मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

(ठाणे जिल्हा वाचनालय) वाचनालय / संदर्भ / नौपाडा

२७ स. १८८५

सदाशिवशास्त्री गोडबोले.

तीर्थयात्राप्रबंध

२७

सं क्र.

(भू प्रवास)

श्री:

SOLD BY
SHRI BHARAT
BOOK DEPOT
POONA CITY

# तीर्थयात्राप्रबंध.

हा ग्रंथ

गणेश सदाशिवशास्त्री लेले त्र्यंबककर

ह्यांनीं तयार केला,

तो

नासिक एथें हरि त्र्यंबक काळे ह्यांच्या नासिकवृत्त छापखान्यांत

छापून प्रसिद्ध केला.

शालिवाहन शके १८०७.

इसवी सन १८८५.

( सन १८६७च्या २५व्या अक्टाप्रमाणें हा ग्रंथ रजिष्टर केला आहे.

[ ह्या ग्रंथासंबंधीं सर्व हक्क ग्रंथकर्त्यानें आपल्याकडे ठेविले आहेत. ]

श्रीः

श्रीमंत रघुनाथराव विठ्ठल ऊर्फ अण्णा

साहेब विंचुरकर,

राजे उमदे तुल्मुल्क बहादर,

दक्षिणेंतील पहिल्या प्रतीचे सरदार,

आणि

कंप्यानियन् आफ्दि मोस्ट एक्झाल्टेड्

आर्डर अफ्दि स्टार आफ् इंडिया,

ह्यांस

हा ग्रंथ त्यांच्या सत्कृत्यांचा दर्शक ह्मणून

ग्रंथकर्त्यानें

अत्यंत आदरपूर्वक नजर केला असे.

# प्रस्तावना.

श्रीमंत रघुनाथराव ऊर्फ अण्णासाहेब विंचुरकर हे दक्षिणेंतील पहिल्या प्रतीचे सरदार आणि विंचूर संस्थानचे चीफ ह्मणजे मुख्य अधिपति आहेत, ही गोष्ट सर्वांस विदित आहेच. अण्णासाहेब हे मोठे उदार, स्वधर्मनिष्ठ व सदाचारसंपन्न असून, दया व विनय इत्यादि अनेक सद्गुणांनीं मंडित आहेत. यांचे हातून धर्मसंबंधाचीं, परोपकाराचीं व लोकोपयोगाचीं अशीं बहुत कृत्यें घडलीं, ह्यामुळें त्यांची कीर्ति सर्वत्र पसरली आहे, व ते अत्यंत लोकप्रिय झाले आहेत! त्यांजवर जशी लोकांची विशेष प्रीति आहे, तशीच इंग्रजसरकारचीही त्यांजवर मोठी मेहेरबानगी आहे. त्यांचे पूर्वज व विंचूर संस्थानचे मूळ संपादक जे प्रख्यात विठ्ठलराव शिवदेव ह्यांस दिल्लीचे बादशाहानें प्रसन्न होऊन "राजे उमदेतुल्मुल्क् बाहादूर" असा किताब दिला; तसाच अण्णासाहेब ह्यांची राजनिष्ठा आणि मनःपूर्वक सद्वर्तन हीं पाहून चक्रवर्तिनी महाराणीसाहेब ह्यांनीं प्रसन्न होऊन संतोषानें त्यांस "कंप्यानियन् ऑफ्दि मोस्ट् एक्झॉल्टेड् आर्डर ऑफ्धिस्टार् ऑफ् इंडिया" हा किताब दिला आहे.

अण्णासाहेबांसारख्या थोर पुरुषाचें चरित्र लिहिलेलें असणें योग्य व अवश्य आहे, आणि याच हेतूस्तव थोडे दिवसांपूर्वीं आमचे मित्र रा॰ रा॰ हरि रघुनाथ गाडगीळ ह्यांनीं एक नामांकित, विद्वान्, व माहितगार, अशा गृहस्थाच्या साहाय्यानें त्यांच्या एकंदर घराण्याचा इतिहास पुणें येथें छापून प्रसिद्ध केला. ह्या इतिहासांत त्या घराण्याचे मूळ पुरुष विठ्ठलराव शिवदेव ह्यांजपासून तों रघुनाथराव अण्णासाहेब ह्यांजपर्यंत एकंदर सहा पुरुषांचीं चरित्रें वर्णिलीं आहेत. त्या ग्रंथांत अण्णासाहेब ह्यांचा संक्षिप्त इतिहास आलाच

---

टीप.—या पुरुषांचीं नांवें अनुक्रमें अशीं आहेत.

१ मूळपुरुष विठ्ठलराव शिवदेव.
२ रे खिनानी विठ्ठल. ( विठ्ठक

आहे, तथापि त्यांच्या तीर्थयात्रा व धर्मकृत्यें, तशींच त्यांनीं केलेलीं साधुपुरुषांचीं दर्शनें व सेवा, ह्यां विषयीं एक स्वतंत्रच ग्रंथ असला पाहिजे, अशा समजुतीनें गाडगीळ ह्यांनीं त्या इतिहासांत ह्या संबंधीं तपशिलवार मजकूर लिहिला नाहीं. सबब त्यांनीं ( अण्णासाहेब ह्यांनीं ) केलेल्या तीर्थयात्रा इत्यादि हा त्यांचे चारित्रांतील सारभूत व विशेष महत्वाचा भाग आहे, असें समजून त्या संबंधाचा एक लहानसा वेगळाच ग्रंथ लिहावा असें मनांत आणून आह्मी त्यांचें साहित्य जमा केलें. त्यांत अण्णासाहेब ह्यांच्या प्रत्येक वेळेच्या देशपर्यटनासंबंधीं जमाखर्चाच्या यादी, प्रत्येक क्षेत्रीं व तीर्थीं तीर्थविधि वगैरे जीं धर्मकृत्यें करण्यांत आलीं त्यांचीं टांचणें व त्यांच्या बरोबरच्या मंडळींनें त्या त्या वेळेस देश संबंधीं लिहून ठेवलेलीं कांहीं टिपणें, अशा प्रकारचे कागद आह्मांस जितके मिळाले तितके मिळवून, व त्यांत मंडळीच्या मुखजबानीची जी माहिती मिळाली तीही सामील करून, त्या आधारानें पुढील ग्रंथ तयार केला आहे. ह्या ग्रंथांत प्राधान्यें करून तीर्थयात्रांचें वर्णन आलें आहे, ह्मणून ह्यास "**तीर्थयात्राप्रबंध**" असें नांव दिलें आहे.

**देश** व काल ह्यांस अनुलक्षून ह्या ग्रंथाचे चार भाग कल्पिले आहेत. त्यां पैकीं पहिल्या भागांत उत्तरहिंदुस्थानांतील देशाटन आणि त्रिस्थळी ( काशी, प्रयाग, व गया, ) इत्यादि महातीर्थें, ह्यांच्या यात्रांचें वर्णन आलें आहे. दुसऱ्या भागांत मध्य हिंदुस्थानांतील देशाटन व तीर्थयात्रा ह्यांचें वृत्त लिहिलें आहे. तिसऱ्या

---

शिवदेव यांचे वडील चिरंजीव )
३ रे खंडेराव विठ्ठल. ( शिवाजी विठ्ठल यांचे कनिष्ट बंधु ) .
४ थे नरसिंह खंडेराव. ( खंडेराव विठ्ठल यांचे चिरंजीव. )
५ वे विठ्ठलराव नरसिंह. ( नरसिंह खंडेराव यांचे चिरंजीव. )
६ वे रघुनाथराव विठ्ठल ऊर्फ अण्णासाहेब ( विठ्ठलराव नरसिंह यांचे चिरंजीव. ) हल्लीं विद्यमान.

भागांत दक्षिण हिंदुस्थानांतील देशाटन व तीर्थयात्रा ह्यांचें निरूपण केलें आहे. आणि शेवटच्या म्हणजे चौथ्या भागांत, देवालयांचे जीर्णोद्धार रथोत्सव वगैरे त्यांनीं केलेली मोठाली धर्मकृत्यें, व साधुपुरुषांचीं दर्शनें व सेवा इत्यादिक, ह्यांचें वृत्त लिहून हा ग्रंथ समाप्त केला आहे.

अण्णासाहेब ह्यांनीं ज्या क्रमानें देशाटन व तीर्थयात्रा केल्या त्याच क्रमानें आम्ही त्या त्या क्षेत्राचें व तीर्थाचें वगैरे वर्णन लिहिलें आहे. त्यांत क्षेत्रें, तीर्थें इत्यादिकांची जी प्राचीन माहिती दिली आहे, ती प्रायः त्या त्या क्षेत्रादिकांच्या पुराणप्रसिद्ध माहात्म्यावरूनच दिलीआहे.वजीअर्वाचीन माहिती दिली आहे, ती आमीकडील शोधाअंतीं जी मिळाली ती दिली आहे.

अण्णासाहेब हे देशाटन व तीर्थयात्रा करीत असतां ते ज्या ज्या स्थलीं गेले, आणि तेथें त्यांनीं जो जो विधि व दानधर्म वगैरे केला, त्याची माहिती ह्यांत दिली आहे. ह्या खेरीज प्रवासामध्यें त्यांचा मुक्काम असतां, किंवा ते मार्ग चालत असतां, ज्या ज्या विशेष महत्वाच्या आणि विशेष ध्यानांत धरण्या जोग्या गोष्टी घडल्या, त्यांचा शोध लाववेल तितका लावून आम्ही त्या वाचकांस कळण्याकरितां लिहिल्या आहेत.

ह्याशिवाय अण्णासाहेब ह्यांनीं ज्या साधुपुरुषांचीं दर्शनें घेऊन त्यांची सेवा केली, त्या साधुपुरुषांची मिळवितां आली तितकी माहिती मिळवून तीही या ग्रंथांत दिली आहे.

आतां धर्मसंबंधानें पाहतां ह्या ग्रंथांत अत्यंत पवित्र व पुण्यकारक अशीं क्षेत्रें व तीर्थें इत्यादिकांचें वर्णन आलें आहे, ह्मणून तें वर्णन वाचल्यापासून वाचकांस कांहीं तरी पुण्यांश प्राप्त होईल हें उघड आहे; परंतु ह्या खेरीज ह्या ग्रंथांत दिलेल्या प्राचीन व अर्वाचीन वृत्तांतावरून, व वर्णना वरून जिज्ञासु वाचकांस बहुत प्रका

रची माहिती करून त्यांचें मनोरंजन व्हावें; तसेंच ज्या कोणास यात्रा करण्याची इच्छा असेल तो श्रीमान् असो किंवा गरीब असो त्यास वेगवेगळ्या यात्रांचा क्रम समजून त्या त्या स्थलीं अण्णासाहेब ह्यांनीं केलेल्या कृत्यांवरून स्वसामर्थ्यानुरूप आपल्या स्वतांच्या कर्तव्यांत विषयींचें ही दिक्प्रदर्शन व्हावें असा हा ग्रंथ करण्यांत आमचा एक उद्देश आहे.

ह्या ग्रंथाच्या शेवटीं वाचकांस विशेष माहिती होण्याकरितां दोन परिशिष्टें जोडिलीं आहेत. त्यांपैकीं पहिल्या परिशिष्टांत काशीक्षेत्रांत नित्ययात्रा, पंचक्रोशीयात्रा, इत्यादि चोवीस यात्रा आहेत, त्यांचा क्रम, आणि प्रत्येक यात्रेंतील देवता व तीर्थें ह्यांचीं नामें अनुक्रमानें लिहिलीं आहेत.

दुसऱ्या परिशिष्टांत महायात्रेसंबंधीं मूळचा शास्त्रोक्त विधि कसा आहे व कांहीं काळामागें त्याविषयीं लोकसंप्रदाय कसा चालत होता, व हल्लीं त्या विषयीं लोक प्रवृत्ति कशी झाली आहे, ह्या विषयींचा विचार लिहिला आहे. व शेवटीं शुद्धिपत्र घातलें आहे.

ह्या प्रमाणें आम्हीं हा ग्रंथ यथामति तयार करून सुज्ञवाचकापुढें ठेविला आहे. ह्या ग्रंथांत न्यूनता व दोष बहुत असतीलच त्यांजकडे लक्ष न देतां त्यांत जो गुणलेश असेल, त्याजवरच दृष्टि देऊन त्यांनीं कृपाळूपणें ह्याचा अंगीकार करावा अशी आमची त्यांस विनयपूर्वक प्रार्थना आहे.

गणेशशास्त्री लेले त्र्यंबककर.

(ग्रंथकार.)

| विषय. | पृष्ठ. |
|---|---|
| **प्रस्तावना.** | |
| **पूर्वपीठिका.** | |
| रघुनाथराव यांचें जन्म. | २ |
| "रघुनाथ" हें नाव ठेवण्याचें कारण. | २ |
| मौंजीबंधन व पहिलें लग्न. | ३ |
| विठ्ठलराव तात्यासाहेब यांचा अंतकाळ. | ३ |
| रघुनाथराव यांस दिवाणीचा वगैरे अधिकार मिळाला; त्यांनीं दुसरें लग्न केलें. | ४ |
| रघुनाथराव यांनीं अग्निहोत्र घेतलें. | ४ |
| त्यांचा नित्येचा वर्तनक्रम. | ४ |
| त्यांची प्रपंच संबंधाने स्थिती. | |
| प्रपंच सूखाचा उत्कर्ष. | ५ |
| ज्येष्ठ पत्नीसें गर्भधारण. | ५ |
| प्रापंचिक सुखाचा अपकर्ष. | ६ |
| कन्याजन्म व ज्येष्ठ पत्नीचा अंतकाळ. | ६ |
| कन्येचा अंतकाळ. | ६ |
| रघुनाथराव यांचे चित्ताची उदासीनता. | ७ |
| त्यांचा देशाटनकरण्याचा विचार. | ७ |
| महायात्रेचा निश्चय. | ७ |
| देशाटनाविषयीं पुण्याचे एजंटाचा रुकार. | ७ |
| सरकारची परवानगी. | ८ |
| द्वितीय कुटुंबास घरीं ठेवून ते एकटेच यात्रेस जावयास निघाले. | ८ |
| [ पूर्व पीठिका समाप्त. ] | |
| **भाग १ ला.** | |
| ( प्रारंभ. ) | |
| रघुनाथराव यांचे विंचूर येथून प्रयाण. | ११ |
| त्यांनीं बरोबर घेतलेला सरमजाम. | १२ |
| पहिला मुक्काम सांयखेडें | १३ |
| गोदावरी प्रयुक्त तीर्थविधि. | १३ |
| गोदावरीची उत्पत्ति वगैरे वर्णन. | १३ |
| चांदवड [ चंद्रवट ] | १४ |

| विषय. | पृष्ठ. |
|---|---|
| रेणुकादेवी, कालिकादेवी. | १४ |
| मालेगांव. | १४ |
| लंडिगबारी, ललितादेवी. | १५ |
| धुळे, तापीनदी, सेंधवा-घाट. | १५ |
| माळवा. | १५ |
| महेश्वर, बढवाई, ओम्-कार व कोटीतीर्थ. | १६ |
| अमरेश्वर, उज्जनी, क्षिप्रानदी. | १७ |
| मंगलेश्वर, मंगलग्रहाचें उत्पत्तिस्थान. | १८ |
| भैरवगड, सिद्धवट, शक्तिभेदतीर्थ. | १८ |
| नाथद्वारा. | १८ |
| एकलिंगेश्वर, मेवाडदेश. | १९ |
| काकुडली, द्वारकाधीश. | २० |
| रायसमुद्रतलाव, अजमीर. | २० |
| खाजासाहेब [ पीर ]. | २० |
| पुष्करतीर्थ. | २१ |
| पातालमार्ग. | २२ |
| कृष्णगड, जयपुर. | २२ |
| भरतपुर, मथुरा, वाराह अवतार. | २३ |
| विश्रांतितीर्थ. | २४ |
| रंगेश्वर, गोकर्णेश्वर. | २५ |
| वनयात्रा, बरसानागांव, नंदगांव. | २५ |
| वृंदावन. | २६ |
| गोवर्धनपर्वत, कुसुमसरोवर, मानसीगंगा. | २७ |
| गोकुळ, ब्रह्मांडतीर्थ. | २७ |
| बलदेव, अग्राशहर. | २८ |
| खांडववन, अचलेश्वर. | ३० |
| कोलची छावणी, मरठची छावणी. | ३१ |
| मयासुराचेंस्थान, सूर्यतीर्थ | ३१ |
| मुजफरशहर | ३१ |
| हरिद्वार [ मायापुरी ] | ३१ |
| कुशावर्ततीर्थ. | ३१ |
| विष्णुतीर्थ, ज्वालापुर, कनखलतीर्थ. | ३२ |
| दक्षेश्वरलिंग, बिल्वतीर्थ, बिल्वेश्वर, | ३३ |
| नीलगंगा, नीलपर्वत, नीलेश्वर, | ३३ |
| श्रीचंडी, गौरीशंकर, गणेशतीर्थ. | ३३ |
| हृषीकेश, कुब्जाम्रकतीर्थ. | |
| तपोवन, देवप्रयाग. | ३४ |

| विषय. ( भाग १ ला. ) | पृष्ठ. | विषय. ( भाग १ ला. ) | पृष्ठ. |
|---|---|---|---|
| वागीश्वर, श्रीनगर. | ३५ | नारायणमूर्ति [सुवर्णाची] | ४९ |
| कमलेश्वर, भिल्लकेदार. | ३७ | ब्राह्मणीगांव, कुबेरशिला, | |
| शिवगंगातीर्थ क्रौंचपर्वत, | | कुबेरगंगा, ऋषिगंगा, श्री | |
| रुद्रप्रयाग. | ३८ | बदरीनारायण, अग्नितीर्थ, | |
| कूर्मक्षेत्र [ कुमारकोटी ] | | नारदतीर्थ. | ५० |
| ध्यानबदरी. | ३८ | कूर्मधारातीर्थ, नरपर्वत, | |
| गुप्तकाशी, नारदक्षेत्र, | | नारायणपर्वत, गरुडशिला | |
| त्रियुगीनारायण. | ३९ | वराहशिला इत्यादि पांच | |
| हिमालयपर्वत, गौरीकुंड. | ४० | शिला. | ५१ |
| मंदाकिनी, केदारनाथ | ४१ | ब्रह्मकपाल. | ५४ |
| रेतोदक. | ४२ | स्वर्गारोहणमार्ग, मूर्तिनामें | |
| भृगुपतन, अलकापुरी, | | नरनारायणमाता. | ५६ |
| कुबेरगंगा, उखीमठ. | ४५ | कलापग्राम, काळीभित, | |
| अगस्त्याश्रम, वैतरणीनदी | | व्यासाश्रम. | ५६ |
| तुंगनाथपर्वत, तुंगगंगा. | ४६ | सरस्वतीनदी, वसुधारा- | |
| तुंगनाथलिंग, कर्णप्रयाग | ४७ | तीर्थ. | ५६ |
| कर्णगंगा, नंदप्रयाग, नं- | | हरिद्वारास तीर्थें व देव | |
| दगंगा. | ४७ | स्थानें आहेत त्यांची नावें. | ५९ |
| पिंपळकोटीगांव, गरुडगं- | | हरिद्वारापासून लक्ष्मणझु | |
| गा. | ४८ | ल्यापर्यंतचीं तीर्थें व देव | |
| व्यासाश्रम, व्यासगंगा, | | यांचीं नावें. | ६० |
| जोशीमठ. | ४८ | देवप्रयागास तीर्थें व देव | |
| हस्तामलकस्थान, विष्णु- | | स्थानें आहेत त्यांची नावें. | ६० |
| प्रयाग, विष्णुगंगा. | ४८ | श्रीनगरास तीर्थें व देव | |
| पंडुकेश्वर, वैखानसतीर्थ. | ४९ | स्थानें आहेत त्यांची नावें. | ६० |

| विषय. ( भाग १ ला. ) | पृष्ठ. | विषय. ( भाग १ ला. ) | पृष्ठ. |
|---|---|---|---|
| केदार येथें तीर्थें व देव- | | सन्निहत्यतीर्थ. कुरुध्यज- | |
| स्थानें आहेत त्यांची नावें. | ६० | तीर्थ. | ७० |
| केदारापासून बदरीनाराय | | ज्योतीश्वर, अर्जुनास गी | |
| णापर्यंतच्या तीर्थांची व दे | | ता सांगितली तें स्थान, | |
| वस्थानांचीं नावें. | ६१ | विश्वरूपेश्वर, कुरुतीर्थ, | |
| ज्योतीमठ ( जोशीमठ ) | | कुरुराजा. | ७० |
| येथील देवस्थानें. | | बाणगंगा, वशिष्ठविश्वा- | |
| बदरिकाश्रमांतील तीर्थें | | मित्राश्रम. | ७१ |
| व देवता. | ६२ | स्थाणुकेश्वर,तीर्थांचींनावें. | ७१ |
| पर्वतांचीं व रस्त्यांचीं प्रा | | देवतांचीं नावें. | ७२ |
| कृत नावें. | ६४ | शुकताल. | ७३ |
| वनगाई. | ६५ | परीक्षितगड, धर्मतीर्थ. | |
| कस्तूरीमृग, वनस्पति. | ६६ | गांधारेश्वर, शुक्रतीर्थ, स | |
| रघुनाथराव यांचें हरिद्वा | | प्तऋषिस्थान. हस्तनापुर, | |
| रास परत येणें. | ६७ | गजराजेश्वर.चीरेश्वर. क | |
| पाणिपतगांव,सोनपतगांव | ६७ | र्णगंगा,बुढ्ढगंगा[वृद्धगंगा] | |
| दिल्लीशहर. | ६७ | गणमुक्तेश्वर. | ७४ |
| कुतुबनावाचेंस्थान. [ मु- | | पुष्पावती [ अंबरीष रा- | |
| सलमानाचें ] | ६८ | जाची राजधानी. ] | ७५ |
| पृथूदकतीर्थ. | ६८ | कर्णघाट.रामघाट, वारा | |
| जुनीदिल्ली,खांडववन, इंद्र | | क्षेत्र. | ७६ |
| प्रस्थ. | ६९ | फरकाबाद, कमलगंज,श्री | |
| निगमोद्बोधतीर्थ. | ६९ | गीरामपुर. | ७६ |
| करनालछावणी,कुरुक्षेत्र, | | सोमेश्वर. | ७७ |
| लक्ष्मीतीर्थ. | ७० | क्षीरवर्गेश्वर. | ७८ |

अनुक्रमणिका.


| विषय (भाग १ ला.) | पृष्ठ |
|---|---|
| कानपुर [कर्णपुर] कर्णतीर्थ. | ७९ |
| ब्रह्मावर्त (शेवटील बाजीरावसाहेब यांची भेट व रघुनाथराव यांचा तेथें मुकाम असतां काय घडलें तें. | ८० |
| ब्रह्मावर्तवर्णन. | ८४ |
| वाल्मीकऋषीचाआश्रम. | ,, |
| कानपुर, लखनौ | ८५ |
| श्वेतपिंपळ. | ८९ |
| अयोध्या, स्वर्गद्वारतीर्थ. | ९० |
| हनुमानगढी, रामजन्मस्थान सप्त [सात] हरिस्थानें. | ९१ |
| सरयूनदी, तमसानदी. नंदीग्राम,त्रिवेणी,सोमेश्वर, इत्यादि स्थानें. | ९३ |
| वेणीमाधव, अक्षय्यवट, दशाश्वमेधतीर्थ, तारागंजगांव, कीटगंजगांव. | ९४ |
| प्रयागवर्णन. | ९५ |
| बाळाजीपंत नातू यांची भेट. | ९६ |
| विंध्यवासिनी, विंध्याचल (पर्वत.) | ९७ |

| विषय (भाग १ ला.) | पृष्ठ. |
|---|---|
| महाकाली, महासरस्वती, त्रिकोणतीर्थ, मिरजापुर. | ९८ |
| मनवाडी. | ९९ |
| काशी [क्षेत्र] चक्रपुष्करिणी. | ९६ |
| पंचतीर्थीयात्रा. | ९९ |
| मणिकर्णिकेंत तात्यासाहेब यांचा अस्थिप्रक्षेप. | १०० |
| काशींत असतां रघुनाथराव यांचा नित्यक्रम. | १०० |
| वृद्धकालकूप. | १०१ |
| गोविंदबावा अंमळनेरकर यांची भेट. | |
| बाबाआपटे यांची भेट | १०१ |
| शिमग्याचासण. बुढ्ढामंगळ | १०२ |
| दंगलमेळा, जंगलमेळा. | १०४ |
| पंचक्रोशी यात्रा प्रकार. | |
| अंतर्गृहीयात्रा. | १०६ |
| [रघुनाथराव यांनीं पंचक्रोशी यात्रा केली तिचा अनुक्रम.] ज्ञानवापीवंदन, विश्वेश्वराची पूजा, मणिकर्णिकास्नान, आससिंगम, कर्दमेश्वर, कर्दमतीर्थ, भीमचंडीदेवी, | १०७ |

| विषय [ भाग १ ला. ] | पृष्ठ. | विषय. [ भाग १ ला. ] | पृष्ठ. |
|---|---|---|---|
| गंधर्वसागरतीर्थ, रामेश्वर, | | हरिश्चंद्राची मठी. | १२३ |
| वरुणानदी [ तीर्थ ] | | हरिश्चंद्रेश्वर, मार्कंडेश्वर. | १२४ |
| वृषभध्वजेश्वर, कपिलधा | | कालाष्टक. | १२५ |
| रातीर्थ. | १०८ | प्रायश्चित्तार्थ पुनःपंचक्रो- | |
| साक्षीविनायक, मोक्षमंड | | शी यात्रा. | १२६ |
| प, विश्वेश्वरदर्शन. | १०९ | रघुनाथराव यांची काशी | |
| बाबाआपटे यांची पंच- | | यात्रा समाप्ति व गया | |
| तीर्थी यात्रा. | | यात्रेचा उपक्रम, कर्मना- | |
| बाळाजीपंत नातू यांचा | | शानदी. | १२७ |
| अंतकाळ. | ११० | सुवर्णभद्रनद, पुनःपुना- | |
| झांशीचे संस्थानिक गंगा | | नदी, मगधदेश, च्यवना | |
| धरराव बाबासाहेब यांची | | श्रम, राजगृह | १२७ |
| भेट. | १११ | गया, फल्गुनदी, गदाधर, | |
| जंगबाहादूर यांची भेट. | | विष्णुपद. | १२८ |
| श्री नरसिंहजयंती बद्दल | | मधुस्रव, प्रेतपर्वत, रामप- | |
| वसंतपूजा. | १११ | र्वत, ब्रह्मकुंड, प्रेतब्राह्मण. | १२९ |
| काशी येथें दारू पेटून | | रामकुंड, वटवृक्ष काकबली | |
| अनर्थ झाला तो. | ११२ | षोडशीब्राह्मण, गयाश्राद्ध | |
| काशीक्षेत्राचें वर्णन. | ११३ | विधि, खापर [ सरमजा- | |
| रामनगर, शिवगया. | ११५ | माचें टोपलें ]. | १३० |
| मास, ऋतु, इत्यादिपरत्वें | | पंचतीर्थी, उत्तरमानस, चंद्र | |
| विशेष उत्सव. | | कुंडतीर्थ, फल्गुपयोष्णी, | |
| रामलीला. | ११६ | सूर्यकुंडतीर्थ, उदीच्यतीर्थ. | १३१ |
| अन्नसत्रें. | ११७ | कनखलतीर्थ, पित्रेश्वर, पि | |
| कार्तिकस्नान माहात्म्य | ११९ | तामहेश्वर, प्रपितामहेश्वर, | |

| विषय. [ भाग १ ला. ] | पृष्ठ. | विषय. [ भाग १ ला. ] | पृष्ठ. |
|---|---|---|---|
| गदाधरपूजा, धर्मारण्य, | | आदिगया, धौतपद, भीम | |
| सरस्वती. मतंगतीर्थ,मतं- | | गया,गोप्रचार,गोपद, वै- | |
| गेश्वर, यूपस्थान. | | तरणीतीर्थ, विष्णुश्राद्ध, | |
| यूपकूप, बुधगया, अश्वत्थ | १३१ | [ न्यूनातिरिक्तदोषशांति- | |
| वृक्ष, जगन्नाथ, ब्रह्मसरोव | | कर श्राद्ध ] त्रिसंध्या, १ | |
| रतीर्थ, आम्रवृक्ष, आदिग | | गायत्री, २ सावित्री. | १३७ |
| दाधर,धर्मेश्वर, अष्टादश | | रुद्रयोनी, ब्रह्मयोनी, सर- | |
| पदें. | १३२ | स्वती, विष्णुपदमहापूजा, | |
| १ कश्यप, २ अगस्ति | | दीपदान, फल्गुपूजा, गदा | १३८ |
| ३ क्रौंच. ४ मतंग, ५ क | | धरपूजा, विष्णुपदाची. पु | |
| ण्व, ६ दधीचि, ७ गणेश, | | नःमहापूजा,गयावर्णन,सा | |
| ८ चंद्र, ९ आहवनीय, | | हेबगंजगांव. | १३९ |
| १० दक्षिणाग्नि, ११ इंद्र, | | रघुनाथराव यांचे गयेहून | |
| १२ सूर्य, १३ गार्हपत्य, | १३३ | काशीस परत येणें, व ग | |
| १४ आवसथ्य, १५ स- | | यायात्रेची समाप्ति. | १४० |
| भ्य, १६ कार्तिकेय, १७ | | प्रयागास परत येणें. | १४० |
| ब्रह्म, १८ रुद्र. | | कानपुर. | १४० |
| विष्णुपदविधि. | १३३ | ब्रह्मावर्त येथें परत येणें. | १४१ |
| रुक्मिणीतीर्थ, गदालोल- | | बाजीरावसाहेब यांचा अं | |
| तीर्थ, अक्षयवट, गयावळ | | तकाळ,व तत्संबंधी गोष्टी. | १४१ |
| बिदागी. | १३४ | रघुनाथरावहे ब्रह्मावर्ताहून | |
| गयाक्षेत्रसंबंधीयात्रा, रा | | स्वदेशी येण्यास निघाले. | १४२ |
| मगया. मधुस्रव, पुंडरीका | १३६ | कनोजशहर [ कान्यकुब्ज] | १४३ |
| क्ष, गयाशिर, गयाकूप मं | | अश्वतीर्थ. | १४४ |
| गलागौरी, मुंडपृष्ठ. | | शृंगीरामपुर, धवळपुर, च | |

| विषय. ( भाग १ ला. ) | पृष्ठ. | विषय. ( भाग २ रा ) | पृष्ठ |
|---|---|---|---|
| मण्वती [ चमेलनदी ] | १४५ | श्रीत्र्यंबकेश्वर ज्योतिर्लिंग | १५८ |
| मुचकुंदतीर्थ. | | गंगापुर, धोतपापतीर्थ, क्षुधांबिकादेवी, जलालपुर. | १६२ |
| वटेश्वरक्षेत्र | १४७ | नासिकक्षेत्र [ या क्षेत्राचें वर्णन. ] | १६३ |
| संबळगड, सोनकचगांव [ प्रांतमाळवा. ] | | सप्तशृंग [ येथील स्थलाचे वर्णन ] | १६७ |
| धुळे, मालेगांव, विंचूरइलाखा. टांकळीगांव, शेवटीं रघुनाथराव यांचें विंचुरास येऊन दाखल होणें. | १४८ | शेवालयतीर्थ कालीतीर्थ. | १६८ |
| गंगापूजन व, गंगागोदा भेट. | १४९ | मार्कंडेयपर्वत, वणीगांव, अगस्त्याश्रम. | १६९ |
| महायात्रेची समाप्ति [ मांवदें ] देणग्या वगैरे | १५० | कोंपरगांव, शुक्रेश्वर, कचेश्वर, श्रीविष्णु. | १७० |
| [ पहिला भाग ] समाप्त. | | गोवर्धनधारीदेव नारदीनदी. | १७१ |
| | | वेरूळ घृष्णेश्वर. | १७२ |
| | | रोजागांव टोंकें प्रवरानदी | १७३ |
| भाग २ रा. | | सिद्धेश्वर [ त्र्यंबकेश्वराचें उपलिंग. ] | १७४ |
| कथा संगति. | १५१ | | |
| यात्रावृत्त प्रारंभ. | १५२ | नेवासें. [ मोहनीराजदेव ] | |
| विंचूर येथून प्रयाण. | १५३ | बेलापुर. | १७५ |
| श्री त्र्यंबक क्षेत्रास गमन | १५३ | भीमाशंकर, भीमानदी, ( भीमरथी ) | १७६ |
| श्री त्र्यंबकक्षेत्र वर्णन. | १५३ | | |
| श्रीगोदावरीची उत्पत्ति. | १५४ | औझर, खेड. | १७७ |
| कुशावर्ततीर्थ. | १५६ | देहू, अळंदी, सिद्धेश्वर. | १७८ |
| श्रीबल्लाळविनायक. | १५८ | थेऊर, [ श्रीगणपतिस्था- | |

| विषय. ( भाग २ ला. ) | पृष्ठ. | विषय. ( भाग २ ला. ) | पृष्ठ. |
|---|---|---|---|
| न ], तुळापुर. | १७९ | श्रीभुवनेश्वरीदेवी. | २१८ |
| जेजुरी. [ श्रीमल्लारीमार्त | | रामतीर्थ. | २२० |
| ड देव. ] | १८० | शूरपालक्षेत्र, जमाखिंडी, | |
| मोरेश्वर. [ श्री गणपति- | | गलगली. | २२१ |
| स्थान. ] | १८२ | शाकंभरीदेवी. | २२३ |
| शंभुमहादेव, शिंगणापुर- | . | तिलकवन. | २२३ |
| गांव. | १८३ | बदामी, [ किल्ला ] पर्वती | |
| जातेंपोतें. | १८४ | गांव, महाकूटक्षेत्र. | २२४ |
| श्री नरसिंहपुर. | १८५ | लज्यागौरी, अहिवल्लीगांव | २२५ |
| श्री नरसिंहपुराची अर्वा- | | पटत्कलगांव, संगमेश्वरम | |
| चीन माहिती. | १९८ | हादेव, सं०क्षेत्र. | २२६ |
| बारशी, [श्रीभगवंतदेव ] | २०५ | छायाभगवती क्षेत्र. | २२७ |
| तुळजापुर, [ देवी ] | २०७ | चितापुरगांव, कनकगिरि | |
| पंढरपुर. [ पंढरीनाथ अ | | ( नृसिंहक्षेत्र. ) | २२८ |
| थवा विठ्ठलदेव. ] | २०८ | कनकगिरि येथील श्रीवै- | |
| [illegible], कोळानृसिंह. | २११ | ष्णव ह्मणजे रामानुज म | |
| [illegible]गोरगांव, रामेश्वर, | | तानुयायी लोक यांचे सं | |
| को[illegible]पुर, [करवीरक्षेत्र.] | २१२ | बंधानें रामानुज मध्व व | |
| [illegible]र्वत. [ जेथील शिव | | शंकराचार्य यांचीं मतें. | २३० |
| [illegible]केदारेश्वराचें | | हंपीविरूपाक्ष, तुंगभद्रानदी | २३० |
| [illegible]ग ठाय. ] नरसोबा | | विद्यानगर. | २३३ |
| [illegible] | २१४ | कोदंडधारीराम, चक्रतीर्थ. | २३४ |
| [illegible]पुर. | २१६ | यंत्रोद्धारमारुती, विजय- | |
| [illegible], औदुंबरक्षेत्र. | | विठ्ठलदेव. | २३४ |
| [ श्री गुरुदत्तमहाराज. ] | २१७ | अच्युतपुर, कृष्णपुर. | २३५ |

| विषय. ( भाग २ रा. ) | पृष्ठ. |
|---|---|
| किष्किंधा. ( अनीगोंदी ) | २३६ |
| कपिलाश्रम, अंजनीपर्वत, पंपासरोवर, ऋष्यमूकपर्वत, | २३६ |
| माल्यवान्पर्वत, नववृंदावनें. | २३७ |
| श्रीरंगनाथ. (गविरंगनाथ) | २३७ |
| कंपलीगांव. [ कूर्मक्षेत्र. ] | २३८ |
| रघुनाथराव यांचा कपिलाश्रमीं चातुर्मास्यवास. | २३९ |
| गंडीनरसिंह. | २४० |
| सिद्धटेक. | २४० |
| आवींगांव. | २४१ |
| गुरुलाश्रम, अश्वत्थवृक्ष. | २४१ |
| रघुनाथराव हे नासिकास येऊन त्र्यंबकक्षेत्रीं रथ समर्पणार्थ गेले, तेव्हा पासून तेथें वार्षिक रथोत्सव चालू झाला. | २४१ |
| रघुनाथराव यांनीं नरसिंहपुरास जाऊन तेथील देवालयाच्यां जीर्णोद्धाराचा उ[illegible] | २४३ |
| र[illegible]थराव यांनीं विचुरा [illegible] [illegible]ल कांहीं भाग एथील तीर्थयात्रा केल्या त्यांची सांगता करून समाप्ति केली. | २४३ |

[ दुसरा भाग समाप्त. ]

( भाग ३ रा. )

प्रारंभ.

| विषय. ( भाग ३ रा. ) | पृष्ठ. |
|---|---|
| ग्रंथसंगति व यात्रेचा उपक्रम. | २४४ |
| रघुनाथराव यांचें विंचुराहून प्रयाण. | २४४ |
| कडपस्टेशन, अक्कलकोट. | २४५ |
| कलबुर्गी, शाहाबाद. | २४६ |
| गदवाली, गुत्ती, ताडपत्री कद्दपा वगैरे शहरें, व बल्लारी. | २४६ |
| सोंडुरगांव, लोहाचल. ( पर्वत ) | २४७ |
| कार्तिकस्वामी. | २४८ |
| गोविंदराजपट्टण, कपिलधारातीर्थ, वेणुगोपाळ, लक्ष्मीनारायण, कपिलेश्वर, शेषशायी, त्रिचिनीगांव, सुब्रह्मण्यदेव. | २५४ |
| अर्कोणस्टेशन. | २५६ |

| विषय (भाग ३ रा) | पृष्ठ. |
|---|---|
| कांचीमंडल, शिवकांची, सर्वतीर्थ, एकांबरेश्वरदेव. | २१७ |
| कामाक्षीदेवी. | २१८ |
| विष्णुकांची, हस्तिगिरी. [ पर्वत ] | २५९ |
| मद्रासशहर | २५९ |
| पार्थसारथिस्थान. | २६० |
| दक्षिणवृंदावन, कपालेश्वर, रत्नाकरसमुद्र, कैरविणी वगैरे तीर्थें. | २६१ |
| चिन्नापटण, रघुनाथराव हे ही यात्रा करून परत विंचुरास येऊन त्यांनीं यात्रेची समाप्ति केली. | २६१ |
| [ तिसरा भाग समाप्त. ] | |

भाग ४ था.

| विषय (भाग ४ था) | पृष्ठ. |
|---|---|
| रघुनाथराव यांनीं केलेलीं सत्कृत्यें आणि सत्पुरुषांचीं दर्शनें इत्यादि यांच्या यादी. | |
| [ सत्कृत्यांची याद. ] | |
| १ अग्निहोत्र. | २६३ |
| २ तीर्थयात्रा. | २६४ |
| १ महायात्रा. [उत्तरहिंदुस्थानांतील यात्रा यांचें वर्णन पहिल्या भागांत आहे.] | २६४ |
| २ मध्यदेशांतील यात्रा [ यांचे वर्णन दुसऱ्या भागांत आहे ] | |
| ३ दक्षिण भागांतील यात्रा, [ यांचे वर्णन तिसऱ्या भागांत आलें आहे. ] | |
| ३ इतिहास व पुराणें यांचें श्रवण. | २६४ |
| ४ वेदश्रवणाचा उपक्रम. | २६९ |
| १ ऋग्वेदश्रवण. ऐतरयेब्राह्मण. | २६५ |
| २ यजुर्वेदश्रवण. हिरण्यकेशीय शाखा. [ कृ० य० ] | २६६ |
| वाजसनेयीशाखा. [ शुक्लयजु० ] | |
| मैत्रायणीयशाखा. [ कृ० यजु० ] | |
| कण्वशाखा. [शु० य.] | २६७ |
| आपस्तंबशाखा. [ कृ० यजु० ] | २६७ |

| विषय. ( भाग ४ था. ) | पृष्ठ. |
|---|---|
| ३ सामवेदश्रवण. | २६६ |
| कौथुमीशाखा. | |
| राणायणीयशाखा. | |
| ४ अथर्वणवेदश्रवण. | २६७ |
| ५ मन्वादिस्मृतींचें श्रवण | २६८ |
| ६ वेदभाष्यश्रवणाचा उपक्रम. | २६८ |
| १ ऋग्वेदभाष्य. | २६९ |
| २ यजुर्वेदभाष्य. | " |
| लोकोपयोगी कृत्ये. | |
| १ [ विंचूर येथील. ] | २७० |
| १ पाण्याचे हौद बांधिले. | २७० |
| २ श्री नृसिंहाचा रथोत्सव चालू केला. | २७० |
| २[ नाशिक येथील ] | |
| १ पंचवटींतील रामास दसऱ्याचे स्वारी करितां नेमणुक चालू केली. | २७१ |
| ३ [ श्रीत्र्यंबकक्षेत्रीं केलेलीं कृत्यें. ] | |
| १ संततधारेचें अनुष्ठान. | २७२ |
| २ नागनारायणबळीच्या धर्मशाळेचा जीर्णोद्धार | २७२ |

| विषय. ( भाग ४ था. ) | पृष्ठ. |
|---|---|
| ३ श्रीत्र्यंबकेश्वराच्या देवळावर सोनेरी मुलाम्याच्या कळसांचें स्थापन. | २७२ |
| ४ श्रीत्र्यंबकेश्वरास रथ समर्पण व वार्षिक रथोत्सव चालू. | २७१ |
| ५ श्री कुशावर्ततीर्थावरील देवळांवर सो० मु० कळसांचें स्थापन. | २७२ |
| ६ श्रीत्र्यंबकेश्वराचे देवळास चुन्याची टीपगारी. | २७२ |
| ७ श्रीत्र्यंबकेश्वराचे देवळावर सोन्यारुप्यानें मढविलेल्या ध्वजाचें स्थापन | २७३ |
| ८ श्री कुशावर्ततीर्थावर जाण्यास सडक व पूल. | २७३ |
| ९ श्री निवृत्तिनाथाचे समाधीस पूजा नैवेद्याची नेमणूक. | २७३ |
| १० श्री त्र्यंबकेश्वरास वेळोवेळीं महापूजा | २७३ |
| ११ उंचीवस्त्रें, श्वेतछत्र सांडवूप, यांचें श्री त्र्यंबकेश्वरास अर्पण. | २७३ |
| १२ वृषोत्सर्ग. | २७३ |

| विषय. ( भाग ४ था ) | पृष्ठ. |
|---|---|
| १३ तीस शिवलिंगांचें स्थापन. [ तीस शिवलिंगांचीं नावें. ] | २७४ |
| ४ ( श्री नरसिंहपुरक्षेत्रीं केलेलीं धर्मकृत्यें वगैरे.) | |
| १ देवळाचा जीर्णोद्धार. | २७५ |
| २ वेदशाळा स्थापन. | २७५ |
| ३ आरतीसमयीं वेदोक्त व पुराणोक्त मंत्रांनीं देवाची स्तुति करण्याविषयीं योजना. | २७६ |
| ४ संस्कृतशाळा स्थापन. | २७६ |
| ५ मराठीशाळा स्थापन. | २७६ |
| ६ नवीन गरुडवाहनोत्सव | २७६ |
| ७ ध्वजारोपण. | २७७ |
| ८ श्री नृसिंहाचें सिंहासन रुप्यानें मढविलें. | २७७ |
| ९ रघुनाथराव यांनीं पुनः अग्निहोत्र घेतलें. | २७७ |
| (रघुनाथराव यांची तिसरी स्त्री सौ० जानकीबाई हिचा श्री नरसिंहपुर येथें अंतकाळ.) | २७८ |
| १० श्री नृसिंहमूर्तीचें वज्रलेपानें दृढीकरण. | २७९ |

| विषय. ( भाग ४ था ) | पृष्ठ. |
|---|---|
| प्रकरण १ लें. | |
| ११ श्री नृसिंहपुर येथें जानकीश्वरनामें लिंग स्थापन. | २८१ |
| १२ प्रस्थानत्रय ह्मणजे ब्रह्मसूत्र दशोपनिषदें व भगवद्गीता यांचें भाष्यश्रवण | २८१ |
| प्रकरण २ रें. | |
| ( सत्पुरुषांचीं दर्शनें व सेवा. ) | |
| रघुनाथभटजीमहाराज, केशवभटजी. | २८२ |
| रावजी मोडक व त्यांचें शिष्य अण्णाबाबा पुराणिक. | २८३-४ |
| केशवबाबा. | २८४ |
| गोपाळबाबा. | ” |
| बाप्पाबाबा, व महादेवबाबा आराधी त्र्यंबककर. | २८५ |
| मौनीबाबा, ( मुनीबाबा त्र्यंबक येथील. ) | |
| दाजीबाबा आराधी. [ सप्तशृंग येथील. ] | २८६ |
| सखारामबाबा अम्मळनेरकर. | २८७ |
| ब्रह्मानंदबावा. | २८८ |

| विषय. ( भाग ४ था. ) | पृष्ठ. | विषय. ( भाग ४ था. ) | पृष्ठ. |
|---|---|---|---|
| नारायणबावा योगी. | | ६ छपन्नविनायक यात्रा. | [illegible] |
| चंडीरामबावा. | २९१ | ७ बेचाळीसलिंगांची यात्रा. | १९ |
| वेणीमाधव. | | | |
| अयोध्याप्रसाद. | २९२ | ८ एकादशरुद्र यात्रा. | २१ |
| एक तपस्वी मैथिल ब्राह्मण | २९३ | ९ अष्टभैरव यात्रा. | २१ |
| गोविंदबावा अम्मळनेरकर [ सखारामबावा अम्मळनेरकर यांचे शिष्य. ] | २९४ | १० द्वादशादित्य यात्रा. | २१ |
| | | ११ अष्टवसु यात्रा. | २२ |
| | | १२ नवदुर्गा यात्रा. | २२ |
| गोविंदबावा चोपडेकर. | २९५ | १३ नवगौरी यात्रा. | २२ |
| पंडितस्वामी. | २९६ | १४ चतुःषष्टियोगिनी यात्रा. | २३ |
| वासुदेवस्वामी. | २९७ | | |
| यशवंतरावमहाराज ( देवमामलेदार. ) | २९९ | १५ दक्षिणमानस यात्रा. | २४ |
| | | १६ उत्तरमानस यात्रा. | २६ |
| ( प्रकरण २ रें समाप्त. ) | ३०२ | १७ नगरप्रदक्षिणायात्रा. | २९ |
| ( भाग ४ था समाप्त ) | | १८ सप्तऋषि यात्रा. | ३० |
| ( परिशिष्ट १ लें. ) | | १९ अष्टविनायक यात्रा | ३० |
| काशी क्षेत्रांतील २४ यात्रा. | | २० द्वादशज्योतिर्लिंग यात्रा. | ३१ |
| अशक्त इत्यादि लोकां करिता सुगम यात्रा. | ४ | २१ नवग्रह यात्रा. | ३१ |
| | | २२ मोक्षप्रदक्षिणा यात्रा | ३१ |
| १ नित्ययात्रा. ( लहान ) | ५ | २३ अविमुक्त प्रदक्षिणा यात्रा. | ३३ |
| २ नित्ययात्रा. ( मोठी ) | ५ | | |
| ३ अंतर्गृही यात्रा. | ६ | २४ सप्तपुरी यात्रा. | ३४ |
| ४ पंचतीर्थी यात्रा. | ९ | ( परिशिष्ट १ लें समाप्त ) | |
| ५ पंचक्रोशी यात्रा. | ९ | ( परिशिष्ट २ रें.) | |

| विषय. | पृष्ठ. | विषय. | पृष्ठ. |
|---|---|---|---|
| महायात्रा. ( त्रिस्थली यात्रा ) | | अगगाडी चालू झाल्यावरची स्थिती. | ७ |
| महायात्रेचा शास्त्रोक्त विधि. | १ | उपसंहार. | |
| | | ( परिशिष्ट २ रें समाप्त ). | |
| महायात्रेचा अगगाडी चालू नव्हती त्या काळचा संप्रदाय. | ३ | तीर्थयात्रा प्रबंध नामक ग्रंथाची अनुक्रमणिका समाप्त. | |

श्रीः

# तीर्थयात्रा प्रबंध

---

श्रीमंत रघुनाथराव उर्फ अण्णासाहेब विंचूरकर ह्यांनीं देशाटन आणि तीर्थयात्रा केल्या; त्या देशाटनाचा आणि तीर्थयात्रांचाच वृत्तांत लिहून काढावा असा आमचा मुळचा विचार होता. परंतु अण्णासाहेबांसारिख्या गर्भश्रीमंतानें अल्प वयांतच घरदार सोडून आणि प्रापंचिक सुखाचा त्याग करून क्लेशकारक असें देशाटन आणि तीर्थयात्रा, त्याही हिमालया सारिख्या बिकट आणि अत्यंत दुःसह अशा थंडीच्या पाहाडी प्रदेशांत करीत फिरणें, हें पाहून जिज्ञासु वाचकास मोठा चमत्कार वाटेल. आणि असा चमत्कारिक प्रकार घडण्यास कारण काय झालें, व तो ओघ त्यांस कसा प्राप्त झाला, हें समजण्याविषयींची इच्छा त्याला अवश्य उत्पन्न होईल यांत संशय नाहीं. आतां ती वाचकाची इच्छा पूर्ण करण्याकरितां अण्णासाहेब यांची जन्मापासूनच हकीकत लिहावी, ह्मणजे त्यांस देशाटन आणि तीर्थयात्रा करण्यास कारण काय झालें, व तो ओघ कसा आला, हा प्रकार यथास्थितपणें समजून ,त्या खेरीज आणखीही विशेष माहिती कळण्यास साधन होईल. असें जाणून ती हकीकतच पहिल्यानें संक्षिप्त लिहावी, आणि त्यानंतर त्यांचे देशाटन आणि तीर्थयात्रा यांचा वृतांत विस्तारानें लिहावा. असा विचार करून ती हकीकत आह्मी येथें "पूर्वपीठिका" या रूपानें पहिल्या प्रथम लिहितों.

जिचें नांव सत्यभामाबाई, ती हल्लीं विद्यमान आहे.

तात्यासाहेब यांनीं शके १७५४ नंदननाम संवत्सरीं चैत्र शुद्ध १० या दिवशीं सायखेडें ह्मणून श्रीगोदावरीच्या तीरीं विंचूरकर यांचे जहागिरीचा गांव आहे, तेथें मोठ्या समारंभानें रघुनाथराव यांचें मौंजीबंधन केलें. त्यावेळेस त्यांसआठवें वर्ष होतें. तात्यासाहेब हे मोठे शोधक असून कर्ममार्गावर त्यांची अत्यंत श्रद्धा होती, ह्मणून त्यांनीं तीन वर्षे पर्यंत आपले पुत्राचें समावर्तन ह्मणजे सोडमुंज न करितां तितक्या काळांत त्यांजकडून सायंप्रातः अग्निकार्य वगैरे जितके ब्रह्मचाऱ्याचे धर्म करवितां आले तितके करवून शिवाय महानाम्न्यादिक वेदव्रतेंही यथाविधि करविलीं. मौंजीबंधन

नंतर तात्यासाहेब यांनीं मंदूसरचे सरसुभे गणपतराव खटावकर यांची कन्या काशीबाई हीजबरोबर रघुनाथराव यांचें लग्न मोठ्या समारंभानें केलें. हा लग्नाचा उत्सव शके १७५७ या वर्षी वैशाख वद्य दशमी ह्या दिवशीं विंचूर येथें झाला. लग्न

पुढें थोड्याच दिवसांनीं ह्मणजे शके १७५७ ह्याच वर्षी पौष शुद्ध त्रयोदशी रोजीं तात्यासाहेब यांस (त्यांचे वयाचे ४१ वे वर्षी) मस्तकशूलाचे व्यथेनें विंचूर मुकामीं देवाज्ञा झाली. तेव्हां रघुनाथराव यांचें वय सुमारें अकरा वर्षांचें होतें. रघुनाथराव हे अल्पवयी असल्यामुळें तात्यासाहेब यांचे मागें विंचूरसंवस्थानचा कारभार त्यांचे परंपरा कारभारी सालकाढे यांचे घराण्यापैकीं कृष्णाजीशामराव ह्मणून त्या वेळेस होते, त्यांनीं सुमारें चार वर्षे चालविला. पुढें ते वारल्यामुळें आबासाहेब डमढेरे पुणेकर यांनीं तो एकवर्ष चालविला. विठ्ठलरावतात्यासाहेब यांचा अंतकाल

त्यापुढें रघुनाथराव हे स्वतांच तो पाहूं लागले.

दिवाणी फौजदारी अधिकार रघुनाथराव यांस मिळाले

या प्रमाणें रघुनाथराव हे वयांत येऊन आपले संस्थानचें सर्व कामकाज पाहूं लागल्यावर त्यांस शके १७६६ सालीं त्यांचे संस्थान संबंधीं दिवाणी, फौजदारी, मुलकी वगैरे सर्व प्रकारचा अधिकार इंग्रज सरकारांतून मिळाला. तेव्हां त्यांचे कनिष्ठबंधु कृष्णराव उर्फ बापूसाहेब हे रघुनाथराव यांचे विचारें संस्थानचा कारभार चालवूं लागले. रघुनाथराव हे फक्त त्यांजवर नजर मात्र ठेवीत असत. तात्यासाहेब वारल्या नंतर रघुनाथराव यांनीं आपलें दुसरें लग्न केलें होतें. त्या स्त्रीचें नांव रमाबाई, ती कृष्णाजीशामराव सालकाढे कारभारी यांची कन्या होय.

अग्निहोत्र घेणें

रघुनाथराव यांस लहानपणापासूनच वैदिककर्माविषयीं फार आवड होती. त्यांनीं अल्प वयांतच (शके १७६३ यावर्षी) आधान सिद्ध करून अग्निहोत्रकर्मास आरंभ केला होता. तेव्हांपासून त्यांचा प्रतिदिवशीं अन्हिक क्रम चालू झाला तो असा:—

नित्यआन्हिक क्रम

उष:कालीं ह्मणजे पाहांटेस पांच चार घटका रात्रीचे सुमारास उठून भगवच्चिंतन करावें. नंतर शौचविधिमुखमार्जन करून स्नान करावें. पुढें संध्योपासन व जप आटोपून यथाकालीं अग्निहोत्रहोम घ्यावा. नंतर षोडशोपचार पुर्वक इष्टदेवतांचें पूजन करून ब्रह्मयज्ञादिक कर्म आटपावें. नंतर वैश्वदेव अतिथी अभ्यागत यांचें यथावैभव पूजन करून आश्रितवर्ग व बंधुजन यांसहवर्तमान भोजन करावें. तिसरे प्रहराचे सुमारास कांहीं पुराणश्रवण झाल्यावर गांवांतील देवांचीं दर्शनें घेऊन वाड्यांत यावें. नंतर सायंकाळीं पुन्हा स्नान-

संध्या होमादिक सायंतन विधि उरकून मंडळीसहित रात्रीचें भोजन करावें.

ह्याप्रमाणें विहितकर्माचरणांत कालक्षेप होत असतां "धन्यो गृहस्थाश्रमः" इत्यादि वाक्यांनीं ज्या गृहस्थाश्रमाची मोठी धन्यता वर्णिली आहे, त्या गृहस्थाश्रमाचे धर्म पूर्णपणें रघुनाथराव यांचे ठायीं वास करूं लागले असें ह्मणण्यास बाध दिसत नाहीं.

प्रपंचसंबंधानें स्थिति

ही धर्म संबंधानें गोष्ट झाली. आतां धर्म संबंध सोडून केवळ प्रपंच दृष्टीनें पाहिलें असतां, हातांत विंचूरइलाख्याची राज्यसत्ता, जवळ वडिलोपार्जित द्रव्याचा संग्रह, आंगीं लावण्य व तारुण्य यांचा भर, दोन स्त्रीया, त्याही सुस्वरूप व सुशील, बंधुवर्ग आणि आप्तजन ह्यांची अनुकूलता, सेवकवर्ग आज्ञातप्तर, आणि सार्वभौम जें इंग्रज सरकार याचीही मेहेरबानी, या प्रकारें मांडलिकसंस्थानिकास अपेक्षित ज्या गोष्टी, त्या बहुतेक या काळीं रघुनाथराव यांस अनुकूल असल्यामुळें प्रापंचिक सुखाची त्यांस विपुलता प्राप्तझाली. आणि मनास खिन्नता किंवा उदासीनता होण्याचें कांहींच कारण राहिलें नाहीं.

प्रपंच सुखाचा उत्कर्ष

पत्नी गर्भ धारण

या प्रमाणें धर्मसंबंधानें आणि प्रपंच संबंधानें रघुनाथराव हे आपला काल परम सुखांत आणि आनंदांत घालवूं लागले. इतक्यांत त्यांचे ज्येष्ठ पत्नीस गर्भ धारण झालें! तेव्हां पुत्राचीच एक न्यूनता होती ती ही लौकरच पुर्ण होणार, अशा संभवामुळें तर आनंदाची अधिकच वृद्धि होऊन शास्त्रोक्त पुंसवनादि गर्भ संस्कार आणि लौकिक रीतींचीं डोहोळे जेवणें यांचे समारंभ चालू झाले.

या प्रकारें रघुनाथराव यांच्या प्रापंचिक सुखास्थितीचा उत्कर्ष हो

त गेला, तो आह्मी वर सांगितला. आतां त्या स्थितीचा अपकर्ष होण्यास आरंभ होऊन मागें पाऊल कसें येऊं लागलें तो प्रकार सांगतों:-

प्रपंचसुखा चा अपकर्ष

रघुनाथराव यांची ज्येष्ठ पत्नी सौभाग्यवती काशीबाई यांस गर्भधारण झाल्याचें संतोष कारक वर्तमान आह्मी वर लिहिलेंच आहे. या गोष्टीस कांहीं दिवस लोटल्यावर त्यांच्या प्रकृतीस चैन पडेनासें झालें! कधीं ज्वर यावा, कधीं पोटांत शूळ व्हावा, अन्न पचन होऊं नये, ग्लानि यावी. असे विकार होऊं लागले. तेव्हां डोहोळे जेवणाचे वगैरे सोहोळे एकीकडेस राहून गर्भिणीची प्रकृति बरी असो ह्मणून औषधोपचारांचीच खटपट चालू झाली! अशारीतीनें सरासरीं पूर्ण दिवस भरून काशीबाई ह्या भाद्रपद वद्य ९ शके १७६९ रोजीं प्रसूत जाल्या. तों पुत्र न होतां कन्याच

कन्याजन्म

झाली! आणि प्रसूत होण्यासही बहुत कष्ट झाले! दहा दिवस पार पडल्यावर, पुढें प्रकृति फारच बिघडली. आणि कांहीं दिवसांनीं तर प्रसूति रोगाचीं लक्षणें स्पष्ट दिसूं लागलीं! तेव्हां रघुनाथराव यांनीं मोठमोठे नामांकित वैद्य मिळवून त्यांचे उपचार चालविले. तथापि कांहीं गुण न वाटतां त्या रोगाचाच जोर होऊन शेवटीं त्याच रोगानें

सौ० काशीबाईचा अंतकाल

त्या स्त्रियेचा काळ झाला! ही दुःखकारक गोष्ट शके १७७० आषाढ वद्य ८ या दिवशीं घडली! हें दुखणें या स्त्रीनें सरासरी दहा महिनें पावेतों भोगिलें. तिच्यापाठीमागें तिची तान्ही मुलगी होती तिची

कन्येचा अंत

चांगली सुश्रूषा व्हावी ह्मणून दायी व दुसऱ्या जाणत्या बायका यांची योजना करून रघुनाथराव यांनीं उत्तम व्यवस्था ठेविली; परंतु ती मुलगी आपले आईचे मागें फार दिवस वांचली नाहीं!

असा विपरीत प्रकार घडून आल्यामुळें रघुनाथराव यांस अत्यंत अनिष्ट अशा दोन गोष्टी घडल्या. एकतर प्रियपत्नीचा वियोग, आणि दुसरी अग्निहोत्राचा विच्छेद. अशा कारणानें रघुनाथराव यांचे चित्त अत्यंत उदास होऊन प्रपंचांतून उठल्यासारखें झालें. सर्वदां मनाची व्यग्रता होऊन स्वस्थतेनें कालक्रमण होईना, आणि रात्रंदिवस मनाला फार हुरहुर वाटूं लागली! र० याचे चित्ताची उदासी

अशी उदासीनता आणि खिन्नता झाली असतां रघुनाथराव यांचे मनांत असा विचार आला कीं, कांहीं दिवस उत्तर हिंदुस्थानांत देशाटण करून तीर्थयात्रा कराव्या. ह्मणजे ठिकठिकाणचे चमत्कार दृष्टीस पडून मनाचें रंजन होईल, आणि तेणेंकरून दुःखाचा विसर पडेल! देशाटनाचा विचार

ह्या विचार त्यांच्या मनांत कांहीं दिवस घोळत होता. शेवटीं तो त्यांनीं आपले बंधू वगैरेस कळविला. परंतु बाहेर जाण्यास कोणीही रुकार देईना. तथापि तो विचार त्यांचे मनांत दृढ झाला आणि त्यांनीं माहायात्रेस जाण्याचा निश्चय करून तयारी केली. आणि आपले पाठीमागे आपले संस्थानचा बंदोबस्त यथास्थित राहून त्या संबंधीं कामकाज सुयंत्र चालण्याची तजविज केली. आपण यात्रेस गेल्यावर मागें सरकारी कामासंबंधीं कांहीं आडचण पडूं नये, व यात्रा करीत असतां त्या कार्यांत आपल्यास कांहीं हरकत होऊं नये, ह्मणून त्यांनीं पुण्यास जाऊन त्या वेळीं ब्राउन साहेब ह्मणून एजंट होते, त्यांची भेट घेतली. आणि त्यांस तीर्थयात्रा करून देशपहाण्याचा आपला हेतु आहे असें कळविलें. दुसरें असें कळविलें कीं, मी यात्रेस गेल्यावर माझे मागें माझे बंधू कृष्णराव हे महायात्रेचा निश्चय त्याविषयीं पुण्याचे एजंटास कळविणें

संस्थानचें सर्व काम पाहतील, व कोणतेही गोष्टी विषयीं हरकत पडणार नाहीं, याजकरितां ठिकठिकाणचे तालुक्यांत वतन संबंधी वगैरे कितीएक बाबींचा नक्त पैसा मिळत आहे; तो वहिवाटी-प्रमाणें त्यांच्या पत्रानें देत जाण्याविषयीं जिल्ह्या जिल्ह्याचे कलेक्टर यांस लिहिण्यांत येऊन मुलकी, दिवाणी, माजिस्त्रेटी, व इतर कामासंबंधीं पत्रव्यवहार त्यांचे नांवें चालवावा. त्या काळीं हिंदुस्थानांत आगगाडीची सडक मुळींच झाली नव्हती, सबब रघुनाथराव यांनीं एजंट साहेबांस मागाहून असें कळविलें कीं, मी उत्तर हिंदुस्थानप्रांतीं बहुत प्रदेशांत फिरणार आहें, ह्या करितां रहदारीचें दस्तक मला मिळावें. व तें असें असावें कीं, त्यांत एकच मार्ग नमूद न होतां तें हिंदुस्थानांत सर्व ठिकाणीं चालावें. शिवाय इंदुर, ग्वाल्हेर, अजमीर, जोधपूर, जयपूर, अग्रा, लखनौ, वगैरे ठिकाणचे अधिकारी यांस पत्रें पाहिजेत, व त्या पत्रांत मी कोण व कोणत्या दर्ज्याचा आहें हें लिहून माझा बंदोबस्त ठेवण्याविषयींचाही मजकूर असावा. असें कळविल्यावर ब्राऊन साहेबांनीं सांगितलें कीं, या सर्व मजकुराची यादी तुह्मी आह्मांकडे पाठवून द्यावी. ती आली ह्मणजे मी त्या बद्दल सरकारास इतल्ला करून सरकारचा जसा हुकूम येईल तसें मी तुह्मांस लिहून कळवीन. मला असें वाटतें कीं, तुमची देश पाहण्याची इच्छा असून उत्तर हिंदुस्थानाची सर्व माहिती व्हावी असा तुमचा हेतु आहे, त्यापेक्षां सरकार तुह्मांस नाहीं ह्मणणार नाहीं, उलटा त्यास याबद्दल संतोषच वाटेल यांत संशय नाहीं! असें एजंट साहेब बोलिले. नंतर रघुनाथराव यांनीं एजंट साहे

एजंटाचा होकार

यांनी सांगितल्या प्रमाणें आपल्या बरोबर देशपर्यटणास जाणारे खटल्याचे अंदाजासुद्धां सविस्तर यादी इंग्रजीभाषेंत तयार करून ती एजंटसाहेब यांजकडे पाठवून दिली. त्यावरून त्या साहेबांनीं सरकारास रिपोर्ट केला. आणि त्याचा जबाब आल्यावर त्यांनीं रघुनाथराव यांस त्यांचे मागण्याप्रमाणें मार्गाचें दस्तक व ठिकठिकाण चे इंग्रजी अधिकारी यांस पत्रें दिलीं. शिवाय यात्रा करून ते परत येत तोंपर्यंत संस्थानचें सर्व काम त्यांचे कनिष्ठ बंधु चालविंतील असें जिल्ह्यांतील सर्व कामगार लोकांस पत्रद्वारें कळविलें. सरकारची परवानगी मिळाली

यां प्रमाणें व्यवस्था लागल्यावर रघुनाथराव यांनीं आपली कनिष्ठ मातोश्री सत्यभामाबाई पुण्यास होत्या, त्यांस आपले बरोबर यात्रेस येण्याविषयीं विनंती केली. परंतु त्यांनीं त्यावेळी जाण्याची आडचण असल्याचें कळविलें; तेव्हां रघुनाथराव यांनीं विंचुरास येऊन महायात्रेस जाण्याची तयारीचालविली. त्यांनीं प्रथम आपली द्वितीय पत्नी रमाबाई हिला बरोबर घेण्याचा विचार मनांत आणिला. परंतु बहुत दिवस फिरावयाचें असून, बदरीकेदार, नारायण, अशा क्षेत्रांच्या पाहाडी व विकट प्रदेशांत यात्रा करावयाच्या होत्या, तेव्हां बरोबर बायकामंडळी असली ह्मणजे प्रवासांत हरएक प्रकारची अडचण पडते. दुसरें, रमाबाई ही मुळचीं सुकुमार असून तिला यावेळीं दम्याची व्यथा जडली असल्यानें ती फारच अशक्त व क्षीण झाली होती, ह्मणून अशा स्थितींत तिजला बरोबर नेलें असतां तिचा निभाव लागणार नाहीं, ह्यास्तव रघुनाथराव यांनीं तिजबद्दल अशी व्यवस्था केली कीं, तूर्त ति-

ला बरोबर नेता

जला विंचूर येथेंच ठेवावें, आणि पहाडांतील यात्रा झाल्यावर आपलें येणें प्रयाग येथे झालें ह्मणजे तिजला आपले बंधूंनीं परभारें त्या क्षेत्रीं पोहोंचतें करावें, मग तेथून तिजला बरोबर घेऊन आपण त्रिस्थली यात्रा करावी. या प्रमाणें रघुनाथराव यांनीं आपले कडून पत्नी रमाबाई हिला हितकर अशी व्यवस्था योजिली. परंतु त्यांत तिचा संतोष राहिला नाहीं ! तिचा पतीसमागमेंच जाण्याचा फार मनोदय होता ! तथापि रघुनाथराव यांनीं बहुत प्रकारें समाधानाच्या गोष्टी सांगून तिजला विंचूर येथेंच ठेविलें, आणि आपणच जाण्याचा विचार ठरवून त्याप्रमाणें ते कार्तिक शुद्ध ३ गुरुवारीं सकाळचा नऊ घटका दिवस आल्यावर धनुर्लग्नीं गमनास उत्तम वेळा आहे, असें ज्योतिषी यांनीं सांगितलें होतें, त्याप्रमाणें त्या सुमुहूर्तावर प्रथम महायात्रेचे उद्देशानें विंचूर येथून ते प्रयाण करिते झाले. ही गोष्ट शके १७७० ह्या वर्षीं घडली.

घुनाथराव वतां एकले यात्रेस ले.

## पूर्वपीठिका समाप्त.

———o———

# भाग पहिला.

———xox———

## श्रीमंत रघुनाथराव ऊर्फ अण्णासाहेब विंचूरकर यांच्या उत्तरहिंदुस्थानांतील तीर्थयात्रा.

श्रीमंत रघुनाथराव हे पूर्वपीठिकेंत लिहिल्या प्रमाणें कार्तिक शुद्ध ३ या दिवशीं विंचूर येथून मुहुर्तानें निघाले. त्या दिवसापासून त्यांचें उत्तर हिंदुस्थानांतील देशाटन आणि तीर्थयात्रा यांस आरंभ झाला, असें जाणावें. विंचूर येथून निघणें

या दिवशीं व याच्या पूर्वी यात्रेच्या आरंभीं शास्त्रांत देव आणि पितर यांच्या उद्देशानें कांहीं कृत्यें करण्यास सांगितलीं आहेत, तीं रघुनाथराव यांनीं यथाविधि आटपून घेतलीं. नंतर निघण्याचे वेळीं त्यांनीं प्रवासाच्या उपयोगी असा वेष करून मग प्रथम देवघरांत जाऊन, तेथें कुलदेवता श्रीनरहरि यांस साष्टांग नमस्कार करून प्रार्थना पूर्वक त्यांचा निरोप घेतला. नंतर ते बाहेरचे चौकांत आले. तेथें वडील धाकटे आप्तजन होते. त्यांतून वडिलांचे चरणीं मस्तक ठेवून त्यांनीं त्यांचा आशीर्वाद घेतला. आणि धाकटे आपले पायां पडले त्यांचे पाठीवरून हात फिरवून उठविलें, आणि त्या सर्वांचा निरोप घेतला. तेव्हां अंतःकरण अत्यंत खिन्न होऊन डोळे अश्रूंनीं भरून आले आहेत, अशा स्थितींत सौभाग्यवती रमाबाई ह्या मागच्या बाजूस मोठ्या मर्यादेनें उभ्या होत्या, त्यांजकडे प्रेमार्द्र दृष्टीनें पाहून 'मी पूर्वी सांगितल्या प्रमाणें प्रयागास येतांच घेऊन जाईन, तोंपर्यंत धैर्य धरून स्वस्थ असावें, कष्टी होऊंनये'. अशा प्रकारें वृद्धाचेमुखानें त्यांस आश्वासन देऊन रघुनाथराव हे तेथून वाड्याचे बाहेर आले. तों

तेथें यजमान दूर देशीं जाणार, त्यांस पोहोंचविण्याकरितां ह्मणून मोठ्या भक्तीनें रयत लोक जमले होते. तेव्हां भोंताली त्या लोकांची मंडळी आणि मध्यें आपण, अशा रीतीनें रघुनाथराव हे तेथून पायींच चालत चालत विंचुराबाहेर एक लहानसा ओढा आहे, तेथ पावेतों आले; आणि तेथें उभे राहिले. तेव्हां कोणी रामराम, कोणी सलाम, कोणी जोहार, अशा प्रकारें आपापल्या दरजाप्रमाणें अभिवंदनें केलीं. त्या सर्वांचा आदरपुरःसर नम्र मुद्रेनें रघुनाथराव यांनीं स्वीकार करून यथोचितपणें प्रत्याभिवादन करून मोठ्या प्रेमयुक्त भाषणानें 'आतां आणखी पुढें येण्याचे श्रम करूं नका, मी लवकर येईन' असें बोलून त्यांस तेथून परत जाण्यास सांगितलें, आणि भिक्षुक ब्राह्मण व दुसरे गरीब याचकजन यांस दक्षिणादिकांनीं संतुष्ठ करून आपण घोड्यावर स्वार होऊन सर्वांचा निरोप घेऊन पुढें चालते झाले. ते दिसत होते तोंपर्यंत मंडळी ओढ्याचे काठीं ऊभी होती. मग दिसेनासे झाले तेव्हां सर्व लोक खिन्न मनानें तेथून मागें फिरून आपआपले घरीं जाते झाले. रघुनाथराव यांचे बंधू व त्यांचे संस्थानची मंडळीही त्यांस दोन तीन मजला पर्यंत पोंचविण्याकरितां त्यांज बरोबरच चालती झाली.

बरोबर माणसें व सरमनाम काय घेतला तो

रघुनाथराव यांनीं आपले बरोबर सरमजाम व मंडळी बरीच घेतली होती, त्यांत जीं मनुष्यें घेतलीं होतीं तीं बहुतेक तरुण व प्रवासांत उपयोगीं अशीं असून आपआपले कामांत दक्ष व हुशार अशीं होतीं. त्यांत भिक्षुक, कारकुन, शागिर्द, व मुदबखाकडेस वांकनिस, आचारी, पाणके, खटपटे, वगैरे मिळून ब्राह्मण मंडळीं सुमारें २५ होतीं; हुजरे, खिजमतगार, चोपदार, छत्री व अबदागीर धरणारे, मोततदार, सारवान, कोठीकडील माणसें, मशालची, भिस्ती, भोई वगैरे गडी माणसें सुमारें ५०।६० होतीं; खेरीज मार्गांत बंदोबस्ताकरितां आणि चौकीपहाऱ्याकरितां स्वार व मेवाती मिळून पंचवीस तीस शिबंदी लोक होते. यांत स्वारांचा एक जमादार व दफेदार, व मेवाती

रघुनाथराव यांचें जन्म

रघुनाथराव यांचें जन्म शके १७४६ तारणनामसंवत्सरीं आषाढ शुद्ध तृतीया गुरुवारीं विंचूर येथें झालें. विठ्ठलरावशिवदेव ह्मणून जे विंचूरकर घराण्याचे मूळ पुरुष झाले, आणि ज्यांनीं थोरले बाजीरावसाहेब पेशवे यांचे सैन्या मध्यें आघाडीस राहून समरांगणीं मोठाल्या बलाढ्य शत्रूंशीं टकरा देऊन मोठ्या शौर्यानें आणि पराक्रमानें हिंदुस्थानांत आपलें नांव गाजविलें, त्या विठ्ठलरावांपासून रघुनाथराव हे पांचवे पुरुष होत. याच्या तीर्थरूपांचें नांव विठ्ठलराव उर्फ तात्यासाहेब आणि मातुश्रीचें नांव गंगाबाई, ही गोविंदराव धारवाडकर यांची कन्या. या गोविंदरावाचे तीर्थरूप उडपीराव ह्मणून होते, त्यांजकडे सवाईमाधवराव पेशवे यांचे कारकीर्दींत धारवाड येथील सरसुभ्याचें काम होतें.

रघुनाथ हें नांव ठेवण्याचें कारण

असें सांगतात कीं, विठ्ठलरावतात्यासाहेब यांस पुत्राविषयीं फार लालसा होती. याजकरितां त्यांनीं नासिक येथें रघुनाथभटजी ह्मणून त्या काळीं प्रसिद्ध साधु होते, त्यांची निष्ठापूर्वक बहुत सेवा केली. त्या योगानें त्यांस पुत्र झाला, तेच हे अण्णासाहेब होत. आणि हे रघुनाथभटजी यांचे प्रसादानें झाले, ह्मणून तात्यासाहेब यांनीं यांचें नांव 'रघुनाथ' असें ठेविलें. या नंतर तात्यासाहेब यांचे दुसरे कुटुंबासही दोन पुत्र झाले. त्यांपैकीं कृष्णराव उर्फ बापूसाहेब हे ज्येष्ठ, आणि माधवराव उर्फ दादासाहेब हे कनिष्ठ होत. त्यांच्या मातुश्रीचें नांव लक्ष्मीबाई, ही रांजणगांवकर कुळकर्णी यांची कन्या. ही तात्यासाहेब यांची चौथी बायको होय. तात्यासाहेब यांस येकंदर पांच बायका झाल्या. त्यांतून शेवटली बायको,

लोकांचा एक जमादार व दफेदार असे मुख्य होते. शिवाय खासे घोडे, व बारगिरी घोडे, व उंटें, व गाड्यांकरितां बैलांच्या जोड्या, वगैरे मिळून जनावरें अजमासें तीस पसतीस होतीं; व एक म्याना आणि सात आठ गाड्या, इतका खाजगी सरमजाम असून शिवाय भाड्याच्या गाड्या व भाड्याचीं तट्टें वेगळींच होतीं.

वर जी ब्राह्मण मंडळी सांगितली त्यांत शास्त्री, याज्ञिक, वैद्य, ज्योतिषी असे लोक असून प्रवासोपयोगी वस्तू व औषधें व मात्रा वगैरे यांचा ही संग्रह बरोबर घेतला होता.

प्रथम मुका[म] सांयखेडें

या प्रमाणें रघुनाथराव यांनीं विचारपूर्वक उपयुक्त व पोक्त सरमजाम व खटला बरोबर घेऊन ते विंचुराहून निघाले, आणि तेथून सरासरी आठ कोसांवर सांयखेडें ह्मणून गोदावरीच्या तीरीं गांव आहे, तेथें प्रथम दिवशीं जाऊन त्यांनीं मुकाम केला.

गोदावरी प्र[यु]क्त तीर्थवि[धि]

त्या वर्षीं सिंहस्थ ह्मणजे सिंहराशीस बृहस्पति असल्यामुळें प्रथमतः श्रीगोदावरीप्रयुक्त तीर्थविधि सांयखेडें येथें केला. गोदेचें माहात्म्य पुराणांत फार वर्णिलें आहे. गोदावरीस वृद्धगंगा अशी संज्ञा असून तिच्या उत्पत्तीविषयीं स्कंदपुराणांत अशी कथा आहे कीं, शिवपार्वतीचा विवाह झाला, त्या काळीं ब्रह्मदेवानें पार्वतीचा अंगुष्ठ पाहिला. त्यावरून त्याचे अंतःकरणांत काम उत्पन्न होऊन वीर्यपतन पावलें. तें वीर्य पादांगुष्ठानें चोळलें. त्या स्थानीं साठ सहस्त्र वालखिल्यऋषी उत्पन्न झाले. परंतु जगन्मातेविषयीं कामवासना उत्पन्न झाली, त्या पापानें ब्रह्मदेवाचा कृष्णवर्ण झाला. नंतर त्यानें काशीस जाऊन बहुत काल तप केलें. तेव्हां त्यावर शिव प्रसन्न झाले. त्याकाळीं शिवानीं ब्रह्मदेवाचे शुद्ध्यर्थ पृथ्वीचें सार काढून त्याचा कमंडलु केला. व उदकाचें सार काढून तें वेदांतील सारभूत ज्या पावमान्यादिऋचा व शतरुद्रीय मंत्र एहीं करून अभिमंत्रित करून त्या उदकाने तो कमंडलु पूरित करून ब्रह्मदेवास दिला. तो हस्तांत धारण करितांच ब्रह्मदेव पापापासून मुक्त झाला. पुढें कालें करून वामनावता

रीं विष्णूनें एके पादानें पृथ्वीचें आक्रमण केलें. व द्वितिय पाद स्वर्गादि लोकांचे अतिक्रमण करून सत्य लोकीं गेला. त्या समयीं शंकरापासून प्राप्त झालेलें जें अतिपवित्र कमंडलूंतील उदक, तेणेंकरून ब्रह्मदेवानें विष्णुचरणांचें प्रक्षालन केलें. तें उदक शंकरानें कालकूट विष प्राशनापासून उत्पन्न झालेले दाहाचे शांत्यर्थ मस्तकीं जटेंत धारण केलें. पुढें गौतमऋषीस कांहीं कारणानें गोहत्या झाली. त्या पापाचे शांत्यर्थ त्यानें तप करून शंकरापासून जटेंतील उदकाचा कांहीं अंश पृथ्वीतलीं आणिला. तेव्हां त्या उदकास वृद्धगोदा अशी संज्ञा प्राप्त झाली. शिवजटेंत शेष असलेलें उदक पुढें भगीरथ राजानें आपले पितरांचे उद्धारार्थ तप करून आणिलें. त्या उदकास भागीरथी अशी संज्ञा प्राप्त झाली. गोदावरीचें माहात्म्य सर्व काल आहेंच. त्यांत सिंहराशीस गुरु झाला असतां सर्व देवता व पृथ्वीतील सर्व तीर्थें गोदावरींत वर्षभर वास करितात; असें पुराणांत सांगितलें आहे. या करितां सिंहस्थसंबंधानें कांहीं जास्त विधि करावा लागतो. तो विधि सायखेडें येथें यथासांग करून चांदवड रघुनाथराव हे चंद्रवट ज्यास हल्लीं चांदवड असें ह्मणतात, त्या गावीं गेले. त्या गावीं रेणुका देवीचें प्राचीन स्थान आहे. व पर्वतावर रेणुका देवी कालिकेचें स्थान आहे. या देवतेचें वर्णन स्कंदपुराणांतर्गत सप्तशृंग कालिका देवी माहात्म्यांत लिहिलें आहे. रेणुका देवीचे निकट रेणुकानामें तीर्थ आहे, तें तलावा सारखें बांधलेलें आहे. पाहाडावर कालिकेचे डावे बाजूस कालीतीर्थ आहे. रघुनाथराव यांनीं येथील तीर्थस्नानें देवदर्शनें व पूजा वगैरे कृत्यें केलीं. या गावांत होळकर सरकारचा एक मोठा भव्य वाडा आहे. येवढी इमारत मात्र तेथें पाहण्यासारखी चांगली आहे.

मालेगांव चांदवड येथून रघुनाथराव हे मालेगांव येथें गेले. या गांवीं कापडाची पेठ आसोन तेथें खाद्या व पासोड्या वगैरे टिकाऊ देशी कापड चांगलें होतें. नारोशंकर राजेबहादर यांनीं मोठा मजबुत

भुईकिल्ला बांधिला आहे. इंग्रजी अंमल झाला, तेव्हां ह्या किल्यांत राजेबहादर यांचे तरफेचे आरब लोक होते, ते कांहीं दिवस इंग्रेजांशीं लढले. शेवटीं इंग्रेजांनी तो किल्ला हस्तगत करून आपल्या ताब्यांत घेतला. तेव्हां किल्यांतील बहुतेक इमारती पाडल्या.

ज्या वेळीं रघुनाथराव मालेगांवीं गेले, त्यावेळीं तेथें शिवराव अपासाहेब राजेबहादर हे आपले संस्थानावर कायम असून त्यांचा जात सरमजाम वगैरे चालू होता. त्यांनीं रघुनाथराव यांची मोठ्या सन्मानानें भेट घेतली, आणि त्यांची उत्तम प्रकारें बरदास्त ठेवून त्यांस बहुत आग्रहानें तीन दिवस मालेगांवीं राहून घेतलें.

रघुनाथराव हे मालेगांवाहून धुळ्याकडे चालते झाले. तेव्हां धुळ्याचे आलीकडेस चार कोसांवर ललिंगबारी ह्मणून थोडा डोंगरी रस्ता आहे, त्याच्या जवळील डोंगरावर ललितादेवीचें प्राचीन स्थान आहे. त्या देवीचें दर्शन घेऊन रघुनाथराव हे धुळ्यास गेले. धुळ्यास पांजरा ह्मणून नदी आहे, तिचे उत्तरतीरीं रेणुका देवीचें प्राचीन स्थान आहे. तें या ललितादेवीच्या संबंधानें असावें असें अनुमान होतें. ललिंगबारी ललितादेवी धुळें

विंचुराहून कनिष्ठ बंधु कृष्णराव व संस्थानची कांहीं मंडळी रघुनाथराव यांस पोहोंचविण्याकरितां त्यांजबरोबर आली होती, त्या सर्वांस धुळ्याहूनच परत जाण्यास निरोप देऊन रघुनाथराव हे सोनागिरीमार्गें तापीनदीचे तीरीं येऊन दाखल झाले.

तापीनदी ही सूर्यापासून उत्पन्न झाली. व पूर्वेकडून पश्चिम वाहिनी होऊन समुद्रास स्वतंत्र मिळाली. हिच्या सारिखी पश्चिम वाहिनी नदी नर्मदा आहे. तापी नदीचें माहात्म्य स्कंदपुराणांत बहुत वर्णिलें आहे. रघुनाथराव यांनीं तेथें तीर्थविधि व देवब्राह्मण वगैरे करून ते सेंधवा घाटानें पुढें चालते झाले. सेंधवे घाटापासूनच हो ळकराचा मुलुख लागतो. माळवा देशाची दक्षिणेकडील सरहद्द कोणी नर्मदेच्या उत्तर तीरापासून मानितात, व कोणी सेंधव्यापासू तापीनदी सेंधवाघाट

महेश्वर नच मानितात. या मार्गानें रघुनाथराव हे माहिष्मती (महेश्वर) क्षेत्रीं गेले. हें क्षेत्र फार प्राचीन असून प्रसिद्ध कार्तवीर्य राजाच्या राजधानीचें मुख्य स्थान आहे. हेंच मंडनमिश्र ह्मणून जो प्रसिद्ध कर्मवादी झाला, त्याचें जन्मस्थान होय. अद्वैतमत संस्थापक जे महाविख्यात शंकराचार्य,ज्यांस जगद्गुरु असें ह्मणतात, त्यांचा आणि मंडनमिश्राचा मीमांसाशास्त्राविषयीं मोठा वाद याच क्षेत्रीं होऊन त्यांत शेवटीं मंडनमिश्र हा पराजित झाला, असें शंकरविजयांत सांगितलें आहे. ह्या क्षेत्रास हल्लीं महेश्वर असें ह्मणतात. या ठिकाणीं मुख्य तीर्थ पश्चिमवाहिनी नर्मदानदी, आणि राजराजेश्वर इत्यादि पुष्कळ शिवस्थानें आहेत. येथें अंमल होळकराचा असून एक भुईकिल्ला आहे. या क्षेत्रीं पहाण्यासारख्या जागा बऱ्याच आहेत. त्यांत होळकराच्या वंशांत उत्पन्न झालेल्या पुरुषांनीं व अहिल्याबाईनीं नर्मदेस बांधलेले घाट आहेत. अहल्याबाई होळकर यांची छत्रीं बहुत चांगली आहे. येथें पातळें धोतरजोडे वगैरे उत्तम प्रकारचें कापड तयार होतें अशी प्रसिद्धी आहे. रघुनाथराव यांनीं नर्मदायुक्त जो तीर्थविधि तो प्रथम याच ठिकाणीं केला.

बडवाई येथून रघुनाथराव हे बडवाई येथें गेलें. हा गांव नर्मदातीरींच आहे. येथें होळकराचा अंमल असून त्यांची मामलेदारकचेरी येथें असते. त्यास्थळीं एक आवट ह्मणजे खांच आहे. त्यांतून भोगावती गंगा आली आहे. तें कुंड फारच रमणीय बांधिलें आहे. त्या कुंडाचे मध्यभागीं नागचंद्रेश्वर नामेंकरून प्रसिद्ध शिवलींग आहे. तें स्थान ओंकारेश्वरक्षेत्राचें पश्चिमद्वार होय, असें तेथील माहात्म्यांत वर्णन आहे. त्या स्थळीं स्नान, व तेथील देवांचें पूजन करून रघुनाथराव हे ओंकारेश्वरक्षेत्राकडे चालते झाले. प्रथम कावेरी व नर्मदा यांचा संगम झाला आहे, त्या ठिकाणीं नित्यकर्म करून त्यांनीं ओंकारेश्वराचें दर्शन घेतलें.या क्षेत्रास विरजाक्षेत्र अशी संज्ञा आहे. ओंकार ओंकारेश्वरक्षेत्रीं कोटितीर्थ ह्मणून नर्मदेंत एक मुख्य तीर्थ आहे. त्या तीर्थांत कोटितीर्थ

अतिशय मासे आहेत, त्यांस खाण्याकरितां यात्रेकरीलोक फुटाणें वगैरे पदार्थ त्यांत बहुत टाकितात. ओंकारेश्वर हें बारा ज्योतिर्लिंगांतील एक लिंग आहे. या लिंगाचा महिमा पुराणांत बहुत वर्णिला आहे. येथें नर्मदेचा अगाध डोह असून, पलीकडे ब्रह्मपुरी, रुद्रपुरी, अशीं वेगळालीं दोन स्थानें आहेत. रुद्रपुरींत अमरेश्वर नामें करून एक शिवस्थान आहे. येथें कपिलधारानामक नदीचा व नर्मदेचा संगम झाला आहे. येथें यात्रेकरू क्षौरविधि करितात. या ठिकाणाहून ओंकार क्षेत्राची रचना बहुत चमत्कारिक दिसते. हें ओंकारक्षेत्र मांधातानामें राजाची राजधानी होय, असें पुराणांत वर्णन आहे. हल्लीं तेथें भिल्लजातीचा राजा असून त्याजकडे दहा वीस हजारांचा मुलुख आहे. हा राजा आपल्यास मान्धात्याचा वंशज ह्मणवितो. ओंकारेश्वर देवाकडील सर्व बंदोबस्त त्या राजाकडेस आहे.व देवाचें उत्पन्नही त्याचेच खाजगींत जमा होतें. या भिल्लाचें राज्य फार प्राचीन आहे. इतकें प्राचीन राज्य हिंदुस्थानांत क्वचितच असेल असें ह्मणतात. देवाचा पूजाधिकार भिल्लाकडेस असल्यामुळें सोंवळ्या ओंवळ्याचा प्रकार तेथें बिलकुल नसून गावांत स्वच्छताही नाहीं. अमरेश्वर

रघुनाथराव हे सेंबुर्डा घाटानें इंदुरावरून उज्जनी येथें गेले. उज्जनीस अवंतिकापुरी अशी संज्ञा आहे. सप्तपुऱ्यांतील ही एक पुरी असून द्वादश ज्योतिर्लिंगांपैकीं महाकालेश्वर नामाचें ज्योतिर्लिंग ह्या ठिकाणीं आहे. देवापुढें कोटितीर्थ चौफेर बांधिव आहे. या तीर्थाचें उदक कधीं गुलाबी कधीं हिरवें असें भिन्नभिन्न रंगांचें असतें. तीर्थासभोंवतीं पिंपळ वगैरे पुष्कळ आहेत. अवंतीक्षेत्रास क्षिप्रानदी आहे, व तिला घाट वगैरे चांगले बांधिलेले आहेत. या क्षेत्रांत काशीस जितक्या देवता आहेत, तितक्यांचीं स्थानें व तीर्थें आहेत. हरसिद्धि नामक देवीचें स्थान प्रसिद्ध असून त्याच्या पुढें एक तीर्थ आहे. अवंतीक्षेत्रीं कृष्ण व बलराम यांनीं सांदिपिनिनामक उज्जनी (उज्जयिनी) क्षिप्रानदी

गुरूजवळ विद्याभ्यास केला, तें स्थान तेथें आहे. या क्षेत्रांतील बहुते

गलेश्वर क ज्ञातीचे लोक भांगेचा घोटा पिणारे आहेत .क्षेत्राजवळ मंगलेश्वर नामें शिवस्थान फार रमणीय आहे. क्षेत्रापासून दक्षिणेस दोन अडि च कोसांवर त्रिवेणी ह्मणून प्रयाग स्थान आहे. या क्षेत्रीं मंगलग्रहा ची उत्पत्ति झाली, असें वर्णन आहे. शिवाय याच क्षेत्रीं महाप्रतापी विक्रम व भर्तृहरी यांनीं राज्य केलें. येथें कालीचें स्थान आहे, व

रवगड भर्तृहरीची तपश्चर्येची गुहा आहे. उज्जनीचे पश्चिमेस भैरवगड ह्मणून ठिकाण आहे. तेथें भैरवस्थान असून त्याचे लगत क्षिप्रा तीरीं सिद्ध वट नामें एक जुनाट वडाचा वृक्ष आहे. याचे सान्निध क्षिप्रेंतच शक्ति

सिद्धवट भेद नामक तीर्थ आहे. त्या ठिकाणीं यात्रिकरू श्राद्धादि करितात. या

शक्तिभेदतीर्थ क्षेत्रीं शिंद्याचा अंमल आहे. बायजाबाई शिंदी येथें बहुत दिवस राहिली होती. या क्षेत्रीं देवतापूजन, ब्राह्मणभोजन, इत्यादि क्षेत्र संबधीं यात्रा कृत्य रघुनाथराव ह्यांनीं उत्तम प्रकारें केले.

नाथद्वारा नंतर ते तेथून मंदुसरावरून नाथद्वारास गेले. हें स्थान भरतखंडां त अत्यंत मान्य आहे. या ठिकाणचे उपासक भाटे लोक बहुत आहेत. या स्थानीं प्रतिदिवशीं देवसेवेप्रीत्यर्थ चौदाशें रुपये खर्च होतअसून नैवेद्य छपन्न भोगांचा होत असतो. येथें गाई बहुत आहेत, त्यांची संख्या निदान पांच हजारांवर असून त्यांची व्यवस्था उत्तम प्रकार- ची असते. देवास जवाहीर वगैरे सरमजाम फार आहे. देवाचें द- र्शन दिवसांतून सात वेळ होतें. या कृत्यास तिकडील लोक झ्याकी असें ह्मणतात. येथील सर्व अधिकार पूर्वी वल्लभाचार्य ह्मणून जाले, त्यांच्या वंशस्थांकडेस आहे. प्रतिवर्षी कार्तिक शुद्ध प्रतिपदेस या ठिकाणीं अन्नकूटाचा समारंभ होतो. त्यावेळीं यात्राही बहुत जमते. या देवास नेमणुक वगैरे ह्मणण्यासारखी नाहीं. परंतु देवाचे उपास क यांजकडून देवास लाखोंरुपयांची प्राप्ति आहे. सर्व राजोपचार देवास प्रतिदिवसीं अर्पण होतात. वल्लभाचार्यांचे वंशस्थांस गोस्वामी ( गोसावीमहाराज ) अशी संज्ञा आहे. त्या मतांतील सर्व लोक व

ल्लभाचार्यांचे वंशस्थांस, कृष्णावतार समजून अतिशयित मान देतात. वल्लभाचार्यांचे वंशांत सात गाद्या झाल्या. त्या मथुरा, गोकुळ, जयपुर वगैरे ठिकाणीं आहेत. त्याच वंशांतील गोसांवीमहाराजांची कांहीं संस्थानें हल्लीं मुंबईस ही आहेत. नाथद्वारीं संस्थानें पुष्कळ आहेत. त्यांत श्रीनाथजी विठ्ठलनथाजी व नवनीतप्रियाजी हीं मुख्य आहेत. त्या सर्वांचीं दर्शनें व तेथील मुख्य गोसावीमहाराज यांचें दर्शन करून रघुनाथराव यांनीं तेथील रीतीप्रमाणें देवाची सेवा उत्तम केली.

एकलिंगेश्वर

नंतर रघुनाथराव हे तेथून नजीकच उदेपूरचे राज्यांत एकलिंगजी ह्मणून एक मोठें प्रसिद्ध शिवस्थान आहे, तेथें गेले. तेथील लिंगास चार मुखें आहेत. व देवाचें देऊळ फार मोठें आहे. या देशास मेवाड असें ह्मणतात. व सर्व मेवाडदेशाचा एक लिंगेश्वर हा अधिपती आहे, असें तेथील सर्व प्रजा मानिते. एक लिंगेश्वर हें उदेपूरचे राण्याचें कुलदैवत आहे. व तेथील देवाचा खर्च त्याच राण्याकडून चालतो. पुराणांत याची अशी कथा आहे कीं, शंकरांनीं पृथ्वींतील सर्व शिवलिंगांतून तिळ तिळ अंश काढून त्यांचें एक लिंग करून स्थापिलें, आणि त्याचें नाव एकलिंगेश्वर असें ठेविलें. त्याचा महिमा पुराणांत बहुत वर्णिला आहे. या ठिकाणीं ह्मणण्यासारखें प्रसिद्ध तीर्थ नाहीं. एकलिंगेश्वराच्या पूजेचा अधिकार उदेपूरचे राजाकडून नेमलेले स्वामी आहेत, त्यांजकडेस असतो. येथील देवास स्वामीखेरीज दुसरे कोणाचा स्पर्श होऊं देत नाहींत! या स्थलीं देवता दर्शन व तेथील रीतीप्रमाणें यात्राविधि हीं रघुनाथराव यांनीं केलीं. हा प्रदेश सर्व पहाडी असून येथें दाट झाडी आहे. या प्रदेशांत चोरांची व हिंस्र पशूंची भीती बहुत असून रस्ताही फार बिकट आहे. सन १८५८ सालीं तात्याटोप्याचे बंडातील फोज याच बिकट प्रदेशांत बहुत दिवस राहिली होती असें ह्मणतात. येथून उदेपूर सात किंवा आठ कोस आहे.

मेवाडदेश

ाकुडली
रकाधीश
यसमुद्र
(तलाव)

येथून रघुनाथराव हे पुढें काकुडली ह्मणून एक स्थान आहे तेथें गेले. त्या ठिकाणीं द्वारकाधीश नामें करून एक कृष्णस्थान मोठें प्रसिद्ध आहे. त्या द्वारकाधीशाचें दर्शन व तेथील रीतीप्रमाणें कर्तव्य जो विधि तो त्यांनीं केला. या ठिकाणीं रायसमुद्र ह्मणून एक अति विस्तीर्ण तलाव आहे. त्या तलावाची प्रदक्षिणा केली तर पंधरा कोसांहून कमी भरणार नाहीं असें ह्मणतात. त्या तलावास एके ठिकाणीं उदेपूरचे राजाकडून संगमरवरी दगडाचा विस्तीर्ण घाट बांधिला आहे, व ठिकठिकाणीं बुरूज करून त्यांजवर मेघडंबरी चौक्या, दाहा दाहा मनुष्यें बसतील अशा केल्या आहेत. त्यांतून नऊ चौक्या फार अप्रतिम आहेत. संगमरवरी दगडावर खोदलेलीं अशीं नानाप्रकारचीं बारीक चित्रें येथें आहेत. ठिकठिकाणीं मोठे शिलापट्ट असून त्यांत उदेपुरकर राजाचे कुलाचें वर्णन संस्कृत श्लोक बद्ध लिहिलें आहे. येकंदर पृथ्वींत जीं चमत्कारिक स्थानें पहाण्याजोगीं आहेत, त्यांतीलच हें एक आहे, असें ह्मणतात.

पुढें मार्गांत ठिकठिकाणीं संगमरवरी दगडाच्या व अभ्रकाच्या खाणी आहेत. अभ्रकाच्या मोठाल्या शिळा असतात. त्यांस पुडें असून त्यांतून अभ्रकाचे पत्रे निघतात. येथें काळे अभ्रकाचे दगड दृष्टीस पडतात. त्या प्रांती अभ्रकाच्या दगडांनीं केलेल्या इमारती क्वचित क्वचित आढळतात. पिंवळ्या व तांबड्या मातीच्या खाणीही रस्त्यानें दृष्टीस पडतात. याप्रमाणें जयपुरापर्यंत हा प्रदेश द्रव्य उत्पन्न होण्याजोगा आहे. या प्रदेशांत मार्गक्रमण करून रघुनाथराव हे शहर अजमीर येथें येऊन त्यानीं तेथें मुकाम केला. हें शहर फार रमणीय आहे. येथें सावकार लोक बहुत असून व्यापार मोठा चालतो.

जमीर

या ठिकाणीं ख्वाज्यासाहेब ह्मणून एक पिराचें स्थान आहे. त्याचा दर्गा फार मोठा बांधलेला आहे. या पिराची द्रव्यसंपत्तीही मोठी आहे. मुजावर लोक ( मुसलमानपुजारी ) बहुत असून तेथील उत्पन्न तेच घेतात. दिल्लीचे बादशाही वंशास हें स्थान मोठें पूज्य आहे. या

ाज्यासाहेब
(पीर)

ठिकाणीं दरसाल उरूस भरतो, तेव्हां फार मोठा मेळा जमतो. ए- क्याच पात्रांत साठखंडी पुलाव ह्मणजे अन्न शिजवितां यावें अशीं मोठालीं पात्रें येथें बरींच आहेत. पिराचे खालीं शिवलिंग आहे असें तेथील लोक सांगतात. पिराचे दर्शनास हिंदु व मुसलमान असे दोनही जातीचे लोक जातात. अजमीरास पुर्वी शिंद्याचा अंमल हो ता. त्याचा मोबदला होऊन हल्लीं इंग्रजांचा अंमल आहे. त्या ठिका णीं दौलतराव शिंद्यानें केलेला बाग आहे, त्यास दौलतबाग असें म्हणतात. अजमीरास दूधबावडी ह्मणून एक विहीर आहे. तिचें पा- णी फार निरोगी आहे असें सांगतात. अजमीर येथें जीं पहाण्याचीं स्थलें आहेत तीं सर्व तीन मुकाम करून रघुनाथराव यांनीं पाहिलीं.

पुढें अजमीराहून तीन कोसांवर पुष्करनामें तीर्थ आहे, तेथें रघु नाथराव यात्रेस गेले. पुष्करतीर्थ हें पुराण प्रसिद्ध आहे. पद्मपुराणांत या तीर्थाचा महिमा फार वर्णिला आहे. या तीर्थी ब्रह्मदेवानें बहुत यज्ञ केले असें वर्णन आहे. पुष्करतीर्थें तीन आहेत, त्यांची नावें, ब्र- म्हपुष्कर, विष्णुपुष्कर, आणि रुद्रपुष्कर, अशीं आहेत. यांच्या आस मंतातभागीं दुसरीं बहुत तीर्थें व देवस्थानें आहेत. पूर्वयुगीं पुष्कर तीर्थी स्नान करून प्राणी स्वर्गास जाऊंलागले. येणेंकरून यमलोक शून्य होऊन स्वर्गलोकीं बहुत दाटी झाली. तेव्हां यम व इंद्र यांनीं ब्रह्मदेवाची स्तुति करून प्रार्थना केलीकीं, यमलोक शून्य होऊन, स्व र्गलोकीं आतां रहाण्यास स्थळ उरलें नाहीं. तेव्हां ब्रह्मदेवानें सांगि तलें कीं, आजपासून पुष्करतीर्थ हें स्वर्गलोकीं वास करील. त्यांत का र्तिक शुद्ध एकादशी पासून पौर्णिमेपर्यंत मात्र पृथ्वीतलीं येत जाईल. याहून इतर दिवसीं जे कोणी पुष्करतीर्थी स्नानार्थ येतील त्यानीं भ क्तिपूर्वक शुद्धभावानें स्वर्गास असलेल्या पुष्करतीर्थाचें अंकुशमुद्रेनें आवाहन करावें, म्हणजे त्याच्या स्नानाकरितां पुष्करतीर्थ पृथ्वीवर येऊन त्यांस स्वर्ग देईल. या करितां इतर दिवशीं पुष्करतीर्थी स्नान कर णें झाल्यास अंकुशमुद्राकरून उच्चस्वरानें 'एहि पुष्कर' असें ह्मणून

पुष्करतीर्थ

पुष्कराचें आवाहन करून, स्नान केलें तरच स्वर्गप्राप्ति होईल, असें पुराणांत सांगितलें आहे. ज्यांस पृथ्वीप्रदक्षिणा करणें असेल, त्यांनीं पुष्कर तीर्थापासून आरंभ करावा असा नियम आहे. पुष्करापासून पश्चिमेस सुमारें साठ सत्तर कोसांवर भूविवर ह्मणून एक विवर आहे. त्या विवरानें पातालांत जाण्याचा मार्ग आहे. ज्याची पातालांत जाण्याची इच्छा असेल त्यांनीं त्या विवरमार्गें जावें. जसा स्वर्गमार्ग बदरिकाश्रमीं आहे, तसा येथें हा पातालमार्ग सांगितला आहे. पुष्करक्षेत्रीं ब्रह्मदेवाचें एक मंदिर आहे. त्यांत ब्रह्मदेवाची चतुर्भुज अशी फार सुंदर मूर्ति आहे. तिच्याजवळ गायत्रीची मूर्ति असून सनक, सनंदन, सनातन, व सनत्कुमार या चौघांच्या मूर्ति आहेत. ब्रह्मदेवाची ज्येष्ठ स्त्री सावित्री ही कांहीं कारणानें रुसून ब्रह्मदेवापासून दूर पर्वतावर जाऊन राहिली, अशी पुराणांत कथा आहे. त्याप्रमाणें तेथें पहाडावर सावित्रीचें स्थान आहे. तेथें सावित्रीची मूर्ति फार अप्रतिम आहे. पुष्करतीर्थापासून जो प्रवाह वहात गेला आहे, त्यासच सरस्वती असें ह्मणतात. या तीर्थाची यात्रा प्रति वर्षीं कार्तिकी पौर्णिमेस असते. तेव्हां तेथें फार मोठा मेळा भरतो. पुष्करतीर्थीं आठमठेश्वर व आठजोगदेश्वर इत्यादि शिवस्थानें पुष्कळ आहेत. समीपच मंकण व यज्ञ असे दोन मोठे पर्वत आहेत. पुष्करतीर्थांत मगर फार आहेत. या क्षेत्राची यात्रा व तीर्थ स्नानें व देवदर्शनें व तीर्थप्रदक्षिणा व श्राद्धादि सर्व कृत्य रघुनाथराव यांनीं उत्तम प्रकारें केलें. पुष्करक्षेत्राचे उत्तरबाजूस कृष्णगड ह्मणून एक लहानसें स्वतंत्र संस्थान आहे. त्या गावीं लोंकरीच्या धाबळ्या चांगल्या तयार होतात. व हाच व्यापार या गांवचे बाजारांत मोठा चालतो.

(पातालमार्ग) (कृष्णगड)

(जयपुर) पुढें क्रमानें रघुनाथराव हे जयपुर येथें गेले. तथ शहर पाहण्याच्या इराद्यानें आठदिवसपर्यंत तेथील बगीच्यांत त्यांचा मुकाम होता. जयपुर हें मोठें शहर आहे. हें सवाईजयसिंग ह्मणोन राजा झाला, त्यानें वसाविलें. शहराची रचना सोंगट्याचे पटासारखी दोरीसूत अ-

सून मध्यभागीं मोठाथोरला राजवाडा आहे. रस्ते फार रुंद आहेत. त्यांत रेती बहुत असल्यामुळें पायीं चालणारास फार श्रम होतात. या शहरांत सर्व प्रकारचा व्यापार चालतो. व कागदावरील तसबिरा व संगमरवरी दगडाच्या मूर्ति येथें फार चांगल्या होतात. येथील रंगाप्रमाणें रंग दुसरे ठिकाणीं होत नाहीं, अशी आख्या आहे. बहुतेक व्यापार दलालाचे मार्फतच चालतो. त्या शहरीं पहाण्यासारख्या जागा बहुत आहेत.

रघुनाथराव ज्यावेळेस जयपुरास गेले, त्यावेळीं तेथील राजा रामसिंह ह्मणून होता. तो वयानें अल्प असल्यामुळें इंग्रजसरकारांतून पंच नेमून, त्यांचे मार्फत रेसिडेंटाचे सल्यानें राज्यकारभार चालत होता. हाच रामसिंहराजा पुढें वयांत आल्यावर इंग्रजसरकाराशीं दोस्तीनें वागून, त्यानें मोठी योग्यता मिळविली. बडोद्यास मल्हारराव गाईकवाड याचे अपराधाचे चौकशीस कमेटी नेमली, त्या कमेटींत तो राजा मेम्बर होता. आलीकडे थोडे दिवसांत तो परलोकवासी जाला असें समजतें !

जयपुराहून रघुनाथराव हे भरतपुरास आले. हें जाटाचें संस्थान आहे. येथील भुईकिल्ला मजबूद व पहाण्यासारखा आहे. त्याची प्राचीन इतिहासांत प्रसिद्धि आहे. ते वेळेस राज्जावर अधिकारी बलमनसिंग या नांवाचा राजा होता. त्याची परवाणगी घेऊन रघुनाथराव यांनीं तो किल्ला सर्व पाहिला. तेथील राजास व प्रजेस मल्लविद्या शिकण्याचा मोठा षोक आहे. भरतपुरशहराचा देखावा छावणीचे वस्तीसारखा आहे. तेथें किल्याखेरीज पहाण्यासारखें दुसरें कांहीं नाहीं. तेथील राजे कृष्णभक्त असून गोवर्धनपर्वताची उपासना करितात. भरतपुर

भरतपुराहून बाराकोसांवर मथुरा आहे. या क्षेत्रीं रघुनाथराव हे, आपले पूर्वज शिवाजीविठ्ठल यांची छावणी होती, त्याजागीं यमुना नदीनिकट ध्रुवघाटावर शके १७७० चे माघवद्यांत जाऊन दाखल जाले. मथुराक्षेत्र हें फार अप्रतिम आहे. येथें कृष्णालिलेचीं स्थानें पु मथुरा

ष्कळ पहाण्यासारखीं आहेत. पारखजी ह्मणून सिंद्याचें पदरीं एक मोठा सावकार होता. त्यांने द्वारकाधीशाचें एक मोठें मंदिर येथें बांधिलें आहे. व त्या देवास पूजा वगैरे खर्च चालण्यास पुष्कळ पैसा ठेविला आहे. त्याचे व्याजांत देवाचा खर्च चालतो. हें स्थान पहाण्यासारखें आहे. मथुराशहराचा देखावा बहुत सुंदर आहे. ह्या शहरांत सर्व प्रकारचा व्यापार मोठ्या भरभराटीनें चालतो. येथील लोक नानाप्रकारचे व नामांकित असे दुधाचे पदार्थ करितात. ज्या ठिकाणीं रघुनाथराव उत्तरले होते,तें ठिकाण जेथें ध्रुवानें तपश्चर्याकरून विष्णूस प्रसन्न केलें तें होय. या ठिकाणीं रघुनाथराव यांचे पुर्वज शिवाजीविठ्ठल यांचे चिरंजीव अमृतराव हे कैलासवासी झाले, त्यांचे बरोबर त्यांची स्त्री सती गेली, त्या स्थलीं उत्तम प्रकारचें शिवमंदिर त्यांनींच बांधिलें आहे. घाटाचे वरचेबाजूस नरसिंहस्थान आहे, ती जागाही त्यांनींच बांधिली आहे. व तेथें त्यांनीं पुष्कळ शालिग्राम ठेविले होते. त्यांपैकीं कांहीं अद्याप पर्यंत आहेत .या देवांची पुजा वगैरेचें काम माथुर ब्राह्मणांकडेस सोंपिलें आहे. त्यांस वर्षासन भितरवार महालीं करून दिलेलें हल्लीं चालत आहे,व तें घेऊन ते लोक पूजा करीत आहेत. मथुरा हें आदिक्षेत्र आहे. वाराहअवतार येथेंच झाला अशी पुराणांत कथा आहे. मथुरेस मुख्यस्थान जन्मभूमी ह्मणजे कृष्णजन्म झाल्याची जागा असून तिजवर हल्लीं मुसलमानानीं मसीद बांधिलेली आहे. त्याक्षेत्रीं मुख्य तीर्थ विश्रांतिघाट म्हणून

विश्रांतितीर्थ

आहे, तेथें प्रतिदिवशी सायंकाळीं आरतीचा मोठा संमारंभ होतो. कंसाचा वध करून श्रीकृष्णांनीं त्या ठिकाणीं विश्रांति घेतली ह्मणून त्या तीर्थास विश्रांतितीर्थ हें नांव प्राप्त झालें. या क्षेत्रीं पहाण्यासारखे चमत्कार व देवस्थानें बहुत आहेत. मुख्य देवतेपैकीं वराह, केशव आदिकरून देवता पुष्कळ आहेत. विश्रांतितीर्थापासून पश्चिमेस बारातीर्थे, व पुर्वेस बारातीर्थे, मध्यें विश्रांतितीर्थ अशीं मिळून पंचवीस मुख्यतीर्थे आहेत. हा सर्व प्रकार मथुरा माहात्म्यांत वर्णिला आहे. कंसाचावा-

डा ज्या ठिकाणीं होता. तें स्थान तेथें आहे. शिवस्थानें ही तेथें पुष्कळ आहेत. त्यांत मुख्य रंगेश्वर हें स्थान आहे. येथ श्रीकृष्णानें चाणूर रंगेश्वर व मुष्टीक इत्यादि मल्लांचा वध केला. या शिवाय गोकर्णेश्वर ह्मणून गोकर्णेश्वर तेथें एक अप्रतिम शिवस्थान आहें. मथुराक्षेत्राची प्रदक्षिणा ८४ कोसांची असून तीत बारा वनें व बारा उपवनें येतात. या मथुराक्षेत्रीं तीर्थविधि, व तीर्थश्राद्ध, व देवतादर्शन इत्यादि कृत्यें रघुनाथराव यांनीं अनुक्रमानें यथाविधि केलीं. येथील उपाद्धे चोबे म्हणून ब्राह्मण आहेत. हे पूर्वी चतुर्वेद ह्मणणारे असल्यामुळें त्यांस चोबे हें नांव अपभ्रंशानें पडलें. हे ब्राम्हण दक्षिणी ब्राम्हणाचे हातचें खात नाहींत. पक्की रसई म्हणजे लाडू, पूऱ्या इत्यादि घृतपाचित अन्न खातात. याकरितां रघुनाथराव यांनीं तेथील चोबे ब्राम्हणांस फक्त लाडूचेंच जेवण दिलें. हे ब्राम्हण मोठे भक्षक व मल्लविद्येंत कुशल असून अतिशयित भांग पिणारे आहेत. याप्रमाणें सप्तपुरींतील मथुरापूरी-ची यात्रा रघुनाथराव यांनीं केली.

नंतर रघुनाथराव हे मथुरेहून वनयात्रा करावयास निघाले. ते प्रथम मधुवनची यात्रा करून क्रमानें वनयात्रा करीत, बरसाना म्हणून एक मार्गांतच गांव आहे तेथें गेले. या ठिकाणीं राधिकेचा जन्म झाला. तिचे मातापितर याच ठिकाणीं राहिले होते. हा प्रदेश वृंदावनांतीलच आहे. तेथें राधिकेच्या मातापितरांच्या चंदनकाष्ठाच्या मूर्ति आहेत. या गांवीं फाल्गुन शुद्ध अष्टमीस होरीचा (होळीचा) मोठा उत्सव होतो. या उत्सवांत स्त्रिया व पुरूष हीं एकत्र होऊन क्रीडा करितात. ह्या क्रीडेंत बीभत्स शद्बांचा प्रयोग नसून केवळ राधा-कृष्णाचे गुण गाऊन आबीर व गुलाल हीं परस्परांवर उधळतात. त्या स्थलाहून दीडकोसावर नंदगांव म्हणून नंद व यशोदा यांचे राहाण्याचें स्थान आहे. या गांवचे समीप लहान टेंकडीवर एक देऊळ आहे. तेथें नंद, यशोदा, कृष्ण व बलराम, अशा चौघाजणांच्या मूर्ति चंद-नकाष्ठाच्या आहेत. आसमंतातभागीं कद्ंबवृक्ष असून अरण्याची फा

वनयात्रा

बरसानागांव

नंदगांव

र शोभा दिसते. या नंदगांवी फाल्गुन शुद्ध नवमीस होरीसंबंधी उत्सव असतो. ते सर्व उत्सव रघुनाथराव यांनीं पाहिले. तेथून जवळ यमुनातीरीं धीरसमीर ह्मणून एक राधाकृष्णाचे क्रीडेचें स्थान आहे. हीं स्थानें क्रमानें पाहून वनयात्रा करीत रघुनाथराव वृंदावनास गेले. कदंबवृक्षावरून यमुनेचे डोहांत कालिया सर्पास शासन करण्याकरितां कृष्णानें उडी टाकिली, त्या स्थलाचे सन्निध रघुनाथराव यांचे पूर्वज शिवाजीविठ्ठल यांनीं कुंजांत राधामाधवाचें उत्तम मंदिर बांधिलें आहे. व त्या लगतच रहाण्यास योग्य अशी जागा बांधिली आहे. तेथें रघुनाथराव यांनीं मुकाम करून वृंदावनाची यात्रा केली वृंदावनांत ठाकुरद्वारें व कुंजसंस्थानें मिळून त्यांची संख्या सुमारें हजार असेल असा अजमास आहे. त्या स्थलीं बैरागी लोकांची वस्ती फार आहे. वृंदावनांत रासक्रीडेचें स्थान व सेवाकुंज वगैरे स्थानें पहाण्यासारखीं आहेत. कलकत्यांत लालबाबु ह्मणोन एक मोठा बंगाली सावकार होता. तो विरक्त होऊन वृंदावनांत येऊन राहिला. त्यानें पुष्कळ द्रव्य खर्चून तेथें एक मंदिर बांधिलें आहे. त्या स्थलीं वेगळाल्या ऋतूंत कृष्णानें ज्या लीला केल्या, त्या तेथें होतात. या कामीं त्यासावकारानें बहुत पैसा सावकारींत ठेवून त्याचे व्याजाचे उत्पनांत हा प्रकार चालतो. कृष्णानें गोपींचीं वस्त्रें यमुनातीरीं हरण करून कदंबवृक्षावर ठेविलीं, तें स्थान तेथें आहे. त्याचप्रमाणें केशी दैत्याचा वध केला तें स्थान, भांडीरवट, यज्ञपत्न्यांजवळ अन्न मागितलें तें स्थान, गोपींनीं कृष्णाबरोबर क्रिडा केली तें स्थान, अशीं अनेक स्थानें वृंदावनांत असून तीं सर्व हल्लीं उपलब्ध आहेत. फाल्गुन मासीं फाग ह्मणजे फाल्गुन संबंधीं उत्सव त्या प्रदेशीं बहुत होतो. त्यांत फाल्गुन शुद्ध एकादशीस वृंदावन येथें मोठा उत्सव असतो. प्रत्येक ठाकुरद्वारांत फुलडोल करितात. ते उत्सवाचे दिवस रघुनाथराव यांस त्या स्थलीं अनायासें प्राप्त झाले. एकंदर वनें चोवीस आहेत, त्यांत कृष्णलीलेच्या जागा प्रसिद्ध आहेत. आलीकडे पारखजीचा गु-

धीरसमीर

वृंदावन

मास्ता मनीरामशेट याचा ज्येष्ठ पुत्र लखमीचंद यानें रामानुजधर्म स्वीकारिला. सबब दक्षिण प्रदेशीं द्रविडदेशांत श्रीरंगाचें स्थान आहे, त्या नमुन्या प्रमाणें वृंदावनांत बहुत पैसा खर्चून त्यानें एक नवीन मंदिर बांधिलें आहे. तेथें श्रीरंगाची स्थापना करून रामानुज मतांतील बहुत विद्वान् लोक आणून ठेविले आहेत. द्रविडदेशांतील रीतीप्रमाणें तेथें उत्सव होतात. ती जागाही पहाण्यासारखी उत्तम आहे. गोवर्धनपर्वताची प्रदक्षिणा कच्चे दहा कोसांची आहे. त्या प्रदक्षिणेत एक कुसुमसरोवर ह्मणून तलाव लागतो. ती जागा फार रमणीय आहे. तेथें सूरजमल्लनामक जाटराजाची छत्री आहे.त्या छत्रीचें कमा फार अपूर्व आहे. याप्रमाणें चंद्रसरोवर ह्मणून दुसरा तळाव आहे. त्याचे समीप दाटझाडींत राधाकुंड व कृष्णकुंड अशीं दोन कुंडें एकमेकांजवळ असून या कुंडांतील उदक त्या कुंडांत, आणि त्या कुंडांतील उदक ह्या कुंडांत येतें. या स्थळीं स्नानदानाचें माहात्म्य पुराणांत फार वर्णिलें आहे. याप्रमाणेंच मानसीगंगा ह्मणून एक स्थान आहे. तें फार अप्रतिम आहे. येथें दीपावलीस ह्मणजे दिवाळीचेसमयीं यात्रा मोठी भरते. असे प्रकारें चोविस वनांची यात्रा पंध्रा दिवसांत करून रघुनाथराव हे मथुरेस परत आले. नंतर गोकुळास गेले. तेथील मुख्य तीर्थ यमुनेंत ब्रह्मांडघाट ह्मणून आहे. त्या स्थलीं कृष्णानें मृत्तिकाभक्षण केलें हें यशोदेस कळतांच ती त्याच्याजवळ धाऊन जाऊन काय खाल्लें ह्मणून विचारूं लागली. तेव्हां कृष्णानें आपलें तोंड उघडिलें. तों त्यांत यशोदेस सर्व ब्रह्मांड दृष्टीस पडलें, म्हणून त्यास ब्रह्मांडतीर्थ असें नांव प्राप्त झालें.तेथेंच समीप फार बारीक रेति आहे. तींत कृष्ण लोळत होते. तीस रमणरेती असें ह्मणतात. ती रेती व ब्रह्मांडघाटाची मृत्तिका हीं यात्रेकरू आपल्याबरोबर आणीत असतात. गोकुळांत कृष्णचंद्र या नांवाचें स्थान असून त्या देवाची सेवा वल्लभकुळांतील वंशाकडे आहे. रघुनाथराव हे येथें गोकुळची यात्रा करून परत मथुरेस आले. नंतर मथुरेहून सात कोसांवर बलदे

गोवर्धन

कुसुमसरोवर

मानसीगंगा

गोकुळ

ब्रह्मांडतीर्थ

बलदेव वाचें स्थान आहे, तेथें दर्शनास गेले. त्या स्थानीं मोठें एक भव्य मंदिर असून आंत बलदेवाची मूर्ति आहे. त्याच्याजवळ त्याची पत्नी रेवती हिची मूर्ति आहे. या बलदेवमूर्तिची स्थापना कृष्ण निजधामास गेल्यावर कृष्णाचा नातू वज्र, हा यादवांचा कुलक्षय झाला त्यातून शेष राहिला होता त्यानें केली, असें सांगतात. या देवास नेमणूक सालिना पांच हजारांची आहे, त्यायोगें पूजा वगैरे व्यवस्था चांगली चालते. यात्रेकरू लोक बहुत करून लोणी व खडीसाखर यांचा नैवेद्य दाखवितात. त्या प्रांतांतील पुष्कळ राजे रजवाडे यांजकडून लोणी खडीसाखरेच्या नैवेद्याकरितां नेमणुका चालत आहेत. बलदेवास होळकराचा सरदार मिरखान पठाण यानें कांहीं नवस केला होता, तो पूर्ण जाल्यावरून त्यानें कांहीं नेमणूक करून दिली आहे, असें विषयीं माहिती तेथील पुजारी सांगतात. या स्थलची यात्रा करून रघुनाथराव हे मथुरेस परत आले.

रघुनाथराव यांचा यात्रेच्या उद्देशानें बहुत दिवस मथुराक्षेत्रीं मुकाम झाल्यामुळें विंचुरकराचे पदरची मंडळी रोजगारानिमित्त ग्वालेर येथें पुष्कळ आहे, त्यांपैकीं बहुतेक लोक मथुरा येथें रघुनाथराव यांचे भेटीकरितां आले होते.

अग्रा मथुरेपासून अग्रा शहर आठरा कोस आहे. तें पहाण्याकरितां रघुनाथराव त्या शहरीं गेले. अग्राशहर हें अकबर बादशहानें वसवून त्यानें तेथें किल्ला बांधिला. अकबराचे संबधानें तें शहर उदयास आले ह्मणून त्यास अग्रा हें नाव पडलें असें म्हणतात. परंतु त्या स्थलास प्राचीन नांव यमप्रस्थ असें आहे. सांप्रत त्या शहराची फार भरभराट आहे. या शहरांत सर्व प्रकारचा व्यापार चालतो. देशरिवाजा प्रमाणें तेथील बहुतेक लोक टोप्या घालितात. या शहरीं पाहिजे तो पदार्थ मिळतो. त्यांत मुरांबे व कोहोळ्याचे वगैरे पाक फार चांगले मिळतात. शहरास पाणी बहुतेक यमुनेचें आहे. व ठिकठिकाणीं कुवेही आहेत. अग्रा प्रयाग आणि दिल्ली येथील किल्ले एक्याच न

मून्यावर अकबरबादशहानें बांधविलें. रघुनाथराव हे अग्र्याचा किल्ला पहाण्यास गेले होते. तेव्हां त्या किल्यांत सोरटीसोमनाथ म्हणून जे बारा ज्योतिर्लिंगापैकीं एक ज्योतिर्लिंग आहे, त्याच्या देवळाचे मोठाले भव्य असे चंदनी दरवाजे होते ते त्यांनीं पाहिले. हे दरवाजे सरासरीं आठशेंवर्षांपूर्वीं सुलतानमहमूदनामें मुसलमान बादशाहानें त्या देवाच्या देवळाचा विध्वंस करून आपल्या गिझनी नावाच्या राजधानीस नेऊन लाविले. पुढें इसवी सन १८३९—४० या सालीं इंग्रेजसरकारची अफगाणस्थानावर मोहिम झाली. त्या प्रसंगीं अफगाणलोकांचा पराभव करून इंग्रेजसरकारानें मोठ्या मर्दुमकीने हे दरवाजे गिझनीहून परत आणून अग्र्याचे किल्यांत ठेविले. ते पुनः सोरटीसोमथाचे देवळास लावायाचे ह्मणून ही त्यावेळीं लोकवार्ता होती. याप्रमाणें मुसलमान लोकांनी हिरावून नेलेला नकशा आठशें वर्षांनीं हिंदुस्थानास परत आणून देण्याचें यश इंग्रजसरकारानें संपादिलें. आग्र्याचे किल्यांत हामखास ह्मणून एक मोठी विस्तीर्ण बादशाही जागा आहे. त्या जागेंत हिंदुस्थानांतील जे जे राजे इंग्रेजसरकारानें जिंकिले त्यांजपासून हिराऊन आणलेलीं निशाणें (ध्वज) सर्व येथेंच सांठवून ठेविलीं आहेत. याशिवाय एकलाख फौजेस पुरतील इतकीं प्रत्येक जातीचीं हत्यारें, या ठिकाणींच अगदीं तयार ठेविलीं आहेत. त्यांची नेहमीं दुरुस्ती करण्यास त्या वेळीं पुष्कळ नोकर लोक त्या कामीं योजिलेले होते. तेथील किल्यांत अकबरबादशाह बसण्याचें एक तक्त आहे. हें तक्त हिरव्या रंगाच्या पाषाणाचें असून एका मोठ्या खणा येवढें औरस चौरस आहे. अशा प्रकारें अग्रा येथील किल्यांत पहाण्याजोगे जे चमत्कारिक पदार्थ व जागा आहेत, त्या सर्व रघुनाथराव यांनीं पाहिल्या. अग्रा शहरापासून थोड्या अंतरावर किल्याचे पूर्व बाजूस यमुनातीरीं ताजमहाल ह्मणून मोठी भव्य इमारत, एके उत्तम व रमणीय बगीच्यांत आहे. हें स्थान अत्यंत उत्कृष्ट व फारच दर्शनीय आहे. युरोपियन वगैरे ग्रंथकारांनीं या

चें वर्णन करून मोठी तारीफ लिहिली आहे. यास्तव रघुनाथराव यांनीं तेथें जाऊन तें स्थान मोठ्या उत्सुकतेनें समग्र पाहिलें. तेव्हां त्याचें सौंदर्य, महत्व, व कारागिरी, हीं पाहून व तें बांधविणाऱ्या बादशाहाचें वैभव मनांत येऊन त्यांचे अंतःकरणास परमावधीचें आश्चर्य वाटलें ! आणि येवढ्या थोरल्या ऐश्वर्याला थोडक्याच काळांत अशी स्थिति प्राप्त झाली, हें जाणून या लोकींचें वैभव केवळ क्षणभंगुर होय ! असें वाटून त्यांचे मनाला क्षणभर उदासी उत्पन्न झाली ! असो. अग्रा येथील किल्ला व ताजमहाल यांचा नकाशा विक्टोरिया महाराणीसाहिबांचे ज्येष्ठ चिरंजीव प्रिन्सआफवेल्स हे हिंदुस्थानांत आले होते, त्यावेळेस त्यांनीं विलायतेस नेला असें ऐकतों. ह्याप्रमाणें रघुनाथराव यांनीं अग्रा येथें सात दिवस मुकाम करून त्या शहराची रचना व त्यांत असलेल्या दर्शनीय वस्तु सावकाशपणें पाहिल्या. असें ऐहिक पाहाणें आटपून नंतर बदरीकेदार व बदरीनारायण इत्यादि जीं अत्यंत पवित्र व पुण्यकारक, आणि म्हणूनच परमार्थसाधनाला अत्यंत उपयोगी जीं क्षेत्रें, त्यांची यात्रा करण्याचे उद्देशानें ते मेरेठ छावणीचे सडकेनें हरिद्वाराकडे चालते झाले.

खांडववन

अग्र्याहून थोडे अंतरावर खांडववनाची सीमा लागते. तें वन मोठें विस्तृत आहे. तें अग्नीस भक्षण करण्याकरितां कृष्ण व अर्जुन यांनीं अर्पण केलें. या कृत्यास इंद्रादिदेव विघ्न करूं लागले. तेव्हां त्या सर्वांचे निवारण करून त्यांनीं तें वन अग्नीकडून यथेष्ट भक्षण करविलें. त्यावेळीं सारंगपक्ष्याचीं लहान बालकें त्या वनांत होतीं. त्यांनीं अग्नीची स्तुतिपूर्वक प्राथना केली. तिजवरून अग्नीनें त्या बालकांचें दहन न करितां त्यांचें रक्षण केलें, अशी भारतांत कथा आहे.

अचलेश्वर

ज्या स्थलीं तीं पक्षिबालकें अचल राहिलीं, त्या स्थलीं अचलेश्वर नांवाचें प्रसिद्ध शिवस्थान आहे. तेथें सन्निध कोल नामें गांव असून हल्लीं तेथें इंग्रेजांचे फौजेची मोठी छावणी आहे. त्या छावणीस कोलची छावणी असें म्हणतात. त्याठिकाणीं रघुनाथरावांचा मुक्काम

झाला. तेथें अचलेश्वराची पूजा वगैरे करून ते पुढें चालते झाले. पुढें क्रमानें मेरठचे छावणीस जाऊन त्यांनीं मुक्काम केला. तेथें पूर्व कालीं मयासुरनानें दैत्य राहात होता. त्यास अर्जुनानें अभय देऊन खांडववन दहन होते वेळीं त्याचें रक्षण केलें. मयासुराचें तें स्थान ह्मणून त्याचें नाव मेरठ पडलें असें ह्मणतात. या ठिकाणीं जी इंग्रेजी लश्कराची छावणी आहे, तिजपासून कांहीं अंतरावर एक तीर्थ आहे. त्यास सूर्यतीर्थ असें ह्मणतात. हें तीर्थ मोठें विस्तृत असून चोहोंकडून उत्तम बांधिलेलें आहे. तीर्थासभोंवतीं दाटझाडी आहे. तींत शिव, विष्णु, शक्ति, हनूमान्, इत्यादि देवांचीं मंदिरें आहेत. सूर्यतीर्थास प्रदक्षिणेकरितां सडक बांधिली आहे. हें तीर्थ खांडववनांत मोठें पवित्र गणिलें असून याचें माहात्म्य फार वर्णिलें आहे. ही जागा रमणीय असल्यामुळें नित्य सायंकाळीं छावणीतील साहेबलोक हवाखाण्यास ह्या जागीं येतात. या तीर्थीं रघुनाथराव यांनीं स्नानदानादिकृत्यें करून ते हरिद्वाराकडे चालते झाले. मार्गांत मुजफर नांवाचें एक मोठें शहर आहे. त्याखेरीज आणखीही शहरें मार्गांत लागतात. यासमयीं पंजाबांत शीखलोकांबरोबर इंग्रेजसरकारची लढाई सुरू होती. त्या संबंधानें त्याप्रांतीं वरचेवर फौजेची व दारूगोळा वगैरे सामानाची रहदारी चालू होती. अशा प्रकारें मार्गक्रमून हरिद्वारक्षेत्रीं रघुनाथराव हे जाऊन पोहोंचले.

हरिद्वारास मायापुरी असें ह्मणतात. सप्तपुरींतील मायापुरी हीच आहे. या ठिकाणीं गंगेस मोठा घाट असून क्रमानें हरिद्वार, गंगाद्वार, स्वर्गद्वार, मोक्षद्वार, अशी तेथें तीर्थें आहेत. प्रत्येक बारा वर्षांनीं कुंभराशीस बृहस्पति जातो, तेव्हां ह्या ठिकाणीं मोठा मेळा भरतो. आसमंतांत पंचवीस पंचवीस कोसपर्यंत मेळ्याचा पडाव असतो. असा मोठा मेळा भरतखंडांत दुरा नाहीं. हा मेळा एक वर्ष सारखा राहातो. हरिद्वारापासून थोडे अंतरावर कुशावर्त ह्मणून तीर्थ आहे. त्या तीर्थासन्निध अहल्याबाईनें बांधलेली धर्मशाळा आहे. तेथें कां

कोलची छावणी

मेरठची छावणी

मयासुराचें स्थान

सूर्यतीर्थ

मुजफरशहर

हरिद्वार (मायापुरी)

कुशावर्ततीर्थ

हीं दाक्षिणीब्राह्मण रहातात. त्यांचा निर्वाह यात्रेवर होतो. तेथून जव
विष्णुतीर्थ ळच विष्णुतीर्थ आहे. ती जागा फार रमणीय दिसते. हरिद्वारास व
हुतेक बैरागी व गोसांवी, याचीच ठाकुरद्वारें (देवतामंदिरें) आहेत.
प्रापंचिकांची वस्ती त्या ठिकाणीं नाहीं. जे केवळ तपस्वी असतील
त्यांनींच एथें वास करावा, प्रापंचिकानीं करूंनये असें पुराणांत सां
गितलें आहे. तीर्थाचे उपाध्ये ब्राह्मण आहेत. तेथून तीन कोसांवर
ज्वालापुर ज्वालापुर ह्मणून गांव आहे, तेथें ते लोक रहातात. या तीर्थाचे ब्रा
ह्मण दाढी ठेवितात. कारण त्या स्थानीं यात्रेस शीखलोक फार ये
तात, ते ज्यांस दाढी नाहीं त्यांची पूजा करीत नाहींत. हे सर्व ब्राह्म
ण तद्देशीय असून त्यांचा आचार फार कमी आहे. परंतु ते सधन
आहेत. कारण त्या स्थलीं शीखलोक बहुत धर्म करितात. तेथें यात्रे
कऱ्यापासून ब्राह्मणलोक वह्यांवर लेख घेतात. हरिद्वारतीर्थसंबंधीं
क्षौर, श्राद्ध, ब्राह्मणभोजन, वगैरे कृत्यकरून रघुनाथराव हे तेथून दो
कनखलतीर्थ न कोसांवर कनखल नामकतीर्थ आहे, तेथें मुक्कामास गेले. तेथलि
वस्ती बरी आहे. गांव बराच मोठा आहे. या स्थलीं पूर्वी दक्षप्रजा-
पतीनें यज्ञ केला. त्या यज्ञांत त्याची कन्या सती ही शिवास दि-
ली होती तिला त्यानें बोलावलें नाहीं. तरी ती आपणच होऊन पि-
त्याचे घरीं यज्ञास गेली. तेथें तिचा अपमान झाला. तेव्हां क्रोध ये
ऊन तिनें देहत्याग केला. हें वृत्त शिवास कळल्यावर त्यानें अत्यंत
कोपायमान होऊन वीरभद्रनामक गण उत्पन्न करून त्यास दक्षाचे
नाशास पाठविलें. तो यज्ञ स्थानापासून सहा कोसांचे अंतरावर हो-
ता. तेथून सदांत [सभेंत] असणारे देवांनीं त्याचा मुकुट पाहिला. हें
ठिकाण कनखलापासून सहा कोसांवर आहे. तेथें वीरभद्राचें स्थान
आहे. तेथून वीरभद्र यज्ञांत येऊन त्यानें दक्षाचें शिर तोडिलें, व य
ज्ञाचा विध्वंस केला. तेव्हां सर्व देवांनीं व ऋषींनीं त्याची स्तुति
केली. तिचे योगें वीरभद्र प्रसन्न होऊन त्यानें बोकडाचें मुख दक्षाचे
धडास लाविलें. तेव्हां दक्ष सजीव झाला. मग दक्षानें त्यास्थानीं

लिंगस्थापना करून मोठें तप केलें. तेव्हां त्यावर शिवाचा प्रसाद झाला. मायापुरक्षेत्रीं दक्षस्थापित लिंग दक्षेश्वर या नांवानें प्रसिद्ध आहे. तें लिंग मोठें असून तेथें एक फार जुनाट वटवृक्ष आहे, त्या वृक्षाखालीं आहे. तेथील दक्षयज्ञाची भूमी मोठी पवित्र मानिली आहे. जेथें अग्निकुंड होतें, तेथून भस्म अद्यापि निघतें, व तें यात्रेकरू आणितात. तेथून दीड कोसावर बिल्वतीर्थ असून तेथें बिल्वेश्वर महादेवाचें स्थान आहे. हरिद्वारापासून दीड दोन कोसांवर नीलगंगा ह्मणून मोठा गंगेचा ओघ आहे. त्याचे निकट लहान पर्वत आहे, त्यास नीलपर्वत असें ह्मणतात. त्यावर श्रीचंडीदेवीचें स्थान आहे. पर्वताचेखालीं उत्तर बाजूस नीलेश्वर महादेवाचें आणि त्याचे पलीकडे कांहीं अंतरावर गौरीशंकरमहादेवाचें स्थान आहे. तेथील माती फार तांबडी आहे. त्या मातीचें पार्थिव लिंग करून पूजा केली असतां फार पुण्य घडतें, असें क्षेत्र माहात्म्यांत वर्णिलें आहे. त्या ठिकाणचे मातीनें केलेले लिंगास प्राणप्रतिष्ठेची गरज नाहीं असें ह्मणतात. त्याठिकाणीं गंगेत हजारों तांबडेमासे आहेत. कुशावर्ततीर्थाचे दक्षिण बाजूस थोडे अंतरावर गणेशतीर्थ आहे. त्याचे खालीं लगतच भागीरथीचा नहर इंग्रेजलोकांनीं काढिला आहे.

दक्षेश्वरालिंग
बिल्वतीर्थ
बिल्वेश्वर
नीलगंगा
नीलपर्वत
श्रीचंडी
नीलेश्वर
गौरीशंकर
गणेशतीर्थ

याप्रमाणें मायापुरीची यात्रा करून रघुनाथराव हे बदरिकाश्रम यात्रेस जाण्याचे तयारीस लागले.

हरिद्वारापासून पुढें गाडी अगर घोडें कोणतेंही वाहन नेण्यास मार्ग नसल्यामुळें रघुनाथराव यांनीं त्या देशचे रीतीप्रमाणें स्वतः बसण्यास एक 'झंपाण' केलें. बरोबरील मंडळीस बसण्याकरितां कांहीं कंड्या व ओझें वहाणारे लोक करून बरोबरील वीस मंडळीसह रघुनाथराव हे केदारेश्वर यात्रेस चालते झाले.

---

टिप — १ झंपाण हें पाळण्यासारखें असून त्यास चार माणसें उचलतात. मार्गांत सर्व मजलभर यांत बसून जातां येत नाहीं. चांगला रस्ता असेल तेथें त्याचा उपयोग होतो. येकंदर निमे मजल पायीं चालावी लागते.

टिप २ कंडी — उंच टोपलीसारखें वेळूचें पात्र करितात. त्यास कंडी ह्मणतात. तींत बाहेर पाय सोडून बसावें. पहाडी लोक ती कंडी आपल्या पाठिशीं बांधितात. या बसण्यांत फार त्रास होतो. या पेक्षां पायीं चालणें फार चांगले!

---

षीकेश

हरिद्वारापासून बारा कोसांवर हृषीकेश ह्मणून स्थान आहे. त्या स्थानीं कुब्जाम्रक नामें एक मुख्य तीर्थ आहे. या तीर्थी रैभ्यऋषीनीं विष्णुप्रीत्यर्थ तप केलें. तेव्हां विष्णूनें आम्रवृक्षावर कुब्जरूप धारण करून रैभ्यऋषीस दर्शन दिलें. या कारणावरून त्या तीर्थाचें नांव कुब्जाम्रक असें पडलें. त्या कालचा त्या तीर्थासमीप जुनाट आम्रवृक्ष आहे. त्या आम्रवृक्षास क्वचित फळ येतें. तें फार दुर्मिळ आहे, व तें भाग्यवाना शिवाय दुसऱ्यास प्राप्त होत नाहीं, असें म्हणतात. तेथें भागीरथीचा प्रवाह मोठ्या वेगानें वाहतो, व तेथील उदक अतिस्वच्छ आहे. तेथून पुढें थोडे अंतरावर लक्ष्मणाचे स्थान आहे. तेथें लक्ष्मणाची एक सुंदुर मूर्ति असून त्या प्रदेशास तपोवन अशी संज्ञा आहे. त्या स्थलीं बैरागी लोक फार रहातात. ह्या हृषीकेशस्थानाचा देखावा पाहून हें स्थल अत्यंत पवित्र व तपोभूमी खचित आहे असा मनाचा निश्चय होतो. या स्थलीं गंगेचें पात्र फार खोल असून प्रवाह मोठ्या जोरानें वाहातो, त्यामुळें पलीकडे जातां येत नाहीं. या करितां तेथें 'झुला' बांधिला आहे. त्या झुल्यास लच्छिमन झुला असें ह्मणतात. हा झुला सातशें हात लांब व एक हात रुंद आहे. वर दोऱ्या बांधिल्या आहेत, त्यांस धरून एकेक पाऊल खालील बांधिलेले लांकडावर टाकुन मोठे युक्तीनें तो झुलापार उतरून जावें लागतें. तेथून खालीं खाल पाणी पाहून मनास भीति वाटते. या स्थलीं जो कर्तव्य विधि तो करून झुला उतरून रघुनाथराव पार गेले. हल्लीं झुल्यावरून जाण्याचा मार्ग इंग्रजांनीं सुलभ केला आहे, असें ऐकतो.

कुब्जाम्रक (तीर्थ)

तपोवन

देवप्रयाग

मार्गामध्यें चार दिवस चालून पांचवे दिवशीं रघुनाथराव हे देवप्रयागक्षेत्रीं जाऊन पोहोंचले. देवप्रगांत अलकनंदा आणि भागीरथी

यांचा संगम झाला आहे. त्यांत भागीरथी ही गंगोत्रीकडून व अलक नंदा बदरीनारायणाकडून आली आहे. श्रीशंकराचार्य हे या क्षेत्रीं संगमासन्निध मोठी गुहा आहे, त्या गुहेंत कांहीं दिवस राहिले होते. ह्या ठिकाणीं त्यांनीं ब्रह्मसूत्रांवर भाष्य केलें असें ह्मणतात. या देव प्रयागक्षेत्राचा महिमा स्कंदपुराणांत केदारखंड नामक एक भाग आ-हे, त्यांत फार वर्णिला आहे. त्या स्थळीं वाराहशिला आहे. त्या शिलेचें माहात्म्य फार वर्णिलें आहे. तेथून जवळच लहान टेंकडीव र रामचंद्राचें मंदिर आहे, त्यांत रामचंद्राची मूर्ति मोठी भव्य आहे. राम दर्शनास येण्याऱ्या यात्रिकऱ्यापासून तेथील पुजारी कर घेतात. देवाचा आजबाब पुष्कळ आहे. या स्थळीं शिवप्रसाद प्राप्त होण्या करितां रामचंद्रानें तप केलें असें माहात्म्यांत वर्णन आहे. या क्षेत्रीं संगमा सन्निध वागीश्वर या नांवाचें शिवलिंग आहे. तें सरस्वती देवीनें स्थापन करून, बहुत तप केलें, तेव्हां शिवप्रसाद होऊन सर- वागीश्वर स्वतीस सप्तस्वर व सर्व राग, व त्यांचे भेद, यांचें ज्ञान प्राप्त झालें, अशी कथा आहे. याशिवाय आणखी देवस्थानें बरींच आहेत. या क्षेत्राची सर्व यात्रा करून रघुनाथराव हे श्रीनगरास गेले.

श्रीनगर हा गांव त्या पहाडी प्रदेशांत फार मोठा शहरासारखा श्रीनगर

---

टिप — १ या श्रीरामचंद्राच्या पूजाधिकाराविषयीं अशी रीत प्राचीन का-ळापासून चालत आली आहे कीं, पहाडी ब्राम्हणाची कन्या असून दक्षिणेंतील द्रविड किंवा तैलंग ब्राह्मण जो कोणी तिच्याशीं लग्न लावून त्या क्षेत्रीं राहिल, त्यानें देवाची पूजा करून देवापुढें जें उत्पन्न येईल तें, व देवाच्या पूजे बद्दल ने-मणुकीचें उत्पन्न आहे तें, शिवाय यात्रिकरापासून दर्शनाबद्दल कांहीं कर आहे तो, येकूण सर्व उत्पन्न त्यानें घेऊन त्या संस्थानास खर्चाची नेमणूक आहे तिचें स्वामित्व करावें. या पुरुषापासून त्या स्त्रियेच्या पोटीं जी कन्यासंतति होईल ति-चा क्रम सदर्हु लिहिल्या प्रमाणेच जाणावा. पुरुष संतति झाली असतां देवप्रयाग व श्रीबदरीनाथ यांचे सन्निध मुख्य अग्नितीर्थ आहे, तेथील एकंदर उपाध्येकसं-बंधीं उत्पन्न घेऊन त्यावर त्यांनीं निर्वाह करावा. अशा प्रकारची तेथें चमत्कारी-क वहिवाट आहे. दाक्षिणेंतील तैलंग व द्रविड असे कित्येक ब्राह्मण या लोभानें तेथें जाऊन राहिले आहेत!

आहे. तेथें ताडपत्री छत्र्या चांगल्या होतात. बाजारांत कस्तुरीचे नाभे, वनगार्यींचीं पुच्छे, पद्मकाष्ठाच्या काठ्या, तेजबलाच्या काठ्या, शिलाजीत, कस्तूरीमृगांचीं कातडीं, भूर्जपत्रें, उत्तम प्रकारचा शुभ्र मद, बहुत मोठाले हिरडे, शिवाय पहाडांत उत्पन्न झालेले पदार्थ फार चांगले मिळतात. लोंकरीच्या टोप्या व धाबळ्या यांस त्या भाषेंत पंखी ह्मणतात, हे पदार्थ त्या शहरींच उत्पन्न होतात. पहाडी प्रदेशांत इंग्रजी नाणें चालतें. तेथील प्राचीन नाण्यांपैकीं तिमासी ह्मणून नाणें आहे, त्याची प्रवृत्ती फार आहे. तिमासी पांच आण्याचा माल असते. एक रुपयाच्या सरासरी तीन तिमाश्या होतात. या प्रदेशांतील लोक गौरवर्ण असून शरीरानें सुदृढ असतात. त्यांच्या डोक्यास लोंकरीचीटोपी, आंगांत लोंकरीचा आंगरखा, व लोंकरीचाच पायजमा असतो. स्त्रियाही जाड लोंकरीचें कापड नेसतात. पदर खोचणें त्यास दाभण टोंचून ठेवितात. स्त्रिया बहुत करून गौरवर्ण असतात. त्या प्रदेशांत सर्वत्र पहाडी भाषा बोलतात. परंतु मुसलमानी भाषा बहुतेकांस समजत असून ती ते बोलतही असतात. या प्रदेशांत राजगिरा, उडीद, मद, हे पदार्थ, तसेच शेंदुर, हिंगुळ व गेरे धातूही उत्पन्न होतात. त्या प्रांतातील उत्पन्न काय तें हेंच आहे. प्रवाशी लोकांस तांदुळ, गव्हांचा आटा, उडदाची डाळ, इतके पदार्थ मार्गांत बहुतेक ठिकाणीं मिळतात. मुक्कामास गवताचीं छपरे केलेलीं असतात, त्यांस चठ्ठया ह्मणतात. त्या ठिकाणीं रहाणें पडते. एखादे मुक्कामीं पाणी दूर असतें, तेव्हां फार अडचण पडते. श्रीनगर येथें इंग्रजांचें ठाणें आहे. हा गांव तिकडील पहाडी प्रदेशाच्या जिल्ह्याचें ठिकाण ह्मणवितो. या पहाडी प्रदेशांत सर्व व्यापाराचे जिन्नस शेळ्या व बोकड यांवर लहान गोण्या घालून नेतात. दुसरें जनावर तिकडे चालण्यास मार्ग नाहीं. या ठिकाणचे व्यापारी लोक हजारों शेळ्या व बोकड सग्रहीं बाळगितात. हें स्थान लक्ष्मीक्षेत्र ह्मणवितें. याच क्षेत्रीं श्रीशंकराचार्य यांनीं श्रीयंत्र स्थापन केलें आहे. क्षेत्रा

ची मुख्य देवता कमलेश्वर महादेव आहे. या श्रीनगर क्षेत्राची या- कमलेश्वर
त्रा रघुनाथराव यांनी करुन, पहाडी प्रदेशांत पूर्वी राज्य कोणाचें होतें, याचा तपास तेथील वृद्ध व सुज्ञ माहितगार लोकांपाशीं केला. तेव्हां माहिती मिळाली ती अशीः—

पांडव स्वर्गारोहणास गेले, तेव्हां पासून या प्रांती कोणी मनुष्य आले नाहींत. सर्व देश उजाड असून सर्वत्र झाडी होती. चालायास मार्ग अगदीं नव्हते. शंकराचार्य यांचा अवतार झाल्यावर ते या प्रदेशीं आले. तेव्हां त्यांनीं गंगोत्री, केदार, व नारायण, या त्रिस्थलीचा उद्धार केला. म्हणजे सर्व झाडी तोडून रस्ते साफ केले. नद्या उतरण्यास मार्ग नव्हते, तेथें झुले बांधिले. पाणी नव्हतें, तेथें आपले तपोबलानें पाणी उत्पन्न केलें. अशा प्रकारें रस्ते चालू केले. हरिद्वारापासून त्रिस्थली प्रदेशांत शंकराचार्यांनीं शिवमंदिरें येकंदर चोदाशें बांधिलीं आहेत. कोठें कोठें मंदिरांत आचार्यांची मूर्ति आहे. बांधिलेल्या मंदिरांपैकीं हल्लीं कितीएक पडलीं आहेत, व कितीएक कायम आहेत. पहाडी प्रदेशाची स्वस्थता होऊन आचार्यांचे प्रसादानें सर्वत्र वस्ती झाली. आचार्यांचे शिष्यांपैकीं कोणी क्षत्रिय होता, त्यास त्यांनीं येथील प्रदेशाचें राज्य देऊन धर्मानें प्रजेचें रक्षण करण्याविषयीं आज्ञा केली. त्याप्रमाणें त्यानें राज्याधिकारारुढ होऊन श्रीनगर ही आपली राजधानी केली. त्या राजानें व त्याचे वंशस्थांनीं बहुत दिवस राज्य केलें. पुढें हिंदुस्थानांत इंग्रेजी अंमल झाला. तेव्हां गंगोत्रीकडील प्रदेश त्या प्राचीन राज वंशाकडे राहून नारायण व केदार हा प्रदेश इंग्रेजांचे ताब्यांत आला. त्यांनीं श्रीनगर ही जिल्ह्याची जागा केली. गंगोत्री हा प्रदेश हल्लीं प्राचीन राज वंशाकडेसच चालत आहे. येणे प्रमाणें त्या पहाडी लोकांपासून रघुनाथराव यांस माहिती मिळाली. नंतर रघुनाथराव श्रीनगारापासून जवळच भिल्लकेदार ह्मणून एक प्रसिद्ध शिवस्थान आहे. तेथें भिल्लकेदार
गेले हें स्थान हिमालय पर्वतांत इंद्रकील नामक हिमालयाचें एक

शिवगंगा शृंग आहे, त्या शृंगावर आहे. तेथें शिवगंगा नामक नदीचा प्रवाह असून त्या स्थलीं अर्जुनानें पाशुपतास्त्र प्राप्ती साठीं तप केलें. तेव्हां भिल्लाचें रुप घेऊन शिव त्या स्थळीं आले. आणि अर्जुनाची परीक्षा पहावी असें त्यास वाटलें. त्या काळीं ऐक वराह ह्मणजे रान डुकर प्राप्त झाला असतां, अर्जुनानें व भिल्लरूपी शिवानें त्यावर एके कालींच बाण टाकिले. त्या योगानें तो डुकर मरण पावला. तेव्हां ती शिकार कोणी घ्यावी याविषयीं उभयतांचा कलह लागला. माझ्या बाणानें हा डुकर मेला असें ते उभयतांही आपआपले परी ह्मणूंलागले. शेवटीं तो कलहवाढून भिल्लरूपीशिवाचें व अर्जुनाचें युद्ध उपस्थित झालें. त्या युद्धांत अर्जुनाचा पराक्रम पाहून त्यावर शिव प्रसन्न झाले. आणि त्यास प्रत्यक्ष दर्शन देऊन त्याला पाशुपतअस्त्राचा उपदेश केला. भिलाचें रूप धारण करून शिव आले, म्हणून त्या शिवलिंगास भिल्लकेदार अशी संज्ञा झाली. तेथील शिवगंगात्मक तीर्थाचें स्नान व देवाची पूजा करून रघुनाथराव हे पुढें चालते झाले. त्या स्थलापासून समीपच क्रौंच नामक पर्वत आहे. त्या पर्वतास स्वामीकार्तिक यानें शक्तीचा प्रहार करून त्याचें विदारण केलें. त्याचें दर्शन करुन रघुनाथराव यांनीं रुद्रप्रयागास जाऊन मुक्काम केला. या स्थळीं मंदाकिनी आणि अलकनंदा यांचा संगम झाला आहे. संगमापासून वर थोडे अंतरावर रुद्रेश्वर नामें शिवस्थान आहे. या स्थलाचा महिमा केदार खंडांत सविस्तर वर्णिला आहे. या स्थानीं पितरांचे उद्देशानें जे पिंडदान करितात, त्यांचे पितर रुद्रलोकीं जातात, असें वर्णन आहे. तेथें पिंडदान करुन रघुनाथराव कुंभारकोटी येथें मुक्कामास गेले. या स्थलास कूर्मक्षेत्र अशी संज्ञा आहे. येथें रस्ता सोडून खालीं दीड कोसावर ध्यानबदरी म्हणोन नारायणाचें एक प्रसिद्ध स्थान आहे. अशा बिकट स्थळांचीं देवतादर्शनें व तीर्थस्नानें यात्रेकरु लोकांतून थोड्यांसच घडतात. या यात्रेंत दर मुक्कामास अनेक प्रकारचीं तीर्थें व देवतास्थानें असून ठिकठिकाणीं क्र–

क्रौंचपर्वत

रुद्रप्रयाग

कुर्मक्षेत्र उर्फ कुंभारकोटी

ध्यानबदरी

षींचें आश्रम व सिद्धांचीं स्थानें बहुत आहेत.

पुढें क्रमानेंच रघुनाथराव यांचा गुप्तकाशी नामें स्थान आहे, तेथें मुक्काम झाला. या स्थानीं मुख्य देवता काशीविश्वेश्वर असून देवापुढें मणिकर्णिका नामक तीर्थ बांधिव आहे. कलियुगाचे अंतीं, जाती, वर्ण, यांचा भेद राहणार नाहीं. सर्व धर्म नष्ट होऊन पृथ्वी अधर्मानें व्याप्त होईल. तेव्हां मनुष्यांस पवित्र करणारीं तीर्थें पाताल लोकीं जातील. काशीक्षेत्राचा महिमा शंकर हे कैलासास नेतील. त्या कालीं या क्षेत्राचा गुप्त ठेविलेला महिमा शंकर हे प्रगट करून त्या कालचे जे महापापी जीव त्यांचा उद्धार करतील. ह्मणून या क्षेत्राचें नांव गुप्तकाशी असें होय; अशी कथा या क्षेत्राच्या माहात्म्यांत वर्णिली आहे. तेथील मणिकर्णिका तीर्थाचें स्नान व विश्वेश्वराचें पूजन करून रघुनाथराव यांनीं नारदकोटीस जाऊन मुक्काम केला. तें स्थल नारदक्षेत्र ह्मणवितें. तेथें नारदाचा आश्रम व नारद तीर्थ आहे. गुप्तकाशी नारदक्षेत्र

हिमालयाचें एक मोठें व अति रमणीय असें शिखर आहे. त्यावर त्रियुगीनाराण म्हणून एक स्थान आहे. तेथें मोठी वेदी म्हणजे ओंटा आहे. त्या वेदीवर अग्नि असतो. तेथील ब्राह्मणलोक मोठालीं लांकडें लावून अग्नीचें रक्षण करण्याविषयीं नेहमी तत्पर असतात. त्या स्थानीं लांकडांचा तोटा नसल्यामुळें अग्नि सर्वदा प्रदीप्त असतो. तेथें त्या वेदीवर शिवपार्वतीचें लग्न झालें, त्या समयाचा अग्नि अद्याप पर्यंत तसाच आहे असें सांगतात. देवळाबाहेर समीप रुद्रतीर्थ, ब्रह्मतीर्थ, व विष्णुतीर्थ, अशीं तीन तीर्थें आहेत. यां तीर्थीं क्रमानें स्नानें करून यात्रिकरू लोक त्या अग्नींत तिलहोम करितात. तेथें होमास पाहिजे तें सर्व साहित्य विकत मिळतें. पूर्व कालचाच अग्नि स्थापित असल्यामुळें तेथें अग्नीचें आवाहन करण्याचें कारण नाहीं. तीन युगांचा अग्नि असल्यामुळें त्यास त्रियुगीनारायण असें नांव आहे. त्या स्थलाचा महिमा क्षेत्रमाहात्म्यांत अतिशयित वर्णिला आहे. तेथील जें अवश्य कर्तव्य तें रघुनाथराव यांनीं केलें. त्या स्थलापासून त्रियुगी नारायण

हिमालयपर्वत

हिमालय पर्वताची शोभा विलक्षण दिसते. हिमालय पर्वत हा सर्व आश्चर्यांचें एक निधानच होय, असें ह्मणण्यास कांहीं हरकत नाहीं! त्या स्थलाचे आसमंतांत दृष्टि पोहोंचेल तेथपर्यंत देवदारुवृक्षांची दाट झाडी आहे. ते देवदारुवृक्ष केवल सुरूचे झाडाप्रमाणें दिसतात! तेथील अरण्यांत नाना प्रकारचीं फुलझाडें, तशाच नानाप्रकारच्या वेली आहेत. त्यांस निरनिराळ्या रंगांचीं फुलें आलेलीं असतात, तीं पाहून मनास अतिशयित आनंद वाटतो! सर्वज्ञ आणि सर्वशक्ति अशा शिल्पकारानें [ईश्वरानें] रचिलेलें जें हें अरण्य, त्याच्या शोभेचा कोटयंशाचा कोट्यंश देखील, किंचिज्ञ व अल्पशक्ति अशा मनुष्यानें महाप्रयासानें केलेल्याही बागेस कधींही यावयाची नाहीं, हें उघड आहे! बहुत प्रकारचे पक्षी पाहून व त्याचे मधुर मधुर स्वर ऐकून मनास अत्यंत संतोष होतो, तो सांगतां येत नाहीं! हिमालयांतील मार्ग क्रमीत असतां, अजूबाजूस कित्येक कोशपर्यंत एकसारखीं विस्तीर्ण अशी पारिजात वृक्षांचीं व काटे सेवंतीचीं वनें लागतात! त्या कांटेशेवंतीचें फूल लहान असून, त्यास एक्याच पांकळीचा घेरा असतो. हिमालयाचीं उंच ऊंच शिखरें बर्फानें आच्छादित झालेलीं असतात, त्यामुळें सर्व पर्वत रुप्याचा दिसतो! त्यावर कोठें कोठें ऊन पडलें असतां जो चमत्कार दिसतो, त्याचें वर्णन करितां येत नाहीं! याप्रमाणें मोठा भव्य,अत्यंत विस्तीर्ण,आणि परम शोभायमान,असा हा हिमालयपर्वत पाहून त्याचा निर्माणकर्ता जो परमेश्वर,त्याचें अपार सामार्थ्य, अगाधज्ञान, आणि अद्भुत रचनाचातुर्य, हीं रघुनाथराव यांचें मनांत येऊन त्यांचें अंतःकरण भक्त्युद्रेकानें क्षणमात्र सद्गदित होऊन तल्लीन झालें! असो. यास्थानापासून पुढें क्रमानें गौरीकुंडतीर्थ आहे, तेथें रघुनाथराव हे गेले.

गौरीकुंड

गौरीकुंड दोन कोस दूर आहे, तोंच वाफेचा धूर दिसूं लागतो. या कुंडांतील उदक उष्ण आहे. या स्थलीं थंडी विशेष असल्यामुळें पार्वतीनें शंकराची प्रार्थना केली कीं, मला स्नानास उष्ण उदक पाहिजे त्यावरून शंकरांनीं त्या स्थानीं उष्ण उदक नि-

र्माण केलें, अशी या कुंडाविषयीं कथा आहे. हें उदक बहुत उष्ण असतें, ह्मणून यात्रेकरू तें वर काढून स्नान करितात. त्या स्थलाहून केदारेश्वर बारा कोस आहे. तेथून पुढें मार्गांत बर्फ लागतें. गौरीतीर्थाचें स्नान करून रघुनाथराव हे पुढें चालते झाले. केदारेश्वर दोन कोस राहिला असतां पुढें बर्फामुळें वृक्ष वगैरे होत नाहींत! जमीन दलदलीची आहे, परंतु चालतांनां पायांस चिखल लागत नाहीं! जमीन ओली मात्र आहे. तेथें आसमंतातभागीं बर्फांत उत्पन्न होणाऱ्या नानाप्रकारच्या वनस्पती आहेत, त्यांस तऱ्हेतऱ्हेच्या रंगांचीं फुलें येतात! त्या फुलांस सुवास मात्र नसतो! बर्फांत काळीं कमलें उत्पन्न होतात. तें कमल फार मोठें असून त्यास हजार पांकळ्या असतात! त्या फुलांचा घेर एक हातभर असतो! अशीं तीं फुलें फारच रमणीय दिसतात! असले नाना प्रकारचे चमत्कार पाहून ईश्वराची सृष्टिरचना काय आश्चर्यकारक आहे असें मनांत येऊन, हा प्रदेश खचित कैलास संबंधी असावा ! असा प्रेक्षकांचे चित्तांत निश्चय होतो ! तेथें मंदाकिनीचा प्रवाह उतरून पलीकडे जावें लागतें. तो प्रवाह मोठा नाहीं. परंतु बर्फ असल्यामुळें तो उतरून जाववत नाहीं! या करितां त्यावर पुला सारखीं लांकडें टाकिलीं आहेत, त्यांस 'सांगा' म्हणतात. तो उतरून पलीकडे जावें, ह्मणजे तेथून कैलास पर्वताची भूमि लागते, असें ह्मणतात. चहूंफेर मोठाले उंच पर्वत असून मध्यें दोन अडीच कोसांचें मैदान आहे. त्या मैदानांत मध्यभागीं केदारनाथाचें मंदिर आहे. आसमंतात सर्व हिमालयाचीं शिखरें आहेत. त्यांवर बर्फ असल्यामुळें तीं सर्व रुप्यासारखीं चकचकतात. त्या ठिकाणची शोभा कितीही वर्णिली तरी थोडीच, अशी अवर्णनीय आहे! केदारेश्वराचे मंदिरा सभोंवतीं अष्ट दिशांस ईशान तीर्थ, दक्षिणामूर्ति तीर्थ, इत्यादि तीर्थें आहेत. केदारेश्वराचें देऊळ पांडवांनीं बांधिलें असें सांगतात. देवळावर शिखर जालेलें नाहीं. अर्धेंच काम राहिलें आहे! देवळाचा परीघ मोठा असून तें फार जुनाट आहे!

मंदाकिनी

केदारनाथ

देवळांत घोंट्या इतकें पाणी असतें. व तें बर्फाचें ह्मणून अत्यंत गार पायांस सहन होत नाहीं! बाहेर मंडपांत इतर देवतांचीं स्थानें आहेत. मुख्य गर्भगृहांत केदारेश्वर आहे. तो लिंगाकार नसून मोठा रेडा बसतो त्या आकाराचा आहे. त्याच्या मागच्या बाजूस पुच्छाप्रमाणें आकार दिसतो! मोठ्या प्रयासानें यात्रेकरू या स्थानीं जातात! तेथें जाऊन देवाचें दर्शन घेतल्यावर त्यास आलिंगन करितात, तेव्हां मनाला जी भावना होते ती सांगतां येत नाहीं! त्या प्रदेशीं बिल्ववृक्ष नाहींत; या करितां मार्गांत भिल्लकेदार आहे, तेथें बिल्वाचीं झाडें आहेत, तेथून यात्रेकरू बिल्वपत्रें बरोबर आणून तीं केदारनाथास अर्पण करितात. त्या स्थलीं जाऊन रघुनाथराव यांनीं ईशानतीर्थीं स्नान केलें. देवाचें दर्शन घेऊन मंदाकिनीचें उदक, भस्म, आणि बिल्व, हीं समर्पण करून केदारेश्वरास आलिंगन केलें. त्या समयीं त्यांस अत्यंत कृतकृत्यता वाटली! परंतु तेथें अतिशयित थंडी असल्यामुळें त्याठिकाणीं अर्ध्या घटकेवर बसवलें नाहीं! तेथून बाहेर आल्यावर जीं तीर्थें आहेंत, त्यांचें वंदन व आचमन करून केदारेश्वरापुढें कांहीं अंतरावर डावे बाजूस रेतोदक ह्मणून एक स्थान आहे. त्या स्थानीं रघुनाथराव गेले. तेथें लहानसें देऊळ असून त्यांत ओरस चौरस तीन हातांचें कुंड आहे. तें फार खोल नाहीं. त्याचे तळाशीं पारा आणि वर उदक आहे. तें उदक अतिशयित गार आणि फार जड आहे. तेथील कृत्याचा क्रम असा आहे कीं, बीजयुक्त एक मोठा मंत्र आहे. तो तेथील उपाध्ये सांगतात. तो मुखानें ह्मणून उजव्या हातानें उदकाचे तीन चूळ घेऊन प्यावे. पुन्हां तो मंत्र ह्मणून डावे हातानें तीन चूळ घेऊन नंतर आणखी दोन्ही हातांचे ओंजळींत तें उदक घेऊन तो मंत्र ह्मणून तीनवार प्यावें. पुन्हां तो मंत्र म्हणून गुडघे व दोन्ही हात टेंकून बैलासारखें पाण्याचे तीन घोंट घ्यावे. याप्रमाणें द्वादशवार रेतोदक पान करण्याचा विधि आहे. नंतर तो मंत्र म्हणावा. या समयीं मोठा चमत्कार होतो! तो

रेतोदक

असा कीं, उदकांतून एकसारखे बुडबुडे येऊं लागतात. आणि पाणी वर उचलल्यासारखें दिसतें. जो मनुष्य यथाविधि तें उदक प्राशन करील त्याचे हृदयांत शिवलिंग उत्पन्न होतें! असें त्या उदकपानाचें माहात्म्य केदारखंडांत वर्णिलें आहे. असो, रघुनाथराव यांनीं प्रथम दिवशीं विधिपूर्वक रेतोदकाचें पान करून ते केदारेश्वराचे सन्निध यात्रेकरू रहाण्याची जागा आहे, तेथें जाऊन उतरले. रेतोदक पान झाल्यावर नियमें करून किमपि आहार न करितां उपोषण केलें पाहिजे, असा विधि आहे. या प्रमाणें त्यांनीं प्रथम दिवशीं केलें. या प्रमाणें सहा दिवस पर्यंत कैलासप्रदेशांत केदारक्षेत्रीं रेतोदक पान व त्रिकाल केदारेश्वराचें दर्शन करून वास करावा असा मुख्य पक्ष आहे. सहा उपोषणें न होतील तर तीन उपोषणें करून तीन दिवस रेतोदक पान करावें, असा दुसरा पक्ष आहे. यांतील दुसरा ह्मणजे तीन दिवसांचा पक्ष स्वीकारिला तर सहा महिने पर्यंत कांहीं नियम आहेत, ते पाळावे लागतात. असें तेथील माहात्म्यांत सांगितलें आहे. त्या प्रमाणें रघुनाथराव यांनीं तीन दिवस उपोषणपूर्वक रेतोदक पानाचा पक्ष स्वीकारिला. केदार येथील नित्य वर्तनक्रम या प्रमाणें असतो:— प्रहर दिवस आल्या खेरीज घराबाहेर निघवत नाहीं, कारण, धुकें, व थंडी फार असून बर्फ पडत असतें! याजकरितां प्रहर दिवसा नंतर थोडें ऊन पडल्यावर मंदाकिनीचा सांगा उतरून पलीकडे जाऊन शौचविधि करावा लागतो! आलीकडे कैलासाची भूमि असल्यामुळें यात्रेकरू शौचविधि करीत नाहींत! शौचविधि करून आल्यावर प्रयासानें स्नान करून केवळ नुसती

टीप — १ जे दिवशीं प्रथम रेतोदक पान होईल, त्या दिवशीं प्रति महिन्यास उपोषण करावें. व लोहपात्रांत पक्व केलेले पदार्थ भक्षूं नयेत, व स्त्री संग करूं नये, निंद्य पदार्थाचें भक्षण करूंनये असा विधि सहा महिने पर्यंत व्रत चर्येचा नियम आहे.

संध्या करावयास देखील थंडीमुळें मोठे कष्ट पडतात! ती झाल्यावर केदारेश्वराचें दर्शन व रेतोदकपान करून निवाऱ्याच्या जागीं जाऊन पडावें लागतें. तेथें वस्त्रें वाळत नाहींत ह्मणून धाबळीवर निर्वाह करावा लागतो! त्या स्थळीं राहाण्याची जागा अशी आहे कीं, खबुतरें कोंडण्याचें घर असतें, तशा मासल्याची लहान खोली असून तिजवर माळा असतो. व त्यावरबसण्याकरितां लांकडें पसरलेलीं असतात. त्या माळ्यावर जाण्यास दादरा असतो त्या दादऱ्यानें त्या माळ्यावरील पसरलेल्या लांकडावर जाऊन बसावें किंवा निजावें! तेथें उभें राहातां येत नाहीं! खालील मजल्यांत सर्व गार उदक असतें! तेथें मध्यभागीं दगडाचा ओंटा असतो. त्यावर मोठा अग्नि पेटवून त्या अग्नीचे शेकानें माळ्यावरील माणसाचा थंडी पासून जसातसा बचाव होतो! या प्रमाणें तेथें वर्तन करावें लागतें! असो, असे प्रकारें रघुनाथराव यांनीं वर्तन करून तेथें त्यांनीं तीन दिवस मोठ्या कष्टांनें काढिले. तीन दिवसांत एक वार मात्र मंदाकिनीचें स्नान केलें. कारण, तें फारच कठिण आहे म्हणून यात्रेकरू एकच वार करतात! स्नानाचे वेळीं तेथें मोठा अग्नि पेटवून ओलें वस्त्र नेसून मंदाकिनीचे तीरीं स्नानास बसतात! बर्फमिश्रित पाण्यानें वस्त्रें भिजविण्यास फार वेळ लागतो! तितका वेळ तेथें बसवत नाहीं. थंडीनें वेंगडी वळते! ह्मणून स्नानाकरितां ओलें वस्त्र नेसून कांठावर बसल्यावर दुसऱ्या मनुष्यानें दोन घागरी पाण्यानें भरून स्नान करणाऱ्याचे अंगावर ओताव्या. त्या वेळेस स्नान करणाऱ्यास मूर्छा आल्या सारखें होतें! मग जवळ असणारीं दुसरी मनुष्यें त्यास उचलून पूर्वी करून ठेवलेल्या अग्नीवर धरतात! तेव्हां कांहीं पळांनीं त्यास शुद्धि येते! असा मंदाकिनीस्नानाचा कष्टप्रद क्रम आहे! केदारक्षेत्रीं मुंडन श्राद्ध वगैरे कृत्य कांहीं नाहीं! तेथील विधि फक्त केदारेश्वराचें दर्शन व मंदाकिनी तीर्थाचें स्नान व रेतोदकाचें पान इतकाच आहे! या खेरीज तेथें दुसरें कर्तव्य नाहीं! तेथील उपाध्ये त-

द्देशीय ब्राह्मण आहेत. ते अगदीं आचारहीन असून त्यांस वेदाचा संस्कार विलकुल नसतो. केवळ गायत्रीचा मात्र उपदेश असतो असें दिसून येतें

केदारक्षेत्रीं भ्रुगुपतन म्हणून एक हिमालयाचें शृंग आहे त्या शृंगा वरून उडी टाकून देहत्याग केला असतां त्यास आत्महत्येचा दोष नसून त्याच्या मनांत ज्या फलाची वासना असेल तें फल त्याला पुढील जन्मीं प्राप्त होतें, असें क्षेत्र माहात्म्यांत लिहिलें आहे. ज्यास कैलास प्राप्तीची इच्छा असेल, त्यानें केदारेश्वराचे देवालयाचे मागें आग्नेयी दिशेस एक मार्ग पहाडांत जातो, त्या मार्गानें जाऊन देहत्याग करावा ह्मणजे त्याची ती (कैलासप्राप्तीची) इच्छा पूर्ण होते! असें ही त्या क्षेत्रमाहात्म्यांत वर्णन आहे. त्या मार्गानें पूर्वी कोणी कोणी जात असत! त्या वाटेनें कोस दीड कोस गेल्यावर जाणाऱ्यांचा देह बर्फांत गळून पडतो! अगर त्या प्रदेशीं मोठाले गरुड जातीचे पक्षी आहेत, ते उचलून नेऊन त्यास फाडून खातात ! असें तेथील लोक सांगतात. केदाराहून थोडे अंतरावर कुबेराची अलकावती ह्मणून पुरी आहे. तेथें एक मोठें सरोवर आहे. त्यांतून कुबेरगंगा निघाली. तिचा मंदाकिनीशीं संगम झाला आहे. त्या सरोवरांत सुवर्ण वर्णाचीं व फारच सुवासिक अशीं कमलें असतात. त्यांतून एखादें कमल क्वचित् त्या नदीचे प्रवाहा बरोबर येऊन मंदाकिनीचे संगमांत प्राप्त होऊन केदारास वहात येतें तें कमल कदाचित् दैववशात् कोणास प्राप्त होतें ! असें तेथील लोक सांगतात ! तसेंच, त्या प्रदेशीं यक्षांचा संचार असल्यामुळें बर्फांत मोठालीं पावलें उमटलेलीं कधीं कधीं दृष्टीस पडतात, असेंही त्यांच्या सागण्यांत येतें!

भ्रुगुपतन

आलकापुरी

कुबेरगंगा

केदारक्षेत्रीं तीन दिवस राहून चौथे दिवशीं देवाची अज्ञा घेऊन रघुनाथराव हे तेथून निघाले, ते आले मार्गानेंच परत बदरीनारायणाकडे जाण्याचा रस्ता गुप्तकाशीचे सन्निध फुटतो, तेथपर्यंत येऊन उखीवठ ह्मणून जागा आहे, तेथें येऊन त्यांनीं मुक्काम केला. हें बा–

उखीमठ

णासुराची कन्या जी उषा तिचें रहाण्याचें ठिकाण होय. त्या स्थानीं एक मोठें शिवमंदिर असून मंदिरा समीप यात्रस्थास रहाण्या करितां मोठाल्या धर्मशाळा बांधिल्या आहेत. उषेनें त्या शिवलिंगाची पूजा करून तप केलें. तेव्हां शिवप्रसादानें तिला पार्वतीचें सखीत्व प्राप्त झालें असें वर्णन आहे! त्या मठांत जंगम लोक राहतात. त्यांत जो मुख्य महत असतो, तो त्या देवाची पूजा वगैरे करतो. कार्तिक मासापासून केदारक्षेत्रप्रदेशीं बर्फ पडण्यास आरंभ होतो ! यामुळें कार्तिकी पौर्णिमेस केदारेश्वराचें कपाट बंद करून तेथील रहाणारे पूजक ब्राम्हण वगैरे लोक या स्थानीं येऊन रहातात. केदारेश्वराची पूजा नैवेद्य इत्यादि सर्व उपचार या स्थानचे शिवलिंगास झाले म्हणजे ते केदारेश्वरास पावतात असें ते लोक मानितात! वैशाखांत बर्फ वितळूं लागलें म्हणजे तिकडील रस्ता पुन्हां चालू होतो. नंतर बहुत लोक जमून केदारास जातात ! तेथें देवाचें मंदिर बर्फानें आच्छादित असतें, तें मोठ्या यत्नानें बर्फ काढून उघडें करतात. मग देवद्वार खुलें होतें!

अगस्त्याश्रम

उखीमठापासून जवळच अगस्तीचा आश्रम आहे. तेथें रघुनाथराव हे आले. त्या स्थानीं मंदिर असून त्यांत अगस्तिऋषी व त्याची पत्नी लोपामुद्रा अशा दोघांच्या दोन मूर्ति आहेत. आश्रमा सान्निध

वैतरणीनदी

वैतरणी नामें नदी आहे. अगस्तीचें दर्शन करून वैतरणीत स्नान व पितृतर्पण केलें असतां, यमलोक प्राप्त होत नाहीं! व पितृगण यमशासनापासून मुक्त होतात, असें माहात्म्यांत लिहिलें आहे. तेथून रघुनाथराव हे पुढें चालते झाले. मार्गांत एक्या बाजूस तुंगनाथाचा

तुंगनाथ (पर्वत)

पर्वत लागतो.त्या पर्वताची चढण फार मोठी व रस्ता बिकट व त्या प्रदेशीं थंडीही अतिशयित, अशा कारणांनीं बहुतेक यात्रेकरी रस्ता सोडून तिकडे जात नाहींत ! रघुनाथराव हे तें स्थान अपूर्व असल्यामुळें पहाण्याकरितां गेले.

हिमालयपर्वताचे सर्व शिखरांहून बहुत उंच व अति रमणीय अ

सें तें शिखर असल्यामुळेंच त्यास 'तुंगनाथाचें'शिखर असें ह्मणतात. त्याचा चढाव कडे सहाकोस आहे. तो चढाव चढून वर गेल्यावर सपाट जमीन लागते. तेथें आसमंतात् सर्व बर्फ असतें! बर्फांतच उत्पन्न होणारे वृक्षांस तऱ्हेतऱ्हेच्या रंगाचीं फुलें आलेलीं असतात! व तेथें तुंगगंगा नामें नदीचा लहान प्रवाह आहे. त्या नदीचे उभय तीरानीं नाना प्रकारच्या वनस्पती प्रफुल्लीत असल्यामुळें तेथील देखावा अत्यंत रमणीय दिसतो. तो पाहिला ह्मणजे ईश्वरानें जे नेत्र दिले, त्याचें आज साफल्य झालें असा मनाचा ग्रह होतो! नदीतीरीं एक मध्यम प्रतीचें मंदिर आहे. त्यांत तुंगनाथ नामें एक शिवलिंग आहे. लिंगाचे मागें जवळच शंकराचार्यांची मूर्ति आहे. तें स्थान अगदीं निर्मनुष्य आहे, ह्मणजे तेथें एकही माणुस नाहीं! त्या स्थळीं तुंगगंगेचें स्नान करून रघुनाथराव यांनीं तेथील वनपुष्पांनीं तुंगनाथ लिंगाचें पूजन केलें. त्या स्थलाहून कैलास पर्वताचें शिखर दिसतें, असें केदार खंडांत लिहिलें आहे. तुंगगंगेचें स्नान करून तुंगनाथाचे दर्शनाविषयीं माहात्म्यांत मोठी आवश्यकता लिहिली आहे. तेथें जवळच एक टेंकडी असून तिजवर एक शिवस्थान आहे, तेथें रघुनाथराव गेले. तेथून हिमालय पर्वताची अत्यंत शोभा दिसते! त्या स्थानीं रावणानें तप करून आपली दहा मस्तकें शंकारास अर्पण केलीं. तेव्हां त्याजवर शंकराचा अत्यंत प्रसाद होऊन त्यास त्यांनीं आपले गणांत प्रमुख केलें! अशी पुराणांत कथा आहे. येथील यात्रा करून रघुनाथराव यांस खालीं येण्यास संध्याकाळ झाला! येथील रस्ता फार बिटक व चढण मोठी असल्यामुळें त्यांस बहुत श्रम झाले. येथून रघुनाथराव हे क्रमानें कर्णप्रयागास आले. त्या स्थानीं कर्णगंगेचा व अलकनंदेचा संगम झाला आहे. तेथें स्नान, दान, पितृतर्पण करण्याचे मोठें फल सांगितलें आहे. तेथून ते नंदप्रयागास आले. त्या स्थानीं नंदगंगेचा आणि अलकनंदेचा संगम झाला आहे. त्या स्थलीं स्नानादिकृत्य करून, पिंपळ कोटी नामक

तुंगगंगा

तुंगनाथ [लिंग]

कर्णप्रयाग

कर्णगंगा

नंदप्रयाग

नंदगंगा

पिंपळकोटी (गांव) गांव आहे त्या गावांस येऊन त्यांनीं मुकाम केला. हा गांव त्या प्रदेशांत शहरासारखा आहे. तेथें सर्व पदार्थ मिळतात. तेथून रघुनाथराव हे गरुडगंगेस आले. गरुडगंगा ही फार लहान नदी आहे. तिचे उत्तर तीरीं गरुडाची एक मूर्ति आहे. गरुडगंगेचे प्रवाहांतील दगड तोंडानें उचलून घेऊन तो सर्पदंश स्थानीं लाविला असतां सर्पविष उतरतें, असें तेथील लोक सांगतात. यात्रेकरी लोक त्या रीतीनें दगड तोंडानें उचलून घेऊन ते स्वदेशीं नेतात. तेथें यात्रेकरू गरुडाची पूजा करून आपले शक्ती प्रमाणें शेरणी वांटतात. त्या ठिकाणापासून बदरिकाश्रमास आरंभ होतो. तेथून रघुनाथराव हे व्यासाश्रमास आले. तेथें व्यासगंगेचें स्नान करून त्यांनीं व्यासाचें दर्शन घेतलें. नंतर क्रमानें जोसीमठास येऊन त्यांनीं मुक्काम केला. त्या मठास ज्योतिर्मठ अशी संज्ञा आहे. हा मठ शंकराचार्यांनीं स्थापिला. त्या मठांत आचार्य यांचे पूजेचे शालिग्राम आहेत. या स्थानीं उदक नव्हतें ह्मणून आचार्यांनीं दंड मारून पर्वतांतून उदकधारा काढिली. तें पाणी तेथील लोक पितात! आचार्य हे परमधामास गेले, तेव्हां त्यांनीं आपला शिष्य हस्तामलक नामें होता, त्यास त्या स्थानीं स्थापिलें! असें तेथील लोक सांगतात. या ठिकाणची वस्ती चांगली आहे. तेथून खालचे बाजूस एके कोसावर विष्णुप्रयाग आहे. तेथें विष्णुगंगेचा व अलकनंदेचा संगम झाला असून, त्या संगम तीर्थाचें स्नान करणें फार कठीण आहे. कारण, एके बाजूनें विष्णुगंगा व एके बाजूनें अलकनंदा या दोन्ही नद्या फार उतरत्या जाग्यावरून वहात असल्यामुळें त्यांचे प्रवाहास मोठा जोर असतो. आणि संगम स्थलीं परस्परांची भयंकर टक्कर होऊन त्यांचा मोठा शद्व होतो. आणि पाणी फार उंच उडतें! तेथें एक खडकाचें टोंक आहे, त्या टोंकास साखळदंड पक्का बसाविला आहे. ती साखळी एका हातानें धरून सात आठ हात खालीं उतरून स्नान करावें लागतें! स्नानाचे वेळीं सांखळी डावे हातानें धरून उजवे हातानें तांब्या बुडवून आं

(Margin notes: गरूडगंगा; व्यासाश्रम; व्यासगंगा; जोशीमठ; हस्तामलक (स्थान); विष्णुप्रयाग; विष्णुगंगा)

गावर घ्यावा लागतो! तेथील पाण्याचा भयंकर आवाज, व त्याचें वर उसळणें, व एकटेंच सांखळी धरून अवघड रस्त्यानें खालीं उतरणें, येणेंकरून स्नान करणारा मनुष्य फार भयाभीत होतो! वर असणारे मनुष्यास खालीं स्नानास गेलेले मनुष्याची स्थिति कशी झाली आहे. हें तो वर येई पर्यंत समजत नाहीं ! या स्थलीं बरोबर असलेले मंडळीसह रघुनाथराव यांनी तेथें वर लिहिल्या क्रमानें स्नान करून तेथून ते पंडूकेश्वर नामें स्थान आहे, तेथें मुक्कामास गेले. पंडुकेश्वर

पंडूकेश्वर स्थलीं अलकनंदेंत वैखानस नामें एक तीर्थ आहे. त्या स्थलीं एक मध्यम प्रतीचें देऊळ असून त्यांत उत्तम सुवर्णाची केलेली अशी नारायणाची मूर्ति आहे. ती मूर्ति बसलेली असून ध्यान करीत आहे, असा तिचा आकार दिसतो ! या मूर्तीचें अति लावण्य पाहून दर्शन घेणारास मोठा आनंद वाटतो ! साधारण मनुष्य बसतो येवढ्या उंचीची व रुंदीची ती मूर्ति आहे. त्या मूर्तिचें वजन किमान पक्ष साठ सत्तर शेराहून कमी भरणार नाहीं असें सांगतात. यात्रा आली असतां, तेथील पुजारी देवास अलंकार वगैरे घालितात. त्या मूर्तिविषयीं पुराणांत अशी कथा आहे कीं, 'अर्जुनास शंकरापासून पाशुपतास्त्र प्राप्त झाल्यावर सर्व लोकपालांनीं त्यास आपापले अस्त्राचा उपदेश केला. नंतर इंद्रानें अर्जुनास स्वर्गास नेलें. तेथें इंद्र हा या मूर्तीची प्रत्यहीं पूजा करीत असे त्यानें अर्जुनास भूलोकीं पाठविलें, तेव्हां त्यास मस्तकावर धारण करण्यास किरीट दिला. त्या कारणानें अर्जुनास किरीटी हें नांव प्राप्त झालें. त्यावेळीं अर्जुनानें ही मूर्ति धर्मराजास पूजे करितां इंद्रापासून मागून घेऊन पृथ्वीवर आणिली. त्या मूर्तिची पूजा धर्मराज नियमानें करीत होते. श्रीकृष्ण निजधामास गेल्यावर परिक्षितीस हस्तनापुरीं राज्यावर स्थापून क्षत्रिय धर्मास उचित असा वीर सन्यास करून पांडव हे या प्रदेशीं आले, तेव्हां ही मूर्ति त्यांच्या बरोबर होती, ती धर्मराजानें या स्थानीं स्थापन केली, ' अशी पुराणीं कथा आहे. असो, पंडूकेश्वराहू

वैखानसतीर्थ

सुवर्णाची नारायण मूर्ति

न सहा कोस बदरीनारायण आहे. तेथें जाण्यास्तव पंडुकेश्वर एथील वैखानस नामें तीर्थाचें स्नान व सुवर्णमयनारायणमूर्तिचें दर्शन हीं आटपून रघुनाथराव यांनी बदरीनारायणाचे समीप ब्राह्मणी ह्मणून

ब्राह्मणीगांव

एक पहाडी गांव आहे, तेथें येऊन मुक्काम केला. तेथून दुसरे दिवशीं ते प्रातःकाळीं स्नान करून पुढें चालते झाले. मार्गांत प्रथम कु

कुबेरशिला

बेरशिला लागते. तिचें दर्शन घेऊन रघुनाथराव यांनीं तिचे समीप

कुबेरगंगा

कुबेरगंगा आहे, तिचें वंदन केलें. तेथून बदरीनारायणाचे मंदिराचा कळस दिसतो. ह्मणून त्या स्थानीं यात्रेकरी साष्टांगनमस्कार घालतात! ति

ऋषिगंगा

थून पुढें ऋषिगंगा आहे. तिचें वंदन करून क्रमानें मार्गांतील सर्व देवतांची दर्शनें घेऊन त्यांनीं श्रीबदरीनारायणाचें दर्शन केलें. ते

श्री बदरी नारायण

समयीं रघुनाथराव यांचे अंतःकरणास फारच कृतकृत्यता वाटली! श्रीनारायणाचें दर्शन केल्यावर त्यांनीं तेथून समीपच एक धर्मशाळा आहे, तेथें जाऊन मुक्काम केला. पुढें नारायणास नैवेद्य रुपानें समर्पण केलेलें अन्न आणून बरोबरील मंडळी व तेथील ब्राह्मण यांसह भोजन केलें!

बदरी क्षेत्राची मर्यादा [ सीमा ] स्थूल, सूक्ष्म, सूक्ष्मतर, आणि शुद्ध अशी चार प्रकारची आहे! शुद्ध बदरीक्षेत्राची जी मर्यादा, तींत मुख्य दोन तीर्थें आहेत. एक अग्नितीर्थ, तें उष्णोदकाचें कुंड आ

अग्नितीर्थ

हे. दुसरें अलकनंदेंत नारदतीर्थ, तो अगाध डोह आहे. अलकनंदेचा

नारदतीर्थ

प्रवाह पर्वतावरून मोठ्या जोरानें खालीं येत असल्यामुळें या तीर्थाचें स्नान फार संभाळून व अगदीं गंगेच्या कांठीं बसून करावें लागतें! अग्नितीर्थाचें स्नान बहुत सुखकारक आहे! थंडी विशेष असल्यामुळें त्या उष्ण कुंडांत स्नान केल्यानें आनंद वाटतो! तें उदक बहुत उष्ण नसून मनुष्यास जसें स्नानास पाहिजे, तशा बेताचें असतें. अलकनंदेचें व मंदाकिनीचें उदक केदार व नारायण यांपासून देवप्रयागापर्यंत कोणी पीत नाहींत! कारण, त्यांत बर्फ मिश्रित असल्यामुळें तें फार गार असतें, ह्मणून तें प्यालें तर विकार होतो! नारायणास कु

र्मधारा नामें तीर्थ आहे. त्याचें पाणी फार चांगलें असून पाचक अस ल्यामुळें तेथील रहाणारे तेंच पितात. चार वेदांच्या नांवांनीं चार धारा पर्वत शिखराहून खालीं पडतात. त्या स्थलीं आणखी बहुत तीर्थे आहेत. नरनामें एक पर्वत आहे. व दुसरा नारायण नामें आहे. देवाचा (नारायणाचा) नैवेद्य होतो, त्या ठिकाणीं लक्ष्मीचें स्थान आहे. केदारेश्वर नामें शिवस्थान आहे. या शिवाय ही देवस्थानें बहुत आहेत. त्या क्षेत्रीं पांच शिला आहेत. त्यांचें माहात्म्य फार वर्णिलें आहे. त्यांत पहिली गरूडशिला, ती देवासन्निध असून फार मोठी आहे! त्या शिलेचा आकार हुबेहुब गरुड पक्षासारखा दिसतो! दुसरी वाराहाशिला, ती गंगेचे प्रवाहांत आहे. त्या स्थानीं मनुष्याची गति नाहीं! तिचें दर्शन दुरून करावें लागतें. ही शिला अगदीं वराहासारखी आहे. तिसरी नरसिंहशिला, ही गंगेंतच असल्यामुळें तिचें दर्शन दुरून करावें लागतें! चौथी नारदाशिला, व पांचवी मार्कंडेयशिला. विष्णूंनीं वाराह व नरसिंह हे अवतार घेतले, तेव्हां अवतार संबंधीं कार्य झाल्यावर ते देह त्यांनीं ह्या स्थानीं स्थापन केलें, अशी कथा आहे. बदरिकाश्रमीं यात्रेकरी बहुधा स्वयंपाक करीत नाहींत. नारायणाचा नैवेद्य विकत घेऊन तोच भक्षितात. त्या स्थलीं एथील देवाचा नैवेद्यच भक्षावा असा विधि आहे! देवाचा नैवेद्य करणारे तद्देशीय पहाडी ब्राम्हण आहेत! तेथील नैवेद्यास स्पर्शास्पर्शाचा दोष बिलकुल नाहीं! तीर्थश्राद्ध सुद्धां त्याच नैवेद्यानें केलें पाहिजे! यात्रेंत प्रत्यहीं नैवेद्य शंभर रुपयाहून जास्त किंमतीचा विकत असेल, असें सांगतात! नैवेद्य ज्या किंमतीचा पाहिजे असेल त्या किंमतीचा व जितका पाहिजे असेल तितका मिळतो! ते विषयीं सोंवळ्या ओंवळ्याची शंका जो मनांत आणलि त्यास दोष सांगितला आहे!

कूर्मधारातीर्थ
नरपर्वत
नारायणपर्वत
गरुडशिला
वराहशिला
नरसिंहशिला
नारदशिला
मार्कंडेय शिला

बदरीनारायणास निवेदित जालेले अन्न ग्रहण करून त्यानें (त्या अन्नानेंच) वैश्वदेव श्राद्धादि करावें! त्या विषयीं संशय धरूंनये!

स्वतंत्र पाक करण्याचा आग्रह सोडावा ! पितृश्राद्धोद्देशानें स्वतंत्र पाक करण्याविषयीं आग्रह असेल तर बदरीनारायणाकडे दृष्टि लावून हृदयांत विश्वेदेव व पितर यांची भावना करावी ह्मणजे श्राद्ध झालें! स्वतः भक्षणास तर तेंच अन्न घेतलें पाहिजे ! आपण अग्निहोत्री आहोंत अशा अभिमानानें बदरीवनांत जाऊन बदरीनारायणाचा नैवेद्य सेवन न करील, तर तो महा पातकी होतो! बदरीनारायणाच्या नैवेद्यास शूद्रादिकाचा स्पर्श झाला असला तरींही त्याच्या भक्षणेकरून महापातकाचा नाश होतो येवढेंच नाहीं, तर विष्णुभक्ति वाढविण्यास तें अन्नभक्षण साधनभूत होतें ! नैवेद्य सिद्ध करणारी श्रीमहालक्ष्मी, नैवेद्य समर्पण करणारा स्वतः तूं नारद, नैवेद्याचा स्वीकार करणारा श्रीमहाविष्णु, अशा गोष्टी आहेत, तर नैवेद्याचें अन्न घेण्यास कसा दोष घडेल बरे ? असें सनत्कुमारानीं नारदास सांगितलें आहे.

नैवेद्याप्रमाणेंच बदरीनारायणाचें तीर्थ, किंवा अलकनंदेचें उदक, शूद्रादिकांनीं स्पृष्ट जालें असतांही तें विष्णुभक्ति वाढविणारें आहे; यास्तव त्याचें ग्रहण केलेंच पाहिजे! त्याचा त्याग करणारा पुरुष नरकाप्रत जातो! असें सनत्कुमार संहितेतील बदरीमाहात्म्यांचे तिसरे अध्यायाचे एकुणीस श्लोकांपासून सहा श्लोकांपर्यंत सांगितलें आहे.

गंगोत्री, केदार, बदरीनारायण, या त्रिस्थलीचा उद्धार करण्याचे

टीप १ ॥ वैश्वदेवादिकंकार्यं निर्माल्येनहरेरिह ॥ श्राद्धमप्यत्रतेनैवकार्यं नैवास्ति संशयः ॥ १ ॥ स्वतंत्रपाकजाड्यंचे द्बदरीनाथदृष्टितः विश्वान्देवान् पितॄन्न्यान्भावयेदंतरात्मना ॥ २ ॥ श्रोत्रियत्वाभिमानेनयः स्त्यजेद्बदरींगतः ॥ नारायणस्यनैवेद्यं समहापातकीभवेत् ॥ ३ ॥ शूद्रादिस्पृष्टमप्येतन्महापातकनाशनं ॥ बदरीनाथनैवेद्यं विष्णुभक्तिप्रदाय्यपि ॥ ४ ॥ लक्ष्मीः पचतिनैवेद्यं भवान्यत्रनिवेदकः ॥स्वीकरोतिमहाविष्णुर्दोषः कथमिहोच्यतां ॥ ५ ॥ श्रीपादसलिलंचात्र विष्णोर्ग्राह्यंनिरंतरं ॥ विष्णुभक्तिप्रदंनॄणां त्यजन्नरकमाप्नुयात् ॥ ६ ॥ सनत्कुमारसंहितांतर्गतबदरीमाहात्म्येतृतीयाध्यायेैकोनविंशति श्लोकमुपक्रम्याऽयंग्रंथःषट्श्लोकपरिमितः ॥

(याचें तात्पर्य वर प्राकृतांत आलेंच आहे ह्मणून पुनः येथें लिहीलें नाहीं.)

हेतूनें शंकराचार्य हे या हिमालय प्रदेशीं आले. तेव्हां मुख्य नारायण मूर्ति तेथें नसल्यामुळें त्यांचें मन परम खिन्न होऊन ते बहुत काल एकांत स्थलीं त्याच ध्यानांत बसले असतां, स्कंदपुराणांतील केदारखंडस्थ बदरीमाहात्म्यांत श्रीनारायणाचें नारदास वचन आहे, त्याची स्मृति त्यांस झाली. तें वचन असें आहे कीं, "अलकनंदा गंगेंत तुझ्या नावाचा ह्मणजे नारदयानावाचा एक ऱ्हद ह्मणजे डोह आहे त्यांत माझ्या अंशभूत अशा पन्नास मूर्ती युगानुयुग आहेत. शंकराचार्य ह्मणून शिवाचा अंश उत्पन्न होईल तो त्यांस बाहेर काढील" या वचनाचें स्मरण होतांच आचार्यांनीं ध्यानयोगाचें विसर्जन करून अलकनंदेतील नारद कुंडांत उडी घातली. तेव्हां तळाशीं जी मूर्ति प्रथम हाताला आली, तीच बाहेर काढिली. आणि लागलेंच मंदिर बांधिलें, आणि त्यांत मोठ्या समारंभानें त्या मूर्तिचें स्थापन केलें. पूर्वाश्रमातील स्वजातीय ब्राह्मणापासून पूजा नैवेद्य इत्यादिकाचा क्रम चालू केला.

आचार्यांचे हातांत प्रथम मूर्ति आली तिचे अवयव स्पष्ट नसल्यामुळें ती टाकून त्यांनीं चोवीस वेळां उड्या घातल्या, तरी तीच मूर्ति पुनःपुन्हा हातीं येई. शेवटीं आकाशवाणी झाली कीं, "याच मूर्तीचे स्थापन करावें!" असा वृत्तांत तेथील लोकांचे सांगण्यांत आहे!

बदरीनारायणाची पूजा अद्यापि आचार्यांचे जातीचे लंबेरी ह्मणून ब्राह्मण आहेत, त्यांजकडेस आहे. त्यांस तेथील लोक राऊळ असें ह्मणतात. व त्यांचा मोठा मान ठेवितात. देवास स्पर्श करून पूजा राऊळानेंच करावी, इतरानें स्पर्श करूंनये, असा नियम पूर्वापार चालत आला आहे. पूजा करणारा राऊळ याचें लग्न जालें नसतें! ब्रह्मचार्यानेंच पूजा केली पाहिजे. त्या ज्ञातीचे ब्राह्मण तो अ

---

टीप १—मूर्तयःसंतिपंचाशत्कुंडेनारदसंज्ञके ॥ युगेयुगेममांशाश्वहरांशश्चैवशंकरः॥ उद्धरिष्यतिमेमूर्तीस्तावकीनऱ्हदात्शुभात्(याचा अर्थ वर प्राकृतात आलाच आहे.)

धिकार प्राप्त होण्याचे इच्छेनें लग्न न करितां तेथें जाऊन रहातात! पूर्वीचा राऊळ मरण पावला असतां त्या संस्थानची मंडळी दुसरा चांगला ब्रह्मचारी पाहून त्याची त्या जागीं स्थापना करितात, अशी तेथील रीत आहे. राऊळाचा अधिकार देवपूजेचा असून, जोशीमठ येथील ही सर्व अधिकार त्याजकडेसच असतो. राऊळ याची रहा ण्याची जागा फार उत्तम बांधिलेली आहे, व विषय सुखाखेरीज बा कीचे सर्व उपभोग त्यास येथें मोठ्या श्रीमंताप्रमाणें मिळतात! नारा यण संस्थानचा सर्व अधिकार त्याजकडेस असून त्याचे आज्ञेनें सर्व व्यवस्था चालते! तेथील देवास शंकराचार्यांनीं स्थापिलेल्या राजा- कडून पुष्कळ नेमणूक आहे. त्या खेरीज यात्रिसंबंधीही देवापुढील स र्व उत्पन्न त्याजकडेस जमा होतें! कारकून, शिपायी, आचारी, पा णके वगैरे देवाचा खटला फार मोठा आहे देवाचा आजबाब पुष्क- ळ आहे व त्याचें सर्व स्वामित्व तेथील राऊळाकडेस असतें ! बदरी नारायणाचे सन्निध नराची मूर्ति आहे. तशाच कुबेर, नारद, व तेथी ल क्षेत्रपाल घंटाकर्ण यांच्या मूर्ति आहेत. देवळांत उद्धवाची मूर्ति आहे. देवळाचे परिघांत धर्मशिला आहे. तेथें दान करण्याचें फल ब हुत वर्णिलें आहे ! पंचोळीपणाचा ह्मणून कांहीं अधिकार आहे. त्या वर द्रविड ब्राम्हण असतात. शिवाय श्राध्धास वगैरे द्रविड ब्राह्मण त्या ठिकाणीं मिळतात. बदरीक्षेत्रीं मुंडन ह्मणजे क्षौर हे उक्त नाहीं, परंतु नारदतीर्थ संबंधीं श्राध्धाचें फल मोठं सांगितलें आहे. सर्वांहून मोठें माहात्म्य ब्रह्मकपालीं पिंडदानाचें वर्णिलें आहे! ब्रह्मकपाल संबं धीं श्राद्धाचे ब्राह्मण घरीं जेऊं घालून, नंतर कांहीं अंतरावर अलक

कपाल नंदेंत ब्रह्मकपाल आहे, तेथें जाऊन पिंडदान करावें लागतें. ब्रह्मक- पाल ही एक मोठी उंच शिला असून तिचें एक अंग गंगेत आहे. त्या शिलेवर चढून तेथें पिंडदान करावें. नंतर पिंडविसर्जन जाल्यावर खा लीं लगतच गंगेंत ब्रम्हतीर्थ आहे, त्यांत ते टाकावें. ब्रह्मकपाला वि षयीं कथा आहे ती अशीः—

शंकरानीं कांहीं कारणास्तव ब्रह्मदवास पांच मस्तकें होतीं, त्यांतून एक मस्तक छेदिलें! त्या कारणानें शंकरास ब्रह्महत्या प्राप्त झाली! आणि तें शिर शंकराचे मस्तकीं जाऊन बसलें. तें विलक्षण जड होतें. त्याचा भार शंकरास सहन होईना. तेव्हां ते ब्रह्महत्या जाण्याकरितां सर्व पृथ्वीतील तीर्थी फिरले! शेवटीं ते बदरीक्षेत्रीं आले. तेव्हा, अलकनंदा गंगेचें दर्शन होतांच तें शिर त्या स्थानीं पडून शंकर हे ब्रम्हहत्यापातकापासून मुक्त झाले! त्याकाळीं ब्रम्हा, विष्णु, इत्यादि सर्व देव त्या स्थलीं येऊन त्यांनीं शंकराची अत्यंत उपकार स्तुति केली. आणि त्यांनीं एकदम मोठ्या आनंदानें असें ह्मटलें कीं, "ज्या अर्थी साक्षात् शिव हे या स्थानीं सकल दोषापासून मुक्त झाले, त्या अर्थी या ब्रह्मकपालावर ज्याचे नांवानें पिंडदान होईल, तो निरंतर ब्रह्मसदनीं वास करील, यांत संशय नाहीं! जो पुरुष जन्मास येऊन आपले पितृगणांचे नांवें या स्थलीं पिंडदान करून आपल्या वंशाचा उद्धार करितो, तोच पुरुष धन्य व त्याचेंच कुल मोठें भाग्यवान् होय असें खचित जाणावें." ब्रह्मकपालीं इष्टमित्र वगैरे पाहिजे त्याच्या उद्देशानें पिंडदान करावें. तेणेंकरून त्यास ब्रम्हलोक प्राप्त होतो. समर्थ पुरुषानें ब्रम्हकपालींच पितरांचे उद्देशानें पिंडदान करावें. अन्यत्र गयेस देखिल करूंनये. जो करील त्याचे पितर अधोगतीस जातिल असें येथें पिंडदान करण्याचें माहात्म्य व अन्यत्र पिंडदान करण्याचा मोठा निषेध सांगितला आहे!

या विषयीं प्रमाण, सनत्कुमार संहितेंतील बदरीमहात्म्याचे प्रथम अध्यायाचा छतिसावा, व तिसरे आध्यायाच्या त्रेचाळीसापासून दोन श्लोक आहेत ते पहावे.[1]

टीप १ —दद्याद्ब्रम्हकपालेस्मिन्पिंडंपुत्रोऽथवापरः ॥ नाम्नायस्यसवैब्रम्हलोकं यातिसनातन॥ १ ॥ शिरःकपालंयत्रैतत्पपातब्रम्हणःपुरा ॥ तत्रैवबदरीक्षेत्रेपिंडान्दातुं प्रभुःपुमान् ॥ २ ॥मोहाद्गयायांदद्याद्यःसपितॄन्पातयेत्स्वकान् ॥ लभतेचततःशापंनारदतन्मयादितामति ॥ ३ ॥ (याचा भावार्थ वर आलाच आहे.)

बदरीक्षेत्रांतील सर्व देवतांचें दर्शन व तीर्थस्नानें आणि तीर्थश्राद्धें व पितरांचें उद्देशें पिंडदानें वगैरे सर्व कृत्य आटोपल्यावर नारायणापासून स्वर्गारोहणाचा मार्ग आहे, त्या मार्गानें सहा कोसांवर वसुधारा नामें तीर्थ आहे, तेथें जाण्याकरितां रघुनाथराव हे चालते झाले. मार्गांत नरनारायणाची माता जी मूर्ति, तिचें स्थान आहे. पुढें कलापग्राम ह्मणून एक गांव आहे. त्याविषयीं पुराणांत अशी कथा आहे कीं, "द्वापार युगाचे अंतीं कांहीं क्षत्रिय राजे त्या कलापग्रामीं जाऊन योगसमाधी करून गुप्त वास करतील, नंतर सत्ययुग प्रवृत्त झाल्यावर ते प्रगट होऊन धर्मेंकरून प्रजा पालन करतील." कलापग्रामीं वस्ती नाहीं. तो केवळ उजाड आहे! तेथून पुढें गंगा उतरावी लागते. गंगेवर पुलासारखें सर्व बर्फच असतें! ती भरत वर्षाची व किंपुरुष वर्षाची सीमा ( सरहद्द ) आहे. त्या बर्फावरून पलीकडे गेलें ह्मणजे किंपुरुष वर्षास आरंभ होतो. येथें हिमालयाच्या फार मोठाल्या शृंगांची एक सारखी ओळ आहे. ती अगदीं भिंतीसारखी दिसते! तिलाच काळी भिंत असें ह्मणतात. तेथें व्यासाचाआश्रम आहे. जवळ सरस्वतीचा प्रवाह असून तो गंगेस मिळाला आहे. त्या ठिकाणीं व्यासांनीं भारत नामक इतिहास केला. व तो गणपतीनें लिहिला असें ह्मणतात. तेथें गणपतीची मूर्ति आहे. त्या स्थानीं मध्वमत प्रवर्तक आनंदतीर्थ, ज्यांस मध्वाचार्य ह्मणतात, ते आपलें मत पृथ्वीवर स्थापन करून, नंतर व्यासाश्रमीं तप करून समाधिस्थ झाले. मध्वाचार्यांचें या स्थळीं वृंदावन आहे. तेथून पुढें दोन कोसांवर वसुधारातीर्थ आहे. ती केवळ उदकाची धारा

स्वर्गारोहण मार्ग

मूर्ति(नरनारायण माता)

कलापग्राम

काळीभिंत

व्यासाश्रम

सरस्वतीनदी

वसुधारा ( तीर्थ )

---

टीप १—१ जंबूद्वीपांत भरत, किंपुरुष, हरि, कुरु इत्यादि नऊखंडे आहेत त्यास वर्ष ह्मणतात. त्यांत लंकेपासून हिमालयापर्यंत जें वर्ष तें भरतवर्ष, व हिमालय व हेमकूटपर्वत या दोहोंच्या मध्यें जें वर्ष तें किंपुरुषवर्ष होय.

टीप २—सन्याशाचावगैरे मृतदेह पुरलेल्या जागेवर जे थडगें बांधितात त्यास स्मार्तलोक समाधि असें म्हणतात व वैष्णवलोक वृंदावन असें ह्मणतात.

आहे.ती हिमालयाच्या आजमासें पाऊण कोस उंचीच्या शिखरावरून खालीं पडते.तिचा घेर किमान पक्षीं चार हत्तीचे अंगापेक्षां मोठा असून पर्वताच्या उंच शिखरावर अतिशयित वारा असल्यामुळें त्या धारेच्या बारीक तुषारांचा एकवट झालेला झोत दोन दोनशें हात आसमंतात फिरतो.त्या झोताचें पडण्याचें एक ठिकाण नसल्यामुळें जेथें तो पडण्याचा संभव दिसतो, तेथें यात्रेकरी जातात; तथापी वायूच्या योगानें तो झोत दुसरीकडे फिरतो ! या मुळें यात्रेकऱ्यांस बहुत वेळ फिरावें लागतें! आणि इतके केल्यावरही त्या झोताचे तुषार क्वचितच त्याच्या अंगावर पडतात.तथापी जो यात्रेकरी पुण्यवान् असतो, त्यास फिरावे न लागतां तो जेथे असतो, तेथें तो झोत येऊन त्याचे तुषार त्याच्या अंगावर पडतात, असें तेथील लोक सांगतात. पांडव स्वर्गारोहणास गेले, तेव्हां या वसुधारा तीर्थापासून दोन कोसांवर द्रौपदी ही बर्फा त गळाली! अशी कथा तेथील लोकांच्या सांगण्यांत आहे! त्या मा र्गांतील सर्व चमत्कार पाहून वसुधारेचें स्नान केल्यावर संध्याकाळीं रघुनाथराव हे परत आले. नारायण येथील हवा चांगली आहे. थं-डीतर आहेच, परंतु केदारेश्वरापेक्षां फार कमी! त्या ठिकाणीं वस्ती चांगली असून सर्व पदार्थ मिळतात ! नारायणाचें मंदिर शंकराचा र्यांनीं बांधिलें आहे, असें वर सांगितलेंच आहे. पुढें त्या मंदिराचा वारंवार जिर्णोत्धार पुष्कळांनीं केला, अशी माहिती तेथील लोक सांगतात.

कार्तिकमासीं बर्फ पडण्यास आरंभ झाला ह्मणजे पूजारी लोक पोर्णिमेच्या दिवसीं नारायणाचे मूर्तीस लोणी लावून आच्छादन क रितात; व एके कुमारिकेपासून सूत कांतवून त्याचा एक फार मोठा व लांब कांकडा करितात; आणि तेथें एक अत्यंत मोठें दिवेलावणें आहे, त्यांत तो कांकडा पेटवून ठेवून तेल घालतात; नंतर देवळाचीं सर्व दारें बंद करून अवघीं मनुष्यें जोशीमठांत येतात! तेथें सरासरी सहा महिनें पर्यंत नारायणाची पूजा होते. नंतर वैशाखमाशीं पुजा-

री लोक अक्षय्यतृतीयेच्या दिवशीं नारायणाकडे परत जातात. आणि बर्फ खणून काढून त्याचें देऊळ मोकळें करतात. तेव्हां पूर्वी स्थापन केलेला दिवा तेथें कायम असतो! देवावर तुळसीफुलें वाहिलेली असतात तीं सहा महिनेपर्यंत ब्रम्हदेव पूजा करितात, त्यांनींच देवावर वाहिलेलीं आहेत, व तीं कपाट खुलें होतें तेव्हां ताजीं असतात, असें तेथील पुजारी लोक सांगतात; आणि तींच राखून ठेवून कोणी मोठा यात्रेकरू आला असतां त्यास ते प्रसाद म्हणून देतात.

नारायणक्षेत्राहून परत यावयाचें तें कोणी चिलक्याचा घाट आहे त्या घाटाच्या मार्गानें पहाड उतरून लखनौ प्रांतांत जातात. व कोणी आल्या मार्गानेंच परत हरिद्वारास येतात. चिलक्याचे घाटानें लखनौप्रांतांत येण्याचे मार्गांत राम व कौसल्या इत्यादि नद्या आहेत, त्या तीर्थांचें स्नान होऊन कांहीं देवता आहेत त्यांचीं दर्शनें होतात. तसेंच त्या मार्गानें गेलें असतां त्या भागास सव्य प्रदक्षिणाही होते; याजकरितां बहुतेक यात्रा त्या चिलक्याच्या घाटाच्याच मार्गानें लखनौप्रांतांत उतरते.

हरिद्वारास व हरिद्वाराहून पुढें जातानां मार्गांत जीं देवस्थानें व तीर्थें आहेत तीं, व स्वतंत्र क्षेत्रांतील देवता व तीर्थें आहेत तीं, संक्षेपानें लिहून ज्या विषयीं कांहीं विशेष माहिती लिहिली पाहिजे अशीं जीं स्थानें वाटलीं, त्यां बद्दल संक्षेपानें थोडा मजकूर पूर्वी लिहिला. परंतु वाचकांस मार्गांत व क्षेत्रांत किती देवस्थानें व तीर्थें व ऋषींचे आश्रम आहेत, ते समजण्याकरितां त्यांची येकंदर याद खालीं लिहितों:—

---

टीप १—श्लो० वंदेश्रीनारसिंहगरुडसुरमुनिक्रोडकेदारगंगामार्कंडेयाग्नितीर्थद्राविणदभगवत्पादुर्गागणेशान् ॥ घंटाकर्णोद्धवश्रीनरनगबदरीनाथनारायणाख्यब्रम्हप्रल्हादयोगीश्वरकमलपदश्रीनृसिंहांश्वभक्तया ॥ १ ॥ गंगाद्वारेकुशावर्तोबिल्वकेनीलपर्वते ॥ स्नात्वाकनखलेतीर्थेपुनर्जन्मनविद्यते ॥ २ ॥

भावार्थ—नरसिंह गरुड नारद वाराह केदारगंगा मार्कंडेय आग्नितीर्थ कुबेर शं

## हरिद्वारास तीर्थें व देवस्थानें आहेत तीं.

१ ब्रह्मतीर्थ.
२ गंगाद्वारतीर्थ.
३ स्वर्गद्वार तीर्थ.
(येथें क्षौर, श्राद्ध, पिंडदान केलें पाहिजे.)
४ मोक्षद्वारतीर्थ.
५ मुक्तिद्वारतीर्थ.
६ कुशावर्ततीर्थ.
७ बिल्वकेदारमहादेव.
८ बिल्वगंगातीर्थ.
९ नीलपर्वत.
१० कनखलतीर्थ.
११ दक्षप्रजापतीश्वर महादेव.
१२ राजराजेश्वरमहादेव.
१३ तिलभांडेश्वरमहादेव.
१४ सतीकुंडतीर्थ.
१५ विष्णुतीर्थ.
१६ साक्षीश्वरमहादेव.
१७ पंचतीर्थयात्रा.
१८ नीलगंगातीर्थ.
१९ गौरीशंकरमहादेव.
२० चंडीदेवी.
२१ नीलेश्वरमहादेव.
२२ भैरव.
२३ नारायणशिला (येथें शिलेवर पिंडदान केलें पाहिजें.)
२४ मोतीचुरघाटीं गणेशदेव.
२५ गणेशतीर्थ.
२६ सूर्यकुंडतीर्थ.
२७ रामकुंडतीर्थ.
२८ लक्ष्मणकुंडतीर्थ.
२९ भीमगोडा.

( इतकीं स्थानें हरिद्वार क्षेत्रांत आहेत. )

## हरिद्वाराहून मार्गांत लक्ष्मण झुल्यापर्यंत देवता व तीर्थें आहेत तीं.

१ शंकरानदी.
२ वीरभद्र.
३ शिवलिंगेश्वरमहादेव.
४ कुब्जाम्रकतीर्थ (येथें श्राद्ध, पिंडदान करावें लागतें)
५ ह्षीकेश.
६ भरत.
७ तपोवन.

---

कराचार्य दुर्गा गणेश घंटाकर्ण उद्धव नरपर्वत बदरीनारायण ब्रम्हा प्रल्हाद योगिश्वर पद्मपाद नरसिंह यांसनमस्कारकरितो, ॥ १ ॥ गंगाद्वार कुशावर्त बिल्वतीर्थ नीलपर्वत व कनखलतीर्थ येथे स्नान केल्यासतां पुनःजन्म प्राप्त होत नाहीं ॥ २ ॥ या दोन श्लोका मिळून देवता व तीर्थयांची बरींच नांवें आलीं आहेत.

८ लक्ष्म्याश्रम.
९ शिवपुर.
१० मायापुरीदेवी.

येथें लक्ष्मण झुला असून त्यावरून पलीकडे उतरून जावें लागतें.

देवप्रयागास तीर्थें व देवस्थानें आहेत तीं.

१ नरसिंहपर्वत.
२ हनुमंतपर्वत.
३ दशरथपर्वत.
४ सीतारामचंद्रस्थान.
५ विश्वेश्वरमहादेव.
६ वामनगुंफा.
७ गोपालदेव.
८ क्षेत्रपालभैरव.
९ श्रीकृष्णस्थान.
१० वटवृक्ष व दिक्पाल.
११ धनेश्वरमहादेव.
१२ तांडवेश्वरमहादेव.
१३ ताडकेश्वरमाहादेव.
१४ बिल्वकेश्वरमहादेव.
१५ ब्रह्मकुंडतीर्थ.
१६ वसिष्टकुंडतीर्थ.
१७ वाराहीशिला.
१८ पुष्पमालिका.
१९ इंद्रद्युम्नशांतनुकन्या.
२० शांतानदीतीर्थ.
२१ सूर्यकुंडतीर्थ.

श्रीनगरास देवस्थानें व तीर्थें आहेत ती.

१ श्रीयंत्र.
२ कमलेश्वरमहादेव.
३ केदारेश्वरमहादेव.
४ इंद्रकीलेश्वरमहादेव.
५ इंद्रकीलपर्वत.
६ भिल्लकेदार.
७ मार्तंडगंगा.
८ अलकनंदाशिवगंगासंगमतीर्थ.
९ रामगंगा व अलकनंदा याचे संगमतीर्थ.

केदार येथें देवस्थानें व तीर्थें आहेत ती.

१ काष्टाद्रिपर्वत.
२ कठोरग्राम.
३ वालखिल्यगंगातीर्थ.
४ पोवयाचापर्वत.
५ त्रियुगीनारायण.
६ रुद्रकुंडतीर्थ (येथें स्नान केलें पाहिजे.)
७ ब्रह्मकुंडतीर्थ (येथें स्नान केलें

पाहिजे. )

८ विष्णुकुंडतीर्थ [ वंदन ]

९ वासुकीगंगा.

१० झीलमीलपट्टण.

११ गौरीकुंडतीर्थ.

१२ तप्तकुंडतीर्थ.

१३ गौरीश्वरमहादेव.

१४ मंदाकिनीतीर्थ.

१५ गौरीदेवी.

१६ चीरभैरव ( येथें देवास वस्त्र वाहिले पाहिजे. )

१७ भीमगोडा.

१८ मंदाकिनीतीर्थ.

१९ दुग्धगंगातीर्थ.

२० स्वर्गद्वारतीर्थ.

२१ मंदाकिनीतीर्थ.

२२ केदारेश्वरमहादेव.

२३ ईशानेश्वर.

२४ संगमेश्वर महादेव (येथें पिंडदान केलें पाहिजे.)

२५ उदककुंड.

२६ रेतोदककुंड (येथें उदकपान केलेंपाहिजे. )

२७ नंदीमहाकाल.

२८ भृगुपतनपर्वत.

२९ स्वर्गारोहणमार्ग.

३० महापथ म्हणजे कैलासमार्ग.

येथून पुढें बदरीनारायणापर्यंत मार्गांत तीर्थें व देवता आहेत त्याची याद.

१ नंदप्रयाग.

२ ब्रह्मप्रयाग.

३ सूर्यप्रयाग.

४ वासुकीगंगा व मंदाकिनीगंगा याचे संगम तीर्थ.

५ गुप्तकाशी (येथें शुकाचा जन्म जाल्याचे स्थान आहे. )

६ विश्वेश्वर.

७ अन्नपूर्णा.

८ गंगा,यमुना,अशा दोन धारा.

९ उखीमट.

१० सरस्वतीकुंड तीर्थ.

११ केदारेश्वराची गादी.

१२ तुंगेश्वरमहादेव.

१३ तुंगगंगा.

१४ गोपेश्वरमहादेव.

---

टीप १—श्लोक ॥ केदारं मध्यमं तुंगं रुद्रं गोपेश्वरं तथा ॥

केदार पंचकं नित्यं स्मरेत् पातक नाशनं ॥ १ ॥

भावार्थ—केदार इत्यादि पांच देवांचें नित्य प्रातः काळीं स्मरण करावें ह्मणजे पातक दूर होतें.

१५ चंडीदेवी.
१६ वैतरणीनदी (येथें स्नान करून पितृतर्पण केलें पाहिजे.)
१७ बालसरस्वतीगंगा तीर्थ.
१८ लक्ष्मीनारायण स्थान.
१९ अलकनंदातीर्थ.
२० रुद्रनाथाची गादी.
२१ गरुडगंगातीर्थ.
२२ गरुडाचें स्थान.
२३ गणेशगंगातीर्थ.

ज्योतिर्मट ( जोशीमट ) येथील देवस्थानें.

१ शंकराचार्याचामठ.
२ नरसिंह.
३ वासुदेव.
४ गरुड.
५ नवदुर्गा.
६ वासुकीश्वर महादेव.
७ चंडिकादेवी.
ज्योतिर्लिंगेश्वरमहादेव.
९ नवगंगातीर्थ.
१० दंडधारातीर्थ.
११ गंगातीर्थ.
१२ यमुनातीर्थ.
१३ सुदर्शनक्षेत्र.
१४ अलकनंदा विष्णुगंगा संगमीं विष्णुप्रयागतीर्थ(येथें स्नान दानादि केलें पाहिजे.)

(येथून बदरिकाश्रमास आरंभ होतो.)

बदरिकाश्रमांत तीर्थें व देवता आहेत त्याची याद.

१ धवलगंगा अलकनंदा संगम तीर्थ.
२ पंडुकेश्वरीं योगबदरीक्षेत्र.
३ योगध्यान.
४ चक्रतीर्थ.
५ वैखानसतीर्थ.
६ मरुतराज.
७ यज्ञस्थान (या ठिकाणीं मरुत राजानीं यज्ञ केला तेथें विश्वेदेव सभासद होते.)
८ कांचनगंगातीर्थ.
९ कुबेरशिला (येथें नमस्कार घालावा लागतो.
१० ऋषिगंगातीर्थ.
११ कूर्मधारातीर्थ.
१२ तप्तकुंडतीर्थ.
१३ गरुडशिला.
१४ नारदशिला.
१२ वाराहीशिला.
१६ नरसिंहाशिला.

१७ मार्कंडेयशिला.
१८ ब्रह्मकपाल (येथें श्राद्ध पिंडदान केलें पाहिजे.)
१९ ब्रह्मकुंडतीर्थ.
२० पंचतीर्थी.
२१ नारदकुंडतीर्थ.
२१ तप्तकुंडतीर्थ.
२३ ऋषीधारातीर्थ.
२४ कूर्ममुखधारातीर्थ.
१५ बदरीनारायण.
२६ नर.
२७ कुबेर.
१८ नारद.
१९ उध्धव.
३० घंटाकर्णक्षेत्रपाल.
३१ नरपर्वत.
३१ नारायणपर्वत.
३३ ऋग्वेदधारातीर्थ.
३४ यजुर्वेद धारातीर्थ.
३५ सामवेदधारातीर्थ.
३६ अथर्वणवेदधारातीर्थ.
३७ आदिमातामूर्ति (ही नरनारायणांचीमाता.)
३८ वसुधारातीर्थ.
३९ सत्यपथमार्ग.
४० ब्रम्हकुंडतीर्थ.
४१ रुद्रकुंडतीर्थ.
४२ विष्णुकुंडतीर्थ.
४३ अलकापुरी.
४४ सोमतीर्थ.
४५ सूर्यतीर्थ.
४६ सहस्त्रधारातीर्थ.
४७ शेषधारातीर्थ.
४८ लोकपालपर्वत.
४९ शम्याप्राशकक्षेत्र.
५० भारत ग्रंथाचे उत्पत्तीचेंस्थान.
५१ व्यासमूर्ति.
५२ गणपति.
५३ मध्वमत प्रवर्तक आनंदतीर्थ यांचें वृंदावन.
५४ शतस्रोततीर्थ.
५५ मानसभेदतीर्थ.
५६ सनकादिकांचें उत्पत्तिस्थान.
५७ द्वादशादित्यांचें उत्पत्तिस्थान.
५८ मुचकुंदतीर्थ.
५९ कामधेनुतीर्थ.
६० सरस्वती अलकनंदा संगमीं केशव प्रयागतीर्थ.
६१ अलकनंदा भागीरथी संगम तीर्थ.
६२ वामन अवताराचें स्थान.
६३ हरिहरतीर्थ
६४ वायुतीर्थ
६५ अश्वतीर्थ

६६ कलापग्राम
६७ कोटिवन
६८ देवदारुवन
६९ दुर्गाकुंडतीर्थ
७० प्रल्हादतीर्थ
७१ नरसिंहकुंडतीर्थ
७२ मत्स्यतीर्थ
७३ नरतीर्थ.
७४ नारायणतीर्थ
७५ उर्वशीकुंडतीर्थ
७६ पंचबदरी[१ योगबदरी, २ राजबदरी, ३ आदिबदरी, ४ वृद्धबदरी, ५ ध्यानबदरी,]

७७ सप्तऋषिस्थान.
७८ वायुतीर्थ.
७९ उद्धवस्थानें.
८० नंदगंगा अलकनंदा संगमस्थानीं नंदप्रयागतीर्थ.
८१ कण्वऋषीचाआश्रम.
८२ भरताचें उत्पत्तिस्थान.
८३ कर्णगंगा व अलकनंदा यांच्या संगम स्थानीं कर्णप्रयागतीर्थ.
८४ षडाननाची उत्पत्ति [शरवणांत.]
८५ अलकनंदा मंदाकिनी यांचे संगम तीर्थी रुद्रप्रयाग तीर्थ.

येकूण देवता, तीर्थें, स्थानें, व ऋषींचेआश्रम वगैरे मिळून संख्या २१९.

पर्वतांचीं व रस्त्यांचीं प्राकृत नांवें आहेत तीं.

१ लंगोट्यापर्वत.
२ कछोट्यापर्वत.
३ बंदरभेलपर्वत.
४ चित्तभंगपर्वताचा रस्ता.
५ मनोभंग पर्वताचा रस्ता.
६ खांडेधार पर्वताचा रस्ता.

या पहाडाचे यात्रेंत वाघ, रीस, वगैरे घातुक पशूंचा उपद्रव नाहीं, तसेंच चोरांचेंही भय नाहीं! परंतु मस्त जालेले हत्ती एखादे समयीं माठें अरण्य सोडून रस्त्यावर येतात, तेव्हां ते हत्ती तेथून जात तोंपर्यंत दोन तीन दिवस रस्ता बंद होतो ! ही एक मार्गांत मोठी हरक

टीप१ —श्लोक॥ नंदंस्कंदंवधारुद्रं, देवेंद्रंवटमेवच ॥
प्रयागपंचकंनित्यं, स्मरेत्पातकनाशनं ॥ १॥
भावार्थ—या नंदादीपांच देवताप्रयागाचें स्मरण नित्य करावें, ते पाप दूरकरितें.

[stamp]

त आहे. शिवाय दोन घटका दिवस आल्याखेरीज मुक्कामाहून निघण्याची सोय नसतें! कारण, मोठाले पर्वत असल्यामुळें सूर्यप्रकाश लौकर पडत नाहीं, व धुकें असतें! क्वचित बर्फ पडतें! यामुळें मुक्कामाहून निघण्यास उशीर करावा लागतो. मार्गांत बहुत करून पर्जन्य लागतो! तांदुळ, आटा, उडदाची डाळ, या खेरीज दुसरा पदार्थ बहुशः मिळत नाहीं. त्यांत भाजी व विड्यार्चीपानें हींतर बिलकुल मिळत नाहींत. रस्ता चार हात रुंद, क्वचित याहूनही जास्त रुंद आहे. रुंदरस्त्याचे एके बाजूनें पर्वत व दुसरे बाजूस खालीं फार खोल असा गंगेचा प्रवाह अत्यंत वेगानें वहात असल्यामुळें त्याचा मोठा घोष कानीं पडतो! कितीएक ठिकाणीं झुले उतरावे लागतात! मुक्कामाचे जागीं गवताचीं छपरें असतात. कांहीं ठिकाणीं मोठाल्या विखारी वनमाशा आहेत, त्यांच्या दंशानें गांठ येऊन पू होतो! बहुतेक यात्रिकरी लोकांचें पाय या कारणानें सुजलेले असतात! कदाचित डोळ्याजवळ दंश झालातर बहुत इजा होते! विंचू या नांवाची तेथें एक वनस्पती आहे, तिचा स्पर्श जालातर कांहीं वेळ विंचू चावल्याप्रमाणें वेदना होते ! चालतांना पर्वत शिखरावरून दगड पडण्याची मोठी भीति असते! असे प्रकारें सर्व यात्रेपेक्षां ही पहाडाची यात्रा मोठ्या कष्टाची आहे ! श्रीमंतास व गरीबास सारखेच कष्ट सोसावे लागतात! असो, गंगोत्रीस न गेलें तर या यात्रेस निदान दोन अडीच महिने लागतात.

ज्यांच्या पुच्छापासून चवऱ्या होतात, त्या वनगाई विषयीं आपल्या या देशातील लोकांची समज वेगळी आहे. परंतु, या गाई फार लहान असून त्यांच्या अंगावर केश बहुत असल्यामुळें त्या विद्रूप दिसतात! त्या गांईस अदपावाहून जास्त दुध क्वचितच असतें! त्यांचे पुच्छांस मोठाले गोंडे असतात. ते गोंडे शुद्ध पांढरे अथवा काळे अथवा मिश्र वर्णाचे असतात. तिकडील लोक त्या गाई घरीं बाळगतात. तसेंच कस्तुरी मृगांविषयीं इकडील लोकांचे तर्क अनेक वनगाई.

कस्तुरीमृग. आहेत! परंतु, हे मृग इकडील हरणांपेक्षां मोठे नसून त्यांचे अंगावर रांठ केश असतात. त्यांचे नाभींत कंद असतो. त्यातून कस्तुरी निघते. लहान मृगाचे नाभींत कस्तुरी अगदीं थोडी निघते जो मृग वयांत येतो त्याचे नाभींत मोठा कंद सांपडतो. त्यांत कस्तुरी कधीं कधीं पांच तोळ्यापर्यंतही निघते! हे मृग बदरिकाश्रमाचे अरण्यांत फार आहेत. हे मारण्याविषयीं सरकारची परवानगी चिठ्ठी ज्यास असेल, तोच मारितो. अरण्याची सीमा सरकार ठरवून देतें. तेवढ्याच मर्यादेंत परवानगीवाल्यानें मृग मारावे. अशीं मृगाची अरण्यें लोक सरकारांतून मक्तयानें घेतात. या मृगजातीच्या मांदीस कस्तुरीचा कंद नसतो.

वनस्पति. पहाडी प्रदेशांत अनेक प्रकारच्या वनस्पती आहेत. त्या कितीएक रोगांवर हटकून गुण करितात! कांहीं कंद असे आहेत कीं, त्यांस फार सुवास असून ते अत्यंत रुचिकर असतात! कांहीं कंद असे आहेत कीं, ते भक्षिल्यावर पांच, सात दिवस पर्यंत क्षुधा न लागतां ग्लानीही येत नाहीं! परंतु असे कंद व उत्तम औषधी मार्गांत नाहींत. अजुबाजूस अडचणीचे जागीं यत्नानें शोध केलातर मिळतात! तेथील माहितगार पहाडी मनुष्य बरोबर घेऊन कांहीं काल घालवून औषधींची माहिती करून घेतली तर, ही गोष्ट मोठे उपयोगाची होईल! आणि रघुनाथराव यांनीं त्या वेळीं याविषयीं यत्न केला असता तर बहुत उत्तम झालें असतें. त्यांजपासून त्या समयीं तसें झालें नाहीं. ह्मणून, या विषयीं आतां त्यांस फार वाईट वाटतें! आतां जर कोणी त्या प्रदेशीं जाईल तर त्यानें शोध करून तिकडील उत्तम औषधी या प्रदेशीं आणाव्या. ह्मणजे त्यांपासून लोकांस मोठा उपयोग होईल, ह्यांत संशय नाहीं!

बदरी क्षेत्रीं रघुनाथराव यांनीं नऊ दिवस मुक्काम करून, दहावे दिवशीं बदरीनाथाची आज्ञा घेऊन हरिद्वारास गाड्या, घोडे, उंट, व बरोबरचे मुसलमान शिपाई वगैरे खटला असल्यामुळें ते चिल-

क्याचे घाटानें न जातां, गेल्या मार्गानेंच सर्व मंडळीसह कष्टाची या त्रा करून हरिद्वार येथें सुखरूप येऊन पोंहचलें! रघुनाथराव यांचे ज्येष्ठ स्त्रीचें प्रथम वर्षश्राद्ध आषाढ शुद्ध ८ चे असल्यामुळें ते त्यां नीं कनखलतीर्थी केलें. नंतर तेथून ते कुरुक्षेत्राची यात्रा करण्याचे उद्देशानें सर्व खटल्यासुद्धां पुढें चालते झाले. तों शाणपुरचे मार्गे जा तांजातां क्रमानें पाणिपतास त्यांचा मुकाम झाला.

रघुनाथराव चे पुनःहरिद्वारासपरतयें

पाणिपत हा गांव मोठा आहे. येथें लोखंडाचें काम बहुत चांगलें होऊन, त्यावर सोन्या रुप्याची वेलबुट्टी वगैरे फार चांगली होते. ह त्यारें उत्तम प्रकारची तयार होतात. त्या गावांत गढीसारखा लहान किल्ला आहे. त्याचे कोटास ठिकठिकाणीं भोंकें पडलीं आहेत. तेथील मैदानांत अफगाण लोकांबरोबर मराठे लोकांचें युद्ध जालें. त्याका ळीं जेव्हां किल्यावर हल्ला जाला, तेव्हां गढीचे कोटास गोळे लागून तीं भोंकें पडलीं, असें तेथील लोक सांगतात. ज्या जागीं मराठी फौ जेचा तळ होता, ती जागा पाणिपत सोडल्यावर मार्गांत लागते. जे थें भाऊसाहेबपेशवे यांचा डेरा होता, त्या जागीं त्या वेळचा आंब्या चा वृक्ष आहे तो, व पलीकडे युद्धसमयीं मोठा खंदक केला होता, ती ही जागा तेथील माहितगार लोक दाखवितात. ती पाहून रघुना थराव यांनीं तेथून सोनपत येथें येऊन मुक्काम केला. तेथून रघुना- थराव हे दुसरे दिवशीं निघून क्रमानें दिल्लीचे कोठाबाहेर शहरचे दर वाज्या लगत कुंज आहेत, तेथें येऊन उतरले.

पाणिपतगां

सोनपत.

दिल्लीशहर फार मोठें व विस्तीर्ण आहे. सर्व शहरास उत्तम बांधि व कोट असून यमुनातीरा लगत बादशाही किल्ला आहे. ज्या वेळेस रघुनाथराव हे दिल्लीस गेले, त्या वेळेस तेथें बहादुरशाह या नांवाचा बादशाह होता. जेव्हां रघुनाथराव हे किल्ला पहाण्यास गेले, तेव्हां किल्याचे बाहेरील दरवाजावर युरोपिअन लोक रहात असून दरवा ज्याचा बंदोबस्त त्यांजकडेस होता. किल्यांत बादशाही महाल आहे त. त्यावर सर्व घुमट असून वर सोन्याचे पत्रे बसविले आहेत. कि

दिल्लीशहर.

त्यांत बहुत चांगल्या इमारती आहेत. व बादशहाचा दरबार करण्याची एक मोठी जागा आहे. तेथें तक्त ठेवण्याचे ओंट्यावर दगडी सिंहासन होतें. त्यावर पूर्वी रत्नजडीत सिंहासन मांडित असत, असें तेथील लोक सांगतात. ही जागा संगमरवरी दगडानें फार सुशोभित बांधिलेली आहे. तेथील भिंतीस सोनेरी वेल काढिलेलें आहेत. आणि ठिकठिकाणीं रत्नें बसविलीं होतीं त्यांच्या खुणा हल्लीं दृष्टीस पडतात. किल्यांत एक मोठी बाग आहे. तेथें बादशाहा राहण्याच्या इमारती असून त्यात जनानखान्याच्या जागा आहेत. त्या खेरीज बाकी जागा पाहण्याची ज्याची इच्छा असेल त्यास तेथिल हुकुमानें पाहण्यास हरकत होत नाहीं. तेथील पाहण्यास योग्य जीं स्थानें तीं सर्व रघुनाथराव यांनीं पाहिलीं. शहरचे रस्ते चांगले असून, दुतर्फा उत्तम इमारती बांधिलेल्या आहेत. तेथें अनेक जातीचे व्यापारी आहेत त्यांचा मोठा व्यापार चालतो. शहरामधून यमुनेचा नहर वाहत आहे. त्यास ठिकठिकाणीं घाट बांधून इकडून तिकडे जाण्यास थोडे थोडे अंतरावर उत्तम पूल केले आहेत. ती सर्व शोभा पाहून मनुष्य चकित होतें! शहरांत तारकशीं कामें व अनेक प्रकारचे नकशी केलेले पदार्थ फार चांगले मिळतात! शहरांत मुख्य जागा जुम्मामशीद नामें आहे. त्या ठिकाणीं जाण्यास हिंदुलोकांस प्रतिबंध आहे! मशीदबाहेर संध्याकाळीं उत्तम प्रकारचे कापडाचा व्यापार चालतो, व अनेक प्रकारचे पक्षी विकण्यास येतात. चांदणीचोक ह्मणून जागा आहे, तेथें जवाहिराचा व्यापार चालतो. शहरांत बहुतेक मुसलमान लोकांचीच वस्ती आहे. बादशाहा याची हुकमत त्या वेळीं फक्त किल्याचे आंत चालत असे व त्या मर्यादेंतील इनसाफ त्यांनीं नेमलेले अधिकारी पहात असत. कुतुबनामाचें [स्थान] दिल्लीपासून थोडे कोसांचे अंतरावर कुतुब ह्मणून स्थान आहे, त्या स्थानीं यमुनेंत पृथूदक नामें तीर्थ आहे. पृथूदकतीर्थ. तेथें इमारती बहुत चांगल्या पाहण्यासारख्या आहेत. त्या ठिकाणीं बादशाहाचे वंशस्थांच्या कबरी असून त्यांवर अनेक प्रकार

ऱ्या इमारती बांधल्या आहेत. जुनी दिल्ली ह्मणून थोडे अंतरावर एकवेगळी जागा आहे. तेथें वस्ती बरीच आहे. धर्मराजानें राजसूययज्ञ केला, तें स्थळ तेथील लोक येथेंच दाखवितात. बाजीरावबल्लाळ पेशवे यांचे कारकीर्दींत पेशव्यांकडून चांदोरीकर हिंगणे यांचे पूर्वज दिल्लीचे बादशाही दरबारांत वकीलीचे कामावर होते, त्यांनीं त्या शहरीं शिवमंदिर बांधण्यास आरंभ केला. तेव्हां तेथील मुसलमान लोकांनीं हरकत केली त्याकाळीं हिंगणें यांनीं बादशाहास तो मजकूर कळवून हरकत दूर केली. इतकेंच नाहीं. तर त्या मंदिराचे मर्यादेंत मुसलमान लोकांनीं जाऊनये, व त्या मंदिराचें रक्षण सरकारांतून केलें जाईल असा ठराव करून घेतला. तें हिंगण्यांनीं बांधिलेलें मंदिर अद्याप कायम आहे! जुनीदिल्ली.

तो सर्व प्रदेश खांडववनाचा असून त्या शहरास इंद्रप्रस्थ अशी संज्ञा आहे. यमुनेंत निगमोद्बोध ह्मणून मुख्य तीर्थ आहे. याशिवाय आणखी तीर्थें व देवता स्थानें पुष्कळ आहेत. क्षेत्र माहात्म्यांत पुष्कळ तीर्थांचें व देवतांचें वर्णन लिहिलें आहे, परंतु कालानें सर्वांचा आतां उच्छेद झाला आहे! इंद्रप्रस्थ माहात्म्य पद्मपुराणांत तीस आ-ध्याय आहें, त्यांत या क्षेत्राचा महिमा फार वर्णिला आहे, शहरापासून यमुना थोडे अंतरावर असल्यामुळें प्रातःकालीं श्रीमंत लोक मोठाले बेलाचे रथ व येक्के यांत बसून यमुना स्नानास जातात! घाटावर श्रीमंत लोकांची मोठी दाटी असते. रघुनाथराव यांनीं सात दिवस त्या शहरांत मुक्काम करून तेथील पहाण्यासारख्या ज्या गोष्टी आहेत, त्या पाहून तेथून कूच केला, आणि मध्यें थोडे मुक्काम करू खांडववन. इंद्रप्रस्थ. निगमोद्बोध तीर्थ.

---

टीप. १ — इंद्रप्रस्थ माहात्म्यांत श्लोक आहे ;—

श्लोक ॥ यमुनासर्वतुल्भा, त्रिषुस्थानेषुदुर्लभा ॥

॥ इंद्रप्रस्थेप्रयागेच, सागरस्यचसंगमे ॥ १ ॥

भावार्थ—यमुना सर्वत्र सुलभ आहे पण इंद्रप्रस्थ प्रयाग व समुद्रसंगम या तीन ठिकाणीं दुर्लभ आहे.

नालछावणी न शेवटी कर्नाल नावाची जी इंग्रेजांची मोठी व प्रसिद्ध छावणी आहे, तेथें जाऊन पोचले. या छावणींत ते वेळेस फौज फार असून छावणीची मोठी भरभराट होती. पंजाब व आफगाणिस्थान यांवर जरब बसण्याकरितां इंग्रेजांनीं तेथें मोठ्या फौजेची ही छावणी केली होती. तेथून रघुनाथराव हे क्रमानें कुरुक्षेत्रास आले तेथें लक्ष्मी

कुरुक्षेत्र

क्ष्मीतीर्थ तीर्थावर दोन तीन मजली बांधीवअसा एकमोठा मठ आहे. हा मठ थोडे वर्षांपूर्वी श्रवणनाथ ह्मणून एक मोठा सिद्धपुरुष झाला त्यानें बांधिला. श्रवणनाथ हा गोसांवी होता. त्यास तिकडील प्रांतांतील सर्व राजे व सावकार लोक भजत असत. त्यानें ठिकठिकाणीं मोठमोठाले मठ बांधून तेथें आपले शिष्य स्थापन केले आहेत. त्यातीलच हा एक मठ आहे. या मठांत रघुनाथराव यांनीं आपला मुक्काम केला. कुरुक्षेत्रीं मुंडन वर्ज आहे. तेथें सान्निहत्य नामें तीर्थ आहे. त्या ती-

ान्निहत्यतीर्थ

र्था संबंधी श्राद्ध करावें लागतें. चंद्रसूर्य ग्रहण प्राप्त झालें असतां कुरुक्षेत्रीं या तीर्थांत स्नान व येथें दान केलें असतां अनंत पुण्य प्राप्त होतें असें वर्णन आहे. ग्रहण प्राप्त झालें असतां कुरुक्षेत्रीं मोठा मेळा भरतो. त्या क्षेत्रांत कुरुध्वज नामें एक तीर्थ आहे, तें केवळ ध्वजाकार सरोवर असून उत्तम बांधिलें आहे. लक्ष्मीतीर्थाचा महिमा फार वर्णिला आहे. त्या स्थानीं ज्योतिश्वर नामें एक शिवस्थान आहे. तेथें कृष्णांनीं अर्जुनास गितेचा उपदेश केला. त्याचे सन्निध विश्वरुपेश्वर नामें महादेव आहे. तेथें कृष्णांनीं अर्जुनास विश्वरुप दाखविलें. तेथें गिता पाठाचें मोठें फल सांगितलें आहे. ह्या क्षेत्रीं कुरुतीर्थ नामें एक तीर्थ आहे. त्या तीर्थाचे माहात्म्य फार वर्णिलें आहे.

कुरुध्वजतीर्थ

ज्योतीश्वर

अर्जुनासगीता सांगितली ते स्थान

विश्वरुपेश्वर.

कुरुतीर्थ

पूर्वी कुरुजांगल नामक देशाचा कुरु या नामें एक राजा झाला, तो या पवित्र भूमीचें स्वतः कर्षण करूं लागला ( नांगरूं लागला ) हें पाहून इंद्रास मोठें आश्चर्य वाटलें. त्यानें कुरुराजास प्रश्न केला कीं, तूं स्वतः हें नीच कर्म कां करितोस ? त्यावर राजानें उत्तर दिलें कीं, " यज्ञांत तुला सोमपान करण्याकरितां मी भूमीची शुद्धी करितों."

कुरुराजा

हें ऐकून इंद्र संतुष्ट झाला. आणि कुरुराजास बोलला कीं, " इच्छा असेल तो तूं वर माग! " तेव्हां कुरुराजानें असा वर मागितला कीं, " पृथ्वीतील सर्व प्रदेशांपेक्षां ही भूमि, आणि सर्व तीर्थांपेक्षां मी केलेलें हें तीर्थ, अति पवित्र असावें व हें क्षेत्र माझ्या नांवानें प्रसिद्ध होऊन येथें जो मरण पावेल त्यास स्वर्गप्राप्ति व्हावी. " हें राजाचें मागणें इंद्रानें मान्य केलें. अशी याची कथा आहे. कुरुक्षेत्रास चहूंफेर सरस्वतीचा प्रवाह असून मध्यें क्षेत्र आहे. इतर सर्व क्षेत्रीं सरस्वती गुप्त असते, परंतु या क्षेत्रीं ती प्रवाह रुपानें आहे. काशीस भागिरथी, मथुरेस यमुना, कुरुक्षेत्रास सरस्वती, या तीन ठिकाणीं तीन तीर्थांचे माहात्म्य अतिशयित आहे. बलरामानें सरस्वती यात्रा केली, त्या प्रसंगांत जीं सरस्वतींत तीर्थें आहेत, त्यांचें वर्णन महाभारतांत गदापर्वीं केलें आहे. भीष्म शरपंजरी पडले होते तें स्थान येथें आहे. भीष्मास तृषा लागली तेव्हां अर्जुनानें पृथ्वींत बाण मारून उदक धारा काढिली. त्या स्थानास बाणगंगा ह्मणतात, तें ही स्थान येथेंच आहे. येथेंच वसिष्ठाचा व विश्वामित्राचा आश्रम आहे. त्या स्थलीं बहुत तीर्थें असून ठिकठिकाणीं श्राद्ध करण्याचें मोठें फल सांगितलें आहे. तेथील मुख्य देवता स्थाणुकेश्वर महादेव आहे. व त्याच्या पुढें स्थाणु नामें तीर्थ आहे. स्थाणुकेश्वराचें मंदिर दादासाहेब पेशवे यांनीं बांधिलेलें आहें. या शिवाय त्या क्षेत्रीं आणखी बहुत तीर्थें व देवता स्थानें आहेत तीं अशीं:—

बाणगंगा.
वशिष्टविश्
मित्राश्रम.
स्थाणुके

तीर्थांचीं नांवें.

१ ओजसतीर्थ.
२ पंचवटस्थान.
३ वरुणातीर्थ.
४ अग्नितीर्थ.
५ ब्रह्मयोनीतीर्थ.
६ स्थाणुतीर्थ.
७ चतुर्मुखब्रह्मतीर्थ.
८ प्राचीसरस्वतीतीर्थ.
९ शुक्रतीर्थ.
१० कुबेरतीर्थ.
११ ध्रुवतीर्थ.
१२ विहारतीर्थ.

१३ चक्रतीर्थ.
१४ वंदनपावनतीर्थ.
१५ इंद्रतीर्थ.
१६ रामतीर्थ.
१७ येकरात्रितीर्थ.
१८ क्षीरकावासतीर्थ.
१९ आदित्यतीर्थ.
२० सोमतीर्थ.
२१ दधीचीतीर्थ.
२२ सारस्वततीर्थ.
२३ सूततीर्थ.
२४ वृद्धकन्यातीर्थ.
२५ कोटितीर्थ.

देवता आहेत त्यांचीं नांवें.

१ ब्रह्मेश्वर.
२ वटेश्वर.
३ तक्षकेश्वर.
४ विश्वकर्मेश्वर.
५ लिंगरूपउमादेवी.
६ हस्तपादेश्वर.
७ हारीतेश्वर.
८ वातापीश्वर.
९ इल्वलेश्वर.
१० वान्येश्वर.
११ कंकालेश्वर.
१२ सिद्धेश्वर.
१३ मार्कंडेश्वर.
१४ चित्रांगदेश्वर.
१५ रंभेश्वर.
१६ शक्रेश्वर.
१७ पाराशरेश्वर.
१८ व्यासेश्वर.
१९ चतुर्मुखलिंगेश्वर.
२० उमाभगवती.
२१ नकुलांशगणस्थान.
२२ गोकर्णेश्वर.
२३ कुमारेश्वर.
२४ बिभीषणेश्वर.
२५ उर्वशीश्वर.
२६ घृष्णेश्वर.
२७ त्रिशिरेश्वर.
२८ वागीश्वर.
२९ हिमवंतेश्वर.
३० कार्तवीर्येश्वर
३१ विश्वेश्वर.
३२ विरुपेश्वर.

कुरुक्षेत्राची प्रदक्षिणा अठ्ठेचाळीस कोसांची असून, ती सरस्वतीचे तीरानें आहे. ठिकठिकाणीं सरस्वतीचीं नांवें कारण परत्वें भिन्न झालीं आहेत. सरस्वतींत बहुत तीर्थें आहेत. या क्षेत्रीं आठ कोस लां

वी रुंदीची जागा दानधर्म करण्यास ठेवून, वरकड प्रदेशांत कौरव-
पांडवांचें युद्ध झालें. कुरुक्षेत्राची यात्रा करून रघुनाथराव हे भागी
रथीतीरीं शुकताल म्हणून एक स्थान आहे तेथें आले. या स्थानाची अ शुकताल.
शी कथा आहे कीं, सर्पदंश होऊन आजपासून सातवे दिवशीं तुझें
मरण होईल, असा कांहीं कारणानें शृंगी या नांवाचे ऋषिपुत्रानें प
रिक्षिती राजास शाप दिला. त्यामुळें तो राजा प्रायोपवेशनी ( म
रणास सिद्ध होऊन ) बसला. तेव्हां अकस्मात् त्याच्या मोठ्या भाग्य
योगानें शुकाचार्य त्या स्थानीं प्राप्त झाले. आणि त्यांनीं परीक्षिति
राजास समग्र भागवत पुराण सांगितलें. नंतर सातवे दिवशीं सर्प
दंश होऊन राजा मरण पावला. अशी कथा आहे. राजानें पुराण
श्रवण जेथें केलें तेंच हें स्थल होय. येथें बैरागी वगैरे पुष्कळ असून
त्यांचीं ठाकुर द्वारें ही बहुत आहेत. हें स्थल भागीरथीचे तीरीं फार
रमणीय आहे. तेथून रघुनाथराव हे परिक्षिति गड येथें आले. तेथें प
रिक्षिति नांवाचा पर्वत आहे. येथें मुख्य तीर्थ धर्म ह्मणून आहे. गां- परिक्षितगड.
धारेश्वर नामें महादेव आहे, या देवासन्निध गांधार तीर्थ आहे. शु धर्मतीर्थ. गांधारेश्वर.
क्रतीर्थाजवळ सप्तऋषींचें स्थान आहे. येथून हस्तनापुरास आरंभ हो शुक्रतीर्थ.
तो. हस्तनापुराची मर्यादा फार मोठी आहे. हल्लीं त्या प्रदेशांत सर्व सप्तऋषिस्थान.
अरण्य असून दाट झाडी आहे, त्या आश्रयानें तेथें घातुक प्राणी हस्तनापुर.
फार राहातात. तें अरण्य शिकार करण्याकरितां इंग्रेजांनीं ठेविलें आ
हे! ज्या ठिकाणीं कुरुराजाचा मुख्य वाडा होता, त्या ठिकाणीं राज
राजेश्वर या नांवाचे शिवस्थान आहे. ज्या ठिकाणीं दुर्योधनानें द्रौ- राजराजेश्वर.
पदीचीं वस्त्रें फेडिलीं, तेथेंही शिवस्थान आहे. त्यास चीरेश्वर ह्मण चीरेश्वर.
तात. त्या देवास वस्त्र समर्पण करावें असें तेथील लोक सांगतात.
कर्णघाटीं कर्णगंगातीर्थ आहे. त्या स्थलाहून भागिरथीचा प्रवाह ती कर्णगंगा.
न चार कोस आहे. बुद्धगंगा म्हणोन एक तीर्थ आहे. तेथें यात्रेकरी
स्नान करितात. जवळच बौद्धाचें फार प्राचीन मंदिर आहे. तेथें त्या बुद्धगंगा.
मताचे लोक दर्शनाकरितां बहुत जातात. हस्तनापुर हें स्थान अगदीं

निर्मनुष्य आहे. पूर्वकालीं बलरामास कांहीं कारणानें क्रोध येऊन तो नांगरानें हस्तनापुर ओढून गंगेत पालथें घालूं लागला. तेव्हां सर्व कौरव त्यास शरण गेले. त्यावरून पालथें घालायाचें होतें, तें सोडिलें. अशी कथा आहे. त्याप्रमाणें हल्लीं तेथें चिन्ह दिसतें. हस्तनापुर प्रदेशांत रघुनाथराव गेले, तेव्हां तेथें मच्छर ह्मणजे डांस अतिशय होते. तेथील कृत्य आटोपून रघुनाथराव हे गणमुक्तेश्वर क्षेत्रीं गेले.

गणमुक्तेश्वर.

स्वर्गद्वारतीर्थ.

या क्षेत्रांत देवाचे समीप स्वर्गद्वार नामें तीर्थ आहे. देवगणास कांहीं कारणानें शाप झाला होता. ते शापित गण दैवयोगें करून या क्षेत्रीं आले त्यानीं स्वर्गद्वार तीर्थीं स्नान करून तेथील शिवलिंगाचें दर्शन करितांच, ते मुक्त होऊन पूर्व स्थलीं गेले ! या कारणानें तेथील शिवलिंगास गणमुक्तेश्वर संज्ञा झाली. या क्षेत्राची मुख्य देवता हीच आहे. भागीरथीतीरीं जीं क्षेत्रें आहेत, त्यांत या शिवस्थानाचें माहात्म्य बहुत वर्णिलें आहे. खेरीज चक्रतीर्थ व नागकूप हीं तीर्थें आहेत.

चक्रतीर्थ.

नागकूपतीर्थ.

युगांतरीं नहुष राजास इंद्रपदाचा अधिकार प्राप्त झाला असतां, त्यानें मत्त होऊन सप्त ऋषींस आपली शिबिका ( पालखी ) वहन करण्यास योजिलें. त्या कालीं अगस्तीऋषींनें त्यास शाप दिला कीं, " तूं पृथ्वीवर अजगररूपी सर्प होऊन पडशील! " तेव्हां त्या राजानें ऋषीस नमस्कार घालून, स्तुति केली. तेव्हां ऋषींनें प्रसन्न होऊन उच्छाप दिला कीं, " तुझे वंशांत द्वापर युगाचे अंतीं यमधर्माचे अंशानें युधिष्ठिर नामक राजा उत्पन्न होईल; त्या वेळेस तुझा त्याजबरोबर धर्मसंबंधी कांहीं कारणानें संवाद होईल. तेव्हां तूं सर्प योनीतून मुक्त होऊन स्वर्गास येशील. " असा उच्छाप झाल्यावर नहुष राजा अजगर होऊन त्या स्थानीं पतन पावला! कालें करून भीमसेन हा गणमुक्तेश्वर तीर्थाचे प्रदेशीं अरण्यांत मृगया करीत असतां त्या अजगरानें त्यास ग्रहण करून तो गिळूं लागला. त्याच्या पुढें भीमसेनाचें बल कुंठित झालें; तेव्हां भीमसेन मोठ्यानें आक्रोश करूं लागला, तो ध्वनी धर्मराजानें ऐकून तो ह्या स्थलीं आला. तेव्हां

त्या सर्पाबरोबर धर्मराजाचा धर्म संबंधीं पुष्कळ संवाद झाला. त्याचे अंतीं तो सर्प शाप मुक्त होऊन त्यास पूर्ववत् नहुष राजाचा देह प्राप्त झाला. तेव्हां त्यानें आपलें शाप कारण धर्मराजास सांगितलें. आणि तुमचा मी पूर्वज आहे, असें सांगून तो स्वर्गास गेला ! ही कथा महाभारतीं सविस्तर वर्णिली आहे. गणमुक्तेश्वरक्षेत्रीं नाथ या नांवाच्या सात देवता आहेत त्यांचीं नांवें:—

१ मुक्तिनाथ.
२ मुक्तेश्वरनाथ.
३ आमलीश्वरनाथ.
४ भूतेश्वरनाथ.
५ गंगेश्वरनाथ.
६ केदारनाथ.
७ गणमुक्तेश्वरनाथ.

पुष्पावती अंबरीषराजाचीराजधानी कर्णघाट.

या क्षेत्राचा विधि करून रघुनाथराव हे गंगातीरीं आहार ह्मणून एक क्षेत्र आहे तेथें गेले. त्या स्थलीं जनमेजय राजानें सर्पसत्र केलें. असें ह्मणतात. तेथून पुढें भागीरथीतीरीं पुष्पावती नामें नगरी आहे, तेथें रघुनाथराव यांचा मुक्काम झाला. तें स्थळ आंबरीष राजाची राजधानी असून क्षेत्र ह्मणवितें. पुढें मार्गांत गंगातीरानें कर्ण घाट लागतो. तेथें कर्णानें सूर्यप्रीत्यर्थ तप केलें. या ठिकाणीं कुंतीनें कर्णास भेटून सांगितलें कीं, " तूं सुतपुत्र नाहींस तर कन्या अवस्थेंत सूर्यापासून तूं माझे उदरीं झाला. आहेस. मी लोक लज्जेस्तव भागीरथींत तुझा त्याग केला. जसे धर्म, भीम, इत्यादि माझे पांच पुत्र आहेत, तसाच तूंही माझा साहावा पुत्रच असून त्या पांचांपेक्षां तुझा ज्येष्ठ मान आहे." हें कुंतीचें बोलणें ऐकतांच कर्णास क्रोध येऊन तो बोलला कीं, " तूं माझा त्याग केला. मग आतां मजकडे कां आलीस? तर आतां येथून जा मी दुर्योधनाचा पक्ष धरिला आहे. त्याचा त्याग करून त्याचे जे शत्रु पांडव त्यांस कदापि मिळणार नाहीं! " हे कर्णाचें बोलणें ऐकून कुंतीनें त्याची प्रार्थना केली कीं, " जें झालें तें झालें ! परंतु युद्धांत माझे पुत्रांस तूं मारूं नको. " कर्णानें उत्तर दिलें कीं, " मी चोघांस मारणार नाहीं. एक अर्जुन मला

मारील किंवा मी अर्जुनास मारीन." असें वृत्त या स्थलीं झालें असो. तेथून पुढें भागिरथीतीरीं रामक्षेत्र आहे. त्यास रामघाट ह्मणतात. तेथें रघुनाथराव गेले. या क्षेत्रीं रामचंद्राचें मुख्य स्थान असून गंगातीरीं पुष्कळ ठाकुरद्वारें आहेत गंगेत रामतीर्थ नामें एक मुख्य तीर्थ आहें. ग्वाल्हेर प्रांतांतील व शिंद्याचे लष्करांतील लोक यांस हें स्थल समीप असल्यामुळें ते लोक गंगा यात्रेकरितां येथेंच येतात. येथून पुढें गंगातीरीं सूकरनामें क्षेत्र आहे. त्या क्षेत्राचा महिमा वाराह पुराणांत फार वर्णिला आहे. विष्णूनें वाराह अवतार घेतल्यावर पृथ्वीचा उद्धार केला. त्या समयीं वाराह रूपीं विष्णूनें या क्षेत्राचें माहात्म्य पृथ्वीस सविस्तर सांगितलें. या क्षेत्रास वाराहक्षेत्र व सूकरक्षेत्र अशीं दोन नांवें एकाच अर्थाचीं आहेत. येथील देवता व तीर्थें म्हटलीं म्हणजे मुख्य वाराहाचें स्थान चक्रतीर्थ, योगमार्गस्थान, सीतारामचंद्रस्थान, तथील क्षेत्रपाल वटुभैरव, वाराहाची गादी ह्मणजे ज्या स्थानीं विष्णूनें वाराह अवतार घेतला तें स्थान, भागिरथी, कपिल मुनीची तप करण्याची गुहा व वृद्धगंगा अशीं स्थानें व तीर्थें बहुत आहेत. पुढें मार्गांत गंगातीरीं फरकाबाद म्हणून एक फार मोठें शहर लागतें. तेथें दुलयांचें फर्द वगैरे कापड फार चांगलें तयार होतें. त्या शहरीं पाहिजे तो पदार्थ मिळतो. तेथून मार्गांत कमलगंज ह्मणून बराच मोठा गांव लागतो. त्या मार्गानें रघुनाथराव गंगातीरीं शृंगीरामपुर क्षेत्रास आले. तेथें रघुनाथराव यांचे तीर्थरूप विठ्ठलरावतात्यासाहेब यांची पहिले घरची प्रत्यक्ष मातोश्री होती. त्या बाईस तीन पुत्र होते. त्यांत वडील विठ्ठलराव, हे विंचुरकर यांचे घराण्यास दत्त दिले. दुसरे श्रीपतरावगोपाळ, आणि तिसरे गणपतरावगोपाळ; हे उभयतां इंग्रजी अंमल झाल्यावर कांहीं दिवसांनीं ग्वाल्हेरीस जाऊन त्यानीं शिंद्याची महाल संबंधीं कामें उत्तम प्रकारचीं केलीं. त्यांत श्रीपतरावगोपाळ यांनीं माळवे प्रांतीं सोनकच वगैरेचे मामले बहुत काल पर्यंत करून मोठी अब्रु व लौकिक मिळविला. गणपतरावगोपाळ

रामघाट.

सूकरक्षेत्र अथवा वाराहक्षेत्र.

फरकाबाद.

कमलगंज.

शृंगीरामपुर.

यांनीं भिंडमहाल व आणखी पुष्कळ महाल येथील कामें करून अन्न व द्रव्य हीं संपादन केलीं. रघुनाथराव यांची मौंजी झाल्यावर श्रीपतरावगोपाळ यांनीं आपली मातोश्री राधाबाई यांस माळवे प्रांतीं आपले महालीं सोनकच येथें नेलें. तेथें कांहीं दिवस राहिल्यावर दुर्दैवानें श्रीपतराव वारले. तेव्हां कनिष्ठ पुत्र गणपतराव यांनीं बाईस आपले जवळ भिंडमहालीं आणिलें. परंतु तेथें ही न राहातां ती बाई दुःखानें सर्वसंग परित्याग करून विरक्त होत्साती गंगातीरीं शृंगीरामपुरक्षेत्रीं जाऊन राहिली. त्या बाईची भेट रघुनाथराव यांस शृंगीरामपुर क्षेत्रीं झाली. जेव्हां रघुनाथराव हे या आपल्या वृद्ध झालेल्या अजीकडे गेले. तेव्हां तिनें त्यांस अत्यंत प्रेमानें पोटाशीं धरिलें. त्याकाळीं तिजला फार गहिंवर येऊन तिचा कंठ दाटून आला. आणि नेत्रांतून अश्रूंच्या धारा चालल्या, तशीच त्या ममताळू ह्मातारीला आपल्या मृत पुत्रांची स्मृति होऊन ती फारच कष्टी झाली. तेव्हां तिची ती शोकावस्थापाहून रघुनाथरावास ही फार वाईट वाटलें! आणि ते त्या आपल्या वृद्ध आजीपाशीं ममतापाशानें बद्ध होऊन कांहीं दिवस मुक्काम करून राहिले. त्या क्षेत्रीं शृंगीनांवाचे ऋषीचा आश्रम आहे. व गंगातीरीं मोठाले घाट बांधिलेले आहेत. त्या घाटांवर मंदिरांत शृंगऋषीची मूर्ति आहे. हे क्षेत्र चैत्ररथ नामें वनांत आहे, व तेथें गंगेचा व वलगा नदीचा संगम झाला आहे. त्याचे सन्निध सोमेश्वर नामें शिवस्थान आहे. त्या विषयीं त्या क्षेत्र माहात्म्यांत मोठें वर्णन आहे. या क्षेत्रीं थोडे वर्षांपूर्वी रामकृष्णबावा म्हणून ब्रह्मचारी होते. हे मोठे सिद्ध ह्मणून त्यांची बहुत प्रख्याती झाली ती ऐकून दौलतरावशिंदे हे त्यांचे दर्शनाकरितां इंग्रेजी अंमल सोमेश्वर.

---

टीप १ — श्लोक ॥ यत्रगंगाचवलगाच, यत्रचैत्ररथंवनं ॥
॥ यत्रसोमेश्वरोदेवो,मुक्ति तत्रनसंशयः ॥ १ ॥

भावार्थ.— ज्या ठिकाणीं गंगा वलगा चैत्ररथवन आणि सोमेश्वरदेव आहे. तेथें मुक्ति आहे यांत संशय नाहीं.

झाल्यावर या क्षेत्रीं आले होते. येथें गुह नामक केवर्तक [ कोळी ] रहात होता त्यानें अयोद्धेहून श्रीरामचंद्र दंडकारण्यांत जाण्याकरितां आले असतां त्यांस नावेंत बसवून गंगापार उतरून दिलें. येणें करून रामचंद्राची कृपा होऊन त्यास स्वर्गप्राप्त झाला. येथें रघुनाथराव असतां विंचूर मुक्कामीं त्यांची कनिष्ट पत्नी रमाबाई होती, त्या बाईस क्षयरोग होऊन शके १७७१ ज्येष्ट वद्य १० रोजी देवाज्ञा झाल्याचें वर्तमान त्यांस समजलें. तेणेकरून त्यांस अत्यंत दुःख झालें. रघुनाथराव यांस पहाडांतील वगैरे कठीण यात्रेचा प्रवास कर्तव्य होता; आणि बायका मंडळी बरोबर असली ह्मणजे प्रवासांत अडचण पडते. या करितां प्रयागास पोंहचण्याचे संधीस तिला परभारे तेथें नेऊन मग उभयता स्त्रीपुरुषांनीं बरोबर त्रिस्थली यात्रा करावी. अशा हेतूनें रघुनाथरावांनीं तिला विंचुरास ठेविलें होतें. हें पूर्वींच लिहिलें आहे. तो त्यांचा हेतु एकीकडे राहून ईशसत्तेनें हा भलताच परिणाम झाला! ह्मणून रघुनाथराव यांस विशेष खेद झाला! त्या कालीं ब्रह्मावर्तक्षेत्रीं आपले वंशाचे यजमान पेशवे यांचे वंशातील बाजिराव साहेब होते. त्यांचें चरण दर्शन आपणास घडावें, अशी रघुनाथराव यांस अत्यंत उत्सुकता जाल्यामुळें त्यांनीं याविषयीं पुण्याचे एजेंट साहेबांस पत्र लिहिलें त्यावरून एजेंट साहेबांनीं ब्रम्हावर्त येथील रेसिडेंट म्यॉनसन साहेब यांस विंचूरचे संस्थानिक यांचे घराण्याचा मोठेपणा, व त्यांची इच्छा, व पेशव्याशीं त्यांचा कोणता संबंध होता तो, वगैरेचा खुलासा लिहून, त्यांस बाजीरावसाहेब यांची भेट घेण्यास हरकत नाहीं, असें लिहिलें. तो मजकूर रेसिडेंट साहेबांनीं रघुनाथराव यांस पत्रद्वारें कळविला. हें पत्र आल्यानंतर त्यांनीं आपले वृद्ध आजीची आज्ञा घेऊन ते कानपुरापासून थोडे कोसांचे अंतरावर भागिरथीतीरीं क्षीरवर्तेश्वर नामें महादेवाचें स्थान आहे, तेथें आले. त्या स्थानास तद्देशीय लोक खरीयागाढेश्वर असें ह्मणतात. गंगामाहात्म्यांत या स्थलाचें वर्णन आहे. देवापासून गंगा ए

क्षीरवर्तेश्वर.

क कोसावर आहे. देवस्थानाची जागा अति रमणीय असून मंदिर मोठें आहे. आसमंतात मोठाल्या धर्मशाळा आहेत. तेथून रघुनाथराव हे कानपुरास आले. तेथें त्यांची व भाऊपोतनीस यांची भेट झाली. कानपुर. भाऊपोतनीस हे मख्यात गृहस्थ होते. यांनीं व यांचे पूर्वजांनीं विंचूर दौलतीचा कारभार केला होता. स्वतःभाऊपोतनीस यांनीं कांहीं दिवस सिंद्याचे रियासतीचा कारभार करून मोठी कीर्ति मिळविली होती.

कानपुर हें नांव अपभ्रंशानें पडलें आहे. त्याचें नांव कर्णपुर असें आहे या स्थळीं कर्ण रहात असे. प्रत्यहीं बाराघटका दिवस येई तों पर्यंत सूर्याकडे पाहून सूर्यस्तुति करावी, नंतर सवामण सुवर्ण ब्राह्मणास द्यावें. नंतर जो याचक येईल त्याचे मनोरथ पूर्ण करावे, असा कर्णाचा नित्य नेम होता. अर्जुनाचे हिताकरितां इंद्रानें ब्राह्मणाचे रूपानें येऊन कर्णास जन्मतःच सहज कुंडलें व कवच होतें, त्यांची याचना केली. तेव्हां कर्णानें शस्त्रेंकरून शरीर छेदून कवच व कुंडलें इंद्रास दिलीं! ही गोष्ट एथेंच घडली. या स्थळीं कर्णतीर्थ ह्मणून भागीरथींत एक मुख्य तीर्थ आहे. कर्णतीर्थ. येथील छावणी फार मोठी आहे. व या शहरांत पुष्कळ व्यापार चालतो. तेथून ब्रह्मावर्त सहा कोस आहे. या ठिकाणाहून रघुनाथराव यांनीं बाजिरावसाहेब यांस स्वामीचे चरण दर्शनाची या सेवकास फार उत्कंठा आहे असें वकील मार्फत कळविल्यावर त्यांनीं संतोषानें भेटीस येण्याविषयीं आज्ञा देऊन आपले खाजगी फौजेचे कारभारी बापुगोडबोले होते, त्यांस हुकुम केला कीं, येथें विंचुरकराची पागा आहे. त्या पागेचे मालक आले आहेत; या करितां त्या पागेस दुसरें काम न सांगतां, तिनें विंचुरकर यांचा मुक्काम येथें आहे, तो पर्यंत त्यांचेच तैनातीस असावें. या प्रमाणें सांगून बाजीरावसाहेब यांनीं रघुनाथराव यांस आणण्याकरितां दोन ढालाईत व दोन हुजरे पाठविले. तेव्हां आश्विन शुद्ध ५ स रघुनाथराव ब्रह्मावर्तास आपले छावणीतील वाड्यांत जाऊन रा

ब्रह्मावर्त.

हिले. दुसरे दिवशीं तिसरे प्रहरीं त्यांनीं बाजीरावसाहेब यांचें दर्शन घेतलें! तेव्हां रामचंद्रसुभेदार, बापुगोडबोले, बाजीरावसाहेब यांचे दत्तपुत्र नानासाहेब व बाळासाहेब, आणि बाजीरावसाहेब यांच्या मृत दत्तपुत्रांचे दत्तपुत्र रावसाहेब वगैरे मंडळी जवळ होती. रघुनाथराव यांनी बाजीरावसाहेब यांचे पायावर मस्तक ठवून प्रथम दहा मोहरा नजर केल्या. नंतर बाजीरावसाहेब यानी रघुनाथराव यांस आपल्या जवळ बसवून त्यांचे अंगावरून हात फिरविला! आणि नानासाहेबांस सांगितलें कीं, यांस भेटावें! नंतर मराठी रीतीप्रमाणें भेटून बसल्यावर बाजीरावसाहेब बोलले कीं, "आह्मी येथें आल्यापासून आमचे सरदारांपैकीं, रघुनाथराव तुह्मीच येऊन भेटला! येणें करून संतोष वाटतो!" याप्रमाणें बोलणी झाल्यावर रघुनाथराव हे निरोप घेऊन आपले गोटांत आले. नंतर बाजीरावसाहेब हे रामचंद्र सुभेदार यांस बोलले कीं, विंचुरकर येथें आले असून तुह्मी त्यांचे भेटीस कां गेला नाहीं? तुह्मांस जाणें उचित होतें! तेव्हां सुभेदार हे लागलेच रघुनाथराव यांचे भेटीस आले. नंतर रघुनाथराव ही त्यांचे घरीं भेटीस गेले. ब्रह्मावर्त येथें रघुनाथराव यांस अनायासें दसऱ्याचा सण पडला. ते दिवशीं पूर्वीचे रीतीप्रमाणें बाजीरावसाहेबांकडून रघुनाथराव यांस हुजऱ्या बरोबर पोषाख आला! नंतर तिसरे प्रहरीं स्वारी समागमें येण्याविषयीं आज्ञा आली. त्या प्रमाणें पागा बरोबर घेऊन स्वारी समागमें रघुनाथराव हे शिलंगणास गेले. शिलंगणाचे स्वारींत रेसिडेंट म्यॉन्सनसाहेबही कांहीं कवायती फोजेनिशीं आले होते बाजीरावसाहेब यांची स्वारी आपले वाड्यांत परत गेल्यावर सोनें वाटण्याचा दरबार झाला. त्या वेळीं रघुनाथराव यांनीं बाजीरावसाहेब यांस दहा मोहरा नजर करून नानासाहेब वगैरे

---

टीप. १ बाजीरावसाहेब यांस नानासाहेब, दादासाहेब, आणि बाळासाहेब, असे तिघे दत्तपुत्र होते त्यांपैकीं दादासाहेब हे रघुनाथराव विंचुरकर ब्रह्मावर्तीं गेले त्या वेळीं मयत असून त्यांचे दत्तपुत्र रावसाहेब हे बाजीरावसाहेबांपाशीं होते.

खासे मंडळीस सोनें दिलें. नंतर दरबार बरखास्त होऊन रघुनाथराव हे आपले गोटास परत आले. तेव्हां सुभेदार व बापुगोडबोले वगैरे मंडळी रघुनाथराव यांस सोनें देण्यास आली. त्यांचे ही घरीं रघुनाथराव हे सोनें देण्यास गेले. असे प्रकारें रघुनाथराव यांचा त्या सालीं दसऱ्याचा सण स्वकीय यजमानाचे सन्निध मोठे संतोषानें झाला!

नानासाहेब व रघुनाथराव यांचें वय समान असल्यामुळें परस्परें त्यांचा मोठा स्नेह जडून रघुनाथरावावर नानासाहेब बहुत लोभ करूं लागले. त्यांजकडील पिराजीराजे, तात्याटोपे, बाबाभट, नारायणमराठे, वगैरे मंडळीशीं रघुनाथराव यांचा बहुत स्नेह पडला. त्या योगें प्रतिदिवसीं सकाळीं पांच वाजतां भालदार बोलावूं आला म्हणजे रघुनाथराव यांनीं मेदानांत जावें. मग तेथें घोड्याचे फेर व बोथाटीचे खेळ व्हावे. खुद्द नानासाहेब व त्यांची मंडळी घोड्यावर चांगली बसत असे. याप्रमाणें दररोज सकाळीं सात वाजत तों पर्यंत घोड्याचे फेरफठके होत असत. नंतर वेगळ्यावाडयांत नानासाहेबांचें रहाणें असे, तेथें ते त्यांच्या बरोबर जाऊन त्यांचे पंक्तीस भोजन करीत, मग ते आपल्या बिऱ्हाडीं येत. नानासाहेब यांचे वाड्यांत कधीं कधीं रात्रीं तद्देशीय कंचन्यांचे नाच, देशी गाणाऱ्यांच्या बैटकी, गवयांचीं गाणीं होत, त्या मजलसीस रघुनाथराव हे बहुतकरून जात असत. असे प्रकारचा क्रम त्यांचा मुक्काम तेथें होता तोंपर्यंत चालला होता.

पुष्कर, हरिद्वार, गंगोत्री, नारायण, वगैरे ठिकाणच्या तीर्थांचीं उदकें व ठिकठिकाणच देवतांचे प्रसाद, व शहरोशहरींच्या उत्तम जिनसा रघुनाथराव यांनीं बरोबर आणिल्या होत्या, त्या दोन पराती व सात ताटें यांत भरून आपले आश्रित शंकरशास्त्री यांजबरोबर देऊन त्यांनीं बाजीरावसाहेब यांजकडेस पाठविल्या. तेव्हां बाजीराव साहेब यांनीं प्रत्येक तीर्थाचीं हकीकत शास्त्री यांस पुसली. व कोण

ती देवता कोठें, व तिचा प्रसाद काय आहे, वगैरे पुसून मोठे संतो-षानें त्या त्या पदार्थाचा त्यांनीं स्वीकार केला!

रघुनाथराव नित्य तिसरे प्रहरीं बाजीरावसाहेब यांचे दर्शनास जात असत, तेव्हां रामचंद्रसुभेदार व बापुगोडबोले जवळ असावया-चेच. भेटींत ते बहुधा दक्षिण प्रांतींच्या वार्ता पुसत असत. कधीं नासिक त्रिंबक येथील स्थिति, कधीं कोणते सरदाराचा वंश हल्लीं कोण आहे, त्यास उत्पन्न काय आहे, इंग्रेजांची चाकरी कोणते सर दार करितात, वगैरे प्रश्न करीत. त्यांचीं उत्तरें रघुनाथराव आपले माहिती प्रमाणें देत असत. एके दिवशीं बाजीरावसाहेब हे रघुनाथ राव यांस बोलिले कीं, " यशवंतरावहोळकर पुण्यावर ( शके १७ २४ या वर्षीं ) आला ते समयीं लढाई झाली, त्या वेळीं तुमचे आजे नरसिंगराव हे त्याजवर चालून गेले. ते वेळीं त्यांचे छातीवर तरवारीची जखम लागली असून ती त्यांस समजली नाहीं! तेव्हां मी त्यांस रागें भरून उपचार करविले! अशी त्यांची विलक्षण शक्ति हो ती. " तसेंच एके दिवशीं बाजीरावसाहेब हे नानासाहेबास भोजनाचे वेळीं बोलिले कीं, " रघुनाथराव यांचे पूर्वज विठ्ठलशिवदेव हे आ मचे दादासाहेबांचें आत्मलिंग होतें. " बाजीरावसाहेब हे रघुनाथराव यांस एक दोन दिवसांआड, व कधीं लगत एक दोन दिवस पंगती-स भोजना करितां बोलावीत असत. बाजीरावसाहेब यांस विनंती करणें ती बापुगोडबोले यांचे मार्फत करावी, असा रघुनाथराव यांनीं पाठ ठेविला होता. रघुनाथराव यांनीं बाजीरावसाहेब यांस मंडळीसह एके दि वशीं भोजनास येण्याची विनंती केली. ती स्वीकारून ते भोजनास आले, त्या वेळेस खुद्द बाजीरावसाहेब व नानासाहेब, बाळासाहेब, वगैरे मंडळी व त्यांची बायका मंडळी या सर्वांस रघुनाथराव यांनीं पोषाक दिल्हे!

रामचंद्रसुभेदार, बापुगोडबोले, अण्णाटोपे, रामचंद्रशास्त्रीसाठे, व राघवेंद्राचार्य गजेंद्रगडकर या सर्व मंडळीस स्वतंत्र मेजवानी करू न त्यांस ही रघुनाथराव यांनीं योग्यते प्रमाणें पोषाख दिले. रामचं

ब्रसुभेदार व बापुगोडबोले यांनीं रघुनाथरावास निरनिराळे दिवशीं भोजनास बोलावून पोषाख दिले; अण्णाटोपे हे मुळचे येवलें येथील रहाणार असून विंचुरकरांचे आश्रित होते. त्यांजकडे फार दिवसांपासून गोदातीरीं कान्हेगांव आहे तेथील नरहरीची पूजा होती. त्या संबंधानें खुद्दअण्णाटोपे, व त्यांचे चिरंजीव तात्याटोपे यांचें येणें जाणें हमेषा होतें. टोपे यांनीं रघुनाथराव यांस आपले घरीं भोजनास नेलें होतें. राघवेंद्राचार्य गजेंद्रगडकर यांची प्रसिद्धी सर्वत्र आहेच. यांचे घरीं रघुनाथराव यांचे हमेषा जाणें असे. व तेही रघुनाथराव यांच्या भेटीस येत असत. ते आचार्य मध्वमतांतील होते, तरी त्यांचा स्वभाव आग्रही नव्हता. रघुनाथराव हे ब्रम्हावर्त येथील रेसिडेंटाचे भेटीस चार पांच वेळ गेले होते. रेसिडेंटासही त्यांनीं आपले येथें ज्याफतीस ( भेटीस ) आणिलें होते. असे प्रकारें रघुनाथराव यांचा ब्रह्मावर्त येथें दोन महिने पर्यंत मुक्काम झाला.

पुढें त्यांनीं काशीयात्रेस जाण्याकरितां बाजीरावसाहेब यांजपाशीं आज्ञा मागितली. तेव्हां त्यांस बाजीरावसाहेब यांनीं उत्तर दिलें कीं, " आह्मांसही काशीयात्रेस जाणें आहे, तेव्हां तुह्मी आमचे बरोबर चलावें. " त्यावर रघुनाथराव यांनीं अशी विनंती केली कीं, " मी आपले बरोबर तीर्थरूपांच्या अस्थी आणिल्या आहेत, त्यांचा प्रत्येक तीर्थीं विधियुक्तरीतीनें प्रक्षेप केला. आतां राहिलेल्या अस्थींचा प्रक्षेप प्रयाग तीर्थीं व काशी एथील मणिकर्णिकातीर्थीं करणें आहे, तो स्वहस्तें करण्याची इच्छा असून उगीच मध्यें मुक्काम करून दिवस घालविणे हें शास्त्रविरुद्ध होतें. याजवर जशी आज्ञा होईल तसें करीन. " त्याजवर बाजीरावसाहेब बोलिले कीं, " बरेंतर लौकर यात्रा करून परत यावें. याच मुक्कामीं तुमचें लग्न कर्तव्य आहे. " नंतर रघुनाथराव यांनीं ब्रह्मावर्ताहून निघण्याची तयारी केली; तेव्हां बाजीरावसाहेब यांनीं रघुनाथराव यांस व त्यांच्या बरोबरच्या सर्व मंडळीस भोजनास बोलावून पोषाख दिले. आणि यात्रेस जा

ण्याची आज्ञा दिली. नंतर रघुनाथराव हे रेसिडेंटास भेटले आणि लखनौमार्गें आमचा अयोद्धेस जाण्याचा बेत आहे, ह्मणून लखनौ शहर पहाण्याकरितां तेथें थोडे दिवस मुक्काम होईल, याकरितां तेथें आमची तजवीज राहण्यास्तव तेथील रेसिडेंटास सूचना लिहिण्यांत यावी ह्मणून सुचविलें. त्यावरून लखनौ येथील रेसिडेंट सिलेमानसाहेब यांस त्यांनीं परभारें लिहून रघुनाथराव यांजबरोबरही पत्र दिलें. येणेंप्रमाणें रघुनाथराव यांचा ब्रह्मावर्त येथें मुक्काम असतां जें घडलें तें लिहिलें. आतां ब्रह्मावर्त येथील यात्रे संबंधी वृतांत लिहिणे राहिला आहे तो लिहितों:—

ब्रह्मावर्त वर्णन.

पृथ्वींतील सर्व प्रदेशांपेक्षां आर्यावर्त प्रदेश पवित्र, त्यांत ब्रम्हावर्त प्रदेश विशेष पवित्र, त्याहूनही ब्रह्मावर्त क्षेत्र हें फारच पवित्र, असें पुराणांत सांगितलें आहे. भागीरथीतीरीं हें क्षेत्र स्वायंभू मनूची राजधानी होतें. पुढें मनूचे वंशांत जे मोठे पराक्रमी राजे झाले, त्यांनीं ही याच क्षेत्रीं वास करून पृथ्वीचें परिपालन केलें. ब्रह्मदेवानें अश्वमेधयज्ञ करून ब्रह्मेश्वर नांवानें लिंग येथें स्थापन केलें आहे. याशिवाय भूतेश्वर, वनखंडेश्वर, इत्यादि शिवस्थानें ही येथें आहेत. वंदमाता ह्मणून एक देवीचें स्थान आहे. या क्षेत्रीं वाल्मिकऋषीचा आश्रम असून वाल्मिकानें बहुत काल तप करून शिवप्रसाद प्राप्तिसाठीं वाल्मिकेश्वर नांवाचें लिंग स्थापन केलें, तेव्हां शिवप्रसाद प्राप्त होऊन वाल्मिकऋषि कृतकृत्य झाला. रामचंद्रानें सीता गर्भिणी असतां ही तिचा लोकापवादभयास्तव अरण्यांत त्याग केला. तिला मग वाल्मिकऋषीनें आपले आश्रमांत आणून तिचें रक्षण केलें. पुढें नवमास पूर्ण झाल्यावर त्या आश्रमीं सीता प्रसूत होऊन तिला कुश व लव असे दोन पुत्र झाले. पुढें कालें करून रामचंद्राचे अश्वमेधाचा अश्व त्या स्थानीं आला. तेव्हां सीतेचे पुत्रांनीं त्यास धरून ठेविलें. या कारणावरून त्यांचा चुलता लक्ष्मण याजबरोबर त्यांचें मोठें युद्ध झालें. त्यांत त्या दोघां मुलांनीं सर्व सेनेसह त्याचा पराजय केला. हें

वाल्मिकऋषीचा आश्रम.

कृत्य याच स्थानीं घडलें. वाल्मिकाचे आश्रमांत सीताप्रसूतीचे स्थान वगैरे खुणा तेथील लोक अद्यापि दाखवितात. तेथील तीर्थ संबंधी कृत्य आटोपल्यावर रघुनाथराव हे कानपुरास परत आले. तेथून चोवीस कोस लखनौ शहर आहे. तें पहाण्याचे उद्देशें रघुनाथराव यांनीं गंगा उतरून क्रमानें लखनौस येऊन मोतीमहाला समोर गोमती तीरीं पक्कीं बांधिलेली धर्मशाळा आहे तेथें मुक्काम केला. विंचुरचे संस्थानिक हे लखनौस येत आहेत, म्हणून ब्रह्मावर्त येथील रेसिडेंट म्यान्सन् साहेब यांनीं लखनौचे रेसिडेंटास सूचना लिहिली होती, तिजवरून त्यांनीं लखनौ येथील नबाबाचा दिवाण राजा बालकिसन ह्मणून होता त्यास लिहून कळविलें. त्यावरून दुसरेच दिवशीं दिवाणाकडून कुंदन लाल नामें मुनसी रघुनाथराव यांचे भेटीस आला. त्याची भेट झाल्यावर त्यांनीं आठ चपरासी व एक हुद्देदार तेनातीस देऊन त्यांस रघुनाथराव यांचा बंदोबस्त ठेवण्याविषयीं सक्त ताकीद केली. यामुळें रघुनाथराव यांस कोणते प्रकारची अडचण न पडतां शहरांतील जागा व सरकारी इमारती पहाण्यास बिलकुल हरकत पडली नाहीं. लखनौशहर फार मोठें आहे. येथें वस्ती तेवेळेस मुंबईच्या बरोबरीची होती! शहराचे मध्य भागीं गोमतीनदी असून तिला ठिकठिकाणीं पूल बांधिले आहेत. या शहरीं कुंभार काम फार चांगले होतें. मातीचीं चित्रें फारच अपूर्व मिळतात. नबाबाचे फौजेंत पुष्कळ सिद्दी लोक नोकर होते. रिसाले व पलटणें सिद्दी लोकांचींच असून त्या वरील अंमलदारही सिद्दी जातीचेच होते. कानपुर. लखनौ.

त्रेतायुगीं हें शहर गोमतीचे काठीं लक्ष्मणानें वसवून त्याचें नांव लक्ष्मणपुर असें ठेविलें. पुढें कालेंकरून लक्ष्मणपुर याचा अपभ्रंश लखनूर आणि लखनूर याचा अपभ्रंश लखनौ असा झाला. या लक्ष्मणपुराविषयीं अशी कथा आहे कीं, रावणाचा वध करून रामचंद्र आयोद्ध्येस आल्यावर त्यास राज्याभिषेक झाला. नंतर त्यानें लक्ष्मणास आयोद्धे सन्निध स्वतंत्र कांहीं देशाचा अधिकार देऊन त्या स्थलीं रहाण्या

विषयीं आज्ञा केली. तिजवरून लक्ष्मणानें गोमती नदीचेतीरीं शहर वसवून त्याचें नांव लक्ष्मणपुर असें ठेविलें आणि ती आपली राज धानी केली.

मथुरा क्षेत्रीं राहून लवण नामक दैत्यानें ब्राह्मणांस बहुत पीडा करून तो प्रांत उद्वस्त केला; हें वृत रामचंद्रास कळल्यावर त्यानें श त्रुघ्नास आज्ञा केली कीं, मथुरेस जाऊन लवण दैत्याचा नाश करा वा. आणि त्या स्थलीं राहून मथुराप्रांतांतील प्रजेचें पालन करावें. या प्रमाणें रामचंद्राची आज्ञा होतांच शत्रुघ्न तिकडे जावयास निघा ला. तेव्हां रामचंद्रानें लंकेहून वराहाची मुर्ति आणिली होती, ती त्यानें बरोबर घेतली. पुढें त्यानें मथुरेस येऊन लवण दैत्याशी युद्ध करून त्या चा वध केला. त्या कालीं त्याचे उदरांतून ब्राह्मणांचीं प्रेतें निघालीं! ते ब्राह्मण चतुर्वेदाध्ययनसंपन्न असून त्यांस लवणासुरानें गिळलें होतें. तीं ब्राह्मणांचीं प्रेतें वशिष्ठऋषीनें आपले तपःसामर्थ्यानें सजी व केलीं आणि मथुरा क्षेत्रीं वास करून तेथें जे भक्तिमान लोक दा नादि करतील त्याचा प्रतिग्रह करावा, प्रतिग्रह दोष तुह्मांस लागणा र नाहीं, असें सांगून त्या क्षेत्रीं त्यांस स्थापन केलें. हल्लीं जे चौबे ह्मणून ब्राह्मण तेथें आहेत, ते त्यांचेच वंशस्थ आहेत, असें ह्मणतात! मथुराक्षेत्रीं मात्र ते पूज्य आहेत, वरकड ठिकाणीं ते पंक्तिपावन न- सून दानादिकास योग्य नाहींत.

शत्रुघ्नानें आयोद्धेहून वराहाची मूर्ति आणिली त्या विषयीं अशी कथा आहेकीं, वाराहअवताराचें कृत्य समाप्त झाल्यावर ब्रम्हदेवा- नें देवांचा शिल्पी विश्वकर्मा याजपासून पाषाणाची एक वाराहमूर्ति करविली. तिची सत्यलोकीं स्थापना करून ब्रह्मदेव तिची नित्य पू- जा करीत असे. पुढें रावण मोठा पराक्रमी झाला. त्यानें सत्यलोका हून ती वाराहमूर्ति बलात्कारानें आणून लंकेंत स्थापन केली. पुढें रा वणाचा वध झाल्यावर बिभीषणानें ती मूर्ति रामचंद्रास अर्पण केली. तेव्हां पासून मथुराक्षेत्रीं मुख्य देवता वराह असून त्या क्षेत्रास आ

दिवाराह मथुरा क्षेत्र अशी संज्ञा झाली. पुढें कालेंकरून मुसलमानां चें प्राबल्य झालें. तेव्हां त्यांनी हिंदूच्यादेवांचा उच्छेद करण्याचा क्रम सुरू केला. तेव्हां त्या मूर्तीचा नाश झाला. आतां त्या स्थलीं दुसरी मूर्ति स्थापन केली आहे. असो, लखनौस लक्ष्मणाचें स्थान व गोमतीनदींत लक्ष्मण नामक तीर्थ तेथें असून दुसरीं ही देवता स्थानें होतीं, परंतु त्यांचा उच्छेद झाल्यामुळें त्यांचा ठिकाण बरोबर लागत नाहीं!

रघुनाथराव लखनौस गेले त्या वेळीं तेथें अत्यंत अनीति चालू होती. त्या शहरीं गरीब रयतेवर तेथील नबाबाच्या अंमलदार लोकांचा मोठा जुलूम असे. रघुनाथराव यांनीं सूर्योदया पूर्वी मुक्कामाचे जागीं जाण्याकरितां या शहरांत प्रवेश केला. तेव्हां एक भाजीवाला वांग्यांनीं भरलेली गाडी घेऊन तीं विकण्याकरितां बाजारांत जात होता. त्या वेळीं असें झालें कीं, दरवाज्याचे चौकीदार, कोतवालाचे शिपाई, शहरचे रखवालदार, दिवाणाचे शिपाई, काजीचे शिपाई वगैरेंनीं ठिकठिकाणीं तीं वांगीं लुच्याडून घेतलीं त्यामुळें भाजीवाला ती गाडी घेऊन बाजारांत पोहोंचे तो पर्यंत त्या गाडींत टोपलीभर देखिल वांगीं विकण्यास राहिली नाहींत ! असे कितीएक अन्यायाचे प्रकार रघुनाथराव यांनीं तेथें प्रत्यक्ष पाहिले! शहरचे वस्तींतून तेथील अमीरलोकांचे मुलांनीं भरधांव घोडे पिटीत फिरावें! त्यांत कधीं वृद्ध व लहान मुलें सांपडून मरत ! असे प्रकारचे खून झाल्यावांचून एकही दिवस जात नसे ! तेव्हां तें शहर अनीतीचें व लुच्चे लोकांचें केवळ घरच होतें असें दिसतें ! हे सर्व प्रकार पाहून पुढें कांहीं दिवसांनीं इंग्रेजांनीं तें राज्य खालसा केलें! लखनौ येथील नबाबाचें राज्य त्याजकडेसच कायम ठेऊन, त्याचे राज्यांत जी अनीति व अंधाधुंधी चालू होती, तिचा मात्र बंदोबस्त करून इंग्रेजसरकारानें व्यवस्था केली असती, तर त्याची विशेष कीर्ति होऊन त्याचें हित झालें असतें, आणि सन १८५७ सालीं जें मोठें बंड झालें, त्यास ह

खनोचें राज्य खालसा करणें हें एक अंशतः कारण झालें असें जे मानितात, त्यांस तसें मानण्यास जागा राहिली नसती असें कोणाकोणाचें ह्मणणें आहे.

लखनो येथील नबाबाचे पूर्वज पूर्वी दिल्ली येथील बादषाहाचे वजीर असतां त्याचे वंशांत सुजाउद्दौला ह्मणून एक पुरुष जन्मला. त्याची शारीर शक्ती फारच विलक्षण होती. त्याविषयीं लोकांत अशी दंतकथा आहे कीं तो शरयू नदींत कधीं कधीं पोहण्यास जात असे, आणि हरएक प्रसंगीं त्या नदींतून एक मगर धरून आणून त्याचा नाभ तळून खात असे. हत्तीचें शेंपूट धरून त्याचें पुढें चालणें बंद करीत असे. तो मोठा विषयी होता. आणि आपली विषयसुख घेण्याची शक्ती वृध्दिंगत व्हावी म्हणून हमेषा वाजीकरणाचा उपयोग करीत असे. या शिवाय त्याजमध्यें औदार्यही विलक्षण होतें. तो दरवर्षास एक भिकारी धरून आणून त्यास श्रीमान् करीत असे.त्याज विषयीं लखनोचे प्रांतांतील लोक असें सांगतात कीं त्याची स्वारी कधीं कधीं शहरांत फिरावयास निघत असे, तेव्हां एखादे वेळेस रस्त्यांत कोणी सुस्वरूप व सुलक्षणी एखादा भिकारी अढळून त्याचे मर्जीस आला म्हणजे त्यास आपले बरोबर राजवाडयांत नेऊन प्रथम त्याजकडून उंची पोषाग करवून नंतर त्यास एक सुस्वरूप स्त्री करून देऊन त्याचे राहण्याकरितां एक नवीन वाडा बांधून देई. आणि त्यास पुष्कळ दौलत देऊन निरंतरचे उपजीविकेस कांहीं उत्पन्नही करून देई. आणि लोकांनीं त्यास बहुमान द्यावा म्हणोन त्यास आपले खासे मंडळींत दाखल करून नबाब असा किताब देई. यावरून लोकां मध्यें " जिसकोनदेमोला उसकोदेसुजाउद्दवला " अशी ह्मण पडली. याचे कारकीर्दींत ज्या इमारती झाल्या आहेत, त्या पाहण्यासारख्या अपूर्व आहेत. एके ठिकाणीं मोठा सोन्याचा ताबूद असून त्यांत त्याचें त्या वेळचें बांधिव पागोटें होतें. त्यावर शिरपेंच, कलगी, तुरा, वगैरे अलंकार ते वेळचेच होते! शिवाय त्याची ढालतरवार ते

थें ठेविलेली होती! त्या शहरीं जमुनीयाबाग, केसरीबाग, व मोठाले इमामवाडे वगैरे स्थलें पहाण्यासारखीं आहेत. जमुनीयाबागेंत जागो जाग हुबेहुब जीवंत पहारेकऱ्यासारखें पुतळे उभे केलेले असून मधील बंगल्यांत लाखों रुपयांचे मोलवान पदार्थ ही मांडून ठेविले होते! त्या ठिकाणीं बहुतेक हांड्या, झुंबरे, हे पदार्थ सोन्या रुप्याच्या तारेनें गुंफून तारकशी केलेले असत! शिवाय बसण्यास जे कोंच व खुर्च्या होत्या, त्या सोन्याच्या असून त्यांवर जडावाचें काम केलें होतें! बिछायती केवळ कलाबतुच्या विणलेल्या होत्या ! त्यावर नाना प्रकारचीं रेशमी फुलें काढिलीं होतीं! तेथील संपत्ति सारखी संपत्ति या हिंदुस्थानांतील दुसऱ्या कोणत्याही संस्थानांत नसेल, असें सांगतात ! तेथील बागेच्या हद्दींत नानाप्रकारचीं फळझाडें व फुलझाडें असून मध्यें जागोजाग लहान लहान तलाव होते, व त्या प्रत्येक तलावांत फिरण्याकरितां नावाही ठेविल्या होत्या. त्या स्थलीं नाना प्रकारचे पक्षी होते, तें पहांटेस सुस्वर शद्ब करीत असत! या शिवाय मोरे, व हरणें, व चित्ते, वगैरे कितीएक जनावरें मोकळीं फिरत असत! परंतु तीं कोणासही उपद्रव देतनसत ! हें पाहून रघुनाथराव यांचे मनास फार आश्चर्य वाटलें ! शहरापासून कांहीं अंतरावर मार्कीनकोटी ह्मणून एक जागा आहे. ती कोणी युरोपियनानें बांधिली असून पहाण्यासारखी आहे. त्या शहरीं हत्ती अतिशय होते. फारतर काय सांगावें, धोब्याचे घरीं देखिल ओझें वहाण्यास हत्तीच असत! परंतु ते हत्ती मलबारी हत्ती प्रमाणें मोठे नसून सरासरी टोणग्याचे दुपटीनें मोठे असत! या शिवाय त्या शहरांत बहुत पदार्थ वर्णनिय होते. त्यांपैकीं श्वेतपिंपळ हा एक पदार्थ होय. तसा पिंपळ संपूर्ण हिंदुस्थानांत कोठेंही असल्याचें ऐकिवांत नाहीं! तें झाड सरासरी पुरुष सवा पुरुष उंच असून त्यास पानें बहुत नसतात. व तीं परीट घडी प्रमाणें शुभ्र असतात. त्यास अतिशुद्राचा स्पर्श झाला असतां तीं वाळून जातात. परंतु त्याची कोणी शुद्धी केली, तर त्यास पुन्हां नवीं

श्वेतपिंपळ.

न पानें येतात, त्या पानांपासून किमयाही होते! असें तेथील लोकांच्या सांगण्यावरून रघुनाथराव यांस कळलें! त्या वृक्षाजवळ बैरागी लोकच रहात होते व त्या वेळेस त्यांचेच ताब्यांत तो होता.

तेथून निघण्याचे पूर्वी कुंदनलाल मुनसी हा रघुनाथराव यांच्या भेटीस आला होता. त्याजबरोबर त्यांचीं पुष्कळ प्रकारची बोलणीं झाली. त्यांत तेथील अव्यवस्था व अंधाधुंदी विशयीं रघुनाथराव यांनीं गोष्ट काढिली. तेव्हां त्यानें सर्व कबूल करून "शहाणे लोकांचा या ठिकाणीं उपाय नाहीं!" असें सांगितलें. आणि "थोडेच दिवसांत हें राज्य इंग्रेज आपले राज्यास जोडतील असें अनुमान आहे," ह्मणून ही त्याचे बोलण्यांत आलें. आणखी त्यानें असें सांगितलें कीं "हल्लीं रेसिडेंटास हुकूम झाला आहे कीं, सर्व राज्यांत फिरावें आणि राज्यास्थिति कशी आहे या बद्दल रिपोर्ट करावा. त्या हुकुमावरून प्रस्तुत रेसिडेंटाची स्वारी स्थिति पाहण्यास निघाली आहे. ते प्रथम अयोद्धेकडेस जाणार आहेत. या करितां त्यांजबरोबर जर तुह्मी जाल तर रस्त्यांत फार सुख होईल." असें त्यानें कळविलें. हा मुन्सी जातीचा कायथ होता. व बहुत हुषार असावा असें रघुनाथराव यांस वाटलें.

रघुनाथराव यांचा सात दिवस लखनौस मुक्काम झाला. तेवढ्या काळांत पहाण्यासारख्या ज्या वस्तु होत्या, त्या पाहून ते अयोद्धेकडे चालते झाले. तों थोड्याअंतरावरच रेसिडेंटाचें स्वारीचा मुक्काम होता. त्याचे खटल्याबरोबर रघुनाथराव हे अयोद्धेस जाऊन पोंहचले.

अयोध्या शहरास बंगला व फेजाबाद अशीं हीं नांवें आहेत. पैकीं बंगला असें तेथील हिंदुलोक म्हणतात. व फेजाबाद असें मुसलमानलोक ह्मणतात. या प्रदेशास कोसलदेश अशी संज्ञा आहे. या कोसल प्रदेशाची मुख्य राजधानी अयोध्या क्षेत्र होय. या क्षेत्रीं नदी सरयू ही असून तींत मुख्य तीर्थ स्वर्गद्वार ह्मणून आहे. मुंडन, श्राद्ध, वगैरे सर्व कर्म या तीर्थी होतें. अवतार चरित्र समाप्त

तीर्थ.

झाल्यावर रामचंद्र वैकुंठास जाऊं लागले, तेव्हां त्यांनीं अयोध्येंतील सर्व जनांस आज्ञा केली कीं ज्यांची स्वर्गास जाण्याची इच्छा असेल त्यांनीं सरयू तीर्थीं स्नान करावें. तेव्हां सर्व प्रजांनीं सरयूतीर्थीं स्नान करून विमानारूढ होतसाता,त्या स्वर्गास गेल्या.म्हणून या तीर्थास स्वर्गद्वार संज्ञा झाली, अशी अयोध्या माहात्म्यांत कथा आहे. या क्षेत्रीं मुख्य स्थान हनुमानगढी म्हणून आहे. ही लहान टेकडी सारखी जागा असून तिजवर जाण्यास पायऱ्या बांधिल्या आहेत. वर मारुतीचें स्थान अप्रतिम आहे! त्या ठिकाणीं बैरागी लोक बहुत असतात. त्यांचा निर्वाह तिकडील राजे व जमीनदार या लोकांकडून उत्तम चालतो. या गढीबद्दल मुसलमान व हिंदु यांमध्यें शके १७६७ सालीं मोठा तंठा होऊन शेंवटीं कितीएक लढाया झाल्या. त्यांत उभय पक्षीं शेकडों लोक मारले गेले. या तंट्यामुळें इंग्रेजी प्रजेस कदाचित उपद्रव होईल असें त्या वेळचे गवरनरजनरल यांस वाटून त्यांनीं या तंट्याचा बंदोबस्त अमुक एक मुदतींत करावा ह्मणून त्या वेळचे रेसिडेंट कर्नल औटराम यांचे मार्फत लखनौचे नवाबास सक्त ताकीद लिहून पाठविली. परंतु त्याजकडून नमलेले मुदतींत तसा बंदोबस्त झाला नाहीं ! या शिवाय इंग्रेजसरकारचे मनांत ह्या नवाबाचें हें राज्य खालसा करणेंच वाजवी आहे, असें कित्येक कारणांनीं वाटल्यावरून तोच विचार कायम ठरला. तेव्हां त्याप्रमाणें गवर्नर जनरल साहेब यांनीं तें राज्य त्याच सालीं इंग्रेजी राज्यास जोडिलें.

हनुमानगढी.

अयोध्या क्षेत्रीं मुख्य स्थान रामजन्माची जागा. तिजवर मुसलमानांनीं मसिद बांधिली आहे ! या क्षेत्रीं सप्तहरींचीं ( वेग वेगळे सातहरी यांचीं ) स्थानें प्रसिद्ध आहेत. त्यांचीं नांवें चक्रहरी, गुप्तहरी, इत्यादिक आहेत. शिवस्थान नागेश्वरमाहादेव आहे, व तेथें बैरागी लोकांचे ठाकुरद्वारें फार आहेत. या क्षेत्राच्या पश्चिमेस घरघर ( घागरा ) नांवाचा नद थोड्या अंतरावर आहे. तेथील बाजारांत

रामजन्म स्थान.

पायांत घालण्याच्या लांकडी खडावा फार चांगल्या मिळतात. चैत्र मासीं रामनवमीस त्या प्रांतीची बहुत यात्रा एथें जमत असतें. येथें बहुतेक वस्ती तद्देशीय ब्राह्मणांचीच आहे. परशुरामबावा रामदासी म्हणून एक दक्षिणी ब्राह्मण मोठे सिद्ध असत. त्याच्या आश्रयाने थोडे दक्षिणी ब्राह्मण ही अद्यापि तेथे राहत आहेत. या स्थलीं माकडें व वानरें बहुत आहेत. त्यांचा तेथील लोकांस फार उपद्रव सोसावा लागतो! यात्रेकरी लोक वानरांस व माकडांस पुष्कळ खाण्यास घालितात! सरयूस फार मोठाले घाट प्राचीन काळीं बांधिलेले आहेत, सरयुचा ओघ काशीस भागीरथी आहे तेवढा आहे. सीतेचा त्याग केल्यावर सुवर्णाची सीतेची मूर्ति करून रामचंद्रांनीं अश्वमेध यज्ञ केला. ती सुवर्णाची मूर्ति अद्याप या क्षेत्रीं आहे. असें सांगतात. याशिवाय आणखी स्थानें व देवता आहेत त्यांपैकीं कांहीं पुढें लिहितोः—

सरयूनदी.

१ पंचतीर्थीयात्रा.
२ सहस्रधारा.
३ स्वर्गद्वार.
४ नागेश्वरघाट.
५ धर्महारिघाट.
६ रामघाट.
७ विद्याकुंडतीर्थ.
८ क्षीरसागरतीर्थ.
९ चक्रतीर्थ.
१० तिलोत्तमातीर्थ.
११ सुवर्णकुंडतीर्थ.
१२ रामकुंडतीर्थ.
१३ कौसल्याकुंडतीर्थ.
१४ सुमित्राकुंडतीर्थ.
१५ सुग्रीवकुंडतीर्थ.
१६ हनुमत्कुंडतीर्थ.
१७ सीताकुंडतीर्थ.
१८ गणेशकुंडतीर्थ.
१९ ब्रह्मकुंडतीर्थ.
२० सूर्यकुंडतीर्थ.
२१ भरतकुंडतीर्थ.
२२ वामदेवकुंडतीर्थ.
२३ पिशाचमोचनतीर्थ.
२४ पापमोचनतीर्थ.
२५ ऋणमोचनतीर्थ.
२६ निर्मलकुंडतीर्थ.
२७ शरयू आणि ब्रम्हपुत्र घरघर नद यांचा संगम झाला आहे.हे मुख्य तीर्थ आहे. [ यास घागरानद ह्मणतात. ]

२८ मनोरमातीर्थ.
२९ रामरेखास्थान.
३० अगस्तीकुंडतीर्थ.
३१ बृहस्पतिकुंडतीर्थ.
३२ हनुमत्स्थान.
३३ रामप्रसादस्थान.
३४ केकेयीमंदिरस्थान.
३५ सुमित्रामंदिरस्थान.
३६ जन्मस्थान.
३७ वसिष्ठकुंडतीर्थ.
३८ कनकसिंहासनस्थान.
३९ रत्नसिंहासनस्थान.
४० सुग्रीवशिला.
४१ लक्ष्मणघाटी, लक्ष्मणतीर्थ.
४२ नागेश्वरमहादेव.

तमसानदी नंदीग्राम.

अयोध्या क्षेत्रातील यात्राविधि करून रघुनाथराव हे तमसा नदीचे स्नानास गेले. नंतर तेथून नंदीग्रामास आले. तेथें एक मोठें सरोवर आहे. त्या स्थलीं भरतानें दशरथाची क्रिया केली. रामचंद्र वनांत गेल्यावर अयोध्येस न जातां भरतानें या नंदीग्रामींच राहून राज्य चालविलें. तेथून रघुनाथराव हे अनुपशहर मार्गे प्रयाग क्षेत्रीं आले. प्रयाग शहरास मुसलमान लोक अलाहाबाद असें म्हणतात.

प्रयाग.

प्रयाग क्षेत्रीं भागीरथी, यमुना, आणि सरस्वती याचा संगम आहे, त्या स्थानास त्रिवेणी ह्मणतात. त्या त्रिवेणीच्या सन्निध मोठाली गवताची छपरें घालून बरोबरच्या मंडळीसुद्धां रघुनाथराव यांस राहाण्याच्या उपयोगी अशी एक सोयकर जागा पूर्वींच तयार करून ठेविली होती. तेथें त्यानीं जाऊन मुकाम केला. प्रयागास मुख्य स्थानें आहेत तीं:— त्रिवेणी, माधव, सोमेश्वर, भारद्वाजेश्वर, वासुकीश्वर, अक्षय्यवट, शेष, प्रयाग, वेणीमाधव, भागीरथी, सरस्वती, यमुना, हीं मुख्य स्थानें असून भागीरथींत व यमुनेंत पुष्कळ तीर्थें क्षेत्रमाहात्म्यांत वर्णिलीं आहेत. या क्षेत्रीं मुंडन प्रधान आहे. जीवत्पितृकांनीं देखिल मुंडन करावें असा विधि आहे, सौभाग्यवती स्त्रियानीं केशाचा कांहीं भाग काढून त्रिवेणीतीर्थास अर्पण करावा लागतो. यासच वेणीदान

त्रिवेणीमाधसोमेश्वरइत्यादिस्थानें.

टीप. १ ॥त्रिवेणींमाधवंसोमंभारद्वाजंचवासुकिं ॥
॥ वंदेक्षय्यवटंशेषंप्रयागंतीर्थनायकं ॥१॥ ( अर्थ स्पष्ट )

असें ह्मणतात. द्रवीडदेशांतील सौभाग्यवतीस्त्रिया नर सर्व केशकाढतात! प्रतिवर्षीं मकरराशीस सूर्यप्राप्त झाला असतां येथें मोठा मेळा भरतो. ती यात्रा एक मास पर्यंत रहाते. बैरागी लोकांचे थवे ठिकठिकाणीं उतरतात. त्यांचे ठाकुरद्वारे शेंकडों असतात. या लोकांस तिकडील राजे रजवाडे यांजकडून नेमणूका केलेल्या आहेत. त्या नेमणूकांत थंडीचे निवारणार्थ लांकडे लागतात त्यांचा व पोटगीचा खर्च उत्तम प्रकारें चालतो! यमुनेचे पलीकडे वेणीमाधवाचें स्थान आहे. त्या देवाचें मंदिर रघुनाथराव यांचे पूर्वज शिवाजीविठ्ठल यांनीं बांधिलें आहे. मकरमास प्राप्त झाला ह्मणजे एक जातीचे शुभ्र पक्षी आहेत, तसे पक्षी भरतखंडांत दुसरे ठिकाणीं कोठें पहाण्यांत येत नाहींत. ते पक्षी सूर्योदय समयीं संगमांत बुड्या मारतात त्यांस इकडील लोक पांढरेकावळे असें म्हणतात. परंतु त्यांचा आकार कावळ्यासारखा नसतो. कावळ्यापेक्षां हे पक्षी आकारानें मोठे असतात. त्यांस गळ्याखालीं गाईस जशी कांबळ असते तसें मांस असतें. अशा तऱ्हेचे पक्षी पूर्वकालीं फार येत होते! अलीकडे थोडे येतात! असें तेथील लोक सांगतात. परंतु रघूनाथराव यांनीं असे प्रकारचे चार पक्षी येऊन संगमांत बुड्या मारीत असतांनां प्रत्यक्ष पाहिले! अक्षय्यवट हें स्थान प्रयाग एथील किल्यांत आहे. तेथें दर्शनास जावें लागतें. त्या वटाचें खोड मात्र आतां शेष राहिलें आहे! मकरमासीं प्रातःस्नानाचे मोठें माहात्म्य असल्यामुळें सूर्योदयीं हजारो लोक त्रिवेणीतीर्थावर स्नानास येतात. समग्र मकर होई पर्यंत त्या क्षेत्रीं राहून रघुनाथराव यांनीं प्रत्यहीं त्रिवेणीस्नान केलें. किल्याचे समीप सरस्वतीचें कुंड आहे. भागीरथींत दशाश्वमेध नामें तीर्थ आहे. तेथें ब्रह्मदेवांनीं दहा अश्वमेध केले! वेणी सन्निध तारागंज ह्मणून बराच वस्तीचा गांव आहे. कीटगंज ह्मणून जो गांव तो फार मोठा आहे. प्रयागाचे माजिस्त्रेट यांस रघुनाथराव यां विषयीं पुण्याचे एजंटाकडून लिहून गेलें होतें. सबब त्यांकडून दोन चपरासी रघुनाथराव यांचे तैनातीस

[margin notes: ...माधव. / ...य्यवट. / ...श्वमेध तीर्थ. / ...गंज. / ...गंज.]

आले होते. त्यामुळें त्यांस कोणतीही अडचण पडली नाहीं! या क्षेत्रीं तिलहोमाचें फार माहात्म्य सांगितलें आहे. यात्रेकरी आपले शक्ती प्रमाणें लक्ष होम अयुत होम (दहा हजारांचा होम), निदान एक सहस्र होम तरी करितात. प्रयाग क्षेत्राचें माहात्म्य अतिशय आहे. पूर्वीं ब्रह्मदेवानें एके पारड्यांत पृथ्वींतील सर्व तीर्थे व दुसरे पारड्यांत प्रयागतीर्थ घालून तुला केली म्हणजे वजन केलें तेव्हां प्रयागतीर्थाचे पारडें खालीं बसून इतर तीर्थांचें पारडें वर गेलें! अशी तुला झाल्यावर ब्रह्मदेवानें सर्व तीर्थांचें स्वामित्व प्रयागास देऊन त्यास तीर्थराज हें नांव ठेविलें. असें पुराणांत वर्णन आहे. या क्षेत्राचे श्रेष्ठत्वा विषयीं श्रुति स्मृति पुराणें हीं प्रमाण आहेत.[1]

प्रयागमाहात्म्य.

प्रयागतीर्थीं संगम एकच जागीं राहतो असें नाहीं. आज ज्या ठिकाणीं तो असेल, त्यापासून दुसरेच दिवशीं कांहीं अंतरावर असतो! ज्या ठिकाणीं काल स्नान केलें, त्या ठिकाणीं आज अगाध पाणी होतें! दुसरे ठिकाणीं अगदीं कमी होतें! चारचार घटकेंत देखिल फेरफार दृष्टीस येतो! कधीं गंगेचा प्रवाह जोराचा होऊन दीड दीड कोस यमुनेचें पाणी मागें हटत जाऊन गंगा वाढत जाते! कधीं गंगा मागें हटून यमुना वाढते! असा चमत्कार कोठें पहाण्यांत येत नाहीं! त्या ठिकाणीं दगडी घाट नसण्याचें हेंच कारण आहे! घाट्ये लोक संगमीं मोठाले तक्के व चौरंग मांडितात. संगमीं स्नान करून संध्या वगैरे कर्म त्यावर बसून करावें अशी रीत आहे. मकरमासीं संगम प्रदेशांत शेंकडों मोठाले ध्वज असतात. मोठ्या दाटींत ध्वजाचे खुणेनें आपला तक्का अगर चौरंग ओळखूं येतो. यात्रेकरी गंगेस ध्वजा अर्पितात. त्यावर ते

---

टीप १ — श्रुतिःप्रमाणंस्मृतयःप्रमाणं,पुराणमप्यत्रपरंप्रमाणं॥
यत्रैवगंगायमुनासरस्वती,सतीर्थराजोजयतिप्रयागः ॥ १॥

भावार्थ—जेथें गंगा यमुना आणि सरस्वती या नद्यांचा संगम झाला आहे, तो सकल तीर्थांचा राजा असा प्रयाग होय. या विषयीं श्रुति स्मृति आणि पुराणें हीं प्रमाण आहेत.

आपली खूण करितात. रघुनाथराव यांनीं मोठा चौरंग व ध्वज वेणीतीरीं अर्पण केला. ज्या समयीं रघुनाथराव हे प्रयागास आले, त्याच संधीस बाळाजीपंतनातु हे खटल्यासुद्धां तेथें यात्रेस आले होते. त्यास रघुनाथराव हे प्रयागास आल्याची खबर समजतांच ते त्यांच्या भेटीस आले.

ळाजीपंत ातूयांचीभेट

पूर्वी या क्षेत्रीं वेणीस्नानास व वेणीदानास सरकारी कर होता. परंतु कांहीं वर्षांपूर्वी तो कर इंग्रेजसरकारानें माफ केला! प्राचीन काळीं प्रयागवळ, गंगापुत्र व गयावळ हे यात्रेकरांस फार त्रासवून त्यांपासून शक्तीपेक्षां जास्त कर घेत असत! त्या करास स्वारी संबंधी कर असें नांव होतें. यामुळें गरीब यात्रेकरी लोकांस फार पीडा होई! रघुनाथरावांचे पूर्वज शिवाजीविठ्ठल हे त्रिस्थली यात्रेस आले होते, त्या वेळीं तिन्ही क्षेत्रीं जुलमानें कर घेण्याची अनीति पाहून त्यांनीं नेम ठरविला कीं, दर स्वारीस म्हणजे घोडें, माणूस व घोड्यावर बसणारा या पासून पंधरा रुपये घेत जावें. याप्रमाणें तिन्ही क्षेत्रीं बहुत वर्षें क्रम चालला. हल्लीं तोही प्रकार इंग्रेज सरकारांनीं सर्व बंद करून मर्जी असेल तें त्यांनीं द्यावें असें ठरविलें! विंचुरापासून प्रयागवळ व गंगापुत्र यांचे गुमास्ते रघुनाथराव यांजबरोबर असून त्यांचा सर्व वाटखर्च रघुनाथराव यांकडून त्यांस मिळत असे.

प्रथम त्रिवेणी दर्शन होतांच रघुनाथराव यांनीं गंगाभेट केली. व गंगेस अर्घ्य देऊन स्नानाचीं उत्तम सचील वस्त्रें प्रयागवळास दिलीं. गंगातीरीं पूर्वांग उत्तरांगसहीत द्वादशाद्ब प्रायश्चित करून दशदानें व गोदानें दिलीं. ते दिवशीं रघुनाथराव यांनीं व्रत ग्रहण करून उपोषण केलें. दुसरे दिवशीं तीर्थश्राद्ध केलें. गंगाभेट, सचिलवस्त्रें व प्रायश्चिताचे तीन चतुर्थांश आणि पिंडाची दक्षणा, इतका विषय प्रयागवळ घेतात. त्याप्रमाणें रघुनाथराव यांजकडील त्यांनींच घेतला. रघुनाथराव यांनीं एक मास पर्यंत प्रत्यहीं पंचवीस ब्राह्मणांस पक्कान्नाचें भोजन घातलें. तिळांचा लक्ष होम केला.

प्रयाग क्षेत्रीं वेणी दानाचें अतिशय माहात्म्य आहे. पतीचे मां-डीवर मस्तक ठेवून त्यानें स्वतः सहाबोटें पत्नीची वेणी कापून ती डोक्याचे व वेणीचे अलंकारासहीत वंशपात्रांत (सुपांत) ठेवून शिवाय वस्त्रें, नारळ वगैरे सौभाग्य पदार्थ त्यांत घालून त्रिवेणीस तें वायन द्यावें. नंतर मोठ्या वाद्यघोषानें उभयतां स्त्रीपुरुषांनीं आपले घरीं जावें! हा त्या क्षेत्रीं मोठा उत्सव असतो! दैवयोगानें तें कृत्य रघुनाथराव यांस पत्नी नसल्यामुळें त्या वेळेस घडलें नाहीं! व या पुढें ही तें घडेल अशी आशा राहिली नाहीं! भगवत्संकेतापुढें कोणाचा उपाय चालत नाहीं! असो!

रघुनाथराव यांनीं त्रिवेणीची महापूजा केली. त्या संबंधीं बराच विषय प्रयागवळास मिळाला. शेवटीं प्रयागवळाची पूजा केली. तेव्हां त्यांनीं किनखाबीअंगरखा, विजार, शेला, पागोटें, धोतरजोडा, हीं वस्त्रें मोठ्या किमतीचीं देऊन एक उत्तम घोडा दान दिला! त्या घोड्यावर त्यास बसवून वाद्यघोष सहीत घरीं पोंहचतें केलें! तेथील सर्व देवदर्शनें झाल्यावर शेवटीं ब्राह्मणभोजन करून रघुनाथराव हे विंध्याचल नामें पर्वतीं विंध्यवासिनी देवी आहे, तिचे दर्शनास्तव प्रयागाहून निघून तिकडेस चालते झाले. विंध्यवासिनी

विंध्यवासिनी हें स्थान विंध्याचलावर आहे. त्या ठिकाणीं पर्वत फारसा उंच नाहीं, सपाटच आहे. हें स्थान फार प्राचीन व पुराणांत मोठे वर्णिलेलें आहे. या देवी विषयीं कथा आहे ती अशीः—

यशोदेचे उदरीं महामायेस अवतार घेण्यास सांगून विष्णु हे देवकीचे उदरीं प्रवेश करिते झाले. तेव्हां वसुदेव व देवकी हीं कंसाचे बंदीशाळेंत होतीं तेथें श्रीकृष्णरूपानें विष्णु प्रगट झाले. तें त्यांचें अपूर्व व मनोहर रूप पाहून वसुदेवास कंसापासून भीति प्राप्त झाली तेव्हां त्यानें विष्णुची स्तुति केली. त्या वेळेस विष्णुनीं सांगितलें कीं, " गोकुळास यशोदा प्रसूत होऊन तिला कन्या झाली आहे. त्या स्थानीं मला नेऊन ठेऊन ती कन्या येथें आणावी. " त्याप्रमाणें

वसुदेवानें केलें. नंतर कंसास देवकी प्रसूत झाल्याचें वर्तमान समजलें. तेव्हां त्यानें त्या स्थळीं त्वरेनें येऊन त्या कन्येस हातांनीं धरून शिळेवर आपटतांच ती त्याचे हातांतून सुटून दिव्य देहानें आकाशांत गेली! आणि तिनें तेथून कंसास भाषण केलें कीं, " तुझा शत्रु पृथ्वीवर वाढत आहे! " असें बोलून ती विष्णुमाया विंध्याचलीं येऊन वास करिती झाली.

महाकाली. महासरस्वती. त्रिकोणतीर्थ.

या स्थळीं महासरस्वतीचें स्थान असून कांहीं अंतरावर महाकालीचें ही स्थान आहे. तेथील प्रदक्षिणा दीड किंवा दोन कोसांची आहे. तीस त्रिकोण यात्रा म्हणतात. तेथें त्रिकोण नामें तीर्थ आहे. विंध्यवासिनीस बंगाली लोक फार भजतात. नवरात्रांत तेथें मोठी यात्रा भरते, व हजारों पशूंचा वध होतो. देवीचे पूजक तद्देशी ब्राह्मण आहेत, त्यांस पंडे म्हणतात. तो गांव बराच मोठा आहे. येथें मुख्य तीर्थ गंगा असून या ठिकाणचें मोठें माहात्म्य वर्णिलें आहे. त्या स्थानीं श्राद्ध व पिंडदान करण्याचें मोठें फल सांगितलें आहे. त्याप्रमाणें श्राद्ध पिंडदान व देवीची महापूजा वगैरे करून रघुनाथराव हे येथून पुढें चालते झाले.

मिर्झापुर.

मार्गांत मिर्झापुर शहर आहे, तें त्यांस लागलें. हें शहर जगन्नाथराय पंडित ज्यांस पंडितराय असें ह्मणतात, त्यांचें जन्मस्थान होय! पंडितराय यांनीं एक यवन स्त्री जवळ बाळगली होती, त्यामुळें ब्राम्हणांनीं त्यास बहिष्कार घातला. त्या वेळीं त्यांनीं काशींत भागीरथीतीरीं वीरेश्वरघाटीं बसून गंगालहरी नामक ५२ श्लोकांचें स्तोत्र करून भागीरथीची स्तुति केली. त्या काळीं प्रति श्लोकास भागीरथीनें एकेक पायरी चढून शेवटीं त्यांस,

---

१ टीप— ॥ श्लोक॥ जान्हवीसर्वत:पुण्या,ब्रह्महत्यानिवारिणी॥

॥ तत्रापिचविशेषेण,यत्रविंध्येनसंगता ॥ १ ॥

भावार्थ—भागीरथी सर्वत्र पुण्यकारक व ब्रह्महत्यापाप दूर करणारी आहे. परंतु त्यांत ही जेथें विंध्याचलाशीं संगत झाली आहे तेथें तर विशेष पुण्यकारक आहे.

त्यांनीं अंगिकारिलेल्या यवन स्त्रीसह आपले पोटांत घेतलें! ही क था सर्व प्रसिद्धच आहे! त्या जगन्नाथरायपंडितास बादशाहांनीं हें गांव इनाम दिलेलें होतें! ही मोठी पेंठ आहे. व त्या प्रांतीचा धान्या चा वगैरे व्यापार येथें चालतो. तेथून गोपीगंज मार्गे कासीक्षेत्राचे अतिसन्निध मनवाडी ह्मणून एक खेडें आहे, तेथें रघुनाथराव यांनीं येऊन मुक्काम केला. दुसरे दिवशीं स्नान करून त्यांनीं पादचारी का सीक्षेत्रांत प्रवेश केला. ते प्रथम चक्रपुष्करणी नामक तीर्थी आले. हें तीर्थ विष्णुनीं आपले चक्रानें निर्माण केलें. म्हणून यास चक्रपुष्क रिणी असें नांव प्राप्त झालें आहे. तेथें तीर्थभेट व अर्घ्य देऊन व सचिलस्नान करून त्यांनीं गंगापुत्रास पोषाख दिला. व विंचुरापासू न प्रवासांत बसण्याकरितां जो म्याना बरोबर आणिला होता, त्यां त गंगापुत्रास बसविलें. आणि दक्षिणा देऊन घरीं पावतें केलें! गं- गापुत्र हे चक्रपुष्करणी वरील भेट व अर्घ्य आणि सचील वस्त्रें हीं घे तात. या पुढें त्यांचा कांहीं संबंध नाहीं. नंतर मणीकर्णिकेचे तीरीं पूर्वांग उत्तरांग सहीत द्वादशाद्व प्रायश्चित करून रघुनाथराव यांचे पूर्वज शिवाजीविठ्ठल यांणीं पंचगंगाघाटीं बिंदुमाधव महादेवाजव- ळ वाडा बांधिला आहे, तेथें जाऊन ते राहिले. ते दिवशीं त्यांनीं तीर्थ संबंधी उपोषण केलें. दुसरे दिवशीं तीर्थश्राद्ध करून त्यांनीं पिंडदान केलें. तेव्हां गोदानाचा संकल्प करून पिंडावर शालजोडी घातली. ती संकल्पित गाई सुद्धां तेथील उपाध्यास दिली. नंतर वि श्वेश्वरादि देवतांचीं दर्शनें करून कालभैरव प्रीत्यर्थ ब्राह्मण व सु- वासिनी यांस भोजन घातलें. पुढें पंचतीर्थी यात्रा केली. या यात्रें- त पांच श्राद्धें करावीं लागतात. बहुतेक यात्रेकरी एकाच दिवसांत पांच ठिकाणीं पिंडदानें मात्र करतात. परंतु रघुनाथराव यांनीं पांच दिवस क्रमानें पांच ठिकाणीं हस्तश्राद्धें केलीं. तो क्रम असा:— प हिले दिवशीं प्रात:काळीं पंचगंगेंत स्नान करून नंतर मध्यान्हीं मणि कर्णीकेचें स्नान करून असी संगमीं स्नान केलें. नंतर श्राद्ध व भोज

मनवाडी.

काशीक्षेत्र चक्रपुष्करिणी तीर्थ.

पंचतीर्थी यात्रा.

न करून घरीं आले. दुसरे दिवशीं दशाश्वमेध तीर्थीं स्नान करून शूलटंकेश्वर महादेवा समीप श्राद्ध केलें. तिसरे दिवशीं वरुणा संगमीं स्नान करून संगमेश्वर महादेवाचे सन्निध श्राद्ध केलें. चौथें दिवशीं प्रल्हादघाटीं स्नान करून पंचगंगा तीर्थीं स्नान व तर्पण करून श्राद्ध केलें. पांचवे दिवशीं मणिकर्णिका तीर्थीं स्नान करून श्राद्ध केलें. या प्रमाणें पंचतीर्थी यात्रा केल्यावर पुढें रघुनाथराव यांस महाशिवरात्री काशीक्षेत्रीं प्राप्त झाली. तेव्हां मोठ्या संतोषानें विश्वेश्वरादि देवतांची पूजा करून ते दिवशीं [ महाशिवरात्रीस ] कृत्तिवासेश्वर महादेवाच्या दर्शनाचें मोठें माहात्म्य आहे, त्याचें त्यांनीं दर्शन घेतलें.

मणिकर्णिकेंत अस्थिप्रक्षेप.

नंतर तीर्थरूपांच्या अस्थी बरोबर आणिल्या होत्या, त्यांचा त्यांनीं योग्य दिवस पाहून त्या दिवशीं विधिपूर्वक मणिकर्णिकेंत प्रक्षेप केला

रघुनाथराव यांचा काशींत असतां नित्यक्रम.

प्रतिदिवशीं प्रातःकालीं रघुनाथराव यांनीं पंचगंगेचें स्नान करून संध्यादि कृत्य आटोपल्यावर आठवले यांचे मठांत जावें, आणि तेथें वासुदेवस्वामी ह्मणून मोठे विद्वान संन्यासी होते; ते उपनिषदांचें भाष्य सांगत असत, तें भाष्य श्रवण करण्यास बसावें. भाष्य श्रवण झाल्यावर घरीं येऊन मणिकर्णिकेचें स्नानास जावें. तेथें स्नान झाल्यावर गभस्तीश्वर व मणिकर्णिकेश्वर यांची पूजा करून घरीं यावें, नंतर कांहीं सन्यासी व ब्राह्मण पंक्तीस घेऊन भोजन करावें. काशींत सन्यासी व विद्यार्थी वगैरे भिक्षेकरी लोकांचा मोठाच समुदाय असल्यामुळें प्रत्येक घरीं भीक्षा थोडी मिळते, या करितां भिक्षेकऱ्यांस बहुत घरें फिरावीं लागतात. ह्मणून त्यांस ज्यास्त भीक्षा व कालवण देण्याचा रघुनाथराव यांनीं पाठ ठेविला होता. असो. जे दिवशीं भाष्य श्रवणाचा अनध्याय असेल, ते दिवशीं बहुत करून नित्य यात्रेस किंवा दशाश्वमेधी पंडितस्वामी रहात असत, त्यांचे दर्शनास जावें. तिसरे प्रहरीं भैरवाचें दर्शन घेऊन अवकाश असल्यास वृद्धकाल महादेवाचे दर्शनास जाऊन तेथें कूप आहे, त्याचें उदकपान करावें अस्तमानाचे संधीस पंचगंगेवर सायंसंध्या क

रून घरीं जावें. असा रघुनाथराव यांचा काशींत असतां नित्य क्रम होता.

वृद्धकाल कूपाविषयीं अशी कथा आहे कीं, सर्व देव व ऋषी यांनीं पृथ्वींतील संपूर्ण औषधी ऐकत्र करून त्या कूपांत टाकिल्या. यास्तव तेथील उदक सर्व रोग नाशक झालें. या स्थलीं कुष्टी वगैरे महारोगी कांहीं दिवस राहून त्या कूपाचें उदकपान केलें असतां बरे होतात. तूर्त प्रत्यक्ष अनुभव असा सांगतात कीं, त्या कूपाचे उदक पान केलें असतां शौचास साफ होऊन पोटांत वायु रहात नाहीं. अजीर्ण झालें असलें तर तें पाणी प्याले असतां तें नाहींसें होतें! पाणी मात्र क्षारयुक्त असून त्यास कांहीं तऱ्हेचाच स्वाद आहे!

वृद्धकालकू

या संधीस गोविंदबावा अम्मळनेरकर ह्मणून मोठे भगवद्भक्त काशीस आले होते. त्यांस रघुनाथराव यांनीं भोजनास बोलाविलें. आणि त्यांची पूजा करून त्यांचा उत्तम सत्कार केला. घरीं एक दिवस रात्रीं त्यांचें भजन केलें; तेव्हां त्यांनीं मागितल्यावरून रघुनाथराव यांनीं त्यास ओझ्याकरितां स्वारी बरोबरील एक उंट दिला.

गोविंदबावा अंमळनेरकर यांची भेट.

बाबाआपटे हे सिंद्याचे पदरचे नामांकित गृहस्थ होते. ते त्या समयीं काशीस असल्यामुळें त्यांच्याशी रघुनाथराव यांचा विशेष परीचय झाला. त्यांस घाड्यावर बसण्याचा बहुत शोक असल्यामुळें रघुनाथराव हे त्यांजबरोबर घोड्यावर बसून कधीं कधीं बाहेर फिरावयास जात असत. प्रत्यहीं बाबाआपटे सायंसंध्या करून रघुनाथराव यांच्या भेटीस येत असत. चिमाजीआपा साहेब पेशवे बहुत दिवस काशीस होते. त्यांचे पदरची मंडळी त्या वेळीं काशींत फार होती. ही मंडळी कधीं कधीं रघुनाथराव यांच्या भेटीस येई. शिवाय क्षेत्रस्थापैकीं भट्टांचे वंशातील जयरामभट्ट, काशीनाथशास्त्री अष्टपुत्रे वैयाकरण, गणेशशास्त्री हारडीकर नैय्यायिक, सोनभट्ट भुसकुटे वैदिक, अशी विद्वान् मंडळी कधीं कधीं रघुनाथराव यांच्या भेटीस येत असे. स्वतः रघुनाथराव हे रामचंद्रशास्त्री सालापुरकर व

बाबाआपटयांची भेट.

काकारामपंडित यांचे घरीं कधीं कधीं जात असत. काशी क्षेत्रांत भट्ट, शेष, व धर्माधिकारी, अशीं तीन घराणीं आदि व सर्वांस पूज्य अशीं आहेत. त्यांत धर्माधिकारी हे विंचुरकरांचे पुरोहीत होत. त्यांचे वंशांत ते वेळेस आत्मारामभट्ट ह्मणून होते. त्यांस पंडीतजी असें ह्मणत असत. काशी येथें जशी उपाद्धीकासंबंधीं रीत आहे, तसी दुसऱ्या कोणत्याही क्षेत्रीं नाहीं. येथें उपाद्धे सांगतील तो गवळी, उपाध्ये सांगतील तो तांबोळी, याप्रमाणेंच परीट, शिंपी, उचापतवाला, कापडवाला, हे ही उपाध्ये सांगतील तेच केले पाहिजेत. त्यांवर उपाध्याचा कर असतो. आपले कुलउपाद्धे बरोबर असले तरी त्यांचा तेथील कोणतेही धर्मकृत्यांत संबंध नाहीं, अशी या काशीक्षेत्रीं चमत्कारिक रीत चालत आहे.

रघुनाथराव हे काशींत असतांच शिमग्याचा सण प्राप्त झाला. काशींत शिमगा फाल्गुन शुद्ध ११ स सुरू होऊन कधीं बारा दिवस कधीं पंधरा वीस दिवस पर्यंतही असतो. कारण रंगपंचमी झाल्यावर प्रथम जो मंगळवार येईल त्या मंगळवारीं रात्रीं तेथें बुढ्या मंगल ह्मणून एक मोठा उत्सव होतो. शिमग्यांत दक्षिणेंतील लोक एकमेकांचे अंगावर धूळ उडवून चिखल व मोऱ्यांचें पाणी किंबहुना शौचकूपांतील मलमूत्र ही टाकितात! त्याप्रमाणें काशींत घाणेरी व मुर्खपणाची चाल बिलकुल नाहीं! तेथें संपूर्ण शहरभर नाच, रंग भांडाचेतमाशे, व गवयांचींगाणीं हींच चालू असतात. गाणाऱ्या कळवंतिणी आपआपल्या बसण्याच्या माड्यांत रोषनाई करून गात बसतात. तें गाणें ऐकण्यास हजारों तमासगीर रस्त्यानें फिरतात. व रंगपंचमीच्या दिवशीं एकमेकाचे अंगावर रंग व गुलाल टाकितात! रंगपंचमी झाल्यावर प्रथम मंगलवारीं बुढ्ढामंगल होतो. त्याचे उत्सवा करितां पूर्वी महिना दोन महिने तेथील शेटसावकार व श्रीमान् लोक हे गुलाल गोटे तयार करविणें, व नावा रंगवून त्यांची डागडुजी करणें, व कलवंतिणीचे चांगले गाणारे ताफे बाहेरून आणविणें,

किंवा शहरांतील कंचन्यांबरोबर करार करून ठरणें, वगैरे गोष्टी चा लवितात. त्या उत्सवाचे दिवशीं रात्र पडतांच राजघाटापासून तों असीनदी संगमापर्यंत संपूर्ण घाटांवर हलवाई, तांबोळी, हुक्केवाले, गुडाखुवाले, गांजेवाले, मेवेवाले, व आतार यांचीं दुकानें पालें लावून बसतात. श्रीमान् लोक चतुःषष्टी योगीनीचे यात्रे निमित्त देवीचे दर्शनास जाण्यास्तव गंगेंत दोन दोन नावा जोडून, त्यांचे पाट.ई.र बैठक घालून, हांड्या लावून व मंडळी जमवून नाचाकरितां कलवंतीणीचे ताफे उभे करितात! रात्रीं आठ वाजण्याचे सुमारास सर्व लोकांच्या नावा पंचगंगेवर भागीरथीचे पात्रांत जमा होतात. त्यामध्यें रामनगरचे (व्यास कासी येथील) राजेही वीस पंचवीस जोडलेल्या नावांत मंडळी बसवून व नाच उभे करून तेथें येतात! त्या नावांस "बजडे" असें ह्मणतात. त्या प्रसंगीं त्यांची एकंदर संख्या शंभर सवाशें असते. नंतर त्या सर्व नावा हळू हळू वल्हीं मारीत व्यास काशी पर्यंत नेतात. पुष्कळ नावा जमल्या म्हणजे त्यांतून नाच होत असतां एके नावेंतील लोक दुसरे नावेंतील लोकांस गुलाल गोंट मारितात. हा व्यवहार परस्परें घडतो. हा अपूर्व तमाशा गंगेचे किनाऱ्यावरून हजारों तमासगीर पहात राहातात. व फार जवळून पहाण्याकरितां शेकडों लोक भाड्याच्या नावा करून त्यांत बसून गंगेचे पात्रांत फिरतात! शिवाय हलवाई, तांबोळी, मेवेवाले, गुलालवाले, आतार, गुडाखुवाले, गांजेवाले, व भांगेचाघोटा विकणारे, हे आपल्या नावा आपापले सवदे विकण्या करितां गंगेचे पात्रांत फिरवीत रहातात! याप्रमाणें संपूर्ण रात्रभर क्रम चालून पहांटेस त्या सर्व नावा व्यास काशीस परत जातात. उजाडल्यावर काहीं नावांतील लोक मर्जी प्रमाणें गंगेचे पैलतीरास उतरून शौचविधि स्नानें व फराळ करून पुन्हां नावेंत बसून फिरतात! काहीं नावांतील लोक तेथून आपल्या नावा मागें फिरवून आपल्या घाटावर परत येतात. आणि खालीं उतरून घरोघर जातात. काशीं क्षेत्रीं हा तमाशा पहाण्यासारखा व

चमत्कारीक आहे. तसा इतर कोठें ही होत नसेल. तो पाहून मनास फार करमणूक होते!

दंगल बुढ्यामंगलाचे तिसरे रात्रीं काशी शहरांत फिरण्याचा एक मेळा होतो. त्यास "दंगल" असें ह्मणतात. त्या रोजीं रात्रीं आठ वाजल्यावर दहा दहा पांच पांच लोकांचे मेळे आपल्या बरोबर भगवे पोषाख केलेले असे सारंगीवाले, तबलेवाले व गाणारे यांस घेऊन काशीचे रस्त्यांतून थव्या थव्यांनीं फिरतात. आणि ते थवे जागोजाग कांहीं वेळ पर्यंत उभे राहून एक दोन चिजा गातात. त्या गाणाऱ्यांच्या टोळ्या पहाण्याकरितां हजारों लोक रस्त्यांतून फिरत असून हलवाई व मेवेवाले व तांबोळी व आतार व गुडाखूवाले वगैरे सवदागिरांचीं दुकानें दिवसाप्रमाणें आंत सवदा मांडलेलीं अशीं रात्रभर उघडीं असतात. याच प्रमाणें दंगलाचे दुसरे रात्रीं ही गाणाऱ्यांच्या टोळ्या व त्याच प्रमाणें तमासगिरांच्या टोळ्या फिरतात.

जंगल त्या रात्रीचे मेळ्यास "जंगल" असें ह्मणतात.

काशी क्षेत्रांत गाणाऱ्या कंचन्या व गवय्ये लोक पुष्कळ आहेत. त्यां शिवाय त्या शहरांत सावकारा मोठा आहे. व तेथील श्रीमान् लोक उदार मनाचे व हौशी व खर्चिक आहेत. रघुनाथराव काशीस गेले तेव्हां तेथें राजेंद्रबाबू ह्मणून एक मोठा बंगाली सावकार होता. या खेरीज दुसरे ही मोठ मोटे सावकार होते, पण त्यांची नावें स्मरणांत राहिली नाहींत. सावकार लोकांचे घरोघर शिमग्याचे सणा निमित्त दररोज रात्रीं गवई लोकांचीं गाणीं व कळवंतिणींचे नाच व भांडाचे तमासे होत असून त्या प्रसंगीं रोषनाई बहुत होऊन गुलाल ही फार उडविला जातो. अशा प्रकारचे हौशी लोक उत्तरहिंदुस्थानातील शहरांखेरीज विशेषें करून बनारस [ काशी ] शहराखेरीज इतर प्रदेशांत क्वचितच आढळतील, असें ह्मणतात.

उत्तरहिंदुस्थानांतील लोकांस गाण्याचा व वाद्यांचा मोठा शोक असून तिकडील शहरांतून गुणीजनही बहुत आहेत. प्रत्येक शहरांत

एक प्रकारचें विशेष गाणें असतें. त्यावरून त्या गाण्याबद्दल त्या शहराची आख्या पडून गेली आहे. त्या विषयांची माहिती उत्तरहिंदुस्थानातील शहरांत कांहीं वर्षें राहिल्याखेरीज पूर्ण रीतीनें होत नाहीं. परंतु गाणारे लोकांचे माहितीवरून असें समजतें कीं, काशी शहर हें टप्याबद्दल प्रख्यात आहे तसेंच लखनो शहर हें गजलाबद्दल, ग्वालेर हें ख्यालाबद्दल, दिल्ली हें धृपदाबद्दल, मथुरा हें होरीबद्दल, व लाहोर हें पंज्याबी टप्याबद्दल प्रख्यात आहे.

काशीक्षेत्रीं नित्य यात्रा शुद्ध चाळीस यात्रा मुख्य आहेत. त्यांतून प्रत्येक यात्रेचा संकल्प, यात्रा कशारीतीनें करावी तो प्रकार, यात्रेंत देवता व तीर्थें किती येतात, कोणती देवता कोणत्या ठिकाणीं आहे, यात्रेचें फल काय आहे, हे सर्व प्रकार आह्मी या ग्रंथाच्या शेवटीं स्वतंत्र पर्ण सविस्तर लिहून परिशिष्ट रूपानें जोडिले आहेत, त्यांवरून वाचकांच्या लक्षांत येईल.

ज्यास पंचक्रोशी यात्रा प्रथमच कर्तव्य आहे,त्यास यांतील कांहीं तीर्थश्राद्धं करावीं लागतात. तीं श्राद्धासहीत यात्रा करून नंतर गया यात्रेस जावें असा क्रम आहे. रघुनाथराव यांस मधुगया कर्तव्य होती. सबब त्यांनीं श्राद्धासहीत पंचक्रोशी यात्रा केली. तिचा क्रम पुढें सविस्तर लिहिला असल्यामुळें येथें तो संक्षेपानेंच लिहितों. काशी, वाराणसी, अविमुक्त, व अंतर्गृही, अशीं चारक्षेत्रें एकाचे आंत दुसरें अशारीतीनें आहेत. त्यांत प्रथम काशी, काशीचे आंत वाराणसी, वाराणसीचे आंत अविमुक्त आणि अविमुक्ताचे आंत अंतर्गृही असा क्रम आहे. या चार क्षेत्रांचा विस्तार उत्तरोत्तर कमी असून त्यांचा महिमा उत्तरोत्तर अधिक आहे. या चतुर्विध क्षेत्रांत जीं ज्ञात अज्ञात पातकं घडतात, त्यांच्या नाशार्थ ही पंचक्रोशी यात्रा सांगितली आहे.

---

टीप १ — ॥ श्लोक॥ अन्य क्षेत्रे कृतं पापं, पुण्यक्षेत्रे विनश्यति ॥

॥ पुण्यक्षेत्रे कृतं पापं, गंगातटे विनश्यति ॥१॥

**पंचक्रोशी यात्रा.** पंचक्रोशी यात्रा सोंवळ्यानें करावी लागते. मार्गांत भाषण न करितां शिवनाम स्मरण करावें. मध्यें शौचास गेलें असतां स्नान करावें. चालतांना उजवे बाजूस ह्मणजे काशीकडील प्रदेशांत मलमूत्र विसर्ग करूंनये, व थुंकीही टाकूंनये. मुक्कामीं गेल्यावर सोवळ्यांत असावें. निषीद्ध पदार्थ भक्षूं नये. अशा नेमानें यात्रा करावी लागते. पंचक्रोशींचे मार्गांत छायेकरितां दोन्ही बाजूंनीं वृक्ष लावून मध्यें उत्तम सडक भगवंतरावदादा पिंगळे यांनीं बांधिली आहे. याच पुरुषानें आदिकेशवाचें मंदिरही बांधिलें आहे. पेशवे सरकाराकडून गोविंदराव पिंगळे ह्मणून यांचेच पूर्वज हैद्राबादचे नबाबापाशीं वकील होते. पंचक्रोशीची प्रदक्षिणा एकंदर पंचवीस कोसांची आहे. मुक्कामाच्या जागीं फार उत्तम व रमणयि आणि मोठ्या विस्तीर्ण असून, ज्यांत सर्व सोई आहेत, अशा धर्मशाळा धार्मिक लोकांनीं पंचक्रोसींचे मर्यादेबाहेर बांधिल्या आहेत! मार्गांत मुक्कामाच्या जागीं सर्व पदार्थ मिळतात. व तेथें सर्व सुखावह सोयी आहेत ! काशीक्षेत्रांत मुख्य स्थान अंतर्ग्रही होय. त्या अंतर्गृहीची यात्रा प्रथम करून नंतर पंचक्रोशी यात्रा करावी, असा क्रम आहे. अंतर्ग्रहींत येकंदर
**अंतर्गृही यात्रा.** देवता शंभर असून बहुत फिरावें लागतें. ही यात्रा दोन दिवसांत केली तरी बहुत श्रम होतात. म्हणून रघुनाथराव यांनीं तीन दिवसांचा पक्ष स्वीकारून यथा विधि ती यात्रा केली. नंतर त्यांनीं पंचक्रोशी यात्रेस आरंभ केला.

रघुनाथराव यांनीं तेथील विधिप्रमाणें प्रथम ज्ञानवापीचें वंदन

---

॥ गंगातीरेकृतंपापं,वाराणश्यांविनश्यति ॥
॥ वाराणश्यांकृतंपापं,अंतर्गेहेविनश्यती॥२॥
॥ अंतर्गेहेकृतंपापं,वज्रलेपोभविष्यति ॥
॥ वज्रलेपास्थितंपाप,दहेत्क्रोशप्रदक्षिणा॥३॥

भावार्थ---अन्यक्षेत्रीं केलेलें पाप पुण्यक्षेत्रीं जाते. पुण्यक्षेत्रां केलेलें पाप वाराणशींत जातें वाराणशींत केलेलें पाप अंतर्गृहींत जातें अंतर्गृहींत केलेलें पाप वज्रलेप होतें तें वज्रलेप पाप पंचक्रोश प्रदक्षिणेनें भस्म होतें ह्मणजे नाहींसें होतें.

करून मुक्तिमंडपांत पंचक्रोशी यात्रेचा संकल्प केला. नंतर विश्वेश्वरांची पूजा करून तेथील सर्व देवतांचीं दर्शनें घेतलीं. नंतर मणिकर्णिकेस येऊन स्नान केलें. पुढें मार्गांतील सर्व देवतांचीं दर्शनें व तीर्थांचीं वंदनें करून असीसंगमा सन्निध पंचक्रोशी मर्यादेचे बाहेर पेशव्यांचे उपाद्ये करवे यांनीं धर्मशाळा बांधिली आहे, तेथें येऊन मुकाम केला. विधिप्रमाणें ह्मटलें ह्मणजे ते दिवशीं मुक्काम कर्दमेश्वरीं करावयाचा. परंतु घाट चढून वर जाऊन देवतेचें दर्शन करावें, नंतर खालीं येऊन तीर्थाचें वंदन करावें, मग गंगातीरानें चालावें, असें करावें लागतें. यामुळें वरचेवर घाट चढणें व उतरणें. येणेंकरून पाय थकून फार श्रम होतात. ह्मणून रघुनाथराव यांनीं तसे केलें. दुसरें दिवशीं ते स्नान व नित्य कृत्य आटोपून कर्दमेश्वरीं आले. तेथें कर्दमतीर्थीं स्नानकरून देवाची पूजा केली. नंतर कर्दमतीर्थ संबंधी प्रत्यक्ष श्राद्ध करून रघुनाथराव यांनीं ते दिवशीं तेथें मुक्काम केला. हें स्थळ फार रमणीय आहे. कर्दमतीर्थ उत्तम बांधिलें असून त्याच्या आसमंतात् वृक्ष आहेत. तिसरें दिवशीं तीर्थस्नान पूर्वक नित्य कृत्य आटोपून कर्दमेश्वर शिवाची पूजा करून तेथील व मार्गांतील देवतांचीं दर्शनें करीत रघुनाथराव यांनीं भीमचंडीस जाऊन मुक्काम केला. तेथील गंधर्वसागर तीर्थीं स्नानादि कृत्य आटोपल्यावर भीमचंडीचें पूजन करून त्यांनीं श्राद्ध व पिंडदान केलें.

पंचक्रोशी यात्राक्रम ज्ञानवापी वंदन विश्वेश्वर पूजा मणिकर्णिकास्नान असीसंगम कर्दमेश्वर कर्दमतीर्थ (येथें तीर्थ श्राद्ध)

भीमचंडी देवता गंधर्वसागर तीर्थ (तीर्थश्राद्ध)

या जागीं स्त्रिया हटकून रजस्वला होतात, असें तेथील लोक सांगतात. ह्मणून त्याच्या कारणाचा शोध रघुनाथराव यांनीं केला. परंतु खात्रीप्रमाणें त्यांस ठिकाण लागला नाहीं. त्या जागीं यात्रेस येणाऱ्या लोकांच्या एक दोन स्त्रिया अस्पर्श झाल्यामुळें मुक्काम करून राहिलेल्या दृष्टीस पडतात, इतकें मात्र खरें.

चौथे दिवशीं प्रातःस्नानादि कृत्य करून रघुनाथराव हे भीमचंडीची पूजा, तेथील देवता दर्शनें, व क्रमानें मार्गांतील देवांचीं दर्शनें करीत रामेश्वरीं मुक्कामास आले. तेथें वरुणानदी हेंच मुख्य तीर्थ

रामेश्वरदेव

आहे तेथें त्यांनीं तीर्थस्नान, देवतापूजन, श्राद्ध, पिंडदान वगैरे केलें हे स्थान फार रमणीय आहे. येथें रामेश्वराचें मंदिर उत्तम आहे व नदीस घाट वगैरे चांगले आहेत. पंचक्रोशी यात्रेत जीं स्थलें लागतात, त्या सर्वांत हें स्थल फार अपूर्व आहे. ह्या स्थळीं तेव्हां शिवाय करून घाटाचीं वगैरे कामें सुरू होतीं. ह्या जागीं कित्येक मळे लोक सन्याशाप्रमाणें वेष घेऊन यात्रेकरूंच्या पंकीस जेवतात. ह्मणून तेथील सन्यासी व यात्रेंत प्राप्त झालेले सन्यासी यांची पुरी चौकशी करून पंकीस घ्यावें लागतें. पांचवे दिवशीं रघुनाथराव यांनीं तेथील कार्य आटोपून मार्गांतील देवता दर्शन करीत वृषभध्वजेश्वरीं येऊन मुक्काम केला. तेथें मुख्य तीर्थ कपिलधारा आहे त्याचें स्नान, देवपूजा, श्राद्ध, पिंडदान वगैरे कार्य त्यांनीं केलें. हें स्थान बहुत सुशोभित आहे. कपिलधारा तीर्थ उत्तम बांधिलें आहे. व तेथील धर्मशाळा वगैरे चांगल्या आहेत. या स्थलाविषयीं कथा आहे ती अशीः—

वरुणानदी तीर्थ

वृषभध्वजेश्वर देव कपिलधारा तीर्थ

काहीं कारणानें दिवोदास राजास ब्रह्मदेवानें बहुत प्रकारचे वर देऊन त्याला काशींत राज्य स्थानीं स्थापन केला. तेव्हां त्या राजानें आपले तपःसामर्थ्यानें विश्वेश्वरास तेथून काढून दिलें. तेव्हां मंदराचलनामक पर्वतीं विश्वेश्वरांनीं जाऊन वास केला. काशीवियोग विश्वेश्वरास सहन होईना, ह्मणून कोणत्या ही युक्तीनें दिवोदास राजास काशींतून काढून देण्याकरितां त्यांनीं बहुत देवता पाठविल्या. परंतु कोणासही यश आलें नाहीं शेवटीं विष्णूनीं युक्तीनें काशींत प्रवेश केला. आणि तेथें सर्वत्र बौद्धधर्माचीं व्याख्यानें देऊन तेथील संपूर्ण प्रजा वैदिक धर्मापासून भ्रष्ट केली. व बौद्धधर्मप्रवृत्त केला. या प्रमाणें धर्माचा लोप होऊन अधर्माची वृद्धी होत आहे, असें दिवोदास राजानें पाहून आतां येथें राहाणें योग्य नाहीं असें त्यास वाटलें. तेव्हां त्यानें काशीक्षेत्राचा त्याग करून तो उत्तम लोकाप्रत गेला. नंतर विश्वेश्वर हे मंदराचलाहून काशीक्षेत्रीं मोठ्या समारंभा

नें परत आले. ते समयीं काशींतील सर्व देवांनीं व ऋषींनें आणि विष्णूंनीं दुरून विश्वेश्वराच्या रथाचा वृषयुक्त ध्वज पाहिला. ते ह्यां त्या स्थलीं येऊन त्या सर्वांनीं शिवदर्शन केलें. ध्वज ज्या स्थलीं दृष्टीस पडला तथें लिंग स्थापन करून वृषभध्वजेश्वर असें त्याचें नांव ठेविलें. अशी या वृषभध्वजेश्वराची कथा आहे.

सहावे दिवशीं तेथील कृत्य आटोपून रघुनाथराव यांनीं मार्गांतील देवतादर्शनें करीत साक्षीविनायकाचें दर्शन केलें. तेथून हातांत जव घेऊन मार्गानें सतत टाकीत जावें लागतें. त्याप्रमाणें करून त्यांनीं काशींत मोक्षलक्ष्मीविलासनामें मंडपांत विश्वेश्वराचें दर्शन करून यात्रेची समाप्ति केली. घरीं आल्यावर ब्राह्मणांस दशदानें व दक्षिणा देऊन ब्राह्मणासह भोजन केलें. अशा क्रमानें रघुनाथराव यांनीं पंचक्रोशी यात्रा केली. साक्षीविनायक मोक्षमंडपीं विश्वेश्वर दर्शन

कोणी यात्रेकरी अशक्त, वृद्ध, किंवा रोगी, असले तर ते प्रथम मार्गामध्यें एके ठिकाणीं धर्मशाळा आहे तथें एक, व शारंगपाणी यांच्या तलावावर एक, आणि शिवपुरास एक, असे तीन मुक्काम जास्त करितात. शारंगपाण्याचे तलावाचें उदक नामांकित आहे. यवनी लोक त्या ठिकाणीं होय बहारीवर ह्मणजे भांग पिण्यास जातात! व तथें कितीएक दिवस देखिल रहातात! शिवपुरास पांडवांच्या मूर्ति व दुसरे देव आहेत. तेथून इंग्रेजांची छावणी फार जवळ आहे. तिला सिक्रोरची छावणी असें ह्मणतात.

निरंतर पंचक्रोशी यात्रा करीत रहावें; ह्मणजे एक यात्रा समाप्त झाली कीं, लागलाच दुसरीस आरंभ करावा. असें करणारे तथें पूर्वीं होते. क्षेत्रस्थ लोक चातुर्मास्यास आरंभ होण्याच्या पूर्वीं एक पंचक्रोशी यात्रा करितात. चातुर्मास्य समाप्त झाल्यावर सर्व गुणी लोक ह्मणजे गवई, वीनवाजविणारे, सतारवाजविणारे, नवबतवाजविणारे, हे सर्व यकत्र जमून यात्रेस निघतात. मार्गांत ठिकठिकाणीं बसून मिठाई खातात, भांग पितात, अनेक प्रकारचीं वाद्यें वाजवून

गाणीं गातात, व चालतांनाहीं अनेक प्रकारचीं वाद्यें वाजवीत मोठ्या आनंदानें यात्रा करितात. त्या समयीं यात्रेचा फार मोठा मेळा असतो. रघुनाथराव काशीस होते तेव्हां बाबाआपटे शिवरात्रीचे दिवशीं सूर्योदयीं पंचक्रोशी यात्रेस निघाले ते त्याच दिवशीं दहा घटका रात्रीं घरीं आले. हे ग्रहस्थ मोठे मेहेनती, सरळ स्वभावाचे,.आर्जवी, उदार, पैसा कितीही खर्चिला तरी तृप्ति न पावणारे असे होते! अशा प्रकारचे पुरुष जगांत थोडेच आढळतात. उदार पुरुषास बहुत करून कर्ज असतेंच, ह्मणून कर्जबाजारी पणाचा दोष त्यांजवर येतो. परंतु स्वभावापुढें उपाय नसल्यामुळें ते ह्या दोषास जुमानीत नाहींत! ह्या समयीं पुण्यांतील प्रसिद्ध गृहस्थ बाळाजीपंतनातु हे सकुटुंब गया यात्रा करून आल्यावर प्रथम त्यांचें कुटुंब वारलें; नंतर थोडे दिवसांनीं त्यांसही देवाज्ञा झाली! असा अनुक्रमानें मरणाचा योग मनांत आणिल्याप्रमाणें हटकून काशीक्षेत्रीं येणें हे अल्प पुण्याचें फल नाहीं! यांनीं काशीस आल्यावर दान धर्म शक्तीप्रमाणें उत्तम करून कीर्ति मिळविली.

बाबाआपटे यांची प क्रो प्र.

बाळाजीपंत नातूचा अंत काल

पंचक्रोशी यात्रा करून येतांच रघुनाथराव यांनीं काशीक्षेत्राच्या मर्यादे बाहेर येऊन तेथें करण्याचे धर्मशाळेंत मुक्काम करून संकल्प-पूर्वक घृतश्राद्ध करून गयायात्रेस उपक्रम केला. आतां येथून रघुनाथराव यांच्या गयायात्रेचा वृत्तांत लिहावयाचा, परंतु ते काशींत असतां ज्या कांहीं विशेष गोष्टी घडल्या, व त्यांनीं कांहीं विशेष कृत्यें केलीं, तीं सांगणें राहिलीं, सबब तीं लिहून मग गयायात्रेचा वृत्तांत लिहूं.

रघुनाथराव हे काशीस असतां मध्वाचार्यस्वामी त्या क्षेत्रीं आले होते. त्यांजबरोबर लवाजमा वगैरे बराच होता. त्या स्वामींचें दर्शन करून रघनाथराव यांनीं संप्रदायाप्रमाणें त्यांची पादपूजा केली. हे स्वामी काशीस आल्यापासून त्यांची शिष्यमंडळी व दुसरेही मध्वमतानुयायी लोक यांनीं विधिपूर्वक तप्तमुद्रा घेतल्या. त्याप्रमाणें

मध्वाचार्य पादपूजा

च गोविंदाचार्यअष्टपुत्रे यांनीं ही तप्तमुद्रा घेतल्या! परंतु गोविंदाचार्यांचे पुत्र काशीनाथशास्त्रीअष्टपुत्रे जे काशीक्षेत्रीं व इतरत्रही विद्वत्तेनें मोठे मान्य होते, त्यांनीं तप्तमुद्रा घेतल्या नाहींत!

याच संधीस झांशीसंस्थानचे अधिकारी गंगाधरराव बाबासाहेब ह्मणून होते ते तेथें यात्रेस आले होते. त्यांची रघुनाथराव यांजबरोबर भेट झाली. या मोठ्या संस्थानिक पुरुषाची स्थिति व लोकरीतीहून कांहीसा वेगळाच आचार पाहून रघुनाथराव यांस आश्चर्य वाटलें!

झाशीचे संस्थानिक गंगाधरराव बाबासाहेब यांची भेट

नेपाळचे राजाचे मुख्य दिवाण जंगबाहादूर हे विलायतेस गेले होते, ते याच संधीस काशीस आले. त्यांनीं विलायतचा प्रवास केल्याबद्दल प्रायश्चित केलें! त्यांत त्यांनीं बहुत पैसा खर्चिला. त्यांचा काशीस कांहीं दिवस मुक्काम होता. तेव्हा एके दिवशीं त्यांची रघुनाथराव यांनीं भेट घेतली हा पुरुष मोठा नामांकित होता!

जंगबहादूराची भेट

दरवर्षास वैशाखमासी विंचूरकर यांचे घरीं श्रीनरसिंहजयंतीचा उत्सव असतो. तो उत्सव देव ह्मणजे श्रीनरसिंहमूर्ति विंचूर येथें असल्यामुळें तो उत्सव विंचूर येथेंच वर्षाप्रमाणें झाला. तथापि रघुनाथराव हे प्रस्तुत काशींत असतांही त्यांनीं तेथें वैशाख शुद्ध सप्तमी पासून तों पौर्णिमे पर्यंत काशीक्षेत्रीं वसंतपूजा केल्या. त्यांत प्रति दिवशीं शंभर ब्राह्मणास रात्रीं यथेच्छ बासुंदी व आठ आणे प्रमाणें दक्षिणा द्यावी, मंत्र ह्मणणें झाल्यावर त्यांस पानसुपारी, एकेक ताडाचा पंखा, पुष्पमाला, अत्तर, गुलाब, असें देऊन संतुष्ट करावें. याप्रमाणें नऊ दिवस रघुनाथराव यांनीं नरसिंहजयंतीच्या उत्सवाबद्दल काशीमध्यें ब्राम्हणांचा मंत्रजागराचा उत्सव केला.

वैशाखमासी वसंतपूजा

शके १७७२ सालीं काशी येथें रघुनाथराव यांचा मुक्काम असतां एके दिवशीं रात्रीं आठ वाजण्याचे सुमारास एक चमत्कारीक गोष्ट घडून आली, ती ध्यानांत धरण्याजोगी आहे ह्मणून येथें लिहितों:—

दारूपेटून अनर्थ झाला तो

पंज्याबांत शीख लोकांबरोबर इंग्रेजसरकारची लढाई चालली होती. त्या करितां बंदुकीच्या दारूनें भरलेलीं मोठमोठालीं पिंपें नावेंतून कलकत्त्याहून जलमार्गानें प्रयागाकडे जात होतीं. तेव्हां त्या नावा एके दिवशीं सायंकाळीं काशी येथें राजघाटावर नांगरल्या. नंतर आठवाजण्याचे सुमारास एक पिपास आग लागून तें उंच आकाशांत जाऊन फुटलें तेव्हां जो आवाज झाला, तो ज्यांनीं ऐकिला त्यांस ब्रह्मांड फुटलें काय! अशी कल्पना झाली! असा मोठा आवाज कोणी कधींही ऐकिला नसेल! तो आवाज ऐकून कितीएक लोक बेशुद्ध होऊन पडले! सर्व काशी शहरांतील घरांच्या खिडक्यांवरील वगैरे कांचेचें काम त्या आवाजा बरोबर फुटून त्याचे तुकडे तुकडे झाले! त्या पेटलेल्या पिपाचे तुकडे खालीं दुसऱ्या पिपावर पडल्यामुळें तेंही पेटलें, आणि फुटून त्याचाही आवाज झाला परंतु तो आवाज पहिल्या आवाजा इतका मोठा नव्हता. परंतु हा आवाज होण्याबरोबर गंगेचें पाणी वीस हात वर उडून ती नाव बुडाली, इतकेंच नाहीं, तर त्या घाटावर धान्याच्या व इतर मालाच्या व रिकाम्या अशा शेंकडों नावा होत्या, त्याही सर्व फुटून गंगेंत बुडाल्या! पहिल्यानें उडालेल्या पिपांत साठ मण दारू होती, मागाहून उडालेल्या पिपांत चाळीस मण होती, असें पुढें समजलें. आतां ह्याच्या नावा फुटून बुडाल्या व यांवरील नावाडी वगैरे माणसें बुडून मेलीं, हें असें होणें साहजिकच आहे! परंतु त्या नावांचे खिळे व तुकडे उडून आसपासच घाटावरील शेंकडों माणसांसही इजा झाली! शिवाय त्या घाटाचे वरील बाजूस तमाम कापड विणणाऱ्या मुसलमान लोकांचीं घरें होतीं, तीं सर्व जमीनदोस्त झालीं! लहानमोठ्या पडलेल्या घरांची संख्या आजमासें चार पांचशें होती! त्या वेळानें सिकरोळचे छावणींतून कितीएक लष्करी व कितीएक दरबारी साहेब लोक त्या ठिकाणीं पहाण्यास गेले, आणि त्यांनीं तो झालेला सर्व अनर्थ पाहिला! तेथील मॅजिस्ट्रेटानें पुष्कळ संगी लोक आणवून सुमारें पावकोस ओरस

चौरस जाग्यांत जागोजाग पहारे उभे केले. दुसरे दिवशीं सकाळीं इजारो लोक काय झालें, तें पाहाण्याकरितां त्या घाटावर गेले. तेव्हां पूर्वदिवशीं पडलेल्या इमारती खालीं जे लोक दबून मेले होते, त्यांचे मुरदे मजूर लोकांकडून साहिबलोक काढवीत आहेत, व आगीनें होरपळलेले व जखमी झालेले मनुष्यांचे मुरद्यांचा एक मोठा गंज पडला आहे, असे त्यांच्या दृष्टीस पडलें! या अनर्थापुळें एकंदर सरासरी हजार पंधराशें मनुष्यांचा नाश झाला असावा; व लाखोरुपयांची मालमिळकत नष्ट झाली असावी असा आजमास झाला! सर्व पिंपे पेटून उडालीं असतीं तर काय अनर्थ झाला असता याचें अनुमान करवत नाहीं! कदाचित् सर्व काशीशहर ही उडून गेलें असतें! परंतु ईश्वर करणीनें बाकीचीं सर्व पिंपें न पेटतां बुडून गेलीं ह्मणून तसा अनर्थ टळला. हा तमाशा पाहाण्यास रघुनाथराव ही स्वतः गेले होते. त्या वेळेस त्यांस कितीएक जखमी झालेलीं माणसें दृष्टीस पडलीं. त्या पैकीं कोणाचा हात तुटलेला व कोणाचा पाय तुटलेला अगर कोणाचे दोन्ही हात तुटलेले असे दृष्टीस पडले!

काशीक्षेत्रांत पाण्याचा दुष्काळ कधींच पडत नाहीं. कारण तेथें भागीरथी नदी वाहत असून तिचे पात्रांत अथाक पाणी असतें. व त्यांतून बाराही महिनें मालाच्या व उतारूंच्या नावा येत जात असतात. तेथें सर्व प्रकारचा व्यापार चालतो. आणि लाखोंरुपयांची घडामोड नित्य होते; व तेथें सर्व प्रकारच्या व सर्व जातीच्या लोकांकरितां सोई आहेत! काशीशहराचें वर्णन

काशीक्षेत्रीं बहुतेक लोक भांग घोटून पिणारे आहेत! त्या ठिकाणीं उत्तम वैदिक ब्राह्मण बहुत आहेत. व त्याचप्रमाणें व्याकरण, न्याय, पूर्वमीमांसा, उत्तरमीमांसा म्हणजे वेदांत, या चार शास्त्रांत प्रवीण असे ही पुष्कळ शास्त्री आहेत. परंतु साहित्यशास्त्र म्हणजे नाटक, अलंकार, चंपू, यांत विशेष ह्मणण्यासारखा प्रवीण असा शास्त्री रघुनाथराव यांस कोणीही आढळला नाहीं! तेथील ब्राह्म-

णांच्या शेंड्या फार लांब व मोठ्या असतात. पागोटें क्वचित कोणी घालतो. बहुधा बोडकेच असतात. लग्नांत वराच्या मागें देखील बोडके जातात! त्यांची पंचे नेसण्याची रीत फार आहे! ते बहुधा स्वच्छंदी असतात! त्यांस गोड खाण्याची प्रीति फार असून, यात्रेकरी ब्राह्मणभोजन घालितात, त्यांत थोडं कमी पडलें तर तोंडावर त्यांची निंदा करण्यास ते मागें पुढें पाहत नाहींत! भोजन समयीं परस्परें आग्रह करण्याची त्यांची फार चाल आहे! काशींत पक्कान्नें फार उत्तम होतात, त्यांत मोतीचुराचेलाडू जसे तेथें होतात, तसे कोठेंच होत नाहींत ! त्या शहरीं नाव्यापितळेचीं भांडीं चांगलीं होतात. जरीचें काम व पितांबर, पांबऱ्या वगैरे रेशमी कापड हीं चांगले तयार होतें. बंगाली व राधानगरी कापड तेथें फार मिळतें. प्रत्येक ठिकाणी बाजार चांगले आहेत. कोणताही पदार्थ मिळत नाहीं असें नाहीं. ह्मणूनच काशीला हिंदुस्थानी लोक बनारस असें म्हणतात! बनारस ह्या शद्बाचा अर्थ असा आहे कीं, जेथें नाना रस भरलेले आहेत तें ठिकाण. तेथं हालवायांचीं दुकानें बहुत आहेत, आणि बहुतेक लोक त्या दुकानांतूनच आयते पदार्थ विकत घेऊन खातात! तेथें सोंवळ्याओंवळ्याचें मान कमी आहे! बहुतेक जिनसांची स्वस्ताई असते! विड्याचीं पानें तेथें दोन जातीचीं मिळतात. एके जातीचें नाव बंगला व दुसरे जातीचे नाव मघई. त्यांत बंगला जातीचीं पानें फार तिखट व उष्ण असतात. मघईचीं पानें चांगलीं सुवासिक असतात. गुलाब व केवडा, यांचे पाणी तेथें बहुत मिळतें. भांगेच्या घोट्यांत हेंच पाणी फार मिश्र करितात, यामुळें त्याचा खप फार असतो.

काशीस गांवाबाहेर एक गऊमाईचें स्थान आहे. ती बाई विश्वेश्वराची बहीण आहे असें सांगतात. ती फार सोंवळें करूं लागली ह्मणून तिला क्षेत्राबाहेर जागा दिली. यात्रेकरी तिचें दर्शन घेतल्यावांचून जितके दिवस काशीस राहतील तितक्या कवड्या तीस वाहिल्या पाहिजेत. असें जो न करील त्याचे काशीयात्रेचें पुण्य ती घे

ते, असें तेथील लोक सांगतात! परंतु यास कोठें प्रमाण अढळलें नाहीं. गंगेच्या पलीकडे रामनगर ह्मणून एक शहर आहे. पूर्वी काशीस राजा होता. त्याचें राज्य इंग्रेजांनीं घेऊन त्यास हें रामनगर व त्याचे आसपासचा कांहीं मुलूख दिला. त्या राजाचा वंश हल्लीं तेथें असून त्याच्या राहण्याचे वाडे वगैरे चांगले आहेत. तेथें बोरें उत्तम होतात. तशीं बोरें दुसरे ठिकाणीं होत नाहींत. रामनगरास व्यासेश्वर व शुकेश्वर, अशीं दोन स्थानें आहेत. या विषयीं अशी कथा आहे कीं, व्यास हे काशीस आले. तेव्हां त्यांची परिक्षा पाहावी ह्मणून अन्नपूर्णेस देवांनीं अशीं आज्ञा केली कीं, व्यासास थोडे दिवस अन्न देऊं नये. तेव्हां व्यास भिक्षेस निघाले तों अन्न मिळालें नाहीं, असे सात दिवस गेल्यावर व्यासांनीं क्रोधानें क्षेत्रास शाप दिला कीं, या क्षेत्रीं तीन पिढ्या सारखी विद्या व धन राहणार नाहींत! असें होतांच विश्वेश्वर प्रगट होऊन बोलले कीं, व्यासा तूं तपस्वी असून क्रोधानें शाप देतोस हें काय? तुझा क्रोध अद्याप शांत झाला नाहीं! यास्तव तूं काशीवास करण्यास योग्य नाहींस! तर येथून जा! नंतर व्यासानें बहुत स्तुति केली. तिजवरून संतुष्ट होऊन त्यांनीं सांगितलें कीं, गंगेच्या पलीकडे वास करावा, तेथून काशीचें दर्शन करावें, जे कोणी काशीयात्रेस येतील ते तुझें दर्शन अवश्य घेतील, जे तुझें दर्शन घेणार नाहींत, त्यांची यात्रा निष्फळ होईल, याप्रमाणें विश्वेश्वरांनीं सांगितलें. या करितां यात्रा समाप्त करून सर्व यात्रेकरू लोक व्यासाचे दर्शनास जातात. रामनग

सोमवतीअमावास्या आली ह्मणजे वृषभध्वजमहादेवा सन्निध कपिलधारातीर्थ आहे तेथें शिवगया करितात. गयाक्षेत्रीं जसें पिंडदान श्लोक वगैरे आहेत, तसेच येथें ही आहेत. या ठिकाणीं सोमवतीअमावास्येस शिवगया केली म्हणजे पितरांस कैलासप्राप्ति होते, असें वर्णन आहे. जे शेव आहेत ते गयाक्षेत्रीं न जातां येथेंच गयायात्रा करितात! शिव

ऋतूंतल्या पर्वतेंविशे- त्सव वगैरे

काशीक्षेत्रीं प्रत्येक ऋतूंत वेगळ्या वेगळ्या स्थळाचें वेगळें वेगळें माहात्म्य, त्याप्रमाणें त्याच्या वेगळ्या वेगळ्या यात्रा; प्रत्येक मासांत वेगळ्या वेगळ्या स्थळाचें वेगळें वेगळें माहात्म्य, त्याच्या वेगळ्या वेगळ्या यात्रा; व्यतीपातादि योग संबंधानें ही वेगळ्या वेगळ्या यात्रा; अशा यात्रा तेथें पुष्कळ आहेत. नागपंचमीस नागकूप, ललितापंचमीस ललितादेवी, भाद्रपदांत महालक्ष्मी, श्रावणांत मंगळवारीं मंगलागौरी, नवरात्रांत दुर्गादेवी, दक्षिणायन पर्वांत शंखोद्धारतीर्थ, अशीं निरनिराळ्या काळीं निरनिराळ्या देवतांचीं व तीर्थांचीं विशेष माहात्म्यें आहेत. कोणाची मासभर, कोणाची आठदिवस, अशा ही यात्रा अनेक आहेत. यात्रेखेरीज एकही दिवस सुना जात नाहीं! यात्रेस शिवरात्री पासून आरंभ होऊन मार्गशीर्ष शुद्ध चतुर्दशीस पिशाचमोचनतीर्थी पिशाचमोचनेश्वर महादेवाची यात्रा असते, त्या दिवसापर्यंत चालतात. त्या चतुर्दशीच्या यात्रेस रोटाभट्याचा मेळा ह्मणतात. ह्मणजे ते दिवशीं रोट व वांग्याच्या भरताचा नैवेद्य दाखवावा लागतो. ही यात्रा झाली ह्मणजे पुढें शिवरात्री पर्यंत मेळे कमी असतात

रामलीला

आश्विनमासीं रामलीलेस आरंभ होतो. ती लीला सतत महिनाभर चालते. रामचंद्राचें जन्म झालें तेव्हांपासून आरंभ करून तों शेवटीं रावणवध करून रामचंद्र परत अयोध्येस येऊन भरतास भेटले, व त्यास राज्याभिषेक झाला, तेथ पर्यंत लीला करितात. रामनगरचे राजाकडून या लीलेस छतीस हजार रुपयांची नेमणूक आहे. या कामीं गाणारे व सोंगे घेणारे, शिवाय लहान मुलें, अशी मंडळी बहुत नेमलेली आहे. सोंगें घेऊन तुळशीदासांनीं पदें केलीं आहेत, तीं ह्मणून, तदनुसार लीला करितात. या लीलेचा आरंभ प्रथम तुळशीदासांनीं केला. तेव्हांपासून पुढें सतत क्रम चालला आहे. हा चमत्कार या क्षेत्रीं पाहण्यासारखा आहे; त्यांत भरत मिळाफ ( भरतभेट ) ज्या दिवशीं होते, ती क्रीडा पाहण्यास हजारों लोक मिळतात. नाटइम्ली ह्मणजे एक लहान चिंचेचें झाड आहे; तेथें भरताची

व रावचंद्राची भेट होते. याठिकाणीं दुतर्फा मोठमोठे मांडव अर्ध कोस पर्यंत घालून ठिकठिकाणीं लोकस बसून पाहाण्याकरितां जागा तयार करितात. त्या जागीं भाडें दर असामीस जागा पाहून पांच, तीन, किंवा दोन असे रुपये पडतात! ज्यांची जागा असते ते लोक अशा जागेची तयारी करून, ते दिवशीं शेकडों रुपये भाडें मिळवितात! रामचंद्राचें विमान येतें; त्यांत राम, लक्ष्मण, सीता, सुग्रीव, बिभीषण, वगैरे असतात. तें विमान भरताचे जागेकडेस माणसें उचलून नेतात. इकडून जटाधारण केलेला भरत दोन्ही हात जोडून वसिष्ठासह सामोरा जातो. नंतर रामचंद्र व भरत या उभयतांची भेट होते तेव्हां ते परस्परें गळ्यांत मिठ्या मारतात! नंतर वसिष्ठासह विमानांत बसून रामचंद्र अयोध्येस येतात. तेव्हां जमलेले लोक शेकडों रुपयांच्या तुळशी फुलें त्यांजवर उधळतात. तेव्हां कमकसर जमिनीवर घोट्याईतका तुळशीफुलाचा थर एक कोस सारखा पडलेला असतो असें सांगतात! आश्विन शुद्ध दशमीस रावणाचा वधलीला होऊन शुद्ध एकादशीस भरत मिलाफ होतो. द्वादशीस राज्याभिषेक झाल्यावर शहरांतील उत्तम गाणारणी यांचे नाच व भवई लोक यांचे तमासे सारीरात्र होतात ! नंतर पुष्कळ ब्राह्मण व बैरागी यांचें भोजन होऊन रामलीलेची समाप्ति होते.

काशीक्षेत्रीं बहुतेक राजेरजवाडे यांनीं घाट व देवालयें बांधिलीं आहेत, तशींच तेथें त्यांनीं अन्नसत्रेंही ठेविलीं आहेत. अमृतरावसाहेबपेशवे यांनीं एक उत्तम प्रकारचें गणेशमंदिर बांधून त्या देवास अलंकारही पुष्कळ दिले; व पूजा व उत्साह यां बद्दल नेमणूकही चांगली करून दिली. शिवाय अन्नपूर्णानांवाचें अन्नसत्र घालून त्याचे खर्चाकरितां इंग्रजसरकारांत कांहीं पैसा ठेऊन त्याचें व्याज त्या सत्राचे खर्चाकडे लावून दिलें. त्या सत्रांत तीनशेंपर्यंत ब्राह्मण व संन्यासी यांस भोजन देण्याची योजना केली. त्याजवर त्यांचे चिरंजीव विनायकरावसाहेबपेशवे यांनीं त्या सत्रांत बाराशें ब्राह्मण दर

रोजजेवीत जावे असें ठरवून, त्यास ज्याअर्थी खर्च लागे, तो ते महिन्याचे महिन्यास चित्रकूटाहून आपले खासगीतून पाठवीत होते. परंतु दुर्दैवेंकरून पुढें सन १८५७ इसवी सालीं विनायकरावपेशवे यांचे ज्येष्ट दत्तपुत्र नारायणराव यांजवर बंडांत सामीळ असण्याचा आरोप आल्यावरून त्यांची सर्व मालमत्ता इंग्रेजसरकारानें खालसा केली. त्या वेळेस देवाचे अलंकार व सर्व सामान जप्त करून त्याचा लिलांव केला! त्यामुळें बाबूसाहेब यांजकडून पूर्वीच्या तीनशां खेरीज नऊशें पात्रा बद्दल जो खर्च अन्नसत्राचे नेमणुकेंत दर महिन्यास मिळत होता, तो नाहींसा झाला! त्यामुळें अमृतरावसाहेब यांनीं प्रथम जीं तीनशें पात्रें जेवण्याची नेमणूक करून दिली होती, तितकी मात्र चालत असून त्या सत्रांत तीनशें ब्राह्मणभोजन होत आहे!

बंडाचे दोषावरून नारायणरावसाहेब यांजबरोबर त्यांचे कनिष्ट बंधु माधवरावसाहेब यांस ही सरकारानें प्रतिबंधांत ठेविले होतें परंतु पुढें नारायणरावसाहेब मरण पावले, आणि माधवराव हे बंडाचे वेळीं कायद्याचे वयांत आलेले नसल्यामुळें, त्यांजवर बंडांत सामीक असण्याचा दोष शाबीत झाला नाहीं, सबब ते मोठे झाल्यावर सरकारानें त्यांस बंधमुक्त करून, जी नेमणूक अन्नसत्राकडे चालत होती, ती त्यांचे हवाली करून, अन्नसत्र चालविण्याचें काम त्यांचे त्यांनीं पहावें असें ठरविलें. त्याप्रमाणें माधवरावसाहेब यांजकडून हल्लीं व्यवस्था चालत आहे.

ग्वालेरयेथील बायजाबाईसाहेबशिंदे यांनीं मणिकर्णिकेवर बहुत पैसा खर्च करून एक भारी मोठा घाट बांधण्याचें काम चालविलें, परंतु तें शेवटास न जातां गंगेत खचुन दुभाग झालें, सबब तितकेंच राहिलें आहे!

बाजीरावसाहेबपेशवे यांनीं कालभैरवासंनिध मोठा लांकडी वाडा बांधिला आहे त्या क्षेत्रीं लांकडी काम येवढेंच आहे. बाकी सर्व घरें दगडाचीं आहेत. शिवाय पेशवे यांनीं मणिकर्णिकेसमीप व्यंकटे-

शाचें मंदिर बांधिलें आहे. तें बहुत चांगलें आहे. तेथें ब्राह्मणभोजन करण्याची सोय फार चांगली केली आहे. सन १७५७ सालचें बंड समाप्त झाल्यावर वाडा व व्यंकटेशाचें मंदिर हीं इंग्रज सरकारानें शिंद्यास बक्षीस दिलीं!

येथें भोंसल्याचा मोठा घाट व एक उत्तम राममंदिर आहे. त्याचप्रमाणें गाईकवाड व होळकर यांचे घाट व मंदिरें आहेत. विंचूरकराचे पूर्वजांनीं राममंदिर बांधिलें, तें भोंसल्याचे राममंदिरामागें आहे. नरसिंहखंडेरावविंचूरकर यांचे कुटुंब रमाबाई यात्रेस गेली होती. तेव्हां त्यांनीं कालभैरवाचें मंदिर व त्याजवळ एक शिवालय बांधिलें. विंचूरकरांचे पोतनीस यमाजीपंतअण्णा यांनीं दुर्गाघाटीं विठ्ठलमंदिर बांधून धर्मकृत्याची व्यवस्था उत्तम केली, ती अद्यापि चालत आहे. याचप्रमाणें त्यांनीं ज्ञानवापी संनिध मोठा सभामंडप बांधिला, व अन्नपूर्णेश्वरीसंनिध मंडप बांधिला. पंचकाशीयात्रेंत वरुणानदी उतरून जाण्याचे यात्रेकरी यांस बहुत श्रम पडत, या करितां यमाजीपंतांनीं त्या नदीस पूल बांधिला. अशीं त्यांनीं अनेक धर्मकृत्यें केलीं आहेत. दुर्गाघाटीं नानाफडणीस यांचा वाडा आहे, तेथें यात्रेकरी राहण्याची सोय चांगली असल्यामुळें दक्षिणप्रांताकडील यात्रेकरी बहुतेक तेथें उतरतात. जयपूरचेराजे यांनीं वेदशाळे करितां तेथें मोठी इमारत बांधिली आहे. तेथें त्या वेळची ग्रहवेध करण्याची यंत्रें अद्याप आहेत. याप्रमाणें बहुतेक राजे व सरदार व इतर लोक यांचीं धर्मकृत्यें त्या ठिकाणीं आहेत!

कार्तिकमासीं पंचगंगेचे प्रातःस्नानाचें मोठें फळ वर्णिलें आहे. कार्तिकस्नान मागील चार घटका रात्री पासून हजारों लोक स्नान करून बिंदुमाधवाचें दर्शन करितात. नित्य सायंकाळीं यात्रेकरी लोक घाटावर पुष्कळ आकाशदीप लावितात. शिवाय पंचगंगातीरानें तथील स्थाईक व यात्रेकरी पुष्कळ दिवे लावितात, तसेच गंगेतही सोडितात. प्रातःकाळीं स्नानासमयीं उत्तम वाजंत्र्यांचे बाजे होतात, व दीपा-

ऱ्या इरीऱ्याइरी लाविनात. आणि मनुष्यांचा मोठा समुदाय जमतो तो पाहून मनास फार आनंद होतो! कार्तिकीपौर्णिमेस आसी पासून वरुणेपर्यंत सर्व घाटांवर दोन कोस सारखे दिवे लागतात! तेव्हां फारच "चमत्कार" दिसतो ! काशीक्षेत्राचें कितीजरी वर्णन केलें तरी तें थोडेंच होय, असें क्षेत्र भूमंडलांत दुसरें नाहीं अशी प्रसिद्धि आहे! क्षेत्राचे आसमंतांत "सावकार लोकांचे पुष्कळ बाग असून, ठिकठिकाणीं तलाव आहेत. त्याचे आसपास अनेक प्रकारचे वृक्ष असल्यामुळें अत्यंत शोभा दिसते ! येणें करून या क्षेत्रास आनंदवन हें नांव आहे, ते यथार्थ होय यांत संशय नाहीं! काशींतील रस्ते फार अरुंद आहेत ते इतके कीं, त्यांतून कंठाळीसुद्धां घोडे जाण्यास अडचण पडते! दोन्ही बाजूनें चार मजली उंच घरें असून मध्यें लहान गल्या असल्यामुळें शीतकाळीं थंडीची पीडा फार होते. दुर्गेस जाण्याचा एक, व भैरवास जाण्याचा एक, असे दोन रस्ते मात्र मोठाले आहेत. वरकड बहुतेक रस्ते लहान आहेत. हल्लीं पृथ्वींत जितक्या वेदाच्या शाखा उपलब्ध आहेत तितक्या शाखेचे ब्राह्मण प्रस्तुत या क्षेत्रीं असून, प्रत्येक शाखेंत निदान पांच चार तरी समग्र शाखा ह्मणणारे निघतील. दक्षिणी संन्यासी काशीस बहुत आहेत. त्यांत गुजराथी, द्राविड, तेलंगी, गौड, हे संन्यासी धरिले तर एकंदर संन्यास्यांची संख्या मोठी होईल. आसी पासून वरुणेपर्यंत संन्यासी राहण्याचे मठ पुष्कळ आहेत. त्यांत त्यांच्या राहण्याच्या सोई चांगल्या केलेल्या आहेत. ज्यास दंड नाहीं, असे संन्यासी पंक्तीस न बसवितां दूर बसवितात. या क्षेत्रीं दक्षिणी ब्राम्हणाचें पात्र पांच हजारांवर होतें. वरकड गौड वगैरे ज्ञातीचे ब्राम्हण जेऊं घातले तर पुष्कळच पात्र होईल. येथें गोसांवी लोकांचे मठही बहुत आहेत. तुळशीदाससाधु याच ठिकाणीं जन्मले व त्याचा काळही येथेंच झाला. त्यांनीं स्थापिलेल्या मठाचे आश्रयानें बैरागी लोक येथें पुष्कळ राहतात. येथें मुसलमानांचीही वस्ती फार आहे. कबीर ह्मणून मुसल

मानजातीचा जो भगवद्भक्त झाला, तो याच क्षेत्रीं उत्पन्न होऊन त्याचा अंतकाळही येथेंच झाला. त्या कबीराचें घर अद्यापि तेथें आहें.

काशींत वैजनाथेश्वर, दुर्गा, आदिकेशव, वक्रतुंड, गभस्तीश्वर, केदारेश्वर, हीं स्थानें फार उत्तम व पाहण्यासारखीं आहेत. केदारेश्वराचा प्रदेश या क्षेत्रांतच स्वतंत्र असून त्या विषयीं कथा आहे ती अशी:—कोणी ब्राह्मणास केदारेश्वर प्रसन्न होऊन वर माग असें बोलिले. तेव्हां त्यानें परोपकारार्थ असा वर मागितला कीं, काशीक्षेत्रीं ज्याचा मृत्यु होतो, त्यास त्याच्या पापानुसार भैरव यातना भोगावी लागून मग मुक्ति प्राप्त होते. असें आहे परंतु इतःपर काशीक्षेत्रांत केदारक्षेत्राची जी मर्यादा आहे, त्या मर्यादेचे आंत जो कोणी मरण पावेल त्यास भैरवयातना न होतां कैलास लोक प्राप्त व्हावा. हे त्या ब्राह्मणाचें मागणें केदारेश्वरांनीं मान्य केलें. या करितां काशींत राहणारे कोणी कोणी लोक मरणसमयीं केदारक्षेत्राचे मर्यादेंत जाऊन देह ठेवितात.

औरंगजेबबादशाहा काशीस आला तेव्हां प्रथम विश्वेश्वर लिंगाचा उच्छेद करून तेथील मंदिरावर त्यानें मशीद बांधली. नंतर पंचगंगेवर बिंदुमाधवमूर्तीचा उच्छेद केला. त्या ठिकाणीं मशीद बांधून त्या मशीदीस दोन मनोरे फार उंच बांधले आहेत. ते मनोरे चार कोसांवरून दिसतात. विश्वेश्वराप्रमाणें ओंकारेश्वर, कृत्तिवासेश्वर इत्यादि देवतांचा उच्छेद करून त्या त्या ठिकाणीं मशीदी बांधिल्या आहेत. जितक्या ठिकाणीं देवतांचा उच्छेद करून मशीदी बांधल्या आहेत, तितक्या मशीदींत हल्लीं मुसलमान लोक राहतात. काशीक्षेत्रीं पापकरणारे जे जीव त्यांस भैरव शिक्षा करितो. त्या शिक्षेचे स्थानीं कुलस्तंभ ह्मणून उंच मोठा दगडाचा स्तंभ होता. तो स्तंभ पाडण्यास औरंगजेबानें आरंभ केला. तेव्हां त्यांतून रक्ताच्या धारा निघाल्या. तरी तो पाडावा म्हणून त्यावर मोठाले प्र

हार केले, तथापि तो पडेना. असें पाहून मुसलमानांनीं तेथें अकरा गाई मारून त्यांचें रक्त त्या स्तंभावर टाकिलें. तेव्हां आपोआप तो स्तंभ अर्धा मोडून पडला अशी दंतकथा तेथील लोक सांगतात! इ ल्लीं एक पुरुषभर तो स्तंभ कायम आहे. व हिंदुलोकांनीं त्यावर तां ब्याचें टोंपण बसविलें आहे. औरंगजेब हा कालभैरवाचा उच्छेद करण्यास प्रवृत्त झाला. तेव्हां त्याच्या मंदिरांत मोठाले भृंगे (भ्रमर) उत्पन्न होऊन त्यांनीं त्या बादशाहाचे फौजेस अत्यंत त्रास दिला. त्यामुळें त्यानें तें स्थळ जशाचें तसें कायम ठेविलें. याचप्रमाणें अन्न पूर्णेचे मंदिरांत कांहीं प्रतीति झाली म्हणून तेंही स्थान त्यानें कायम ठेविलें या शिवाय केदारेश्वर, पशुपतीश्वर, इत्यादि दुसरीं ही कि तीएक स्थानें उच्छेद न होतां कायम राहिलीं आहेत. विश्वेश्वरादि देवतांचा अशा प्रकारें मुसलमानांनीं उच्छेद करून टाकिला. नंतर कांहीं कालांने नारायणभट्ट म्हणून मोठे विद्वान् व तपस्वी ब्राह्मण काशीक्षेत्रीं झाले. त्यांनीं केलेले त्रिस्थलीसेतु, संस्काररत्नमाला, व गैरे अनेक उत्तम ग्रंथ प्रसिद्ध असून त्यांवरून श्रौतस्मार्तादिक कर्मा नुष्ठानें सर्वत्र चालत आहेत. त्यांनीं पूर्वी विश्वेश्वराचें मंदिर होतें, त्या सन्निध एक नवीन मंदिर बांधून त्यांत विश्वेश्वरलिंगाची स्थापना केली. आलीकडे पंजाबांतील शीखलोकांच्या राजानें सोन्याचीं मुलाम्याचे पत्रे त्या मंदिरास बसविले आहेत, तेणेंकरून त्यास फार शोभा आ ली आहे! विश्वेश्वराचे पूजक तद्देशीय ब्राह्मण आहेत. त्यांस पं डे असें ह्मणतात. त्यांस देवापुढील उत्पन्न बहुत मिळतें. तिकडील राजेलोकांनीं विश्वेश्वरास दिलेल्या नेमणुका आहेत. त्यांचा उपभो ग ते पंडेच घेतात. तसेच देवास अर्पण केलेले घोडे, हत्ती, रथ, पालख्या वगैरेचा उपभोगही पंडेच घेतात. पंड्याचा लवाजमा मोठे राजाप्रमाणें असतो. ते देवाकडे ह्मणण्यासारखा कांहीं खर्च लावीत नाहींत! अन्नपूर्णादेवीचें संस्थानचा अधिकारही त्यांजकडेसच आहे. काळभैरवाचे पुजक कानफाडी आहेत. बिंदुमाधवाचे मूर्तीचा उच्छे

द झाल्यावर त्याची नवीन मूर्ति स्थापन केली. पुढें कऱ्हाडचे प्रतिनिधींनीं त्या देवास मंदिर बांधिलें. त्या देवास नेमणूक वगैरे म्हणण्यासारखी नाहीं. देवाचे पूजक दक्षिणी ब्राह्मण आहेत. त्या मंदिरांत बिंदुमाधवाचे मूर्ती सन्निध दोन मोठाले शालिग्राम आहेत. ते शिवाजीविठ्ठल विंचूरकर काशीस गेले होते तेव्हां त्यांनीं तेथें ठेविले.

काशीक्षेत्रास महास्मशान अशी संज्ञा आहे. तेथें तारकेश्वराचे सन्निध थोडी जागा आहे. तेथें काशींत मरण पावणारांचीं प्रेतें दहन करितात. त्या जागेंत ज्याचें प्रेतदहन होईल त्यास उत्तम गति प्राप्त होईल असें पुराणांत सांगितले आहे. म्हणून दहनाकरितां प्रेतें तेथेंच नेतात. ती जागा फार संकुचित असल्यामुळें जितकीं प्रेतें येतील तितकीं प्रेतें एकदम जाळण्यास सवड नसते. जशी जागा मिळेल तशीं जाळावीं लागतात. म्हणून अग्नि दिलेली प्रेतें दग्ध झाल्यावांचून नवीन आलेल्या प्रेतांस अग्नि देतां येत नाहीं. तेथें सर्व शरीर दहन होण्याची वाट न पाहातां कांहीं शरीर भाग शेष आहे तोंच गंगेंत रुद्रभाग म्हणून टाकून देतात. त्या ठिकाणीं हरिश्चंद्रराजाचें स्थान आहे. त्यास हरिश्चंद्राची मढी असें म्हणतात. या विषयीं अशी कथा आहे कीं, विश्वामित्रऋषीनें कांहीं कारणांवरून हरिश्चंद्रराजाचा अत्यंत छळ केला. शेवटीं त्या राजाकडून काशीक्षेत्रांत आपला पुत्र रोहिदास व स्त्री तारामती यांस विकण्याचा प्रसंग आणून, तसें करविलें. शेवटीं स्वतः राजा आपलें शरीर विकण्यास सिद्ध झाला. तेव्हां तेथील डोंबानें [ महारानें ] त्यास विकत घेतलें आणि जीं प्रेतें महास्मशान स्थलीं जाळण्यास येतील, त्यांचीं वस्त्रें घेण्याचें व त्यां पासून कर घेण्याचें काम त्यानें राजास सांगितलें. तें कर्म अत्यंत नीच होतें तरी राजा सत्वधीर होता, म्हणून त्यानें तें पतकारलें आणि पतकरल्या प्रमाणेंच करणेंही चालविलें. एकेदिवशीं राजाचा पुत्र रोहिदास यास सर्पदंश होऊन तो मरण

हरिश्चंद्राची मढी

पावला, त्यास दहन करण्याकरितां त्याची माता ह्मणज हारश्चंद्राची स्त्री तारामती ही मध्यरात्रीं त्या स्थळीं घेऊन आली. असा प्रसंग प्राप्तझाला असतां हरिश्चंद्रानें आपल्या धन्याच्या तर्फे जो कर घेणें होतें तो घेतल्यावांचून स्वपुत्राचें ही प्रेत दहन करूं दिलें नाहीं. हरिश्चंद्रानें आपले स्त्रीस व पुत्रास वळखिलें. परंतु त्या स्त्रीनें हरिश्चंद्रास वळखिलें नाहीं. आधींच पुत्रशोकानें ग्राशिलें, त्यांत दारिद्र्यामुळें कर देऊन पुत्राची सद्गती करण्यास सामर्थ्य नाहीं ह्मणून अत्यंत व्याकुळ होऊन"अहोहरिश्चंद्रमहाराज, तुह्मी तरी या प्रसंगीं कोठें आहां"असें म्हणून ती अत्यंत विलाप करूं लागली. परंतु राजानें सत्य सोडिलें नाहीं! अशी त्याची विलक्षण सत्वधीरतापाहून विश्वामित्र व सर्व देवही तेथें आले, आणि अत्यंत आश्चर्य पावून हरिश्चंद्रास म्हणाले कीं तुझें अद्भुत सत्व पाहून आह्मी संतुष्ट झालों. तर तूं इच्छित वर माग! हें एकून राजा बोलिलाकीं तुह्मी माझें इच्छित देणार तर वशिष्ठासारखागुरु, विश्वामित्रासारखाछलकर्ता, रोहिदासासारिखापुत्र, व तारामतीसारखी पत्नी जन्मोजन्मीं मला प्राप्त व्हावी, हेंच माझें इच्छित आहे, येवढे द्यावें ह्मणजे झालें! हें राजाचें मागणें पाहून इंद्रादिदेव फारच संतुष्ट झाले, आणि त्यांनीं राजाचा पुत्र रोहिदास यास जिवंत केलें. मग राजानें तेथें हरिश्चंद्रेश्वर नामें लिंग स्थापून, तो स्त्रीपुत्रांसहित आनंदानें आपले राजधानीस गेला अशी कथा आहे. हा प्रकार येथें झाला. या स्थलास हरिश्चंद्राची मठी ह्मणतात.

हरिश्चंद्रेश्वर

काशीपासून आठकोसांवर गोमती नदीचा आणि भागीरथीचा संगम झाला आहे. तेथें मार्कंडेश्वर या नांवाचें शिवस्थान आहे. हें स्थान फार रमणयि असून, त्याचें माहात्म्य पुराणांत बहुत वर्णिलें आहे. तेथें कोणी यात्रेकरी मुद्दाम संगम तीर्थी स्नानास व मार्कंडेश्वराचे दर्शनास जातात.

मार्कंडेश्वर

रघुनाथराव यांनीं चातुर्मास्यांत स्वस्थतेनें काशींतील सर्व यात्रा

केल्या. नंतर कार्तिकमासीं काशीचे सर्व मठांतील संन्याशांस भिक्षा केली. तेव्हां गयेकडे वेळूचे दंड चांगले मिळतात, ते मुद्दाम तेथून पुष्कळ आणविले. आणि प्रत्येक संन्याशास एकेक दंड दिला. कारण त्या ठिकाणीं दंड मोडला तर संन्याशास मोठी आडचण पडते. नंतर रघुनाथराव यांनीं दररोज दोनशें संन्यासी याप्रमाणें तीन दिवस लगत संन्याशांच्या भिक्षेचा [ भोजनाचा ] समारंभ केला. शेवटीं पंडित स्वामीस व त्यांजबरोबर त्यांचे लगतीचे संन्यासी व विद्यार्थी यांस भिक्षेस बोलावून रघुनाथराव यांनीं पंडितस्वामीस व त्यांच्या बरोबर भिक्षेस बोलाविलेल्या स्वामीस छाट्या दिल्या; पुढें विश्वेश्वर, बिंदुमाधव, अन्नपूर्णा, कालभैरव, धुंडीराज, यां देवांची महापूजा केली. त्या वेळीं देवांस पोषाख वगैरे दिले. नंतर पांच पक्वानांचें एक सहस्र ब्राम्हणभोजन केलें. त्यांत दर पात्रीं आठ आणे भोजनदक्षिणा दिली. हें कृत्य आटोपल्यावर मालेगांवकर राजेबहादर यात्रेस येऊन चार महिने काशीक्षेत्रीं राहिले होते, त्यांस रघुनाथराव यांनीं स्वतंत्र मेजवानी केली. याचप्रमाणें बाबाआपटे यांस मंडळीसह भोजनास बोलावून पोषाख दिला. काशींत बहुत दिवस राहाणें झाल्यामुळें पुष्कळ ग्रहस्थ मंडळीशीं रघुनाथराव यांचा परिचय झाला होता. त्यांस व चिमाजीआपासाहेबपेशवे यांचे पदरचे मंडळीस भोजनास बोलाविलें. असे प्रकारें रघुनाथराव यांनीं काशींतील बहुतेक कृत्यें शक्तीप्रमाणें उत्तम केलीं.

कार्तिक वद्य अष्टमी हा दिवस कालभैरवाचे अवताराचा होय. ते दिवशीं रघुनाथराव यांनीं उपोषण करून दुसरे दिवशीं ब्राम्हण भोजन केलें. काशीयात्रेस जातात त्यांस प्रतिवर्षी कार्तिक वद्य अष्टमीस उपोषण करून दुसरे दिवशीं कालाष्टक केलें पाहिजे, म्हणजे आठ तरी ब्राह्मण भैरव प्रीत्यर्थ जेऊं घातलेच पाहिजेत. या अष्टमीस काशी येथें कालभैरवाचे मंदिरांत मोठा उत्सव होऊन मेळा भरतो. हें कालाष्टक झाल्यावर पुढें रघुनाथराव यांनीं कार्तिक

कालाष्टमी कार्तिकव.८

कालाष्टक

वद्य द्वादशीपासून काशी क्षेत्रांतील मुख्य देवता व स्थानें ह्यांचें पुन्हा दर्शन घेतलें. रघुनाथराव यांचें काशीक्षेत्रीं एकंदर दहा महिने राहाणें झालें. यांत ज्ञात अज्ञात जीं पातकें झालीं, व मलमूत्रादिकांचा उत्सर्ग या क्षेत्रीं झाल्यामुळें त्या पासून जो दोष उत्पन्न झाला, त्याच्या निरासार्थ प्रायश्चित संकल्प करून रघुनाथराव यांनीं पुन्हां पंचक्रोशी यात्रा केली. जे दिवशीं ते पंचक्रोशी यात्रेहून परत आले, तेच दिवशीं त्यांनीं ब्राह्मणभोजन करून क्षेत्रमर्यादेंत मलमूत्राचा उत्सर्ग न करितां, विश्वेश्वर, अन्नपूर्णा, धुंढिराज, गणपति [ काशीक्षेत्राचे मुख्य अधिपति, ] अविमुक्तेश्वरमहादेव, भैरव, मणिकर्णिकातीर्थ यांची आज्ञा घेऊन पंचक्रोशीच्या सीमेबाहेर आसी संगमासन्निध करवे यांचे धर्मशाळेंत येऊन मुक्काम केला. जे दिवशीं काशीक्षेत्राचा वियोग होतो, ते दिवशीं भाविक यात्रेकरू लोकांचे अंतःकरणास फार दुःख होतें! काशीहून निघतेवेळेस अविमुक्तेश्वर महादेवाचा निरोप घेतांनां जर त्या देवावर बिल्वपत्र असून तें बिल्वपत्र घेऊन बरोबर आणिलें आणि त्याचें उत्तम प्रकारें रक्षण केलें तर पुन्हां काशीस जाणें होतें असें सांगतात. परंतु तें बिल्वपत्र राहात नाहीं असा अनुभव किती एकांनीं घेतला आहे. असो, याप्रमाणें रघुनाथराव यांच्या काशीतील कृत्यांचें निरूपण केलें. आतां त्यांच्या गयायात्रेचें निरूपण करितों.

प्रायश्चितार्थ पुन्हा पंचक्रोशी यात्रा

काशीयात्रा समाप्ति

रघुनाथराव यांनीं करवे यांचे धर्मशाळेंत येऊन मुक्काम केला हें वर सांगीतलेंच आहे. येथें आल्यावर त्यांनीं गयायात्रेचे उद्देशानें घृतश्राद्ध करून पिंडदान केलें. या श्राद्धांत सर्व पदार्थ घृतप्रधान असतात ह्मणून यास घृतश्राद्ध असें ह्मणतात. तें झाल्यावर रघुनाथराव यांनीं गंगेच्या पार लहान गांव आहे तथें जाऊन भोजन केलें, आणि तेथेंच मुक्काम केला. नंतर क्रमानें कर्मनाशा नदी लागते. त्या नदीचे जलस्पर्शाचा निषेध आहे. या नदीस पाणी विशेष नसतें. प

गयायात्रेचा उपक्रम

कर्मनाशा नदी

---

टीप १. ॥ श्लोक ॥ गंडकीबाहुतरणात्, करतोयाविलंघनात्॥

रंतु तिचे पाण्याच्या स्पर्शाचा निषेध असल्यामुळें पूर्वी यात्रेकऱ्यांस
ती नदी उतरण्याला फार अडचण पडत असे. या करितां नानाफड
णवीस यांनीं या नदीस पूल बांधिला. आलीकडे इंग्रेजांनींही पूल
बांधिला आहे असें ऐकतों. पुलाच्या योगानें कर्मनाशा नदीच्या पा
र गेल्यावर पुढें सुवर्णभद्र नामें नद लागतो. त्याचे तीरीं रघुनाथराव
यांचा मुक्काम झाला. हा नद ब्रह्मदेवाचा पुत्र होय अशी कथा आहे. सुवर्णभद्रनद
तेथें रघुनाथराव यांनीं स्नान, प्रायश्चित, श्राद्ध, व पिंडदान केलें. या
नदाचें पात्र दीड कोसाहून जास्त रुंद आहे. त्यांत पाणी एकसारखें
नसून कमजास्त असल्यामुळें मध्यें ठिकाठिकाणीं नावेंत बसून उतरा
वें लागतें. तेथें रेती अतिशय असल्यामुळें गाड्या चालण्यास फार
आयास पडतात. तो नद उतरण्यास रघुनाथराव यांस समग्र एक
दिवस लागला! तेथून क्रमानें रघुनाथराव यांचा पुनःपुना नामक न
दीवर मुक्काम झाला. तेथें तीर्थभेट, अर्घ्य, सचीलस्नान, प्रायश्चित, पुनःपुनानदी
मुंडन, श्राद्ध, पिंडदान हा सर्व विधि करावा लागतो. या ठिकाणीं
विंचुरकरांचा गयावळ मेहेरवार ह्मणून आहे तो रघुनाथराव यांच्या
भेटीस आला. तेथून गयाक्षेत्र जवळ आहे. या प्रदेशास मगध दे
श असें नांव आहे. हा मगध देश सर्व पृथ्वीचा मल असल्यामुळें मगधदेश
अपवित्र आहे! ह्या देशांत मरण झालें असतां गर्दभाचें जन्म प्राप्त
होतें असें पुराणांत आहे. परंतु मगध देशांत देखिल चार स्थळें पवि
त्र धरिलीं आहेत तीं गया, पुनःपुना, च्यवनाश्रम, आणि राजगृह,
हीं होत. पुनःपुनेच्या तीरींच थोडे अंतरावर च्यवनभार्गवाचा आश्रम आहे.
तेथें यात्रेकरी क्वचित जातात. राजगृह हें गयेपासून पंचवीस को- च्यवनाश्रम राजगृह

|| कर्मनाशानदीस्पर्शात्, पुनः संस्कारमर्हति || १ ||

भावार्थ—गंडकीमध्यें बाहूनीं तरून गेलें असतां, करतोया नदीचें उल्लंघन के
लें असतां व कर्मनाशानदीचा जलस्पर्श केला असतां पुन्हां उपनयन केलें पाहिजे.

टीप १. || श्लोक || मगधेषुगयापुण्या, नदीपुण्यापुनःपुना ||
|| च्यवनस्याश्रमःपुण्य, पुण्यंराजगृहंस्मृतं || १ ||

सांचे अंतरावर आहे. तें जरासंधराजाचे राजधानीचें स्थान होय.
गया पुन:पुनेहून गयेस गेल्यावर तेथें रघुनाथराव यांस उतरण्याकरितां गयावळ यांनीं एक वाडा तयार करून ठेविला होता. तेथें रघुनाथराव यांनीं मुक्कामास जाऊन फल्गुतीर्थी भेट, अर्ध्य, सचिलस्नान,
फल्गु गदाधर विष्णुपद प्रायश्चित वगैरे केलें. गयाक्षेत्रीं मुंडन व उपवास वर्ज्य आहे. रघुनाथराव यांनीं गदाधर व विष्णुपद यांचें दर्शन घेतलें, ते वेळेस गयावळ ब्राम्हणांस भूयसी दक्षिणा वाटावी लागते. ती वाटल्यावर त्यांनीं दुसरे दिवशीं फल्गुतीर्थप्रयुक्त श्राद्ध, व पिंडदान केलें. या श्राद्धास गयावळ ब्राह्मण भोजनास सांगावे लागतात.

गयाक्षेत्रीं ब्रह्मदेवांनें ब्राह्मणास स्थापून त्यांस सर्व क्षेत्राचा अधिकार दिला. आणि सर्व ऋषींस आज्ञा केली कीं, या क्षेत्रीं यांचें पूजन केलें पाहिजे. हे संतुष्ट होत्सातां ज्यास "तुझे पितरांस स्वर्गवास प्रात्प होईल" असें म्हणतील, त्याचे पितर निश्चयानें स्वर्गास जातील. यां ब्राह्मणांस पितरांचे उद्देशें जे दानादिक करतील, त्यास त्याचे कोटी गुण फल मिळेल. असी ब्रह्मदेवांनें यांची एथें स्थापना केल्यावर कालें करून रामचंद्र हे पिता दशरथ याचे उद्देशें विष्णुपदीं पिंडदान करण्यास आले. तेव्हां रामानीं येथील ब्राम्हणांस सुवर्णाचा एक व रुप्याचा एक असे दोन अक्षय पर्वत करून दक्षिणा दिली ! व दुधाची नदी व मधाचीनदी उत्पन्न करून तीही त्यांस दक्षिणा दिली! आणि सांगितलें कीं, या पुढें तुह्मी कोणापाशीं याचना अगर प्रतिग्रह करूंनये. असें जाल्यावरही धर्मारण्यांत धर्मऋषीनें [ नरनारायणांचा पिता यास धर्म असें नांव आहे त्यानें ] यज्ञ केला तेथें क्षेत्रस्थ ब्राह्मण द्रव्य मागण्याकारितां जाऊन त्यांनीं प्रतिग्रह केला! हें रामचंद्रांनीं पाहून ब्राह्मणांस शाप दिला कीं, तुह्मांस अक्षय द्रव्य दिलें असतां तुम्ही याचना करून प्रतिग्रह केला ! यास्तव तुम्हांस कोणी किती जरी द्रव्य दिलें तरी तुमची आशा पूर्ण होणार नाहीं ! व सुवर्णाचे व रुप्याचे पर्वत आहेत ते पाषाणाचे होऊन, दुधाचीनदी व

मदाचीनदी आहे, त्यांतील दुधाचें व मदाचें उदक होईल. आणि तुम्ही वेद व धर्म आणि आचार यांपासून भ्रष्ट व्हाल! असा रामचंद्राचा शाप झाला, तेव्हां दुधाचीनदी होती ती गुप्त झाली यामुळें फल्गूसपाणी नाहीं. नदीचे पात्र उकरलें ह्मणजे पाणी पुष्कळ आढळतें. फलगुचे स्नान करिताना एक ओंजळभर रेती काढून मग स्नान करावें, असा विधि आहे. नदींत उकरलें असतां मोठाले मासे निघतात व ते जिवंत असतात. ठिकठिकाणीं स्नानाकरितां रेतीउकरण्यास गयावळाकडून नेहमीं माणसें ठेविलेलीं असतात. मदाचीनदी गुप्त झाली तिचा प्रवाह जेथून निघाला त्या स्थलास मधुस्रव असें नांव आहे. तेथें श्राद्ध करावें लागतें. सोन्याचे व रुप्याचे पर्वत होते ते पाषाणाचे झाले. हल्लीं ज्यास प्रेतपर्वत ह्मणतात, त्याचे शिखरावर सोन्यासारखी रेषा आहे. त्यावर पिंडदान करावें लागतें. याच प्रमाणें हल्लीं ज्यास रामपर्वत ह्मणतात त्यावर रुप्याचीरेषा आहे. तेथेंही पिंडदान करावें लागतें. शाप झाल्यावर ब्राह्मणांनीं रामाची स्तुति केली. तेव्हां या क्षेत्रीं यात्रस्थ तुमचें पूजन करतील व तुमच्या वाणीनें त्यांचे पितर उत्तम गतीस जातील, वरकड ठिकाणीं मात्र तुह्मी अपंक्त रहाल; असा त्यावर रामचंद्रांनीं अनुग्रह केला! सर्व शाखेचे ब्राह्मणांस अग्निहोत्र व संन्यास याविषयीं अधिकार आहे; परंतु माथुर ह्मणजे मथुरेंतीलचोबे, व मागध म्हणजे गयावळ यांस दोन्ही कृत्यांचा अधिकार नाहीं.

मधुस्रव

प्रेतपर्वत

रामपर्वत

पुढें रघुनाथराव यांनीं गयाक्षेत्रापासून कांहीं अंतरावर प्रेतपर्वतासन्निध ब्रह्मकुंडनामेंतीर्थ आहे. त्याचें स्नान करून, समीप प्रेततीर्थ आहे, त्याचें उदक मलीन असतें, तेथें स्नान केलें. मग कुंडासन्निध धर्मशाळेंत प्रेतपर्वत संबंधीं श्राद्ध केलें. त्या श्राद्धास तेथील अधिकारी जे ब्राम्हण असतात, त्यांस प्रेते म्हणतात! ते अगदीं कलाहीन असून मोठे भक्षक असतात! त्यांस श्राद्धीं भोजनास सांगून श्राद्ध करावें लागतें! त्याप्रमाणें रघुनाथराव यांनीं श्राद्ध केलें. नंतर प्रे

ब्रह्मकुं

प्रेतब्रा

तपर्वतावर जाऊन सुवर्णरेषेवर पिंडदान वगैरे श्राद्धकृत्य केलें. तें आटपल्यावर पितृगणांचा क्रमानें उच्चार करावा लागतो, तो त्यांनीं केला. ते समयीं तेथील अधिकारी प्रेते हे कान धरितात आणि मोठ्यानें बोंबलतात. त्यांस प्रत्येक पितृगणाचे नांव सांगावें, तें नांव घेऊन "उद्धरले! उद्धरले!" असें म्हणून ते गोंबा मारतात. हे प्रेतब्राम्हण यात्रा गयेस आली म्हणजे तीस सामोरे जाऊन यात्रस्थांस पहातांच दहा वीस जणमिळून एकदांच बोंबलतात! तें पाहून यात्रस्थांस आश्चर्य वाटतें! प्रेतपर्वत संबंधीं कृत्य करून रघुनाथराव हे घरीं आले. दुसरे दिवशीं रामपर्वतासन्निध रामकुंड म्हणून तीर्थ आहे, त्या तीर्थीं श्राद्ध करून रामपर्वतावर जाऊन त्यांनीं पिंडदान केलें. नंतर खालीं येऊन मार्गांत एक वटवृक्ष आहे, त्या खालीं काकपिंड म्हणजे काकबली देण्याचा विधि आहे, त्याप्रमाणें काकबली देऊन ते घरीं आले.

रामकुंड वटवृक्ष काकबली

गयायात्रेतील श्राद्धविधिसांगण्यास दक्षिणी ब्राम्हण असतात. ते चांगले विद्वान् आहेत. त्यांस षोडसी म्हणतात. ते क्रमानें यात्रिकांस श्राद्धविधि सांगतात. गयाश्राद्धीं सपत्नीक सर्व पितृगणांचा उच्चार न करितां, पृथक् पृथक् उच्चार करून श्राद्ध व पिंडदान करावें लागतें. पितृगणांशिवाय पंचेचाळीस पिंड प्रतिश्राद्धीं वेगळे द्यावे लागतात. त्यां संबंधीं कांहीं श्लोक आहेत. हा श्राद्धक्रम काशीहून निघतांनां रघुनाथराव यांनीं सर्व पाठ केला होता. येणेंकरून श्राद्ध तंत्र होण्यास उशीर लागत नसे. पुष्कळ पिंडदान करणारी यात्रा असली म्हणजे दहा पांच मिळून एक षोडसीब्राम्हण श्राद्धविधि सांगण्याकरितां असतो, त्यानें पिंडदानाचे श्लोक म्हणून टाळी वाजविली म्हणजे सर्वांनीं पिंड ठवावे, अशी चाल आहे. प्रत्येक यात्रेकरी यास पिंडदानसाहित्याचे टोपलें घ्यावें लागतें. त्यांत चरु शिजविण्याचीं मडकीं वगैरे सर्व सरंमजाम असतो. त्यास खापर म्हणतात. त्या एकंदर पिंडदानाचे सरंमजामाचा मक्ता साडेसातरुपये व पंधरारुपये

षोडशी ब्राम्हण गयाश्राद्ध विधि

सरंजामाचें टोपलें (खापर)

असा आहे. कमी किंमतीचे खापरांत जिन्नस चांगला नसतो. प्रतिदिवशीं उचापतवाला यात्रेकरास संध्याकाळीं तें खापर पावतें करतो. जिन्नस देणारावर गयावळाचा कर आहे. सर्व यात्रेकरी हस्त श्राद्ध करीत नाहींत. फक्त पिंडदानें करितात. विष्णुपदीं मात्र श्राद्ध करून पिंडदान करितात अशी रीत आहे.

प्रत्येक स्थानीं प्रत्यक्ष श्राद्ध कर्तव्य असतां तीं स्थानें वेगळ वेगळे प्रदेशीं असल्यामुळें दोन प्रकारचा स्वयंपाक करणाऱ्यासुद्धां वेगळी तयारी करून ज्या स्थलीं श्राद्ध कर्तव्य असेल, तेथें पूर्वी रवाना करावें, नंतर मागून आपण जाऊन श्राद्ध करावें, याप्रमाणें रघुनाथराव यांनीं व्यवस्था ठेविली होती. या क्रमाप्रमाणें रघुनाथराव यांचे हातून प्रत्यहीं बहुधा दोन श्राद्धें होत असत.

पुढें क्रमानें पंचतीर्थावर रघुनाथराव यांनीं श्राद्धें केलीं. प्रथम उत्तर मानस चंद्रकुंडीं श्राद्धपिंडदान करून फल्गुपयोष्णीतीर्थी श्राद्ध पिंडदान केलें. नंतर घरीं आले. दुसरे दिवशीं सूर्यकुंडीं श्राद्ध व पिंडदान करून उदीच्यतीर्थी श्राद्ध व पिंडदान केलें. तच दिवशीं कनखलतीर्थी श्राद्ध व पिंडदान जालें. त्या दिवशीं त्यांनीं तीन श्राद्धें केलीं. नंतर कनखलतीर्था समीप सूर्याचें स्थान आहे, त्याचें दर्शन घ्यावें लागतें. तें घेऊन पित्रेश्वर, पितामहेश्वर, प्रपितामहेश्वर, हे देव आहेत, त्यांचीं दर्शनें करून ते घरीं आले. नंतर त्यांनीं भोजन केलें. त्या दिवशीं त्यांना भोजनास रात्र झाली. बहुत करून प्रतिदिवशीं त्यांस भोजनास चार वाजत असत. दुसरे दिवशीं क्रमप्राप्त गदाधराची पंचामृत पुरस्सर महापूजा करून त्यांनीं विराम केला. नंतर गयेपासून बरेच अंतरावर धर्मारण्य म्हणून स्थान आहे, तेथें सरस्वती दर्शन करून, मतंगतीर्थी श्राद्ध पिंडदान केलें. आणि मतंगेश्वराचें दर्शन करून कूपतीर्थी श्राद्ध पिंडदान केलें. नंतर धर्मऋषि व त्याची स्त्री मूर्ति यांचे दर्शन करून तेथेंच मुकाम केला. दुसरे दिवशीं यूपस्थानीं श्राद्ध करून पिंडदान केलें. नंतर यूपकूपामध्यें श्राद्ध

पंचतीर्थे
उत्तरमानस
चंद्रकुंड
फल्गुपयोष्णी
सूर्यकुंडतीर्थ
उदीच्यतीर्थ
कनखलतीर्थ
पित्रेश्वर
पितामहेश्वर
प्रपितामहेश्वर
गदाधरपूजा
धर्मारण्य
सरस्वती
मतंगतीर्थ
मतंगेश्वर
कूपतीर्थ
यूपस्थान

पूपकूप करून पिंडदान केलें. येथें यात्रेकरी क्वचितच पिंडदान करतात. अशीं दोन श्राद्धें झाल्यावर रघुनाथराव यांनीं धर्मशाळेंत मुक्कामाचे जागीं आल्यावर भोजन केलें. नंतर दुसरे दिवशीं बौध्दगया स्थानीं एक अश्वथ्थवृक्ष आहे, त्याचे मूलीं श्राद्ध करून पिंडदान केलें. नंतर जगन्नाथनामें देव आहे त्याचें दर्शन घेतलें. हा अश्वत्थ वृक्ष जुना आहे. त्याचे लगत बौद्धाचें मंदिर बहुत पुरातन आहे. तेथें बौद्धमताचे लोक यात्रेस येतात. या स्थानास ते लोक बौद्धाचें मुख्य स्थान असें मानितात. तेथून ब्रह्मसरोवर नामें तीर्थ आहे. त्या तीर्थी जाऊन त्यांनीं पिंडदान केलें. त्या स्थलीं एक आम्रवृक्ष आहे, त्याचे मूलीं पितृतर्पण करावें लागतें, त्यास आम्रसिंचन असें म्हणतात.

बौद्धगया
अश्वत्थवृक्ष.
जगन्नाथ.
ब्रह्मसरोवर तीर्थ
आम्रवृक्ष
आदिगदाधर

तेथें जवळच आदिगदाधराचें स्थान आहे. त्याचें दर्शन करून एक पिंड काकबली म्हणून समंत्रकद्यावा लागतो, तो रघुनाथराव यांनीं देऊन धर्मेश्वराचें दर्शन घेतलें. नंतर गयेस मुक्कामाचे जागीं येऊन भोजन केलें. त्या दिवशीं त्यांना भोजनास फार रात्र झाली.

धर्मेश्वर

पुढें त्यांनीं अष्टादशपदीं श्राद्धें केलीं. हीं पदें विष्णुपदाचे मंदिराबाहेर लगत आहेत. या पदावर पूर्वी छाया नव्हती. यास्तव यमाजीपंतअण्णा म्हणून विंचूरकराचे पोतनीस होते, त्यांनीं त्यांच्यावर दगडीमंडप फार चांगला बांधिला, त्या योगें फार उपयोग झाला. तेथें खडक समान आहे व त्या समान खडकावरच तीं अष्टादश पदें आहेत. तीं जशीं चिखलांत पावलें उमठतात तशीं नाहींत, तर खडकावर पदाचे आकृतीचे काळे डाग[१] आहेत, त्या पैकीं सूर्यपदाचा डाग मात्र तांबडा आहे. हे डाग अगदीं स्वच्छ पाय उमटतो तसे आहे

अष्टादशपदें.

---

टीप १॥ श्लोक ॥ एकोमुनिःकुंभकुशाग्रहस्तआंम्रस्यमूलेसलिलंददाति ॥
आंम्रश्वसिक्तःपितरश्च तृप्ताएकाक्रियाद्व्यर्थकरीप्रसिद्धा ॥ १ ॥

भावार्थ कोणी एक ऋषि हातांत जलकुंभ आणि दर्भ घेऊन आंब्याच्या मुळाशीं उदकदान करितो या योगें आंब्याला पाणी मिळून पितरांची तृप्ति होते. अशी एकच क्रिया करून दोन कार्ये साधतात.

न, असें लक्ष्यपूर्वक पाहिलें ह्मणजे ध्यानांत येतें. असो, त्या ठिकाणीं मंदिरांतील धर्मशाळेंत वेगळाले स्वयंपाक करून रघुनाथराव यांनीं कश्यपपदीं श्राद्ध केलें. पदें आहेत तेथें पिंडदान करणारे फार असतात, त्यामुळें बहुत घोंटाळा होतो, व ती जागा बहुत करून खरकटी असते, या करितां रघुनाथराव यांनीं पहिल्यानें प्रथम पिंडदानापुरती जागा चांगल्या स्वच्छ पाण्यानें धुववून पदापुरती कनाथ लावावी, आणि त्या कनाथीच्या आंत बसून पदावर पिंडदान करावें, असा त्यांनीं क्रम चालविला. त्यांत प्रथम दिवशीं कश्यप, अगस्ती, व क्रौंच या तीन पदीं श्राद्धें व पिंडदानें केलीं. या प्रमाणेंच दुसरे दिवशीं मतंग, कण्व, व दधीचि या तीन पदीं, आणि तिसरे दिवशीं गणेश, चंद्र, व आह्वावनीयअग्नि या तीन पदीं, व चौथे दिवशीं दक्षिणाग्नि, इंद्र व सूर्य या तीन पदीं, व पांचवे दिवशीं गार्हपत्यअग्नि, आवसथ्याग्नि, व सभ्याग्नि, या तीन पदीं, आणि सहावे दिवशीं कार्तिकेय, ब्रह्म, व रुद्र, या तीन पदीं श्राद्धें व पिंडदानें करून त्या नंतर त्याच दिवशीं गजकर्ण गणपति व मोदादिपंचविनायक मिळून एक पिंड द्यावा लागतो, तो देऊन रघुनाथराव हे घरीं आले. अष्टादशपदीं पिंडदानाची समाप्ति ज्या दिवशीं होईल, त्या दिवशीं रात्रीं सुवर्ण, रौप्य, तांबें, मृत्तिका, यांचीं शक्तीप्रमाणें दीपपात्रें करून त्यांत दीप लावावे, ते दीप प्रत्येक पदीं दान द्यावे, असा विधि आहे. त्याप्रमाणें रघुनाथराव यांनीं रुप्याचें पात्रांत दीप लावून अस्तमानीं दीपदानें केलीं. शिवाय अष्टादश पदांचे असमंतात पुष्कळ दीप लाविले. पुढें प्रातःस्नान झाल्यावर त्यांनीं गाईचे दुधानें प्रत्येक पदीं पितृतर्पण करून ते दिवशीं विराम केला. दुसरे दिवशीं पितृस्थानीं ब्राह्मण बसवून त्यांनीं विष्णुश्राद्ध घरीं केलें. नंतर विष्णुपदीं पिंडदान केलें. तेव्हां गयावळांनीं गर्भगृहांचीं द्वारें बंद केलीं. मग रघुनाथराव यांनीं स्वस्थतेनें विष्णुपदीं पिंड समर्पण केलें! विष्णुपदावर नियमित पिंडदानें झालीं, ह्मणजे इच्छा असेल त्याचे नांवें पिंडदान करा

कश्यप. अगस्ति. क्रौंच मतंग कण्व दधीचि गणेश चंद्र आह्वनीय दक्षिणाग्नि इंद्र सूर्य गार्हपत्य आवसथ्य सभ्य कार्तिकेय ब्रह्म रुद्र

विष्णुपद.

वें असा विधि आहे. त्यावरून रघुनाथराव यांनीं कुलयजमानाचे वंशातील माधवरावनारायणपेशवे ज्यांस सवाईमाधवराव असें ह्मणतात, त्यांस यजमान ह्मणून; पित्याचे गुरु रघुनाथभटजीमहाराज, यांस परमगुरु ह्मणून; पित्याचे पहिले घरचे तीर्थरुप गोपाळपरशराम, व कन्येप्रमाणें ज्यांनीं मातोश्रीचें पालन केलें, ते गणपतरावभाऊपानसे, या उभयतांस आप्त ह्मणून; पित्याची एक निष्ठेनें सेवा केली असे बाळोबाबाबासालकाढे व काशीपंतबाबाजोगळेकर या उभयतांस पितृसेवक ह्मणून; कृष्णाजीशामराव उर्फ कुशाबातात्यासालकाढे यांचें चिरंजीव रामचंद्रकृष्ण, यांस मित्र ह्मणून; याप्रमाणें प्रत्येकाचा स्वतंत्र संकल्प करून अनुक्रमानें पिंडदानें केलीं. नंतर रघुनाथराव यांनीं विष्णुपदाची पूजा करून ते बाहेर मंडपांत आले, आणि तेथें रंग शिलेवर उभे राहून त्यांनीं ईश्वराची प्रार्थना केली. त्या वेळेस भाविक यात्रेकरी याच्या मनास कांहीं विलक्षण भावना होते, ती सांगतां येत नाहीं. तशी भावना रघुनाथराव यांचे अंतःकरणांत उत्पन्न झाली. असो, ईश्वराची प्रार्थना झाल्यावर त्यांनीं मोदादिपंचविनायकाचें दर्शन केलें. याप्रमाणें रघुनाथराव यांनीं विष्णुपदीं पिंडदान करून सु-

रुक्मिणीतीर्थ गदालोलतीर्थ वासिनीसह ब्राह्मणभोजन केलें. दुसरे दिवशीं रुक्मिणीतीर्थी व गदालोलतीर्थी अशीं दोन ठिकाणीं श्राद्धें करून ते घरीं आले. नंतर

अक्षय्यवट त्यांनीं अक्षय्यवटीं श्राद्ध केलें. हा दिवस गयावळ यांचा मुख्य मागण्याचा असतो. ते दिवशीं रघुनाथराव यांचा गयावळ हा अंगावर पुष्कळ अलंकार घालून मोठ्या थाटानें रघुनाथराव यांजकडे श्राद्ध भोजनास आला. श्राद्धझाल्यावर रघुनाथराव यांनीं अक्षयवट मूलीं पिंडदान केलें. नंतर गयावळांची पूजा करून त्यास कापड दिलें तें

गयावळ याची पूजा व बिदागी असें:—भरगच्ची किनखाबीअंगरखा, व त्याचप्रमाणें विजार, पल्लेदार शेला, बालमंपंचीपागोटें, शालजोडी, धोतरजोडा, याप्रमाणें वस्त्रें देऊन त्यांजवर पांचशेंरुपयेरोख दक्षिणा दिली नंतर गयावळ यानें फुलांचे माळेनें रघुनाथराव यांचे हात बांधिले व एक फुलांची माळ

ह्मातानें त्यांच्या पाठीवर ठेवून तो 'आणखी कांहीं द्या' असें ह्मणून मागूं लागला. तेव्हां रघुनाथराव यांनीं एक घोडा, व बैलाचा रथ, हीं दोन दानें देऊन दानसांगतार्थ दोनशेंरुपये रोख दिले. त्यावर गयावळ हा 'महाराज येथें भूमिदान व ग्रहदान हें अवश्य झालें पाहिजे' असें म्हणून तें मागूं लागला. त्यावरून रघुनाथराव यांनीं आपले विंचुरइलाख्यांतील जहागिरीपैकीं कोटमगांव तालुके निफाड या गांवीं जमीन बिघे ११० दर बिघा रुपाया एक प्रमाणें ११० रुपये उत्पन्नाची व विंचूर येथील एक घर, असें दान देऊन त्यावर शंभररुपये दानसांगतार्थ दिले. त्यावर 'आणखी कांहीं तरी द्या ह्मणजे हात सोडीन' असें गयावळानें ह्मटलें. तेव्हां रघुनाथराव यांनीं आणखी तीनशेंरुपये रोख दिले! त्यावर गयावळ ह्मणाला कीं, "महाराज! अक्षय्यवटाकडे पहा! विष्णुचरणाचें स्मरण करा, व वित्तशाठ्य करूं नका! कारण ह्मा सर्व पितरांचा उद्धार होण्याचा समय आहे! आणि तो उद्धार आम्हास संतुष्ट केल्यानें होणार! हा प्रसंग वारंवार यावयाचा नाहीं. यास्तव आता मला संतोष होईल असें कांहीं द्या!" मग रघुनाथराव यांनीं आणखी तीनशेंरुपये दिले. त्यावर गयावळानें गाय मागीतली तेव्हां गाईबद्दल त्यांनीं पन्नासरुपये दिले. तेव्हां गयावळानें रघुनाथराव यांचे हात सोडून ह्मटलें कीं "अहो यजमान आतां मी संतुष्ट झालों! तुमचे सर्व पितृगण माझे वाक्यें करून उत्तम लोकास जातील! नारायण त्यांस अक्षय्य लोक देईल!" असें बोलून त्यानें रघुनाथराव यांची पाठ थोपटली! तेव्हां रघुनाथराव यांच्या अंतःकरण वृत्तीस अत्यंत आल्हाद होऊन मोठी कृतकृत्यता वाटली! कसेंही अंतःकरण दृढ व कठोर असलें तरी त्या समयीं त्यास द्रव येतोच असें सांगतात. हे कृत्य झाल्यावर रघुनाथराव यांनीं तेथें भोजन केलें. नंतर सायंकाळीं गयावळ यास घोडा दिला होता, त्या घोड्यावर त्याला पोषाखासुद्धां बसवून वाजंत्री वगैरे वाद्यांचाघोष करीत व दारु सोडित तेथील रीतीप्रमाणें गयावळाची

मिरवणूक काढून त्यास मोठ्या समारंभानें त्याचे घरीं पावतें केलें. त्या मिरवणुकींत विंचुरकर यांचे बरोबरचे शिपाईलोक यांनीं बंदुकाचे अवाज केले, तेव्हां त्यांत कांहीं चूक होऊन हुसेन नावें जमादार होता, त्याचे मुलानें कंबरेस दारूचा शिंगडा बांधिला होता, त्यास आग लागली त्यामुळें अतिशय घोंटाळा झाला! त्यावेळीं शिंगड्यांत दारू फार नव्हती ह्मणून बरें झालें! ह्या घोटाळ्यांत तीन शिपाई दारूनें बरेंच भाजले! परंतु ईश्वरकृपेनें कोणी जाया जालें नाहीं! त्या तिघांजणांस मात्र एक महिन्याचें दुखणें झालें! असो; याप्रमाणें गयावळ यास मोठ्या समारंभानें घरीं पोंचविल्यावर रघनाथराव हे आपले बिऱ्हाडीं आले. अशा रीतीनें रघुनाथराव यांनीं अक्षयवटश्राद्ध करून गयावळ याची बिदागी केली. या वटाला पूर्वी पार नव्हता व तेथें श्रात्धकरण्यास वगैरे मोठी अडचण पडत असे, परंतु विंचूरकराचे पोतनीस यमाजीपंतअण्णा यांनीं त्या वटास फार चांगला पार बांधिला व तेथें एक धर्मशाळा बांधिली, त्यामुळें तेथीलची सर्व अडचण दुर झाली. अक्षय्यवटवृक्ष पन्नास वर्षांपूर्वी सुकत जाऊन त्याची एकच फांदी ओली राहिली होती. त्या समयीं गयावळांनीं पुष्कळ प्रकारचीं खतें खातलीं. व शुष्कझालेल्या फांद्यांस कांहीं औषधी लावून ईश्वराचें आराधन केलें तेव्हां चांगली फांदी होती तिला अंकुर फुटून तो वृक्ष ते समयीं चांगला होत चालला होता. व तो हल्लीं उत्तम झाला आहे असे ऐकतों. अक्षयवटश्रात्ध झाल्यावर रघुनाथराव यांनीं विष्णुपदावर दुधानें तर्पण करून यात्रेस आरंभ केला. प्रथम दिवशीं रामयगेवर श्रात्ध व पिंडदान करून मधुस्रवस्थानीं श्रात्ध व पिंडदान केलें. नंतर पुंडरीकाक्षाचें दर्शन घेऊन गयाशिरावर श्रात्ध पिंडदान केलें. तेथें जनार्दन ह्मणून देव आहे, त्याचें दर्शन घेऊन रघुनाथराव घरीं आले. नंतर प्रातःस्नान करून नित्य विधि जाल्यावर गयाकूप ह्मणून तीर्थ आहे, तेथें श्रात्ध वगैरे करून त्यांनीं मंगलागौरी नामें देवीचें दर्शन केलें. तेथून मुंडपृष्ठ ह्म-

गयाक्षेत्र संबंधीयात्रा
रामगया
मधुस्रव
पुंडरीकाक्ष
गयाशिर
गयाकूप
मंगलागौरी
मुंडपृष्ठ

णून स्थान आहे तेथें श्राद्धादिकरून ते आदिगया ह्मणून स्थान आ आदिगया
हे तेथें जाऊन तेथील श्राद्धपिंडदानादि विधि आटपून ते घरीं आले.
या दिवशीं त्यांनीं एकंदर तीन श्राद्धें केलीं. पुढें त्यांनीं धौतपदीं श्रा धौतपद
द्ध केलें. हें पद फार चमत्कारिक आहे. तेथील श्राद्ध झाल्यावर त्यां
नीं भीमगया स्थानीं श्राद्ध करून मग गोप्रचार स्थलीं श्राद्ध केलें. ते भीमगया
थें गोपदावर पिंडदान करावें लागतें. येथें मोठा खडक आहे, त्यावर गोप्रचार गोपद
गाईचीं व वासरांचीं शेकडों पावलें उमठलेलीं आहेत. तेथून वैतरणी
तीर्थी श्राद्धपिंडदान करून ते घरीं आले. तेथपर्यंत जितकीं श्राद्धें झा वैतरणी
लीं, तीं गयायात्रा पद्धतीनें झालीं, त्या श्राद्धांस गयावळ ब्राह्मण
होते. येथून पुढें त्यांचा संबंध सुटतो.

दुसरे दिवशीं रघुनाथराव यांनीं स्वदेशी ब्राह्मण सांगून घरीं म विष्णुश्रा-
हालयाप्रमाणें विष्णुश्राद्ध केलें. नंतर विष्णुपदीं जाऊन पिंडदान के- द्ध अथवा
लें. यासुद्धां विष्णुपदीं दोनवार पिंडदान होतें. या श्राद्धास न्युनाति न्युनातिरि-
रिक्त दोषशांतिकर श्राद्ध असें ह्मणतात. क्तदोषशांतिकरश्राद्ध

रघुनाथराव यांचें प्रथम कुटुंब काशीबाई यांचें त्यांनीं धर्मपुत्र-
द्वारा स्वतंत्र गयावर्जन करविलें. जनार्दनाचे हातावर समंत्रकपिंड दि
ला, म्हणजे पुढें आपले पश्चात् तो पिंड जनार्दन हा विष्णुपदीं दे
तो, असें गयामाहात्म्यांत सांगितलें आहे. परंतु हा विधि जो अपुत्रि
क असेल त्यानें करावयाचा आहे. यास्तव त्या समयीं रघुनाथराव
यांस संतानाची निराशा जाली नव्हती, ह्मणून त्या वेळीं जनार्दना
चे हातावर त्यांनीं पिंड दिला नाहीं असो.

पुढें त्रिसंध्यायात्रा करावी लागते ती रघुनाथराव यांनीं केली. त्रिसंध्या
ती क्रम असाः—प्रथम सूर्योदयीं गायत्रीतीर्थी स्नान करून प्रातःसं गायत्री
ध्या तर्पणादि जाल्यावर अष्टशत गायत्रीजप केला. नंतर गायत्री-
चें दर्शन करून मध्यान्ही सावित्रीतीर्थी जाऊन स्नान केलें. तेथें म
ध्यान्हसंध्या केल्यावर अष्टशतगायत्रीजप केला. नंतर पर्वतावर जा सा
ऊन सावित्रीचें दर्शन केलें. पर्वताचा चढाव पुष्कळ आहे. व तेथीं

रुद्रयोनी ब्रह्मयोनी
ळ सावित्रीची मूर्ति बहुत चांगली आहे. तेथेंच रुद्रयोनी व ब्रह्मयोनी म्हणून गुहे सारखीं स्थानें आहेत,त्यांत प्रवेश करून दुसरे मार्गानें बाहेर यावें लागतें. ती जागा संकोचित असल्यामुळें ज्याचें शरीर स्थूळ असतें, त्यास त्यांत शिरून बाहेर निघण्यास अवघड पडतें या दोन योनींत शिरून बाहेर आलें ह्मणजे पुढें योनी द्वारांनीं येणें चुकतें असें सांगतात. तेथून सरस्वतीचें स्थान दूर आहे. तेथें जाऊन र-

सरस्वती
घुनाथराव यांनीं सरस्वतीतीर्थी स्नान करून सायंसंध्या केली. नंतर अठ्ठाविसगायत्री जप करून सरस्वतीचें दर्शन घेतलें. या तीन संध्या करून रघुनाथराव यांस घरीं येण्यास सव्वाघटका रात्र झाली. घरीं आल्यानंतर भोजन आटपून निद्रा करण्यास त्यांस फार रात्र झाली. याप्रमाणें या त्रिसंध्या यात्रेच्या दिवशीं यात्रेकरूस बहुत श्रम होतात!

विष्णुपद महापूजा व दीपदान
पुढें विष्णुपदाची महापूजा करून रात्रीं सुवर्णपात्रांत विष्णुपदासन्निध रघुनाथराव यांनीं दीपदान दिलें. त्या वेळेस मंदिरांत सर्वत्र दीप लाविले होते. गयावळांनीं रात्रीं विष्णुपदीं गंधाची पूजा केली होती. ही पूजा पहाण्यासारखी असते. विष्णुपदाचे मंदिर व सभामंडप अहल्याबाईहोळकर यांनीं फार उत्तम बांधिला आहे. विष्णुपदासभोंवतीं लांकडीकठडा आहे. पूर्वी अमृतरावपेशवे यांनीं कठडा भरेपर्यंत विष्णुपदीं रुपये अर्पण केलें. ते मोजून पाहातां एक लक्ष भरले असें ह्मणतात.

फल्गुपूजा गदाधरपूजा
पुढें रघुनाथराव यांनीं फल्गूची पूजा करून फल्गूस वायन अर्पण केलें. मग गदाधराची पूजा करून ब्राह्मणद्वारा व स्वतः विष्णुसहस्र नामानें दहासहस्र तुळसी विष्णुपदावर वाहिल्या. नंतर दुसरे दिवशीं पुन्हां त्यांनीं विष्णुपदाची महापूजा करून पीतांबर, शाल

विष्णुपद महापूजा
जोडी, वगैरे वस्त्रें देवास समर्पण केलीं. नंतर गयायात्रेंत जे न्यून जालें असेल त्याची पूर्णता करण्याविषयीं प्रार्थना करून बाहेर मंडपांत आल्यावर त्यांनीं उभें राहून हात जोडून प्रार्थनेचे श्लोक आ

हेत ते झटले. नंतर त्यांनीं केशवादिचोवीस नांवांनीं चोवीस नमस्कार घालून मंदिरास प्रदक्षिणा केली, नंतर सभामंडपांत येऊन पुन्हां प्रार्थना केली. नंतर घरीं आल्यावर त्यांनीं त्या क्षेत्रांत जितके दक्षिणी ब्राह्मण होते, त्यांस भोजन घातलें. व त्याच दिवशीं रात्रीं वसंत पूजा केली. या क्षेत्रीं दक्षिणी ब्राम्हण थोडे आहेत.

गयाक्षेत्र हें शहराप्रमाणें मोठें आहे,येथें जड्ज्य व माजिस्त्रेट् वगैरे साहेब लोक असतात. बरकड अंमलदार सर्व बंगाली आहेत. गये जवळ साहेबगंज म्हणून मोठा गांव आहे. तेथें इंग्रेजांची छावणी असते. या प्रांतीं सूर्यकांताच्या खाणीं आहेत. येथील बाजारांत सूर्यकांत फार चांगले व स्वस्त मिळतात. तशाच सूर्यकांताच्या लहान शिळाही मिळतात येथें दगडी काम फार चांगलें होतें. दगडाचे प्याले, पंचपात्र्या, नंदीमहादेव व सोन्याचें काम केलेले दगडी पदार्थ मिळतात. दगडी विष्णुपदें पाहिजे तेव्हढाली मिळतात. शिवाय रंगनाथ वगैरे देवांच्या पितळी मूर्ति येथें चांगल्या होतात. येथील गयावळब्राम्हण बहुत करून द्रव्यवान् आहेत. त्यांत पेशवे, शिंदे, होळकर, भोसले, यांच्या गयावळांस त्या त्या यजमानाकडून वर्षाशनें व कोणास गांव ही इनाम आहेत. कितीएक गयावळ श्रीमंतासारखे वागतात! बहुतेक गयावळांस पक्षी बाळगण्याचा फार शोक आहे! कितीएक गयावळाचे घरीं चंडोल वगैरे पक्षांचे पिंजरे पंचवी

गयावर्णन

साहेबगंज गांव

---

टीप१ ॥ श्लोक ॥ साक्षिणःसंतुमेदेवाब्रह्मेशानादयस्तथा॥
मयागयांसमासाद्यपितॄणांनिष्कृतिःकृता ॥ १ ॥
आगतोस्मिगयादेवपितृकार्येगदाधर ॥
त्वमेवसाक्षीभगवन्ननृणोहंऋणत्रयात्॥ २ ॥

भावार्थ —मी गयेस येऊन पितरांची निष्कृति केली या विषयीं ब्रह्मरुद्रादिक साक्षी असोत. तसाच हे भगवंता गदाधरा देवा मी या गयेस पितृकार्यास येऊन तीन ऋणापासून मुक्त झालों याला साक्षी तूंच आहेस.

टीप२ ॥ श्लोक ॥ गयागजोगयादित्योगायत्रीचगदाधरः ॥
॥गयागयाशिरश्चैवषड्गयामोक्षदायकाः ॥(भवार्थ स्पष्ट आहे.)

स पन्नास किंबहुना शंभर पर्यंत असतात. हातावर पक्षी ठेऊन ते बा हेर फिरतात. एकवार स्त्री वारली ह्मणजे ते पुढें दुसरें लग्न करीत नाहींत. या कारणानें त्यांची वंशवृद्धि कमी आहे! त्या वेळेस बोहरीलालभय्या, वेणिरामकढ्या, गंगाविष्णु, लछमनमिहेरवार, लालजीमेहेता, हे गयावळ रघुनाथराव यांस द्रव्यवान् दिसून आले! लछमनमेहेरवार हा होळकराचा गयावळ आहे. त्यास होळकराकडून तीन हजार रुपयांचे इनामी गांव आहेत. गया येथें अहल्याबाईनें एक राममंदिर बांधिलें आहे, त्याची देखरेख त्याजकडेस आहे. हाच विंचुरकरांचा गयावळ आहे.

गयेहून परत काशीस माणें

या प्रमाणें रघुनाथराव यांचा गयायात्रेचे निमित्तानें पावणेदोन महिने गयेस मुक्काम झाला. नंतर विष्णुपदाची व गदाधर आणि गयादेवी यांची आज्ञा घेऊन रघुनाथराव हे तेथून निघाले. ते वेळेस लछमनमेहेरवार गयावळ यानें मोठ्या किंमतीची शालजोडी व पागोटें त्यांस प्रसाद दिला. नंतर गयेहून निघून रघुनाथराव हे आले ल्या मार्गानें काशीस परत येऊन त्यांनीं दधिश्राद्ध केलें. या श्राद्धांस प्रधान द्रव्य दधि असतें. ह्मणून यास दधिश्राद्ध असें नांव आहे.

काशीस परत येणें

याप्रमाणें दधिश्राद्ध सपिंडक करून ते दिवशीं गयायात्रेच्या पूर्णते स्तव ब्राह्मणभोजन घालून त्यांनीं गयायात्रेची समाप्ति केली. या वेळेस ही काशीक्षेत्राबाहेर करवे यांचे धर्मशाळेंतच रघुनाथराव यांनीं मुक्काम केला होता.

गयायात्रेची समाप्ति

प्रयागास परत येणें

काशी येथून निघून रघुनाथराव हे आलेल्या मार्गानें प्रयागास गेले. तेथें तीर्थविधि श्राद्ध करून त्यांनीं स्वदेशी नेण्याकरितां गंगोदक विधिपूर्वक कुप्यांत भरून घेतलें. येकंदर कुप्या मोठाल्या दोन रुद्र ह्मणजे बेवीस, शिवाय लहान बेवीस अशा एके कावडींत भरून एक स्वतंत्र ब्राह्मण कावड वहाण्यास नेमला. नंतर ते गंगेसहवर्तमान फत्तेपुर मार्गें ब्रम्हवर्तास जाण्याचे उद्देशानें कानपुरास आले.

कानपूर

तों त्या ठिकाणीं श्रीमंतबाजीरावसाहेब यांची प्रकृति अस्वस्थ अस-

त्याचा वृतांत समजतांच ते ब्रह्मावर्त येथें येऊन सरकारी वाड्यांत गेले. तों प्रकृति अगदीं आसन्न दिसली! नानासाहेब, रामचंद्रसुभेदार व इतर मंडळीं, यांची भेट तेथेंच झाली. नंतर रघुनाथराव हे घरीं येऊन पहांटेस पुन्हा वाड्यांत गेले. तेव्हां श्रीमंतास अग्निहोत्रअसल्यामुळें त्यांस वेदीत नेण्याचा उपक्रम चालला होता! पुढें वेदीत नेल्यावर बरेंच अवकाशानें सरासरी बारा घटका दिवसाचे सुमारेंत [बाजीरावसाहेब] कैलासवासी झाले. या वेळेस त्यांचें वय सुमारें ऐंशी वर्षांचें होतें असें म्हणतात. ही गोष्ट शके १७७३ या वर्षीं पौष वद्य द्वादशीस घडली! या प्रसंगीं प्रत्येकास फार दुःख झाले! पांचहजार ब्राह्मण व इतर हजारों लोक यांचा एकच आकांत झाला! शेकडों ब्राह्मणांचीं कुटुंबें अन्नदाता गेला पाहून तोंडांत माती घालूं लागली! गांवातील संपूर्ण लोक दुकानांतील सर्व व्यापार बंद करून तेथें जमले. येकंदर पंधराहजारांवर मनुष्यें त्यांच्या समीप ते समयीं एक सारखा शोक करीत होतीं! नंतर नानासाहेब यांनीं त्यांस अग्निसहवर्तमान भागीरथीतीरीं नेऊन त्यांचा उत्तर विधि जसा कर्तव्य तसा केला. मग सर्वांनीं स्नानें करून तिलांजल्या दिल्या. आणि नानासाहेबास वाड्यांत पोंहचवून मंडळी घरोघर गेली. ते दिवशीं रघुनाथराव यांचे मातोश्रीचें सांवत्सरिक श्राद्ध होतें. ते करून त्यांस भोजनास रात्र झाली दुसरे दिवशीं ते गंगेवर गेले. तेथें वाळूंत मोठा डेरा व चांदणी दिली होती. तेथें नानासाहेब व इतर खासे मंडळी जमली होती. रामचंद्रसुभेदार व बापुगोडबोलेही आले. नंतर पुढील जो कर्तव्य विधि तो नानासाहेबांनीं करून स्वतः थोडी रक्षा गंगेंत टाकिली. मग सर्वांनीं थोडी थोडी रक्षा गंगेंत टाकण्याचा क्रम चालला. तेव्हां एके घटकेंत सर्व रक्षा संपली! नंतर स्नाने व तिलांजली देऊन मंडळी घरीं आली. मग प्रत्यही तिसरे प्रहरीं रघुनाथराव हे नानासाहेबांकडे जात असत. या प्रमाणें दहा दिवस पर्यंत क्रम झाला. अकरावे दिवशीं सरस्वतीश्वराचे समीप गंगामंदिरांत

ब्रह्मावर्त

बाजीरावसाहेब यांचा कैलासवास.

महादानें झालीं. त्या दिवशीं यकंदर दान संबंधीं तीन लक्ष रुपये खर्च झाला. त्या दानांत भूमिदान झालें नाहीं. तेव्हां रघुनाथराव यांनीं नानासाहेबांस विनंती केली कीं, "माझी दोन गांवें सरकारांनीं इनाम दिलेली आहेत. शिवाय जहागिरीचीं पन्नास गावें सरकारींच आहेत. त्यांतून मर्जी असेल तितकी भूमी दान देण्याचा संकल्प करून या समयीं ब्राम्हणास देण्यांत यावी!" यावर नानासाहेब यांनीं कांहींच उत्तर केलें. नाहीं! त्यावर अर्धघटकेनें पुन्हां रघुनाथराव यांनीं तीच विनंती केली. तेव्हां नेत्रास अश्रू आणून नानासाहेब बोलले कीं, "या गोष्टीचें उत्तर देववत नाहीं! तथापि तुमची मर्जी आहे तर वर्षश्राद्ध पर्यंत अवकाश आहे! पुढें भूमिदान करतां येईल!" याप्रमाणें अकरावे दिवसांचा विधि होऊन बारावे दिवशींचा विधि क्रमानें झाला. तेरावे दिवशीं सर्व मंडळीस प्रसाद करितां भोजनास बोलाविलें होतें. त्याप्रमाणें भोजनें झाल्यावर दुखवटे देण्याचा क्रम सुरू झाला. तेव्हां रघुनाथराव यांनीं दुखवटा करून निरोप मागीतला. तेव्हां त्यांस नानासाहेब बोलिले कीं, 'रघुनाथराव, तुह्मी या समयीं आलांत हें फार चांगलें झालें! आतां कांहीं बोलणें व्हावयाचें आहे. तें फुरसतीनें होईल.'

पुढें उभयतांची भेट झाली तेव्हां नानासाहेब बोलिले कीं, "येथील स्थिति विद्यमान कशी झाली आहे, हें तुह्मी जाणतच आहांत! इंग्रेजसरकाराकडून महाराजांस चालत आलेली नेमणूक आह्मांकडेस पुढें चालेल अशी उमेद वाटत नाहीं खर्च तर बहुत लागतो! तो कमी करण्याकरितां कांहीं मंडळीस रजा द्यावी असा विचार मनांत आणिल्यास जा ह्मणून तरी कोणास सांगावे? मंडळी कमी केल्याशिवाय तर गत्यंतर दिसत नाहीं असे प्रकारचा मोठा वाईट प्रसंग शेवटीं माझे माथीं आला आहे. पुढें नेमणूक चालावी, असे विषयीं गवरनरजनरल यांस विनंती कर्तव्य आहे. या करितां कांहीं दिवस तुह्मी येथें असावें अशी माझी इच्छा आहे." त्यावर पुष्कळ प्रका

र्च्री बोलणीं होऊन, शेवटीं पिराजीराव ह्मणून कामांत वागणारा एक मनुष्य होता, त्यास सर्व मजकूर कळवीन, ह्मणजे त्याचे द्वारें आपणास तो श्रुत होईल असें बोलून रघुनाथराव यांनीं निरोप घेतला. नंतर त्यांनीं संकेताप्रमाणें पिराजीराव यास बोलावून आणिलें आणि सांगितलें कीं, "मला यजमानांच्या आज्ञेबाहेर कांहींच कर्तव्य नाहीं. परंतु बिचूर सोडून बहुत दिवस झाले, म्हणून एकदा घरीं गेलें पाहिजे! आतां गेलेंतर फार दिवस घरीं न राहातां सहा महिन्याचे आंतच परत येईन." अशा प्रकारे रघुनाथराव यांनीं बोलणें काविलें. तो मजकूर पिराजीराव यानें नानासाहेबांस कळविला नंतर नानासाहेब यांनीं रघुनाथराव यांचे म्हणणें मान्य करून लौकर परत येण्याविषयीं सांगितलें.मग रघुनाथराव हे निघण्याची तयारी करून निरोप घेण्यास नानासाहेब याजकडे गेले तेव्हां त्यांस फार लौकर परत आलें पाहिजे असें सांगून नानासाहेब यांनीं निरोप देतांनां त्यांस पोषाख देण्यास आणविला. तेव्हां रघुनाथराव यांनीं विनंती केली कीं, महाराज! 'सरकारचें तेलही पदरांत घ्यावें' अशी वडिलांची ह्मण आहे, परंतु विद्यमान ही गोष्ट करणें उचित नाहीं! ईश्वरकृपेनें पुढें आपणांस संतोष कारक प्रसंग प्राप्त होतील, त्या वेळेस मी आपली देणगी स्वीकारण्यास अनमान करणार नाहीं. आतां यावेळीं माफी असावी!" हे रघुनाथराव यांचे बोलणें ऐकून नानासाहेब यांनीं त्यांस निरोपाची सुपारी दिली. ती घेऊन ते घरीं आले. इतक्यांत नानासाहेब यांनीं नारायणमराठे याजबरोबर खुद्द आपले बसण्याचा घोडा पाठवून देशीं घेऊन जाण्याविषयीं सांगितलें. त्याप्रमाणें रघुनाथराव यांनीं तो घोडा ठेवून घेतला. मग सर्व मंडळीचा निरोप घेऊन ते क्रमानें गंगातीरीं कनोज शहरीं येऊन दाखल झाले. या शहराचें नांव पूर्वीं कान्यकुब्जक्षेत्र असें होतें. सर्व देशांपेक्षा आर्यावर्त देश उत्तम, त्या देशाचे नाभीस्थानीं कान्यकुब्जक्षेत्र आहे. येथें गंगेंत अश्वतीर्थ ह्मणून एक मुख्य तीर्थ आहे. या तीर्था

कनोजशहर (कान्यकु

सून पूर्वी शामकर्ण अश्व निघाले होते. वेदव्यासांनीं चार वेदांचे वे
अश्वतीर्थ गळाले विभाग करून त्यांच्या शाखा केल्या, त्या सर्व शाखेंचे ब्राह्म
ण याच क्षेत्रीं मूळीं येकत्र होते. एथून पुढें जे द्रविड देशांत गेले, ते
द्राविड, तैलंगणांत गेले ते तैलंग, महाराष्ट्रांत गेले ते महाराष्ट्र, गुजरा
थेंत गेले ते गुर्जर. पर्वतावर गेले ते पर्वती, अशीं देश परत्वें त्या
त्या ब्राम्हणांस वेगळाली नावें पडली. सर्व ब्राम्हणांचें मूलस्थान का
न्यकुब्जक्षेत्रच आहे. मथुरेंतील चोबे व गयेंतील गयावळ हे मात्र
कान्यकुब्ज नाहींत. येविषयीं एथील माहात्म्यांत प्रमाण आहे. पूर्वी
सर्व पृथ्वींत चार पुरे मोठीं होतीं. त्यांचीं नावें कान्यकुब्ज, हस्तनापुर,
अयोध्या, आणि पाटलीपुत्र ( हल्लींचें पाटणा ) अशीं आहेत, या चा
र पुरांत लक्ष्मी व सरस्वती या दोघी वास करीत होत्या. असें वर्ण
न आहे. या कान्यकुब्जपुरांत [ कनोजशहरांत ] तीर्थे व देवता फार
आहेत. हें कनोजशहर हल्लीं बहुत उज्याड आहे, त्याचें कारण असें
झालें कीं, मुसलमान लोकांचा बादशाहा महम्मदघोरी म्हणून होता.
त्यानें दिल्लीचा क्षत्रियराजा पृथ्वीराज ज्यास साधारण रजपुत लोक
पिठोराराजा असें ह्मणत असत त्यावर चाल केली. तेव्हां उभयतां
चें भयंकर युद्ध झालें त्यांत पृथ्वीराज पडला. तेव्हां महम्मद यानें
आपले बादशाहीची राजधानी दिल्ली शहर केलें. नंतर त्या बादशा-
हानें कनोजच्या क्षत्रिय राजावर स्वारी केली, तेव्हां त्या राजानें
त्यांशीं मोठी निकराची लढाई केली. परंतु अखेरीस मुसलमानाचाच
जय होऊन त्यांनीं कनोज शहराचा अगदीं विध्वंस केला. त्यामुळें
तें उद्धस्त झालें. हल्लीं त्या जागीं लहान गांव आहे त्यास कनोजच
ह्मणतात. येथें सर्व जातींचें गुलकंद व अनेक प्रकारचे पाक फार चां
गले होतात. शृंगीरामपुरास रघुनाथराव यांची अजी गंगातीरीं राहि

---

टीप १ ॥ कान्यकुब्जाद्विजाःसर्वेमाथुरान्मागधान्विना ॥

भावार्थ— माथूर ( मथुराप्रदेशांतील ) आणि मागध ( मगधदेशांतील ) या दोनप्रकारच्या द्विजांवाचून सर्व द्विज कान्यकुब्ज आहेत.

त्याचा मजकूर पूर्वी लिहिलाच आहे. तिचे भेटी करितां ते कनोज एथून शृंगीरामपुर येथें गेले. त्या ठिकाणीं आठ दहा दिवस मुक्काम करून महाशिवरात्री झाल्यावर फाल्गुन शुद्ध प्रतिपदेस ते अजीचा निरोप घेऊन ढवलपुर शहरीं आले. ढवलपुरास एक स्वतंत्र रजपुतांचें राज्य आहे. त्या राजास राणा असें म्हणतात. ढवळपुराहून पुढें मार्गांत चमेल नांवाची नदी लागते. तिचें संस्कृत नांव चर्मण्वती असें आहे. तिचें स्नानपानादि केलें असतां मोठें पुण्य आहे, असें पुराणांत सांगितलें आहे. प्राचीनबर्हीनामक राजा झाला त्यानें बहुत यज्ञ केले ते इतके कीं पश्चिम समुद्रापासून तों पूर्व समुद्रापर्यंत यज्ञ संबंधीं बर्ही ह्मणजे दर्भ सर्व पृथ्वीभर एकसारखे पसरले होते. त्या योगानें त्या राजाचें नांव प्राचीनबर्ही असें पडलें! त्यानें यज्ञार्थ पशूंचा वध केला. त्या पशूंचे चर्माचा मोठा पर्वत पडला. त्यापासून ही नदी उत्पन्न झाली म्हणून हिला चर्मण्वती असें नांव पडलें. प्राचीनबर्ही राजाच्या यज्ञांत सोमपान करण्याकरितां इंद्रादिदेव आले होते. त्यांची त्यानें प्रार्थना करून वर मागितला कीं, " या नदीचें स्नान व उदकानें पितृतर्पण जे करतील त्यांस अनंत पुण्य प्राप्त व्हावें! या नदीचेतीरीं पितरांचे उद्देशें जे पिंडदान करतील, त्यांचे पितरांस स्वर्गप्राप्ति व्हावी! " असें त्यानें वरदान मागितलें. तेव्हां तें इंद्रादिदेवांनीं मान्य केलें, अशी चर्मणवती नदी विषयीं पुराणांत कथा आहे. त्या स्थलीं श्राद्धपिंडदान करून रघुनाथराव हे मुचकुंद क्षेत्रीं गेले.

शृंगीरामपुर

ढवळपुर

चर्मण्वती (चमेल)नदी

पूर्वयुगीं इंद्रानें मुचकुंद नामक राजास दैत्यांच्या नाशार्थ स्वर्गास नेलें. तेव्हां तेथें दैत्यांसहवर्तमान बहुत काल युद्ध करून त्यांचा त्यानें पराजय करून नाश केला. त्याकाळीं इंद्रादिदेव प्रसन्न होऊन त्यांनीं त्या राजास वर मागण्याची आज्ञा केली. तेव्हां मुचकुंद राजास बहुत श्रम झाले होते, ह्मणून त्यानें असा वर मागितला कीं " मला बहुतकाल सुखानें निद्रा यावी. आणि माझे निद्रेचा जो भं-

मुचकुंदक्षेत्र

ग करील तो माझे दृष्टिपातानें भस्म होऊन अंतीं मला भगवद्दर्शन व्हावें." हें त्याचें मागणें देवांनीं मान्य केलें. नंतर भूलोकीं येऊन मोठी गुहा पाहून त्या गुहेंत तो राजा निद्रा करिता झाला. पुढें द्वापर युगाचे अंतीं कृष्णाचा अवतार झाल्यावर एके ऋषिपुत्राच्या तपःसामर्थापासून यादवांचा पराजय करणारा असा कालयवन नामक एक यवन उत्पन्न झाला. त्याचा व कृष्णाचा मथुरेसन्निध संग्राम होऊन त्यांत कृष्णानें पलायन केलें. त्याचे मागें कालयवन लागला असतां, ज्या गुहेंत मुचकुंद निजला होता, त्या गुहेंत कृष्णानें प्रवेश करून तो एके बाजूस उभा राहिला. कृष्णाच्या मागून कालयवन तेथें आला. त्यास कृष्णच निजला आहे असें वाटून त्यानें मुचकुंदास लत्ताप्रहार केला. त्या योगें त्याचे निद्रेचा भंग होऊन त्यानें त्याकडे अवलोकन केलें. तेणेकरून कालयवन तत्काळ जळून भस्म झाला. व कृष्णपरमात्म्याचेंही तत्काळ दर्शन झालें. तेव्हां मुचकुंदानें कृष्णाची स्तुति केली. नंतर कृष्णानें त्यास बदरिकाश्रमीं जाण्यास आज्ञा केली. त्याकाळीं त्यानें गुहेसन्निध एक सरोवर होतें, तेथें मुखप्रक्षालन करून स्नान केलें. आणि कृष्णाची प्रार्थना केली कीं, "लोकोपकारार्थ मला असा वर द्यावा कीं, या सरोवरांत सर्व तीर्थांनीं वास करावा, आणि हें तीर्थ माझे नांवानें प्रसिद्ध व्हावें. येथें जे स्नानादिक करतील त्यांस उत्तम लोकाची प्राप्ति व्हावी!" हें त्याचें मागणें कृष्णानि मान्य केलें. नंतर मुचकुंदराजा बदरिकाश्रमाकडे चालता झाला. तेव्हापासून त्या सरोवराचें नांव मुचकुंदतीर्थ असें पडलें. त्या तीर्थाच्याकांठीं बैरागीलोकांचे बहुत ठाकुरद्वारे आहेत. तेथें बैरागी राहतात. त्याचे सन्निध लहान टेकडी आहे. तीस एक मोठी गुहा आहे, तीच त्या राजाचें निद्रास्थान होय. ज्या ठिकाणीं कालयवन भस्म झाला, त्या ठिकाणीं कबर आहे, त्या स्थलीं हिंदु व मुसलमान असे दोनही जातीचे लोक जाऊन दर्शन करितात! हें स्थल अत्यंत रमणीय. आहे. येथून ढवळपुर अगदीं नजीक आहे. तेथून रघुनाथरा

व हे यमुनातीरीं वटेश्वर ह्मणून एक क्षेत्र आहे तेथें आले. तिकडील लोक त्यास बटेश्वर असें ह्मणतात. येथें यमुना पश्चिमवाहिनी आहे ह्मणून हें मुक्तिक्षेत्र म्हटलें आहे. पृथ्वीत नवउषर स्थानें आहेत, त्यातील वटेश्वर हें एक उषरस्थान आहे. येथें पूर्वी भिंडभदावर येथील राजाचा अंमल होता. त्या राजानें या क्षेत्रीं यमुनेस मोठाले घाट बांधिले आहेत. व तेथें दक्षिणी ब्राह्मणांस स्थापून त्यांस पुष्कळ वर्षाशनें करून दिलीं आहेत. तीं हल्लीं त्यांकडे चालत आहेत. नारोशंकरराजेबहादर यांनीं यमुनातीरीं एक उत्तम शिवालय बांधिलें आहे यमुनामाहात्म्यांत या क्षेत्राचें वर्णन फार केलें आहे. येथें मुख्य देवता वटेश्वरमाहादेव आहे. या क्षेत्रीं कार्तिकमार्शी फार मोठा मेळा भरतो. तो मेळा पौर्णिमेपर्यंत राहातो. या मेळ्यांत घोड्यांचा व्यापार फार होतो. ज्यांस घोडे घेणें असतील, ते या मेळ्यांत जाऊन खरेदी करितात. हा गांव लहान असून फार चांगला आहे गांवाचे मानानें ब्राह्मणांची बस्ती जास्त आहे. फाल्गुनांतील शिमग्याचा सण रघुनाथराव यांनीं येथेंच केला. वटेश्वरक्षेत्र

रघुनाथराव यांचे तीर्थरुप विठ्ठलरावतात्यासाहेब यांस पाहिले धरचे बंधु होते. त्यांत मधले श्रीपतराव हे निवर्तले होते. त्या श्रीपतरावाचे चिरंजीव रामचंद्रराव यांजकडे शिंद्याकडून माळवेप्रांतांतील सोनकच वगैरे महाल असून ते या वेळीं तेथें होते. कनिष्ट गणपतराव यांजकडेस लष्कर नजीक संबळगड वगैरे महाल होते. रघुनाथराव यांची मुंज झाल्यापूर्वींच गणपतराव हिंदुस्थान प्रांतीं असल्या

---

टीप १ ॥ श्लोक ॥ विरंचितनयाप्राचीउदीचीविष्णुपादजा ॥

॥ प्रतीचीयमुनायत्र मुक्तिस्तत्रनसंशयः ॥ १ ॥

भावार्थ —सरस्वती जेथें पूर्ववाहिनी आहे, गंगा जेथें उत्तरवाहिनी आहे, व यमुना जेथे पश्चिमवाहिनी आहे, तेथें निःसंशय मुक्ति प्राप्त होते. कुरुक्षेत्रीं सरस्वती पूर्ववाहिनी आहे. व काशीक्षेत्रीं गंगा उत्तरवाहिनी आहे. व या वटेश्वर क्षेत्रीं यमुना पश्चिमवाहिनी आहे.

मुळें त्यांची फार दिवस भेट नव्हती. त्या कारणानें त्यांजकडून का-
रकून वगैरे खटला संबळगडास नेण्याकरितां आला. रघुनाथराव यांसही
त्यांची भेट घेणें अवश्य होती सबब ते वटेश्वराहून संबळगडास गे
ले. त्या समयीं गणपतराव हे पागा वगैरे सरमजाम बरोबर घेऊन
सामोरे आले, आणि त्यांनीं रघुनाथराव यांस समारभानें संबळगड
संबळगड महालीं नेलें. व तेथें मोठ्या अगत्यानें दहा दिवस पर्यंत ठेवून घेत
ले. त्या मुक्कामाहून ग्वालेर शहर नजीक असल्यामुळें तेथून बहुत
मंडळी रघुनाथराव यांच्या भेटीस आली. पुढें निघतांनां गणपतराव
यांनीं सर्वांचा सत्कार करून पोषाक दिले, रघुनाथराव यांजबरोबर
आश्रित पैकीं शंकरशास्त्री होते. त्यांस त्यांनीं संबळगडमहालीं शंभ
र रुपयांचें वर्षाशन वंशपरंपरा करून दिलें, तें हल्लीं त्यांजकडे चाल
त आहे. पुढें गणपतराव यांचा निरोप घेऊन रघुनाथराव हे श्रीपत-
राव यांचे चिरंजीव सोनकचमहालीं होते, त्यांचे भेटीकरितां माळवे
प्रांतीं सोनकच येथें आले. त्यांनींही रघुनाथराव यांचा बहुत सत्कार
सोनकचगांव केला, व मोठ्या प्रेमानें त्यांस आठ दिस ठेवून घेऊन बरोबरील मं
(प्रांतमाळवा) डळीसुद्धां सर्वांची योग्य संभावना केली. शंकरशास्त्री यांस सोनक
चमहालीं पन्नासरुपये वर्षाशन वंशपरंपरा करून दिलें, तें हल्लीं त्यां
जकडे चालत आहे. रघुनाथराव हे सोनकच येथून निघाले ते मजल
धुळें दरमजल कूच करीत नर्मदा उतरून धुळें मालेगांव या मार्गें विंचूरइला-
मालगांव ख्यांत येऊन दाखल झाले. तेव्हां त्यांचे बंधु कृष्णराव (बापूसाहेब)
विंचुरइलाका विंचुरास होते, त्यांस रघुनाथराव हे आपल्या इलाख्यांत येऊन दा
टांकळीगांव खल झाल्याचें वर्तमान कळतांच मोठा संतोष झाला. आणि त्यां
नीं त्यांस विंचुरास आणण्याची तावडतोब तजवीज चालविली. इ
कडे विंचुरापासून दोन कोसांवर टांकळी ह्मणून विंचुरकराचे जहागि
रीचा गांव आहे, तेथें रघुनाथराव हे मुक्कामास आले. तेवळीं विंचूर
येथील सर्व पदरची मंडळी व गांवचे नामांकित लोक असे तेथ त्यां
चे भेटीस गेले. त्याच दिवशीं तिसरे प्रहरीं कृष्णराव [ बापूसाहेब ]

व माधवराव [ दादासाहेब ] हे उभयतां बंधुही रघुनाथराव यांचे भे टीस गेले. तेव्हां बंधुबंधूंच्या परस्परे भेटी मोठ्या आनंदानें होऊन ते सर्व मंडळीसहित विंचुरास येण्याकरितां निघाले. ते विंचुराजवळ आले तेव्हां गांवाबाहेर एक बाग आहे,तेथें रघुनाथराव वगैरे मंडळींनीं सायंसंध्या केली. नंतर पुढें गंगेची कावड, व तिच्या मागें मंडळीसह त्रिवर्ग बंधु असून शोभेकरितां बिराकदान केलें होतें, त्यांतून दारू वगैरे सोडीत, मोठ्या समारंभानें त्यांनीं श्रीभागिरथीस वाड्यांत आ णिलें. तेव्हां वार्षिक नरसिंहजयंतीचा उत्सव वाड्यांत चालू होता. त्या उत्सवांत आणखी हा श्रीगंगा आल्याचा उत्सव झाल्यानें अ त्यंत शोभा आली ! पुढें रघुनाथराव यांनीं उत्सवमंडपांत श्रीनृसिं– हाचे दर्शन घेऊन नंतर मातोश्रीचें दर्शन घेतलें. हें कृत्य शके १७७२ सालीं वैशाख शुद्ध दशमी रोजीं झालें. पुढें पौर्णिमेपर्यंत नृसिंहजयं तीचा उत्सव व शेवटीं ललित होऊन वद्य प्रतिपदेस तीर्थप्रसाद झाल्यावर गंगेची व गोदेची भेट करण्याकरितां वद्य द्वितीयेस रघु नाथराव हे गोदातीरीं सायखेडें येथें गेले.

गोदादर्शन होतांच बरोबर गंगोदकाच्या कुप्या भरलेल्या होत्या त्यांचीं झांकणें काढून त्या गोदातीरीं ठेविल्या. त्या समयीं कुप्यांतून गंगोदक बाहेर येऊन बारीक धारा चालल्या! नंतर गोदाभेट होऊन रघुनाथराव यांनीं तीर्थविधीस आरंभ केला. मग अर्घ्यदान करून मुंडन झाल्यावर त्यांनीं त्या दिवशीं तीर्थउपोषण केलें. दुसरे दिव शीं श्राद्धपिंडदान आटपून तिसरे दिवशीं गोदापूजन करून ते परत विंचुरास आले. नंतर विंचूर येथें गंगापूजन करून मांवदे करण्या चा ह्मणजे ब्राह्मणभोजन करण्याचा दिवस ठरविला. त्या करितां आप्त व इष्ट मंडळी यां सर्वांस निमंत्रण पत्रें पाठवून बोलावणें के लें. त्यावरून पुणे येथून आबासाहेबदमदेरे आले. आणखी नासिक प्रदेशांतील सख्य संबंधाची मंडळी बहुत आली. मग ठरविलेले दि वशीं गंगापूजन केलें. तसेंच ज्या देवतांच्या व ज्या तीर्थांच्या या

## मध्यदेशांतील तीर्थयात्रा.

——०——

श्रीमंत रघुनाथराव विंचूरकर हे उत्तराहिंदुस्थानांतील यात्रा करून आल्यावर सुमारें तेरा चौदा वर्षें घरींच होते. ह्मणजे शके १७७१ या वर्षीं ते महायात्रेहून आले ते पुन्हा शके १७८६ या वर्षीं मध्यदेशांतील यात्रेस गेले. इतक्याकाळांत स्थितीच्या संबंधानें बरेच फेरफार झाले ते असेः— कथासंगति.

त्यानीं शके १७७१ या वर्षीं महायात्रेहून परत आल्यावर त्याच वर्षाचे अखेरीस ह्मणजे फाल्गुनमासीं आपलें तिसरें लग्न केलें. या तिसरे स्त्रीचें नाव जानकीबाई, ही सातारा येथील गोविंदरावपालकर यांची कन्या.

रघुनाथराव यांचे कनिष्ट बंधु कृष्णराव उर्फ बापुसाहेब यांनीं कायद्यांचा उत्तमप्रकारें अभ्यास केला, त्यावरून त्यांस सन १८५२ ह्मणजे शके १७७४ या वर्षीं सरकारानें पुणें येथील सदरअमीनीचे जागेवर नेमिलें. पुढें कांहीं दिवसांनीं त्यांची ठाणें येथील सदरअमीनाचे जागेवर बदली झाली.

रघुनाथराव यांचे दुसरे कनिष्ट बंधु माधवराव उर्फ दादासाहेब हे ही कायद्यांचा वगैरे अभ्यास करून चांगले हुशार झाले. आणि ते सन १८५४ म्हणजे शके १७७६ या वर्षापासून विंचूर संस्थानांतील दिवाणी व फौजदारी काम पाहूं लागले. याच सुमारास इनामकमीटीचें खातें सरकारानें स्थापिलें. त्या कामीं दादासाहेब यांनीं सरकारास बहुत मदत केली. तेव्हां त्यांची चांगली हुशारी पाहून सरकारानें त्यांस सन १८६२ ह्मणजे शके १७८४ या वर्षीं

---

टीप १ मध्यदेश या शब्दाने येथे महाराष्ट्रदेश आणि दक्षिणेकडील तुंगभद्रा नदीपर्यंतचा प्रदेश विवक्षित आहे.

फुल्पावरमाजिस्ट्रेटचा अधिकार दिला. तसेंच त्यांस मुंबई येथील कायदेकौन्सिलांत सभासद नेमिलें. दादासाहेब हे विंचूर संस्थानांतील मुख्य माजिस्ट्रेटचें काम पाहात असतां त्यांचे हाताखालीं वामनरावनारायण फडणीस ह्मणून विंचूरकराचे पदरचे गृहस्थ आहेत, यांस सबार्डिनेटमाजिस्ट्रेट नेमिलें. या वेळीं विंचूर येथील दौलतीची व्यवस्था वगैरे दुसरींही बहुतेक कामें दादासाहेब हेच पाहात होते.

पुढें सन १८६३ म्हणजे शके १७८५ या सालीं वतनदार लोकांचे कायम हक्क ठरविण्याकरितां सरकारानें वतनकमिशन नेमिलें. त्या कमिशनांत मेहेरबान गार्डनसाहेब यांस मुख्य नेमून त्यांचे मदतीस दोन हुशार एतद्देशीय गृहस्थ नेमिले. त्यांत एक दादासाहेब विंचूरकर व दुसरे उत्तरभागरेव्हेन्यूचे दप्तदार केशवपंततात्या जोग हे होते. याही कामांत दादासाहेब यांनीं बहुत मेहनत घेऊन हुशारी दाखविली त्यावरून सरकाची मर्जी त्यांजवर फार संतुष्ट झाली.

याप्रमाणें तेरा चौदावर्षांत स्थितीचे संबंधानें फेरफार झाले, हे मुख्य ह्मणून एथें लिहिले. या खेरीज दुसरे जे किरकोळ फेरफार झाले, ते येथें सांगण्याचें अगत्य दिसत नाहीं. असो, येथपर्यंत जो मजकूर लिहिला तो कथासंदर्भाची संगती कळावी ह्मणून लिहिला. आतां येथून त्यांच्या यात्रेचा वृत्तांत लिहिण्यास आरंभ करितों.

यात्रावृत्त प्रारंभ.

श्रीमंत रघुनाथराव हे उत्तरहिंदुस्थानांतील तीर्थयात्रा करून विंचुरास परत आले; तेव्हांपासून मध्यदेश आणि हिंदुस्थानाचा दक्षिणप्रांत एथील तीर्थयात्रा कराव्या, आणि तो प्रदेश पाहावा, असा त्यांचा फार हेतू होता. परंतु तो हेतू सिद्धीस नेण्यास संधीच मिळाली नाहीं. त्यांनीं एकेवेळीं तर जाण्याचा अगदीं निश्चय करून तयारी देखील केली परंतु त्या संधीस दादासाहेब यांस

सरकारानें वतनकमिशनर नेमिल्यावरून त्या कामावर त्यांचें जाणें झालें. त्यामुळें दौलतीसंबंधी वगैरे सर्व कामाची व्यवस्था अर्थात च रघुनाथराव यांस स्वतां पाहाणें प्राप्त झालें. सबब त्या समयीं त्यांचे यात्रेस जाणें तसेंच राहिलें. अशाच प्रकारें प्रपंच संबंधी वगैरे अडचणी कांहीं दिवस येतगेल्या त्यामुळें जाण्याचा योग आला नाहीं. शेवटीं कृष्णरावबापूसाहेब हे त्यावेळीं ठाणें येथील सदरअमीन होते, त्यांस कांहीं दिवसांची रजा घेऊन विंचुरास येण्याविषयीं रघुनाथराव यांनीं लिहिल्यावरून ते एक वर्षाची रजा घेऊन विंचुरास आले. नंतर त्यांस विंचूर येथील संस्थानचे सर्व कामकाजाची सोंपणूक करून रघुनाथराव हे मध्यदेश आणि दक्षिणेकडील प्रांत येथील तीर्थयात्रा करण्याचे उद्देशानें आपलें कुटुंब ह्मणजे सौभाग्यवती जानकीबाई या सहवर्तमान शके १७८६ या वर्षीं आश्विन शुद्ध दशमी ह्मणजे दसरा या दिवशीं विजयमुहूर्तावर विंचूर येथून प्रयाण करिते झाले. आतां येथून त्यांच्या मध्यदेशांतील तीर्थयात्रांचा आरंभ झाला. विंचूर येथून प्रयाण.

श्रीमंत रघुनाथराव हे आह्मी वर लिहिल्याप्रमाणें विजयादशमी च्या दिवशीं विंचूर एथून सुमुहूर्तावर निघाले, ते प्रथम श्रीत्र्यंबकक्षेत्रास गेले. या क्षेत्रीं मुख्य देव त्र्यंबकेश्वरज्योतिर्लिंग व मुख्य तीर्थ कुशावर्त आहे. या खेरीज केदारेश्वर, कुशेश्वर, कर्पूरेश्वर, इंद्रेश्वर, बल्लाळविनायक, त्रिभुवनेश्वर, त्रिसंध्येश्वर, बिल्वकेश्वर, कांचनेश्वर, ज्वरेश्वर, त्रिसंध्यादेवी, भुवनेश्वरीदेवी, कोलांबिका, नीलांबिका, इत्यादि देवता; व इंद्रतीर्थ, कांचनतीर्थ, गौतमतीर्थ, कपोततीर्थ, वाराणसीतीर्थ, मणिकर्णिकातीर्थ, अन्नपूर्णातीर्थ, केतकीतीर्थ, वाराहतीर्थ, रामतीर्थ, बल्लाळतीर्थ, बिल्वतीर्थ, इत्यादि तीर्थें आहेत तसेच ज्ञानेश्वरांचे ज्येष्ठबंधु निवृत्तिनाथ यांचें समाधिस्थान व प्रसिद्ध ब्रह्मानंदस्वामी व दुसरेही कित्येक साधुपुरुष यांचीं समाधिस्थानें येथें आहेत. श्रीत्र्यंबक क्षेत्र.

हें क्षेत्र गोदावरीचें उत्पत्तिस्थान आणि गोतमऋषीचें आश्रमस्थान आहे. गोदावरीच्या उत्पत्तीविषयीं पुराणांत सविस्तर कथा वर्णिली आहे, तिचा सारांश असाः—

गोदावरीची उत्पत्ति.

पूर्वी युगांतरीं पृथ्वीवर बहुत काळपर्यंत अवर्षण होऊन धान्याचा दुष्काळ पडला. त्यासमयीं गौतमऋषीनें शेतांत साळी पेराव्या, आणि पर्जन्य पडत नव्हता तरी आपल्या तपोबलानें यथेच्छ धान्य उत्पन्न करून त्या योगानें आलेल्या ब्राह्मणांचें उत्तम प्रकारें पोषण करावें. हा त्याचा लौकिक ऐकून बहुत ऋषि वगैरे ब्राह्मण मंडळी त्याचे आश्रमीं येऊन राहिली. त्यांचें पोषण गौतमानें वर लिहिल्या प्रमाणें चालविलें. असा क्रम बहुत काळ चालला. पुढें अनावृष्टि दूर होऊन पृथ्वीवर सर्वत्र सुभिक्षता झाली. तेव्हां जमलेले ब्राह्मण आपआपल्या स्थळीं जाऊंलागले असतां गौतम त्यांस राहाण्याविषयीं आदरपूर्वक आग्रह करूं लागला. तेव्हां त्यानें बहुतकाळ पोषण केलें, त्यामुळें त्याची मर्जी मोडून त्यांस जाता येईना ह्मणून ते निरुपाय झाले !

इकडे शंकरानी आपले मस्तकावर जटाजूटांत गंगेस गुप्त रीतीनें ठेविलें होतें. त्यामुळें शंकराची स्त्री पार्वती हिला मत्सर उत्पन्न होऊन दुःख होऊं लागलें. त्याचें निवारण करण्याविषयीं तिचा पुत्र गणपति उद्योग करूं लागला. तेव्हां गौतमऋषि हा मोठा शिवभक्त आहे, त्यानें शंकराचें जटेंतील गंगा मागीतली असतां ते त्यास देतील यांत संशय नाहीं. परंतु त्या ऋषीला निजविषयींची याचना करण्याचा योग आणिला पाहिजे. असा गणपतीनें विचार करून तो पार्वतीची सखी जया हिला बरोबर घेऊन या प्रसंगी गोतमाचे आश्रमी वृद्धब्राह्मणाचे रुपानें येऊन राहिला होता. तेथें गौतमाच्या भिडेमुळें ब्राह्मणमंडळीस स्वस्थानीं जातां येइना असें झालें. त्या समयीं येथून जाण्याविषयीं मी कांहीं युक्ति करितों, असें गणपतीनें ब्राह्मणांस सुचवून जयेला एकीकडे नेऊन "तूं वृद्ध व जर्जर अशा गा

ईचें रूप धरून गौतमऋषीच्या शेतांत शिरून त्याचा नाश करूं लागावें, म्हणजे तो ऋषि तुला हाकून लावण्याकरितां येईल. मग त्यानें नुसतें थैक ह्मटलें तरी तूं गतप्राण झाल्याप्रमाणें होऊन भूमीवर पडावें, ह्मणजे झालें! " असें गणपतीनें सांगितलें, तें येकून जयेनें वृद्धगाईचें रूप धरून गौतमाचे शेतांत शिरून त्याचा नाश आरंभिला. तें गौतमानें पाहातांच हातांत केवळ गवताचीकाडी घेऊन तो त्या गाईचें निवारण करूं लागला असतां ती गाय तत्काळ भूमीवर पडून निश्चेष्ट झाली ! हा प्रकार पाहातांच आपणास गोहत्या घडली असें वाटून गौतमऋषीनें ब्राह्मणमंडळीकडे येऊन त्यांची प्रार्थना केली कीं, " असें संकट मला प्राप्त झालें आहे, याच्या परिहाराचा उपाय आपण मजला सांगावा! " अशी गौतमाची प्रार्थना ऐकून वृद्धब्राम्हणरूप धारण केलेला गणपति यानें पुढें होऊन गौतमास सांगीतलें कीं, " हे मुनीश्वरा, तू कांहीं चिंता करूं नको! त्रैलोक्यास ही पावन करणारी अशी गंगा शंकरांनीं जटेंत गुप्त ठेविली आहे, ती तूं त्यांचें आराधन करून मागून घे. आणि तिचे स्नान कर म्हणजे तुझा दोष जाईल ! आणि या गाईवरही त्या गंगेचें उदक सिंचन कर ह्मणजे ती जिवंत होईल ! याप्रकारें ती गंगा भूलोकीं आल्यानें सकल भूमंडळावर तुझा उपकार होईल! आतां तुजवर हा गोहत्येचा आरोप आल्यामुळें आह्मास तुझ्या एथे भोजन करून राहणें योग्य नाहीं, ह्मणून आम्ही आपआपल्या स्थानास जातों. "असें गणपतीनें सांगीतल्यावर संपूर्ण ब्राह्मणमंडळी आपआपल्या ठिकाणीं गेली. नंतर गौतमानें ब्रम्हगिरीच्या शिखरावर जाऊन शंकराची आराधना केली. तेव्हां शंकर प्रसन्न होऊन त्यास इच्छित वर माग असे म्हणाले. तेव्हां आपले जटेंत गंगा आहे ती द्यावी असा गौतमानें वर मागितला. त्या काळीं शंकरांनीं गंगेस जटेंतून बाहेर येण्याविषयीं सांगितलें. परंतु ती बाहेर येईना. तेव्हां शंकरांनीं कोपयुक्त होऊन पर्वतशिखरावर जटा आपटल्या त्याकाळीं गंगा जल

रुपानें औदुंबरवृक्षाचे मुळीं प्रकट झाली. तिलापाहून गौतमऋषीस अत्यंत आनंद झाला. आणि त्यानें गंगोदकांत स्नान केलें, तेणेकरून तो निष्पाप झाला. तेथून ती पर्वताचे खालचे भागाकडे आली, त्या भागास गंगाद्वार असें ह्मणतात. तेथें वाराहतीर्थ आहे. त्यांत प्रवेश करून ती गुप्त झाली ती पर्वताखालीं येऊन पुनः जलरुपानें प्रकट झाली. तेव्हां गौतमानें तिचे भोंवती कुश ह्मणजे दर्भ मांडून तिचें आवरण केलें, आणि गंगेची बहुत स्तुति केली. गौतमानें भोंवतीं कुश मांडून जेथें तिला आवरण केलें, त्या तीर्थास कुशावर्त असें ह्मणतात. या कुशावर्त तीर्थाचा महिमा पुराणांत अतिशयित व

कुशावर्त तीर्थ.

---

टीप १ गोदावरीच्या उत्पत्तिकालाविषयीं वृद्धपरंपरेने श्लोक प्रसिद्ध आहेत ते असें:—

|| गतेकृतेद्विलक्षेवैमांधातृचक्रवर्तिनि ||
|| कूर्मेचैवावतारेचतथासिंहगतेगुरौ ||
|| माघशुक्लदशम्यांचमध्यान्हेसोमवासरे ||
|| गंगासमागताभूमौगौतमप्रार्थितासती ||
|| औदुंबरतरोर्मूलेययौप्रत्यक्षतांतदा ||
|| स्नानंचक्रेमहाभागःप्रथमंगौतमोमुनिः || ||

भावार्थ — कृतयुगाचीं दोन लक्ष वर्षे गत झालीं असतां, व मांधातानामक राजा सर्व पृथ्वीचा सार्वभौम राजा असता, विष्णूचा कूर्मावतार असतां, धाताना मसंवत्सरीं सिंहराशीचा गुरु असतां माघमासीं शुक्लपक्षीं, दशमीस, सोमवारीं दोनप्रहर दिवस झाला असतां गौतमाच्या प्रार्थनेवरून औदुंबर वृक्षाच्या मुळीं या भूलोकांत गंगा प्रकट झाली. त्या काळीं प्रथम गौतमऋषीनें तिच्या मध्यें स्नान केलें. ( हे श्लोक मुळीं कोणत्या पुराणांतील आहेत. किंवा यास मूळ काय आहे याचा शोध लागत नाहीं. )

२ || श्लोक.—||कुशैर्नावर्तितागंगागौतमेनमहात्मना ||
||कुशावर्तमितिख्यातंत्रिषुलोकेषदुर्लभं || १ ||

भावार्थ;—गौतमनामक थोर ऋषीनें कुशांनीं ह्मणजे दर्भांनीं आवरण केलें, ह्मणून त्या तीर्थास कुशावर्त असें नाव पडलें. हें कुशावर्ततीर्थ त्रैलोक्यांतही दुर्लभ आहे!

र्णिला आहे. कुशावर्ततीर्थापासून ती प्रवाहरुपानें वाहत जाऊन पूर्व समुद्रास मिळते. याप्रमाणें ही गंगा गौतमानें भूलोकांत आणिली म्हणून तिला गौतमी असे म्हणतात; व दर्शनादिकें करून स्वर्गदेणारी आहे म्हणून तिला गोदावरी असें नांव पडलें तेंच नांव सांप्रत- काळीं लोकांत प्रसिद्ध आहे. हें कुशावर्ततीर्थ मुळचें हेमाडपंती बांधिलेंलें होतें. त्यावर अलीकडे रावजीमहादेव पारनेरकर म्हणून होळकराचे फडणीस झाले, त्यानीं हें उत्तम चिरेबंदी बांधिलें. यास बांधून सुमारें सवाशेंवर्षें झालीं. याचें काम फार रमणीय आहे. भोंवतालच्या धर्मशाळा व देवळें मिळून हें बांधण्यास सात लक्षरुपये लागले असें ह्मणतात.

त्र्यंबकेश्वरज्योतिर्लिंगाचा माहाप्रासाद (मोठें देऊळ) पेशव्या- नीं बांधिला. याचा प्रारंभ बाळाजीबाजीरावऊर्फनानासाहेब पेशवे यांचे हातून शके १६७७ ह्या वर्षी होऊन याची समाप्ति नानासाहे- ब यांचे नातू माधवरावनारायणऊर्फसवाईमाधवरावपेशवे यांचे हातून शके १७०८ या वर्षी झाली. यास खर्च दहालक्षांवर रुपये लागले असें म्हणतात. भोंवताला दगडी मजबूत कोट असून त्याचे आंत फरसबंदी मोठें पटांगण आहे याची दक्षिणोत्तर लांबी सुमारानें सवाशें हात असून पूर्वपश्चिम लांबी आजमासें दीडशें हातांवर आहे. या पटांगणाच्या मध्यभागीं हें देऊळ पूर्वाभिमुख आहे याची उंची सरासरी छपन हात आहे. या देवळाचें काम हिंदुशिल्पशास्त्राप्रमाणें बांधिलें आहे. त्या शास्त्रान्वयें हा मेरू नामक जातीचा प्रासाद आहे असें ह्मणतात. कोठास चारी दिशांस दरवाजे आहेत. त्यांत उत्तरे

---

टीप १ चंद्र सूर्य ग्रहणकालीं प्रयागास सत्पात्रीं सवत्स व सालंकार अशा हजारो (असंख्य) गाईचें दान केलें असतां जें पुण्य प्राप्त होतें त्यापक्षाहि वर ह्मणजे अत्युत्कृष्ट फल स्नानानें प्राप्त होतें ह्मणून हिला गोदावरी ह्मणतात. अशी गोदावरी शब्दाची निरुक्ति गौतमी माहात्म्यांत आहे. केवळ स्मृतिमात्रेंकरून सकल पृथ्वीदानाचें पुण्य प्राप्त होतें असेंही त्या पुराणांत वर्णन आहे.

कडील दरवाजा फार मोठा असून त्यावर नगरखाना चिरेबंदीच बांधलेला आहे. येवढें मोठें देऊळ या प्रांतीं दुसरें नाहीं! याचें काम फार नकशीदार व बहुत सुंदर आहे. येथें पर्जन्य फार पडतो ह्मणून तें बरेंच जर्जर झालें आहे! या देवळाच्या उत्तरेकडील महाद्वाराच्या वरल्याभागीं त्यावेळचा संस्कृत भाषेंत शिलालेख आहे तो असाः—

शके १६७७युवानामसंवत्सरेमार्गशीर्षकृष्णाष्टम्यां
प्रारंभःश्रीमत्त्रिलोचनशिवालयमश्वशैलभूपीमित
सुशकेचयवाब्दमार्गे ॥ कृष्णाष्टमीभृगुदिनेनृपतिप्र
धानःश्रीबाजिरावतनयोरचनेप्रवृत्तः॥१॥नानाभिधः
स्तदनुतत्सुततोपिवृत्तंपौत्रःप्रपूरयदिदंखलुमाधवा
ख्यः ॥ शाकेष्टखाश्ववसुधासमितेनुवृत्ते॥मायासिते
श्वरतिथौतुपराभवाब्दे ॥ २॥ भगवत्तनयंनानाप्रभुर
त्रनियोजयत्॥नारायणाख्यंतत्सुतौनागेशःपूर्णमातनोत् [१]
शके १७०८पराभवसंवत्सरेमहाशिवरात्र्यांसंपूर्णः ॥

**बल्लाळेश्वर गणपति.** या क्षेत्रास त्रिसंध्याक्षेत्र अशीही संज्ञा आहे. येथें बल्लाळ या नामें गणपतीचा अवतार झाला, अशी गणेशपुराणांत कथा आहे. या बल्लाळविनायकाचे मंदिर दादासाहेबपेशवे यांनीं बांधिलें. त्यास शंभर वर्षें झालीं. मंदिर बांधण्यास खर्च सुमारें तीसहजार रुपये लागला असें ह्मणतात. या क्षेत्रीं ब्रम्हगिरि ह्या नांवाचा मोठा पर्व

---

टीप १ हा शिलालेख आहे तशाचा तसाच येथें लिहिला आहे. यांत अशुद्धें आहेत तीं व्युत्पन्नवाचकांच्या सहज लक्ष्यांत येण्याजोगीं आहेत. ह्या शिलालेखाच्या श्लोकाचा भावार्थ असा आहे कीं, श्रीमंतबाजीरावसाहेबपंतप्रधान यांचे पुत्र नानासाहेब यांनीं या शिवमंदिरास शके ११७७ युवनामसंवत्सरे मार्गशीर्ष वद्य ८ भृगुवासर या दिवशीं आरंभ केला. पुढें यांचे नातु श्रीमंतमाधवरावनारायण यांचे अमलांत शके १७०८ पराभवनामसंवत्सरे माघवद्य १४ रोजीं हें काम समाप्त झालें. या कामावर नारायणभगवंत ह्मणून कारकून योजिला होता, त्याचे हातून आरंभ होऊन त्याचा पुत्र नागेशनारायण याचे हातून समाप्ति झाली. ( हें काम एकंदर ३१ वर्षें चाललें होतें असें दिसतें.)

त आहे. त्यावर सद्योजात, वामदेव, अघोर, ईशान व तत्पुरुष अशीं पांच लिंगाकार शिखरें आहेत. पर्वतावर मुख्य त्र्यंबकनामें तीर्थ आहे. व त्याच्या सन्निध औदुंबरवृक्षाच्या मूळीं गोदावरीचें उत्पत्ति स्थान आहे. पर्वतावर त्र्यंबकेश्वराचें लहानसें देऊळ आहे. या शिवाय त्या पर्वतावर आणखीही तीर्थे आहेत. ब्रम्हगिरि पर्वतास नवक्रोशात्मक ( नऊकोसांची ) एक प्रदक्षिणा आहे. त्या प्रदक्षिणेच्या मार्गांत प्रयागतीर्थ, रामतीर्थ, नागतीर्थ, नरसिंहतीर्थ इत्यादि पुष्कळ तीर्थे व स्थानें लागतात.

त्र्यंबकेश्वर ज्योतिर्लिंगास पेशव्यांकडून बाराहजार रुपयांची सालीना नेमणूक आहे. या नेमणुकीच्या योगानें देवाचा पूजानैवेद्य इत्यादिकांचा खर्च चांगल्या प्रकारें चालतो. येथील संस्थानासारखी व्यवस्था दुसरे कोठें आढळत नाहीं. या संस्थानाकडे कारभारी कारकून पुजारी व दुसरे नोकर लोक मिळून सुमारें साठ सत्तर मनुष्यांचा बेहडा आहे. या संवस्थानचा कारभार जोगळेकर यांजकडे बहुत दिवस चालत असून हल्लीं नारायणराव तात्या जोगळेकर हे कारभारी आहेत. बारा वर्षांनीं सिंहराशीचा बृहस्पति झाला ह्मणजे गोदावरी स्नानाचें फार माहात्म्य वर्णिलें आहे. त्या सिंहस्थपर्वांत ह्या क्षेत्रीं पुष्कळ यात्रा येते, व गोसाव्यांचा मोठा मेळा भरतो. बहुत गोसांवी लोक वर्षभर येथें राहतात. निरंजनी निर्वाणी उदासी वगैरे गोसाव्यांत अनेक पंथ आहेत, त्यांचे वेगळाले मठ येथें आहेत. त्यांस अखाडे ह्मणतात. त्यांत दोन तीन अखाडे उत्तम बांधलेले आहेत. नागबलि नारायणबलि करण्याचा पाठ या क्षेत्रीं फार आहे. बहुत यात्रेकरी लोक हा विधि करितात. या कर्माच्या सोईकरितां

---

टीप १ श्लोक ॥ आद्यंब्रह्मगिरेर्मूर्ध्नितीर्थंत्र्यंबकसंज्ञितं ॥

॥ ततोवाराहमतुलंकुशावर्तमतःपरं ॥ १॥

भावार्थ. ब्रह्मगिरीच्या माथ्यावर त्र्यंबक या नावाचें आद्यतीर्थ आहे. त्यांतून गोदावरी वाराहतीर्थांत आणि तेथून कुशावर्तांत आली.

येथें गोदावरीच्या कांठीं स्मशानांत मोठी धर्मशाळा असून ती अगदीं मोडकळीस आली आहे, असें या वेळीं रघुनाथराव यांनीं पाहून तिचा जीर्णोद्धार करावा असें त्यांचे मनांत आलें. त्या प्रमाणें त्यांनीं तें जीर्णोद्धाराचें कृत्य केलें. त्र्यंबकेश्वराचा महाप्रासाद पेशव्यांनीं बांधिला, परंतु त्यावर कलशस्थापना झाली नव्हती, सबब रघुनाथराव ह्यांनीं नवीन कलश तयार करून त्यांची त्या देवळावर विधिपूर्वक स्थापना केली. हे कलश तांब्याचे असून त्यांवर सोन्याचा मुलामा चढविला आहे. याच प्रमाणें कुशावर्त तीर्थाच्याकांठीं देवळें आहेत, त्यांजवर व त्रिसंधेश्वर आणि त्रिभुवनेश्वर यांच्या देवळांवरही रघुनाथराव यांनींच सोन्याच्या मुलाम्याचे कळस करून बसविले.

त्र्यंबकेश्वरदेव आणि कुशावर्ततीर्थ ह्यां खेरीज येथें तीर्थें व देवळें पुष्कळ आहेत, त्यांतून आम्ही पूर्वी बऱ्याच निर्दिष्ट केल्या आहेत. त्यांत एक पंचतीर्थी मुख्य आहे.

त्र्यंबक हा गांव डोंगराळ आहे. येथील डोंगरी किल्यावर पूर्वी मोगलाईंत व पुढें पेशवाईंत कांहीं शिबंदीलोक व तोफा वगैरे सरंजाम असे. हल्लीं हा गांव नासिकतालुक्याखालीं आहे. एथें सरकारी मराठीशाळा पोष्टहापीस व एक मुलींचीशाळा आहे. येथें लोकांनीं स्थापलेली संस्कृतशाळा आहे. तिला मुख्य रघुनाथराव बिंदूरकर यांचा आश्रय आहे. येथें म्युनिसिपालकमिटी आहे. तिचें सालिना

टीप १ हें धर्मशाळेच्या जीर्णोद्धाराचें काम शके १७८० ह्या वर्षी झालें.

२ हें कलशस्थापनेचें काम शके १७९० ह्या वर्षी झालें.

टीप ३ ह्या पंचतीर्थीचा पुराणांत श्लोक आहे तो असा "गंगाद्वारेकुशावर्तेबिल्वकेनीलपर्वते ॥ स्नात्वाचकनखलेतीर्थेपुनर्जन्मनविद्यते" ॥ १ ॥ भावार्थ. गंगाद्वार, कुशावर्त, बिल्वतीर्थ, कनखळतीर्थ, येथें स्नान केलें असतां पुन्हा जन्म प्राप्त होत नाहीं.

टीप. ४ रा. रा. शिवरामअनंत लेले यांनीं येथें एक लायब्ररी ह्मणजे पुस्तकालय स्थापिलें आहे, त्यास "त्र्यंबकेश्वर पुस्तकालय" असें ह्मणतात.

उत्पन्न अजमासें २२०० रुपये पर्यंत असून इष्टयाबिशमेन्टचा म्ह णजे कारकून शिपाई वगैरे कचेरीचा खर्च दरमाहा पंचवीस तीस रुपयाचा आहे. येथील घरांची संख्या सुमारें ७०० आहे. त्यापैकीं निमे घरें ब्राम्हणांची आहेत. लोक संख्या सरासरी ३८०० आहे, त्यांतून ब्राह्मणांची संख्या १५०० आहे. येथील ब्राम्हण प्रायःभि- क्षुक व तीर्थोपजीवी आहेत. या गांवची जमीन बरड व पाणी गो ड आहे. येथें पाऊस फार पडतो त्यामुळें घरांवर वीतवीत दीडदीड वीत गवत वाढतें. येथें उन्हाळा व थंडी यांचें मान कमी असतें. ये थें लोकांस नारू फार होतात, ते येथील कोडीवपाण्यामुळें होतात, असें म्हणतात. येथें गंगालय [ गंगाळे ] गौतमतीर्थ [ गौतमाळें ] इंद्रतीर्थ [ इंद्राळें ] अशीं तीर्थे तळयाप्रमाणें बांधलेलीं आहेत. विसो बाचेतळें म्हणून एक तलाव आहे त्याचें पाणी चांगलें गोड असून पुष्कळ लोक पितात. म्युनिसिपालिटी झाल्यापासून या गांवचे र स्त्याची वगैरे दुरुस्ती बरीच झाली आहे. या क्षेत्रीं प्रथम पासून म हाशिवरात्रीची एकच यात्रा वर्षांतून एक वार भरत असे. त्या पुढें पोषवद्य ११ स निवृत्तिनाथाची यात्रा भरूं लागली. या गोष्टीस सरासरी पन्नासवर्षें होत आलीं. त्या पुढें आलीकडे शके १७८७ सालापासून कार्तिक शुद्ध १५ चे दिवशीं रघुनाथराव विंचुरकर यां नीं रथोत्सव चालू केला, त्या संबंधानें यात्रा भरूं लागली आहे. आलीकडे येथें कृष्णमंदिर, परशुराममंदिर, राममंदिर, अशीं कांहीं मं दिरें लोकांनीं नवीन बांधलीं आहेत. त्यापैकीं परशुरामदेवास श्रीमंत जवारकर राजे यांनीं पूजानैवेद्या करितां सालीना कांहीं नेमणूक क रून दिली आहे असें ऐकतों. येथें गंगाद्वार व नीलपर्वत यांवर चढून जाण्याकरितां मुंबईकर गृहस्थांनीं पायऱ्या बांधिल्या आहेत. गाय- कवाडाकडून येथें एक लहानसें अन्नसत्र चालू आहे.

रघुनाथराव यांनीं येथील कुशावर्ततीर्थी पूर्वांग उत्तरांग यांसहि त प्रायाश्चित पूर्वक तीर्थविधि ह्मणजे क्षौर, तीर्थोपोषण व श्राद्ध हीं

करून त्र्यंबकेश्वर ज्योतिर्लिंगाची पूजा व ब्राह्मणभोजन वगैरे कृत्य केलें. ह्यानंतर रघुनाथराव यांच्या मनांत अशी इच्छा उत्पन्न झाली कीं, ह्या क्षेत्रीं शिवरात्री वगैरे वार्षिक शिवोत्सव थोडे थोडके रीतीनें तरी चालू आहेत, परंतु रथोत्सवमुळींच नाहीं म्हणून तो आपण चालू करावा! असें मनांत येतांच त्यांनीं त्याचवेळीं एक मोठा भव्य व सुशोभित असा नवीन रथ तयार करण्याचे कामाची योजना करून उत्तम कारागीर आणवून त्याची सुरवात केली! नंतर ते तेथून निघून नासिककडेस चालते झाले. ते त्र्यंबकाहून सातकोसांवर गंगापुर म्हणून गांव आहे तेथें जाऊन उतरले.

गंगापुर गंगापुर हा गांव गोदावरीच्या कांठीं आहे. येथून नासिक हें तीन कोसांवर आहे. या स्थलीं गोदावरींत धौतपाप म्हणून एक तीर्थ आहे. या तीर्था विषयीं गोदावरी माहात्म्यांत कथा आहे ती अ-

धौतपापतीर्थ शीं:—एक ब्राह्मण केवळ अल्पवयी असतां त्याची माता देशांतरीं जाऊन तिनें वेश्या धर्म स्वीकारिला. पुढें कांहीं कालांने ती परत या स्थलीं आली. तेव्हां परस्परें आपण मातापुत्र आहों, हें न जाणोन तीं उभयतां विषयसुखाचा अनुभव घेऊं लागलीं! प्रति दिवशीं त्या ब्राह्मणानें या तीर्थीं स्नानास जावें, तेव्हां त्याचा देह मलिन व विवर्ण दिसावा! स्नान करून परत येतांना त्याची देहकांति सोज्वल दिसावी! असें तेथें असणारे ऋषींनीं पाहून ते याच्या कारणाचा शोध करूं लागले. तेव्हां शोधाअंती हे परस्परें मातापुत्र आहेत असें समजलें! ही गोष्ट पुढें त्या उभयतांसही समजली. तेव्हां त्यांनीं आपसांत एकमेकास खुणाखाणा पुसून शोध केला. त्यांतही आपण मातापुत्र आहों हीच गोष्ट सिद्ध झाली! मग कांहीं काळानें तीं दोघें मरण पावलीं.तेव्हां या तीर्थस्नानाच्या प्रभावानेंत्यांचें तें सर्व पाप दूर होऊन त्यांस उत्तम गति प्राप्त झाली!

क्षुधांबिका देवी ह्या स्थलीं क्षुधांबिका नामक एक देवीचें स्थान आहे. येथून जवळच जलालपुर नामक गांव आहे, या गावाचें प्राचीन नाव जग

दीशपुर असे कागदोपत्रीं आढळतें. येथें गोदावरींत वाराहतीर्थ असून त्याचे तीरीं वाराहेश्वर नामें शिवलिंग आहे. तेथून जवळच सोमेश्वर नांवाचें शिवस्थान आहे. हीं स्थानें पुराणप्रसिद्ध आहेत. येथील तीर्थस्नानें व देवतांदर्शनें करून रघुनाथराव हे नासिक क्षेत्रीं गेले. जबालपुर

नासिक हें क्षेत्र फार प्राचीन व पुराणांत वर्णिलेलें आहे. याच्या पूर्वोत्तर भागीं गोदावरी नदी वाहात असून तिच्या पैलतीरीं पंचवटीक्षेत्र आहे. नासिक या क्षेत्राचीं युगपरत्वें चार वेगळालीं नांवें आहेत.कृतयुगांत याचें नांव पद्मनगर, त्रेतायुगांत त्रिकंटक, द्वापरयुगांत जनस्थान आणि या कलियुगांत नासिक असें आहे. येथें मुख्य तीर्थ गोदावरी असून तिच्यांत अनेक तीर्थें आहेत, त्यांचें वर्णन पुराणांत बहुत आहे. या क्षेत्रांत तिळभांडेश्वर, नीळकंठेश्वर, पंचरत्नेश्वर,मृगव्याधेश्वर,तारकेश्वर,सोमेश्वर,सिद्धेश्वर, चित्रघंटा,भद्रकाली, कालिकादेवी,दुर्गादेवी,नारायण,व्यंकटेशबालाजी, राम, मारुती, गणपति, मुरलीधर, उमामहेश्वर, अशीं प्राचीन व अर्वाचीन मिळून बहुत देवस्थानें आहेत. अहल्याबाईहोळकरीण, नारोशंकरराजेबाहादर, चांदोरीकरहिंगणे, व या शिवाय दुसरेही कित्येक गृहस्थ यांनीं येथें गोदावरीस मोठाले घाट व सुंदर मंदिरें बांधिलीं आहेत! पेशव्यांनींही येथें गोदावरीस मोठा घाट व पटांगण बांधिलें आहे. तें पेशव्याचें पटांगण ह्मणून प्रसिद्ध आहे! कांहीं वर्षांपूर्वीं रघुनाथभटजी ह्मणून या क्षेत्रीं मोठे सिद्धपुरुष झाले, त्यांचे समाधिस्थानावर उत्तम मंदिर असून त्याचे आजूबाजूस दुमजली धर्मशाळा आहेत; त्यांपैकीं कांहीं धर्मशाळा विंचूरकर यांनीं बांधिल्या आहेत! समाधीच्या पुढें मोठा भव्य सभामंडप आहे, तो विंचूरकर यांचे पदरी भाऊपोतनीस ह्मणून गृहस्थ होते, त्यांनीं बांधिला. भटजीमहाराज समाधिस्थझाल्यापासून त्यांची पुण्यतिथी दर वर्षास माघवद्यांत विंचू- नासिक

टीप १ श्लोक कृतेतु पद्मनगरं त्रेतायां तु त्रिकंटकं॥ द्वापरे च जनस्थानं कलौ नासिक मुच्यते॥ १

रकर यांजकडून होत असते. तो उत्सव तीन दिस होतो. त्यांत क्षेत्रस्थ सर्व सन्यास्यांस भिक्षा होऊन वस्त्रें मिळतात! शिवाय श्राद्धीच्या ब्राह्मणांस वस्त्रें व दक्षिणा मिळते! याखेरीज पुष्कळ ब्राह्मणभोजन होतें! भाद्रपदमासीं त्याचा महालयही विंचूरकर यांजकडूनच चांगला होतो! या क्षेत्रीं भटजीचा मठ या नांवानें हें स्थान प्रसिद्ध आहे. येथें शंकडो लोक या सिद्धपुरुषाच्या समाधिची सेवा करितात.

नासिकचे पूर्वभागास गोदावरी असून तिच्या उत्तरतीरीं पंचवटीक्षेत्र आहे. तेथील मुख्य देवता कपालेश्वरमहादेव होय. त्रेतायुगीं रामचंद्र हे बंधु लक्ष्मण व पत्नी सीता यां सहवर्तमान वनवास करीत असतां या पंचवटीक्षेत्रांत बहुत काळ राहिले होते. तेव्हां रावणाची बहीण शूर्पणखा, हिचें नाक कापून लक्ष्मणानें तिला विरूप केलें. तें रावणास कळल्यावर त्यानें रामलक्ष्मणांचा वध करण्याकरितां चौदाहजार सैन्यासहित खर, दूषण, व त्रिशिरा, असे तीन राक्षस पाठविले, त्यांचा रामचंद्रानीं वध केला! तें स्थळ हल्लीं नाशिकांत तिवंधा ह्मणून प्रसिद्ध आहे! रावणानें भिक्षुवेष घेऊन सीतेचें हरण केलें, तें पंचवटींतच केलें. या पंचवटीक्षेत्रांत रामचंद्राचें पुराणप्रसिद्ध स्थान आहे, तेथें रंगरावआपाओढेकर यांनीं बहुत खर्च करून एक मोठें व रमणीय असें देऊळ बांधिलें आहे. त्यांत रामलक्ष्मण व सीता यांच्या काळ्या वाळूकामय पाषाणाच्या मूर्ति आहेत. येथें सितेची राहण्याची एक गुहा आहे, तीस सीतागुंफा असें ह्मणतात. तेथून कांहीं अंतरावर रामशेज ह्मणून एक डोंगर आहे. तेथें तृणशय्येवर रामचंद्र निजत होते असें म्हणतात. तपोवन म्हणून लक्ष्मणाचें राहाण्याचें स्थान आहे, तेथेंच त्यानें शूर्पणखेचा नासिकाच्छेद केला! हल्लीं तेथें बैरागी लोक राहातात. येथेंच एक जैनाचें लेणें ह्मणून लहानसें लेणें आहे, तेथें जैनलोकांचे जती वगैरे असतात. पंचवटींत रास्ते यांचा वाडा असून बाळाजीबाजीराव उर्फ नानासाहेबपेशवे यांची

पत्नी गोपिकाबाई यांचे पूजेच्या बाळकृष्णाचें मंदिर व त्यांचीच गो शाळा आहे. आलीकडे भिकाबापूमुठे ह्मणून मैत्रायणीय शाखेचे मोठे सावकार पंचवटींतच रहात होते. त्यांनीं एक सुंदर राममंदिर बांधिलें आहे! मुंबईकर सावकार लोकांनींही येथें लहान मोठ्या ध र्मशाळा बांधिल्या आहेत. व कांहींचीं कामें चालू आहेत! या शि- वाय अहिल्याबाईचे राममंदिर व शंकराचार्यांचा मठ वगैरे पंचवटीं त मंदिरे आहेत. अजगरबावा ह्मणोन मोठे सिद्धपुरूष होऊन गेलें, त्यांची समाधी विंचूरकर यांचे वंशस्थानीं उत्तम बांधिली आहे. ना रोशंकरराजेबहादर यानीं एक मोठें शिवालय या क्षेत्रांत बांधिलें आहे. त्या शिवालयाचे दरवाज्यावर एक फार मोठी घंटा टांगलेली आहे. तीस नारोशंकराची घंटा असे म्हणतात.ती फिरंगी लोकांपासू न जिंकून आणलेली आहे असें म्हणतात. तिजवर सातशें एकवीस ही संख्या युरोपियन अंकानीं लिहिलेली आहे. पातालेश्वर, नरसिं- ह, वगैरे देवस्थानें पंचवटींत प्रसिद्ध आहेत.

नाशिक व पंचवटी ही दोन क्षेत्रें मूळचीं वेगळालीं असून त्यां चे अत्यंत सनिधान व हल्लींची स्थिती पाहातां तीं दोन मिळून एक च गांव आहे असें दिसून येतें! मध्यें गोदावरी वाहत असून तिच्या उभयतीरीं सुंदर मंदिरे, घाट, व मोठाल्या इमारती आहेत, तेणेंक रून ह्या स्थळाचा देखावा फार उत्कृष्ट दिसतो! अशा प्रकारें दुथडी वस्तीचा गांव क्वचितच आढळण्यांत येतो!

नाशिक हें क्षेत्र असून त्यास शहराची रचना आली आहे! ह- ल्लीं पंचवटी हा प्रदेश नाशिक शहराचाच एक भाग मानण्यांत येतो. येथें पूर्वीं मोंगललोकांचा अंमल होता. मुसलमानांचे वस्तीस काजी पुरा, व कोंकणीपुरा अशीं नावें आहेत. या शहराचें मुसलमानी ना व गुलछनाबाद असें आहे! पेशवाई अमल झाल्यावर येथें राजबहा दर, हिंगणें, पेठे, गद्रे, दीक्षित, भागवत.दरवे,करवे,ओक,सुभेदार,वगै रे मोठमोठ्या श्रीमंत लोकांनीं येथें हवेल्या बांधल्या! शेवटील बा-

जीरावसाहेबपेशवे यांनीही येथें मोठा वाडा बांधिला आहे. शहराची प्राचीन वस्ती दक्षिणचे बाजूस टेकडीवर आहे. तेथें मोंगलांचे अंमलांतील गढीचे ठिकाण आहे. पुढें पेशवाई अंमलांत शहरांची वस्ती पश्चिमेकडे व उत्तरेकडे वाढत गेली त्यासच नवापुरा व त्याचे उत्तरेकडील भागास रविवारपेंठ अशी नांवें आहेत. पेशवाई बुडाल्यावर हें शहर मोडकळीस आले! परंतु हे जिल्ह्याचें ठिकाण झाल्यापासून व याचे जवळ आगगाडीचें ष्टेशन झाल्यापासून या शहराची वरीच भरभराटी झाली आहे. येथें कलेक्टर, त्याचे आसिष्टंट, जडज, पोलीससुपरींटेंडेंड, इंजिनियर, फारेष्टर, वगैरे यूरोपियन कामदार राहतात; त्या करितां यूरोपियन तऱ्हेचे बंगलेही येथें झाले आहेत मुसलमानी अंमलांत या क्षेत्रीं जसा काजीपुरा मुसलमानाचा झाला, तसेंच साप्रत खिस्तिलोकांनीं धर्मसंबंधानें येथें एक वेगळेंच ठिकाण करून त्यास शरणपुर असें नाव ठेविलें आहे! हें क्षेत्र ह्मणून हिंदू रोजगारी लोक पेनशान घेऊन येथें बरेच राहिले आहेत. येथें पेक सरकारी इस्पितळ तारायंत्र पोष्टहापीस असून एक हायस्कूल ह्मणजे इंग्रेजी शिकण्याची मुख्य सरकारी शाळा व मराठी सरकारी पांच चार शाळा व एक हिंदूस्थानी शाळा व एक मुलींचीशाळा आहे. येथें म्युनिसीपालिटी(शहर दुरस्तीची मंडळी)स्थापन झाली आहे,तिचे वार्षिक उत्पन्न सरासरी चाळीसहजार रुपये असून तिचे इष्टापलिशमेंटचा ह्मणजे कारकून शिपाई वगैरे कचेरीचा खर्च सालिना ३५०० रुपये आहे. या खेरीज कमेटिनें एक यूरोपियन हेल्थहापीसर पदरीं बाळगला आहे त्याजबद्दलचाच खर्च सरासरी दोन अडीचहजार होतो असें ऐकण्यांत आहे! येथें नाशिक व पंचवटी मिळून लहान मोठ्या घरांची संख्या आजमासें साडेचारहजार असून लोकसंख्या सुमारें चोवीसहजार आहे. त्यांत हिंदूची संख्या अजमासें साडेवीसहजार आणि मुसलमानांची संख्या साडेतीनहजार आहे. एथें पेशवाई अंमलांत वेदशास्त्र या विषयेस उत्तेजन होतें. तें आतां नाहींसें झाल्यामुळें

त्या विद्येचा ऱ्हास होऊन लोकांचा कल इंग्रेजी विद्येकडेस वळला आहे! हल्लीं एथें एक संस्कृतशाळा आहे. तिला रघुनाथराव विंचूरकर यांचा आश्रय आहे. सरकारांतूनही या शाळेस वर्षास कांहीं मदत मिळूं लागली आहे. एथील आड, व विहिरी यांचे पाणी बहुत करून खारें आहे. पिण्याचें पाणी कायतें गोदावरीचें, तें उष्णकाळांत आटून थोडें राहिलें ह्मणजे बरीच आडचण पडते. येथील हवा सर्द आहे. येथें व्यापार बराच चालतो. आगगाडी चालूझाल्यापासून येथें निरंतर यात्रा असते. येथें तांबेपितळेचीं व चांदीचीं भांडीं उत्तम घाटदार होतात. तशींच येथील मागावर लुगडींही चांगलीं टिकाऊ निघतात. येथें चैत्रांत रामनवमीचा, आश्विनमासीं नवरात्रांत व्यंकटेशाचा, कार्तिकांत नारायणाचा, असे उत्सव होतात. या उत्सवांत बरींच ब्राह्मणभोजनें होतात. चैत्रशुद्ध ११ स पंचवटींतील रामाचा रथोत्सव होतो. त्या करितां पुष्कळ यात्रा जमते. त्र्यंबकापेक्षां येथें पर्जन्य फार कमी पडतो, परंतु उन्हाळा व थंडी यांचें मान विशेष असतें! म्युनिसिपालकमिटी असल्यानें शहराची दुरुस्ती बरीच राहाते! येथून तीन कोसांवर एक लहान डोंगर आहे. त्यांत प्राचीन कोरीवलेणें पाहाण्यासारखे आहे.येथें जवळच टांकळी ह्मणून ठिकाण आहे तेथें प्रसिद्ध रामदासस्वामी कांहीं दिवस राहिले होते, त्यांनीं तेथें एक मारुती स्थापला आहे. त्याचा उत्सव तेथें चैत्रीपूर्णिमेस होतो. त्र्यंबक व नासिक या क्षेत्रीं ब्राह्मणधर्म संबंधानें शौच आचार वगैरेच्या बहुत मर्यादा होत्या, त्यांत कालमानानें अंतरपडून लोक स्वेच्छाचार व स्वतंत्र होऊं लागल्यामुळें विधिनिषेधाकडे त्यांचें दुर्लक्ष्य होत चालले आहे! इतर क्षेत्रांत असाच प्रकार असल्याचें ऐकण्यांत येतें ! रघुनाथराव हे नासिकास येऊन त्यांचा पंचवटींत वाडा आहे तेथें उतरले. नंतर उभयक्षेत्र संबंधानें त्यांस जें कर्तव्य होतें तें करून ते सप्तशृंगास गेले.

सप्तशृंग हें उत्तम ठिकाण असून येथील पर्वतावर देवीचें एक

अप्रतिम स्थान आहे! माहूर, तुळजापुर, कोल्हापुर, आणि सप्तशृंग अशीं शक्तीचीं साडेतीन पीठें वर्णिलीं आहेत. त्यांत सप्तशृंग या स्थानास अर्धमात्रा अशी संज्ञा आहे! पर्वताची चढण फार मोठी आहे. पर्वतावर जाण्यास पायऱ्या बांधल्या आहेत, त्या स्थलविशेषीं कठीण आहेत! गाड्या घोडीं जाण्यास दुसरा मार्ग चांगला आहे. परंतु तो फार दूरचा असल्यामुळें पायऱ्यांच्याच मार्गानें बहुतेक लोक जातात. पर्वतावर शैवालय म्हणून एक तीर्थ मुख्य असून दुसरें काली नावाचें तीर्थ आहे. त्या तीर्थाच्या सन्निध गोंडस्वामी ह्मणोन मोठे तपस्वी सन्याशी राहत होते. हे मोठे शक्त्युपासक असत. त्यांवर भगवतीचा प्रसाद इतका होता कीं, त्यांजबरोबर तिचें साक्षात् भाषण होत असे, अशी प्रसिद्धी आहे! ज्या समयीं भाऊसाहेबपेशवे अफगाणचा बादशाहा अमदेशाहाअबदाली याजवर चढाई करून जाऊं लागले, तेव्हां ते देवीदर्शनार्थ पर्वतावर गेले. त्या समयीं स्वामींचें वृत्त त्यांस समजून त्यांनीं स्वामींचा कांहीं छल केला! तेव्हां स्वामीनीं त्यांस शाप दिला. त्या योगें त्यांचा पाणिपत येथील लढाईंत पराजय होऊन सर्वस्वीं नाश झाला असें म्हणतात! सरस्वतीतीर्थ, तांबूलतीर्थ अशीं तीर्थें येथें पुष्कळ आहेत. बहुतेक वस्ति तीर्थासन्निध आहे. तीर्थापासून वर आणखी बहूत चढून जावें लागतें. तेथें प्रभावळी सारखा पहाड असून मोठी कपार आहे. तींत मोठी भव्य व अतिरमणीय अशीं देवीची मूर्ति आहे! तिच्या पुढें लहान मंडप रघुनाथराव ह्यांनीच बांधिला आहे. येथें गरसोळीची व अष्टतीर्थाची अशा दोन प्रदक्षिणा आहेत. त्या कोणी भाविक लोक करितात. देवीच्या मागें जो मोठा पर्वत आहे त्यावर चढण्यास बिलकूल मार्ग नाहीं. कोणाची पर्वतशिखरावर ध्वज लावण्याची इच्छा असल्यास जवळ एक गांव आहे, त्या गावांतील एके शूद्राचे कुळांतील मनुष्यांस मात्र शिखरावर जाऊन ध्वज लावतां येतो! इतर कोणास वर जातां येत नाहीं! त्या शूद्राचे कुलास देवीचा वर असल्यामुळें त्या

शैवालयतीर्थ
कालीतीर्थ

तील मनुष्यास मात्र शिखरावर चढतां येतें, असें तेथील लोक सांगतात. ध्वज लावण्याचे मेहेनतीबद्दल जें द्यावयाचें त्याचा नेम ठरलेला आहे, त्याप्रमाणें त्याला द्यावें लागतें. तो मनुष्य ज्या मार्गानें जातो त्या मार्गानें जाण्याविषयीं पुष्कळ लोकांनीं यत्न केले, परंतु कोणासही रस्ता सांपडला नाहीं! सुरथ नामक राजा व समाधि नामक वैश्य यांची कथा सप्तशतीत प्रसिद्ध आहे. त्या उभयतांवर भगवतीचा प्रसाद झाला तें स्थान हेंच होय! ह्या पर्वतावर अनेक प्रकारच्या वनस्पती आहेत. शेजारीं मार्कंडेय नावें पर्वत आहे. त्यावर मार्कंडेयऋषीचा आश्रम असून त्याचेच नांवानें प्रसिद्ध असें तेथें एक तीर्थ आहे. रघुनाथराव यांस दिवाळी ह्या ठिकाणीं पडली. दिवाळींतील अमावास्येस सायंकाळीं लक्ष्मीपूजन विहित आहे, तें लोक घरोघर यथासंभव करितात! रघुनाथराव यांस तर त्या दिवशीं प्रत्यक्ष महालक्ष्मीचें संन्निधान प्राप्त झाल्यानें मोठा आनंद झाला, आणि त्यांनीं त्या सायंकाळीं मोठ्या भक्तियुक्त अंतःकरणानें तिची स्वहस्तें महापूजा केली! दुसरे दिवशीं ब्राह्मणभोजन करून ते गडाखालीं आले. तेथें एक चांगला गांव आहे त्यास वणी म्हणतात. तेथेंही देवीचें स्थान असून एक बांधीव तलाव आहे. तेथून समीपच नदी आहे. तिच्या सन्निध तिळभांडेश्वर नावाचें शिवस्थान फार रमणीय आहे. सप्तशृंगाचा पर्वत खानदेश जिल्ह्याचे हद्दींत असल्यामुळें उष्णकाळीं त्या जिल्ह्यांतील साहेबलोक हवा खाण्याकरितां कचेरीसुद्धां त्यावर जातात! मार्कंडेयप वणी

रघुनाथराव हे सप्तशृंगाहून निघून क्रमानें अगस्तिऋषींच्या आश्रमास आले, त्या स्थलास आतां अणकाई असें म्हणतात. तेथें मोठा पाहाडी किल्ला आहे. हा किल्ला विंचूरकर यांनीं मोंगला बरोबर मोठी लढाई करून त्यांपासून जिंकून घेतला. तो त्या दिवसापासून इंग्रजी अंमल होईपर्यंत शंभर वर्षे त्यांचेच ताब्यांत होता. त्यांची सर्व मालमत्ता याच किल्ल्यावर राहत असे! या स्थलीं अगस्तीचा आगस्त्या (अणक

आश्रम असून अगस्ति नामें तीर्थ आहे. रामचंद्र दंडकारण्यांत आले त्या समयीं लोपामुद्रेसहीत अगस्त्यऋषि ह्या पर्वतावर होते. तेथें त्यांचें त्यांनीं दर्शन घेतलें. ते वेळेस रावणवधार्थ पाशुपतअस्त्र शंकरापासून प्राप्त व्हावें म्हणून अगस्त्यऋषीपासून रामचंद्रानें शिवमंत्राचें ग्रहण केलें, आणि नासिकाजवळ रामगिरि नामें पर्वत आहे त्यास हल्लीं रामसेज असें ह्मणतात, तेथें तप करून शंकरापासून पाशुपतास्त्र प्राप्त करून घेतलें अशी पुराणांत कथा आहे.

कोपरगांव रघुनाथराव ह्यांनीं अगस्तितीर्थीं स्नान करून गोदातीरीं कोपर गांवचें सन्निध बेट ह्मणून ठिकाण आहे तेथें जाऊन मुक्काम केला. गोदामाहात्म्यांत या स्थलाविषयीं बहुत वर्णन आहे. एथें मुख्य देवता शुक्रेश्वरमहादेव आहे. येथें शुक्राचार्यांचा आश्रम असून त्यानेंच शुक्रेश्वर हें शिवलिंग आपल्यानावानें स्थापन केलें. या शुक्रेश्वराचें मंदिर प्राचीन आहे. शेवटले बाजीराव साहेबपेशवे यांनीं मंदिराच्या तीन बाजूंस दुजोडी धर्मशाळा बांधिल्या आहेत. देवाचे मंदिराबाहेर शुक्राची कन्या देवयानी हिचें स्थान आहे. त्या पुढें गोदावरी व पलीकडे बृहस्पतिचा पुत्र कच याचा आश्रम आहे. तेथें कचानें स्थापलेलें कचेश्वर नामें करून शिवलिंग आहे. याविषयीं गोदामाहात्म्यांत कचेश्वर कथा आहे ती अशी:—

दैत्यांचा गुरु शुक्र यास शिवापासून मृतसंजीविनी विद्या प्राप्त झाली होती, त्या योगें युद्धांत मरण पावलेले दैत्य शुक्रानें पुन्हां सजीव करावे! ही विद्या देवांचा गुरु जो बृहस्पति त्यास येत नव्हती! या करितां सर्व देवांनीं बृहस्पतीचा पुत्र कच यास ती विद्या संपादन करण्यास्तव शुक्राकडेस पाठविलें. तेव्हां शुक्र हा देवयानी नामक कन्येसह आपले आश्रमीं असतां कच हा तेथें येऊन शुक्राचे सेवन करून त्याच्या आश्रमीं राहाता झाला. पुढें बहुत काल गुरु सेवा झाल्यावर देवयानीचे आग्रहामुळें शुक्रापासून मृतसंजीविनी विद्या कचास प्राप्त झाली! नंतर कच हा गुरुकुलवासाची समाप्ति करून प

रत जाण्यास सिद्ध झाला. तेव्हां देवयानीनें त्यास आपलें पाणिग्रह
ण करण्याविषयीं बहुत आग्रह केला, परंतु त्याची ती गुरुभगिनी असल्या
मुळें त्यानें ती गोष्ट मान्य केली नाहीं. त्यावरून देवयानीला अत्यंत
कोप येऊन तिने कचास शाप दिला! तेव्हां कचालाही संताप चढून
त्यानें तिला शाप दिला! हा वृत्तांत या स्थलीं घडला. ज्या स्थलीं
कचास मंत्रोपदेश झाला, तें स्थळ हल्लीं तेथें दाखवितात. गोदेचे प
लीकडे कचेश्वर नामक शिवालिंग आहे. त्या शिवलिंगास मंदिर न
सून तें अश्वत्थाच्या वृक्षाखालीं आहे. त्या अश्वत्थास पार बांधिलेला आ-
हे. हें स्थान अत्यंत जागृत असल्यामुळें बहुत लोक येथें येऊन सेवा करि
तात व आपले मनोरथ पूर्ण करून घेतात! तेथें नागबलि व नाराय
णबलि हमेश होतात. या स्थानीं पांच चार तरी सेवेकरी नेहमी राहू
न देवाची सेवा करीत असतात! कोंपरगांवीं दादासाहेबपेशवे बहुत
दिवस प्रतिबंधांत होते! पुढें बाजीरावसाहेब हे ही येथें बरेच दिवस
होते! बाजीरावसाहेब यांस राज्यपद मिळाल्यावर हें स्थान त्यांचे
मोठे प्रीतीचें असल्यामुळें त्यांनीं तेथें गोदातीरीं घाट बांधिले व वि श्रीविष्णु
ष्णूची स्थापना केली. येथील शुक्रेश्वर देवास चौघडा, नैवेद्य वगैरे
चे खर्चास नेमणूक करून दिली. शिवाय शिवरात्रीचा उत्सव व
कार्तिकी पौर्णिमेस गोदेचा उत्सव करण्याकरितां नेमणुका करून दि
ल्या, त्या हल्लीं चालत आहेत. एकंदर नेमणूक पांच हजारांवर रुपये
चालत असून तेथील सर्व अधिकार हल्लीं रघुनाथराव विंचूरकर यां
जकडेसच आहे. कोपरगांव येथें घाट व देवालयें फार चांगलीं आ
हेत. तेथें गोवर्धनधारी या नावाचें एक संस्थान आहे. तें ही विंचुरक गोवर्धनधारी
रांचेच देखरेखी खालीं आहे.

रघुनाथराव यांनीं येथील कृत्य आटोपून येथून पुढें नारदी म्ह- नारदीनदी
णून नदी आहे, तिचे तीरीं जाऊन मुक्काम केला. या नदी विषयीं
अशी कथा आहे कीं, पूर्वीं तुंबरु ऋषीनें बहुत तप करून शंकरापा
सून गायन विद्या संपादन केली. तें तुंबरूचें अप्रातिम गायन एके वे-

ळीं नारदानें श्रवण केलें. तेव्हां त्या गायनरसांत निमग्न झाल्यामुळें नारदाचें शरीर द्रवलें! त्यापासून नदी उत्पन्न झाली, तीस नारदीनदी हें नांव प्राप्त झालें. त्या नदीच्या स्नानाचें मोठें माहात्म्य वर्णिलें आहे.

वेरूळ घृष्णेश्वर

एथून पुढें रघुनाथराव हे वेरूळ गांवीं गेले. हें गांव पुरूरवराजाचा पुत्र जो एल राजा त्याचें राजधानीचें स्थान होय. येथें घृष्णेश्वर नामेंकरून द्वादश ज्योतिर्लिंगा पैकीं एक लिंग आहे. हें मोठें क्षेत्र असून येथें शैवालय नामें मुख्य तीर्थ आहे. त्याचे अष्टदिशेस त्या तीर्थांतच उपतीर्थें आहेत. तीर्थाचें उदक चांगलें नाहीं! कांहीं कारणानें ब्रह्मदेवाच्या शापेंकरून तें उदक दूषित झालें, असें पुराणांत आहे. तेथील यात्रा क्रमांत त्या तीर्थीं अष्टदिशेस स्नानें करावीं लागतात. हें तीर्थ अहिल्याबाईहोळकर यांनीं उत्तम बांधिलें आहे. तेथून कांहीं अंतरावर घृष्णेश्वर ज्योतिर्लिंग आहे. त्या देवाचें मंदिर अहिल्याबाईनेंच बांधिलें आहे. येथें आणखीही देवता बहुत आहेत. इला नांवाची नदी देवासन्निध वाहते. या भागांत नानाफडणीस यांची देशमुखी आहे, ती हल्लीं त्यांच्या चिरंजीवाकडे चालत आहे. देवाचे पूजक गुरव आहेत. ह्या स्थलापासून कांहीं अंतरावर एक लहान पर्वत आहे, त्यांत देवादिकांच्या मोठमोठ्या सभा आणि उत्तम प्रकारच्या भव्य आणि सुंदर मूर्ति कोरल्या आहेत! असल्या कोरीव कामास लेणें म्हणतात. या वेरूळच्या लेण्यासारखें अत्यंत विस्तीर्ण, भव्य आणि मोठें असें लेणें पृथ्वींत दुसरें ठिकाणीं अद्यापी आढळण्यांत आलें नाहीं! ज्यांत नानाप्रकारच्या दगडी मूर्ति आहेत, अशा प्रकारच्या सभा तेथें दाहा बारा आहेत, हें स्थल फार अपूर्व व पाहण्या सारखें आहे. इंद्रसभा, सत्यलोक, यमलोक, अशीं वेगळालीं स्थानें वेगळाल्या ठिकाणीं पर्वतांत कोरलीं असून आंत देव दैत्य यांच्या मूर्ति आहेत! राक्षसांच्या मूर्ति फारच मोठाल्या आहेत! त्या पाहून भय वाटतें! येथें बाराज्योतिर्लिंगाची स्थानें आहेत. तसेंच कैलास ह्मणून एक स्थान आहे, तें तर फारच अपूर्व आहे! अशा त्या

अत्यंत सुंदर मूर्ति असून त्यांचा देखील ठिकठिकाणीं भंग होऊन त्या विद्रुप झाल्या आहेत हे पाहून मनाला फारच वाईट वाटतें! आ तां कोणी मनुष्यांनीं हें कृत्य केलें असल्यास तीं मनुष्यें अत्यंत दुष्ट हृदयाचीं असतील यांत संशय नाहीं! पृथ्वींत अवश्य पाहाण्यासारख्या ज्या वस्तु आहेत, त्यांतीलच हें एक स्थळ होय असें असतां त्याचाही नाश करण्यास जीं प्रवृत्त झालीं, तीं मनुष्यें नव्हेत, तर राक्षस होत असें ह्मटलें पाहिजे! हीं लेणीं कोणीं व कधीं कोरलीं या विषयीं रघुनाथरावांनीं पुष्कळ शोध केला. परंतु त्याचा ठिकाण लागला नाहीं! कोठें शिला लेख त्यांच्या दृष्टीस पडले, ते जीर्ण झाल्यामुळें व पालीलिपींत असल्यामुळें त्यांचा ही त्यांस बोध झाला नाहीं! आलीकडे त्या स्थळाची दुरुस्ती निजामाचे दिवाण सरसालारजंग यांनीं करविली असें ऐकतो. या प्रदेशांत मोंगलांचा अंमल आहे. तेथून जवळ रोजा ह्मणून एक गांव आहे. तेथें मुसलमान लोकांची वस्ती असून फार उत्कृष्ट बांधलेले असे दरगे पाहाण्यासारखे आहेत! त्यांत दोन तीन जागा तर फारच उत्तम आहेत! येथें औरंगजेब बादशाहाची कबर आहे. त्या कबरेवर एक सब्जाचें झाड आहे. त्यास पाणी घालण्यास जागा नसतांही तें सर्वकाल हिरवेंगार असतें असें तेथील मुजावर (पुजारी) लोक सांगतात! असो. रघुनाथराव हे वेरूळ क्षेत्र संबंधीं विधि उरकून मार्गक्रमीत टोंके ह्मणून एक गांव आहे तेथें आले. रोजागांव

टोंके हा गांव गोदावरी व प्रवरा या दोन नद्यांच्या संगमाजवळ आहे. प्रवरेस अमृतवाहिनी ह्मणतात! सर्व नद्यांत ही नदी प्रवर म्हणजे श्रेष्ठ होय, ह्मणोन हिला प्रवरा असें नांव प्राप्त झालें. हिची उत्पत्ति पुराणांत वर्णिली आहे ती अशी:— पूर्वकाळीं देव व दैत्य यांनीं मिळून समुद्राचें मंथन केलें. त्या पासून चौदारत्नें निघालीं. त्यांत अमृत कलश होता. त्या करितां देव व दैत्य यांचा कलह उत्पन्न झाला. त्यांत शेवटी दैत्यांनीं तो कलश बलात्कारानें घेतला. टोंके प्रवरानदी

तेव्हां देवांनीं विष्णूची प्रार्थना केली. ते समयीं विष्णूनें मोहिनी रूप धरून त्या स्थलीं येणें केलें. तेव्हां तें लोकोत्तर असें स्त्रीरूप पाहून दैत्यांस मोह झाला! त्या काळीं दैत्यांनीं त्या स्त्रीस ह्मटलें कीं, "अहो आपणच आतां हें अमृत आह्मा उभयतांस वाटून द्यावें" हें दैत्यांचें ह्मणणें मोहिनीनें मान्य करून देव आणि दैत्य यांस पंक्तीनें बसण्यास सांगितलें. त्याप्रमाणें ते बसल्यावर मोहिनीनें अमृताचा कलश घेऊन प्रथम देवपंक्तीत वाढण्यास आरंभ केला! तेव्हां कांहीं कपट आहे असें राहूदैत्याच्या लक्षांत आल्यावरून त्यानें देवरूप धारण करून तो देवपंक्तींत जाऊन बसला ! तेव्हां जेथें राहू देवरूप धारण करून बसला होता, तेथें मोहिनीनें अमृत वाढीत येऊन त्याचे हातावर अमृत घातलें. तेव्हां त्याच्या दोहोंबाजूस चंद्रसूर्य होते, त्यांनीं हा दैत्य आहे असें तत्काळ सुचविलें ! तेव्हां त्याच्या कंठांत अमृत जात आहे, तोंच विष्णूनें चक्रें करून त्याचा मस्तक छेदिला! तेव्हां त्या मस्तकापासून अमृतासह उदकाचा प्रवाह उत्पन्न झाला. त्या प्रवाहास प्रवरानदी म्हणतात व त्याच्या धडापासून जो प्रवाह उत्पन्न झाला, त्याला मुळखडीनदी ह्मणतात. राहूचें मस्तक व धड यांस अमृताचा योग झाल्यानें तीं दोन्हीही अमर झालीं ! अमावास्या आणि पूर्णिमा या दिवशीं सूर्य व चंद्र यांचें त्या वेळचें कृत्य स्मरून राहूदैत्य त्यांस ग्रास करण्यास प्रवृत्त होतो, त्याकाळीं सूर्यग्रहण व चंद्रग्रहण होतें असें पुराणांत सांगितलें आहे. असो तो उदकप्रवाह गोदावरीसीं संगत झाला त्या योगें तें स्थान मोठें पवित्र

सिद्धेश्वर क्षेत्र झालें. त्या क्षेत्रीं सिद्धेश्वर नामें करून शिवलिंग आहे. हें त्र्यंबकेश्वर ज्योतिर्लिंगाचें उपलिंग होय, म्हणोन वर्णन आहे. शिवाय विश्वेश्वर नामें करून शिवस्थान आहे, आणखीही देवतास्थानें व गोदेंत आणि प्रवरेंत तीर्थें आहेत. या स्थलीं, टोकें, कायगांव, व प्रवरासंगम अशीं तीन गावें अगदीं लगत आहेत, या ठिकाणची हवा व पाणी फार चांगलें आहे असें म्हणतात.

नेवासें

तेथून रघुनाथराव हे नेवासें येथें गेले, त्या स्थलास निवासक्षेत्र अशी संज्ञा आहे. मोहिनी अवतार घेऊन विष्णूनें ह्या स्थलीं वास केला, ह्मणोन यास निवासक्षेत्र असें ह्मणूं लागले. तेथें प्रवरानदीचे कांठीं मोहिनीराजाचें मंदिर आहे. देवाची मूर्ति पाषाणाची असून बहुत जीर्ण झालेली आहे. ह्या स्थानीं देव दर्शनास पुष्कळ यात्रा जाते. पूर्वी ज्ञानेश्वर ह्मणोन सिद्धपुरुष झाले, त्यांनीं भगवद्गीतेवर भावार्थदीपिका म्हणून टीका केली तिलाच ज्ञानेश्वरी असें ह्मणतात. ती टीका येथें दगडांवर खोदिली. त्या दगडांपैकीं कांहीं दगड अद्यापि तेथें दृष्टीस पडतात. नेवासें हा गांव तालुक्याचा असून तेथें मामलेदार कचेरी आहे.

मोहिनीराज

नेवासें एथील कृत्य झाल्यावर रघुनाथराव हे बेलापुर ह्मणून गांव आहे, त्या गांवीं गेले. तेथें केशवगोविंद या नावें एक देव प्रवरातीरी आहे. त्या देवाचें मंदिर मोठें आहे. व त्याच्या आसमंतात धर्मशाळा आहेत. तेथील देवता म्हटली म्हणजे केवळ लांकडाचे दोन स्तंभ आहेत, त्यांची पूजा करितात. याच प्रमाणें कांहीं अंतरावर उक्कल ह्मणून गांव आहे, आणि बन म्हणोन अरण्यात एक स्थान आहे; तेथही स्तंभ रूपच देवता आहेत! हें पाहून रघुनाथराव ह्यांस आश्चर्य वाटलें. म्हणोन त्यांनीं तेथील माहात्म्यशोध करून आणवून पाहिलें! तेव्हां स्कंदपुराणांत प्रवरामाहात्म्य आहे. त्या माहात्म्यांत दोन अध्याय ह्या क्षेत्राविषयीं आहेत. त्यांत कथा आहे ती अशीः—"कलियुगाच आरंभीं त्या स्थलीं कोणी एक शूद्र राहात होता. त्यानें आपलें शूद्रधर्मानें बहुत भक्तिपूर्वक शिवाराधन केलें. त्यावर शिवांनीं प्रसन्न होऊन त्यास शिवलिंगस्पर्शाचा अधिकार नसल्यामुळें काष्ठाचे दोन स्तंभ दिले. आणि आज्ञा केली कीं याचें स्थापन करून पूजा करीत जा. हीं काष्ठें शिवलिंग स्थानीं असून विष्णूच्या नामेंकरून प्रसिद्ध होतील! यांच्या पूजेनें हरिहरांच्या पूजेचें फळ प्राप्त होईल ! अशी शिवाची आज्ञा झाल्यावरून त्या शूद्रा

बेलापुर

नें तसें केलें, तेणें करून तो शूद्र उत्तम गतीस गेला. प्रवरेंत केशव गोविंदतीर्थीं स्नान करून त्या हरिहरात्मक कच्छाची जे पूजा करतील त्यांस उत्तम गति होईल." याप्रमाणें माहात्म्यांत कथा असून या स्थानाचें पुष्कळ वर्णन केलें आहे.

बेलापुर हा गांव मोठा आहे. या गांवीं बेलापुरी म्हणोन नाणें पूर्वीं पडत होतें. या गांवीं व आसमंतातभागीं तेलीलोकांची वस्ती बहूत आहे. आणि तेथें तेलाचा व्यापार फार चालतो! गोदातीरचे प्रदेशीं जें तेल विकावयास जातें तें बहूत करून येथलेंच असतें. या

भीमाशंकर बेलापुर गांवाहून रघुनाथराव हे भीमाशंकरनामें ज्योतिर्लिंग आहे, त्याच्या दर्शनास गेले. हें स्थल मोठ्या बिकट सह्याद्रीचे शिखरावर आहे! येथें गाड्या चालत नाहींत या करितां ओझ्यास बैल किंवा घोडीं करावीं लागतात! मार्गांत दोन ठिकाणीं मुक्काम करून तिसरे दिवशीं रघुनाथराव हे त्या क्षेत्रीं जाऊन पोंचले! ह्या पर्वतास 'रथाचल' व अरण्यास 'डाकिनीवन' अशी संज्ञा आहे! भीमरथी [भीमानदी] या पर्वतापासूनच निघाली आहे. पर्वतावर वस्ती डोंगरी चालीची असून ब्राह्मणरीतीचीं घरें पांच चार आहेत. पर्वतशिखरावर भीमाशंकराचें स्थान आहे. या देवाचें मंदिर नानाफडणीस यांनीं बांधिलें आहे. देवाची पूजा व नैवेद्य वगैरेचे खर्चास जुजवी नेमणूक असून एका ब्राह्मणाकडे त्याचा अधिकार आहे. भीमानदीच्या उत्पत्तिस्थानीं विहीर आहे, त्या विहिरीपासून नदीचा प्रवाह वाहतो. हेंच येथें मुख्य तीर्थ आहे. क्षौर, श्राद्धवगैरे विधि याच तीर्थीं करितात आणखी तीर्थें व स्थानें पुष्कळ आहेत.

भीमरथी (भीमानदी) भीमानदीच्या उत्पत्तिविषयीं कथा आहे ती अशी:—त्रिपुरनामें दैत्य, ज्यास त्रिपुरासुर असें ह्मणतात, तो ब्रह्मदेवाच्या वरदानानें अजिंक्य होऊन त्यानें आकाशगामी अशीं तीन पुरें निर्माण केलीं. पुढें त्यापासून देवांस व ऋषींस बहुत पीडा झाली. ह्यास्तव ब्रम्हदेवानें त्याचा वध करण्याविषयीं शंकराची प्रार्थना केली. तेव्हां शंकरांनीं ती मान्य करून युद्धसामग्री सि

द्ध करावी म्हणून सांगितलें. त्यावरून ब्रम्हदेवानें सह्यपर्वताचा [ स ह्याद्रीचा ] रथ केला. चारवेद अश्वस्थानीं योजिले. स्वतः ब्रह्मदेव सा रथ्य करण्यास सिद्ध झाला. विष्णूस बाणस्थानीं कल्पून त्याच्या ( बाणाच्या ) पुंखस्थानीं [ पुच्छस्थानीं ] वायुस व पर्वस्थानीं अग्नीस यो जिलें! या प्रकारें सर्व सिद्धता झाली, तेव्हां शंकरांनीं त्या रथावर आरोहण केलें, आणि पाशुपतमंत्रानें बाण अभिमंत्रित करून एके बा णानें त्रिपुरासुराच्या तीन पुरांचा दाह केला! त्यासमयीं शंकरास जो क्रो ध आला, त्या योगें त्यांच्या मस्तकापासून घर्मधारा उत्पन्न झाली, तीच भीमानदी होय! ती रथाचलापासून निघाली ह्मणून तिला भीम रथी असें नांव पडलें! ह्या क्षेत्रीं कमलजा नामेंकरून एक देवीचें स्थान आहे. येथील पर्वतावर पूर्वीं वाघ बहुत असत! परंतु त्यांपासून क्षेत्रमर्यादेंत कोणास पीडा होत नव्हती, व हल्लीं ही होत नाहीं! महा शिवरात्रीस येथें मोठी यात्रा भरते. तेव्हां मात्र येथें सर्व पदार्थ मि ळतात, इतर वेळीं त्यांची गरज लागल्यास ते बरोबर घ्यावे लागता त! भीमाशंकर येथील यात्राकृत्य आटोपल्यावर रघुनाथराव हे ते थून निघून ओझरास आले.

ओझर या गांवीं गणपतीचें स्थान आहे. हें स्थान अष्टविनायकां तील एक होय. पेशवेसरकारचे दरकदारांतील मुजुमदार यांचे पूर्व जांनीं एथील गणपतीचें देऊळ बांधलें आहे. या देवस्थानाचे खर्चा स ओझर हा गांव इनाम असून त्याची मालकी चिंचवडकर देव यांचे बंधुवर्गांतील कोणी आहेत, त्यांजकडेस चिंचवडकरांनीं सोंप- ली आहे. ओझराहून निघून रघुनाथराव हे भीमातीरीं खेड ह्मणून गांव आहे तेथें गेले. या गांवाचें नांव पुराणांत खेटक असें आहे. तें गांव क्षेत्र ह्मणविलें. भीमाही चार ठिकाणीं दुर्लभ आहे असें पु ओझर खेड

टीप १ ॥ श्लोक ॥ पांडुरंगेमातुलिंगेधुलखेटचखेटकं ॥
सर्वत्रसुलभाभीमाचतुःस्थानेषुदुर्लभा॥ १॥

भावार्थ — पंढरपूर, मातापुर, धुळखेड, आणि खेड या च्यार ठिकाणीं भी- मा फार दुर्लभ आहे!

राणांत म्हटलें आहे त्यांतीलच खेटक ( खेड ) हें एक ठिकाण आहे. येथें चंडीरामबावा ह्मणोन थोडे दिवसांपूर्वी एक साधु झाले. त्यांनीं भीमातीरीं एक विष्णुमंदिर बहुत अपूर्व बांधिलें आहे! व त्याची पूजा नैवेद्याची उत्तम व्यवस्था त्यांनीं आपल्या शिष्य मंडळीकडून काविली ती तशीच आजपर्यंत चालत आहे. खेडापासून कांहीं अंतरावर सिद्धेश्वर म्हणोन एक शिवस्थान आहे. त्या देवापुढें उत्तम बांधलेलें कुंड आहे त्यास भागीरथीतीर्थ असें ह्मणतात. त्याचें पाणी फार चांगलें आहे. या ठिकाणीं दाटझाडी असल्यानें हें स्थान फार रमणीय दिसतें ! खेडाहून निघून रघुनाथराव हे देहू येथें गेले. हा गांव इंद्रायणीचेतीरीं आहे. अर्वाचीनकाळीं तुकाराम ह्मणोन जो महाप्रसिद्ध भगवद्भक्त व साधु झाला त्याचें हें जन्मस्थान होय! या साधूची कीर्ति सर्वत्र प्रसिद्ध असल्यामुळें येथें विशेष लिहीत नाहीं. तुकारामाचे वंशज अद्यापि येथें राहात आहेत. तुकाराम याचे पूजेची विठ्ठलमूर्ति या स्थळीं आहे. येथें संतमंडळी रात्रंदिवस नामघोष करीत असते. या स्थळीं दर्शनाकरितां बहुत वारकरी येतात. येथून जवळ इंद्रायणींत मोठा डोह आहे त्याचे सन्निध तुकाराम एकांत वास करून अभंग करीत असे. देहासहवर्तमान तुकाराम याच स्थळीं वैकुंठलोकास गेला अशी त्याची कीर्ति सांगतात. रघुनाथराव हे देहूहून निघून अळंदी येथें गेले. हा गांव इंद्रायणीनदीचे कांठीं आहे. यास अलकापुरी असें नांव आहे. हें पुराणप्रसिद्ध क्षेत्र असून येथें सिद्धेश्वर ह्मणून एक मुख्य व अनादि असें शिवस्थान आहे या क्षेत्राचें माहात्म्य रघुनाथराव यांनीं आणून पाहिलें, त्यांत याचा मोठा महिमा वर्णिला आहे. एके समयीं गोलोकाहून कृष्णगोपी सहवर्तमान ह्या स्थळीं येऊन क्रीडा करिते झाले. तेव्हां कृष्णाचीं पदें गोपींच्यापदांसहवर्तमान ठिकठिकाणीं वटलीं आहेत, असें क्षेत्र माहात्म्यांत लिहिलेलें पाहून रघुनाथराव ह्यांनीं त्याचा फार शोध केला. तेव्हां काळानें बहुत पदांचा उच्छेद झाला असावा असें त्यांस वा

सिद्धेश्वर

देहू

अळंदी

सिद्धेश्वर

ठलें. तथापि तेथें कृष्णेंद्रस्वामीचे मठा सन्निध एक पार आहे, त्याचे समीप कांहीं पर्दे गयेस अष्टादश पर्दे आहेत, त्या आकृतीची अद्यापि दृष्टीस पडतात. तीं रघुनाथराव ह्यांनीं पाहिली निवृत्तिनाथ, ज्ञानेश्वर, सोपानदेव, मुक्ताबाई अशीं महाभगवद्भक्त व अतिविख्यात चार भावंडें झालीं, तीं एथेंच झालीं. यांचीं चरित्रें प्राकृत ग्रंथकारांनीं बहुत वर्णिलीं आहेत. हें पवित्रक्षेत्र जाणून ज्ञानेश्वरानीं येथेंच योगसमाधि केला! कार्तिक वद्य एकादशीस हजारो लोक या सत्पुरुषाच्या समाधीचे दर्शनास जातात. इंद्रायणीस घाट चांगले बांधले असून पुष्कळ विष्णुमंदिरें आलीकडे झालीं आहेत. अळंदीहून रघुनाथराव हे थेऊर येथें गेले. या गांवी अष्टविनायकांपैकीं एक विनायकाचें [ गणपतीचे ] स्थान आहे या स्थलीं मुळामुठानदी आहे तिच्या तीरीं चिंचवडसंस्थानचे आदिपुरुष मोरयादेव यांनीं तप केल्याचें स्थान आहे. तेथें गणपतीचें मंदिर चांगलें आहे. माधवरावबल्लाळपेशवे यांनीं बदामीचा किल्ला सरकेल्यावर या देवापुढें उत्तम लांकडी मंडप बांधिला तो आतां बहुत जीर्ण दशेस आला आहे. या ठिकाणींच देवाचे सन्निध ओरींत माधवरावबल्लाळ हे कैलासवासी झाले! त्यांची स्त्री रमाबाई हिनें सहगमन केलें तें स्थान येथें नदीतीरीं आहे. त्यावर चिंतामणरावअपा सांगलीकर यांनीं वृंदावन बांधिलें आहे. थेऊर येथून रघुनाथराव हे तुळापुरीं गेले. तेथें इंद्रायणी आणि भीमा ह्या उभय नद्यांचा संगम झाला आहे त्या ठिकाणीं उत्तम घाट असून संगमेश्वर महादेवाचें स्थान आहे. ह्या स्थलीं उभय पवित्र नद्यांचा संगम असल्यामुळें इंद्रायणी माहात्म्यांत या स्थलीं स्नानदानाचें मोठ फल सांगितलें आहे. पूर्वीं या ठिकाणीं औरंगजेबबादशाहाचा मुक्काम असतां त्यानें शिवाजीमहाराज यांचा पुत्र संभाजी यास धरून आणून त्याचा वध केला! ही गोष्ट शके १६११ म्हणजे सन १६८९ इसवी सालीं झाली!

थेऊर

तुळापुर

या गावास तुळापुर हें नांव पडण्याचें कारण असें सांगतात कीं

दिल्लीचा बादशाह औरंगजेब हा दक्षिणेंत आला असतां तो एकेसमयीं या गावांजवळ भीमानदी उतरावी लागले तेथें येऊन उतरला. तेव्हां त्याचें लश्कर मागून यावयाचें होतें ह्मणून तो कांहीं वेळ तेथें च थांबला. तेसमयीं तेथें एक नावाडी होता तो फार चलाख व हुशार असा दिसल्यावरून औरंजेबानें त्यास जवळ बोलावून गमती करितां त्याचबरोबर कांहीं गोष्टी केल्या. तितक्यावरून तो नावाडी मोठा हजरजबाबी व हिक्मती आहे असें औरंगजेबास वाटलें. बादशाहाबरोबर बोलत असतां त्यानें असेंही बोलून दाखविलें कीं, या पृथ्वीवर असा कोणताही प्राणी नाहीं कीं ज्याचें वजन मला सांगतां येणार नाहीं! त्यावरून औरंगजेबानें आपल्या हत्तीचें वजन किती आहे तें सांगण्याविषयीं त्यास हुकूम केला! तेव्हां त्या नावाड्यानें तो हत्ती आपल्या एक्या मोठ्या नावेवर चढविला. आणि त्या हत्तीच्या भारानें नावेचा भाग पाण्यांत बुडून पाणी जेथवर चढलें तेथें खूण करून तो हत्ती खालीं उतरिला. आणि हत्ती नावेवर असतां जितका भाग पाण्यात बुडाला होता तितका भाग पाण्यांत बुडेपर्यंत नावाड्यानें नावेंत दगड भरले. नंतर ते दगड वेगळाले वजन करून एकंदर जी बेरीज झाली तितकें त्या हत्तीचें वजन आहे असें त्यानें बादशाहास विनंती करून कळविलें! तेव्हां ती त्याची चमत्कारिक युक्ति पाहून बादशाहास मोठें आश्चर्य वाटून बहुत संतोष झाला. आणि त्यानें त्या गावाचें तुळापुर असें नवें नाव ठेवून तें तत्काल त्या नावाड्यास वंशपरंपरेनें इनाम करून दिलें! तेव्हां पासून लोक त्या गावास तुळापुर असें ह्मणूं लागले! कोणी ह्मणतात कीं, थोरलेबाजीरावसाहेबपेशवे यांनीं या गांवीं तुळापुरुषाचें दान केलें, ह्मणून त्यास तुळापुर असें नांव पडलें! असो.

जेजुरी तेथून रघुनाथराव हे जेजुरीस गेले. तेथें पर्वतावर मार्तंडभैरवाचें स्थान आहे, त्या पर्वतास जयाद्रि असें नांव आहे मणी व मल्ल ह्या उभय दैत्यांचे वधार्थ शंकरांनीं मार्तंडभैरवरूप धारण करून त्यांचा व

ध केला. त्याकाळीं पार्वतीनें म्हाळसा हें नांव धारण करून मार्तंडभैरवा चें अर्धांगीं बसली. याप्रमाणें गंगेनें बाणादेवी हें नाम धारण करून ती त्या स्थलीं प्राप्त झाली. पर्वतशिखरावर देवाचें मंदिर बहुत रमणीय बांधिलें आहे पर्वतावर जाण्यास पायऱ्या आहेत. पर्वताचे आसमंतातभागीं बहुत तीर्थें, व स्थलें, जयाद्रिमाहात्म्यांत वर्णिलीं आहेत. हा देव, ब्राह्मण व शूद्र इत्यादि जातीचा कुलस्वामी असून त्याची उपासना बहुतांस आहे. जयाद्रिमाहात्म्यांत अशी कथा आहे कीं, “ मार्तंडभैरव हा गोकुळांतील नंद नामक गोपाचा कुलस्वामी होता. गोकुलांमध्यें कृष्ण हा लहान बाळ असतां एके दिवशीं तो देवघरांत गेला व तेथें मार्तंडभैरवाची मूर्ति होती ती हातांत घेऊन आई हें काय आहे असें त्यानें माता यशोदा हिजला विचारिलें. तेव्हां यशोदा बोलिली कीं, अरे बाळा हा आपला कुलस्वामी आहे हें ऐकतांच कृष्णानें ती मूर्ति दूर फेंकून दिली! असें करितांच कृष्णाची वाणी बंद होऊन तो कुत्र्यांसारखा शब्द करूं लागला! हें पाहून नंदादिक सर्व गोपाळ भयचकित होऊन तेथें आले. तेव्हां अकस्मात नारदही त्या स्थानीं प्राप्त झाले. त्यांस हें सर्व वृत्त श्रुत केल्यावर त्यांनीं सांगितलें कीं, कृष्णापासून कुलस्वामीची हेलना झाली आहे, या मुळें असें झालें. या करितां तुह्मी सर्वांनीं जयाद्रिनामक पर्वतावर तुमचा कुलस्वामी आहे त्याचे यात्रेस जाऊन त्यास शरण निघावें. व तेथें व्याघ्रचर्म धारण करणारे असे शिवगण हे भक्तरुपानें आहेत, त्यांची प्रार्थना करावी ते प्रसन्न झाले ह्मणजे कृष्ण पूर्वस्थितीवर येईल. असें नारदाचें भाषण ऐकून नंद यशोदा, आणि सर्व गोपाळ यांनीं सिद्धता करून ते कुलस्वामीचे यात्रेस निघाले. प्रथम कमंडलु नामक नदीतीरीं येऊन त्यांनीं स्नानादि कृत्य केलें. ही नदी महादेवाचे कमंडलूपासून उत्पन्न झाली तीस आतां कऱ्हा असें ह्मणतात. तेथून जयाद्रिनामक पर्वतावर येऊन तेथें आपले कुलस्वामीचें दर्शन करून तेथील यात्रा व कुलधर्म केला. नंतर व्याघ्रचर्म धा

रण करणारे मार्तंडाचे उपासक यांस अन्नादि समर्पण करून त्यांची प्रार्थना केली. तेव्हां त्यांनीं हस्तस्पर्श करितांच कृष्ण पूर्वस्थितीवर आला. व्याघ्रचर्म धारण करणार यास आतां वाघे असें ह्मणतात. जयाद्रिमाहात्म्यांत वाघ, मुरळया, गळयांत घालण्याचे गेठ, कुळधर्माचे प्रकार, तळीभरण्याचा विधि, इत्यादि सर्व गोष्टी सविस्तर लिहिल्या आहेत; त्या ते माहात्म्य पाहिलें असतां सर्व लक्षांत येतील. पर्वतशिखरावर मार्तंडभैरव आणि म्हाळसा अशीं दोन लिंगें शेजारीं शेजारीं आहेत, याशिवाय त्यांच्या सन्निध दुसरे पर्वतावर मार्तंडभैरवाचें स्थान आहे, त्यास कडेपठार ह्मणतात. पर्वतावर आणखी पुष्कळ स्थानें आहेत. मार्तंडभैरवासमीप पंचलिंगाचें स्थान आहे. त्याचें वर्णन जयाद्रिमाहात्म्यांत फार केलें आहे. पंचलिंगाचें मंदिर विंचूरकरांचे घराण्यांतील पुरुषांनीं बांधून पूजा नैवेद्याकरितां देवास नेमणूक करून दिली. ती हल्लीं चालत आहे. हें होळकरांचें मुख्य कुलदैवत असल्यामुळें त्यांजकडूनही देवास नेमणूक चालत. हा देव सचीव पुरंदरे वगैरे मोठमोठया संस्थानिकाचाही कुलस्वामी असल्यामुळें त्यांजकडून त्यास पूजानैवेद्य इत्यादिका करितां नेमणुका आहेत. तेथील पुजारी गुरव आहेत. व देवाचें दर्शनास शूद्रादि जाति येण्याचा फार पाठ आहे. यामुळें सोंवळया ओंवळयाचें मान फार कमी असल्याचें रघुनाथराव यांचे पाहण्यांत आलें. तेथील कुळधर्माप्रमाणें यात्रा करून रघुनाथराव हे मोरेश्वर क्षेत्रीं गणपतीचे दर्शनार्थ चालते झाले.

मोरेश्वर

मोरेश्वर एथें गणपतीचें स्थान आहे. गणपतीची मूर्ति मोठी भव्य आहे. परंतु तिचे अवयव स्पष्टपणें दिसण्यांत येत नाहींत येथील गणपतीस मयुरेश्वर असें ह्मणतात. या देवाचे उपासक पुणेंप्रांतीं बहुत आहेत. देवाल यांत तरटीचा वृक्ष आहे, त्यास कल्पवृक्ष ह्मणतात. देवाचे पूजानैवेद्याचा वगैरे बंदोबस्त चिंचवड येथील संस्थानिकांकडून राहतो, या क्षेत्रीं मुख्य तीर्थ कमंडलुनदी होय. या

नदीस प्राकृतांत कऱ्हा ह्मणतात, व ब्रम्हदेवाचे कमंडलूपासून या नदीची उत्पति आहे हें पूर्वी सांगितलेंच आहे. या स्थलीं सर्व जातीचे लोक गणपतीचे उपासक आहेत. ते सर्व संकष्टचतुर्थीचें व्रत करितात. या क्षेत्राचा महिमा मुद्गलपुराणांत बहुत वर्णिला आहे. भाद्रपद शुद्ध चतुर्थीचे सुमारे चिंचवड येथील संस्थानिक या क्षेत्रीं येऊन उत्सव करितात. त्यांत ब्राह्मणभोजन पुष्कळ होतें. ते वेळीं आसपासची यात्रा बहुत जमते. येथें चिंचवडकर संस्थानिकांचा वाडा आहे. त्या वाड्यांत राहून रघुनाथराव यांनीं क्षेत्रसंबंधीं यात्रा केली. तेथून ते शंभुमहादेव येथें गेले.

या क्षेत्रास मांगीश अशी संज्ञा आहे. येथें देवाचें स्थान पर्वतावर असून खालीं पायथ्याशीं सिंगणापुर नांवाचा गांव आहे. या गांवची वस्ति फार विलक्षण आहे. ती पर्वताच्या तळापासून शिखरापर्यंत सारखी असल्यामुळें मोठा चमत्कार दिसतो ! पर्वतास पायऱ्या चांगल्या बांधिलेल्या असून त्यांच्या दोहोंबाजूनीं लोकांची वस्ति आहे. पर्वताखालीं मोठा तलाव आहे, त्यास शिवतीर्थ ह्मणतात. गांवास पिण्याचें कायतें हेंच पाणी आहे! उष्णकालांत पाणी बिघडतें तेव्हां येथें पिण्याचे पाण्याची मोठी अडचण पडते! पर्वताशिखरीं मंदिरांत शिवपार्वतीचीं दोन स्वयंभु लिंगें आहेत. देवाचें मंदिर बहुत अपूर्व बांधिलेंलें आहे. वरले बाजूस जंगमाचा मठ आहे. हें दैवत सातारकरमहाराज यांचें उपास्य असल्यामुळें त्यांनीं यास दरसाल पांच हजारांची नेमणूक करून दिली, ती हल्लीं चालत आहे. तिची व्यवस्था सांप्रत महाराजांचे वंशस्था कडेस असून तेथें तजविजीस त्याकडून कारकून नेमिलेला असतो. हें स्थान दक्षिणकैलास ह्मणवितें! चैत्रीपौर्णिमेस दमनकानें (दवण्यानें) पूजा करण्याचें येथें मोठें माहात्म्य आहे ! दमनकाची उत्पति विष्णूचे अंशापासून झाली असें क्षेत्रमाहात्म्यांत वर्णन आहे. येथील पर्वतास कोथलाचल अशी संज्ञा आहे. या क्षेत्राचें माहात्म्य पद्मपुराणांत अठ्ठावीस अध्याय आहे

शंभुमहादेव

सिंगणापुर गांव

येथें शंकरपार्वती येण्याचें कारण असें झालें कीं, एके समयीं कैला सपर्वतीं शंकर हे पार्वतीसह अक्षक्रीडा करीत होते ( सोंगट्या खेळ त होते ). तेव्हां त्यांस पार्वतीनें जिंकिलें, तेणेंकरून त्यांस क्रोध आ ला, आणि पार्वतीशीं भाषण करणें सोडून ते तेथून आकाशमार्गें श्रीशैलपर्वतावर जाऊं लागलें. तेव्हां त्यांस आकाशांतून भूतलीं कोथलाचलपर्वत फार रमणीय दिसला, ह्मणोन ते त्या पर्वताच्या गुहेंत गुप्त येऊन राहिले! त्यांचे मागून पार्वतीही त्या स्थलीं आली! ते समयीं शंकर हे तिच्याशीं भाषण न करितां कोथलाचलाचे शिखरावर जाऊन बसले ! तें पाहून पार्वती फार खिन्न झाली; आणि तिनें शंकराचा बहुत प्रकारें स्तव केला. त्या योगें ते संतुष्ट होऊन पार्वतीशीं भाषण करून ह्मणाले कीं, पृथ्वींतील पापी जनांचे उद्धारार्थ आपण उभयतां येथेंच वास करूं ! जे कोणी येथील लिंगस्वरूपी आपलें उभयतांचें दर्शन करतील ते पापमुक्त होऊन कैलासास जातील, असें पुराणांत वर्णन आहे. या ठिकाणीं चैत्रमासीं लक्ष संख्येपर्यंत यात्रा जमते! त्या यात्रेंत तेथील एक कोष्टी याचे कुळांत देवास पागोट्याचा ध्वज बांधण्याचा नेम आहे, त्याचा क्रम असा कीं, दर सोमवारीं प्रातःकाळापासून सायंकाळ पावेतों पागोटें विणण्याचें काम करावें. असें वर्षभर करून तें पागोटें विणून तयार करावें. नंतर तें वार्षिक उत्सव प्राप्त झाला असतां एका पात्रांत घालून तें पात्र मस्तकावर घेऊन वाद्यगजर करीत या क्षेत्रांत आणावें. नंतर चैत्र शुद्ध अष्टमीस शिवपार्वतीचा विवाहोत्सव होतो, त्या दिवशीं पर्वतावर जें मुख्य मंदिर आहे, त्या मंदिराचे कळसास त्या पागोट्याचा एक पदर बांधून दुसरा पदर खालीं अमृतेश्वर नामक महादेवाचें देऊळ आहे, त्याचे कळसांस बांधावा. असा क्रम त्या कोष्ट्याच्या कुळांत बहुत पिढ्या चालत आला आहे! असो. तेथून समीप नातेंपोतें ह्मणोन एक गांव आहे. तेथें गौरीशंकराचें स्थान असून गांव मध्यम प्रतीचा आहे. येथील यात्रा करून रघुनाथराव हे

नातेंपोतें

क्षेत्र नरसिंहपुर येथें गेले.

नरसिंहपुर हें क्षेत्र भीमा व नीरा या दोन नद्यांच्या संगमासान्निध आहे. नीरानदी ही सह्याद्रीच्या तळवट जमीनींत एक नीर नांवें विहीर आहे तेथून निघाली. येथून सचीवांचें भोरसंस्थान जवळ आहे. भीमानदी भीमाशंकर क्षेत्रीं रथाचल नामक पर्वतापासून निघून या क्षेत्रीं आली, तेव्हां येथें त्या उभयतांचा संगम झाला. या दोन्हीं नद्यांच्या मध्यें श्रीनरसिंहाचें मंदिर असून त्यांत दोन मूर्ति आहेत. एक प्रल्हाद स्थापित मुर्ति ती वालुकेची, व दुसरी ब्रह्मदेवस्थापित मूर्ति ती पाषाणाची आहे. प्रल्हादस्थापित मूर्ति ही समोरचे बाजूस सिंहासनारूढ पश्चिमाभिमुख असून ब्रह्मदेवस्थापित मुर्ति तिचे डावेबाजूस उत्तराभिमुख आहे. नरसिंहपुर

प्रल्हादस्थापित मूर्तीविषयीं अशी कथा आहे कीं, ज्याकाळीं हिरण्यकशिपु दैत्यानें तप केले, त्याकाळीं त्याचें आंगावर वारुळें वाढून त्याचें रक्तमास सर्व मुंग्यांनीं भक्षिलें! त्या वेळीं इंद्रादिदेवांस असें वाटलें कीं आतां हिरण्यकशिपु हा मरण पावला यांत संशय नाहीं! असा निश्चय करून त्यांनीं त्याचे राजधानीस येऊन तेथें असलेले सर्व दैत्यांचा पराभव केला. आणि हिरण्यकशिपूची स्त्री कयाधु नामें होती तीस ते धरून नेऊं लागले. तेव्हां मार्गांत नारदाची भेट झाली. त्याकाळीं स्त्रियांस धरून नेणें हें उचित नव्हे असें म्हणून नारदानें त्यांचा बहुत निषेध केला! तेव्हां इंद्रानें सांगितलें कीं, इच्यागर्भांत माझा शत्रु आहे, तो उत्पन्न होतांच त्याचा नाश करून मी या स्त्रीस सोडून देईन. असें इंद्राचें भाषण ऐकून नारदानें सांगितलें कीं इचे गर्भांत मोठा भगवद्भक्त असून तो सर्व देवांचें कल्याण करणारा आहे! तेव्हां त्याच्या वधास जर तूं प्रवृत्त झालास तर तुझाच उलटा नाश होईल! असें नारदाचें वचन ऐकतांच इंद्रानें कयाधूस सोडून दिलें. तेव्हां ती नारदाचे आश्रमीं जाऊन वास करिती झाली. त्या समयीं गर्भाचा उद्देश करून नारदानें तीस

भागवत धर्म सांगितले ! नंतर ती यथा कालीं प्रसूत होऊन तिला प्रल्हाद नामें पुत्र झाला. तो मोठा झाल्यावर त्यानें भीमेंतील कोटीतीर्थी सन्निध नारदाचे आश्रमीं वास केला. तेव्हां त्यानें दररोज संगमीं स्नान करावें आणि नरहरीची वाळुकेची मूर्ति करून तिची पूजा करावी ! असा त्यानें निरंतर क्रम चालविला. तेव्हां एके दिवशीं नित्याप्रमाणें वाळुकेची मूर्ति करून तिची पूजा करीत असतां अकस्मात् त्या मूर्तींत नरसिंह प्रगट होऊन त्यानें प्रल्हादास दर्शन दिलें आणि वर माग असें म्हटलें ! तेव्हां प्रल्हादानें वर मागीतला कीं, या मूर्तींत निरंतर आपलें सन्निधान असावें ! आणि जे या मूर्तीचें दर्शन आणि पूजन करतील त्याचे सर्व मनोरथ पूर्ण करावें. हें त्याचें मागणें नरसिंहानें मान्य केलें. या प्रमाणें प्रल्हादस्थापित नरसिंहमूर्तीची कथा आहे.

ब्रह्मदेवस्थापित नरसिंहमूर्तीविषयीं क्षेत्रमाहात्म्यांत इतिहास आहे तो असाः—

महाप्रळयाचे अंतीं विष्णूचे नाभिकमलापासून ब्रह्मदेव उत्पन्न झाल्यावर पुन्हां सृष्टि उत्पन्न होण्याकरितां तो तप करितां झाला! तेव्हां विष्णु प्रसन्न होऊन त्यांनीं त्यास सृष्टिसामर्थ्य प्राप्त होण्याचा वर दिला. त्या समयीं ब्रह्मदेवानें आणखी वर मागीतला कीं, प्रस्तुत ज्या रूपानें आपण मला दर्शन दिलें, त्याच रूपानें मीं जी

---

टीप ।। बाल:कृत्वाप्रनिकांतिसैकतींद्विभुजांशुभां ।। तुष्ट:सिंहाननोदेव:प्रतिमा- ।। यांविशन्हरि: ।। भगवानुवाच ।। प्रल्हादाभंवरश्रेष्टंवरदोहंवरंवृणु ।। न ।। मामालोक्यभूमानंकोपिशोचितुमर्हति ।। १ ।। प्रल्हादउवाच ।। कोवर ।। स्तेवरेशात्वदर्शनादाधिकोमत: ।।यन्नामश्रवणान्मुक्त:सद्य:स्याद्रोवधादापि।। ।। तथापियाचेसंदिष्ट:प्रभुणाकिंकरानुग: ।। स्वामिन्ननेनरूपेणविशेमांप्राति ।। मांभुवि ।। येभजंतिसमर्चंतिमानवा:प्रणमंतिये।।तेषामभीष्टकामानांपूरकोभ ।। र्नर्दा ।। एषएववरोदेयोनान्यंत्वत्तोवरंवृणे ।। मन्मनस्त्वत्पदद्वंद्वे नेद्वेति ।। [illegible] ।। [ याचा भावार्थ वर आलाच आहे ]

ही लोक कल्याणार्थ पाषाणमूर्ति केली आहे, हिजमध्यें आपण निरंतर आविर्भूत असावें! हें ब्रह्मदेवाचें मागणें मान्य करून त्या दिवसापासून त्या पाषाणमूर्तींत विष्णु सर्वकाळ वास करिते झाले! या प्रमाणें ब्रह्मदेवस्थापित मूर्तीविषयीं कथा आहे.

या क्षेत्राचा प्रलयकाळीं देखील नाश व्हावयाचा नाहीं, असें पुराणांत सांगितलें आहे.[२]

एकंदर नगराच्या क्षेत्राचें प्रमाण बारा कोश, मध्यें जें नरसिंहपुर आहे, त्याचे प्रमाण पांच कोश. व नरसिंहाच्यामंदिराचें प्रमाण अर्ध योजन ह्मणजे दोन कोश आहे. असें या क्षेत्राच्या लांबीरुंदी विषयीं वर्णन आहे.[३]

हें सर्व क्षेत्र नरहरीचें शरीर आहे. येथील वाळूचे खडे हे सर्व

---

**टीप** ॥ तत्रश्रीनृहरिःप्रेष्णाद्योमात्मागूढमाहतं॥तपस्तपेतितंमत्वानुग्रहंसततापह॥
॥ सवर्षशतमेकाग्रसमाधौपरिनिष्ठितः । तस्येदंदर्शयामासरूपंनारायणो
। हरिः ॥ श्रीभग• ॥ वेदगर्भप्रसन्नोहंवरंवरयसुव्रत ॥ यदयाचित्वया-
॥ पूर्वंमयादिष्टेनवर्त्मना ॥ ब्रह्मो• ॥ अथापियाचेभवतःशासनेनमहेश्वर॥
॥ स्थातव्यंभुविदेवेशरूपेणानेनसर्वग ॥ श्रीभ० ॥ विधेद्यारभ्यतिष्ठामिभु-
॥ त्रिलोकहितंकरः ॥ श्रवणाद्दर्शनाद्ध्यानात्कायवाङ्मानसाघहृत् ॥ नृसिं
॥ हनामाजीवानांबंधहावरदेश्वरः ॥ स्यास्यामिदृश्यादृश्यात्मानानाशक्ति-
॥ भिरादरात् ॥ तवानुग्रहकामायलोकानांहितदर्शनः ॥ स्थितोपिपापैर्दु
॥ र्लभ्यःप्रायशोहंप्रजापते ॥ [ याचा भावार्थ स्पष्ट असून तात्पर्य वर आलें आहे. ]

**टीप२** श्लोक ॥श्रीनृसिंहकराग्रेणकल्पांतेनखरोज्वलं ॥ त्रिकोणमस्त्रमेतद्धिराजतेपरमर्धिभिः ॥ १ ॥ भावार्थ. (कल्पांतींही या क्षेत्राचा नाश न व्हावा या हेतुनें परमेश्वर आपले हातांत याचे धारण करितात. ईश्वराचे नखकांतीनें प्रकाशित त्रिकोणास्त्राप्रमाणें हें सर्वकाल अविनाशी आहे.)

३ श्लोक॥पंचक्रोशंहरिपुरंनगरंयोजनत्रयं॥देवालयंयोजनार्धंप्रमाणमितिविश्रुतं॥१॥
[ भावार्थ वरील इतिहासांत आलाच आहे. ]

नरसिंहमूर्ति आहेत, येथील वृक्ष हे देव आहेत, पक्षी हे ऋषी आहेत, सर्व मनुष्यें चित्स्वरूप आहेत.

गणपति, अंबिका, दुर्गा आणि शारदा अशा चार देवता चार दिशेस राहून या क्षेत्राचें रक्षण करितात.

या क्षेत्रीं देश व काल हे सदासर्वदा पवित्र आहेत. येथील सर्व ब्राह्मण सत्पात्र आहेत. येथें एके जीवास भोजन घातलें तरी कल्पपर्यंत त्रैलोक्यास भोजन घातल्याचें फळ प्राप्त होतें.

एकवार नृसिंहनाम ग्रहण केलें असतां पातकाचे पर्वत नाश पावतात. संकेतानें, थट्टेनें किंवा सहज रीतीनेंही नरसिंहाचें नामग्रहण एकवार झालें तरी सर्व दोष दूर होतात. याचे नामापुढें कलिकालाचें व मृत्यूचेंही भय राहात नाहीं.

पूर्वी शंकरांनीं त्रिपुरासुराचा नाश केला, त्या काळीं त्यांनीं मोठें भीम म्हणजे भयंकर रूपधारण केलें. तें पाहून सर्व देव भयाभीत होऊन विष्णूस शरण गेले. तेव्हां विष्णूनीं सांगितलें कीं शंकर हे काळाचेहीकाळ आहेत. आणि ते माझें केवळ हृदयं आहेत! त्रि

---

१ श्लोक. ॥ एवंनरहरे:साक्षात्सच्चिदानंदरूपिण: ॥ शरीरंक्षेत्ररूपेणप्रतिष्टाप्राप्तमत्रहि ॥ वालुकाविष्णुरूपेणनरवोविबुधोत्तमा: ॥ पक्षिणोमुनयोयत्रमानवाश्चिद्रसात्मका: ॥ [याचा भावार्थ. वर इतिहासांत आहेच]

टीप२ श्लोक ॥ गणेशश्चांबिकादुर्गाशारदाबहिरास्थिता: ॥भावार्थ.[ वर आलाच आहे ]

३ श्लोक ॥ सदापुण्यतम:कालोदेश:पुण्यतम:सदा ॥ सदापात्रंपवित्रंहियत्र देवोनृकेसरी ॥ १ ॥ एकंसंभोजयेज्जीवंनीराभीमांबुसंगमे ॥ त्रैलोक्यतृप्तिविधिवज्जयेदाकल्पकींनर:॥ २॥( याचा भावार्थ वर इतिहासांत आलाच आहे.)

टीप४श्लोक॥ नकलिर्नचवाकालोनाधिर्नव्याधिरुल्बण: ॥यत्रजागर्तिचंडोग्रोमृत्योर्मृत्युर्नृकेसरी ॥१॥ तावत्पातकमातंगागर्जंतिभुविनिर्भया: ॥ यावद्गीमतटोल्लासीसिंहनामनवाक्पथे ॥२॥ प्रसंगादुपहासाद्वासंकेताद्वुतकीर्तितं ॥ नृसिंहेतिसकृन्नामदहत्यापौघपंजरं ॥३॥ भावार्थ जेथें मृत्युचाहीमृत्यु असा नरसिंह वास करितो तेथें कलिकाल आधिव्याधि यांचें भय नाहीं! जों कालपर्यंत मुखांत नरसिंहनामरूपीसिंह

पुरवधाचे तापानें शंकरास घर्म उत्पन्न होऊन त्यापासून भीमानदी उत्पन्न झाली आहे, तर मी आतां आपलें शरीर द्रवरूप करून भी मेशीं संगत होतो, म्हणजे शंकराचा दाह शांत होईल, असें विष्णु बोलले. आणि ते त्याप्रमाणें नीरारुपेंकरून भीमेशीं संगत झाले. त्या काळीं शंकराचा दाह शांत झाला! तेव्हां त्या संगमस्थलीं देव, ऋषी, गंधर्व, विद्याधर या सर्वांनीं येऊन वास केला. मनुष्य कितीही पापी असला तरी भीमा व नीरा यांच्या संगमीं स्नान केल्यानें तो पापा पासून मुक्त होतो!

सर्व मनोरथ पूर्ण करणारी ह्मणोन नीरा व भीमरूपीशिवापासून उत्पन्न झाली ह्मणोन भीमा, अशी ह्या नद्यांची नामें अन्वर्थ आहेत![1]

प्रयाग क्षेत्रीं त्रिवेणीस्नानापेक्षां येथील संगमीं स्नानाचें फल कोटीगुणित आहे! हें क्षेत्र यज्ञभूमी झाल्यापासून देवांस अत्यंत हर्ष झाला![2]

केवळ संगमाचें नामग्रहण केलें असतां पाप दूर होऊन यमदूताचें दर्शनही होत नाहीं! पितर निरंतर अशी इच्छा करितात कीं आमचे वंशांत कोणी उत्पन्न होऊन तो नरसिंहक्षेत्रीं नीराभीमासंगमीं आमचें तर्पण करो. जो येथें स्नान व तर्पण करील तोच पुत्र कुलदीप समजला पाहिजे! या स्थलीं गयाश्राद्धापेक्षां अधिक फल आ

---

वास करीत नाहीं तों पर्यंतच पापरूपी हत्ती या पृथ्वीवर गर्जना करितात! प्रसंगातें उपहासानें किंवा संकेतानें नृसिंहाचें नामस्मरण एकवार केलें तरी तें पापाचे राशी दुर करितें!

टीप १ श्लोक ॥नयनीसर्वभावानांनीरेयंकथ्यतेबुधैः॥सानीराप्रार्थिताल्लोकोविष्णोःशक्तिःपरेश्वरी॥१॥भियंनयतिकालस्यलोकानांयास्वरूपतः॥भीमस्वमेद्रवतनुर्भीमालोकेषुपठ्यते॥२॥ भावार्थ.[ नीराही विष्णूची शक्ति आहे व ती सर्व मनोरथ पूर्ण करिते. भीमाही शिवाच्या भमिरूपापासून उत्पन्न झाली व ती सर्व भयेंदुरकरिते. ]

टीप २ श्लोक ॥ संगमोयंभुविख्यातःप्रयागइवपावनः ॥ अभवद्यजनंयत्रप्रहर्षमगमन्सूराः ॥ प्रगागइतिविख्यातःप्रयागोत्कोटिपुण्यदः ॥ २ ॥ भावार्थ.[ या नद्यांचा संगम प्रयागासारिखा पावन आहे. येथें यज्ञाच्या योगानें देव संतुष्ट झाले. प्रयागा पेक्षां एथें कोटीगुण फल प्राप्त होतें.]

हे! याप्रमाणें नृसिंहपुर माहात्म्यांत या स्थलाचें फार वर्णन केलें आहे.

संगमीं दोन्ही नद्यांस घाट बांधिला आहे; त्यास पायऱ्या उंच असून अरुंद आहेत ह्मणून जपून उतरावें लागतें. घाटाचा चढाव पुष्कळ आहे. घाटाचे शेवटील टोंकावर गणपतीचें एक अनादिस्थान आहे. त्याच्या पुढें एक उंच दिपमाळ बांधलेली आहे. रघुनाथराव यांनीं आपले जानकी नामक तृतीय पत्नीचे उद्धारार्थ जानकीश्वर या नामें शिवलिंग त्या दिपमाळे जवळ स्थापन करून त्या करितां एक लहान मंदिरही त्यानीं आलीकडे ह्मणजे शके १८०३ ह्या वर्षी बांधिलें. त्यावर पुढें चिरेबंदी पार असून त्यावर फार जुनाट असा एक अश्वत्थवृक्ष आहे. या अश्वत्थास खालचा अश्वत्थ असें ह्मणतात. त्यावर चौफुल्या सारखा चिरेबंदी बांधिलेला असा एक पार आहे. त्याला दगडाचे सोळा खांब आहेत म्हणून त्यास सोळखांबी असें म्हणतात. मध्यभागीं अनादि नृसिंहरूपी अश्वत्थ आहे. त्याचे खालीं मारुती व गणपति यांच्या मूर्ति व एक शिवलिंग आहे. संगमावरील दोन्ही बाजूंच्या घाटांसुद्धां ज्यानें अश्वत्थास सोळा खांबी पार बांधिला, त्यानें शिलालेख स्थापन केला आहे तो असा:—

"शके १५९० कीलकनामसंवत्सरे ज्येष्ट वद्य १३ गुरुवार ते दिवशीं मुधोजीत्रिमलभुरंग याचे पुत्र गोविंदराव व गोपाजी व शामजी यांनीं सोळाखांबा केला, व कुर्णाजी कोनेरी या कामावर होता त्याचा शिक्का"

याप्रमाणें तेथें शिलालेख आहे. या अश्वत्थाची छाया चांगली आहे. या अश्वत्थाखालीं श्राद्ध वगैरे करितात. त्या अश्वत्थाचे मागें एक जुनाट वटवृक्ष आहे. त्यास अक्षय्यवट असें ह्मणतात. त्या वटवृक्षाचे पाराचा जीर्णोद्धार आलीकडे शके १८०३ ह्या वर्षीं रघुनाथराव यांनींच केला.

आतां उभय नद्यांमध्यें संगमापासून जीं तीर्थें आहेत तीं सांगतों. त्यांत प्रथम नीरानदींतील संगमापासून जीं तीर्थें आहेत तीं लि

हितों. याचा अनुक्रम पूर्वेपासून पश्चिमेकडेस एकामागेंएक असा असून शंभर शंभर हातांवर जीं तीर्थें आहेत तीं मोठीं, व पांच पांच हातांवर आहेत तीं लहान असें जाणावें.

प्रथम संगमापासून पश्चिमेस शंभर हातांवर पद्मतीर्थ आहे. येथें लक्ष्मीचे हातांतील कमल पडलें म्हणोन पद्मतीर्थ असें याचें नाम झालें. या स्थलीं कुबेरानें तप केल्यावरून त्याला पद्मनामक निधि मिळाला. तेथून पुढें पश्चिमेस शंभर हातांवर शंखतीर्थ आहे. त्या स्थलीं नृसिंहाचें शंखनामक आयुध राहतें. येथें कुबेरानें तप करून शंखनामक निधि मिळविला. पुढें लक्ष्मीतीर्थ आहे. येथें लक्ष्मीचें निरंतर वास्तव्य असतें. या स्थलीं लक्ष्मीनें आपला चंचलत्वदोष जाण्याकरितां तप केलें, तेव्हां विष्णूनें लक्ष्मीस आपल्या वक्षस्थलीं धारण करून या तीर्थास असें वरदान दिलें कीं, "जो कोणी शुक्रवारीं या तीर्थांत स्नान करील आणि उपोषण पूर्वक सायंकाळीं लक्ष्मीची पूजा करील, त्यास अचल लक्ष्मी प्राप्त होईल." पूर्वीं एका वैश्यानें या तीर्थीं ब्राम्हणास फुटाणे दिले होते, त्या योगानें त्यास व त्याचे वंशस्थांस अचल लक्ष्मी प्राप्त झाली. येथील लक्ष्मीच्या पीठाचे अष्टदिग्भागीं अष्टपीठें आहेत. तीं अशीं:— पूर्वेस कोल्हापुर, दक्षिणेस कामाक्षी, पश्चिमेस विरज, उत्तरेस कामरूप, आग्नेयीस त्रिकूट, नैऋत्येस हिंगूल, वायव्येस सिंधु, ईशान्येस जालंधर, अशीं अष्टदिशेस अष्टपीठें असून मध्यें लक्ष्मीपीठ आहे. तेथून पश्चिमेस शंभर हातांवर गदातीर्थ आहे. या स्थलीं नृसिंहाचे गदारूपी आयुधाचें सन्निधान आहे. या तीर्थीं स्नान केलें असतां भगवद्गदेच्या प्रहारानें पातकें चूर्ण होतात. पुढें शंभर हातांवर पिशाचमोचन तीर्थ आहे. या तीर्थीं श्राद्ध केलें असतां पितर पिशाच योनींतून मुक्त होतात. या

टीप १ कुबेर हा धनाचा स्वामी आहे. याच्या पाशीं धनाचे नवनिधी म्हणजे ठेवे आहेत, त्यांचीं नावें: महापद्म, पद्म, शंख, मकर, कच्छप, मुकुंद, कुंद, नील आणि खर्व अशीं आहेत.

विषयीं श्राद्धकल्पमाळा ह्मणून एक ग्रंथ दाल्भ्यऋषींनें लिहिला आहे. येथेंच नारायणनागबलि होतो. या स्थलीं पिशाचमुक्ती करितां अवश्य श्राद्ध करावें, असें सांगितलें आहे. पुढें गरुडतीर्थ आहे, तेथें गरुडानें तप केल्यावरून, विष्णूनें त्यास आपलें वाहन केलें. तेथून पश्चिमेस एक कोसाचे आंत नृसिंहतीर्थ आहे. या तीर्थाचें प्रमाण एक कोसाचें आहे. विष्णूस नृसिंह अवतारीं बहुत श्रम झाले ह्मणून अवतारकृत्य समाप्त झाल्यावर ते या स्थळीं येऊन विश्रांति पावले. विष्णूस हें स्थान फार आवडल्यावरून त्यांनीं एथेंच वास केला असें क्षेत्रमाहात्म्यांत वर्णन आहे.

सांप्रत नृसिंहपुरक्षेत्रांत कांहीं संकट प्राप्त झाले किंवा महामारी वगैरेचा उपद्रव झाला तर क्षेत्रस्थ लोक या तीर्थी येऊन भगवत् सेवा करितात. येथें नीरेला घाट बांधिलेला आहे. घाटावर देवाचें मंदिर आहे, त्यांत कपारीला नृसिंहाचा तांदळा आहे. तेथें तीन खणाची दगडी ओरी आहे. त्या ओरींत यात्रेकरी लोक स्वयंपाक करितात. शिवाय जवळच मारुतीचें लहानसें देऊळ आहे. तेथें अश्वत्थ, चिंच, निंब, असे वृक्ष आहेत. येथून पश्चिमेस पाव कोसावर आद्योबा (आद्यनृसिंह) याचें स्थान आहे. येथील देवालय कान्हेरकर यांनीं बांधिलें, पुढील खण दादा निंबाजी यांनीं बांधिले, व विहीर जोशीकांकडे यांनीं बांधिली, ती हल्लीं कोरडी आहे. हें स्थान मार्गावर आहे. नृसिंहतीर्थापासून पुढें इंद्रतीर्थ आहे. या स्थलीं इंद्र हा स्नान करून वृत्रहत्येपासून मुक्त झाला. तेथून पुढें हंसतीर्थ आहे. त्या स्थलीं नृसिंहांनीं हंसरूप धारण करून ब्रह्मदेवास ज्ञानोपदेश केला. हंसतीर्थाचे आसमंतांत पुष्कळ तीर्थें आहेत तीं अशीं:— १ मरीचितीर्थ, २ क्रतुतीर्थ, ३ सोमतीर्थ, ४ वरुणतीर्थ, ५ अश्वि

---

टीप १ हा घाट कोणी ब्राह्मण कुळकरणी यांनीं बांधिला.

२ हें मंदिर लोऊळकर जिनसीवाले यांनीं बांधिलें.

३ ही ओरी गंगाखेडकर कोणी काठण उपनावाचे गृहस्थ यांनीं बांधिली.

नीतीर्थ, ६ अत्रितीर्थ, ७ अंगिरातीर्थ, ८ दक्षतीर्थ, ९ धनदतीर्थ, १० निऋतितीर्थ, ११ पुलहतीर्थ, १२ पुलस्त्यतीर्थ, १३ गीष्पत्ति तीर्थ, १४ वायुतीर्थ, १५ वसुतीर्थ १६ वशिष्टतीर्थ १७ देवलती र्थ, १८ भारद्वाजतीर्थ, १९ यमतीर्थ.

अशीं एकुणीस तीर्थे आहेत. यापुढें तीर्थें आहेत तीं अशीं:—

१ तारातीर्थ—या तीर्थी स्नानानें तारा मुक्त झाली.

२ दुर्वासतीर्थ—या स्थलीं तप करून दुर्वासास सिद्धि प्राप्त झाली.

३ कपिलतीर्थ—येथें कपिलांनीं ऋषिमंडळीस सांख्यशास्त्राचा उपदेश केला. या स्थलीं एकाक्षर [ प्रणव ] जपें करून मुक्ति होते. या प्रमाणें नीरा नदींत क्षेत्रमर्यादेचे आंत तीर्थें आहेत तीं सांगीतलीं. आतां भीमा नदीतील तीर्थें सांगतों.

भीमानदींत तीर्थें आहेत त्यांचा क्रम पश्चिम दिशेपासून पूर्व दिशेस संगम झाला आहे, तेथपर्यंत समजावा. भीमेंत पश्चिमेस दुर्गातीर्थ आहे: तेथून तीर्थमालिकेस आरंभ करून संगमीं समाप्ति करितों. हा क्रम तीर्थप्रदक्षिणेचा धरला. मोठीं तीर्थें शंभर शंभर हातांवर, व लहान तीर्थें पांच पांच हातांवर आहेत. हें पूर्वीं सांगितलेंच आहे.

दुर्गातीर्थ पश्चिमेस आहे. तेथें दुर्गेचें स्थान आहे. या देवीस ईवराई म्हणतात. दुर्गातीर्थाचे आसमंतांत स्थानें व तीर्थें आहेत तीं अशीं:—

१ कालरूपतीर्थ—[ येथील देवता उज्जनीमाहाकाल होय. ] २ भीमानृसिंह, ३ महानादेश्वर, ४ विमलेश्वर, ५ कुरुक्षेत्र ६ स्थाणुमहेश्वर.

हीं पुढील स्थानें दुर्गातीर्था सन्निध आहेत.

१ कोटितीर्थ—या तीर्थी प्रयाग व गोकर्ण या तीर्थाहून अधिक फल प्राप्त होतें असें वर्णन आहे. या स्थलीं असंख्य तीर्थें आहेत, व येथें नारदाचा आश्रम आहे. त्या विषयीं क्षेत्र माहात्म्यांत कथा आहे ती अशी:—

एकेसमयीं कोणतें तीर्थ श्रेष्ट या विषयीं ऋषिमंडळीचा वाद झाला.तेव्हां नारदऋषीकडे जाऊन त्यांस विचारावें, आणि ते जें सांगतील तें तीर्थ श्रेष्ट समजावें, असा सर्वांनीं विचार करून त्या वेळीं नारद हे नरसिंहक्षेत्रीं कोटितीर्था सन्निध वास करून होते, त्याकडे जाऊन त्यांस हें वृत्त कळविलें. तेव्हां सर्व तीर्थांपेक्षां हें कोटितीर्थ श्रेष्ट होय याहून दुसरें कोणतेंही तीर्थ श्रेष्ट नाहीं असें नारदांनीं सांगितलें. त्यावरून हें कोटितीर्थ सर्व तीर्थांपेक्षां श्रेष्ट होय, असा सर्वांचा निश्चय होऊन निर्णय ठरला.

या कोटितीर्था सन्निध नारदाचा सर्वकाळ वास आहे. तेहेतीस कोटी देवता, व पृथ्वींतील सर्व तीर्थें येथें वास करून नरहरीची निरंतर उपासना करितात, असें वर्णन आहे.

या तीर्थांत ज्या देवतांनीं आपल्या क्षेत्रांतील ज्या तीर्थासह येऊन वास केला तीं तीर्थें व त्या देवता खालीं लिहिल्या आहेत:—

| तीर्थें. | देवता. | तीर्थें. | देवता. |
|---|---|---|---|
| १ तेजस्तीर्थ. | शंकूकर्णमहादेव. | ९ रामेश्वर. | जटादेवेश्वर. |
| २ कालांजन | कृत्तिवासानी- | १० हरिश्चंद्र. | हरीश्वर. |
| | लकंट. | ११ वृषध्वज. | वृषेश. |
| ३ छगल | कपर्दीशपिशाच | १२ वात्स्यायन. | भव. |
| | मोचन. | १३ भद्रकर्ण | शिव. |
| ४ गंगातीर्थ | पुरुकेश. | १४ धर्मलिंग. | हरेश्वर. |
| ५ सोम्यतीर्थ | गोकर्णासहकु- | १५ नेपाळ. | पशुपती. |
| | कूटनाथ. | १६ दारुक्षेत्र. | दंडधृक्. |
| ६ ब्रह्मावर्त. | देवराट्. | १७ कनखल. | उग्र. |
| ७ अग्नितीर्थ. | प्रभासासहसो- | १८ रुद्रालय. | रुद्र. |
| | मेश्वर. | १९ केदार. | गर्गेशान. |
| ८ गधातीर्थ. | फल्गुसहधर्मे- | २० सुवर्ण. | सहस्राक्ष. |
| | श्वर. | २१ सर्वमेध्य. | सर्वेश. |

| तीर्थे. | देवता. | तीर्थे. | देवता. |
|---|---|---|---|
| २२ श्रीशैल. | त्रिपुरांतक. | ३३ माहेश्वर. | दीपनाथ. |
| २३ जालेश्वर. | त्रिशूलेश. | ३४ भूतेश. | अमरेश. |
| २४ काश्मीर. | विजयेश्वर. | ३५ गंगासागर. | भस्मगात्रवान्. |
| २५ आम्लातक. | सूक्ष्मेश. | ३६ विंध्य. | धरणीवराह. |
| २६ मरुजांगल. | चंडेश. | ३७ कैलास. | गणनायक. |
| २७ रुद्रकोटी. | महायोगी. | ३८ हेमकूट. | विरूपाक्ष. |
| २८ प्रयाग. | शूलटंक. | ३९ पाताल. | हाटकेश्वर. |
| २९ महेंद्र. | महाव्रत. | ४० कर्णिकार. | गणाध्यक्ष. |
| ३० मरुकोट. | महोत्कट. | ४१ गया. | गदाधर. |
| ३१ पुष्कर. | अयोगवीश. | ४२ गंधमादन. | भूर्भुवः स्वः पति. |
| ३२ करवीर. | कपालभृत. | ४३ काशी. | विश्वेश्वर. |

कोटितीर्थापासून पुढें गोतीर्थ आहे. त्या स्थलीं चिंतामणि, कामधेनु, कल्पवृक्ष, हे निरंतर वास करितात. हिरण्यकशिपूच्या वधानंतर प्रल्हादानें स्तुति करून नृसिंहाचा क्रोध शांत केला. नंतर सर्व देवता, व ऋषी हे कामधेनूसह त्या स्थलीं येऊन त्यांनीं प्रल्हादाकडून कामधेनुच्या दुधानें नृसिंहास अभिषेक करविला. नंतर सर्व देवांनीं कामधेनूस वर दिला कीं तुझ्या दुधानें एथें ईश्वरास अभिषेक झाला, यास्तव हें तीर्थ गोतीर्थ या नामानें प्रसिद्ध होईल. याचप्रमाणें अभिषेक काळीं सर्व तीर्थांनीं आपलीं उदकें नृसिंहावर सिंचन केलीं, ह्मणोन त्या स्थानीं झालेल्या तीर्थास सर्वतीर्थ असें ह्मणूं लागले. या ठिकाणची सर्व भूमि कामधेनूप्रमाणें मनोरथ पूर्ण करणारी आहे. तेथें समीपच डावेबाजूस चिंतामणिस्थान असून पृष्ठभागीं अश्वत्थवृक्ष आहे. हाच कल्पवृक्षाप्रमाणें मनुष्यांस इच्छित फल देणारा आहे. तेथून पुढें भानुतीर्थ आहे. या स्थलीं सर्वकाल सूर्याचें सन्निधान असतें. या तीर्थीं सूर्यग्रहणपर्वकाळीं तीर्थाचें फल कुरुक्षेत्राप्रमाणें आहे. त्याचप्रमाणें रविवार, भानुसप्तमी, संक्रांति, रथस

प्रमी या पर्वी येथें स्नानाचें मोठें माहात्म्य वर्णिलें आहे. तेथून पुढें पूर्वदिशेस चक्रतीर्थ आहे. येथें प्रल्हादाचें रक्षण करण्याकरितां चक्रास निरंतर राहण्याविषयीं नृसिंहांनीं आज्ञा केली. पुढें पूर्वेस नंदक नांवाचें तीर्थ आहे या स्थलीं नृसिंहांनीं आपलें नंदकनामें खड्गाचें स्थापन केलें. पुढें समीप पाशतीर्थ आहे. त्यापुढें लांगल ( नांगर ) तीर्थ, पुढें मुसलतीर्थ, अशीं भीमेंतील अष्टतीर्थें आहेत. संगमासन्निध महापद्म, महाशंख हीं तीर्थें आहेत. पुढें नद्यांचा संगम आहे. येथील भूमि ही सर्व तीर्थमयी, व येथील देव (नृसिंहरूपी हरि)हा सर्व देवमय आहे. येथील तीर्थ परमपद देणारें होय. इत्यादि या क्षेत्राचें व संगम तीर्थाचें वगैरे माहात्म्य क्षेत्रमाहात्म्यांत बहुत वर्णिलें आहे.

येथें यात्रा तीनप्रकारच्या आहेत. त्या अशाः—१ वार्षिक यात्रा, २ मासिकयात्रा, आणि ३ नित्ययात्रा या खेरीज चौथी नैमित्तिक यात्रा आहे. या यात्रांचे दिवस येणेंप्रमाणें आहेतः—

( १ )नृसिंहजयंती, रामनवमी, कृष्णजन्माष्टमी, व महाशिवरात्री; या वार्षिक यात्रा होत.

[ २ ]पौर्णिमा व आमावास्या या मासिक यात्रा होत. यांत पौर्णिमेचे दिवशीं गोतीर्थस्नानाचें व अमावास्येच्या दिवशीं संगमतीर्थस्नानाचें विशेष फल आहे.

[ ३ ]प्रतिदिवशीं प्रातःकाळीं, मध्यान्हकाळीं, व सायंकाशीं अ

---

टीप १ सर्वेयंतीर्थरूपाभूःसर्वदेवमयोहरिः ॥ सर्वामरसाभीमानीरासर्वफलदायिनी ॥ स्नातव्यंसंगमेनित्यंतर्पणीयाद्विजेश्वराः ॥ पूजनीयोनृहरिःप्राप्तव्यंपरमंपदं ॥ अत्रतीर्थानिसर्वाणिमंत्राअत्रप्रतिष्टिताः ॥ देवतानृहरिर्यत्रकिमन्यदवशिष्यते ॥ सर्वतीर्थोद्भवंपुण्यंप्राप्नुयात्तत्पदेपदे भावार्थ—एथली भूमी सर्व तीर्थमय आहे. एथील देव सर्व देवमय आहे. भीमाही सर्व वेदमयी आहे, व नीरा ही सर्व फल देणारी आहे. येथील संगमीं नित्य स्नान करावें. ब्राह्मणभोजन करावें. एथें नृहरीचे पूजन करावें, ह्मणजे परमपद प्राप्त होतें. एथें सर्व तीर्थें आहेत. सर्व मंत्र आहेत. एथें देव नरहरि आहे, मग आणखी काय राहिलें? येथें सर्व तीर्थाचें फल पदोपदीं प्राप्त होतें.

शा तिन्हींकाळीं देवाचें दर्शन पूजन करणें ही नित्ययात्रा होय. याचप्रमाणें देवास प्रदक्षिणा व नमस्कार करणें हें ही नित्ययात्रे प्रमाणेंच आहे.

[ ४ ]ग्रहण, संक्रांति, रविवार, भानुसप्तमी, रथसप्तमी इत्यादि निमित्तपरत्वें ज्या यात्रा, त्या नैमित्तिकयात्रा होत. यांत सूर्यसंबंधाचीं जितकीं पर्वें, त्या दिवशीं भानुतीर्थस्नानाचें विशेष फल आहे.

प्रतिदिवशीं नृसिंहाची पूजा अवलोकन करणें, अभिषेककाळीं त्याचें दर्शन करणें, आरती होतअसतां त्याचें मुखावलोकन करणें, व पूजेचे अंतीं नृसिंहास नमस्कार करून त्याचें मुख सुप्रसन्न झालें आहे व त्याची आपल्यावर प्रसन्नता होऊन तो दयार्द्रदृष्टीनें आपल्याकडे अवलोकन करीत आहे अशी अंतःकरणांत भावना करणें हे सर्व प्रकार इच्छित फल देणारे आहेत. नैवेद्य समयीं देवाकडेस अवलोकन करणें हें मात्र पातक सांगीतलें आहे.

या क्षेत्रीं राहून जे कोणी ब्राह्मणाचा द्वेष करतील व ब्राह्मणांच्या वृत्तीचा उच्छेद करतील तशींच दुसरींही अनेकविध पातकें करतील त्यांस नरक प्राप्त होईल. जे कोणी आपल्या सामर्थ्यानुसार नृसिंहाची नित्य पूजा करितील त्यास वैकुंठलोक प्राप्त होईल. जयंत्यादि पर्व दिवशीं पूजा करणारास कोटी यज्ञाचें फल प्राप्त होईल, देवाकरितां तुलसीफुलांचा बाग करून त्यांतील तुळसीफुलें हीं देवास अर्पण झालीं असतां बागेंत तुळसी व फुलें यांचे वृक्ष असतील त्यांच्या पानांच्या संख्ये इतकीं वर्षें तीं झाडें लावणाराला स्वर्गवास प्राप्त होतो. तसेंच जो कोणी या क्षेत्रीं मंदिर बांधील व देवताप्रतिष्ठा करील, तसाच जो कोणी मंदिराचा जीर्णोद्धार करील, त्यास वैकुंठ लोक प्राप्त होतो, असें सांगीतलें आहे.

या प्रमाणें नृसिंहपुर क्षेत्राचें माहात्म्य शंकरापासून पार्वतीनें श्रवण केल्यावर तिनें प्रार्थना केली कीं, " आतां या पुढें आपण या क्षेत्रीं निरंतर वास करूं" हें ऐकून शंकरांनीं उत्तर दिलें कीं " नृसिंहाचे

मूर्ती मध्येंच माझें आधीष्ठान आहे. तथापि तुझे ह्मणण्याकरितां नृसिंहाचे अग्रभागीं भीमाशंकर या नामें करून, व उजवे बाजूस काशीविश्वेश्वर या नामेंकरून,व डावेबाजूस रामेश्वर या नामेंकरून मी वास करीन." त्याप्रमाणें नृसिंहाचे सन्निध शंकरांनीं येथें लिंगरूपें करून वास केला. नृसिंहमूर्तीचे ठायीं ब्रह्मा, विष्णु, शिव हे तिघेही आहेत असें क्षेत्रमाहात्म्यांत वर्णन आहे.

नरसिंहपुर व संगमस्थान हीं ही हरिहर रूप आहेत असें त्यांतच सांगीतलें आहे. याप्रमाणें नरसिंहपुर क्षेत्राचा पुराणोक्त महिमा थोडा लिहिला. आतां त्याच्या संबंधाची अर्वाचीन माहिती लिहितों.

नृ.पुर अर्वाचीनमाहिती. या क्षेत्रीं तीनशें वर्षांपूर्वी ब्राह्मणांची वस्ति केवळ दाहावीस घरांची होती व ती मंदिराचे पश्चात् भागापासून संगमापर्यंत होती. देवालय फार लहान दगडी होतें. एके समयीं उभय नद्यांचे संगमीं किल्ला बांधावा अशा उद्देशानें अलीआदिलशाहा नामें विजापूर येथील बादशाहा या क्षेत्रीं आला. त्या वेळीं रात्रीस त्याचें आंग सुजून बहुत वेदना होऊं लागली. तेव्हां सर्वांनीं सांगितलें कीं या स्थलीं हिंदूचें देवस्थान आहे. येथें आपण किल्ला बांधण्याचा निश्चय केला, त्या योगानें आपल्यास अशी पीडा झाली.त्यावरून त्या बादशाहानें तो बेत रहित केला. तेव्हां तत्काळ त्याची प्रकृति स्वस्थ झाली! अशी त्या बादशाहास प्रतीति आली, तिजवरून त्यानें हा गांव तेथील ब्राह्मणांस इनाम देऊन त्याबद्दलची सनद करून दिली. पुढें कांहीं काळानें शिवाजीमहाराज हे एके वेळीं ग्रहणपर्वी स्नान निमित्तानें त्या क्षेत्रीं आले. त्या काळीं त्यांनीं मागील बादशाही सन

---

टीप १ श्लोक॥ देहाकारोभवेत्ब्रह्मानामप्रमात्रोहरिःस्वयं ॥ पूजाभिमानीरुद्रोहंत्रयमात्मैवकेवलं ॥ अथापिरूपत्रयवानग्रेदेवस्यपार्श्वयोः ॥ त्वयातिष्टामिदेवेशिसर्वेषांसुखहेतव ॥ भावार्थ—देह ब्रह्मा, नाम विष्णु, पूजाधिकारी रुद्रतो मी आहे. तथापि या देवाच्या अग्रभागीं आणि दोहीं बाजूस तुझ्यासह लोककल्याणार्थ वास करितों,असें शंकरांनी पार्वतीस सांगितलें आहे.

द पाहून त्या सनदेचा उद्धार करून नवीन सनद भोगवटियास करून दिली. [ तें साल राज्याभिषेक शके ३५ सर्वधारी नामसंवत्सरे कार्तिक बहुळ तृतिया हें आहे. ] तेव्हांपासून गांवचा उपभोग ब्राह्मणांकडे निर्वेध चालत आहे. या गांवीं ब्राह्मणांखेरीज दुसरे कोणाचाही हक्क नाहीं. गांवचे अधिकारी ह्मटले ह्मणजे पुज्यारी ज्योतिषी आणि धर्माधिकारी अशीं तीन घराणीं मुख्य आहेत. पुज्यारी यांजकडे देवाकडील उत्पन्न, ज्योतिषी यांजकडे गांवांतील व यात्रस्थाकडील हव्यकव्याचें उत्पन्न, व धर्माधिकारी यांजकडे कांहीं धर्म संबंधीं अधिकार, अशीं तीन घराण्याच्या अधिकारांची व्यवस्था आहे.

औरंगजेबबादशाहाचा मुक्काम नरसिंहपूर क्षेत्रापासून पांच कोसांवर नीरातीरीं आकुलज नामें गांवीं फार दिवस होता. त्या समयीं नरसिंहपूरचे ब्राह्मणांनीं भीतीस्तव श्रीनरसिंह देवाच्या मूर्ति देवालयांत तरटीचें झाड आहे, त्या खालीं आच्छादन करून ठेविल्या! बादशाहा गेल्यानंतर सिंहासनावर त्यांची पुन्हा स्थापना केली. त्या पुढें शके १६५२—५५ चे सुमारास मुसलमानांचा मोठा दंगा झाला. त्या समयीं तेथील ब्राह्मणांनीं प्रल्हादकृत वालुकेची मूर्ति निजामाचे राज्यांत तालुके नळदुर्ग जिल्हा धारासीव येथील देशमुखाचे घरीं गुप्त नेऊन ठेविली. पुढें स्वस्थता झाल्यावर ती क्षेत्रीं आणून सिंहासनावर बसविली. ही माहिती तेथील जुने लोक सांगतात.

पुढें थोडे दिवसांनीं विंचूर संस्थानचे मूळ संपादक विठ्ठलराव शिवदेव ( रघुनाथराव यांजपासून वरील पांचवे पुरुष ) यांनीं नरहरीचें मंदिर बांधण्यास आरंभ केला. त्या विषयीं कथा आहे ती अशी:—

साताऱ्यापासून पांच कोसांवर कृष्णातीरीं मरढें ह्मणून एक गांव आहे, तेथें विदेहेश्वर अमृत स्वामी ह्मणोन मोठे सिद्ध पुरुष होते. हे विठ्ठलशिवदेव यांचे गुरु, हे तीर्थयात्रे निमित्त देशाटन करीत असतां

नृसिंहपुर एथें आलें. त्या काळीं येथील नरहरीचे मंदिराची अशी स्थिति होती कीं, दोन्ही नद्यांचे ओघानें जमीन झरून जाऊन देवाचें मंदिर अगदीं वाहून जाण्याचे बेतांत आलें आहे, अशी त्या मंदिराची स्थिति स्वामींनी पाहिली. पुढें ते मरढ्यास गेल्यावर जेव्हां विठ्ठलराव त्यांचे दर्शनास गेले, तेव्हां त्यांस तीर्थयात्रेतील देवता व क्षेत्रें याचे चमत्कार सांगतांना ते नरसिंहपूर येथील मंदिराची स्थिति सांगून बोलिले कीं, "विठ्ठलराव, नरहरी तुझा कुलस्वामी असून त्याच्या मंदिराची अशी अव्यवस्था झाली आहे हें ठीक नाहीं! जर आतां त्या मंदिराचा उद्धार तूं न केला, तर दोन्ही नद्या तें मंदिरस्थान अगदीं नाहींसे करतील! यास्तव त्या स्थळीं भीमा व नीरा या नद्यांपासून देवालयास कधींही धका न होईल असें तूं मंदिर बांध" असें स्वामींचें भाषण ऐकून विठ्ठलराव यांनीं हात जोडून विनंती केली कीं, "महाराज! त्या मंदिराचा जीर्णोद्धार करण्याविषयीं फार दिवसांपासून माझा मनोदय आहे. परंतु तें काम बहुत द्रव्यसाध्य असल्यामुळें माझा कांहीं उपाय चालत नाहीं. असें आहे तथापि स्वामी आज्ञा करितील तसें करीन!" हें ऐकून स्वामी बोलिले कीं, "आतां लौकर त्या कामास आरंभ कर. राम तुझ्या हातानें तें काम शेवटास नेईल." अशी स्वामींची आज्ञा होतांच विठ्ठलराव यांनीं क्षेत्रीं येऊन मंदिराचा पाया खोदण्यास आरंभ केला. हा आरंभ कोणते सालीं झाला याचा आतां पक्का शोध लागत नाहीं. असो, धर्मशाळेसुद्धां हल्लीं जितका देवालयाचा परीघ आहे, तितकी जागा दोन्ही नद्यांचे ओघाचे बहुत खालपर्यंत खणून ती चुना व दगड घालून भरून आणिली, चोहोंफेर मजबूत दगडी तट बांधिला. हल्लीं उभय नद्यांस कितीही पाणी आलें तरी महाद्वाराचे खालील पायरीला मात्र लागतें. इतकें तें काम उंच व मजबुत बांधिलें आहे! हें पायाचें काम सतत सात वर्षे चाललें होतें! इतक्याच कामास अडीच लक्ष रुपये खर्च झाला! त्या मजबूत पायावर यंत्राका

र उत्तम चिरेबंदी चहुत्रा बांधून त्यावर उत्कृष्ट दगडांनीं गाभारा बांधिला व त्या देवळावर चुन्याचें शिखर फार मजबुत केलें. हें एकंदर काम सतत वीस वर्षे पर्यंत चाललें होतें. गाभारा तयार झाल्यावर प्रल्हादकृत व ब्रह्मदेवकृत अशा दोन्ही मूर्ति सिंहासनारूढ करून त्यांनीं देवाची महापूजा केली. त्या समयीं त्यांनीं देवास बहुत जवाहीर व पोषाक दिले! त्या पैकीं कांहीं जवाहीराचा उपभोग देवास अद्याप पर्यंत होत आहे. सिंहासनावर मूर्ति स्थापिल्या, त्या समयींचा शिलालेख उत्तराभिमुख ब्रह्मदेवकृत मूर्तीचे सिंहासनावर आहे. तो असाः—

(श्री लक्ष्मीनृसिंह प्रसन्न.)

" श्रीक्षेत्र नीरा नरसिंहपुर घाट, गाभारा, देवालय, चरणारविंदी विठ्ठलशिवदेव दानी कसबे सासवड प्रांत पुणें शके १६७८. धातानाम संवत्सरे चैत्र शुद्ध १ "

त्या पुढें त्यांचे चिरंजीव शिवाजीविठ्ठल यांनीं देवापुढील दगडी सभामंडप व पश्चिमेकडील महाद्वार व नगारखाना या इमारती बांधिल्या. त्या पुढें विंचूरकर घराण्यांत जे जे पुरुष झाले, त्यांनीं त्यांनीं या देवालयाचीं थोडीथोडी कामें केलीं. इंग्रजी अंमल होण्याचे आरंभीं रघुनाथराव यांचे तीर्थरूप विठ्ठलरावतात्यासाहेब यांनीं पश्चिमद्वारीं प्रल्हादासमोर लांकडी उत्तम मंडप बांधिला. त्याच प्रमाणें त्यांनीं पूर्व दिशेकडील महाद्वारीं दुसरा लांकडी सभामंडप बांधिला. शिवाय इंग्रजी अंमल झाल्यावर त्यांनीं पश्चिममहाद्वाराचे दोन्ही बाजूंस बुरूज व नीरा नदीचे पाण्यापासून देवालयास उपद्रव न व्हावा या करितां नीरानदींत दगडी पक्का बुरूज व पश्चिमेकडील महाद्वारासन्निध आंतील लांकडी धर्मशाला, अशीं कामें केलीं !

नरसिंहक्षेत्रापासून थोडे अंतरावर निजामाचे राज्याची सरहद्द आहे. त्या राज्यांत हमेषा बखेडे चालू असत. रोहिले, अरब, सिंदी, पठाण, यांचे दंगे व बंडें होऊन त्यांचा पाठलाग मोंगलाकडून होऊं

लागला ह्मणचे त्या लुटारू लोकांनीं पेशव्यांचे राज्यांत शिरून लुटालूट करावी, अशी रीत असे. एके वेळेस मुसलमान लोकांचा आपसांत बखेडा माजून त्यापासून शेवटीं बंड उत्पन्न झालें! त्या बंडाचा फैलाव नरसिंहपूर क्षेत्रासन्निध येऊन पोहोंचला! त्या समयीं रघुनाथराव यांचे अजे नरसिंहखंडेराव हे पुण्यास होते. त्यांस त्या दंग्याची बातमी पोहोंचल्यावर ते श्रीमंतांची आज्ञा घेऊन फौजेसुद्धां मुसलमान लोकांचा बंदोबस्त करण्या करितां पुण्याहून निघाले! परंतु मुसलमान लोक हिंदूंचे देवाचा अत्यंत द्वेष करितात. व क्षेत्रांत सर्व ब्राम्हणांचीच वस्ति असून त्यांचे रक्षण करण्याचा असावा तसा बंदोबस्त नाहीं. या कारणास्तव मुसलमान लोक क्षेत्रास व देवास उपद्रव करतील अशी त्यांचे मनांत शंका येऊन क्षेत्रापासून तीन कोसांवर टेंभुरणी ह्मणोन गांव आहे, तेथील कुळकर्णी सदाशिवपंत भाऊ माणकेश्वर ह्मणून होते, त्यांचे घरीं दंग्याचा शेवट होईपर्यंत देवास गुप्तपणें आणून ठेवावें; असें क्षेत्रांतील ब्राह्मणास त्यांनीं पत्र लिहिलें. त्यावरून त्या ब्राह्मणांनीं सिंहासनावरील दोन्ही मूर्ति काढून टेंभुरणी येथें माणकेश्वराचे वाड्यांत नेऊन ठेविल्या. [ ही गोष्ट शके १७१८ माघ शुद्ध १० रोजीं घडली. ] प्रल्हादाची मूर्ति सिंहासनावरून काढतांना तिचे पायाचे अंगठ्यास इजा झाली. इकडे पुण्याहून दंग्याचे बंदोबस्तास फौज रवाना झाल्याचें वर्तमान दंगा करणारे मुसलमान लोकांस समजतांच ते पेशव्यांचे मुलखाची हद्द सोडून जिकडील तिकडे गेले! ही खबर नरसिंगराव यांस मार्गांतच समजली. तेव्हां त्यांनीं परभारे टेंभुरणीस येऊन दोन्ही मूर्ति पालखींत घातल्या. आणि स्वतां पालखीस खांदा देऊन क्षेत्रीं आणिल्या! ही गोष्ट शके १७१८ या वर्षी वैशाख शुद्ध २ स झाली. तेच दिवशीं त्यांनीं सुमुहूर्तावर मूर्ति सिंहासनारूढ केल्या. प्रल्हादाची नवीन मूर्ति करून स्थापन केली. व मोठ्या समारंभानें देवाची महापूजा करून त्यास वस्त्रें भूषणें समर्पण केलीं, आणि त्या सालीं

नृसिंहजयंतीचा उत्सव त्याच क्षेत्रीं करून उत्सवांत व उत्सवानंतर ही बहुत ब्राम्हणभोजन केलें. देव टेंभुरणीस सदाशिवपंतभाऊ माणकेश्वर यांचे घरीं राहिल्यापासून त्यांच्या ऊर्जित कालास आरंभ झाला. पुढें थोड्याच दिवसांनीं ते शेवटील बाजीरावसाहेब पेशवे यांचे मुख्य कारभारी झाले. टेंभुरणीहून देव आणतांना देवाच्या पितळी पादुका त्यांनीं आपल्या घरीं ठेऊन घेतल्या. त्या अद्याप पर्यंत तेथें असून त्यांचे घरीं नृसिंहजयंतीचा उत्सवही होत असतो.

नरसिंहपुर क्षेत्रीं प्रतिवर्षी पांच वेळां निरनिराळे ठिकाणीं व निरनिराळे दिवशीं तेथील ब्राह्मण देवाच्या पादुका पालखींत ठेऊन स्वारीची मिरवणूक काढितात. त्यांत दसऱ्याचे दिवशीं क्षेत्राचे पश्चिम सीमेवर, दिवाळींत अश्विन वद्य चतुर्दशी व कार्तिक शुद्ध एकादशी या दिवशीं संगमावर, व मकर संक्रांतीचे पूर्व दिवशीं ( भोगीस ) लक्ष्मीतिर्थावर, वैशाख शुद्ध पूर्णिमा म्हणजे [ जयंती ] या दिवशीं संगमावर, अशा प्रकारें निरनिराळ्या ठिकाणीं जाऊन सर्व गावांत ती पालखी मिरवितात. शिवाय कोणी यात्रेकरूही तशी स्वारी काढितात. तेव्हां ती देवळांत मिरवितात. ते समयीं देवळाच्या आसमंतांत प्रदक्षिणा होते. स्वारीची मिरवणूक निघाली ह्मणजे त्या वेळेस पालखीचे मागें ब्राह्मणांनीं वेदघोष करीत चालण्याचा पाठ आहे. या क्षेत्रीं चांगले वेद ह्मणणारे असे विद्वान् ब्राह्मण आहेत. तसेंच पुढें ही वेदाध्ययन कायम राहावें म्हणून रघुनाथराव यांनीं कांहीं वर्षांमागें तेथें एक वेदशाळा स्थापन केली. त्या शाळेंत ब्राम्हणांची नवीन मुलें चांगलीं विद्वान् होऊन तयार झालीं आहेत. शिवाय शास्त्रशाला ही त्यांनीं स्थापन केली. त्या शाळेंत काव्यें, नाटक, अलंकार, यांचा व कांहीं शास्त्राचाही अभ्यास चालत आहे. या शास्त्र शालेवर क्षेत्रांतील ज्योतिष्यांचे घराण्यापैकीं काशीस विद्याभ्यास करून आलेले रंगशास्त्रीमायभट्ट म्हणून आहेत, त्याची योजना केली आहे त्यांजकडून सदरहू शाळेचा क्रम उत्तम रीतीनें

चालत आहे.

या क्षेत्रीं पूर्वेकडील महाद्वार मलठणकर पवारांनीं बांधिलें आहे देवाचे डावेबाजूस दुघईची दगडी धर्मशाला बीडकर यांनीं बांधिली असून शेष राहिलेलें काम अद्यापी चालूच आहे. उजवेबाजूची उत्तरेकडील धर्मशाला कोरांटक धर्माधिकारी यांनीं बांधिली आहे. देवाचे मागील पूर्व बाजूची धर्मशाला विंचूरकरांचे भाऊबंदांतील परशुरामभाऊ सायखेडकर यांनीं बांधिली आहे.

नीरानदीस लक्ष्मीतीर्थासन्निध राखीलकर यांनीं घाट बांधिला आहे. भीमातीरास गुडसालकर कवडे आडनांवाचे कोणी मराठी जातीचे होते, त्यांनीं घाट बांधिला आहे. व बाबाबावडेकर यांनीं नृसिंहाचे मंदिराचे उत्तर दरवाजासमोर घाट बांधिला आहे. सदाशिवपंत भाऊ माणकेश्वर यांनीं गांवापासून कांहीं अंतरावर भीमेस घाट बांधिला आहे. या शिवाय बहुत पैसा खर्च करून त्यांनीच एक मोठा वाडा बांधिला, परंतु तो कित्येक कारणांनीं लिलांव होऊन हल्लीं नाहिसा झाला आहे. पश्चिमेचे महाद्वारासन्निध प्रल्हादाचे मागें जी मोठी घंटा आहे ती माणकेश्वर यांनीं देवास अर्पण केली आहे.

येथील नृसिंहाचे संस्थानास विंचूर दौलतीचे मूळ संपादक विठ्ठलरावशिवदेव यांनीं दरसाल सहाहजार रुपयांची नेमणूक करून दिली आहे. तींत चौघडा, पांचवेळां नैवेद्य, त्रिकाल पूजेकडील ब्राह्मण, अनुष्ठानाचे ब्राह्मण, देवाकरितां तुलसीफुलांची बाग, इतका खर्च चालतो. या शिवाय अचारी, पाणके, रखवालीचे शिपाई वगैरे, यांचा खर्च व नृसिंहजयंतीचे उत्साहा संबंधीं खर्च, यांतच करावा लागतो. तो या नेमणुकींत भागत नसल्यामुळें विंचूर संस्थानांतून त्यास मदत करावी लागते. या प्रमाणें रघुनाथरावापर्यंत साहा पिढ्या सतत नरहरीची सेवा चालू आहे! विंचूरकर घराण्यांतील प्रत्येक पुरुषानें देवास जवाहिरी डागिने दिले. त्या शिवाय इतरांकडून आलेले दागिनेहीं पुष्कळ होते, परंतु देवाच्या पुजाऱ्यांपासून त्याची

व्यवस्था कालमानास अनुसरून राहिली नसल्यामुळें हल्लीं देवाचे उपभोगास जवाहिरी डागिने फार थोडे राहिले आहेत! पुढें त्याचा बंदोबस्त होण्याची तजवीज चालू आहे.

पश्चिमेचे महाद्वारासमोर विंचूरकरांचा वाडा आहे. त्या वाड्यापासून महाद्वारापर्यंत सडक बांधून दोन्ही बाजूंनीं झाडें लाविलीं आहेत. या वाड्यांत देवाचा नैवेद्य होतो. आणि देवाकडील उपभोगाचे सर्व पदार्थही येथेच आसतात. येथील संस्थानचे वहिवाटीस कारभारी नेमिला आहे. तो या वाड्यांत राहून संस्थानची सर्व व्यवस्था पाहतो. सोटेबारदार, चोपदार पाहेरेकरी वगैरे राजकीय संस्थाना प्रमाणें देवाची व्यवस्था आहे. या क्षेत्रीं विंचूरकरांचे घराण्यांतील कोणी यात्रेस आलें तर कुलधर्माप्रमाणें यात्रा करण्याचा संप्रदाय आहे. परंतु शके १७८७ या वर्षी रघुनाथराव या क्षेत्रीं गेले तेव्हां त्यांनीं संगमीं पूर्वांग उत्तरांगप्रायश्चित, क्षौर, श्राद्ध वगैरे तीर्थ संबंधाचा विधि करून महापूजा केली. पुढें ब्राह्मणभोजन घातलें. या नरसिंहपूर क्षेत्राचा व संगमाचा आकार वाचकांचे लक्षांत येण्याकरितां नकाशा पुढें दाखल केला आहे. त्यावरून सर्व क्षेत्राचें स्वरूप लक्षांत येण्यासारखें आहे. येथील क्षेत्रसंबधीं सर्व कृत्यें आटोपल्यावर रघुनाथराव यांनीं नरसिंहमंदिराची स्थिति पाहिली. तेव्हां देवळावरील शिखराचे चुनेगच्ची काम जीर्णदशेस आलें असें जाणून त्यांनीं त्याचा पुन्हां जीर्णोद्धार करण्याचा विचार केला. त्याप्रमाणें सुमुहूर्तावर त्या कामास आरंभ करून देऊन ते बारसीकडे चालते झाले.

बारशी या गांवास द्वादशीक्षेत्र व अंबरीषक्षेत्र अशी संज्ञा आहे. पूर्वी येथें महाविष्णूभक्त असा अंबरीष नामें राजा होता. त्याचा एकादशी व्रत कडकडीत करून द्वादशीस पारणा करण्याचा नियम असे. एके समयीं दुर्वासऋषी द्वादशीस पारण्याचे समयीं प्राप्त झाले असतां, राजानें ऋषीस भोजनाविषयीं प्रार्थना केली. तेव्हां ते बारशी

ऋषी स्नान करून येतों म्हणून गेले तों त्यांस येण्यास विलंब ला गला. तेव्हां द्वादशीचा अतिक्रम न व्हावा ह्मणोन राजा जलपारणा करीत आहे, इतक्यांत दुर्वासऋषि तेथें प्राप्त झाले. तेव्हां राजानें जलपारणा केली असें जाणून त्यांस अत्यंत क्रोध आला. तेव्हां त्यां नीं तत्काळ एक कृत्या उत्पन्न करून तिला राजाचा नाश करण्या विषयीं आज्ञा केली. त्या कालीं विष्णूच्या आज्ञें करून सुदर्शन च क्रानें त्या कृत्येचा नाश केला, आणि दुर्वासाचा नाश करण्यास तें प्रवृत्त झालें! तेव्हां दुर्वास हे भयचकित होऊन पलायन करूं लाग ले! तॅव तें सुदर्शनचक्रही त्यांचे मागें लागलें. याप्रमाणें ते ऋषि पु- ढें आणि चक्र मागें असे ते सर्व पृथ्वीवर फिरले. तथापि चक्रानें त्यांस सोडिलें नाहीं! तेव्हां ऋषी स्वर्गलोकीं गेले. तेथेंही चक्र सो डीना! तेथून सत्यलोकीं ब्रह्मदेवाकडे गेले. तेथें ब्रम्हदेवांनीं विष्णूच- क्र पाहतांच त्यास नमस्कार करून दुर्वासास सांगीतलें कीं फार त्वरेनें वैकुंठास जाऊन विष्णूस शरण निघावें! त्यावरून दुर्वासांनीं वैकुंटलोकीं जाऊन तेथें विष्णूस साष्टांगनमस्कार घातला! तेव्हां वि ष्णूनींत्यांस सांगितलें कीं आतां हें माझें चक्र माझीही आज्ञा मान्य क रणार नाहीं. कारण तुम्हीं विनापराधी अंबरीष राजाचा छल केला. यास्तव त्या राजाशिवाय दुसऱ्याच्यानें चक्राचें निवारण व्हावया चें नाहीं! हें ऐकून दुर्वासऋषी द्वादशीक्षेत्रीं येऊन अंबरीषराजास शरण गेले. त्याकालीं राजानें सुदर्शन चक्राची प्रार्थना करून त्याचे भयापासून दुर्वासास मुक्त केलें! इतक्या कृत्यास एक संवत्सर लो- टला! एवढा काळपर्यंत ऋषि भोजन न करतां आपले घरीहून गेले ह्मणोन ते परत येत तों पर्यंत म्हणजे एक वर्षभर राजा उपोषित हो ता! त्यासमयीं भगवान्विष्णू तेथें प्राप्त होऊन त्यांनीं वर मागण्या विषयीं राजास आज्ञा केली. तेव्हां राजानें प्रार्थना केली कीं माझ्या राजधानींत चंद्र सूर्य आहेत, तों पावेतों आपण वास करून भक्तज नाचे मनोरथ पूर्ण करावे. हें राजाचें मागणें विष्णूनीं मान्य करून

त्याप्रमाणें त्या स्थलीं वास केला. मागाहून लक्ष्मी तेथें येऊन राहि ली. तिची मूर्ति देवाच्या मागें आहे. दुर्वासही त्या क्षेत्रीं लिंगरूपें करून राहिले. त्यास दुर्वासेश्वर ह्मणतात. कोणी त्यास उत्तरेश्वर असेंही ह्मणतात. त्याच्या जवळ दुर्वास नामें तीर्थ आहे. या शिवा य त्या क्षेत्रीं आणखी बहुत तीर्थें आहेत. तेथील देवास भगवंत असें ह्मणतात. या क्षेत्रीं एकादशीव्रताचें मोठें फल सांगितलें आहे. बारसी हा गांव फार मोठा असून तेथें पेंठ आहे. पेंठेंत व्यापार बहु तेक किराणा जिनसांचा चालतो. चहूंकडून किराणा येथें येतो, तो व्यापारी लोक खरेदी करतात. त्या प्रांतीं असें व्यापाराचें स्थल दु सरें नाहीं. तेथून रघुनाथराव हे तुळजापुरी गेले. भगवंतदेव.

तुळजापूर हें मोठें शक्तिक्षेत्र म्हणोन सर्वत्र प्रसिद्ध आहे. येथें देवीची मूर्ति फार अपूर्व आहे तिची पूजा शूद्र करितात. त्यांस भो पे म्हणतात. ते ब्राम्हणांस देवीचा स्पर्श करूं देत नाहींत! ही मोठी ध्यानांत ठेवण्याजोगी गोष्ट आहे! येथें मुख्य तीर्थ कल्लोल नांवाचें आहे. या स्थानीं पूर्वी देवीचे दर्शनार्थ पृथ्वींतील सर्व तीर्थें एकत्र झालीं. तेव्हां मोठा कल्लोळ शब्द झाला ह्मणोन ब्रह्मदेवानें या तीर्थाचें नांव कल्लोल तीर्थ असें ठेविलें! दुसरें धारातीर्थनामें तीर्थ आ हे, तेथें धार पडते. या क्षेत्रांतील सर्व तीर्थें उत्तम बांधलेलीं आहेत. त्या स्थानीं यात्रा येते तीस कर द्यावा लागतो. त्यास "खुंटाफ ळी" ह्मणतात. येथें निजामाचा अम्मल असून पेशकार म्हणोन अ धिकारी असतो. देवीचें जवाहीर व पोषाकी कापड सरकारी अंम लदाराचे ताब्यांत असते. पंचवीसरुपयांहून अधिक किंमतीचा जो पदार्थ देवीस अर्पण होईल, तो सरकारांत जमा होऊन त्याचा उप भोग देवीस होतो. प्रति पौर्णिमेस देवीचें वाहन निघून उत्सव हो तो. या ठिकाणचे गोंधळी फार उत्कृष्ट आहेत. पूर्वी भारतीबाबा म्ह णोन गोसांवी झाले होते. ते मोठे तपस्वी असल्यामुळें त्यांवर भग- वतीचा प्रसाद होता असें म्हणतात त्यांचा मठ तेथें आहे. त्यांत त्यां तुळजापूर.

चे शिष्य असतात हा गांव मोठा आहे. येथें सर्व पदार्थ मिळतात. चहूंफेर पर्वत असून मध्यें गांव असल्यामुळें विलक्षण शोभा दिसते. येथील उपाध्ये दक्षिणीब्राह्मण आहेत.ही देवी विंचूरकरांची कुलस्वामिनी असल्यामुळें कुलधर्म रीतीनें येथील यात्रा विधि करून रघुनाथराव हे येथून पंढरपुरास गेले.

पंढरपुर. पंढरपुर या क्षेत्राची प्रसिद्धी सर्व देशांत आहे येथील देवाचे उपासक सर्व भरतखंडांत पसरले आहेत येथील मुख्य देवता पांडुरंग ज्यास विठ्ठल व विठोबा असेंही म्हणतात तो असून इतर देवांचीं स्थानेंही बहुत आहेत. मल्लिकार्जून नामाचें एक शिवस्थान या क्षेत्रीं प्रसिद्ध आहे. पांडुरंगास ब्राह्मणांपासून तों शूद्रापर्यंत सर्व लोक स्पर्श करितात! येथें जातिभेदाचे व सोंवळ्या ओंवळ्याचें मान बहुत कमी आहे. मुख्य तीर्थ भीमरथी आहे. ती या क्षेत्र मर्यादेंत चंद्रभागा या नामें करून प्रसिद्ध आहे. या नदीचे तीरीं वेणुनाद ह्मणोन स्थान बहुत रमणीय आहे. तेथें विष्णुपद उमटलेलं आहे. त्या स्थळीं भक्तिमान् लोक गयाश्राद्ध करितात. परंतु तेथील माहात्म्यांत या विषयीं प्रमाण आढळलें नाहीं. विठ्ठलाचें मंदिर पूर्वी चांगदेव ह्मणोन मोठे योगी झाले होते त्यांनीं बांधिले अशी दंत कथा आहे. त्या मंदिराचा जीर्णोद्धार बाळाजीपंतदादानातू म्हणोन इंग्रजी अमलांत मोठे प्रख्यांत गृहस्थ पुण्यात झाले, त्यांनीं केला. त्या मंदिरांत पुष्कळ देवता आहेत. त्यांत रुक्मिणी, सत्यभामा, लक्ष्मी, अशीं शक्तिस्थानें आहेत. गोपाळपुर म्हणोन एक स्थान आहे. तेथें चांगलीं मंदिरें व देवतास्थानें आहेत. मुख्य विठ्ठलाची मूर्ति उभी असून कटीवर कर ठेविलेले आहेत. ही मूर्ति फार भव्य आणि मनोहर असल्यामुळें दर्शन झाल्यावर मनास मोठा आनंद होतो! देवाचे मस्तकीं शिवालिंग आहे. या विषयीं शिवरहस्य ग्रंथांत प्रमाण आढळलें आहे. दुसरे एके ठिकाणीं अशी कथा वाचण्यांत आली आहे कीं, विष्णू हे लक्ष्मीवर कांहीं कारणानें रागें भरून चंद्रभागातीरीं आले येथें वस्त्रा

दि सर्व वस्तूंचा त्याग करून त्यांनीं दिगंबर होत्साता नग्न केलें! असो, ही मूर्ति नग्न असल्यामुळें ती बौद्धाची असेल असें कोणी म्हणतात! तसेंही मानिलें तरी विष्णूचे दशावतारांत बौध्ध अवतार आहेच. तेव्हां या स्थलीं दर्शनादिकाचा निषेध नसून हें स्थान पूज्य आहे, असें ह्मणण्यास बाध नाहीं. कारण, जगद्गुरु शंकराचार्य हे या स्थलीं आले होते, तेव्हां त्यांनीं पांडुरंगाचा स्तव केलेला सर्वत्र प्रसिद्ध आहे. या क्षेत्राचें माहात्म्य पद्मपुराणांत वर्णिलें आहे. दुसरे मोठे मोठे साधु झाले, ते या मूर्तीची उपासना करून उत्तम गतीस गेले. तसेच लक्षानुलक्ष लोक या स्थानास मान देतात. चंद्रभागातीरीं शिवालिंग असून त्यास पुंडलीक म्हणतात. पुंडलीक नामें एक ब्राम्हण आपल्या मातापितरांची सेवा अतिशय निष्ठेनें करीत असे तशी पूर्वीं कोणीच केली नाहीं! अशी त्याची कीर्ति ऐकून प्रत्यक्ष त्यास पाहाण्याकरितां भगवान् विष्णू त्या स्थलीं आले. तेव्हां उभयतांचे भाषण झालें त्यांत आपण चिरकाल येथेंच वास करून भक्तजनाचा उद्धार करावा अशी पुंडलीकानें विष्णूची प्रार्थना केली. त्यावरून या क्षेत्रीं विष्णू हे विठ्ठल नामानें राहते झाले, अशी कथा आहे. पुंडलीकाचे मंदिराचा जीर्णोद्धार पुणेकर नंदरामनाईक गवंडी यांनीं केला. या क्षेत्रांत केवळ भगवन्नामसंकीर्तन करून भजन करणारे असे साधु पूर्वीं बहुत झाले व सांप्रतही आहेत. येथें वैदिक, शास्त्री, पुराणिक, असे पुष्कळ ब्राम्हण आहेत. मोठे विद्वान् व भगवद्भक्त असे अनंतोपाध्याय व त्यांचें चिरंजीव ज्यांनीं अत्यंत सुलभ व अत्यंत उपयोगी असे धर्मसिंधु वगैरे ग्रंथ केले ते काशीनाथोपाध्याय, तसेच मोठे विद्वान् असे विठ्ठलोपाध्याय व त्यांचे बंधु प्रसिद्ध विद्वान् बाबापाध्ये हे ही याच क्षेत्रीं झाले. आषाढी व कार्तिकी एकादशीस एथें एक लक्षावर यात्रा जमते! एथील देवाचे मूर्तीस शके १७९५ आषाढ शुद्ध ११ चे यात्रेंत कोणी दुष्टानें दगड मारून पाय मोडिले! तेव्हां मोठा अनर्थ झाला. पुढें ही अनादि मूर्ति असल्यामुळें पाय

जडून पूर्ववत क्रम चालण्यास बाध नाहीं असे ठरल्यावरून तसें केलें आहे. देवाचे पुजारी कण्व शाखेचे ब्राम्हण आहेत, त्यांस बडवे म्हणतात. त्यांस यात्रेसंबंधीं बहुत उत्पन्न आहे. व देवाचे सर्व अलंकार त्याचेच ताब्यांत असतात. रुक्मीणीचे पूजक ब्राह्मण आहेत, त्यास उत्पात म्हणतात. देवाचे परिचारकही ब्राह्मणच आहेत. यात्रेकरांनीं महापूजा केली असतां त्यांवर त्यांचा कर आहे. या लोकांचा परस्पर कज्जा दिवाणींत व फौजदारींत हमेष चालूच असतो. पंढरपुर हा गांव मोठा आहे. त्याची सांप्रतची स्थिति शहरासारखी झाली आहे. गांवांत मोठाल्या इमारती व बहुतेक मोठे लोकांचे वाडे आहेत. एथें होळकरांचा वाडा व त्या जवळ त्यांचेंच राममंदिर आहे. आलीकडे बायजाबाईशिंदे यांनीं एथें वाडा बांधून एक कृष्णमंदिर ही बांधिलें आहे. शेवटचे बाजीरावसाहेबपेशवे हे प्रतिवर्षी आषाढी एकादशीस येथें येत असत. त्यांनीं देवास पुष्कळ जवाहीर दिलें. पेशवाईचे अखेरीस गंगाधरशास्त्री पटवर्धन यांस त्रिंबकजीडेंगळे यानें ठार मारिलें असें ह्मणतात, ती गोष्ट येथेंच घडली! कांहीं वर्षांपूर्वी त्या शहरीं म्युनिसिपालिटी स्थापित झाली. तेव्हां पासून शहरांत स्वच्छता चांगली असते. चंद्रभागेचे पलीकडे वल्लभमत प्रवर्तक वल्लभाचार्य यांनीं तप केलें तें स्थान आहे. भाटेलोक येथेंच राहून यात्रा करितात. या क्षेत्रीं मुख्य यात्रा विधि चंद्रभागातीर्थी स्नान, पुंडलीकाचें दर्शन, विठ्ठलदर्शन, व नामस्मरण हाच आहे. येथें टाळ, वीणे, व मृदंग यांचे नाद व त्यावर संत मंडळीच्या प्रेमपुरःसर नामकीर्तनाचा घोष निरंतर चालू असल्यानें हें स्थान केवळ भूवैकुंठच भासतें! रघुनाथराव हे पंढरपूर येथें असतां शिंद्यांनीं भिवरथडी घोडे खरेदी करण्याकरिता बाबाआपटे यांस पाठविल्यावरून तेही या क्षेत्रीं आले होते. तेव्हां पूर्वीचा काशीक्षेत्रांतील परिचय असल्यामुळें ते मुद्दाम रघुनाथराव यांचे भेटीस आले होते. रघुनाथराव यांचे एकंदर सात मुक्काम पंढरपुर येथें झाले. इतक्याकाळांत रुक्मिणीसह पंढरी-

नाथाची महापूजा, विद्वान् ब्राह्मणांचीसभा, शिवाय ब्राह्मणभोजन अशीं कृत्यें करून ते येथून कन्हाड येथें गेले.

कन्हाड यास करहाटकक्षेत्र असें नांव आहे. या क्षेत्रीं कन्हाडे ब्राम्हणांची उत्पत्ति झाल्याची सह्याद्रिखंडांत कथा आहे. येथें ककुद्मती म्हणजे कोयनानदी हिचा व कृष्णेचा संगम झाला आहे. या क्षेत्रीं जसा संगम आहे तसा अन्यत्र कोठेंही असल्याचें ऐकिवांत नाहीं. या संगमास प्रीतिसंगम असें ह्मणतात. कारण येथें उभय नद्या सारख्या समोर येऊन त्यांचा संमग झाला आहे! इतर स्थळीं जे संगम पाहाण्यांत येतात, ते कातरीच्या आकाराप्रमाणें झाले असतात. हें क्षेत्र फार प्राचीन आहे. कृष्णामाहात्म्यांत याचें वर्णन बहुत केलें आहे. येथील मुख्य देवतेचा उच्छेद करून मुसलमान लोकांनीं त्यावर मशीद बांधिली आहे! त्या मशीदीस मनोरे आहेत ते फारच उंच आहेत. येथून पांच कोसांवर कोळानृसिंह म्हणोन एक स्थान आहे, तेथें रघुनाथराव गेले. कन्हाड.

या स्थळीं कृष्णानदी असून तिला घाट चांगला बांधिला आहे. एथें मुख्य देव नरहरि आहे. त्यास सोळाभुजा म्हणजे हात आहेत. प्रत्येक हातांत आयुध असून मूर्तीस आंगचीच दगडी प्रभावळ आहे.त्या प्रभावळीवर दशावतारांच्या मूर्ति आहेत. सोळाभुजांची नरहरीची मूर्ति अन्यत्र कोठें पाहाण्यांत येत नाहीं. मूर्तीचे अवयव फार अप्रतिम आहेत. अशा सुंदर मूर्ति पृथ्वीवर थोड्याच असतील, असें ह्मणतात. असल्या उत्कृष्ट मूर्तीचे हात वगैरे कांहीं अवयव भग्न झालेले पाहून मनास फारच वाईट वाटतें! हें स्थान गुहेंत आहे. ही गुहा बहुत खोल आहे. येकांत एक गुहा करून आंत जाण्याचा मार्ग केला आहे. असें करण्याचें कारण बहुधा यवनाची भीति हेंच असेल असें वाटतें. या ठिकाणीं दिव्याचा प्रकाश व माहितगार बरोबर असल्याखेरीज जाण्याची सोय नाहीं! गुहेवर मंदिर व धर्मशाळा आहेत. देवालयाचें व धर्मशाळेचें काम नदीचे धक्क्यामुळें लोक कोळानृसिंह.

रच पडेल अशी लोकांस शंका वाटते! कृष्णामाहात्म्यांत ही मूर्ति पराशर ऋषींनीं ध्याना करितां निर्माण केली अशी कथा आहे. तेथें तीन दिवस मुक्काम करून रघुनाथराव हे पुढें चालते झाले. मार्गांत

रयाचोरगांव.

रयाचोरगांव लागतें तेथून सन्निध कृष्णेच्या मध्यभागीं बहुत अपूर्व असें एक शिवस्थान आहे. तेथें एक मोठा चमत्कार आहे. तो असा कीं, कृष्णेच्या प्रवाहाचा शब्द त्या स्थलीं बिलकुल होत नाहीं! या विषयीं अशी कथा आहे कीं, श्रीरामचंद्र लंकेहून परत येतांना ह्या स्थलीं माध्यान्हिक करण्यास स्थित झालें. तेव्हां समोरून कृष्णेचा प्रवाह मोठ्या वेगाने शब्द करीत आला. हें मारुतीनें पाहून तो तिच्या पुढें जाऊन उभा राहिला. तेव्हां कृष्णा दोन बाजूनें प्रवाह रूपानें जाऊं लागली. त्या समयीं मारुतीनें सांगितलें कीं, रामचंद्र शिवध्यान करीत आहेत, यास्तव तूं शब्द करूं नको. हें ऐकतांच कृष्णा निःशब्द झाली. पुढें ध्यान विसर्जन झाल्यावर रामांनीं पार्थिव लिंग करून त्याची पूजा केली. आणि तें लिंग त्या स्थलीं स्थापन करून ते बोलिलें कीं हें लिंग सेतुबंध रामेश्वराचें उपलिंग होय. यास्तव कृष्णेचें स्नान करून जो या लिंगाचे दर्शन करील त्यास सेतुस्नानाचें व रामेश्वर दर्शनाचें फल प्राप्त होईल असें वर्णन आहे. या स्थलीं मारुतीच्या पश्चात्‌भागीं रामचंद्राची मूर्ति आहे तेथून सन्निध एक शिवस्थान आहे, त्यास रामेश्वर ह्मणतात. येथील जागा बहुत

रामेश्वर.

रमणीय आहे. दोन्ही बाजूनें कृष्णेचा प्रवाह असल्यामुळें फार शोभा दिसते! या स्थलाचें माहात्म्य कृष्णामाहात्म्यांत वर्णिलें आहे. असो या ठिकाणाहून रघुनाथराव हे कोल्हापूर येथें गेले.

कोल्हापुर. [ करवीर ]

या क्षेत्रास दक्षिणकाशी असें ह्मणतात. काशीस जितकीं तीर्थें व देवतास्थानें आहेत तितकीं येथेंही आहेत. येथील मुख्य देवता महालक्ष्मी आहे. तिचें मंदिर यंत्राकार असून उत्तम बांधिलेले आहे. मध्यें त्रिकोणांत बिंदुस्थानीं भगवतीची ( महालक्ष्मीची ) मूर्ति आहे. या मंदिरास पश्चिमदिशा फार उत्कृष्ट साधली आहे. माघ

शुद्धात तीन दिवस सूर्यास्ताचे संधीस प्रथम सूर्यतेज देवीचे मुखाव र पडून पायांपर्यंत येतांच सूर्याचाअस्त होतो. तेव्हां बहुत लोक ज मून देवीस नीराजन करितात. या दिवसांतच त्या क्षेत्रीं रघुनाथरा व यांचें जाणें होऊन त्यांनीं हा चमत्कार प्रत्यक्ष पाहिला. देवीची प्रदक्षिणा गाभाऱ्यांतून आहे. व आंत खांब बहुत असल्यामुळें प्र- काशावांचून प्रदक्षिणा घालणें कठीण पडतें! प्रत्यहीं संध्याकालीं ब हुत दिवे लागून धुपारती होते, त्या समयीं फार चमत्कार दिसतो! आरती झाल्यावर शंखोदकाचें प्रोक्षण करितात. त्याचें तेथें मोठें मा हात्म्य आहे. या क्षेत्रीं बहुत तीर्थें व देवता आहेत त्यांचा कालानें बहुत करून लोप झाला होता! परंतु आलीकडे इंग्रेजसरकारानें ते थील राज्याचा कारभार दाजीपंडित नामें गृहस्थाकडे सोंपला होता, तेव्हां त्यांनीं तेथील माहात्म्याप्रमाणें सर्व देवता व तीर्थें यांचा शो ध लावून त्या स्थलाचा बहुतेक जीर्णोद्धार केला! महालक्ष्मीचीमूर्ति बहुत कालची असल्यामुळें फार जीर्ण झालेली आहे. तीस ब्राम्ह णांवाचून इतरांचा स्पर्श होत नाहीं. प्रति पौर्णिमेस मंदिरावर सर्वत्र दीप लागतात. देवीस तेथील राजाकडून उत्तम नेमणुक चालत आ हे. येथें तीर्थें बहुतच आहेत, परंतु मुख्यत्वें रंकाळें ह्मणून आहे. गां वापासून पंचगंगा नदी थोडी दूर आहे, ते ही तेथील मुख्य तीर्थच ह्मणावितें. गांवांतील बहुत लोक नदी स्नानास जातात. क्षेत्रापासून तीन कोसांचे अंतरावर त्रिवेणीस्थान आहे, तेथें मकरस्नानाचें फार माहा त्म्य असल्यामुळें त्या काळांत बहुत क्षेत्रस्थ लोक तेथें स्नानास जा तात. याचप्रमाणें कांहीं अंतरावर कात्यायनी देवीचें स्थान आहे, तें मोठें जागृत आहे,असें ह्मणतात. जगद्गुरु शंकराचार्य यांचा येथें मठ असून त्यास कांहीं गावें इनाम आहेत. त्या गांवांचीं कामें त्यांचा कारकून तेथें राहून करितो. रघुनाथराव हे तेथें गेले त्या समयीं ते- थील राजाचें वय अल्प असल्यामुळें इंग्रेजसरकारानें रामरावताड पत्रे नामें गृहस्थास त्याचे कारभारी नेमिलें होतें. कोल्हापूरचें राज्य

बारालक्षांचें आहे. सातारचे राजे मुख्य शाहूमहाराज यांचे बंधूचा वंश हल्लीं कोल्हापुरास राज्याधिकारावर आहे. पांच कोसांचे अंतरावर करवीरक्षेत्र सीमेंतच एक स्वतंत्र क्षेत्र आहे. तेथें रत्ननामक पर्वतावर एक शिवस्थान आहे. बाराज्योतिर्लिंगाची बारा उपलिंगें पुराणांत सांगितलीं आहेत, त्यांतील हें बदरीकेदारेश्वराचें उपलिंग होय, असें वर्णन आहे. या लिंगासही केदारेश्वर असें ह्मणतात. येथील रत्नगिरीवर जें स्थान आहे, त्या विषयीं कथा आहे ती अशीः—कोलासुर या नावें एक दैत्य होता, त्यानें त्रैलोक्यास फार पीडा दिली. तेव्हां ब्रह्मादिदेव त्रस्त होऊन त्यांनीं श्रीमहालक्ष्मीची प्रार्थना केली. त्यावरून ती देवी त्या दैत्याचा वध करण्याकरितां निघाली. तेव्हां तिनें आपले बरोबर जमदग्नि नामक ऋषीचा क्रोध घेतला. आणि त्याचे साह्यानें देवीनें कोलासुराचा वध करून त्यास ( क्रोधास ) करवीर क्षेत्राचें निरंतर रक्षण करण्याकरितां रत्नाचलावर स्थापन केलें. त्या भैरवस्थानास ज्योतिबा असें ह्मणतात. तेथें पर्वतावर आठ तीर्थें मुख्य असून आणखी बहुत देवता आहेत. जोतीबा हें शिंद्यांचें कुलदैवत असल्यामुळें त्यांजकडून त्यास [ जोतीबास ] सालीना सहाहजार रुपयांची नेमणूक आहे. त्याचे व्यवस्थेकरितां त्यांचा कारकून तेथें असतो. देवाचे दोन हत्ती व कांहीं घोडे आहेत, ते प्रतिदिवशीं धूपारतीच्या समयीं तयार करून देवासन्निध आणितात. हा पर्वत उतरतांना कोल्हापुराकडे पाहावें ह्मणजे त्या शहराची मोठी शोभा दिसते ! कोल्हापुर हें मोठें शहर असून पुरातन राजधानीचें स्थान असल्यामुळें येथील रस्त्यांत हत्ती व घोडेस्वार यांची हमेष रहदारी असते, त्या योगानें शहरास फार शोभा दिसते ! येथें या क्षेत्रसंबंधानें जें कर्तव्य तें करून रघुनाथराव हे कुरुंदवाडाजवळ नरसोबाचीवाडी ह्मणून स्थान आहे तेथें गेले. या ठिकाणीं पंचगंगा आणि कृष्णा यांचा संगम झाला आहे. या संगमस्थानाची बहुत प्रशंसा कृष्णामाहात्म्यांत केली आहे. या संगमीं स्नानाचें फल त्रिवेणी

रत्नपर्वत.

बदरीकेदारेश्वरउपलिंग.

नरसोबाची वाडी.

स्नानापेक्षां अधिक असून सर्व ऋषी, देवता, आणि भूमंडलांतील सर्व तीर्थें एथें वास करितात, असें कृष्णामाहात्म्यांत सांगीतलें आहे कलियुगांत जगाचे उद्धारार्थ श्रीदत्तात्रयांनीं मनुष्यलोकीं अवतार घेतला. तेव्हां ते प्रथम गुप्त असून पुढें प्रकट झाल्यावर या क्षेत्रीं बारावर्षें वास करून त्यांनीं अनेक प्रकारच्या लीला केल्या. त्याचें सविस्तर वर्णन गुरुचरित्रनामक प्राकृत ग्रंथांत केलें आहे. या पवित्र स्थलीं दत्तगुरूच्या पादुका स्थापन केल्या आहेत. त्याची पूजा वगैरे तेथें राहणारे सेवकरी करतात. त्या स्थलीं शेंदीडशें सेवकरी नेहेमी असतात. ते भिक्षा वृत्तीनें निर्वाह करून गुरुसेवा करितात. येथें भक्तिपूर्वक सेवा केली असतां कुष्ठ, अपस्मार इत्यादि रोग त्वरित दूर होतात. व संबंधाची पीडा अथवा भूतबाधा असेल तर तीही येथील सेवेनें नाहींसी होते, अशी प्रसिद्धि आहे. प्रत्यहीं सायंकाळीं धुपारतीचे समयीं संबंधादिकें करून पीडीत झालेले सर्व लोक तेथें जमतात. त्यांतून कितीएकांचे आंगांत संचार होतो, असें त्या स्थलीं दृष्टीस पडतें. गुरुचरित्रांत त्या स्थलाचें फार वर्णन केलें आहे. त्यांतील कांहीं ओव्या खालीं टीपेंत लिहिल्या आहेत.[1] संगमासन्निध जो गांव आहे, त्याचें नांव अमरपूर असून त्यास कुरवपूर असेंही ह्मणतात. कारण हें दक्षिण दिशेंत कुरुक्षेत्रच ह्मणावितें. येथें औदुंबरवृक्षाचे सन्निध अमरेश्वरनामें महादेवाचें स्थान आहे. आणि या देवाचे नांवावरून यास अमरपूर असें नांव पडलें आहे. पंचगंगानाम होण्याचें कारण पांच नद्या एकत्र होऊन कृष्णेशी संगत झाल्या आहेत. त्या पांच नद्यांचीं नांवें गुरुचरित्रांत लिहिलीं आहे

---

टीप १ पुढेंकृष्णाप्रवाहांत ॥ अमरापुरप्रख्यात ॥ पंचगंगीसंगमींस्नात॥ प्रयागाहुनिअधिकपुण्य ॥ १ ॥ अखिलतीर्थेंतयास्थानीं ॥ तपकारितीसकळमुनी सिद्धहोतीत्वरितज्ञानी ॥ अनुपमक्षेत्रपरियेसा ॥ २ ॥ ऐसेंप्रख्याततयास्थांनीं ॥ अनुष्टितांदिवसातिन्ही॥अखिलअभीष्टपावोनी ॥ पावतीत्वरितपरमार्था ॥ ३ ॥

तें. तीं अशीं:— १ शिवा, २ भद्रा, ३ भोगवती, ४ कुंभी, आणि ५ सरस्वती. पंचगंगा ही नदी कृष्णेशीं संगत झाली, तेथें चौसष्ट योगिनीसह कोटीतीर्थें निरंतर वास करितात, असें वर्णन आहे.

संगमाच्या पुढें कृष्णेस मोठा घाट व घाटावर राहण्यास स्थल असें हल्लींचे पटवर्धन जाहागिरदार यांचे पूर्वजांनीं उत्तम बांधिलें आहे. घाटावरील जागेंत रघुनाथराव यांनीं मुक्काम केला होता. तेथून दीडकोसावर कुरुंदवाड नावें गांव आहे. तेथें कुरुंदवाडकर जाहागिरदार असतात. तेवेळेस दादासाहेब, आबासाहेब, व आपासाहेब असे त्रिवर्ग बंधु होते. हे रघुनाथराव यांच्या भेटीस येऊन तेथें त्यांचा मुक्काम होता तोंपर्यंत त्यांनीं त्यांचा उत्तम प्रकारें बंदोबस्त ठेविला होता. व कुरुंदवाड येथें त्यांस भोजनासही नेलें होतें. तेथें त्यांच्या पूर्वजांनीं बांधिलेलें उत्तम राममंदिर आहे. तेथून रघुनाथराव हे येडुरास गेले.

कुरुंदवाड.

कृष्णेच्या उगमापासून तों थेट ती समुद्रास मिळेपर्यंत तिच्या उभयतीरीं देवता, तीर्थें, स्थानें बहुत असल्याचें कृष्णामाहात्म्यांत वर्णन आहे. त्यांत वेणी, ककुद्मती, घटप्रभा, मलापहा, व तुंगभद्रा, या पांच नद्यांचा ज्या स्थलीं कृष्णेशीं संगम झाला आहे, त्या स्थलाचें व संगमाचें बहुत वर्णन केलें आहे. याचप्रमाणें वैराजक्षेत्र, [ वाई ], वीरभद्रक्षेत्र, शूरपाल, छायाभगवती, व कृष्णासागरसंगम, अशीं पांच क्षेत्रें आहेत. एकूण पांच संगम व पांच क्षेत्रें यांचें माहात्म्य अतिशय वर्णिलें आहे. त्या पांच क्षेत्रांपैकींच येडूर हें गांव वीरभद्रक्षेत्र होय. येथें दक्षप्रजापतीनें यज्ञ केला. यज्ञकुंडापासून विरूपाक्षेश्वर नामें शिवलिंग फाल्गुन शुद्ध पौर्णिमेस उत्पन्न झालें. यास वीरभद्रेश्वर असेंही ह्मणतात. फाल्गुन शुद्ध पौर्णिमेस उत्तराफाल्गुनी नक्षत्राचा योग आला असतां त्या दिवशीं पलाशपुष्पांनीं (पळसाच्या फुलांनीं या शिवलिंगाचें पूजन

येडूर.

---

टीप ५ ॥ शिवाभद्राभोगवती ॥ कुंभीनदीसरस्वती ॥

॥ पंचगंगाअसेख्याती ॥ महापातकसंहारी ॥ १ ॥ [ गुरुचरित्र ]

केलें, तर मोठे पुण्य आहे. हेंच पूजन त्या दिवशीं कृष्णास्नान करून केलें तर पंचमहापातकेंही तत्काळ दूर होतात, असें पुराणांत सांगितलें आहे.) या पूर्णिमेस देवदर्शनार्थ त्या प्रांतांतील पुष्कळ यात्रा येथें जमते. देवापासून जवळच कृष्णानदी आहे. या ठिकाणीं कृष्णेचें पात्र मोठें आहे. व तिचे तीरीं चिंचेची दाट झाडी आहे. देवालया सन्निध जंगमाचा एक मठ आहे. त्यांत देवाची भोगमूर्ति असते. ती पालखींत घालून देवालयासभोंवतीं प्रातःकाळीं, मध्यान्हीं, व सायंकाळीं, असे त्रिवार मोठ्या समारंभानें मिरवितात हा मिरविण्याचा अधिकार मठांतील जंगमांकडे आहे. येथील देवास पूजानैवेद्याच्या वगैरे खर्चास माधवरावबल्लाळपेशवे यांनीं सहाहजाररुपयांचीं गांवें इनामी करून दिलीं आहेत. त्यांची वहिवाट तेथील जहागीरदाराकडेस आहे. देवालयासन्निध एक वाडा आहे, त्यांत जाहागीरदार असतात. या जाहागीरदारांचे पुत्रास रघुनाथराव यांचे कनिष्ठ बंधु कृष्णराव यांची कन्या दिली आहे. येडूर गांव देवापासून बरेच अंतरावर असल्यामुळें रघुनाथराव हे देवालयांतील सभामंडपांतच उतरले होते. तेथें पांच दिवस मुक्काम करून ते तेथून औदुंबरक्षेत्रीं जाण्याकरितां भिलवडीं गांवीं गेले.

भिलवडी हा गांव कृष्णातीरीं मध्यम वस्तीचा आहे. येथें गांवासन्निध कृष्णेस दगडी घाट बांधिला आहे. तेथें कृष्णा उतरून पलीकडे अर्ध्या किंवा पाउण कोसावर अरण्यांत श्रीगुरूचें स्थान आहे. तेथें मंदिर दगडी असून अगदीं लहान आहे. व मंदिराचें दार तर फारच लहान आहे. मंदिरांत श्रीगुरूच्या पादुका आहेत. पुढें मोठें पटांगण आहे. त्यांत व मंदिराचे आसमंतांत सर्वत्र उदुंबराचे (उंबराचे) वृक्ष आहेत. पुढें अगदीं समीपच दरडीचे खालीं कृष्णा नदी आहे. या स्थलास औदुंबरक्षेत्र असें ह्मणतात. येथें यात्रेकरी उतरण्यास दोन धर्मशाला आहेत. त्यांतील एके धर्मशाळेंत रघुनाथराव हे उतरले होते.

भिलवडी

औदुं

या स्थळीं हमेषा पन्नास साठ सेवेकरी शिवाय साधारण रोगी, व महारोगी, व संबंधबांधेनें पीडित असे पुष्कळ लोक असतात. ते देवासमोर उंबराखालीं गुरूचरित्राचे पाठ करितात. कोणी प्रदक्षिणा घालितात. कोणी जप करीत बसतात. असा सूर्योदयापासून मध्या न्हापर्यंत क्रम चाललेला असतो. अस्तमानीं देवास धुपारती होते. त्यासमयीं सर्व सेवेकरी तेथें जमून देवावर चवऱ्या, मोर्च्येल, वगैरे वारितात. अरतीसमयीं कोणी प्राकृत कविता केली आहे, ती ह्मणून देवास नीराजन होत असतें. हें नीराजन दोन घटका चालून शेवटीं मंत्रपुष्पांजली होते. या स्थानासमोर कृष्णेच्यापलीकडे भुवनेश्वरी दे

भुवनेश्वरी. वीचें स्थान आहे. तें स्थान कृष्णामाहात्म्यांत वर्णिलें आहे.

औदुंबर वृक्षाचा महिमा विशेष असण्याचें कारण असें आहे कीं ज्या कालीं नृसिंहानें हिरण्यकशिपु नामक दैत्याचें उदर नखां नीं विदारण केलें. त्याकालीं त्या दैत्याचे उदरसंबंधीं विष नृसिंहा चे नखांस लागून त्यांचा अत्यंत दाह झाला. तेव्हां श्रीमहालक्ष्मीनें औदुंबर वृक्षाचीं फळें आणून नृसिंहापुढें ठेविलीं, आणि विनंती केली कीं, या फलांनीं नखांचा दाह दूर होईल. नंतर नृसिंहानीं त्या फालांमध्यें नखें रोंविलीं. तेणेंकरून नखांचा दाह शांत झाला. त्या योगानें नृसिंहास संतोष होऊन त्यांनीं औदुंबरवृक्षास वर दिला कीं, औदुंबर हा भूलोकीं कल्पवृक्षाप्रमाणें होईल. व या वृक्षाच्या छायेखालीं कोणत्याही कामनेनें अनुष्ठान केलें असतां त्यास शीघ्र फलप्राप्ति होईल. व या वृक्षाचे छायेखालीं जो स्नान करील त्यास गंगास्नानाचें फल प्राप्त होईल. याप्रमाणें औदुंबर वृक्षास वर दिले, या कारणामुळें श्रीगुरूनीं औदुंबरवृक्षाचे वनांत वास केला, अशी कथा गुरुचरित्रांत आहे.

कोणेएके कालीं करवीरक्षेत्रांतील कोणीएक विद्वान् ब्राह्मणाचा पुत्र अतिमंदमति होता. तो प्रौढ झाला. तरी त्याला वेद किंवा शास्त्र यांचें एक अक्षर देखिल न येतां दुसरी कोणतीही विद्या प्राप्त झाली

नाहीं! या कारणानें त्याच्या मातापितरांनीं त्याची फार निर्भर्त्सना केली. व गांवांतील सर्व लोक त्याचा धिक्कार करूं लागले! त्या काळीं त्या ब्राह्मणपुत्रास अत्यंत पश्चात्ताप होऊन त्यानें निश्चय केला कीं, आतां विद्या प्राप्त झाली तर बरें, नाहींतर देहत्याग करावा! असा निर्धार करून तो कृष्णातीरीं भिलवडी गांवासन्निध भुवनेश्वरी देवीच्या मंदिरांत येऊन तेथें देवीसन्निध तीन रात्र उपोषित बसला. शेवटीं निराश होऊन त्यानें आपली जिव्हा छेदून भगवतीचे चरणास अर्पण केली! आणि त्या रात्रीं निजण्याचे वेळीं देवीस अशी प्रार्थना केली कीं, मला प्रसन्न होऊन विद्या प्राप्त झाली तर बरें, नाहींतर मीं आपलें मस्तक छेदून तुला अर्पण करीन! असा निश्चय करून त्यानें रात्रीं निद्रा केली. तेव्हां भुवनेश्वरीनें त्याच्या स्वप्नांत येऊन सांगितलें कीं, कृष्णेच्या पश्चिमतीरीं औदुंबराखालीं श्रीगुरुस्वामी आहेत. त्यांच्या दर्शनानें तुझें इच्छितकार्य होईल. याप्रमाणें त्या ब्राह्मणपुत्रास रात्रीं स्वप्न होतांच प्रातःकालीं उठून कृष्णाप्रवाहांतून औदुंबरक्षेत्रीं औदुंबराचे वृक्षाखालीं स्वामी बसले होते. त्यांचे चरणावर मस्तक ठेऊन त्यांची स्तुति करावी असें त्याचे मनांत आलें! परंतु जिव्हा नसल्यामुळें भाषण करितां येईना! तेव्हां गुरुस्वामींनीं त्याचे मस्तकावर हात ठेविला! तेणेंकरून तत्काळ त्याला जिव्हा उत्पन्न होऊन त्यानें उत्तम संस्कृत श्लोकबद्ध अशी गुरूची स्तुति केली! अशी कथा गुरुचरित्रांत वर्णिली आहे.

या क्षेत्रीं थोडे वर्षांपूर्वी ब्रह्मानंदबावा म्हणोन एक मोठे योगी झाले. ते गौड जातीचे ब्राह्मण असून ब्रह्मचारी होते. कलियुगांत हठयोग बहुत करून सिद्ध होत नाहीं. परंतु यांस ईश्वर कृपेनें योगसिद्धि होऊन ते आठपंधरा दिवस पर्यंत समाधि करीत असत, असें ह्मणतात. त्यांचा त्या ठिकाणीं मठ आहे. त्या मठांत त्यांचे शिष्य असतात. हे ब्रह्मानंदबावा नासिक वगैरे प्रांतीं आले होते. तेव्हां कांहीं दिवस नासिकाजवळ गंगापुरास त्यांचा मुक्काम होता. त्या सम

र्यी रघुनाथराव यांनीं गंगापुरास जाऊन त्यांचें दर्शन घेतलें. पुढें ते कांहीं दिवसांनीं सन्यास घेऊन औदुंबरक्षेत्रीं समाधिस्थ झाले. त्यांची तेथें समाधि आहे. श्रीगुरुपादुकेची महापूजा करून व तेथील सेवेकरी यांस भोजन घालून तेथून रघुनाथराव हे निघून रामतीर्थास गेले.

रामतीर्थ. रामतीर्थाविषयीं पुराणांत अशी कथा आहे कीं, दिवोदास राजास ब्रम्हदेवांनीं अनेक वर देऊन काशीक्षेत्रीं राज्याभिषेक केला. नंतर त्या राजानें आपले तपःसामर्थ्येंकरून विश्वेश्वरास काशीक्षेत्रांतून जाण्याविषयीं सांगितलें. तेव्हां निरुपायास्तव काशीक्षेत्राचा त्याग करून विश्वेश्वर मंदर नामक पर्वतावर जाऊन राहिले. तेव्हां तेथें विश्वेश्वरास काशीक्षेत्राची वारंवार स्मृति होऊन चैन पडेना! त्या कालीं त्यांचे मनोरंजन होण्याकरितां त्यांस ऋषींनीं अनेक प्रकारच्या कथा व इतिहास सांगितले. याचप्रमाणें अप्सरा व रुद्रकन्या यांनीं अनेक प्रकारचीं गायनें व नृत्यें करून त्यांचें अंतःकरण स्वस्थ होण्याकरितां यत्न केलें. तसेंच काशीवियोगापासून विश्वेश्वराचे शरीरास दाह झाला होता, त्याचे शांत्यर्थ शिवगणांनीं त्यांच्या शरीरास कर्पूरलेप केले. जगन्माता पार्वती हिनेंही अक्षादिक्रीडेकरून [ सोंगटी वगैरे खेळून ] त्यांचें अंतःकरण स्वस्थ होण्याविषयीं यत्न केला. तथापि त्यांस चैन पडेना! तेव्हां बाणासुरानें तांडव नृत्य केलें. हाहाहूहू इत्यादि गंधर्व व नारद तुंबरु ऋषी, यांनीं उत्तम गायनें केलीं. शेवटीं ब्रम्हदेव व विष्णू हे ही आपल्या स्त्रियांसह तेथें येऊन त्यांनीं विश्वेश्वरास कालक्षेप होण्याकरितां अनेक उपाय योजिले. परंतु कोणत्याही उपायानें काशीवियोगापासून अंतःकरणास झालेला ताप शांत होऊन त्यांचे मनास चैन पडेना! तेव्हां त्यांनीं नंदिकेश्वरास आज्ञा केली कीं, सर्व पृथ्वीवर संचार करून काशीसारखें स्थल असेल तें लवकर शोधून काढावें. म्हणजे आपण तेथें जाऊन वास करूं. तेव्हां नंदिकेश्वर तेथून निघाले. ते सर्व पृथ्वीवर संचार करून आन आ

त्यावर एक रमणीय स्थल पाहून ते विश्रांति घेत असतां त्या स्थला ची शोभा व पवित्रता विलक्षण वाटून त्यांस मोठा संतोष झाला. नंतर तेथें लहान पर्वत होता, त्याचे शिखरावर जाऊन त्यांनीं तेथून त्या स्थलाकडे पाहिलें, तेव्हां तें स्थल संपूर्ण दृष्टिगोचर होऊन त्याची सर्व शोभा दिसण्यांत आली. ती पाहून हें स्थान काशीपेक्षांही आनंद-कारक आहे, असा नंदिकेश्वराचा निश्चय झाला. तेव्हां त्यांनीं मंद राचलीं जाऊन विश्वेश्वरास हें वृत्त निवेदन केलें. त्यावरून विश्वेश्वर हे पार्वतीसहवर्तमान तेथें आले, आणि त्या पर्वतशिखराची शोभा पाहून त्यांस मोठा संतोष झाला. तेव्हां ते नंदिकेश्वरास बोलिले कीं, तूं हें स्थल पाहून काढिलें तें उत्तम आहे खरें! ज्या स्थलीं उभे राहून नंदिकेश्वरांनी पूर्वी येथील शोभा पाहिली त्या स्थलीं नंदिकेश्वराचें पाऊल वठलें होतें तें पाहून विश्वेश्वर ह्मणाले कीं, या पदावर जे कोणी पिंडदान करितील त्यांस गयाश्राद्धाचें फल प्राप्त होईल! असें बोलून त्यांनीं तेथें विश्वेश्वर या नांवानें वास केला. असें झाल्यावर काशींतील सर्व तीर्थें व देवता त्या स्थानीं येऊन राहिल्या. त्या क्षेत्रीं जी गंगानदी आहे, तींत मणिकर्णिकेचें स्थान आहे. पुढें कालेंकरून रावणवधार्थ रामचंद्र दक्षिण प्रदेशीं आले. तेव्हां या स्थलीं येऊन त्यांनीं विश्वेश्वराची पूजा करून बहुत स्तुति केली. ते समयीं विश्वेश्वर प्रसन्न होऊन वर मागण्यास सांगितलें. तेव्हां रामानी अशी विज्ञप्ती केली कीं, हें विश्वेश्वरलिंग, रामलिंग या नामें करून प्रसिद्ध व्हावें. जे कोणी या रामलिंगाची पूजा करितील, त्यांस काशीक्षेत्रांतील विश्वेश्वराचे पुजेपेक्षां शतपट फल प्राप्त व्हावें. या क्षेत्रीं माझे नामें करून तीर्थ प्रसिद्ध होऊन या तीर्थाचा अगाध महिमा व्हावा! अशी रामचंद्रानें प्रार्थना केली, ती शिवानीं मान्य केली. तेव्हां पासून त्या क्षेत्रांस रामतीर्थ असें नांव प्राप्त झालें. येथील देव जतकर जहागिरदार डफळे यांचा कुलस्वामी आहे. या देवाचा पूजा नैवेद्याचा खर्च त्याच जहागीरदारांकडून चालतो

असो तेथून निघून रघुनाथराव हे क्रमानें शूरपालनामें क्षेत्रीं जाते झाले.

शूरपालक्षेत्र. शूरपालक्षेत्रीं कृष्णातीरावर नृसिंहस्थान आहे. परशुरामांनीं एकवीस वेळा पृथ्वींतील क्षत्रियांचा संहार केला, त्या पातकाची निवृत्ति या शूरपाल क्षेत्रीं झाली. तेव्हां या क्षेत्राच्या महिम्यानें आपण पापनिर्मुक्त झालों असें पाहून परशुरामाचे नेत्रास आनंदाश्रु आले, आणि ते अश्रु ज्या ठिकाणीं पडले त्या ठिकाणीं एक अश्वत्थवृक्ष उत्पन्न झाला. त्या वृक्षाचें दर्शन व पूजन यांचें मोठें फल सांगितलें आहे. तसेंच पूर्वीं बलराम हे तीर्थयात्राकरीत असतां या क्षेत्रीं आले. तेव्हां या क्षेत्राचा मोठा महिमा जाणून त्यांनीं कांहीं दिवस या क्षेत्रीं वास केला, अशी कथा पुराणांत आहे. कृष्णातीरापासून शूरपाल हें गांव थोड्या अंतरावर आहे. या गांवांत ब्राह्मणांची वस्ति बहुत आहे. येथील सर्व ब्राह्मण मध्वमत संप्रदायी असून उत्तम वैदिक आहेत. येथें बहुतेक ब्राह्मण वेदविद्येचाच अभ्यास करितात. त्या प्रांतीं वेदविद्या रघुनाथराव यांस कायती याच क्षेत्रीं आढळली. येथें माघवद्य दशमीस रघुनाथराव यांचें जाणें झालें. एकादशीस मुक्काम होऊन द्वादशीस सर्व क्षेत्रस्थ ब्राह्मणांस भोजन घालून ते येथून चालते झाले. मार्गांत जमखिंडी गांव लागतो. तेथें

जमखिंडी. पटवर्धनांच्या घराण्यापैकीं एक शाखा आहे. तिजकडेस तें संस्थान चालत आहे. हल्लीं गोपाळरावसाहेब पटवर्धन यांचे दत्त चिरंजीव आपासाहेब हे संस्थानचे मालक आहेत हे प्रतिवर्षीं महाशिवरात्रीचा मोठा उत्सव करीत असतात. तेथून पुढें पर्वताची एक खिंड लागते. त्या खिंडीनजीक एक गांव आहे तेथें मुक्काम करून रघुनाथराव हे दुसरे दिवशीं सकाळीं कृष्णातीरीं गलगलीस गेले.

गलगली. गलगली हें नांव गालव या शब्दाच्या अपभ्रंशानें झालें असावें असें वाटतें. या क्षेत्रीं गालवऋषींचा आश्रम मुख्य आहे. या गांवास कृष्णानदी अगदीं समीप असून तिच्या तीरीं सप्तऋषींचें स्थान

आहे. या क्षेत्रीं महाशिवरात्री अनायासें रघुनाथराव यांस प्राप्त झा ली. तिजकारितां त्यांनीं येथें एक दिवस मुक्काम करून ते दुसरे दि- वशीं पारणा झाल्यावर येथून निघाले. ते क्रमानें वनशंकरी क्षेत्रीं गेले या क्षेत्रास शाकंभरी असेंही ह्मणतात.

शाकंभरी हें स्थान अगदीं अरण्यांत आहे. तेथें वस्ति बिलकुल नाहीं. या ठिकाणीं वृक्षांचें वन बहुत दाट आहे. आसमंतांत दोन कोस सर्व बाग आहेत. त्यांत केळीचीं व नारळीचीं वगैरे झाडें फा र आहेत. सर्व जमीन बहुतकरून बागाईत आहे. तें स्थान दुरून पा हतांच कोंकणांत आलों असा भास होतो! देवीचें देऊळ उत्तम बां धिलेलें आहे. ही देवी अनगळ उपनांवाचे गृहस्थांची कुलस्वामिनी असल्यामुळें त्यांनीं हें देऊळ बांधिलें असें सांगतात. देवीपुढें दगडी सभामंडप व बाजूस ओऱ्या आहेत. देवीची मूर्ति सिंहारूढ असून तिचें ध्यान बहुत सुंदर आहे! पूर्वींची मूर्ति भंगली ह्मणून आलीक डे दुसरी मूर्ति बसविली आहे, असें तेथें रघुनाथराव यांनीं ऐकिलें. मंदिरांत तीन चार तीर्थें आहेत. मंदिराबाहेर एक मोठा तलाव आ हे. व त्याच्या भोंवतालींही ओऱ्या बांधलेल्या आहेत. या तलावास हरिद्रातीर्थ असें नांव आहे. या क्षेत्रास तिलकवन अशीही संज्ञा आ हे. येथें सरस्वती नदीसीं दुसऱ्या एका नदीचा संगम झाला आहे. संगमस्थलीं रुद्रेश्वर नामें महादेवाचें स्थान आहे.

वनशंकरी किंवा शाकंभरी.

तिलकवन.

पूर्वयुगीं शंभर वर्षें अनावृष्टी झाली! तेव्हां या स्थलीं देवीनें शा का उत्पन्न करून बहुत ऋषींचें संरक्षण केलें. यामुळें तिला शाकंभ री हें नांव प्राप्त झालें. या प्रदेशांत जिवंत पाणी फार असल्यामुळें त्यांतून कालवे काढिले आहेत. तेणेंकरून सर्वत्र बागाईत झालेलें आहे. व त्या योगें त्या स्थलास विशेष शोभा आली आहे. देवीचे सन्निध यात्रेकरी मात्र एकदोन दिवस राहतात. घरें करून राहणा रे असे तेथें कोणी नाहींत. देवीचे पुजारी तेथून दोन कोसांवर तुल- सीपुर ह्मणून गांव आहे, तेथें असतात. ही देवी बहुतांची कुलस्वा

मिनी आहे. हेमंतऋतूंत पौष शुद्ध सप्तमीपासून पौर्णिमेपर्यंत तिचें नवरात्र असतें. ही देवी ज्याची कुलस्वामिनी आहे. त्यास पौष शुद्ध पौर्णिमेस कुलधर्म करावा लागतो. तेव्हां साठ भाज्या केल्या पाहिजेत! ही देवी विंचूरकर यांची कुलस्वामिनी आहे. येथील यात्राविधि कुलधर्म रीतीनें करून रघुनाथराव हे तेथून पक्का दीड कोस ब-

बदामी. दामीगांव आहे, तेथें मुक्कामास गेले. त्या स्थलीं गांवासन्निध मोठा तलाव आहे. त्यास अगस्तितीर्थ असें म्हणतात. त्याचे समीप अगस्तीश्वरनामें महादेवाचें स्थान आहे. येथील किल्ला मराठ्यांचे इतिहासांत प्रसिद्ध आहे. हा किल्ला पाहाडी असून फार बिकट आहे. बदामी हा गांव किल्ल्याचे माचीस आहे. तेथून जवळ पर्वती ह्मणून गां

पर्वतीगांव. व आहे. तो मात्र शहरासारखा मोठा असून तेथें ब्राह्मणाची वस्ति पुष्कळ आहे. हा गांव पूर्वी रास्त्यांकडेस होता. येथें पूर्वी संभावित गृहस्थ बहुत राहत असत. अद्यापीही येथें चांगलीं संभावित घराणीं आहेत. या गांवीं कोष्ट्याचे माग पुष्कळ आहेत. येथून जवळच व्याघ्रपादऋषीचा आश्रम आहे. या ठिकाणीं पाणी फार चांगलें असून पुष्कळ आहे. हें स्थान अरण्यांतच आहे. येथें व्याघ्रपादेश्वर नामें महादेवाचें मंदिर आहे. आत स्वयंभु शिवलिंग आहे; तें मोठें जागृत आहे असें ह्मणतात. तेथून रघुनाथराव हे महाकूट क्षेत्रीं गेले.

महाकूट क्षेत्र हें सर्व शिवलिंगमय आहे. एथें पर्वतावर, शेतांत,

महाकूटक्षेत्र. अरण्यांत वगैरे सर्वत्र हजारों शिवलिंगें आहेत. एथें एकंदर किती लिंगें आहेत याचा अंत नाहीं! जमीन उकरली तर आंत शिवलिंग निघतें! पूर्वी करनाटकप्रांतीं चिदंबरदीक्षित ह्मणोन मोठे सिद्ध पुरुष झाले होते. ते या क्षेत्रीं आले, तेव्हां त्यांनीं क्षेत्रमर्यादेपासूनच दर्शन केलें. मर्यादेचे आंत पाय ठेविला नाहीं! कारण हें सर्व क्षेत्र त्यांस लिंगरूपानें दिसूं लागलें, असें सांगतात. येथील मुख्य स्थानीं मोठा परीघ असून आंत मंदिरें आहेत. त्या सर्व मंदिरांत शिवलिंगें आहेत. या खेरीज एक वीरभद्राचें मंदिर आहे. मध्यस्थानीं महाकूटेश्वरा

चे मंदिर असून त्यांत स्वयंभु लिंग आहे. त्याचे समीप विष्णुतीर्थ आहे. त्यास कंबरेइतकें पाणी सर्वत्र सारखें असतें. हें कुंड चांगलें बांधीव आहे. यास खालीं जमिनींतून पाण्याच्या उकळ्या येतात! हें पाणी फार उत्कृष्ट आहे. या तीर्थाचे एका कोंपऱ्यास पाण्यांत शिव मंदिर आहे. त्याचें दर्शन करणें झालें तर पाण्यांत बुडी मारून मंदिरांत जावें लागतें! क्षेत्रमर्यादेंत कोटी लिंगें आहेत असें क्षेत्रमाहात्म्यांत लिहिलें आहे! महाकूटेश्वराचे सन्निध लज्जागौरीचें स्थान आहे. या देवीची मूर्ति फार चमत्कारिक आहे! ही मूर्ति नग्न व उताणी निजलेली असून रतिकालीं स्त्रियांची जशी स्थिति असते तशा स्थितीची आहे! तिचे सर्व अवयव फार उत्तम केलेले आहेत! मूर्तीस मस्तक मात्र नाहीं! मस्तकावांचून खालील धड आहे. अशा प्रकारची मूर्ति अन्यत्र कोठें असल्याचें ऐकण्यांत येत नाहीं! या स्थानाविषयीं रघुनाथराव यांणीं शोध केला, पण पुराणमाहात्म्य त्यांस मिळालें नाहीं! परंतु तेथील लोकांचे सांगण्यांत कथा आली ती अशी:—एकेसमयीं पार्वतीचा विनोद करावा व सत्व पाहावें ह्मणून शिवानी आपली गोदडी संभाळून ठेवण्यास दिली, व आपणच उंदिराचें रूप घेऊन तीस भोंकें पाडलीं. पुढें गोदडी पार्वतीनें पाहिली तों उंदरानें खाल्लेली दृष्टीस पडली. तेणेंकरून ती शिवकोपास भ्याली. इतक्यांत शिंप्याचे रूप घेऊन शिव तेथें आले. त्यास पार्वतीने ती गोदडी नीट करून देण्याविषयीं विचारलें. तेव्हां जर तूं मला संभोग देशील तर मी ही गोदडी पूर्ववत करून देईन असें शिंप्यानें सांगितलें. तेव्हां शिव रागें भरतील या भयास्तव पार्वतीनें त्याची गोष्ट कबूल केली! पुढें उभयतांचा संभोगक्रम चालू झाला असतां शिवांनी शिंप्याचे रूप टाकून निजरूप प्रकट केलें! तें पाहातांच पार्वतीस अतिशयित लज्या झाली! त्या योगानें तिचें मस्तक तत्काळ गळून पडलें, व धड ज्या स्थितींत होतें त्या स्थितींत तसेंच राहिलें!

लज्जागौरी देवी.

या क्षेत्रापासून सात कोसांवर अहिवल्ली ह्मणोन मलप्रभेचे कां

अहिवल्लीगां

ठीं गांव आहे. तेथपर्यंत सर्व प्रदेशांत नदीतीरीं पर्वतशिखरावर व अरण्यांत वगैरे शिवलिंगें बहुत असून कित्येक लिंगांस मंदिरेंही आहेत.

पटतकलगांव

पुढें मार्गांत पटत्कल ह्मणून एक गांव लागतें. त्या गांवीं फार मोठालीं शिवमंदिरें व दगडीमंडप बांधिलेले आहेत. ज्यांत शिवलिंगें नाहींत, अशींही मंदिरें पुष्कळ आहेत. अहिवल्ली क्षेत्रीं परशुरामेश्वर नामें शिवस्थान आहे. या शिवाय आणखीही शिवस्थानें बहुत आहेत. या स्थानीं परशुरामांनीं एकवीस वेळा निक्षत्रिय पृथ्वी केल्यावर नदीतीरीं आपला परशु स्थापन केला होता. त्या परशूचा आकार खडकावर उमठला आहे! या क्षेत्रीं रघुनाथराव गेले, तेव्हां त्याचे दुसरे दिवशीं त्या ठिकाणचा रथोत्सव होता. त्या करितां बहुत लोक क्षेत्रीं जमले होते, त्याप्रमाणें तो रथोत्सवाचा समारंभ यथास्थित झाला.

संगमक्षेत्र.

संगमेश्वरदेव.

तेथून रघुनाथराव हे मलापहा व कृष्णा यांच्या संगमस्थानीं गेले. कृष्णातीरीं चार स्थानें दुर्लभ ह्मणून सांगीतलीं आहेत. त्यांतील च हें संगमस्थान एक होय. या संगमाचें कृष्णामाहात्म्यांत बहुत वर्णन आहे. येथें परशुरामस्थापित लिंग आहे, त्यास संगमेश्वर ह्मणतात. क्षत्रियांशीं युद्ध करण्यामुळें परशुरामास फार श्रम झाले. तेव्हां त्यानीं या क्षेत्रीं बहुत काल विश्रांति घेतली. येथील संगमेश्वराचें मंदिर फार पुरातन आहे. तें कोणीं बांधिलें याचा ठिकाण लागत नाहीं ! पुढील सभामंडप बर्वी उपनावाचा कसबे गंजीहल या गांवचा पाटील व नायीक यानें बांधिला. थोरले माधवरावसाहेब पेशवे, बदामीचा किल्ला जिंकून परत आले, तेव्हां त्यांनीं या स्थलीं कृष्णेस घाट बांधिला, असें तेथील लोक सांगतात. संगमासन्निध शंकराचार्य व मध्वाचार्य यांचे मठ आहेत. त्या मठांत त्यांचे त्यांचे

टीप १ ॥ शूर्पालेसंगमेचच्छायायांश्रीगिरौतथा ॥

॥ सर्वत्रसुलभाकृष्णाचतुःस्थानेषुदुर्लभा ॥ १ ॥

अधिकारी असतात. त्यांचा आपआपले शिष्यशाखेवर अधिकार चालतो! देवास पुजेबद्दल वगैरे नेमणूक नाहीं. येथील देवाचा रथ फार मोठा तीन पुरुष उंचीचा आहे! इतका मोठा रथ दुसरे कोठे असल्याचें ऐकण्यांत नाहीं. रथाचें काम बहुत अपूर्व केलें आहे. तो रथच पाहून मनास संतोष वाटतो! या प्रदेशीं सर्वत्र शिवस्थानीं जंगम लोकांची प्रमुखता आहे, परंतु या संगमक्षेत्रीं मात्र नाहीं! कृष्णातीरीं रुद्रपद आहे.तेथें कोणी श्राध्द करितात! संगमगांव कृष्णेपासून बऱ्याच अंतरावर आहे. येथील ब्राम्हण बहुतेक मध्वमतानुयायी व मोठे विद्वान् आहेत. या क्षेत्रीं रामाचार्य ह्मणोन एक मोठे विद्वान्, तपस्वी, व सदाचारसंपन्न असे ब्राम्हण होते. त्यांची कीर्ति त्या प्रदेशीं अद्यापि आहे. त्यांस अठरा पर्वात्मक छापील भारत पुस्तक रघुनाथराव यांनीं दान दिलें. या क्षेत्रींचा तीर्थविधि करून व ब्राम्हणभोजन घालून रघुनाथराव हे छायाभगवती या क्षेत्रीं गेले.हें स्थान अगदीं अरण्यांत आहे. एकमजल डोंगराळ प्रदेश आहे ह्मणून तेथें गाड्या चालत नाहींत! तेथें वाघांचा उपद्रव असल्यामुळें जनावरांस फार जपावें लागतें! छायाभगवतीस देवऱ्हद, कन्याऱ्हद, अशीं मुख्य अठरा तीर्थें आहेत. या स्थलीं कृष्णेचे दोन ओघ होऊन पुढें त्यांचा पुनःसंगम झाला आहे. कांहीं तीर्थें आलीकडील ओघांत आहेत, व कांहीं तीर्थें पलीकडील ओघांत आहेत. आलीकडील तीर्थस्नान झाल्यावर बाजेला भोंपळे बांधून ताफे केले आहेत, त्यांत बसून पलीकडे जावें लागतें. तिकडील ओघांत तीर्थें पुष्कळ आहेत. त्या तीर्थीं क्रमानें स्नानें करीत शेवटीं नरकतीर्थ आहे, त्याचें स्नान करावें ह्मणजे नरकयातना होत नाहीं! तेथून पुढें वशिष्टाचा आश्रम आहे. तेथें त्यांच्या कामधेनूचेंपद आहे. वशिष्टांनीं आपला दंड ज्या स्थानीं स्थापन केला त्याचा वृक्ष झाला आहे. त्या जातीचा वृक्ष अन्यत्र कोठें नाहीं असें म्हणतात. त्याची साल बरोबर आणिली असतां राहात नाहीं, थोडेच दिवसांत नाहींशी होते! ही प्रतीति बहुतांनीं पाहिली आहे.

छायाभगवती गांव.

पुढें मोठा कडा आहे. त्याचे खालीं कृष्णेंत बहुत कुंडें आहेत. कृष्णे चें पाणी कमी झाल्यावर तीं कुंडें दिसूं लागतात. प्रत्येक कुंडांत वेग ळ्या वेगळ्या रंगाचें पाणी असतें ! त्या स्थलीं मनुष्य जाण्यास मा र्ग नाहीं, ह्मणून पाणी पाहणें झाल्यास कड्यावर जावें लागतें. तेथू न तीं कुंडें दिसतात. येथील तीर्थांचें स्नान फाल्गुनमासीं कृष्णेचें पाणी जेव्हां कमी होत असतें तेव्हां होतें. रघुनाथराव यांचें फाल्गुन वद्यांत तेथें जाणें झालें. तेव्हां त्या समयीं कृष्णेचें पाणी कमी झा ल्यामुळें तीर्थें मोकळीं होतीं! त्या क्षेत्रीं यात्रा करून रघुनाथराव हे

चितापूर— क्रमानें निजामाचे हद्दींत कृष्णातीरीं चितापूर म्हणोन एक गांव आ हे, तेथें गेलें. हा गांव तेथील मोठे विद्वान् श्रीनिवासाचार्य यांजकडे स मोंगलसरकाराकडून इंनाम चालत आहे. त्या गांवीं रघुनाथराव यांनीं आचार्य यांचे घरीं जाऊन त्यांचें दर्शन घेतलें. तेव्हां त्यांनीं रघुनाथराव यांची बहुत प्रकारानें बरदास्त ठेविली. हेच आचार्य पु ढें सन्यास घेऊन सत्यबोधाचे मठांत सत्यपराक्रम या नामानें अधि कारारूढ झाले ! त्यांचेंच येणें थोडेवर्षांपूर्वीं वांई व पुणें या प्रांतीं झालें होतें. तेथून रघुनाथराव यांचें कनकगिरिस जाणें झालें.

कनकगि— कनकगिरी हें नृसिंहक्षेत्र आहे. येथील नृसिंहाचें मंदिर फार उ त्कृष्ट आहे. मंदिरावर चुन्याचीं चित्रें फारच अपूर्व केलीं आहेत. अ सें मंदिर दुसरे कोठें नसेल असें म्हणतात ! देवापुढील सभामंडपांत दोन्ही बाजूस अनेक प्रकारचीं चित्रें करून बसविलीं आहेत. चित्रां वर असे रंग आहेत कीं, त्यांस बहुत वर्षं झालीं असून आतां नवी नच रंग दिले आहेत काय असा भास होतो ! पृथ्वींत ज्या पाहण्या सारख्या वस्तु आहेत, त्यांतीलच हें [ मंदिर ] एक होय असें ह्मटलें पाहिजे. कर्नाटकांत त्या भाषेंत ह्मण आहे तिचा अर्थ, देवांनीं डोळे दिले आहेत तर कनकगिरीचें मंदिर पाहावें ! असा आहे. गाभाऱ्यां त स्वयंभु लिंग आहे. त्या लिंगास मुखाचें आकृतीप्रमाणें छिद्र आ हे त्यास नृसिंह ह्मणतात. येथें म्हणण्यासारखें प्रख्यात तीर्थ नाहीं.

या ठिकाणीं पूर्वीं आनीगोंदीचें राज्य सार्वभौम होतें. त्याचा अंकित असा कोणी एक शूद्र राजा होता. त्यानें हें मंदिर बांधिलें. त्याचा वंश हल्लीं कनकगिरीपासून थोडे अंतरावर एक गांव आहे तेथें आहे. येथील देवाच्या पूजेचा अधिकार रामानुजांकडेस आहे. ते देवास दुसऱ्याचा स्पर्श होऊं देत नाहींत. पूजाक्रम आगमानुसारी आहे.

या क्षेत्रीं श्रीवैष्णव म्हणजे रामानुजमतानुयायी यांची वस्ति बहुत आहे. पूर्वीं रामानुजमतांत जे मोठे विद्वान् झाले, ते याच क्षेत्रीं झाले असें ह्मणतात. रामानुज हे यज्ञांत प्रत्यक्ष पशुयाग करितात, व एकादशीस अग्निहोत्र होमही देतात! हे ब्राम्हण भस्म धारण करणारांचा अतिशय द्वेष करितात! त्याच प्रमाणें मध्वमतांतील मुद्रा धारण करणारे आहेत, त्यांचाही द्वेष करितात! मध्वाचें धर्मांत व यांचें धर्मांत बहुत अंतर आहे! या रामानुजाचे मतांत त्यंगल व बढल अशीं दोन मतें आहेत. याच्यांत वेद ह्मणणारे फार कमी आहेत. ते रामानुजाचार्यांनीं केलेले प्रबंध म्हणतात. त्या प्रबंधांस वेदाप्रमाणें ते मान देतात! यांच्यां जातींत तैत्तिरीय शाखेचा भरणा बहुत आहे यांचा आचार कांहीं चमत्कारिक आहे. बहुतांचें भोजन एक पाकांत होत नाहीं! अन्नावर दुसऱ्याची दृष्टि नजावी या करितां ते फार जपतात! प्रवासांत त्यांस पडदे बाळगल्या खेरीज सोयच नाहीं! ते मार्गांत अन्न बरोबर बाळगतात. आणि त्यास प्रत्यक्ष स्पर्श न करितां काठीस बांधून तें खांद्यावर घेऊन मार्ग क्रमितात. मुक्कामावर जाऊन तेंच अन्न भक्षितात! हे मारुतीस नमस्कार करीत नाहींत! यांचे मुख्य आचार्य मारुतीचे मंदिरांत दर्शनास गेले असतां "तूं सुखी आहेसना?" असा त्यास कुशल प्रश्न करितात. ते आपल्यास रामाचे बंधु आहों असें समजून मारुतीस विशेष मान देत नाहींत! यांच्यांत दोन भेद आहेत. त्यांतून एके भेदांत भर्ता मरण पावल्यावर केश काढण्याची रीत नाहीं! यांच्या स्त्रिया एकप्रकारचें लुगडें नेसतात त्यास कच्छ आंतून असतो! हे ब्राह्मण मोठे विद्वान् व धूर्त असता

त. व यांची बुद्धि फार चपल असते! त्यांच्यांत बहुतेक कविता क-रणारे असतात. नाटकालंकार ही विद्या आमचीच व आम्हींच त्यांत

रामानुजमत प्रवीण आहों, असा त्यांस अभिमान असतो! रामानुजांचा मुख्य सिद्धांत असा आहे कीं, जीव आणि ईश्वर यांचा सृष्टिसमयीं भेद आहे! हा सत्य असून मोक्ष कालीं अभेद होतो! याचें नांव विशि-ष्टाद्वैत ह्मणजे भेदपूर्वक अभेद.

मध्वमत मध्वाच्यामताचा सिद्धांत असा आहे कीं, सर्वदा जीवेश्वरांचा भेदच आहे! मोक्ष कालींही भेद असून सेव्य सेवक भाव राहतो!

शंकराचार्य मत. शंकराचार्यांच्या मताचा असा सिद्धांत आहे कीं, ईश्वर आणि जीव यांचा मुळींच भेद नाहीं! भेद पूर्वक संसार दिसतो, तो केवळ अनादि भ्रां-ति आहे! अशीं तीन आचार्यांची तीन वेगळालीं मतें आहेत असो.

रामानुजांच्या स्त्रिया बहुधा सुस्वरूप असतात. व मुखास आणि शरीरास हळद लावितात. रामानुजांमध्यें दरिद्री थोडेच अढळतात! त्या देशांत मोठाले सावकार व तिकडील राजेलोक हे सर्व रामानुज मताचे आहेत. हिंदूंपैकीं रामानुज व जंगम, या दोन पंथाचे लोक दु-सऱ्याच्या मताचा द्वेष करणारे आहेत! रघुनाथराव हे कनकगिरीस गेले, तेव्हां ते परमताचे म्हणोन त्यांस मंदिरांत वस्तीस उतरूं दिलें नाहीं! बाहेर मारुतीचें मंदिर आहे त्यांतही राहूं दिले नाहीं! मग प्र-त्यक्ष घरांत उतरण्यास जागा कोठून मिळणार? शेवटीं रघुनाथराव यांस जंगमाच्या मठांत मुक्काम करणें भाग झाले! तेथील देवाचें द-र्शन करून पुजेबद्दल तेथील ब्राम्हणांस त्यांनीं रोख पैसा देऊन पू-जा करविली! आणि ते तेथून पुढें चालते झाले.

हंपीविरूपाक्ष मग तुंगभद्रेच्यातीरीं हंपीविरूपाक्ष म्हणोन एक क्षेत्र आहे, तेथें रघुनाथराव यांचें जाणें झालें. विरूपाक्षेश्वराचें मंदिर अत्यंत मोठें असून आंतील मंदिराचा परीघ बहुत विस्तीर्ण आहे. महाद्वारावर फार मोठें गोपुर बांधिलें आहे. त्यावर ठिकठिकाणीं चुन्याचीं चित्रें करून बसविलीं आहेत. दुसरें गोपुर उत्तर दरवाजावर आहे. मंदि

राच्या परिघांत ठिकठिकाणीं मोठे भव्य सभामंडप आहेत. या मंडपां त प्रतिऋतूंत ऋतुसंबंधी उत्सव होतो. तेव्हां तेथें भोगमूर्तीचें स्थापन करितात. विरूपाक्षेश्वर लिंग स्वयंभु आहे. या विषयीं कथा आहे, ती अशी: —

वशिष्टऋषी हे विरूपाक्षाची पूजा करीत बसले असतां तेथें विश्वामित्रऋषी आले. त्यांनीं वशिष्टास प्रश्न केला कीं, हें स्वयंभुलिंग आहे कीं काय? त्यावर वशिष्टांनीं उत्तर दिलें कीं, तुह्मीं बाहेरून गंडूष करून या [ चूळ भरून या ! ] त्यावरून विश्वामित्रांनीं तसें करितांच त्यांच्या मुखांतून सहस्रावधि कीटक पडले ! त्याचें त्यांस आश्चर्य वाटून त्यांनीं असें कां झालें ह्मणून वशिष्टास विचारिलें. तेव्हां वशिष्टांनी उत्तर दिलें कीं, तुह्मांस या लिंगाचे स्वयंभुत्वाविषयीं संशय झाला या कारणानें तुमचे मुखांत कीटक झाले! अशी कथा आहे.

विरूपाक्षाचे मंदिरांत शक्तिस्थानें पुष्कळ आहेत. गुंजामाधव ह्मणोन विष्णूचें एक स्थान आहे. त्या विष्णू पुढें शिवलिंग आहे, त्या लिंगावर विष्णूचा एक हात असून दुसऱ्या हातांत गुंजा ( गुंज ) आहे. याचें कारण क्षेत्रमाहात्म्यांत असें लिहिलें आहे कीं, काशी क्षेत्राहून एक गुंजप्रमाण या क्षेत्राचें माहात्म्य अधिक आहे ! असें सर्व लोकांस शिवलिंगाची शपथ वाहून विष्णू सांगत आहेत! मंदिरांत भुवनेश्वरीचें स्थान आहे. त्या स्थलीं विद्यारण्यांनीं गायत्रीपुरश्चरणें केलीं. देवापुढील दुसरे परिघांत तुंगभद्रेचा कालवा वाहत आहे. व देवाचे मागल्या बाजूस तुंगभद्रानदी आहे. तुंगभद्रेचें पाणी पिण्यास फार गोड व रुचिकर आहे. इतर नद्यांचे पाण्यास इतकी रुचि नसते! हिच्या पाण्यांत जडांश मात्र विशेष आहे!

वराह अवतार झाला त्या काळीं त्याच्या एक्या दंष्ट्रे पासून( दा

---

टीप १ ॥ तुंगभद्रापयःपानंतुंगसौधाधिरोहणं ॥
॥ तुंगस्तनोपरिष्वंगःउत्तुंगतपसःफलं॥ १ ॥( भावार्थ उघडच आहे. )

ढेपासून) तुंगानदी निघाली. दुसऱ्या दंष्ट्रेपासून भद्रानदी निघाली. पुढें त्यांचा संगम झाल्यावर त्या मिश्र ओघास तुंगभद्रा हें नांव प्राप्त झालें अशी कथा आहे. या क्षेत्राचें परिमाण फार मोठें वर्णिलें आहे! या क्षेत्रमर्यादेंतच किष्किंधा, पंपासरोवर, माल्यवान्पर्वत, ऋष्यमूकपर्वत, तारापर्वत, शिवाय ऋषींचे आश्रम व देवस्थानें आहेत! देवाचे सन्निध विद्यारण्यांचा मठ आहे. तेथें सन्याशी लोक असतात. विद्यारण्य हे शंकराचार्यांचे मठांत अधिकारारूढ झाले, त्या कालीं त्यांनीं हंपी येथील स्वतंत्र्या मठांत आपले शिष्य स्थापन केले. या मठास दहाहजारांचीं इनामी गांवें आहेत. मठांत गादीवर असलेल्या स्वामींचा मोठा खटला आहे. व विद्यारण्य यांचे पूजेचे देव अद्यापि त्या मठांत आहेत. त्यांचें पूजन त्या मठाचे अधिकारी स्वामी करितात. विरूपाक्षेश्वरास सहाहजरांची नेमणूक आहे त्याची सर्व व्यवस्था स्वामीकडेस असते. प्रतिवर्षीं चैत्रमासीं आगमोक्त विधीनें नव दिवस देवाचा उत्सव होतो. प्रतिदिवशीं देवाचें वाहन मिरवून पौर्णिमेस रथोत्सव होतो. त्या समयीं सुमारें एक लक्ष पर्यंत यात्रा जमते! येथील रथ फार मोठा आहे. त्या प्रांतीं या रथा सारखा दुसरा रथ नाहीं. देवाचे चार दिशेस चार कोसांचे अंतरावर चार शिवस्थानें आहेत. तीं किन्नरेश्वर, सोमेश्वर, वाराहेश्वर आणि दुसरें एक अशीं आहेत. हीं चार शिवस्थानें मोठीं प्रसिद्ध आहेत. विरूपाक्षाच्या मागें विद्यारण्याची समाधि आहे तिच्यावर चक्र स्थापन केलें आहे. समाधीच्या मागें विद्यारण्याची मूर्ति आहे. विरूपाक्षापासून कांहीं अंतरावर क्षत्रपालकवीरभद्राचें स्थान आहे. ही मूर्ति दीडपुरुष उंच असून मोठी भव्य आहे. तेथून जवळच एक नृसिंहस्थान आहे. त्या नृसिंहाचें मुख अर्ध्याखणा एवढें मोठें आहे! या वरून मूर्तीचा आकार केवढा मोठा आहे, हें लक्षांत येईल! वीरभद्राचे पूजक जंगम आहेत, व त्याजवळ त्यांचा मठ आहे. हंपी हा गांव फार लहान आहे. येथें तेलंगी स्मार्त ब्राह्मणांची वस्ति आहे.

व देवाचे पूजक तेच आहेत.

विरूपाक्ष क्षेत्रालगत विद्यानगर ह्मणोन मोठें सार्वभौम राजधानींचें शहर होतें. या स्थलीं पूर्वी बुक्कभूपाल नामें राजा झाला. त्या राजाचे मंत्री माधवाचार्य होते. तेच सन्यस्त झाल्यावर त्यांचें नांव विद्यारण्य असें ठेविलें. त्यांचे कनिष्ट बंधु सायणाचार्य होते. राजानें माधवाचार्यास चार वेदांवर भाष्य करण्यास सांगितलें. तेव्हां त्यांनीं आपले बंधूकडून भाष्याचें काम करविलें. माधवाचार्यांचे ग्रंथ सर्व शास्त्रांवर आहेत! कलियुगांत या सारखा दुसरा विद्वान् झाला नाहीं! यांणीं अमृतरस ह्मणून एक रसायन सिद्ध करण्यास आरंभ केला होता. त्याकामीं राजाचें बहुत द्रव्य खर्च झालें. तो रस सिद्ध होण्याचे संधीस दुर्दैवानें राजाचे बुद्धीस विपर्यास होऊन माधवाचार्यांनी आजपर्यंत हा रस तयार होण्याचे कामी बहुत द्रव्य खर्च करून माझा जामदारखाना रिकामा केला, असें त्यास वाटून तें त्यानें बोलूनही दाखविलें! त्यावरून माधवाचार्यांस अनुताप झाला. तेव्हां तो रस पुरता तयार होणें राहिला होता, तथापि त्यांनीं राजाच्या समोर त्या शहरांतील जन्मांध, जन्मबधिर, मुके, व महाव्याधीनें ग्रस्त अशा सर्वांस जमवून त्यांजवर त्या रसाचा प्रयोग केला. तेव्हां तत्काळ ते सर्व बरे झाले! अशी प्रतीति राजास दाखवून तो अमृतरस तुंगभद्रेस अगाध डोह आहे, त्यांत नेऊन टाकिला! आणि "राजा, तुझा द्रव्यव्यय झाला असेल त्याचे लक्षपट तुला द्रव्य देईन"! असें राजास सांगून त्यांनीं तप करण्यास आरंभ केला! आणि देवता प्रसन्न करून तिजकडून सुवर्णाची वृष्टि त्या प्रदेशी करविली! असें वृत्त तेथील लोकांचे सांगण्यावरून ऐकण्यांत येतें.

विद्यानगर

त्या प्राचीन व ओसाड विद्यानगरांत राजमंदिराचा कांहीं भाग व ज्याच्या दगडावर सर्व रामचरित्राच्या मूर्ति खोदलेल्या आहेत, असा मोठा मंडप, व गजशाला, व गोशाला, इत्यादिक ठिकाणें अजून आहेत. या खेरीज ठिकठिकाणीं अनेक प्रकारचे उत्तम मंडप

आहेत. शिवाय शहरांतील घरें पडकीं आहेत. व त्यांत गवत व वृक्ष वाढले आहेत! त्या नगराचा परीघ बारा कोसांहून कमी नसेल असें ह्मणतात! पडकीं मंदिरें आहेत, त्यांत रान वाढून वाघ, रीस असे घातुक पशूंची वस्ति झाल्यामुळें ती जागा आतां मोठी भयंकर झाली आहे!

या क्षेत्रीं रघुनाथराव यांचें चैत्र शुध्धांत येणें झालें. येथील यात्राविधि झाल्यावर रथोत्सव प्राप्त झाला. तो पाहून ते तेथून दीड कोसावर किष्किंधा नामें गांव आहे, तेथें गेले.

ोदंडधारी राम.

मार्गांत कोदंडधारी नामक रामाचें स्थान लागतें. ही रामाची मूर्ति आकारानें मोठ्या पुरुषाएवढी आहे. याचप्रमाणें सीता व लक्ष्मण यांच्या मूर्ति आहेत. देवाचें मंदिर लहान आहे. देवाचे पूजक रामानुज आहेत. देवापुढें तुंगभद्रानदी आहे. त्या स्थलास चक्रतीर्थ असें ह्मणतात. या ठिकाणीं तुंगभद्रेस मोठा डोह आहे. देवाचे समीप मारुतीचें स्थान आहे. त्यास यंत्रोत्धार मारुती अशी संज्ञा आहे. पाषाणावर यंत्र कोरिलें आहे, त्यामध्यें मारुती कोरींवच आहे या मारुतीची स्थापना मध्वाचार्यांचे पश्चात् कांहीं कालानें व्यासराज ह्मणून कोणी स्वामी अधिकारारूढ झाले त्यांनीं केली असें सांगतात. मारुतीचे पूजक मध्वसंप्रदायी आहेत. या स्थलीं राहून कितीएक मध्वमतानुयायी अनुष्ठान करीत असतात.

ाक्रतीर्थ.

ोत्धार ारुती.

विठ्ठल.

पुढें विजयविठ्ठल नामें देवाचें मंदिर लागतें. त्यांत देवाची मूर्ति नाहीं, एथें रघुनाथराव हे गेले. हें मंदिर फार मोठें आहे. याच्या आसमंतात अष्टनायिकांचीं मंदिरें आहेत. हें विजयविठ्ठलाचें मंदिर प्रत्यक्ष पाहिल्यावांचून तें केवढें मोठें आहे व तें बांधण्यास किती खर्च झाला असेल व आंतील कारागिरी कशी आहे, ह्या गोष्टी लक्ष्यांत यावयाच्या नाहींत! विद्यानगर एथें बुक्कभूपाल राजाचे पश्चात् रामराजा ह्मणोन झाला, त्यानें शंकरमताचा त्याग करून रामानुजमताचा स्वीकार केला होता तो पंढरपुरास येऊन त्यानें तेथील

विठ्ठलाची मूर्ति आणून या मंदिरांत स्थापन केली. कालेंकरून येकनाथाचे पूर्वज भानुदास म्हणोन मोठे भगवद्भक्त झाले. त्यांनीं ती मूर्ति पुन्हा पंढरपुरास नेऊन स्थापन केली. तेव्हांपासून तें मंदिर शून्य पडलें! आतां तें अगदीं मोडकळीस येऊन त्यांत सर्वत्र रान माजलें आहे!

पुढें अच्युतपुर व कृष्णपुर हीं दोन गांवें लागतात. तेथें रघुनाथराव गेले. हीं स्थानेंही हल्लीं उजाड आहेत. या ठिकाणीं मोठाल्या इमारती व मंदिरें आहेत. तेथें एक गणपतीचें मंदिर आहे. त्यांत तीन पुरुषांहून जास्त उंचीचा एके काळ्या पाषाणाचा गणपती आहे. त्या मूर्तीस सेंदुराचालेप आहे. विद्यानगर येथील राजवंशांत अच्युतराव व कृष्णराव असे दोघे बंधु झाले. त्यांनीं आपले नावानें हीं दोन पुरें वसविलीं. परंतु तीं हल्लीं उजाड आहेत! या उभय बंधूंनीं त्या प्रदेशांत बहुत शिवालयें बांधिली आहेत. हे मोठे प्रतापी पुरुष झाले. यांची कर्नाटक प्रांतीं अतिशयित कीर्ति आहे! हे अत्यंत धर्मशील होते. यांनीं राज्य मोठे न्यायानें केलें, असें तिकडील लोक अद्यापि त्यांचें वर्णन करितात. अच्युतपुर. कृष्णपुर.

विद्यानगर येथें कांहीं कालपर्यंत सरस्वती व लक्ष्मी यांचा वास होता ह्मणजे तेथें विद्वान् व धनिक असे लोक पुष्कळ होते. ही राजधानी अकबरबादशहापर्यंत बऱ्याच स्थितींत होती. पुढें अकबर बादशाहानें त्या राज्याचा अगदीं मोड केला. तेव्हां तेथील राजे तें स्थान सोडून किष्किंधा येथें [ आनीगोंदी येथें ] राहूं लागले! मग उत्तरोत्तर त्या राज्याचा ऱ्हास होऊं लागला! ह्मैसूरचे राजाचा सरदार हैदर ह्मानें त्याचा बहुतेक मुलूख हस्तगत करून ह्मैसूरचे राज्यास जोडला! पुढें टिपूसुलतान ह्मानें त्यांचा थोडका राहिलेलाही प्रदेश लुटून त्यांतील द्रव्य व जवाहीर हीं हरण केलीं! हल्लीं त्या राजाचे वंशस्थाकडेस निजामाकडून आनीगोंदी ( किष्किंधा ) गांव इनाम चालत आहे. त्या गांवास तुंगभद्रेचे कालवे असल्यामुळें त्याचे ती

आहेत. शिवाय शहरांतील घरें पडकीं आहेत. व त्यांत गवत व वृक्ष वाढले आहेत! त्या नगराचा परीघ बारा कोसांहून कमी नसेल असें ह्मणतात! पडकीं मंदिरें आहेत, त्यांत रान वाढून वाघ, रीस असे घातुक पशूंची वस्ति झाल्यामुळें ती जागा आतां मोठी भयंकर झाली आहे!

या क्षेत्रीं रघुनाथराव यांचें चैत्र शुध्धांत येणें झालें. येथील यात्राविधि झाल्यावर रथोत्सव प्राप्त झाला. तो पाहून ते तेथून दीड कोसावर किष्किंधा नामें गांव आहे, तेथें गेले.

[को]दंडधारी राम. मार्गांत कोदंडधारी नामक रामाचें स्थान लागतें. ही रामाची मूर्ति आकारानें मोठ्या पुरुषाएवढी आहे. याचप्रमाणें सीता व लक्ष्मण यांच्या मूर्ति आहेत. देवाचें मंदिर लहान आहे. देवाचे पूजक रामानुज आहेत. देवापुढें तुंगभद्रानदी आहे. त्या स्थलास चक्रतीर्थ असें ह्मणतात. या ठिकाणीं तुंगभद्रेस मोठा डोह आहे. देवाचे समीप मारुतीचें स्थान आहे. त्यास यंत्रोत्धार मारुती अशी संज्ञा आहे. पाषाणावर यंत्र कोरिलें आहे, त्यामध्यें मारुती कोरींवच आहे या मारुतीची स्थापना मध्वाचार्यांचे पश्चात् कांहीं कालानें व्यासराज ह्मणून कोणी स्वामी अधिकारारूढ झाले त्यांनीं केली असें सांगतात. मारुतीचे पूजक मध्वसंप्रदायी आहेत. या स्थलीं राहून कितीएक मध्वमतानुयायी अनुष्ठान करीत असतात.

[च]क्रतीर्थ.

[यंत्र]ोत्धार [मा]रुती.

[विजय]विठ्ठल. पुढें विजयविठ्ठल नामें देवाचें मंदिर लागतें. त्यांत देवाची मूर्ति नाहीं, एथें रघुनाथराव हे गेले. हें मंदिर फार मोठें आहे. याच्या आसमंतात अष्टनायिकांचीं मंदिरें आहेत. हें विजयविठ्ठलाचें मंदिर प्रत्यक्ष पाहिल्यावांचून तें केवढें मोठें आहे व तें बांधण्यास किती खर्च झाला असेल व आंतील कारागिरी कशी आहे, ह्या गोष्टी लक्ष्यांत यावयाच्या नाहींत! विद्यानगर एथें बुक्कभूपाल राजाचे पश्चात् रामराजा ह्मणोन झाला, त्यानें शंकरमताचा त्याग करून रामानुजमताचा स्वीकार केला होता तो पंढरपुरास येऊन त्यानें तेथील

विठ्ठलाची मूर्ति आणून या मंदिरांत स्थापन केली. कालेंकरून येकनाथांचे पूर्वज भानुदास म्हणोन मोठे भगवद्भक्त झाले. त्यांनीं ती मूर्ति पुन्हा पंढरपुरास नेऊन स्थापन केली. तेव्हांपासून तें मंदिर शून्य पडलें! आतां तें अगदीं मोडकळीस येऊन त्यांत सर्वत्र रान माजलें आहे!

अच्युतपुर कृष्णपुर

पुढें अच्युतपुर व कृष्णपुर हीं दोन गांवें लागतात. तेथें रघुनाथ राव गेले. हीं स्थानेंही हल्लीं उजाड आहेत. या ठिकाणीं मोठाल्या इमारती व मंदिरें आहेत. तेथें एक गणपतीचें मंदिर आहे. त्यांत तीन पुरुषांहून जास्त उंचीचा एके काळ्या पाषाणाचा गणपती आहे. त्या मूर्तीस सेंदुराचा लेप आहे. विद्यानगर येथील राजवंशांत अच्युतराव व कृष्णराव असे दोघे बंधु झाले. त्यांनीं आपले नावानें हीं दोन पुरें वसविलीं. परंतु तीं हल्लीं उजाड आहेत! या उभय बंधूनीं त्या प्रदेशांत बहुत शिवालयें बांधिलीं आहेत. हे मोठे प्रतापी पुरुष झाले. यांची कर्नाटक प्रांतीं अतिशयित कीर्ति आहे! हे अत्यंत धर्मशील होते. यांनीं राज्य मोठे न्यायानें केलें, असें तिकडील लोक अद्यापि त्यांचें वर्णन करितात.

य
ैट

विद्यानगर येथें कांहीं कालपर्यंत सरस्वती व लक्ष्मी यांचा वास होता ह्मणजे तेथें विद्वान् व धनिक असे लोक पुष्कळ होते. ही राजधानी अकबरबादशहापर्यंत बऱ्याच स्थितींत होती. पुढें अकबर बादशाहानें त्या राज्याचा अगदीं मोड केला. तेव्हां तेथील राजे तें स्थान सोडून किष्किंधा येथें [ आनीगोंदी येथें ] राहूं लागले! मग उत्तरोत्तर त्या राज्याचा ऱ्हास होऊं लागला! हैसूरचे राजाचा सरदार हैदर ह्यानें त्याचा बहुतेक मुलूख हस्तगत करून हैसूरचे राज्यास जोडला! पुढें टिपूसुलतान ह्यानें त्याचा थोडका राहिलेलाही प्रदेश लुटून त्यांतील द्रव्य व जवाहीर हीं हरण केलीं! हल्लीं त्या राजाचे वंशस्थाकडेस निजामाकडून आनीगोंदी ( किष्किंधा ) गांव इनाम चालत आहे. त्या गांवास तुंगभद्रेचे कालवे असल्यामुळें त्याचें ती

किष्किं (अनी

ुद

श्री

सहजार रुपये उत्पन्न होतें! या शिवाय आणखी दोन तीन गांव निजामाकडून त्यांकडे चालत आहेत. इंग्रजांकडूनही कांहीं नक्तपैसा पावतो. मिळून हल्लीं त्या राजवंशास एकंदर उत्पन्न सुमारें सत्तर हजारापर्यंत असावें असा अदमास आहे. ह्या वंशांतील राजे आपणास क्षत्रिय ह्मणवितात. व क्षत्रियधर्मानेच वागतात. आनीगोंदी हा गांव तुंगभद्रेच्या कांठीं आहे. या गांवाची स्थिति चांगली आहे. सर्वत्र बागाईत असल्यामुळें पीक चांगलें होतें. जमीन मात्र डोंगर प्रदेशाची आहे. या गांवापासून अर्ध कोसावर तुंगभद्रानदीतीरीं कपिल ऋषींचा आश्रम आहे. या आश्रमाची जागा बहुत रमणीय आहे. तेथें कपिलेश्वर नामें महादेवाचें स्थान आहे. देवापुढें दगडी मंडप आहे. आसमंतात राहण्यासारख्या सोईच्या जागा पुष्कळ आहेत. त्या आश्रमीं रघुनाथराव यांचा मुक्काम झाला.

ानीगोंदी. ािष्किधा.)

पेलाश्रम.

किष्किधेस वानरांचें राज्य होतें, हें रामायण ग्रंथांत प्रसिद्ध आहे. त्या प्रदेशांतील बहुतेक पर्वतास मातीचा अंश नसून मोठाले दगड खड्यासारखे एकावरएक रचून आंत राहाण्यासारख्या गुहा मुद्दाम केल्या आहेत, असें दृष्टीस येतें! अशा हजारो गुहा तिकडील पर्वतांत आहेत. गुहेंत ठिकठिकाणीं उत्तम पाणी आहे. याच ठिकाणीं पूर्वी वानर राहत असतील असें वाटतें. अंजनी नामक पर्वतावर केसरी नामें वानराची फार मोठी गुहा आहे. त्या स्थळीं अंजनी पासून मारुतीचा जन्म झाला. तेथें मारुतीची मूर्ति आहे. चैत्र शुद्ध पौर्णिमेस तेथें यात्रा भरते. तें स्थान अगदीं पर्वतशिखरावर असल्यामुळें फार चढून जावें लागतें!

पर्वत.

ोवर.

आनीगोंदीहून एक कोसावर पंपासरोवर आहे. हें सरोवर उत्तम बांधिलेलें असून त्याच्या समीप दगडी मंडप आहे. सरोवरासान्निध एक शिवस्थान आहे. त्या स्थलीं रामचंद्र लक्ष्मणासहीत आले होते. तेथून अगदीं समोर ऋष्यमूक पर्वत आहे. त्यावर सुग्रीव मारुती वगैरे वानर होते. त्यांनीं हे कोण आले आहेत ह्मणून त्यांचे शोधार्थ

ऋप-

मारुतीस पाठविलें. तेव्हां मारुतीनें त्या स्थानीं येऊन रामचंद्रा बरोबर संभाषण केलें. नंतर रामानीं सुग्रीवाबरोबर अग्निसन्निध सख्य केलें, तें स्थान तेथें आहे. रामानें एक्या बाणानें सात तालवृक्षांचा छेद केला. तेंही स्थल येथें जवळच आहे. सुग्रीवाशीं सख्य झाल्यावर त्याचा ज्येष्ठ बंधु वाली याचे वधाविषयीं रामानीं प्रतिज्ञा करून सुग्रीवास वालीबरोबर युद्ध करण्यास पाठविलें. त्या युद्धकाळीं रामानें वालीस बाण मारिला. ही जागा तेथून कांहीं अंतरावर आहे त्या स्थलीं बाण मारतांना रामाचे पाय खडकावर उमटले आहेत. रामाचे बाणप्रहारानें वाली मरण पावला. नंतर वालीचें प्रेत बहुत वानरांनीं एकत्र होऊन मोठ्या आयासानें तुंगभद्रातीरीं नेऊन तीन बाजूंनीं पर्वत आहेत, त्यांमध्यें त्याचें दहन केलें. त्या जागेवर हल्लीं एक पुरुष उंचीची पांच साहाशें हात लांब व तीस चाळीस हात रुंद अशी टेंकडी दिसते. तेथें उकरलें तर राख निघून मोठाल्या अस्थि सांपडतात! त्या अस्थि भूतबाधा नव्हावी ह्मणोन कोणी मुद्दाम घरीं आणून ठेवितात! हें वालीचें दहनस्थान पाहिलें म्हणजे वालीस येथेंच दहन केलें, असा निश्चय होतो!

आनीगोंदींपासून जवळच माल्यवान् नामें पर्वत आहे. त्या स्थलीं सीताशुद्धी करितां मारुतीस पाठविल्यावर रामचंद्र लक्ष्मणासह राहिले होते. या पर्वतशिखरावर उत्तम मंदिर असून आंत रामचंद्राची मोठी भव्य मूर्ति पद्मासन घालून ध्यान करीत आहे, अशा आकाराची आहे. समीप लक्ष्मणाची मूर्ति व सीताशुद्धी करून येऊन अतिनम्रतेनें हात जोडून लंकेतील वृत्त रामास निवेदन करीत आहे, अशी मारुतीची मूर्ति आहे. अशा प्रकारच्या मूर्ति तेथें फार सुंदर आहेत. तुंगभद्रेच्या पैलतीरीं मध्वाचार्यांचे मतांतील स्वामींच्या नव समाधि आहेत. त्यांस नववृंदावनें ह्मणतात. त्यांचे दर्शनार्थ बहुत लोक जातात. गांवापासून सरासरी पाउण कोसाचे अंतरावर श्रीरंगाचें स्थान आहे. त्यास गविरंगनाथ ह्मणजे गुहेंतील रंगनाथ असें

माल्यवान् पर्वत

नववृंदावन

श्री

म्हणतात. व या ठिकाणीं फार दूर पर्यंत गुहा आहे. तींत प्रकाश घे ऊन जावें लागतें. तेथें देव आहेत, ते लिंगच असून समीप श्रीदेवी, भूदेवी अशा दोन मूर्ति आहेत. तेथून समीप वालीभांडार म्हणजे वा लीचा जामदारखाना आहे त्यांत असंख्य द्रव्य आहे असें म्हणतात. परंतु गुहेंत शिरून तें घेण्यास कोणाचे धैर्य होत नाहीं. पूर्वी कोणीं मनुष्यानीं तें घेण्याविषयीं यत्न केला. परंतु त्या स्थलीं जातांच ते सर्व मरण पावले असें सांगतात. गांवांत श्रीरंगाचें स्थान आहे. दे-वाचें मंदिर फार चांगलें असून देवास तेथील राजाकडून सहाहजा रांची सालीना नेमणूक आहे. प्रतिवर्षी वैशाखांत आगमोक्त रीतीनें नव दिवस देवाचा उत्सव होतो. प्रत्यहीं वाहन मिरवून शेवटीं रथो त्सव बहुत चांगला होतो. या उत्सवा करितांच राजाकडून पांच हजार रुपयांची वेळीच नेमणूक आहे.

कंपलीगांव कूर्मक्षेत्र.

आनीगोंदीपासून आठ कोसांवर तुंगभद्रातीरीं कंपली म्हणोन एक मोठा गांव आहे. त्यास कूर्मक्षेत्र म्हणतात. हा गांव शहराप्रमाणें आहे. तेथें जिनगर जातीचे कारागीर चांगले आहेत. हल्लीं नरसिंहपूर क्षेत्रीं देवापुढी लांकडी सभामंडपांत दोन्ही बाजूस सोनेरी वगैरे रंगाचीं जीं फार देखणी शिवपंच्यायतन व पट्टाभीरामपंच्यायतनदशावतारगरुडहनुमानादि लांकडी चित्रें स्थापन केलेले आहेत. तीं विंचुरसंस्थानांतील आश्रीत कृष्णाच्यार्य बिन भीमाचार्य गंजी-हाळकर यांचे विद्यमानें तेथील उत्तम कारागिरापासून तयार होऊन आलेलीं आहेत. आनीगोंदीचे आसमंतात गंगावती, कमलापूर, न्हस, पेंठ वगैरे गांवें आहेत.

---

टीप १ हल्लीं नरसिंहपुर येथे देवापुढील सभामंडपांत दोन्ही बाजूस सोनेरी वगैरे रंगाची व फार दर्शनीय व सुंदर अशीं शिवपंचायतन, पट्टाभिरामपचायतन, दशावतार, गरुड, हनुमंत, इत्यादिकांचीं लांकडी चित्रें बसविलीं आहेत. तीं विंचुरसंस्थानांतील आश्रित कृष्णाचार्य बीन भीमाचार्य गंजीहाळकर यांचे विद्यमानें तेथील उत्तम कारागीराकडून तयार होऊन आलेलीं आहेत.

वर लिहिलेलीं स्थळें व शिवाय आणखी पाहण्यासारखीं स्थळें होतीं, तीं सर्व रघुनाथराव यांनीं पाहून पुढें वैशाखमासीं श्रीरंगाचा रथोत्सव पाहिला. नंतर कपिलाश्रमीं चातुर्मास्य राहून कांहीं भगवत्सेवा करावी, असें त्याचे मनांत आलें. तेव्हां कपिलाश्रमाची जागा बेमरामत होती ती त्यांनीं स्वतांचे राहाण्याकरितां चांगली दुरुस्त केली. व तिच्या जवळच चिंतामणिचा आश्रम आहे, ती जागा मंडळीस राहण्याकरितां नेमिली. याप्रमाणें योजना करून ते कपिलाश्रमीं राहिले. त्यांनीं आश्रमासमोर उत्तम तुळसीचा बाग केला. चातुर्मास्यांत प्रत्यहीं प्रातःकालीं तुंगभद्रेचें स्नान करून नक्तव्रत पूर्वक शिवषडक्षर मंत्राचा जप करून त्यांनीं त्याचें पुरश्चरण करण्यास प्रारंभ केला. प्रतिदिवशीं पंपासरोवरांतील कमलें आणवून त्यांनीं तीं प्रदोषपूजेसमयीं देवास अर्पण करण्याचा क्रम चालविला. तसेंच ते चातुर्मास्यांतील प्रतिद्वादशीस ब्राह्मणभोजन करूं लागले. त्या क्षेत्रीं स्मार्त, मध्व, व रामानुज या तीन्ही मतांचे ब्राह्मण पुष्कळ असल्यामुळें एकेक मताचे ब्राह्मण एकेक द्वादशीस भोजनास घालण्याचा पाठ ठेविला. त्यांत ज्या दिवशीं रामानुजमताचे ब्राह्मण भोजनास बोलावण्याची पाळी येई, त्या दिवशीं ते आपले घरचीं भांडीं आणून स्वतंत्र स्वयंपाक करून जेवीत. याप्रमाणें चातुर्मास्यभर संतत क्रम चालला.

कपिलाश्रमीं चातुर्मास्य वास.

रघुनाथराव यांचा तेथें मुक्काम होता. तों पर्यंत आनीगोंदी येथील तिरुमल नामक राजाकडून त्यांची हरएक प्रकारची बरदास्त राहिली. राजाचे कारभारी निमाप्पा व रंगराज असे दोघे होते, ते हमेष रघुनाथराव यांचे बिऱ्हाडी येऊन त्यांचा शोध समाचार घेत. रघुनाथराव हेही कारण परत्वें राजाचे भेटीस जात असत. राजाचे परिवारांतील मंडळी व राजाचे चिरंजीव वीरव्यंकटपतिराज यांसी रघुनाथराव यांचा अत्यंत स्नेह झाला. रघुनाथराव यांस दसऱ्याचा सण तेथेंच पडला. ते दिवशीं राजाचे चिरंजीव, व त्यांचा परिवार, व उभयतां

कारभारी यांस रघुनाथराव यांनीं भोजनास बोलावून राजपुत्रास व कारभारी यांस पोषाक दिले.

अशा प्रकारें साहा महिनेपर्यंत किष्किंधाक्षेत्रीं रघुनाथराव यांचा मुक्काम झाला. या कारणानें त्या गांवांतील सभ्य गृहस्थ व राजाकडील सभ्य मंडळी, शिवाय आसपासचे गांवांतील बहुतेक लोक यांचा परिचय झाल्यामुळें आपण विंचुरासच आहोंत असें त्यांचे मनांत वाटूं लागले.

त्र्यंबकेश्वरीं रथ करण्याचें काम सुरू केलें होतें, त्या रथाची सर्व तयारी होऊन कार्तिकी पौर्णिमेस देवास रथार्पण करून रथोत्सव करण्याचा निश्चय ठरल्यामुळें रघुनाथराव यांनीं तेथून निघण्याची तयारी करून राजाचा निरोप घेतला. तेव्हां राजानें त्यांस पोषाक दिला. आणि आपले शिपाई वगैरे खटला बरोबर देऊन मोठ्या आदरसन्मानानें त्यानें त्यांची रवानगी केली! याचप्रमाणें रघुनाथराव यांची पत्नी सौभाग्यवती जानकीबाई यांस राणीसाहेबानीं शालजोडी वगैरे वस्त्रें देऊन निरोप दिला! नंतर तेथून चार कोसांवर आसमंतांत पर्वत असून मध्यें नृसिंहाचें फार जागृत स्थान आहे, त्यास तिकडील लोक गंडीनृसिंह असें ह्मणतात, त्याचें दर्शन करून रघुनाथराव हे हंपीस आले. त्या वर्षी आश्विनी पौर्णिमेस ग्रहण होतें. तें पर्व त्या क्षेत्रीं झाल्यावर त्यांनीं तेथील मुख्य मठांतील स्वामीस भिक्षा केली. नंतर ते विरूपाक्षेश्वराचा निरोप घेऊन रथोत्सवार्थ त्र्यंबकेश्वरीं येण्याकरितां चालते झाले. तेव्हां त्यांस दिवाळी मार्गांतच पडली. पुढें क्रमानें सोलापुरापर्यंत येऊन कार्तिकीपौर्णिमा समीप आल्यामुळें सर्व गाड्या वगैरे खटला पायमार्गें रवाना करून ते स्वतां आगगाडीमार्गें डिकसाळ स्टेशनास उतरले. मग तेथून पांच कोंस सिद्धटेंक ह्मणोन स्थान आहे, तेथें ते पाय रस्त्यानें गेले.

गंडीनृसिंह.

सिद्धटेंक.

या स्थलीं भीमानदी असून अष्टविनायकांतील एके गणपतीचें मोठें प्रसिद्ध स्थान आहे. या क्षेत्रीं रघुनाथराव यांचा तीन दिवस

मुक्काम होता. देवापुढें गोपाळराव मैराळबडोदकर यांनीं सभामंडप बांधिला आहे. या क्षेत्राहून समीप तीन कोसांवर आर्वी ह्मणोन गांव आहे, त्याचे समीप मुद्गल ऋषींचा आश्रम आहे; तेथें रघुनाथराव हे गेले. तेथें भीमातीरीं मोठा पार आहे, त्यावर फार जुना अश्वत्थ वृक्ष आहे. तसा मोठा अश्वत्थ कोठेंही पाहण्यांत येत नाहीं असें सांगतात! त्या अश्वत्थाचे खालचे खोडाचा परीघ शंभर हाताहून कमी नसावा असें ह्मणतात. पारावर मोठा वृक्ष आहे भोंवतालीं धर्मशाला आहेत. या स्थलीं कित्येक लोक येऊन नवसाच्या मुंजी लावितात. तेथें सेवेकरी लोक फार असतात. या ठिकाणीं देवता कायती अश्वत्थच आहे. येथें भोरकर सचीव यांजकडून नेहमीं अनुष्ठान असतें. येथून रघुनाथराव हे पायमार्गें दौंड स्टेशनावर आले तेथून पुढें आगगाडीमार्गें कार्तिक शुद्ध एकादशीस नासिकास येऊन तेथून क्षेत्र त्र्यंबक येथें पौर्णिमेकरितां जाऊन दाखल झाले ! आर्वीगांव. मुद्गलाश्रम. अश्वत्थवृक्ष. नासिक त्र्यंबक.

तेव्हां विंचूर येथून रघुनाथराव यांची मातोश्री व बंधु कृष्णराव, शिवाय बहुत मंडळी रथोत्सवास आली होती. कार्तिक शुद्ध चतुर्दशीस विधिपूर्वक रथसंस्कार करून रघुनाथराव यांनीं पौर्णिमेस देवाची महापूजा केली; आणि देवास रथ समर्पण केला. ते दिवशीं तिसरेप्रहरीं रथोत्सवाचा प्रथमारंभ झाला! ते वर्षीं शुद्ध द्वादशीपासून त्र्यंबक येथें पावसाची एकसारखी झड बसली होती! परंतु रथोत्सवाचे समयीं ईश्वर कृपेनें पर्जन्य उघडून उत्सव यथास्थितपणें झाला! या रथोत्सवास आरंभ शके १७८७ सालीं कार्तिक शुद्ध पौर्णिमेस जाला. याप्रमाणें प्रतिवर्षीं रथोत्सव होण्यास्तव रघुनाथराव यांनीं आपला इनाम गांव विंचूर येथील जमीन बिघे ५२३ याचा आकार रुपये ६१८ बिन हरकत उत्पन्न होतील, अशी देवास दान देऊन तिची सनद करून दिली! आणि वार्षिक उत्सव कसे प्रकारें व्हावयाचा त्याचा नियम करून खर्चाचा बेहेडा, व उत्सवक्रमाचें टिपण त्र्यंबक येथील संस्थानचे कारभारी नारायणराव काशीनाथजोगळे- रथोत्सवाचा प्रारंभ

कर यांजकडेस देऊन हा रथोत्सव सतत चालेल अशी तजवीज केली! त्याप्रमाणें हल्लीं तो उत्सव प्रतिवर्षी होत आहे. याप्रमाणें त्र्यंबक क्षेत्रींचा रथोत्सव झाल्यावर श्रीनरसिंहपुरक्षेत्रीं नरसिंहाचे मंदिराचा जीर्णोद्धार करण्याचें काम सुरू होतें. तें शके १७८७ सालीं कार्तिक वद्य पंचमीस पूर्णतेस गेलें. ते दिवशीं मंदिरांत दोन शिलालेख स्थापन केले, त्यांतून एक संस्कृत पद्यात्मक व दुसरा त्याचेंच मराठी भाषांतर रूपात्मक आहे.

या नंतर नरसिंहाचे मंदिराचा जीर्णोद्धाराचा उत्सर्ग करण्याकरितां रघुनाथराव हे त्र्यंबकाहून परभारे क्षेत्र नृसिंहपुर येथें गेले. ते

---

टीप ॥ संस्कृत शिलालेख ॥

॥ नानामंडलभूमिपालमुकुटप्रोत्कीर्णरत्नस्फुरत्कांत्यायच्चरणौतरो नमृदुलौनीराजितौप्रत्यह ॥ यद्धीत्याप्रपलायितारिपुगणाःशोध्याइतीवद्रुतंयत्कीर्तिश्चदिगंतराण्युपगताविद्विरह्यासह ॥ १ ॥ तस्यासन्नरवरशाहुराजनाम्नःसद्बुद्धिप्रसरविराजिमंत्रिणोष्टौ ॥ तन्मध्येद्विजमणिबाजिरायशर्मातत्सूनुःसमजनिबालनामधेयः ॥ २ ॥ सेनापतिःसमभवत्किलतस्यशौर्यचातुर्ययोःप्रकटनात्पःतितेवनाच्च ॥ दाणीत्युपाह्वयधरःशिवशर्मसूनुःश्रीविठ्ठलाभिधउदारमतिर्द्विजेंद्रः॥ ३॥ तेनेभस्वर १६७८ रसभूशकेमुदायःप्रासादोरविनृहरेःसमर्पितःप्राक ॥ तंदृष्ट्वाशिथिलतरांहितज्जपुत्रात्पौत्रोभूत्स्वरघुनाथनामधेयः ॥ ४ ॥ नुःनंतंव्यतनोच्चवीरनृहरेःपादाब्जयोरर्पणाज्जीर्णोद्धारफलंयथोक्तममुनाप्राप्नोतुतत्कारकः ॥ कर्तुर्वंशसमुद्भवाश्चपुरुषाःकीर्त्यायुरारोग्यतोलक्ष्म्याब्रह्मविदाचिरायसखिनोनंदंतुसद्वासनाः ॥ ५॥ ॥

---

## मराठी सिलालेख.

सार्वभौम राजधानी सातारा येथील अधिकारी शाहूराजाचे मुख्य प्रधान ब्राम्हण बाळाजीबाजीराव यांचे सेनापति प्रथम पुरुष दाणी विठ्ठल वशिंदत्र उमदेतल्पुलुक बहादर यांनीं शके १६७८ धातानाम संवत्सरे चैत्र शुद्ध १ दिवशीं नीराभीमरथीं संगमांत नूतन मंदिराची पूर्णता करून प्रल्हादकृत नृसिंहमूर्ति सिंहासनारूढ केली. सांप्रत त्या देवालयाचा जीर्णोद्धार संपादकापासून पंचम पुरुष रघुनाथराव विठ्ठल यांनीं शके १७८७ कार्तिक शुद्ध ५ रोजीं पूर्ण करविला. येणे करून सर्वोत्तम श्रीलक्ष्मी नृसिंह सुप्रसन्न होवोत.

थें शके १७८७ सालीं मार्गशीर्ष वद्य दशमीस उत्सर्ग करून देवाची महापूजा व क्षेत्रसमाराधना केली. या उत्सर्गाचा प्रतिवर्षी वाढदिवस ह्मणोन उत्सव व्हावयाकरितां रघुनाथराव ह्यांनीं स्वतंत्र नेमणूक करून दिली. त्याप्रमाणें तो उत्सव प्रतिवर्षी होत असतो. मार्गशीर्ष वद्य नवमीस उत्सवास आरंभ होऊन दशमीस समाराधना होते, आणि द्वादशीस उत्सवाची पूर्णता होते, असा क्रम चालू आहे! नरसिंहपूर येथील जीर्णोद्धाराचा उत्सर्ग.

यापमाणें नरसिंहपुर येथील उत्सर्ग संबंधीं कृत्य आटोपल्यावर रघुनाथराव हे शके १७८७चे पौषमासीं विंचूर येथें येऊन त्यांनीं या वेळीं केलेल्या यात्रेचे सांगते करितां ब्राह्मणभोजन वगैरे करून त्या कृत्याची परिपूर्णता केली!

याप्रमाणें श्रीमंत रघुनाथराव ऊर्फ अण्णासाहेब विंचूरकर यांनीं मध्यदेश व दक्षिणेकडील कांहीं प्रदेश एथील तीर्थयात्रा केल्या, त्यांचा वृत्तांत येथें समाप्त झाला असे.

---

तीर्थयात्रा प्रबंधाचा
दुसरा भाग समाप्त.

---

## दक्षिणेकडील प्रदेशांतील तीर्थयात्रा.

---o---

श्रीमंतरघुनाथराव विंचूरकर यांनीं हिंदुस्थानाच्या उत्तरभागांतील तीर्थयात्रा केल्या, त्यांचा वृत्तांत आम्ही पहिल्या भागांत लिहिला. त्यानंतर त्यांनीं मध्यदेश ह्मणजे महाराष्ट्रदेश आणि दक्षिणेकडेस कर्णाटकांत हंपीविरूपाक्षापर्यंत तीर्थयात्रा केल्या, त्यांचा वृत्तांत आह्मी दुसऱ्या भागांत लिहिला. आतां त्यांनीं हांपीविरूपाक्षाच्या पलीकडे दक्षिणप्रांतीं ज्या तीर्थयात्रा केल्या त्यांचा वृत्तांत या तिसऱ्या भागांत लिहितों.

कार्तिकी पूर्णिमेस कृत्तिकानक्षत्राचा योग आल्यास त्या दिवसीं कार्तिकस्वामीचे दर्शनाचें मोठें फल सांगीतलें आहे. कृत्तिकानक्षत्र असून आणखी शिवयोगाचा योग असला तर दर्शनाचें त्याहूनही विशेष फल वर्णिलें आहे. असा कृत्तिकानक्षत्र आणि शिवयोग यांचा योग शके १७९६ या वर्षीं कार्तिकी पूर्णिमेस आला होता. ह्मणून कार्तिकस्वामीचें दर्शन करून बनेलतर पुढें जाऊन रामेश्वराचें दर्शन आणि सेतूचें स्नान करावें असा रघुनाथराव यांचे मनांत विचार येऊन त्याप्रमाणें ते त्या वर्षीं कार्त्तिक शुद्ध द्वितीयेस सुमुहूर्तावर विंचूर येथून निघून आगगाडीचे मार्गानें पत्नी सौभाग्यवती जानकीबाई यासहवर्तमान चालते झाले. या यात्रेच्या वेळीं आगगाडी बहुत ठिकाणीं चालू झाली होती ह्मणून जीं तीर्थें

विंचुराहून प्रयाण.

---

टीप १ श्लोक ॥ कार्तिक्यांकृत्तिकायोगेयःकुर्यात्स्वामिदर्शनं ॥ सप्तजन्मभवेद्विप्रोधनाढ्योवेदपारगः॥ १ ॥कार्तिक्यांकृत्तिकायोगेशिवयोगेविशेषतः ॥ शिवस्यतनयंदृष्ट्वापुनर्जन्मनविद्यते॥ २ ॥ भावार्थ —कृत्तिकानक्षत्र युक्त जी कार्तिकी पूर्णिमा तिच्याठायीं जो कोणी कार्तिकस्वामीचें दर्शन घेईल तो सप्तजन्मपर्यंत धनवान् व वेदपारंगत असा ब्राह्मण होईल. ॥ १ ॥ कृत्तिकानक्षत्र आणि शिवयोग या दोहोंचा योग ज्या कार्तिकीपूर्णिमेस असेल त्या पूर्णिमेस जो कार्तिकस्वामीचे दर्शन करील त्याला पुन्हा जन्म प्राप्त होणार नाहीं.

व देवस्थानें आगगाडीचे रस्त्यास लागून होतीं त्यांची यात्रा त्यांनीं आगगाडीनेंच केली. व जीं आगगाडीसोडून दूर होतीं त्यांची यात्रा पायरस्त्यानेंच केली. या वर्षी कार्तिकस्वामीचे दर्शनार्थ दक्षिणेंतील बहुत यात्रा निघाली होती.

कार्तिकस्वामीचें स्थान कर्णाटकप्रांतीं आहे. आणि कर्णाटकाकडेस जो आगगाडाचा रस्ता जातो तो अक्कलकोटाच्या जवळून जातो ह्मणून मागील यात्रेच्या प्रसंगीं जरी तथील स्वामीचें दर्शन रघुनाथराव यांनीं मुद्दाम जाऊन घेतलें होतें, तथापि प्रस्तुत प्रसंगींही इतके जवळून जाणें होत आहे, त्यापेक्षां त्या अवतारी सिद्धपुरुषाचें दर्शन घेऊन मग पुढें कार्तिकस्वामीस जावें असा रघुनाथराव यांचे मनांत विचार येऊन त्याप्रमाणें ते अक्कलकोटापासून तीन कोसांवर कडपूगांव ह्मणून आगगाडीचें एक स्टेशन आहे, त्या स्टेशनावर ते स्वामीचे दर्शन घेण्याकरितां उतरलें. कडपस्टेशन.

त्या समयीं अक्कलकोटकर राजा अज्ञान दशेंत होता, ह्मणून त्याचे जे कारभारी होते त्यांनीं रघुनाथराव यांस अर्धकोस पर्यंत सामोरें येऊन बगीच्यांत भेटीकरितां जागा तयार केली होती, तेथें मोठ्या सत्कारानें नेलें. तेथें परस्पर भेटी झाल्या नंतर सर्व मंडळीं गावांत गेली. त्या समयीं स्वामी हे राजवाड्यांत होते ह्मणून रघुनाथराव यांनीं प्रथम तेथें जाऊन त्यांचें दर्शन घेतलें. स्वामीचें दर्शन झाल्या नंतर रघुनाथराव हे तेथील राजाचे भेटीस गेले. तेव्हां तेथें पानसुपारीचा उत्तम समारंभ केला होता. या पानसुपारीच्या प्रसंगीं रघुनाथराव यांस देण्याकरितां वस्त्रें वगैरे पोषाक आणवून राजानें त्याचा स्वीकार करण्याविषयीं आग्रह केला. परंतु या पूर्वी येणें झालें होतें, तेव्हां परस्परें मेजवान्या होऊन शिष्टाचार झालाच होता, सबब त्याचा स्वीकार न करितां रघुनाथराव यांनीं स्वामींचा निरोप घेऊन परत स्टेशनावर येऊन तेथून आगगाडीमार्गे ते पुढें चालते झाले. अक्कलकोट-

कलबुर्गे. मार्गांत पहिल्यानें कलबुर्गे शहर लागतें. हें काकतीय वंशांतील राजाचें राजधानीचें शहर होय. या काकतीय वंशांत प्रतापरुद्र या नांवाचा एक राजा झाला. तो बहुत प्रतापी व दानशूर होता. त्यानें हिंदुस्थानांत कांहीं काल सार्वभौम राज्य केलें असें म्हणतात.

शाहाबाद. पुढें रघुनाथराव यांस शाहाबाद शहर लागलें तें शहरही मोठें आहे. तेथून मार्गांत कृष्णानदी लागते. त्या स्थळीं मुक्कामास जागेची अमर्दी गैरसोय होती, परंतु तीर्थसंबंधानें रघुनाथराव यांस तेथें मुक्काम करणें भाग झालें. त्या ठिकाणीं कृष्णेस आगगाडी करितां मोठा पूल बांधिला आहे, त्या पुलाच्या आश्रयानेंच बहुतेक यात्रा उतरली होती. त्या स्थलीं तीर्थ संबंधीं क्षौरश्राद्धादि विधि करून दुसरे दिवशीं ते तेथून चालते झाले.

गदवाली. गुत्ती. ताडपत्री. कडपा, शहरे तेथून पुढें मद्रासपर्यंत मार्गांत गदवाली, गुत्ती, ताडपत्री, कडपा वगैरे मोठालीं शहरें लागलीं. त्याचप्रमाणें पापघ्नी, चित्रा, बाहुदा, पिना, किनी, उत्तरपिनाकिनी वगैरे पुराणप्रसिद्ध नद्या व क्षेत्रें लागलीं. त्या शहरांची व प्रांतांची व नद्यांची व क्षेत्रांची माहिती रघुनाथराव यांस मिळाली नाहीं. जेथें मुद्दाम मुक्काम करून त्यांनीं क्षेत्रसंबंधीं यात्रा केली, तेथील थोडी थोडी माहिती त्यांस मिळाली, तीच आह्मी वाचणारा करितां लिहिली आहे.

बल्लारी. रघुनाथराव हे आगगाडीमार्गें बल्लारीस येऊन तेथें त्यांनीं मुक्काम केला. तें शहर फार मोठें आहे. तेथें कुमारस्वामी या नांवाचे मोठे सधन गृहस्थ आहेत. रघुनाथराव हे पूर्वीं ह्यांनीं येथें राहिले होते, त्या वेळीं त्यांचा या गृहस्थाशीं परिचय झाला होता. त्यामुळें त्यांनीं या शहरीं असतां रघुनाथराव यांचा सर्व प्रकारें बंदोबस्त ठेऊन

---

टीप गर्ज[illegible]दति[illegible]कारु[illegible]णयत्रकाचित्कालो ॥
क्षितपा[illegible]दानसमयेनै[illegible]यविधत्ते[illegible] ॥ पश्चात्पांडुरता[illegible] ॥
तिल[illegible]घुलाप्यांतभूयस्तत:श्री[illegible]कातिवीरद्र[illegible]तदी, ॥
[illegible]त्कियान्मारिदः ॥ १ ॥

शहरांतील पाहण्यासारख्या ज्या वस्तु होत्या, त्या सर्व त्यांस दाखविल्या, आणि आपले घरीं भोजनास नेलें. बल्लारी येथें प्राचीन किल्ला आहे. त्यांत व शहरांत इंग्रेजीअंमल आहे. तेथून स्वामीकार्तिकाकडेस पंधरा कोस आगगाडीची सडक नसल्यामुळें बैलाच्यागाड्या, व घोडीं करून रघुनाथराव हे क्रमानें सोंडुरानजिक पावकोसावर शिवपूर ह्मणोन स्थान आहे, तेथें जाऊन उतरले.

सोंडुरगांव.

सोंडुर या गांवाच्या चहूंकडून पर्वत असून तें त्यांच्या मध्यभागीं आहे. गांवची वस्ती मध्यम शहरा एवढी आहे. या गांवीं कर्नाटक चालीची तांब्यापितळेची भांडीं चांगली होतात. ह्या पर्वतांतील प्रदेशांत अंमल सोंडूरकर घोरपड्यांचा आहे. त्यांस तेथील उत्पन्न सरासरी पाऊण लक्षापर्यंत आहे. त्या पर्वतास लोहाचल अशी संज्ञा आहे. तेथें लोखंड उत्पन्न होतें. लोखंड उत्पन्न करण्याचे कारखाने पर्वतांत ठिकठिकाणीं चालू आहेत. पर्वतावर झाडें पुष्कळ आहेत. त्यांत विशेषें करून साग व वेळू बहुत आहेत. मुधोळकर घोरपडे व सोंडुरकर घोरपडे हे मुळचे एकच आहेत, त्यांचाच एक पुरुष मुधोळास व एक पुरुष सोंडुरास राहिला. कृत्तिकानक्षत्राचा योग ज्या वर्षी येतो, त्या वर्षी कार्तिकी पौर्णिमेस कर दिल्यावांचून स्वामीकार्तिकाचें दर्शन होत नाहीं! या कराचें उत्पन्नही सोंडुरकर घोरपडे यांजकडेसच जमा होतें! ज्या सालीं यात्रा फार असते, त्या सालीं कमकसर पंचवीस हजार रुपयांपर्यंत उत्पन्न होतें असें ह्मणतात! तेथील देवाचा व देवासन्निध अन्नसत्र आहे, त्याचा खर्च सोंडुरकर घोरपडे यांजकडून चालतो. मुख्य दौलतीचा अधिकारी या वेळेस जो होता त्यास दोन सापत्न कनिष्ठ बंधु होते. मुख्य अधिकारी अल्पवयी असून लोकरीतीस गैरवाकब असल्यामुळें संस्थानचा बंदोबस्त त्या वेळीं इंग्रजसरकाराकडे असून त्या सरकारांतून व्यवस्था पाहण्यास एक इंग्रज कामगार नेमला होता! त्यास पांचशें रुपये पगार सोंडुरकरास द्यावा लागत होता!

लोहाचल पर्वत

सोंडुरापासून कार्तिकस्वामी तीन कोस आहे. तेथें पर्वत चढावा लागतो म्हणून बैलगाड्या चालत नाहीं. ओझ्यास व बसण्यास बैल व घोडीं करून यात्रेकरास जावें लागतें. त्या पर्वतावर स्त्रिया जात नाहीं या करितां रघुनाथराव यांनीं आपले कुटुंबास सोंडुर येथें ठेऊन आपण देवदर्शनास गेले. मार्गांत एक शिवस्थान लागतें. त्या देवापुढें शिवतीर्थ आहे. त्याचें वंदन व देवाचें दर्शन करून पुढें जाण्याचा क्रम आहे. त्या प्रमाणें करून रघुनाथराव हे पर्वतावर गेले. आनीगोंदी येथील राजास रघुनाथराव यांचे येण्याविषयीं पूर्वीं सूचना लिहिली गेली होती तिजवरून त्यानें त्यांस राहण्याकरितां पर्वतावर अगास्तितीर्थासन्निध मंडप घालवून आसमंतांत तंबू देविले होते. तेथें रघुनाथराव यांचा मुक्काम झाला. त्या वर्षीं यात्रा फार जमल्यामुळें पर्वतावर खुले जागीं देखील ठिकठिकाणीं लोक उतरले होते.

कार्तिक स्वामी

स्वामीकार्तिकाचें दर्शन कृत्तिकायोग आहे तों पर्यंत सर्वांस झालें पाहिजे, या साठीं बंदोबस्त राखण्याकरितां खुद्द घोरपडे आले होते. परंतु व्हावा तसा बंदोबस्त न झाल्यामुळें फार अव्यवस्था झाली असें सांगतात! कितिएकांस कराचा पैसा देऊनही कृत्तिकायोगीं दर्शन न होतां मोठा त्रास झाला व दाटींत एक दोन मनुष्यें जायां देखिल झाली असें ऐकण्यांत आहे!

रघुनाथराव यांनीं कृत्तिकायोगांत देवाचें दर्शन व पूजा या बद्दल उक्तें देण्याचें ठरवून मागील दोन घटका रात्रीं अगास्तितीर्थीं स्नान करून बरोबरील मंडळीसह स्वामीचें दर्शन करून पूजा केली. तेव्हां देवास पोषाक वगैरे दिले. नंतर पुन्हां तिसरे प्रहरीं मंडळीसह दर्शन घेतलें. यात्रेकरांपैकीं कोणी अशक्त व गरीब असल्यामुळें ज्यास दर्शन झाले नाहीं, त्यांस रघनाथराव यांनीं दर्शन करविलें!

कृत्तिकायोगांत दर्शनाचा व पूजेचा विधि आहे तो असाः—प्रथम अगस्तितीर्थीं स्नान करून स्वामीची पूजा करावी. ते समयीं

कुशपुष्पें ( दर्भाचीं फुलें ) देवास वाहावीं. पलाशदंड, मृगचर्म, कौ-पीन, [ लंगोटी ] कमंडलु हीं देवास अर्पण करावीं. जे मामाभाचे अ सतील त्यांस विशेष विधि असा आहे कीं, मामानें भाच्यास वस्त्रें अलंकार देऊन त्याची पूजा करावी. नंतर उभयतांनीं देवास प्रदक्षि णा वाद्यघोष करीत घालावी.

स्वामीकार्तिकाची मूर्ति काळे पाषाणाचीच पण फार अपूर्व आ हे, तिला मुख एकच आहे. खालीं क्रौंच पक्षी असून मूर्ति उभी बा रा वर्षाचे मुला इतकी उंच आहे. मूर्तीवर बाल्यावस्था दिसते. म-ध्य भागीं स्वामीचें मंदीर असून उजवे बाजूस शिवमंदिर व डावे बाजूस पार्वतीचे मंदिर आहे. लोहाचल पर्वतावर स्वामीची स्थानें आहेत तीं अशीः—कपटस्वामी, मयूरस्वामी, गुप्तस्वामी, कार्तिकस्वा मी, हीं चार व या शिवाय दोन, अशीं सहा स्थानें आहेत. कांहीं स्थ ळें पर्वतावर अतिबिकट ठिकाणीं असल्यामुळें सर्वांचें दर्शन स्वस्थते शिवाय होत नाहीं. या ठिकाणीं स्वामीकार्तिक येऊन राहिले त्या विषयीं कथा आहे, ती अशीः—

एकेसमयीं कैलास पर्वती पार्वतीचे अंकावर स्वामीकार्तिक बसले अ सतां ती बोलली, " बाळा, तुला आतां स्त्री करावयाची आहे. " त्या कालीं स्वामींनीं तिला विचारिलें. " आई स्त्री कशी असते? " पार्वतीनें उत्तर दिलें, " बाळा मजसारखीच असते! " हें ऐकतांच स्वामी बोलि ले कीं, " आई, तुझ्यासारखी स्त्री आहे, तर आजपासून सर्व स्त्रीया मला तुझ्यासारख्याच आहेत. मी आतां लग्न करणार नाहीं! " नंतर पा र्वतीनें लग्न करण्याविषयीं बहुत आग्रह केला. तो न ऐकतां ते कै-लासपर्वत सोडून लोहाचल पर्वतावर येऊन राहिले. त्याच्या मागून पार्वती आली. आणि पुत्रप्रेमानें मोहित होऊन बोलिली कीं, "अ रे मुला, तुला मीं आपले स्तनांतील दुग्ध पाजिलें, डोळयांत काजळ घातलें, हें सर्व विसरून असा कसारे निष्ठुर झालास? " हें ऐकून स्वामींनीं जें दुग्ध पान केलें होतें, तें ओकून टाकिलें! काजळ घात

लें होतें, तें काढून टाकिले! आणि ते पार्वतीस बोलिले कीं, "आतां तुझें मीं कांहीं लागत नाहीं! तूं येथून जा!" असें बोलून "या पुढें जी स्त्री माझें दर्शन घेईल, ती सप्तजन्म विधवा होईल" असा त्यांनीं शाप दिला! हें पार्वतीनें ऐकून पुत्राचें मुख न पाहतां पुत्रस्नेहानें बद्ध होत्साती तेथें जवळच वास करिती झाली. शंकरही केला साहून येऊन पुत्रासन्निध राहाते झाले, अशी पुराणांत कथा आहे.

ज्या स्थलीं दुध ओकून टाकिलें तेथें पांढरें भस्म झालें. तें बहुत मृदु असतें. त्याचें धारण करण्याविषयीं क्षेत्रमाहात्म्यांत फार प्रशंसा लिहिली आहे. त्या प्रांतीं सर्व स्मार्त ब्राह्मण तेंच भस्म धारण करितात. दूध ओकण्याच्या जागीं मोठालीं पेवें केलेलीं आहेत. त्या पेवांत दगड टाकितात. तीन वर्षांनीं कृत्तिकायोगांत यात्रा जमते, तेव्हां तीं पेवें उकरतात. त्या काळीं आंत टाकिलेल्या दगडांचें भस्म होऊन मोठाले खडे निघतात. हल्लीं बायका तें भस्म लहान मुलांस कांहीं रोगावर औषध म्हणून देतात! काजळ काढून टाकिलें तेथें खाण असून तींत काळे खडे आहेत. येथें अगस्तिऋषि आले, त्या विषयीं कथा आहे ती अशीः—

मेरुपर्वतासी स्पर्धा करून विंध्याचल वृद्धीस पावला; त्यास नम्र करण्याकरितां सर्व देवांचे प्रार्थनें वरून अगस्तिऋषी लोपामुद्रानामें स्त्रीसह काशीक्षेत्राहून विंध्याचलासमीप आले. त्या काळीं विंध्यपर्वतानें त्या ऋषीस दंडवत् नमस्कार घातला. तेव्हां ऋषींनीं त्यास आज्ञा केली कीं, मी परत येईपर्यंत तूं असाच रहा. नंतर क्रमानें लोहाचल पर्वती येऊन त्यांनीं स्वामींचें दर्शन केलें. आणि त्यास काशीवियोगापासून मनास जो ताप झाला होता, त्याचें निवेदन केलें. तें ऐकून स्वामींनीं त्यांचे दुःख शमनार्थ या क्षेत्राचा महिमा त्यास सविस्तर सांगीतला. तो समग्र श्रवण झाल्यावर काशीविरहापासून झालेले दुःखाचा त्याग करून अगस्तिऋषि हे लोहाचल पर्वतीं स्वामीसन्निध वास करिते झाले.

अगस्तीनें स्नानाकरितां तीर्थ निर्माण केलें, त्यास अगस्तितीर्थ म्हणतात. तेथें तीर्थासन्निध अगस्तीश्वर व लोपामुद्रेश्वर अशीं दोन शिवलिंगें आहेत. त्या क्षेत्रीं मुख्य तीर्थ हेंच आहे. येथें क्षौर, श्राद्ध वगैरे कांहीं करूं नये, असा नियम आहे. नुसती हजामत करणें झाली तरी देखिल क्षेत्रमर्यादे बाहेर केली पाहिजे.

शेवटील बाजीरावसाहेबपेशवे हे दोन वेळ या क्षेत्रीं कृत्तिकायोगीं स्वामीदर्शनास गेले होते. त्यांत दुसरे वेळीं अगस्तितीर्थीं स्नान करून ते संध्या करीत बसले असतां पर्वत शिखरावरून एक मोठा दगड ढसळून बाजीरावसाहेब बसले होते त्यांचे सन्निध येऊन पडला. तेव्हां तेथून ते लागलेच कूच करून चालते झाले. त्यावर पुन्हां ते त्या क्षेत्रीं गेले नाहींत. तो दगड अगस्तितीर्थावर अद्यापि पडला आहे. त्यास बाजीरावाचा धोंडा असें ह्मणतात.

कार्तिक वद्य प्रतिपदेस रघुनाथराव यांनीं तेथें ब्राह्मणभोजन केलें. व द्वितियेस निघण्याची तयारी केली. तेव्हां सोंडूरचे मुख्य अधिकारी भेटीस येऊन त्यांनीं त्यास आपले तंबुंत पानसुपारीस नेले. नंतर पानसुपारी घेऊन रघुनाथराव पर्वत उतरून खालीं आले. ते पायमार्गानें बल्लारीस येऊन पुढें आगगाडीमार्गें त्रिपतिक्षेत्रीं व्यंकटेशाचे दर्शनास चालते झाले.

ते आगगाडी मार्गें क्रमानें गोविंदराजपट्टणास आले. तेथून एक कोसावर कपिलधारा नामक तीर्थ आहे, तेथें ते गेले. त्या स्थलीं पर्वतावरून मोठी धार पडते, तीस कपिलधारा असें ह्मणतात. तेथें एके बाजूनें पर्वत असून तीन बाजूनीं फार मोठें कुंड बांधून त्यास पायऱ्या केल्या आहेत. आसमंतांत दगडी मंडप व धर्मशाला आहेत. तेथें वेणुगोपाळ, लक्ष्मीनारायण या देवांचीं उत्तम मंदिरें आहेत. वरचे बाजूंस पर्वतालगत कपिलेश्वरनामें महादेवाचें स्थान आहे. त्या तीर्थीं क्षौर, व श्राद्ध करावें लागतें. त्याप्रमाणें तेथील विधि करून रघुनाथराव हे शेषाचल पर्वताची चढण फार असल्यामुळें स्वनां आ

गोविंदराजपट्टण. कपिलधारा तीर्थ.

वेणुगोपाळ लक्ष्मीनारायण कपिलेश्वर

शेषाचल पर्वत.

पण व आपले कुटुंब या उभयतां करितां डोल्या करून मागील दोन घटका रात्रीं कपिलधारेहून निघाले तेथून अर्ध कोसावर पर्वताची चढण लागते. तेथून मार्गांत ठिकठिकाणीं दरवाजे आहेत. व त्याव र गोपुरें केलेली आहेत. कोठें पायऱ्याही आहेत. मध्यें मध्यें देव-स्थानें आहेत. त्यांत कोठें व्यंकटेशाच्या पादुका, कोठें गरुड, कोठें मारुती, अशीं स्थानें आहेत. मार्गांत जागोजाग भिकारी लोक बहु त असल्यामुळें त्रास होतो! या पाहाडाची चढण फार आहे ह्मणून रघुनाथराव यांस पर्वतावर जाऊन पोहोंचण्यास सकाळचे अकरा वाजले. पर्वतावर मुख्य तीर्थ स्वामीपुष्करणी ह्मणोन आहे. त्या ती-र्थाचे जवळ एक्या ब्राह्मणाचे घरीं रघुनाथराव जाऊन उतरले. म ग तीर्थस्नान करून त्यांनीं मुख्य क्षेत्रपति वराह आहे, त्याचें दर्शन करून व्यंकटेशाचें दर्शन घेतलें. ते दिवशीं त्यास जेवण्यास अस्त मान झाला.

व्यंकटेशदेव

व्यंकटेशाची मूर्ति मोठी भव्य व पुरुषप्रमाण उंचीची उभी आ हे. मूर्तीस चार भुजा आहेत. हातांत शंख, चक्र ही आयुधें आहेत. दंडास सर्पाचीं बाहुभुषणें आहेत देवाचे पूजक रामानुज असल्या-मुळें ते दुसरे कोणाचा स्पर्श होऊं देत नाहींत. देवास मंगलारती क रणें, अगर तुलसी वाहणें अशा प्रकारची सेवा करणें असेल तर कां हीं नियम केले आहेत त्याप्रमाणें पैसा दिला ह्मणजे तें कृत्य पुजारी करितात. गरुडवाहनोत्सव, ब्रह्मोत्सव, निमंत्रणोत्सव असे उत्सवाचे अनेक प्रकार आहेत. त्या उत्सवसंबंधीं द्रव्यसंखेचा नियम केला आ हे, तितकें द्रव्य दिलें ह्मणजे ते उत्सव होतात. याचप्रमाणें नैवेद्याचे नियम आहेत. त्यांत मनोहर ह्मणोन एक पक्वान्न आहे. तो नैवेद्य देवास फार प्रिय आहे. निमंत्रणोत्सव म्हणजे सकाळपासून रात्रीं शयन होईपर्यंत देवासंबंधीं जें कृत्य होतें, त्यास जितका पैसा नि-यमित आहे, तितका दिला ह्मणजे पैसा देणाराचे नांवानें ते दिवशीं जो उत्सव होतो तो. रघुनाथराव यांनीं निमंत्रणोत्सव केला. त्याच

प्रमाणें दर्शन घेणें झालें तरी द्रव्य द्यावें लागतें. प्रतिशुक्रवारीं देवास स्नान घालितात. त्या समयीं ज्यास दर्शन घेणें असेल, त्यास एक रुपया द्यावा लागतो. त्या समयीं जें दर्शन होतें, त्यास विश्वरुपदर्शन म्हणतात. या दिवशीं ( शुक्रवारीं ) देवाचे स्नानाचा खर्च फार आहे. या देवास उत्पन्न बहुत असून खर्चही फार आहे. आश्विन मासीं नवरात्रांत आगमोक्त रीतीनें उत्सव होतो. त्यांत देवाचें नित्य नवीन वाहन निघतें. शेवटीं रथोत्सव होतो. या ठिकाणीं रथ फार मोठा असून चांगला आहे. हा रथ महादजीशिंदे यांणीं चंदन काष्टाचा करून दिला असें सांगतात. नवरात्रांत फार मोठी यात्रा भरते. या [ शेषाचल ] पर्वतावर जोडा घालूं नये, असा नियम आहे. युरोपियन लोक या पर्वतावर बिलकुल जात नाहींत. शिताफळी, पोपनीस, रक्तचंदन अशा प्रकारचीं झाडें या पर्वतावर फार आहेत. व माकडेंही पुष्कळ आहेत. ज्यांचे अंडांत कस्तूरी उत्पन्न होते, तीं जवारी मांजरें व रानडुकरें हीं जनावरें एथें बहुत आहेत. पर्वतावरील हवा चांगली नाहीं रोगी आहे. पूर्वी हत्तीरामबाबा या नांवाचा बैरागी झाला तो मोठा सिद्धपुरुष होता. त्याचा मठ त्या ठिकाणीं आहे. त्या मठांत बहुत उत्कृष्ट शालिग्राम आहेत. त्या मठांतील गादीवर शिष्य परंपरेनें जो बसतो, त्याजकडे त्या मठांतील देवस्थान संबंधीं सर्व अधिकार असतो. या देवाचें उत्पन्न त्याजकडे जमा होऊन त्याचे मार्फत सर्व खर्च होतो. त्याचे कारकून शिपाई वगैरे मिळून लवाजमा फार आहे.

व्यंकटेशाचें मंदिर बहुत कालापूर्वी आकाश राजा झाला, त्यानें बांधिलें. त्या मंदिराचे परिघांत आणखी बहुत देवता आहेत. देवाचे सन्निध आकाश राजानें यात्रा उतरण्याकारितां फार मोठा दगडी मंडप बांधिला आहे. रघुनाथराव तेथें गेले, ते वेळेस त्या मंडपाची दुरूस्ती देवाचे संस्थानांतून चालली होती. देवासन्निध सभामंडपांत बहुत मोठी घंटा आहे. ती आकाश राजानेंच बांधिली असें म्हणता

त. देवालय तांब्याचे पत्र्यावर सोन्याचा मुलामा देऊन त्यांनीं सगळें मढविलें आहे. त्यास फार काल झाल्यामुळें त्यावरचा बहुतेक मुलामा हल्लीं उडून गेला आहे.

रघुनाथराव यांचा शेषाचलपर्वतावर चार दिवस मुक्काम होता. तेथून पांचवे दिवशीं ते खालीं गोविंदराजपट्टणास आले. येथें उतरण्यास मोठाल्या जागा बांधिल्या आहेत, त्यास छत्रे म्हणतात. या ठिकाणीं गोविंदराजाचें मंदिर बहुत मोठें आहे. मंदिरांत मोठा शेष आहे, त्यावर विष्णूंनीं शयन केलें आहे. लक्ष्मी पादसंवाहन करीत असून ब्रम्हदेव नाभिस्थानीं आहेत. ही शेशषायीची मूर्ति फार मोठी आहे. त्या निजलेल्या मूर्तीची लांबी पांच हाताहून जास्त दिसते. देवालयाचे परिघांत आणखी लक्ष्मी वगैरे देवता पुष्कळ आहेत.

गोविंदराज पट्टण.

शेषशायी

गोविंदराजपट्टण हा गांव मध्यम आहे. येथील बाजार मात्र चांगला असून त्या देशचीं भांडीं, रक्तचंदनाच्याबाहुल्या, तांब्यापितळेच्या व्यंकटेशाच्यामूर्ति, व्यंकटेशाच्या तसबिरा, हे पदार्थ तेथें मिळतात.

तेथून रघुनाथराव हे आगगाडीमार्गें त्रिचनी गांवीं सुब्रह्मण्य नामें देवाचे दर्शनार्थ गेले.

त्रिचनी गांव अगदीं लहान आहे, तेथें गांवाजवळच एक उत्तम तीर्थ बांधिलेलें आहे. त्याचे आसमंतता यात्रेस उतरण्या करितां जागा चांगल्या बांधिलेल्या आहेत. प्रत्येक जागेंत दोन चौक असून सर्व सोयी आहेत. अशा जागा सुमारें पांच सहा आहेत. तेथून पर्वतचढावा लागतो, पर्वतास पायऱ्या आहेत. चढाव अगदीं थोडा आहे. पर्वतावर मैदान असून तेथें देवाचें मंदिर फार मोठें आहे. त्यांत सुब्रह्मण्यांची मूर्ति बहुत अपूर्व आहे. मंदिराचे परिघांत कार्तिकस्वामीच्या स्त्रिया वल्ली व देवसेना यांचीं स्थानें आहेत. वीरबाहू, विशाखइत्यादिक स्वामीचे जे सहा बंधु, त्यांच्याही मूर्ति तेथें आहेत. प

त्रिचनीगांव.

सुब्रह्मण्यदेव

टीप १ हें कार्तिकस्वामीचेंच स्थान आहे. त्यास सुब्रह्मण्य अशी संज्ञा आहे.

र्वतावर कल्हार सरोवर म्हणोन तीर्थ आहे. या तीर्थी स्नान वर्ज्य आहे. आचमन व वंदन इतकेंच करावें ह्मणजे झालें. प्रथम त्या तीर्थाचे वंदन व आचमन करून मग देवदर्शन केलें पाहिजे.

हें देवस्थान अतिरमणीय व फार स्वच्छ आहे. पर्वतावर देवाचा रथ आहे. कार्तिकस्वामीस स्त्रिया वगैरे परिवार नाहीं ही गोष्ट प्रसिद्ध आहे, तेव्हां या स्थळीं त्यांच्या स्त्रियांची स्थानें आहेत हें कसें? असें मनांत येतें. परंतु स्कंदपुराणाचे संहिता ह्मणून सहा भाग आहेत, त्या पैकीं शंकरसंहिता नामक भागांत कथा आहे ती अशीः—

शूरपद्मा, तारकाक्ष, तारकासुर व क्रौंच असे चार दैत्य बंधु होते. त्यांनीं अतिशयित तप केलें तेव्हां ब्रह्मदेवापासून त्यांस बहुत वर मिळाले. मग त्यांनीं सर्व देवांचा पराजय करून त्रैलोक्याचें राज्य बहुत वर्षें केलें. शेवटीं सर्व देव त्या दैत्यांच्या अतिशयित पीडेमुळें त्रस्त होऊन ब्रह्मदेवास शरण गेले. तेव्हां ब्रह्मदेवानें त्यांस सांगितलें कीं, शंकरास जो पुत्र होईल, तोच यांचा नाश करील त्याजवांचून या दैत्यांचा नाश करण्यास कोणीही समर्थ नाहीं. असें ब्रम्हदेव बोलिले त्या काळीं पार्वतीसहवर्तमान शंकर हे क्रीडासक्त होते. त्या क्रीडेचा विराम झाल्यावांचून पुत्रोत्पत्ति होणार नाहीं. असें जाणून नारदऋषीचे विचारें अग्नीस कैलासपर्वतीं पाठविलें. त्या काळीं या परकीय पुरुषास पाहून पार्वती लज्जित होत्साती दूर झाली. त्या समयीं शंकराचें वीर्य पतन पावलें. तें शंकरानीं अग्नीस प्राशन करण्यास सांगिलें. तेव्हां अग्नीनें तें प्राशनाकरितां हातांत घेतलें असतां त्यांतील सहा बिंदू भूमीवर पडले. त्या बिंदूंपासून वीरबाहु, विशाख, इत्यादि सहा पुत्र उत्पन्न झाले. पुढें अग्नीस ते वीर्य सहन होईना म्हणून त्यानें तें सांहाजणी कार्त्तिका होत्या त्यांच्या गर्भांत स्थापन केले. शेवटीं त्यांसही तें सहन होईना, या करितां त्यांनीं गंगेंत त्याचा त्याग केला. गंगेनें तें वीर्य बहुतकाळ धारण करून शरवणांत [बरूचेबेटांत] त्याचा त्याग केला. तेथें त्या पासून विलक्षण पु-

उत्पन्न झाला ! त्या काळीं कृत्तिकांस हा आपला पुत्र असे वाटून त्या त्यास स्तनपान करविण्यास प्रवृत्त झाल्या त्या सहा असल्या मुळें त्या पुत्रास सहा मुखें झालीं. नंतर नारदापासून हें वृत्त पार्वतीस कळल्यावर तिनें कैलासपर्वतीं त्या पुत्रास आणिलें. त्या काळीं वीर्यबिंदूपासून उत्पन्न झालेले वीरबाहु इत्यादि जे साहा पुत्र त्यांस ही कैलासपर्वतीं आणून स्वामीकार्तिका बरोबर त्यांचे संगोपन केलें. पुढें कांहीं कालानें विष्णूस लक्ष्मीचे ठायीं कन्या झाली, तिचें नांव वल्ली. आणि इंद्रास कन्या झाली. तिचें नांव देवसेना. या उभय कन्यांचा विवाह स्वामीकार्तिक यांजबरोबर केला. पुढें कालेंकरून वीरबाहु इत्यादि सहा बंधुसहवर्तमान कार्तिकस्वामी यांनीं मोठें दारुण युद्ध करून त्यांत मोठा प्रतापी जो शूरपद्म व तारकासुर इत्यादि जे त्याचे बंधू यांचा नाश केला. नंतर स्वामीकार्तिक हे आपल्या स्त्रीया वगैरे परिवारासहित ह्या स्थलीं येऊन वास करिते झाले. अशी स्वामीकार्तिक याच्या विवाहाची कथा आहे.

प्रतिकृत्तिका नक्षत्रीं हजारों लोक या देवाचे दर्शनास येतात. येथील देवाचे उपासक त्या प्रदेशीं पुष्कळ आहेत. देवास बहुत लोक नवसही करितात. स्त्रियांस त्या ठिकाणीं स्वामीकार्तिकाचे दर्शनाचा निषेध नाहीं. या देवास नेमणूक चांगली आहे. व कारकून शिपाई वगैरे लवाजमाही मोठा आहे. देवाचे पूजक स्मार्तब्राह्मण आहेत. त्या प्रदेशीं देवपुजेवर निर्वाह करणाऱ्या ब्राह्मणांच्या पंक्तीस कोणी जेवीत नाहीं. रघुनाथराव यांचा या क्षेत्रीं तीन दिवस मुक्काम होऊन चवथ्या दिवशीं ते आगगाडीमार्गें कांचीक्षेत्राकडे चालते झाले.

अर्कोण स्टेशन. मार्गांत ठिकठिकाणीं मोठाले तळाव व चिंचेचीं बनें, व ताड, सिंदी, नारळी, असे वृक्ष त्यांस आढळले. याप्रमाणें मार्ग क्रमून ते अर्कोणचे स्टेशनावर येऊन दाखल झाले. या स्टेशनापासून आगगाडीचे तीन फांटे फुटतात. त्यांत एक फांटा मद्रासेकडे जातो, व दुसरा फांटा श्रीरंगावरून रामेश्वराकडे जातो. व तिसरा फांटा कांची

स जातो, या अर्कोण स्टेशनावर रघुनाथराव यांचा मुक्काम होऊन दुसरे दिवशीं सकाळीं निघोन प्रहर दिवसाचे सुमारास ते कांचीस जाऊन पोहोंचले. कांची प्रदेशास कांचीमंडल असें ह्मणतात हें स्थान अतिरमणीय आहे. याच्या आसमंतात नारळी व ताड बहुत असून दुसरे अनेक जातीचे वृक्ष आहेत. तेथें कोंकणासारखा भास होतो. कांचीक्षेत्र सप्तमोक्षपुऱ्यांतील एक पुरी आहे. या क्षेत्रीं बहुत देवता व बहुत तीर्थें आहेत. कांचीक्षेत्राचे दोन विभाग आहेत, एक शिवकांची व दुसरा विष्णुकांची. रघुनाथराव हे प्रथम शिवकांची या विभागांत जाऊन उतरले. या विभागांत मुख्य तीर्थ ह्मटले ह्मणजे एक मोठा तलाव आहे, त्यास सर्वतीर्थ असें ह्मणतात. हें तीर्थ चारीबाजूंनीं उत्तम बांधिलेलें असून त्यास चहूंफेर पायऱ्या केल्या आहेत. तीर्थासन्निध क्षेत्रमाहात्म्यांत वर्णिलेलीं प्रसिद्ध शिवस्थानें आहेत. या क्षेत्रांतील मुख्य देवता एकांबरेश्वरनामें आहे. देवाचें मंदिर अतिशयित मोठें आहे. त्याचे परिघांत बहुत देवता व तीर्थें आहेत. आंतील सर्व देवतांचीं दर्शनें घेणें तर दीड कोस फिरावें लागतें! एकंदर देवालयाचा परीघ तीन कोस असेल असा अजमास आहे. देवालयांतच प्रत्येक वारांच्या देवता व तीर्थें आहेत. त्या त्या वारीं तेथें तेथें स्नानाचें व त्या त्या देवता दर्शनाचें फल सांगितलें आहे. महाद्वार फार मोठें आहे. त्यावर गोपुरही अपूर्व आहे. फक्त महाद्वाराची उंची अकरा हात आहे देऊळ बांधण्यास किती खर्च झाला असेल याचें अनुमान होत नाहीं. एकांबरेश्वराचें लिंग फार मोठें नाहीं देवाचे पुजारी स्मार्त ब्राम्हण आहेत. त्यांखेरीज देवास दुसरे कोणाचा स्पर्श होऊं देत नाहींत! महापुजा करणें तर ठरविलेलें द्रव्य द्यावें, ह्मणजे देवाचे पुजारी पूजा करितात. रुद्राभिषेक वगैरे प्रकार सर्व पुज्याऱ्या कडूनच होतो. येथें जसा रथ आहे, तसा त्या प्रांतीं दुसरे ठिकाणीं नाहीं. रथोत्सव आगमोक्त क्रमानें नऊ दिवस होतो, तेव्हां त्या प्रांतांतील बहुत यात्रा जमते.

कांचीमंडल.

शिवकांची

सर्वतीर्थ.

एकांबरेश्वर देव

कामाक्षीदेवी

तेथून कांहीं अंतरावर कामाक्षी नामें देवीचें मंदिर आहे. हें मंदिरही फार मोठें असून त्यांत दुसऱ्या देवता पुष्कळ आहेत. कामाक्षी देवीची मूर्ति मोठीं भव्य आहे, तिचें ध्यान पद्मासन घालून बसल्याप्रमाणें आहे. मूर्तीवर अलंकार घातले ह्मणजे ती फारच सुंदर दिसते. व ही कोणी सुस्वरूप स्त्रीच प्रत्यक्ष बसली आहे काय! असा भास होतो. तिचे समीप एक मंडप आहे. त्यांत भोगमूर्ति आहे. ती मूर्तीही फार अपूर्व आहे. तिजवर अलंकारही बहुत घातलेले असतात. कामाक्षीचे पूजक ब्राह्मण आहेत. या स्थलीं पुजका खेरीज देवीस इतरांचा स्पर्श होऊ देत नाहींत. या पुजकांसच पूजा व नैवेद्य या बद्दल द्रव्य दिलें ह्मणजे तें काम ते व्यवस्थित करितात. देवळाचे परिघांत एक मंदिर आहे. त्यांत शंकराचार्य यांची मूर्ति स्थापन केली आहे या मूर्तीचे हातांत दंड वगैरे सन्याशाचीं सर्व चिन्हें असल्यामुळें ती फार चमत्कारिक दिसते! या शिवकांचींत सर्व ब्राह्मण स्मार्त व शिवपूजक आहेत. बहुतेक तैलंगी व द्राविड असल्यामुळें चिंच, भात, आणि तिखट हे पदार्थ फार खातात. तेथील बहुतेक लोकांस खरजेचा उपद्रव असल्याचें दिसून येतें. ब्राह्मणांमध्यें वेदांत, न्याय, व व्याकरण हीं शास्त्रें ह्मणणारे पुष्कळ आहेत. त्यांतही वेद व पूर्वमीमांसा म्हणणारे फार निघतील. धर्मराजभट चांदीकर यांनीं तप करून देवी प्रसन्न केली आणि भोजन समयीं जो माझें स्मरण करील त्यास मक्षिकेची पीडा होऊं नये असा तिजपासून वर मागून घेतला तें हेंच स्थान होय.

शिवकांची पासून विष्णूकांची पर्यंत दोन कोस पावेतों दुतर्फा एकसारखा बाजार आहे. अशा प्रकारची एक सारखी दुतर्फा वस्ती असल्यामुळें चमत्कार दिसतो. शिवकांचीचा व विष्णूकांचीचा भेद समजण्याकरितां दोहींच्या मध्यें एक मोठा रथ आहे. त्याचे आलीकडे शिवकांची व पलीकडे विष्णुकांची असें समजावें. बाजारांत दुतर्फा सारखीं नारळीचीं झाडें असून घरें चांगली सुशोभित आहे

त. या बाजारांत सर्व पदार्थांचा व्यापार चालतो. त्या देशांतील का पड भांडीं वगैरे तेथें चांगलीं मिळतात.

शिवकांचीस जें मुख्य तीर्थ आहे, त्यास सर्वतीर्थ ह्मणतात हें पूर्वीच सांगिलें आहे.त्या क्षेत्रीं क्षौर करून तीर्थसंबंधानें श्राद्ध करावें लागतें, त्याप्रमाणें तीर्थ संबंधीं क्षौरश्राद्धादि विधि आणि देवाचें पूजन व ब्राह्मणभोजन वगैरे करून रघुनाथराव हे तेथून विष्णुकांचीस गेले.

विष्णुकांचीस मुख्य देवता वरदराज नामें आहे. हें स्थान लहान टेंकडीवर आहे. मध्यभागीं टेंकडी असून तिच्या आसमंतातभागीं गांवची वस्ति आहे या टेंकडीस हस्तिगिरि असें म्हणतात. तेथें थोड्या पायऱ्या चढून वर जावें लागतें. देवाचे मंदिर बहुत मोठें असून आसमंतांत दगडी मंडप आहेत. देवाची मूर्ति मोठी भव्य एक पुरूष उंचीची उभी आहे. देवाचे पूजक रामानुज आहेत. बाहेर एक्या मंडपांत छताचेजागीं आढ्यास मोठी सोन्याची पल्ली (पाल) करून बसाविली आहे. त्या पल्लीस स्पर्श केला तर पल्लीपतनापासून जें अशुभ होणार तें होत नाहीं. देवाची पूजा व नैवेद्य या बद्दल पूजक लोकांस रोख पैसा दिला म्हणजे ते सर्व यथास्थित करितात.

विष्णुकांची

हस्तिगिरी पर्वत.

विष्णूकांचीस मुख्य तीर्थ वेगवतीनदी आहे. या नदीचा उगम समीप असल्यामुळें तींत विशेष उदक नसतें. पर्जन्य कालीं मात्र प्रवाह असतो. या क्षेत्रीं क्षौर वगैरे विधि कोणी करीत नाहीं.

या विष्णुक्षेत्रीं सर्व ब्राम्हण रामानुज आहेत. ते बहुतेक सधन

---

टीप. १ सप्तपुर्‍यांत साडेतीन शिवपुऱ्या व साडेतीन विष्णुपुऱ्या असा विभाग आढळतो; ह्मणजे काशी, अवंतिका, मायापुरी, हीं तीन शिवक्षेत्रें आहेत. आणि मथुरा, अयोध्या, द्वारका, हीं तीन विष्णुक्षेत्रें आहेत. अर्धी कांची शिव क्षेत्र व अर्धी विष्णुक्षेत्र या प्रमाणे कांची क्षेत्राचा विभाग केला आहे. याच प्रमाणें चार धामें आहेत त्यांतही दोन शिवधामें व दोन विष्णुधामें असा प्रकार आढळतो. म्हणजे उत्तरेस केदारेश्वर, व दक्षिणेस रामेश्वर हीं शिवधामें ह्मणवितात. तसेंच पूर्वेस जगन्नाथ, व पश्चिमेस द्वारका हीं विष्णुधामें म्हणवितात.

दिसतात. हे सर्व तैत्तीरीय शाखेचे आहेत. त्यांत स्वशाखा म्हणणारे असे थोडेच निघतील. बहुतेक ब्राम्हण रामानुजाचार्यांनीं केलेले प्रबंध वेदतुल्य मानून त्यांचेच अध्ययन करितात. त्यांच्यांत नैयायिक म्हणजे न्यायशास्त्र म्हणणारे बहुत आहेत. त्यांत स्वकीय वेदांतांत आह्मी पारंगत आहोंत. असा अभिमान बाळगून दुसऱ्या मतवाल्यांशीं विवाद करण्यास उत्सुक असे विद्वान् निदान दाहा तरी असतील. आगमोक्त रीतीनें प्रति वर्षीं देवाचा उत्सव होतो तेव्हां रथ काढितात. त्या रथाच्या उत्सवास बहुत यात्रा येते, उभय क्षेत्रींही रथोत्सव होतो, त्यामुळें दोहीं क्षेत्रांतील उत्सव चढोवढीने चांगले होतात. या प्रांतांतील बहुतेक सावकार लोक रामानुजमताचे आहेत, यामुळें या संस्थानास त्या लोकांची मदत फार आहे.

उभय क्षेत्रीं प्रतिमहिन्यांत एक दोन उत्सव असतात, त्यांचे दिवस नेमिलेले आहेत. त्या दिवशीं भोगमूर्तीस बाहेर काढून मिरवितात, तेव्हां मोठा चमत्कार दिसतो. अशा प्रकारचे उत्सव या आपल्या महाराष्ट्रदेशांत होत नाहींत. देवांचे वाहनापुढें दहा वीस वेश्या एकदम नृत्य करितात. त्यावेळीं अनेक प्रकारचीं देशी वाद्यें वाजत असून त्या वेश्या द्राविड भाषेंत प्रबंध म्हणतात. देवास अनेक प्रकारच्या पुष्पमाला करून तऱ्हेतऱ्हेचे फुलडोल करितात. हे प्रकार फार चांगले पाहण्यासारखे असतात.

विष्णुकांची क्षेत्रामध्यें जो कर्तव्य विधि तो करून रघुनाथराव हे अर्कोण स्टेशनावर परत आले. तेथून पुढें आगगाडीमार्गानें मद्रासेस गेले.

मद्रासशहर पार्थसारथि स्थान. दक्षिणवृंदावन

मद्रासशहर हें पार्थसारथी नामक देवाचें स्थान आहे. त्याचे समीप केरविणी नामक तीर्थ प्रसिद्ध आहे. रघुनाथराव यांनीं या क्षेत्राचें माहात्म्य मुद्दाम आणून पाहिलें या स्थलास दक्षिणवृंदावन अशी संज्ञा आहे. पार्थसारथी याचें मंदिर मोठें आहे. मंदिरांत कृष्ण, बलराम, सात्यकी, उद्धव, व अक्रूर यांच्या मूर्ति आहेत. देवाचे पूजक

रामानुज असल्यामुळें दर्शन घेण्याची मर्यादा केलेली आहे, त्या म र्यादेचे आंत दुसऱ्यास येऊंदेत नाहींत! तेथून दीड कोसावर शहरां तच कपालेश्वर नामें महादेवाचें स्थान आहे. त्या देवाचे आसपास सर्व स्मार्त ब्राह्मण राहतात. या दक्षिण वृंदावन क्षेत्रीं मुख्य देवता पार्थसारथी व कपालेश्वर महादेव या आहेत. मुख्य तीर्थे रत्नाकरस मुद्र, कैरवणीतीर्थ, कपालेश्वरासन्निध कपालमोचनतीर्थ अशीं आहेत.

मद्रास हें शहर मुंबईचे खालोखाल आहे. येथें गव्हरनरकौंसिल असतें. या शहरीं समुद्राचे कांठीं गलबत लावण्यास धक्याची सोय चांगली नाहीं. चिन्नापट्टण ह्मणोन त्या शहराचा एक भाग आहे, तेथें एक भुईकिला आहे. त्यांत सोलजर लोक वगैरे असतात. सर टीमाधवराव हल्लीं बडोद्यास मुख्य दिवाण आहेत त्यांचे चुलत बंधु रघुनाथराव हे तेवेळेस तेथील डेपुटीमाजिस्त्रेट होते. दुसरे चुलत बंधु हरिहरराव हेही त्यावेळेस तेथेंच होते. या उभयतांनीं रघुनाथराव हे तेथें असतां त्यांचा उत्तम प्रकारें बंदोबस्त ठेऊन त्या शहरीं पाहण्यासारख्या ज्या जागा व वस्तु होत्या, त्या सर्व त्यांनीं बरोबर फिरून दाखविल्या. त्या ठिकाणीं जसें पदार्थसंग्रहालय आहे, तसें मुंबई व कलकत्ता एथेंही नाहीं असें ह्मणतात. तेथून रघुनाथराव यांचे मनांत रामेश्वराकडे जाण्याचें फार होतें, परंतु कांहीं घरगुती जरूरीचे कामामुळें त्यांचे परत येणें होऊन त्यावेळेस तिकडे जाणें तसेंच राहिलें! आल्या रस्त्यानें आगगाडीमार्गे केमचे स्टेशनापर्यंत येऊन तेथून आठकोस नरसिंहपूर राहतें तेथें जाऊन रघुनाथराव यांनीं कुलस्वामी श्रीनरसिंह याचें दर्शन घेतलें. नंतर विंचुरास येऊन तेथे केलेल्या यात्रेच्या सांगते करितां यथाविधि ब्राम्हणभोजनादिक कृत्य करून त्यावेळच्या यात्रेची संपूर्णता केली.

तिसरा भाग समाप्त.

# सूचना.

ही यात्रा झाल्यावर पुढें थोडेच दिवसांनीं मुंबई सन्निध वज्रेश्वरी म्हणून एक देवीचें स्थान आहे, तेथें रघुनाथराव यांनीं जाऊन त्या देवीचें दर्शन घेतलें. नंतर त्यांचे विधिपूर्वक समुद्रस्नान झालें नव्हतें, म्हणून ते समुद्रस्नानोद्देशानें मुंबईस गेले, आणि तें कृत्य त्यांनीं यथासांग केलें. तेथून महाबळेश्वरीं कृष्णेचें उत्पत्तिस्थान आहे. तेथें जाऊन त्या देवाचें दर्शन करून ते वैराज म्हणजे वांई या क्षेत्रीं गेले आणि त्या प्रांतांतील सातारा व त्या नजीकचीं स्थानें पाहून त्यांनीं तेथील तीर्थस्नानें व देवता दर्शन केलें त्या योगें रघुनाथराव यांस धन्यता वाटली. ही तीर्थे व क्षेत्रें आणि इतर कर्तव्य जो यात्राविधि तो इकडील बहुतेक लोकांस अवगत असे त्यामुळें त्याबद्दलची विशेष माहिती आम्ही येथें लिहिली नाहीं.

---

सत्कृत्यें आणि सत्पुरुषांचीं दर्शनें इत्यादि.

सत्कुलांत उत्पन्न झालेल्या थोर आणि विख्यात अशा गृहस्थांनीं परोपकारार्थ लोकहितार्चीं आणि स्तुत्य अशीं जीं उदार कृत्यें केलीं असतात, तीं पुढील प्रजेस कित्ता होण्यास्तव लिहून ठेवणें हें अत्यंत उपयोगी आणि ह्मणूनच आवश्यक होय यांत संशय नाहीं. आतां श्रीमंतरघुनाथराव विंचूरकर हे विख्यात व थोर गृहस्थ असून मोठ्या नामांकित घराण्यांत उत्पन्न झाले आहेत. त्यांचे हातून त्यांच्या वयाच्या सतराव्यावर्षापासून तों त्यांचें वय सत्तावन वर्षांचें होईपर्यंत ह्मणजे सुमारें चाळीस वर्षांत त्यांचे हातून धर्मसंबंधाचीं व परोपकारसंबंधाचीं मिळून सत्कृत्यें बहुत घडलीं, तीं पुढील लोकांस कित्ता घेण्याजोगीं आहेत. म्हणून त्यांचें या चौथ्याभागांत निरूपण करितों. तसेंच कितीएक विद्वान्, भगवद्भक्त,व साधु,अशा सत्पुरुषांचीं त्यांनीं दर्शनें घेतलीं आणि त्यांपैकीं कितीएकांची त्यांनीं सेवा केली तोही वृत्तांत वाचकांस कळावा ह्मणून त्याचें येथें निवेदन करितों. हे दोन विषय मिळून त्यांचीं दोन प्रकरणें आह्मी कल्पिलीं आहेत.

## प्रकरण पहिलें.

### सत्कृत्यें.

शके १७६३ या वर्षीं रघुनाथराव यांनीं अग्न्याधान केलें, ह्मणजे अग्निहोत्र घेतलें. तेव्हां नासिक एथील राहाणार मोठे कुलीन आणि विद्वान् असून श्रौत व स्मार्तकर्मांत परम निष्णात असे बाळदीक्षितइयांटे म्हणून ब्राम्हण होते, त्यांजपासून त्यांनीं अरणीचें ग्रहण करून त्यांस त्यांनीं आध्वर्यवप्रयोग दिला. त्र्यंबक येथील प्रसिद्ध घराण्यांतील विद्वान् नारायणभट्ट पिंगळे यांस हौत्रप्रयोग दिला. नासिक येथील प्रसिद्ध घराण्यांतील विद्वान् भाऊदीक्षित पटवर्धन यांस उद्गातृत्वाचा प्रयोग दिला. आणि विंचूरसंस्थानांतील आ- अग्निहोत्र.

श्रितांपैकीं भास्करशास्त्रीजोशी वडुथकर यांस आग्निध्राचा प्रयोग दिला. व चिंतामणदीक्षित वांईकर ह्मणून उत्कृष्ट विद्वान् व श्रौतक र्मांत परम निपुण असे ब्राम्हण होते, त्यांस ब्रह्मत्व दिलें.

या प्रमाणें अध्वर्यु, होता, उद्गाता, आणि अग्नीध्र, असे चार मु ख्य ऋत्विज अग्निहोत्रकर्मास लागत असतात, त्या चार ऋत्विजां- ची उत्तम प्रकारें योजना करून रघुनाथराव यांनीं उक्तकाळीं अग्नि होत्र कर्मास प्रारंभ केला! आणि तेव्हांपासून ते आपल्या पत्नीसहव र्तमान विध्युक्तरीतीनें अग्नीची सेवा करूं लागले. पुढें त्यांनीं बहुते क काम्येष्टी, स्वर्गसत्र, चातुर्मास्यें वगैरे विकृति यथाकालीं केल्या नंतर त्यांस अग्निष्टोमादिकक्रतु करण्याची इच्छा होती, परंतु दुर्दैवा नें त्यांची पत्नी (सौभाग्यवती काशीबाई) यांस अत्यल्प वयांतच देवाज्ञा झाली! त्यामुळें अग्निहोत्र विछिन्न झालें! ही गोष्ट शके १७७० या वर्षी घडली.

महायात्रा. पुढें शके १७७० पासून शके १७७३ पावेतों रघुनाथराव यां नीं उत्तराहिंदुस्थानांतील हिमालयपर्वतापर्यंत जाऊन तीर्थाटनें आणि महायात्रा केली. या कामीं त्यांनीं द्रव्याचा बहुत व्यय केला. त्या प्रमाणेंच बदरीकेदार, बदरीनारायण इत्यादिक पहाडांतील दुर्ग म स्थळींच्या यात्रा करितांना त्यांस शरीरकष्टही बहुत भोगावे लागले.

इतिहास पुराणश्रवण. महायात्रा करून आल्यावर इतिहास, व सर्व पुराणें व उपपुरा णें, यांचें श्रवण करावें अशी रघुनाथराव यांस इच्छा उत्पन्न झाली.

---

टीप १ या महायात्रेचा वृत्तांत पहिल्या भागांत विस्ताराने लिहिला आ हे. शके १७८६ यावर्षी त्यांनीं मध्यदेशांतील तीर्थयात्रा केल्या, त्यांचा वृत्तांत दुसऱ्या भागांत लिहिला आहे. आणि शके १७९६ या वर्षी त्यांनीं दक्षिणेक- डील प्रांतांतील तीर्थयात्रा केल्या, त्यांचा वृत्तांत तिसऱ्याभागांत लिहिला आहे. या प्रमाणें या तीनही तीर्थयात्रारूप कृत्यांचें निरूपण अनुक्रमें तीन भागांत पृथ- क्पृथक् केलें आहे तें तेथें पहावें.

त्यावरून त्यांनीं आपल्या संस्थानांतील आश्रित मंडळींपैकीं शंकरशास्त्रीबावा यांनीं मूळ ग्रंथ वाचीत जावा आणि दुसरे एक पुराणीक यांनीं पोथी घेऊन शुद्ध अशुद्ध पाहात जावें. याप्रमाणें योजना करून रघुनाथराव यांनीं पुराणश्रवणास आरंभ केला. प्रथमतः त्यांनीं हरिवंशासहित भारताचें श्रवण केलें. तें झाल्यावर त्यांनीं योगवाशिष्ट आणि वाल्मिकीरामायण यांचें श्रवण केलें. यानंतर त्यांनीं भागवत वगैरे दुसरीं पुराणें ऐकण्यास आरंभ केला. तेव्हां जितकीं महापुराणें व उपपुराणें शुद्ध व सुवाच्य अशीं उपलब्ध झालीं, तितकीं सर्व त्यांनीं श्रवण केलीं; जीं तशीं शुद्ध व सुवाच्य नव्हतीं तीं मुळींच वाचविलीं नाहींत.

पुराणाचें श्रवण झाल्यावर रघुनाथराव यांचे मनांत आलें का, ब्राह्मणांचें मुख्य कर्म ह्मटलें ह्मणजे समग्रवेदाध्ययन करणें हें होय. परंतु तें आपले पासून झालें नाहीं, या करितां चारी वेदांचा समग्र मूलग्रंथ तरी आपण श्रवण करावा, असें त्यांचे मनांत आल्यावरून त्यांनीं प्रथम ऋग्वेद श्रवण केला. तेव्हां संस्थानांतील उत्तम दशग्रंथी विद्वान् आश्रित हरीदादापोळ नासिककर व भाऊभटजी वांकीकर या उभयतांची त्या कामीं त्यांनीं योजना करून, भाऊभटजी यांनीं पुस्तक पहावें, व हरीदादा यांनीं पारायण करावें, अशी व्यवस्था करून त्यांनीं पाहिल्यानें ऋग्वेदश्रवणास प्रारंभ केला. त्यांत प्रथम प्रत्येक अध्यायाचा सर्वानुक्रम श्रवण करून नंतर संहिता ऐकावी असा क्रम ठेविला. अशा प्रकारें दोन महिन्यांत त्यांचें शाकलसंहिता ऐकणें समाप्त झालें. नंतर त्यांनीं पुस्तक व वक्ता व श्रोता यांची उत्तम प्रकारें पूजा करून ब्राह्मणभोजन घातले. याचक्रमानें त्यांनीं ऐतरेयब्राह्मण आरण्यकासुद्धां श्रवण केलें. नंतर आश्वलायन सूत्र श्रवण करून निघंट, अष्टाध्यायी, ज्योतिष, वगैरे दशग्रंथ श्रवण केले. पुढें निरुक्त व परिशिष्ठ आणि प्रातिशाख्य हीं श्रवण करून त्यांनीं निरीन कुनाप, प्रैषाध्याय, चरणव्यूह, हे ग्रंथ श्रवण केले. याप्रमाणें

वेदश्रवण

ऋग्वेद.

ऐतरेयब्राह्मण

श्रितांपैकीं भास्करशास्त्रीजोशी वडुथकर यांस आग्निध्राचा प्रयोग दिला. व चिंतामणदीक्षित वांईकर ह्मणून उत्कृष्ट विद्वान् व श्रौतकर्मांत परम निपुण असे ब्राम्हण होते, त्यांस ब्रह्मत्व दिलें.

या प्रमाणें अध्वर्यु, होता, उद्गाता, आणि अग्नीध्र, असे चार मुख्य ऋत्विज अग्निहोत्रकर्मास लागत असतात, त्या चार ऋत्विजांची उत्तम प्रकारें योजना करून रघुनाथराव यांनीं उक्तकाळीं अग्निहोत्र कर्मास प्रारंभ केला! आणि तेव्हांपासून ते आपल्या पत्नीसहवर्तमान विध्युक्तरीतीनें अग्नीची सेवा करूं लागले. पुढें त्यांनीं बहुतेक काम्येष्टी, स्वर्गसत्र, चातुर्मास्यें वगैरे विकृति यथाकालीं केल्या. नंतर त्यांस अग्निष्टोमादिकक्रतु करण्याची इच्छा होती, परंतु दुर्दैवानें त्यांची पत्नी (सौभाग्यवती काशीबाई) यांस अत्यल्प वयांतच देवाज्ञा झाली! त्यामुळें अग्निहोत्र विछिन्न झालें! ही गोष्ट शके १७७० या वर्षीं घडली.

महायात्रा. पुढें शके १७७० पासून शके १७७२ पावेतों रघुनाथराव यांनीं उत्तराहिंदुस्थानांतील हिमालयपर्वतापर्यंत जाऊन तीर्थाटनें आणि महायात्रा केली. या कामीं त्यांनीं द्रव्याचा बहुत व्यय केला. त्याप्रमाणेंच बदरीकेदार, बदरीनारायण इत्यादिक पहाडांतील दुर्गम स्थळींच्या यात्रा करितांना त्यांस शरीरकष्टही बहुत भोगावे लागले.

इतिहास पुराणश्रवण. महायात्रा करून आल्यावर इतिहास, व सर्व पुराणें व उपपुराणें, यांचें श्रवण करावें अशी रघुनाथराव यांस इच्छा उत्पन्न झाली.

---

टीप १ या महायात्रेचा वृत्तांत पहिल्या भागांत विस्तारानें लिहिला आहे. शके १७८६ यावर्षी त्यांनीं मध्यदेशांतील तीर्थयात्रा केल्या, त्यांचा वृत्तांत दुसऱ्या भागांत लिहिला आहे. आणि शके १७९६ या वर्षी त्यांनीं दक्षिणेकडील प्रांतांतील तीर्थयात्रा केल्या, त्यांचा वृत्तांत तिसऱ्याभागांत लिहिला आहे. या प्रमाणें या तीनही तीर्थयात्रारूप कृत्यांचें निरूपण अनुक्रमें तीन भागांत पृथक्पृथक् केलें आहे तें तेथें पहावें.

त्यावरून त्यांनीं आपल्या संस्थानांतील आश्रित मंडळींपैकीं शंकरशास्त्रीबावा यांनीं मूळ ग्रंथ वाचीत जावा आणि दुसरे एक पुराणीक यांनीं पोथी घेऊन शुद्ध अशुद्ध पाहात जावें. याप्रमाणें योजना करून रघुनाथराव यांनीं पुराणश्रवणास आरंभ केला. प्रथमतः त्यांनीं हरिवंशासहित भारताचें श्रवण केलें. तें झाल्यावर त्यांनीं योगवाशिष्ठ आणि वाल्मिकीरामायण यांचें श्रवण केलें. यानंतर त्यांनीं भागवत वगैरे दुसरीं पुराणें ऐकण्यास आरंभ केला. तेव्हां जितकीं महापुराणें व उपपुराणें शुद्ध व सुवाच्य अशीं उपलब्ध झालीं, तितकीं सर्व त्यांनीं श्रवण केलीं; जीं तशीं शुद्ध व सुवाच्य नव्हतीं तीं मुळींच वाचविलीं नाहींत.

पुराणाचें श्रवण झाल्यावर रघुनाथराव यांचे मनांत आलें कीं, ब्राह्मणाचें मुख्य कर्म ह्मटलें ह्मणजे समग्रवेदाध्ययन करणें हें होय. परंतु तें आपले पासून झालें नाहीं, या करितां चारी वेदांचा समग्र मूलग्रंथ तरी आपण श्रवण करावा, असें त्यांचे मनांत आल्यावरून त्यांनीं प्रथम ऋग्वेद श्रवण केला. तेव्हां संस्थानांतील उत्तम दशग्रंथी विद्वान् आश्रित हरीदादापोळ नासिककर व भाऊभटजी वांकीकर या उभयतांची त्या कामीं त्यांनीं योजना करून, भाऊभटजी यांनीं पुस्तक पहावें, व हरीदादा यांनीं पारायण करावें, अशी व्यवस्था करून त्यांनीं पहिल्यानें ऋग्वेदश्रवणास प्रारंभ केला. त्यांत प्रथम प्रत्येक अध्यायाचा सर्वानुक्रम श्रवण करून नंतर संहिता ऐकावी असा क्रम ठेविला. अशा प्रकारें दोन महिन्यांत त्यांचें शाकल संहिता ऐकणें समाप्त झालें. नंतर त्यांनीं पुस्तक व वक्ता व श्रोता यांची उत्तम प्रकारें पूजा करून ब्राह्मणभोजन घातलें. याचक्रमानें त्यांनीं ऐतरेयब्राह्मण आरण्यकासुद्धां श्रवण केलें. नंतर आश्वलायन सूत्र श्रवण करून निघंट, अष्टाध्यायी, ज्योतिष, वगैरे दशग्रंथ श्रवण केले. पुढें निरुक्त व परिशिष्ठ आणि प्रातिशाख्य हीं श्रवण करून त्यांनीं निर्वीत कुनाप, प्रैषाध्याय, चरणव्यूह, हे ग्रंथ श्रवण केले. याप्रमाणें

वेदश्रवण

ऋग्वेद.

ऐतरेयब्राह्मण

सांगोपांग ऋग्वेदाचे श्रवण करून त्यांनीं त्याची समाप्ति केली.

कृष्णयजुर्वेद हिरण्यकेशी-य शाखा

पुढें जेव्हां त्यांनीं कृष्णयजुर्वेद श्रवणास आरंभ केला, तेव्हां नासिकक्षेत्राहून हिरण्यकेशी शाखेचे उत्तम विद्वान् नारायणदीक्षित घोपावकर व रावजीमहाबळ असे दोघ ब्राम्हण आणून दीक्षित वक्ते व महाबळ श्रोते असी योजना करून त्यांनीं सूत्रासह समग्र हिरण्यकेशी शाखा श्रवण केली.

शुक्लयजुर्वेद वाजसनीय शाखा

वाजसनीयशाखा समग्र म्हणणारे ब्राह्मण सांप्रत कालीं फार थोडे सांपडतात. यामुळें सर्व नासिकक्षेत्रांत समग्र शाखा ह्मणणारे असे दोनच ब्राह्मण त्या समयीं निघाले, त्यांपैकीं एकाचें नांव चिंतामणदीक्षित शौचे, व दुसऱ्याचें नाव श्रीकृष्णभटगर्गे असें होतें. रघुनाथराव यांनीं त्या दोघांस आणिले आणि पूर्वील क्रमाप्रमाणेंच दीक्षित हे वक्ते, व गर्गे हे श्रोते अशी योजना करून प्रथम सर्वानुक्रमासहित संहिता व शतपथ ब्राह्मण व सूत्र, आणि मागाहून त्या शाखेचीं सर्व परिशिष्टें याप्रमाणें ती शाखा श्रवण केली.

(कृष्ण.य.) मैत्राणीय शाखा

मैत्रायणी शाखेंत अधीत असे ब्राह्मण प्रस्तुत फार थोडे आहेत. नासिकक्षेत्रीं एक विठ्ठलभट व त्यांचे सहाध्यायी दुसरे एक भटजी, हे दोनच सर्व शाखा म्हणणारे त्या कालीं निघाले. त्या दोघांस आणवून रघुनाथराव यांनीं सूत्र व परिशिष्ट या सुद्धां समग्र मैत्रायणी शाखा श्रवण केली.

(शु.य.) कण्वशाखा

सांप्रत पंढरपूर क्षेत्रीं कण्वशाखेच्या ब्राह्मणांचा बराच मोठा भरणा आहे. परंतु त्यावेळेस तेथें सर्व शाखा म्हणणारे असे दोनच ब्राह्मण आढळले. त्यांपैकीं एकाचें नांव भिकंभटमंजुल, व दुसऱ्याचें नांव पंढरीनाथ पिंपळनेरकर असें होतें. त्या उभयतांस आणवून रघुनाथराव यांनीं सर्वानुक्रम, संहिता, शतपथ ब्राम्हण, आणि परिशिष्टें हीं श्रवण केलीं. वाजसनीयशाखेचें व कण्वशाखेचें सूत्र एकच आहे. परंतु वाजसनीय शाखेचे म्हणणी पासून कण्वशाखेची म्हणणी निराळी असते. म्हणून तें सूत्र त्यांनीं कण्वशाखेचे ब्राम्हणाकडून

पुन्हां म्हणवून श्रवण केलें.

आपस्तंभ शाखेचे द्राविड ब्राम्हण साताऱ्यानजीक यवतेश्वरी फार उत्कृष्ट आहेत, असें समजल्यावरून रघुनाथराव यांनीं तेथून दोन विद्वान् ब्राम्हण आणवून पूर्वोक्त क्रमाप्रमाणें सूत्रासह समग्र आपस्तंब शाखा श्रवण केली. कृष्णयजुर्वेद आपस्तंबशाखा

या प्रमाणें यजुर्वेदांतील शाखेचे विद्वान् ब्राम्हण इतकेच उपलब्ध झाले. त्यांजपासून वर लिहिलेल्या पांच शाखा समग्र श्रवण केल्या. अशा प्रकारें त्यांनीं यजुर्वेदाचें श्रवण केलें.

सामवेदाध्ययन करणारे उत्तम ब्राम्हण भडोचे जवळ नर्मदातीरीं शुक्लतीर्थ आहे तेथें आहेत त्या क्षेत्राहून रघुनाथराव यांनीं दोन ब्राम्हण आणवून सामवेदांतील कौथुमीशाखा ही सूत्र व परिशिष्ट या सह श्रवण केली. सामवेद कौथुमीशा.

पुण्यास सामवेदांतील राणायणीयशाखा म्हणणारे असे शंकर भट द्राविड म्हणून एकटेच होते, त्यास व त्यांचे पाशीं अध्ययन केलेले विद्यार्थी नारायणभट कोल्हापूरकर म्हणून होते, त्यांस त्यांनीं आणवून राणायणी शाखा समग्र श्रवण केली. राणायणी शाखा

या प्रमाणें सामवेदांतील दोनच शाखेचे जे ब्राह्मण उपलब्ध झाले, त्यांजपासून त्यांनीं वर लिहिलेल्या दोन शाखा श्रवण करून सामवेदाची समाप्ति केली.

अथर्वणवेदी ब्राम्हण समग्र वेद ह्मणणारे त्या काळीं फार दुर्मिळ होते. वामनभटआबा ह्मणोन एक ब्राह्मण उत्तम अथर्वणवेद ह्मणणारे ग्वालेरीस होते. व दुसरे व्यकंटभट म्हणोन सांगली येथील जाहागिरदाराचे आश्रयानें होते. कृष्णातीरीं माहुलीक्षेत्रीं अथर्वण वेदी ब्राह्मणांचीं घरें फार आहेत, परंतु त्यांत त्या वेदाचें पारायण करणारे असे ब्राह्मण थोडेच होते. ह्मणून रघुनाथराव यांनीं वर लिहिलेले वामनभटआबा यांस ग्वालेरीहून व कृष्णंभट नांवाचे एक ब्राह्मणास माहुलीक्षेत्राहून आणवून अथर्वणवेदाची संहिता ब्राम्हण अथर्वणवेद

व आरण्यक व त्या वेदांत जीं बहुत उपनिषदें आहेत, तीं,व परिशि ष्टें याप्रमाणें समग्र अथर्वणवेद श्रवण केला. या वेदाच्या आणखी शाखा ह्मणणारे ब्राह्मण मिळाले नाहींत.

स्मृतिश्रवण या प्रमाणें चार वेदांचे श्रवण झाल्यानंतर ऋषिप्रणीत सर्व स्मृति श्रवण कराव्या असें रघुनाथराव यांचें मनांत आलें. मग त्यांनीं नासिक वगैरे ठिकाणांहून स्मृतींचे ग्रंथ आणविले. त्यांत कांहीं स्मृति. या प्रांतीं उपलब्ध नाहींत. ह्मणून त्यांनीं त्या स्मृतीचे ग्रंथ काशी, व बडोदें, इंदूर, ग्वालेर इत्यादि ठिकाणांहून आणविले. आणि चांगले विद्वान् शास्त्री यांजकडून प्रथम त्या सर्व स्मृती शुद्ध करविल्या. नंतर वक्ता व श्रोता यांची योजना करून त्यांचे श्रवणास उपक्रम केला. प्रत्येक स्मृतीची समाप्ति झाल्यावर पुस्तकपूजा व वक्ता व श्रोता यांची पूजा करून ब्राम्हणभोजन करावें अशा क्रमानें मनुस्मृतिस आरंभ करून सर्व स्मृतींचा मूल ग्रंथ श्रवण केला.

अशा प्रकारें रघुनाथराव यांनीं श्रुति, स्मृति, व पुराणें यांचें श्र वेदभाष्यश्र. वण केलें. नंतर त्यांचे मनांत आलें कीं, जरी आपण मूलवेद ग्रंथाचें श्रवण केलें, तरी वेदाचा अर्थ आपल्या श्रवणांत आला नाहीं, याकरितां वेदभाष्य श्रवण करावें. हा हेतू सिद्धीस नेण्याकरितां त्यांनीं बाहेरून विद्वान् ब्राम्हण आणविण्याचा उद्योग चालविला. इतक्यांत इंदूर येथें दिनकरशास्त्री खांबेटे म्हणोन एक वेदशास्त्रसंपन्न आहेत, अशी त्यांची कीर्ति ऐकून त्यांनीं त्यास इंदुराहून आणविलें. यांस वेद येत असून पूर्व व उत्तर मीमांसा आणि न्याय शास्त्र यांचे उत्तम अध्ययन आहे. व ते बहुत आचार संपन्न आहेत. कांहीं वर्षांपूर्वी पुणें मुक्कामी जगद्गुरु शंकराच्यार्य यांचे समक्ष विष्णूशास्त्री पंडित यांसीं पुनर्विवाह संबंधीं वाद झाला, त्यां वादांत हे शास्त्री पुनर्विवाह निषेध पक्षाकडून एक पंच नेमिलेले होते. या दिनकरशास्त्री यावांस वक्ते नेमिलें. आणि सदाशिवशास्त्री जोशी काठूरकर हे उत्तम वय्याकरण व सीतारामशास्त्री पटवर्धन नासिककर हे उत्तम व्यु

मन असून श्रौतकर्मांत उत्कृष्ट माहितगार, व त्र्यंबक येथील राहणार नारायणभट्ट पिंगळे हे उत्तम वेदविद्वान् व श्रौती, आणि विंचूरसंस्थानचे आश्रित भाऊभटजी वांकीकर हे उत्तम वैदिक याप्रमाणें चार ब्राह्मणांस श्रोते नेमिले. या प्रमाणें योजना करून रघुनाथराव यांनीं दिनकरशास्त्री यांचे मुखानें प्रथम सर्वानुक्रमाचें भाष्य श्रवण केलें, नंतर ऋग्वेद संहितेचे भाष्यश्रवणास आरंभ केला. प्रत्येक अष्टकाचे समाप्तीचे वेळेस पुस्तक व वक्ते श्रोते या सर्वांचें पूजन करून ब्राह्मण भोजन करावें, अशा प्रकारें रघुनाथराव यांनीं आठ अष्टक संहितेचे भाष्य श्रवण केलें. त्यानंतर त्यांनीं ब्राम्हण भाष्य श्रवण करून वर लिहिलेल्या प्रकारेंच त्याचीही समाप्ति केली. नंतर आरण्यक भाष्याचें श्रवण करून मधुपर्क पूर्वक वक्ते श्रोते वगैरे सर्व ब्राम्हणांचें पूजन करून ब्राह्मणभोजन केलें. याप्रमाणें त्यांनीं ऋग्वेदभाष्य श्रवणाची समाप्ति केली. ऋग्वेद

पुढें रघुनाथराव यांनीं यजुर्वेद भाष्य श्रवणास आरंभ केला. तेव्हां पूर्वीची सर्व मंडळी कायम असून बाळशास्त्रीबाबालेले या नांवाचे एक हिरण्यकेशीय ब्राम्हण यांची त्यांनीं त्या मंडळींत नवीन योजना केली. बाळशास्त्री यांस स्वशाखाध्ययन उत्तम असून शिवाय त्यांनीं व्याकरणशास्त्राचाही अभ्यास केला आहे. यजूर्वेदांत बहुतेक यज्ञ संबंधीं विधि असल्यामुळें विशेष माहिती करितां भाऊदीक्षित थिटे वांईकर यांस मुद्दाम विंचूर येथें आणविलें. अशी सिद्धता करून रघुनाथराव यांनीं पूर्वी लिहिलेल्या सर्व मंडळीसहवर्तमान दिनकर शास्त्री याचे मुखानें त्या वेदाची समग्र संहिता, ब्राम्हण, व आरण्यक, यांचें भाष्य श्रवण केलें. आणि त्याचे शेवटीं त्यांनीं मधुपर्कानें वक्ते व श्रोते यांचें पूजन करून ब्राम्हणभोजन केलें. आणि यजुर्वेद भाष्य श्रवणाची समाप्ति केली. यजुर्वेद

अशा प्रकारें रघुनाथराव यांनीं ऋग्वेद व यजुर्वेद या दोन्ही वेदांच्या भाष्यांचें यथास्थितपणें श्रवण केलें.

विंचूर येथें पाण्याचे हौद

काहीं वर्षांपूर्वी विंचूर येथें पाण्याची अत्यंत कमताई होती, तिजमुळें तेथील सर्व ज्ञातींचे लोकांचे फार हाल होत असत. त्या गांवांत चार पांच विहिरी होत्या, परंतु त्यांचें पाणी खारें होतें, पिण्याजोगें नव्हतें, यामुळें पिण्याचें पाणी पाव कोसावरून आणावें लागत असे. उष्ण कालीं तें खार पाणी देखिल अटून गांवाजवळच्या विहिरीही अटत असत. या कारणास्तव त्या ऋतूंत सर्व गावकऱ्यांस पाण्याकरितां एक कोस दूर जावें लागत होतें. या प्रमाणें पेशवाई अखेर पावेतों पाण्याचे बाबतींत त्या गांवची अत्यंत दुःखदायक स्थिति होती. परंतु दक्षिणेंत इंग्रजी अम्मल झाल्यावर रघुनाथराव यांचे वडील विठ्ठलरावतात्यासाहेब हे विंचूरास निरंतर राहूं लागले. तेव्हां पाण्याचे संकटापासून आपली प्रजा मोठें दुःख भोगीत आहे, असें त्यांचे नजरेस आलें. त्यावरून तीस त्या दुःखापासून मुक्त करण्याकरितां त्यांनीं आसपास पाण्याचा तपास चालविला. तेव्हां गांवचे पश्चिमेस एका विहिरीस विपुळ पाणी असतें असा त्यांस शोध लागला. तो लागतांच त्यांनीं पुष्कळ पैसा खर्च करून एक उत्तम कारागिराचे हातानें त्या विहिरीपासून आपले वाड्यांपर्यंत नळ बांधून आणविला. हें काम होत आहे तों दुर्दैवानें त्यांचा काळ जाला. यामुळें गांवात हौद वगैरे बांधण्याचें काम बहुत वर्षे पर्यंत तसेंच पडून राहिलें. तथापि त्यांचे पुत्र रघुनाथराव यांनीं वडिलांचे मागें गांवात जागोजाग निरनिराळे हौद बांधवून कैलासवासी तात्यासाहेब यांचे हेतूप्रमाणें लोकांस पाण्याचे दुःखापासून मुक्त केलें.

विंचूर येथें रथोत्सव चालू

शके १७९८ या सालीं रघुनाथराव यांनीं कृपामूर्ति यशवंतरावमहाराज यांस कांहीं महिनेपर्यंत आपले घरीं ठेऊन घेतलें. तेव्हां महाराजांनीं रघुनाथराव यांस आज्ञा केली कीं, श्रीलक्ष्मीनरसिंहा सन्निध आषाढमासीं नामसप्ताह करून त्याचे अंतीं शुद्ध एकादशीस श्रीनरसिंहाची भोगमूर्ति रथांत बसवून रथोत्सव करीत जावा. अशी आज्ञा झाल्यावरून रघुनाथराव यांनीं एक नवीन उत्तम रथ तयार

करवून तो श्रीनरसिंहदेवास अर्पण केला. आणि शके १७९९ चे आषाढ शुद्ध एकादशी या दिवशीं पहिला रथोत्सव करून तसाच तो प्रतिवर्षी करण्याचें कृत्य चालू केलें. त्याचा क्रम असा कीं आषाढ शुद्ध चतुर्थीचे दिवसीं नामसप्ताहास आरंभ करून शुद्ध एकादशीस त्याची समाप्ति करावी. आणि त्याच दिवशीं श्रीनरसिंहाची मूर्ति रथांत बसवून मोठ्या समारंभानें मिरवावी. या वार्षिक नामसप्ताहाकरितां व रथोत्सवाकरितां रघुनाथराव यांनीं एक स्वतंत्र नेमणूक करून दिली आहे. आतां प्रतिवर्षी विंचुर येथील आसमंतातभागांतील सर्व भजन करणारे संतमंडळीस बोलावणी होऊन मोठ्या थाटानें नामसप्ताहाचा उत्सव होतो. शेवटीं एकादशीस रथोत्सव होऊन द्वादशीस ब्राह्मणभोजन होतें आणि उत्सवाची समाप्ति होते. याप्रमाणें प्रतिवर्षी विंचूर येथें या उत्सवाचा क्रम चालू आहे.

पंचवटीतील रामास दसऱ्याचे स्वारीस खर्चाची नेमणूक

नासिकासन्निध पंचवटी क्षेत्रीं दसऱ्यास श्रीरामाची स्वारी सीमोल्लंघनास निघते. त्याचे खर्चाकरितां कोणाकडूनही नेमणूक नव्हती, यास्तव देवाचे पूजारी स्वतःचे खर्चानेंच सरासरी दसऱ्यास पालखीची मिरवणूक काढीत असत. आलीकडे थोडेवर्षांपूर्वी रघुनाथराव यांनीं दसऱ्याचे खर्चाबद्दल त्या देवास स्वतंत्र नेमणूक करून दिली. तेव्हांपासून प्रतिवर्षी दसऱ्याचे दिवशीं त्या नेमणूकीतील पैशानें विंचूरकरांकडून देवासमहापूजा होऊन नैवेद्य होतो. व अस्तमानचे सुमारास जेव्हां पालखी निघते, तेव्हां दारूकाम रोषनाई यांचाही खर्च त्या नेमणूकींतूनच होतो.

## त्र्यंबक क्षेत्रीं शके १७८२ साला पासून शके १८०० सालाच्या अखेरीपर्यंत रघुनाथराव यांनीं धर्मकृत्यें केलीं तीं.

——o——

शके १७८२ सालीं रघनाथराव हे त्र्यंबकक्षेत्रीं जाऊन तेथें अ

श्रीत्रिंबकेश्वरास संततधारानुष्ठान

जवळसे सात महिनेपर्यंत राहिले. आणि त्र्यंबकेश्वर महादेवावर रुद्रैकादशिनी पूर्वक संतत जलधाराभिषेकाचें आनुष्ठान चालविलें. त्यांत प्रतिप्रहरास दोन दोन ब्राह्मण या प्रमाणें रात्रंदिवस मिळून आठ प्रहरांकरितां एकंदर सोळा ब्राम्हण रुद्र ह्मणण्यास नेमिले. आणि दर प्रहरास दोन दोन ब्राम्हणांकडून अकरा छिद्रांचें अभिषेक पात्रधरवून संतत सातमहिनेपर्यंत अविच्छिन्न अभिषेक करविला. खेरीज अभिषेकपात्रांत उदक घालणारे व अभिषेकाकरितां कुशावर्ततीर्थाचें उदक आणणारे ब्राह्मण वेगळे नेमिले होते. या शिवाय प्रत्यही ब्रह्मगिरीच्या दोन प्रदक्षिणा दोन ब्राम्हणांकडून सातमहिने पर्यंत करविल्या. याचप्रमाणें कुशावर्ततीर्थासन्निध केदारेश्वर महादेव आहे, त्यावर संतत धारेचा अभिषेक श्रावणमासभर करविला. आणखी ही अनुष्ठानें ब्राह्मणांकडून बहुत करविली. व स्वतः उभयतां स्त्रीपुरुषांनीं देवाची सेवा केली. याप्रमाणें संतत धारेचीं वगैरे अनुष्ठान करून शेवटीं पुष्कळ ब्राह्मणभोजन घालून त्यांची समाप्ति केली.

नागनारायण बळीच्या धर्मशाळेचा जीर्णोद्धार

याचवर्षी त्या क्षेत्रीं नारायणनागबली करण्याची धर्मशाला पडून अगदीं निरुपयोगी झाली होती, तिचा रघुनाथराव यांनीं जीर्णोद्धार केला.

त्रिंबकेश्वर देवाल्यावर सुवर्णकळश स्थान

शके १७८३ सालीं ज्येष्ठ वद्य ९ रोजीं त्यांनीं श्रीत्र्यंबकेश्वराचे देवालयावर सोन्याच्या मुलाम्याचे कळस स्थापन केले. त्यांत देवळाचे शिखरावर मोठा एक, सभामंडपावर मध्यम एक, बाजूस लहान तीन, व नंदीचे देवळावर एक, एकूण सहा कळस बसविले.

रथोत्सव

शके १७८७ सालीं त्यांनीं कार्तिक शुद्ध पूर्णिमेस नवीन केलेला रथ श्रीत्र्यंबकेश्वरास अर्पण करून प्रतिवर्षी रथोत्सव होण्याकरितां विंचूर येथील जमीन आकार रुपये ६१८ची देवास दान देऊन तिचें दानपत्र करून दिलें.

कुशावर्तावरील दे० सुवर्ण कलश

शके १७८८ सालीं त्यांनीं त्या क्षेत्रीं आणखीं सोन्याच्या मुलाम्याचे कळस बसविले ते असे; कुशावर्ताचे चार बाजूस च्यार,

केदारेश्वराचे देवळावर दोन, त्रिभुवनेश्वराचे देवळावर दोन, ज्वरेश्वराचे देवळावर एक, एकूण दहा.

पर्जन्यकालांत श्रीत्र्यंबकेश्वराचें देऊळ गळत असे, त्यास त्यांनीं शके १७९३ सालीं चुन्याची टिपगारी करविली. श्रीत्रिंबकेश्वराचेदेउळास चुन्याची टिपगारी.

शके १७९४ सालीं कार्तिक शुद्ध द्वितीया या दिवशीं त्यांनीं श्रीत्र्यंबकेश्वराचे देवळावर चांदी व सोनें यांचे मुलाम्याचा असा पताकेसुद्धां एक उत्तम ध्वज बसविला. सोन्यारूप्याचा ध्वज

शके १७९५ सालीं त्यांनीं श्रीत्र्यंबकेश्वराचे देवळापासून कुशावर्ततीर्थापर्यंत रथ चालण्यास रस्ता अरुंद असल्यानें अडचण पडत असे ह्मणून श्रीगोदावरीचा कांठ वाढवून रस्ता रुंद केला. आणि तेथें चांगली सडक बांधली, त्यामुळें रथ चालण्यास तो रस्ता चांगला सुगम व प्रशस्त झाला. कुशावर्तावर जाण्यास सडक

शके १७९६ सालीं इंग्रजसरकारानें गोदावरीस नवीन पूल बांधिला, त्या कामीं त्यांनीं द्रव्याची मदत केली. पूल

त्र्यंबकक्षेत्रीं निवृत्तिनाथ हे समाधिस्थ झाले, त्यांचे समाधीचें स्थान गंगाद्वारतीर्थासन्निध आहे. त्या समाधीस पूजा व नैवेद्य होत नसे, या करितां रघुनाथराव यांनीं नित्य पूजा व नैवेद्य होण्यास्तव नेमणूक करून दिली. त्या प्रमाणें तो क्रम अद्यापि चालत आहे. निवृतीसपूजा नैवेद्यनेमणूक

शिवाय रघुनाथराव यांनीं श्रीत्र्यंबकेश्वराची वेळोवेळ महापूजा करून देवास उत्तम वस्त्रें समर्पण केलीं; कितीएक वेळां अनुष्ठान्यांनीं महापूजा केली; आणि सूर्यग्रहणपर्वांत देवास श्वेतछत्र व सांडवृष यांचें दान केलें; व विधिपूर्वक वृषोत्सर्गही केला. श्रीत्रिंबकेश्वराची वेळोवेळ महापूजा. वस्त्रें श्वेतछत्र सांडवृष यांचें अर्पण वृषोत्सर्ग

शके १८०० सालीं रघुनाथराव यांनीं श्रीत्र्यंबकेश्वराचें देवळाच्या परिपाचे आंत लहान लहान अशीं तीस मंदिरें नवीन बांधून त्यांत शिवलिंगें स्थापन केलीं. आणि त्याबद्दल त्या स्थलीं शिलालेख स्थापन केला आहे तो असाः— तीसशिवलिंगस्थापन.

मीनर्षिवसुसक्षोणीरघुनाथाभिधोनृपः ॥दानीत्युपाह्वयःसूरिर्गंगायां–

विठ्ठलादभूत् ॥ १ ॥त्र्यंबकक्षेत्रमेवादिप्रासादेषुहिरण्मयाः ॥ कुशावर्त द्वारिबंधेमेरुभेदविनिर्मिते ॥२॥ कलशाःस्थापिताश्छत्रंवृषःसांडःसमर्पितः ॥ सांबायतस्यायतनेध्वजोरौप्यःसमर्पितः ॥ ३ ॥ वार्षिकोत्सवयात्रार्थीकिंकिणीध्वजमंडितः॥दारवःस्यंदनोयेनविधिवत्प्रतिपादितः॥४॥ सस्त्रीकस्यात्मनोमातृसपत्नीपुत्रयोस्तथा ॥ अतीतवर्तमानानांस्वपितॄणां विमुक्तये॥ ५ ॥ श्रीगुरोःशंकराचार्यस्याद्यंलिंगंद्वितीयकं ॥ स्ववंशयजमानस्यश्रीबाजीरायशर्मणः ॥ ६ ॥ स्वपूर्वजानांमध्येंत्येसर्वपापहरस्यच॥ क्रमेणैषांनामधेयैर्युतानीहवृषध्वजे॥७॥ सप्रासादानिलिंगानिस्थापयामासभूपतिः ॥ सुस्पष्टप्रतिपत्यर्थंनामसंबंधयोःक्रमः॥ जगद्गुरुःशंकराख्यो- बाजीरायःस्ववृत्तिदः ॥ विठ्ठलाभिधआख्यातःस्ववृत्धप्रपितामहः ॥प्रपितास्वंडरायश्चगंगाख्याप्रपितामही ॥ राज्ञःपिताविठ्ठलश्चगंगानाम्नीप्रसूःसती ॥ स्वीयमातृसपत्नीनांरुक्मिणीरुक्मिणीतिच ॥ लक्ष्मीश्चसत्यभामाचनामसंघःक्रमादयं॥मातामहश्चगोविंदउद्दीपीतज्जनकःस्मृतः ॥ नृसिंहाख्यस्तत्सविताचैवंमातामहत्रयी ॥ श्रीनिवासोगणपतिःकृष्णोगोविंदएवच ॥ मातुलःश्वशुराश्चैतेकेशवोमंत्रदोगुरुः ॥ गोपालआप्तोविज्ञेयःरघुनाथःस्वयंनृपः ॥काशीरमाजानकीतिराज्ञीनामाभिधाःक्रमात् ॥ सापत्नभ्रातरौकृष्णमाधवौपारिकीर्तितौ॥पिशाचमुक्तिदःशंभुःसर्वपापहरोहरः ॥ नामसंबंधयोरेवंक्रमोत्रकथितोमुदा॥खाभ्राष्टेंदुमितेशाकेबहुधान्याख्यवत्सरे ॥ वसंतेमधुशुद्धाद्यतिथौविधुजवासरे ॥सुश्लोकसंधंनिर्मायनृपसुश्लोकसूचकं ॥ अंकयित्वाशिलापट्टंरघुनाथनृपाश्रितः ॥ कृतीगौरीशंकरस्त- मकरोत्सुस्थिरंमुदा ॥

शके १८०० चैत्रशुद्ध १ बुधवासरेस्थापितोयंशिलापट्टःदेवतास्थापनंतुचैत्रकृष्णषष्ठयांजातं ॥ ॥ ॥

| | |
|---|---|
| १ जद्गुरुःशंकराचार्यः | ४ खंडेरायःप्रपितामहः |
| २ बाजीरायःकुलयजमानः | ५ गंगेतिप्रापितामही |
| ३ विठ्ठलोवृत्धप्रापितामहः | ६ नृसिंहेतिपितामहः |

| | |
|---|---|
| ७ रमेतिपितामही | १९ कृष्णःश्वशुरः |
| ८ विठ्ठलःस्वपिता | २० गोविंदःश्वशुरः |
| ९ गंगेतिस्वमाता | २१ केशवोगुरुः |
| १० रुक्मिणीतिमातृसपत्नी | २२ गोपालआप्तः |
| ११ रुक्मिणीतिमातृसपत्नी | २३ रघुनाथःस्वयंराजा |
| १२ लक्ष्मीतिमातृसपत्नी | २४ काशीतिराजमहिषी |
| १३ सत्यभामेतिमातृसपत्नी | २५ रमेतिराजस्त्री |
| १४ गोविंदेतिमातामहः | २६ जानकीतिराजस्त्री |
| १५ उडपीतिमातुःपितामहः | २७ कृष्णाख्यःसापत्नोबंधुः |
| १६ नृसिंहइतिमातुःप्रपितामहः | २८ माधवाख्यःसापत्नोबंधुः |
| १७ श्रीनिवासोमातुलः | २९ पिशाचमोचनेश्वरःशिवः |
| १८ गणपतिःश्वशुरः | ३० सर्वपापहरेश्वरःशिवः |

———o———

## श्रीनरसिंहपुरक्षेत्रीं शके १७८७ पासून शके १८०४ पर्यंत रघुनाथराव यांनीं केलेलीं धर्मकृत्यें.

———o———

श्रीनरसिंहदेवाचें मंदिर जीर्णदशेस आलें होतें, त्याचा त्यांनीं शके १७८७ या वर्षी जीर्णोद्धार करून त्याविषयीं त्या मंदिरांत एक शिलालेख स्थापन केला आहे. देवळाचा जीर्णोद्धा[र]

नरसिंहपुर येथील ब्राम्हणांचे मुलांस वेदाभ्यास व्हावा, या करितां त्यांनीं एक वेदाध्ययन संपन्न अशा गुरुची योजना करून देवासन्निध धर्मशालेंत एक वेदशाला स्थापन केली. त्या योगानें वेदपठणकरण्यांत आजपर्यंत दाहा पंधरा मुलें उत्तम तयार झालीं आहेत. हल्लींही त्या शाळेंत पंधरा वीस पर्यंत मुलगे वेदाभ्यास करीत असून ते उत्तम विद्वान् होण्याचे मार्गांत आहेत. वेदशाळ[ा]

सदरहू मंदिरांत सायंकाळीं देवाची धुपारती झाल्यानंतर ऋग्वेद

यजुर्वेद आणि सामवेद या तीन वेदांचे मंत्र, व इतिहास, पुराणें, आणि स्तोत्रें, एर्हीकरून श्रीनरसिंहाची स्तुति करण्यास्तव त्यांनीं निरनिराळे ब्राह्मणनेमून तो क्रम सुरू केला, तो हल्लीं चालत आहे.

त्याचप्रमाणें या क्षेत्रांतील ब्राह्मणांचे मुलांस संस्कृत व्युत्पत्ति यावी, या हेतूनें त्यांनीं एक शास्त्राध्ययनसंपन्न अशा गुरुची योजना करून देवासन्निध धर्मशाळेंत शास्त्राध्ययनाची शाळा सुरू केली. या शाळेंत आजपर्यंत दाहा बारा विद्यार्थी उत्तम तयार झाले, व हल्लीं चौदा पंधरा विद्यार्थी अभ्यास करीत आहेत.

या क्षेत्रीं मराठी लिहिणें वाचणें वगैरेची शाळा नव्हती, ती स्थापन व्हावी या हेतूनें त्यांनीं सरकारी अधिकाऱ्यांस पत्र लिहून असें कळविलें कीं जर सरकारनें येथें शाळा स्थापन केली तर त्या शाळे करितां इमारत बांधण्यास जी जागा लागेल ती, व जो खर्च लागेल त्यापैकीं निम्मेखर्च आम्ही देऊं. त्यावरून सरकारी कामगारांनीं त्यांच्या तेथील वाड्यालगत एक जागा पसंत करून खर्चाचा आजमास केला. त्या अजमासाची रकम त्या अधिकाऱ्यानीं त्यांस कळविल्यावर त्यांनीं लागलेच निम्मे रुपये भरले. तव्हां इमारतीचें काम चालून एक उत्तम इमारत तयार झाली. तींत हल्लीं सरकारी शाळा व पोष्टहापीस यांचीं कामें चालत आहेत.

या क्षेत्रीं प्रतिवर्षीं कार्तिक शुद्ध चतुर्दशी ( वैकुंठचतुर्दशी ) या दिवशीं गरुडवाहनोत्सव व्हावा या हेतूनें रघुनाथराव यांनीं शके १८०३ या सालीं एके उत्तम कारागिराकडून गरुडाची एक मोठी भव्य मूर्ति करवून ती त्या देवास समर्पण केली. आणि त्या मूर्तीवर दरसाल श्रीनरसिंहाच्या पादुका स्थापन करून गांवांत देवाची स्वारी निघावी, असा पुजारी ब्राह्मणांस नियम करून दिला; आणि तो उत्सव सतत चालण्याकरितां स्वतंत्र नेमणूक करून दिली. त्या प्रमाणें श्रीनरसिंहाचे स्वारीची मिरवणूक होण्याची सुरवात झाली.

रघुनाथराव यांनीं शके १८०४ या सालीं सदहू क्षेत्रीं कामें के

ळीं तीं:—

१ देवाचे मंदिरावर सोन्याचे मुलाम्याच्या पताकेसह ध्वजाचें स्थापन केलें. ध्वजारोप

१ सदरहू क्षेत्रीं यात्रस्थ आले असतां त्यांस उतरण्या ची अडचण न पडावी ह्मणोन पश्चिमेकडील महा- द्वारासन्निध नीरानदीचे कांठाजवळ एक धर्मशाळा बांधिली. धर्मशाळा

१ देवाचें संपूर्ण सिंहासन रुप्यानें मढविलें. सिंहासन रुप्यानेंमढविलें

३ या प्रमाणें श्रीनरसिंहपुर येथें त्यांनीं धर्मकृत्यें केलीं.

—o—

रघुनाथराव यांची ज्येष्ठपत्नी शके १७७० सालीं निर्वतल्याव र त्यांचें अग्निहोत्र विछिन्न झालें. पुढें उत्तर हिंदुस्थानांतील यात्रा करून आल्यावर शके १७७३ सालीं त्यांनीं तृतीयविवाह केला. तेव्हांपासून पुनः अग्निहोत्र घेण्याची रघुनाथराव यांस अत्यंत उत्कं ठा होती परंतु कितीएक कारणांनीं तो योग आला नाहीं. तथापि त्यां नीं गृह्याग्नीचें पुन्हां संधान करून स्मार्त कर्माच्या सर्व विकृति के- ल्या. नंतर शके १८०१ सालीं माघ शुद्ध १३स पुष्यनक्षत्रीं अग्न्या धान केलें. तेव्हां पूर्वीचे अध्वर्यु बाळदीक्षित इयांटे नासिककर यांचे चिरंजीव रामदीक्षित यांजपासून त्यांनीं अरणी ग्रहण करून त्यांस आध्वर्यव प्रयोग दिला वांईकर भाऊदीक्षित थिटे यांचे चिरंजीव बाळदीक्षित यांस हौत्रप्रयोग दिला. त्र्यंबककर नारायणभट्ट पिंगळे यांचे पुतणे त्रिंबकराज यांस ब्रह्मत्वाचा प्रयोग दिला; संस्थानचे आ- श्रितांपैकीं वडुथकर भास्करशास्त्री यांचे चिरंजीव नरहरिशास्त्री यां स औद्गातृत्वाचा प्रयोग दिला; आणि वांईकर वित्रावाचे घराण्यां तील तात्यादीक्षित यांस आग्नीध्रत्वाचा प्रयोग दिला; असे त्यांनीं ऋत्विज करून अर्धाधान केलें. नंतर यथाकालीं सायंप्रातःअग्निहो त्र होम व स्मार्ताग्नीचा होम स्वतः देऊं लागले. प्रतिपर्वास ते अन्वा पुनःअग्निहोत्र घेतलें

धान करून व्रत ग्रहण करीत. अमावास्येस पिंडपितृयज्ञ दर्शश्राध्ध नियमानें करीत. अशा क्रमानें उत्तम प्रकारें उभयतां स्त्रीपुरुषांनीं अग्निसेवा करून प्रथम संवत्सर समाप्तीचे दिवशीं ब्राह्मण भोजन वगैरे करून मोठा उत्सव केला. प्रथम संवत्सरीं रोगानें एकदोन पशूंचा नाश झाल्यामुळें त्यांस पुनराधेय प्राप्त झालें होतें, तें त्यांनीं केलें

प्रथम संवत्सर समाप्त होतांच माघवद्यांत ते अग्नी बरोबर घेऊन श्रीत्रिंबकेश्वराचे दर्शनास गेले. नंतर घरीं येऊन अग्नीसह नरसिंहपुर येथील कुलस्वामीचें दर्शन घ्यावें या हेतूनें शके १८०३ सालीं चैत्रमासीं पायमार्गें ते नरसिंहपुर क्षेत्रीं गेले. तेथें जातांच प्रथम अरणीसहवर्तमान श्रीनरसिंहाचें दर्शन करून आपल्या वाड्यांत गेले, आणि त्या क्षेत्रीं वास करण्याचे बेतानें राहिले.

या प्रमाणें त्या क्षेत्रीं जाऊन राहिल्यावर सूत्रोक्त क्रमानें प्रथम निरूढ पशुबंध करून चातुर्मास्यें करावीं, या हेतुनें त्यांनीं वांईकर भाऊदीक्षित थिटे यांस व दुसरे नासिककर उत्तम विद्वान् ब्राह्मण यांस आणून सदर्हू कृत्याची सर्व तयारी केली. मग थोडे दिवस गुरूचा अस्त होता तो संपून गुरूचा उदय होतांच वैशाख वद्य पक्षीं पशुयाग करून ज्येष्ठ शुध्धांत चातुर्मास्यें करावीं असा विचार ठरविला. त्या संधीस कुलपरंपरागत श्रीनरसिंहजयंतीचा उत्सव प्राप्त झाला. तेव्हां त्या उत्सवास वैशाख शुद्ध सप्तमी पासून आरंभ होऊन तो निर्विघ्नपणें शेवटास गेला. नंतर शुद्ध पूर्णिमेस त्यांनीं वृषोत्सर्ग केला. त्याच दिवशीं त्यांची पत्नी सौभाग्यवती जानकीबाई यांस ज्वर येऊन त्यांची प्रकृति बिघडली! दुसरे दिवशीं याग दिवस असल्यामुळें त्यांनीं स्नान करून इष्टी केली. त्या दिवशीं तिसरे प्रहरीं जानकीबाई यांस विशेष ज्वर येऊन दिवसेंदिवस प्रकृति आधिक आधिक बिघडत चालली! ती बरी होण्याकरितां त्यांनीं पुण्याहून व पंढरपुराहून उत्तम वैद्य आणवून पुष्कळ औषधोपचार केले. शि

जानकीबाईचा अंतकाल.

वाय ब्राह्मणद्वारा भगवत्सेवा व अनुष्ठानें हीं पुष्कळ करविलीं परंतु जानकीबाईचे प्रकृतीस किंचितही आराम पडला नाहीं. यामुळें त्यांस आपल्या प्रकृतीचा भरंवसा न वाटून त्यांनीं स्वहस्तें गोदानें वगैरे दिलीं. व शिवाय बहुत दानधर्म केला. नंतर परिवारांतील मंडळीशीं जें बोलावयाचें होतें, तें त्या बोलिल्या. व रघुनाथराव यांजबरोबरही त्यांनीं पुष्कळ प्रकारचें संभाषण केलें. मरण काळापूर्वी मंत्रस्नान व वस्त्रस्नान करून श्रीनरसिंह मंदिराचें शिखर दर्शन केलें. नंतर आपल्यास अग्निहोत्रशाळेंतील वेदींत नेण्याविषयीं सूचना केली. त्याप्रमाणें सेवक जनांनीं त्यांस वेदींत कृष्णाजिनावर नेऊन ठेविलें. नंतर तेथें त्यांनीं बराच दानधर्म केला. आणि ईश्वर नामस्मरण करीत असतां ज्येष्ठ वद्य अष्टमीस दोन प्रहर दिवसाचे सुमारास त्या पुण्यश्लोक बाईचा देहांत झाला.

पुढें आहिताग्नीस जें कर्तव्यकर्म तें रघुनाथराव यांनीं केलें, आणि त्यांस अग्निसह नीरा व भीमा यांच्या संगमासंन्निध नेऊन श्रौताग्नीनें त्यांचें दहन केलें. पुढें त्यांचें उत्तर कार्यही त्यांनीं उत्तम प्रकारें केलें. या प्रमाणें रघुनाथराव यांस एकाएकीं अत्यंत दुःखाचें कारण प्राप्त झाल्यामुळें त्यांचे मनास बहुत उदासीनता प्राप्त झाली. आणि त्यामुळें इतःपर विंचूर वगैरे ठिकाणीं न जातां नरसिंहपुर क्षेत्रींच श्रीनरसिंहाचे चरणासन्निध वास करावा असा त्यांनीं मनांत विचार आणिला.

नरसिंहपुरक्षेत्रीं श्रीनरसिंहाची अतिपुरातन मुर्ति आहे. ती धालुकेची असल्यामुळें फारच सूक्ष्म झाली होती. ह्मणून त्या मुर्तीस वज्रलेप ह्मणजे कितीएक औषधींचे मिश्रणापासून जो एक लेप वज्रासारखा दृढ होतो, असें शिल्पशास्त्रांत लिहिलें आहे, तो लेप करून ती पहिल्यापेक्षां अधीक मजबूत करावी असें रघुनाथराव यांस वाटून त्यांनीं त्याप्रमाणें करण्याचा उद्योग चालविला. परंतु त्या कृत्यास देवाचे पुजारी सर्व प्रकारें प्रतिकूल होऊन वज्रलेप करूंनये

देवाचे मुर्तीचें वज्रलेपानें दृढीकरण.

असा त्यांनीं आग्रह धरिला. तेव्हां त्याबद्दल बरीच वाटाघाट झाली. शेवटीं असा विचार ठरला कीं, " वज्रलेप करावा " आणि " वज्रलेप करूंनये. " अशा दोन प्रकारच्या दोन चिठ्या लिहून त्या देवापुढें ठेवाव्या आणि एके कुमारिकेस स्नान घालून तिजकडून त्या चिठ्यांपैकीं एक चिठ्ठी उचलवावी. आणि ज्या मजकुराची चिठ्ठी ती कुमारिका उचलून देईल, ती देवाची आज्ञा समजावी. असा संकेत ठरवून त्यांनीं त्या प्रमाणें दोन चिठ्या देवापुढें टाकिल्या. त्यांतून जी चिठ्ठी कुमारिकेनें उचलून दिली, तींत " वज्रलेप करावा " अशी आज्ञा होती. त्यावर आणखी चिठ्या टाकिल्या कीं, " मूर्तीचा जो सूक्ष्म भाग झाला असेल त्या भागास वज्रलेप करावा " किंवा " सर्वांगास वज्रलेप करावा. " त्यावरून सर्वांगास वज्रलेप करण्याविषयींचीच चिठ्ठी आली. या तजविजीनें पुजारी ब्राह्मणांची हरकत दूर झाली. मग रघुनाथराव यांनीं शिल्पशास्त्रांत सांगितल्या अन्वयें एके निपुण कारागिराकडून वज्रलेपाची तयारी करविली. आणि एक चतुर ब्राह्मणाकडून सुमुहूर्तावर मूर्तीस लेप लावण्याचा क्रम सुरू केला; आणि त्या दिवसापासून प्रत्यहीं कांहीं अनुष्ठानें व ब्राह्मणभोजन सुरू केलें. एकवार लेप दिल्यावर तो शुष्क होण्यास आठ दिवस लागत. तो लेप शुष्क झाला ह्मणजे त्यावर दुसरा लेप द्यावा याप्रमाणें पांच वेळां मूर्तीस लेप दिले. इतके लेप देण्याचें कृत्य होई तों पर्यंत अनुष्ठानें व ब्राह्मणभोजन चालूच होतें. शेवटीं त्यांनीं शके १८०३ श्रावण शुद्ध चतुर्थी या दिवशीं महापूजा व क्षेत्रसमाराधना करून चालू असलेल्या अनुष्ठानांची वगैरे समाप्ति केली. ह्या लेपामुळें आतां देवाची मूर्ति चांगली सुदृढ झाली आहे.

नरसिंहपुरक्षेत्रीं रघुनाथराव यांचा राहाण्याचा हेतू दिसल्यावर त्यांचे कनिष्ठबंधु दादासाहेब व मातोश्री सत्यभामाबाई व इतर पदरची मंडळी यांचीं पत्रें विंचुरास येण्याविषयीं अतिआग्रहाचीं आलीं.

शेवटीं दादासाहेब यांचा असा निश्चय लिहून आला कीं, " आपली स्वारी विंचुरास न येईल तर आम्ही सर्व तेथेंच येऊन आपले सन्निध राहूं! " त्यावरून निरुपायामुळें रघुनाथराव नरसिंहपुराहून निघाले, आणि श्रीत्र्यंबकक्षेत्रीं येऊन श्रीत्र्यंबकेश्वराचें दर्शन करून शके १८०३ चे श्रावण वद्य पक्षीं विंचुरास गेले. तेथें मातोश्री व बंधु व इतर इष्टमित्र आणि पदरची मंडळी यांनीं त्यांस विवाह करण्याविषयीं बहुत आग्रह केला. परंतु वयाचें व कालगतीचें मान लक्षांत आणून ती गोष्ट त्यांनीं अगदीं अमान्य केली! मग कांहीं दिवस कुलस्वामीचे सन्निध नरसिंहक्षेत्रीं वासकरण्याविषयीं सर्वांची संतोष पूर्वक संमति घेऊन ते मार्गशीर्षमासीं नरसिंहपुरक्षेत्रीं श्रीनरसिंहचरणासन्निध वास करण्यास जाऊन राहिले.

नीरा व भीमा यांच्या संगम तीर्थासन्निध ज्या ठिकाणीं रघुनाथराव यांची स्त्री सौभाग्यवती जानकीबाई यांचें श्रौताग्नीनें दहन झालें, त्या ठिकाणीं त्यांनीं दगडाचें एक लहानसें उत्तम मंदिर बांधून त्यांत शके १८०४ या सालीं जानकीश्वरनामें शिवलिंग स्थापन केलें. आणि त्या शिवस्थानाची पूजा व नैवेद्य सतत चालण्या करितां एक नगदी नेमणूक करून दिली. जानकीश्वर

रघुनाथराव हे नरसिंहपुरक्षेत्रीं येऊन राहिले, आणि त्यांनीं दिनकरशास्त्री खांबेटे यांजपासून प्रस्थानत्रय श्रवणास आरंभ केला, व रावजीशास्त्री पाटणकर त्र्यंबककर व सीतारामशास्त्री पटवर्धन नाशिककर हे श्रवणास असून त्यांनीं ब्रह्मसूत्रभाष्य ह्मणजे शारीरभाष्य समग्र श्रवण केलें. प्रस्थानत्रय श्रवण

या प्रमाणें रघुनाथराव यांनीं शके १८०४ या वर्षापर्यंत चाळीस वर्षांत जीं उदारपणें सत्कृत्यें केलीं त्यांचें वृत्त समाप्त झालें.

—०—

## सत्पुरुषांचीं दर्शनें आणि सेवा.

आतां विद्वान्, भगवद्भक्त व साधुसंत अशा सत्पुरुषांपैकीं रघुनाथराव यांस कोणाकोणाचीं दर्शनें झालीं, व कोणाकोणाचा सहवास घडला, आणि कोणाकोणाची सेवा घडली. हा प्रकार वाचकास कळावा म्हणून तो संक्षेपानें लिहितों.

रघुनाथभटजी महाराज

दक्षिणेंत इंग्लिशांचा अम्मल होण्यापूर्वीं नासिकक्षेत्रांत रघुनाथ भटजीमहाराज या नांवाचे एक मोठे सिद्धपुरुष झाले. ते जातीचे कऱ्हाडे ब्राह्मण होते. त्यांच्या सिद्धाई विषयींच्या बहुत गोष्टी लोकांत प्रसिद्ध आहेत. याच सत्पुरुषापासून रघुनाथराव यांचे तीर्थरूप विठ्ठलरावतात्यासाहेब यांनीं उपदेश घेतला होता. हे सत्पुरुष इंग्रेजी अंमल झाल्यावर थोडेच दिवसांनीं सन्यास घेऊन शके १७३९ सालीं माघ वद्य १४ चे दिवशीं समाधिस्थ जाले. चतुर्थाश्रमांतील त्यांचें नांव " अद्वैतसच्चिदानंदेंद्रसरस्वती " असें होतें. यांचें समाधिस्थान नासिक येथें गोदावरीच्या तीरीं आहे. त्या समाधीवर लिंगस्थापन करून त्यावर दगडी देऊळ बांधिलें आहे, आणि देवळाच्या समोर एक मोठा लांकडी सभामंडप असून भोंताल्या चांगल्या धर्मशाळा आहेत. इष्टफल प्राप्त्यर्थ बहुत लोक ह्या समाधीची सेवा करितात, व भावानुसार त्यांचे मनोरथही पूर्ण होतात.

केशवभटजी

वर लिहिलेले रघुनाथभटजी यांस केशवभटजी ह्मणोन एक पुतणे होते. भटजीमहाराज समाधिस्थ झाल्यावर नासिकक्षेत्रीं गोदातीरीं ज्या आश्रमांत ते राहत होते, त्याच आश्रमांत हे त्यांचे पुतणे राहूं लागले. केशवभटजी हे अत्यंत आचार संपन्न असून त्रिकाल गोदास्नान करीत असत. आणि अयाचित वृत्तीनें राहून आलेली भीक्षा ग्रहण करीत असत. यांचा ब्रह्मकर्मांत वेळ खर्च होऊन जो शेष राही, त्यामध्यें ते वेदांत विचार करून हटयोगाचाही अभ्यास करीत असत. यांच्या पासून रघुनाथराव यांनीं शिवषडक्षर

महामंत्राचा उपदेश घेतला. केशवभटजी यांच्या पुण्याचरणाविषयीं सर्वत्र मोठी विख्याती आहे. हे सत्पुरुष शके १७८१ सालीं कैला सवासी झाले. यांची उत्तर क्रिया व पुढील वार्षिक श्राध्धाची सर्व व्यवस्था आजपर्यंत रघुनाथराव यांजकडून चालत आहे. रघुनाथराव यांनीं या सत्पुरुषाची कृपासंपादून वेदांत संबंधीं पुष्कळ गोष्टींचें ज्ञान संपादन केलें.

पंचवटीक्षेत्रीं श्रीकपालेश्वर महादेवासान्निध एके लहान खोलींत श्रीलक्ष्मीनारायणाची मूर्ति आहे. त्या स्थलीं रावजीमोडक ह्मणोन एक मोठे विरक्त, तपस्वी, आचारसंपन्न, आणि अद्वैत वेदांतांत निष्णात असे सत्पुरुष राहात होते. यांची शास्त्रव्युत्पत्ति उत्कृष्ट असून हे उत्तम कवीही होते. हे जात्या कोंकणस्थ ब्राह्मण असून हे रघुनाथभटजी महाराज यांचे प्रसादानें ज्ञानसंपन्न होऊन आत्मसाक्षात्कारी झाले असें सांगतात. नासिकक्षेत्रीं व इतरत्र त्यांची मोठी प्रसिद्धि आहे. त्यांनीं स्वतःकेलेले सर्वमान्य असे अनेक ग्रंथ प्रस्तुत उपलब्ध आहेत. रघुनाथराव व त्यांचे तीर्थरूप विठ्ठलरावतात्यासाहेब यांजवर यांची अत्यंत प्रीति असून पुढें तात्यासाहेब यांचे पश्चात् त्यांनीं रघुनाथराव यांजवर अतिप्रेम केलें. रघुनाथरावही प्रतिवर्षी पंचवटीक्षेत्रीं जाऊन त्यांचे दर्शन अवश्य घेत असत. या सत्पुरुषाच्या मुखानें रघुनाथराव यांनीं धर्मसंबंधाच्या व परलोक साधनाच्या अशा पुष्कळ गोष्टी श्रवण केल्या. पुढें कांहीं दिवसांनीं ह्मणजे शके १७६१ सालीं हे सत्पुरुष सन्यास करून समाधिस्थ झाले. चतुर्थाश्रमांतील त्यांचें नांव " प्रत्यक्ब्रह्मेंद्रसरस्वती " असें होतें. ज्या ठिकाणीं ते राहात असत, त्याच ठिकाणीं त्यांच्या शिष्यमंडळींनें त्यांस समाधी देऊन तेथील प्राचीन असलेली श्रीलक्ष्मीनारायणाची मूर्ति त्या समाधीवर स्थापन केली. विंचूर संस्थानचे आश्रित मंडळींत आन्याबापुराणीक या नांवाचे पिढीजात आश्रित होते. हे नासिक येथील सिध्धपुरुष भटजीमहाराज यांचे शि

रावजीमोड

प्य असून पंचवटींतील रावजीमोडक यांजपाशीं त्यांनीं वेदांतशास्त्रा चा अभ्यास चांगला केला होता. या योगें त्यांस विरक्तता व अंतरदृष्टीही असे. अल्पवयापासून यांचा सहवास फार असल्यामुळें त्यांजपासून व्यवहारोउपयुक्त नितीचे ग्रंथ व पुराणें तसेच वेदांत शास्त्रांतील इतिहास, योगवाशिष्ठ, पंचदशी, सूतसंहिता, इत्यादिकांचें श्रवण जालें. तेव्हां पासूनच रघुनाथराव यांची वेदांत शास्त्रश्रवणा विषयीं अभिरुची वाढली. हे शके १७९६ वैशाख शुध्द२ या दिवशीं सन्यास घेऊन समाधिस्थ झाले, त्यांचे वंशस्थ गौरी शंकरपुराणीक वगैरे हल्लीं संस्थानचे आश्रित आहेत.

केशवबावा. पंचवटीक्षेत्रीं एका बागेंत केशवबावा नांवाचे एक सिद्धपुरुष राहत असत. ब्रह्मनिष्ठाच्या बाल, उन्मत्त आणि पिशाच अशा तीन प्रकारच्या वृत्ति वर्णिल्या आहेत. त्याप्रमाणें या सत्पुरुषाची वृत्ति पिशाचसदृश दिसत होती ते भाषण करीत, तें असंगत असे. जो कोणीं कांहीं हेतू मनांत आणून त्यांचे दर्शनास जाई, त्यास त्यांच्या असंगत भाषणापासून त्याच्या हेतूचे अनुसार उत्तर मिळे. आणि त्या प्रमाणें अनुभवही येई. अशा प्रकारचे अनुभव शेंकडों लोकांस आल्याचें ऐकण्यांत येतें. या सिद्ध पुरुषाची उपासना करणारे बहुत लोक त्यावेळीं नासिक क्षेत्रीं होते, व हल्लींही आहेत. रघुनाथराव यांस या सिद्धपुरुषाचें दर्शन बहुत वेळ झालें असून त्यांनीं त्यांची सेवाही बहुत प्रकारें केली. ते सिद्धपुरुष शके १७६८ सालीं समाधिस्थ झाले.

गोपाळबावा. पूर्वी गोपाळबावा ह्मणोन एक मोठे शिवभक्त नासिकक्षेत्रीं झाले. त्यांचें राहणें तेथें एके बागेंत निरामय जागीं असे. हे जातीचे कोंकणस्थ ब्राह्मण होते. हे त्रिकाल शिवपूजन, व नियमित घरीं भिक्षान्न ग्रहण करीत असत. ह्या सत्पुरुषांनीं त्रिकाल गोदास्नान, शिवार्चन, शिवषडक्षरमहामंत्राचाजप, व उपनिषद्विचार या चार कृत्यांत आपले आयुष्याचा व्यय केला रघुनाथराव हे वारंवार या

शैवपुरुषाचें दर्शन घेऊन त्यांचे मुखानें शिवाच्या सर्वोत्तमत्वाविषयीं चे सिद्धांत श्रवण करीत असत. हे सत्पुरुष अंतकाळी सन्यास करून समाधिस्थ झाले.

त्र्यंबकक्षेत्रीं बाप्पाबावा व महादेवबावा आराधी म्हणून उभयतां बंधु असत. हे जातीचे यजुर्वेदी ब्राम्हण होते. हे अरण्यांतील अनेक प्रकारचीं वनपुष्पें आणून तीहींकरून प्रत्यहीं प्रदोष कालीं श्रीत्र्यंबकेश्वराची पूजा करीत असत. त्यांचा नेहमींचा वर्तनक्रम असा होता कीं, प्रतिदिवशीं त्यांनीं श्रीत्र्यंबकेश्वराची नव्या नव्या प्रकारची पुष्पपूजा करून मग पारणा करावी. उभयतां बंधुपैकीं बापाबावा हे ज्येष्ठ असून त्यांचें कायिक तप मोठें विलक्षण होतें! ते दररोज मागील दहा घटका रात्रीं स्नान करून ब्रम्हगिरीची नवक्रोशात्मक प्रदक्षिणा करून अरुणोदयकाळीं घरीं परत येऊन स्मार्ताग्नीचा होम वेळेवर देत असत. अशाप्रकारें शिवाराधना करून उभयतां बंधूंनीं आपले आयुष्याचा व्यय केला. उभयतांही आपापल्या अंतकालीं सन्यास करून त्या क्षेत्रीं समाधिस्थ झाले. या उभयतां बंधूंचा रघुनाथराव यांनीं पुष्कळ समागम करून ते होते तोंपर्यंत त्यांची शक्तीप्रमाणें चांगली सेवा केली. हल्लीं उभयतांचेही पुत्र त्र्यंबकक्षेत्रीं रहात असून आपापले वडिलांप्रमाणें प्रदोषकालीं श्रीत्र्यंबकेश्वराचें पूजन करीत असतात.

बाप्पाबावा महादेवबावा आराधी.

एकेसमयीं द्रविड देशांतील कोणी एक सिद्ध पुरुष त्र्यंबकक्षेत्रीं आले.तेव्हां ते क्वचित् संस्कृत भाषण करीत असत.त्यांनीं त्र्यंबकक्षेत्राचा सर्वोत्तम महिमा जाणून ते त्या क्षेत्रीं राहिले. पुढें थोडे दिवसांनीं ते वाणीचा उपरम करून तेथें नीलपर्वत नामक डोंगराच्या खालीं लहान झोंपडींत राहूं लागले.तेथें स्नान, शौचादि क्रिया ते कोणते वेळेस करीत होते हे कोणाचेही समजुतीस आलें नाहीं. कोणी दर्शनास गेले तर डोळे झांकलेले असून बसले आहेत असें दृष्टीस पडे. कोणाबरोबर भाषण करणें सोडिलें म्हणून त्यास लोक मुनीबावा ह्मणुलागले.

मुनिबावा

ते एके वस्त्रावर सहाही ऋतु क्रमीत असत. पुढें कांहीं दिवसांनीं सर्वकाळ निजलेलेच दृष्टीस पडूं लागले. त्या सिद्धपुरुषांचें दर्शन घेण्याकरितां जे लोक त्यांच्या आश्रमस्थलीं जात, त्यांस अरण्यांतील सर्प वगैरे विषारी व घातुक प्राणी त्यांचे आसमंतांत वारंवार संचार करितांना आढळत. परंतु त्यांकडे त्यांचे लक्ष कधींही जात नसे. त्र्यंबकक्षेत्रीं रघुनाथराव यांचें जाणें झालें ह्मणजे ते नियमानें त्या ब्रह्मनिष्ठाचें दर्शन करीत असत. हे सत्पुरुष त्र्यंबक येथें त्याच स्थलीं शके १७९० चे सुमारास विदेहकैवल्याप्रत पावले. तेव्हां त्र्यंबक क्षेत्रांतील ब्राह्मणांनीं त्यांस तेथें समाधी देऊन थोडे वर्षांपूर्वीं त्या स्थलीं मध्यम प्रतीची इमारत केली आहे.

दामोबाबा आराधी. सप्तशृंग पर्वतावर कालीतीर्थाचे समीप एक्या लहान पर्णकुटिकेत दामोबाआराधी या नांवाचे एक पुण्य पुरुष रहात होते. या ब्राम्हणाचें कायिक तप विलक्षण असे. देवीसन्निध वरील पर्वतावर आसपास उदक नसल्यामुळें ते भगवतीचें मंगलस्नान व पूजा यां करितां खालील तीर्थाच्या दहा बारा घागरी स्वतः आणून वर पोहोंचवीत असत. त्यांचा नित्य क्रम असा होता कीं, प्रातःकालची पूजा झाल्यावर पांच कोसांची एक अष्टतीर्थी प्रदक्षिणा आहे, ती करून पुन्हां वर जाऊन देवीचें दर्शन घ्यावें. नंतर शैवालय तीर्थासमीप कांहीं झोपड्यांत ब्राह्मण व आराधी रहात असत, तेथें भिक्षा मागावी. त्या स्थलीं भाकरीचे तुकड्यांचीच भिक्षा मिळे, तिजवरच त्यांनीं निर्वाह करावा! मध्यान्होत्तर पर्वतावर चरण्याकरितां ठेविलेल्या गायी व बैल व दुसरींही गुरें वगैरे यांस पाणी पिण्याकरितां जें एक मोठें कुंड बांधिलेलें होतें त्यांत वरचे वर पाणी घालून सर्व गायी व इतर जनावरें यांची तृषा तृप्त करावी. नंतर खांद्यावर घागरीनें पाणी आणून ते पर्वतावरील एक्या लहानशा जागेंत देवी करितां ज्या तुळसी व फुलझाडें सुद्धां त्यांनीं लाविलीं होती, त्यांस घालावें. पुन्हां संध्या

काळीं तांबूलतीर्थांत स्नान करावें, आणि सायंकाळची पूजा व मंगलारती यांजकरितां पर्वतावर जावें, तेथें ती पूजा व मंगलारती झाली ह्मणजे पर्वतावरून खालीं येऊन निद्रा करावी, असा त्यांचा नित्येचा क्रम असे. एकादशीस देवीची प्रातःकालची पूजा झाल्यावर तेथून चौदा कोस नासिकासंन्निध पंचवटी क्षेत्र आहे, तेथें जाऊन श्रीरामचंद्राचें दर्शन घ्यावें. नंतर एक्या कळशींत गंगोदक घेऊन निघावें, तों मागील प्रहररात्रींचे सुमारें पर्वतावर पोहोंचावें. नंतर द्वादशीस शेवालतीर्थाचें स्नान करून प्रातःकालचे पूजेसमयीं देवीस गंगोदकाचें स्नान घालावें. आणि नित्य क्रमाचीं अष्टतीर्थी प्रदक्षिणा करून भिक्षान्नानें पारणा करावी. अशा तीव्र नेमानें त्यांनीं बहुत वर्षेपर्यंत देवीच्या सन्निध वास केला. त्यांचें वैराग्यही अप्रतिम होतें. रघुनाथराव यांनीं पुष्कळ वेळां सप्रशृंगास जाऊन या सत्पुरुषाचें दर्शन घेतलें. व त्यांची त्यांवर अत्यंत कृपा होती. हे सत्पुरुष सुमारें चौदा पंधरावर्षें झालीं परलोकवासी झाले.

सखारामबाबा कवाडकर

कोंकणांत कल्याणानजीक कवाड ह्मणोन एक गांव आहे, तेथें सखारामबावा या नांवाचे साधु राहात होते. हे नासिक येथील रघुनाथभटजी महाराज यांचे शिष्य असून अत्यंत वैराग्य संपन्न होते. हे वेदांत शास्त्रांत परिनिष्ठ असून उत्तम प्रकारचे व्युत्पन्न असल्यामुळें कांहीं विद्यार्थ्यांस काव्यें पढवून अयाचित वृत्तीनें देह निर्वाह करीत असत. या सत्पुरुषाची कीर्ति उत्तर कोंकण प्रदेशीं सर्वत्र पसरली आहे. हे त्याच गांवीं (कवाड गांवी) सन्यास करून समाधिस्थ झाले. त्या जागीं आलीकडे मोठें मंदिर व सभामंडप त्यांचे शिष्य मंडळींनीं बांधिला आहे. रघुनाथराव यांनीं या सत्पुरुषाचें दर्शन मुद्दाम त्या गांवीं जाऊन घेतलें. आणि तेथें थोडे दिवस राहून त्यांचा सहवास केला.

ब्रह्मानंदबावा ह्मणोन गौड जातीचे ब्राम्हण होते. हे ब्रह्मचारी

ब्रह्मानंदबाबा असत त्यांची शरीरकाठी बहुत उंच होती. आणि जरी ते शरीरानें फार कृश होते, तथापि बहुत तेजस्वी असत. ते हिंदुस्थानी भाषा बोलत. त्यांचें रहाणें बहुत करून कृष्णातीरीं भिलवडी नजीक औदुंबर क्षेत्रीं असे. यांस हटयोग सिद्ध असून ते कांहीं दिवस समाधी लावून बसतात असें त्या समयीं बहुत लोक ह्मणत होते. सुमारें चाळीस वर्षांमागें, सिंहस्थपर्वणींत गोदास्नाना करितां ते नासिक क्षेत्रीं येऊन त्या क्षेत्राच्या जवळच गोदातीरीं गंगापुर म्हणोन एक गांव आहे, तेथें चातुर्मास्य राहिले होते. त्या समयीं त्यांचे दर्शनार्थ रघुनाथराव हे मुद्दाम जाऊन थोडे दिवस त्यांचे सन्निध राहिले. तेव्हां हटयोग संबंधीं जीं नानाप्रकारचीं आसनें धोती व पोती या चे प्रकार त्यांनीं केले. ते पुष्कळ वेळां रघुनाथराव यांचे दृष्टीस पडले. त्यांचा आहार व निद्रा फार स्वल्प असे. रघुनाथराव गंगापुराहून विंचुरास परत गेल्यावर त्या सत्पुरुषानें गंगापुरास कांहीं दिवस योगसमाधि केला होता, असें त्यांनीं ऐकिलें. हे योगी पुढें औदुंबरक्षेत्रीं गेले. आणि तेथें सन्यास करून कांहीं दिवसांनीं समाधिस्थ झाले. औदुंबरक्षेत्रीं त्यांची समाधि असून तेथें त्यांचा मठही आहे. त्यांत त्यांची शिष्य मंडळी राहत असते.

रघुनाथभटजी आणि रावजीमोडक यांचें वृत्त वर लिहिलें आहे. ते उभयतां एके दिवशीं एकांत स्थळीं परमार्थसंबंधीं गोष्टी करीत असतां रावजी मोडक यांचे बोलण्यांत असें आलें कीं, या कलियुगांत हटयोग पूर्णरीतीनें सिद्ध होत नाहीं. हें भटजीमहाराजांनीं ऐकून त्यांनीं त्या वेळेस कांहींच उत्तर दिलें नाहीं. पुढें नारायण या नांवाचा एक अल्पवयी ब्राह्मण रघुनाथभटजीचा समागम होण्याचे हेतूनें एकटाच आला. तो खानदेशांत एका यजुःशाखी ब्राह्मणाचा पुत्र असून प्रारब्ध योगानें त्यास तरुणावस्थेंतच विरक्तता प्राप्त झाली होती. त्यानें भटजीमहाराजांचें दर्शन करून आपलें असें वृत्त निवेदन केलें कीं, मला मातापितर नसून माझें लग्न झालें

नारायणबाबा योगी

लें नाहीं व मला पुढें लग्न करण्याची इच्छाही नाहीं. केवळ आपली सेवा करून आपले सन्निध वास करावा, एवढीच माझी इच्छा आहे. हें ऐकून भटजींनीं त्यास आज्ञा केली कीं, प्रातःकालीं गंगेचें स्नान करून गायत्रीजप करावा. भिक्षा मागून उदरपूर्ती करावी. आणि मला कधीं कधीं भेटतही जावें. त्याप्रमाणें त्यानें क्रम चालविला. भटजींनीं एक वर्षपर्यंत त्याचा आचार निर्मल चाललेला पाहून त्यास विचारिलें कीं, तुला योगमार्ग सांगितला तर त्याप्रमाणें तूं करशील काय? त्यानें तत्काल उत्तर दिलें कीं, होय महाराज, मी करीन. नंतर एक निरामय जागा पाहून तेथें भटजीमहाराज यांनीं त्याजकडून नित्य यथाशास्त्र योगाचा अभ्यास चालविला. आसनें, धौती, पोती, प्राणायाम, प्रत्याहार, ध्यान, धारणा, वगैरे योगशास्त्रांत जे जे अभ्यासाचे प्रकार लिहिले आहेत, ते ते तीन वर्षे पर्यंत सतत त्याजकडून करविले. असें करितां करितां शेवटीं जेव्हां त्यास तीन दिवस पर्यंत अहोरात्र पूर्णरीतीनें समाधी लावून बसण्याचें सामर्थ्य आलें, तेव्हां एके दिवशीं भटजी हे रावजी मोडकांस ह्मणाले कीं, कोणी योगी आले आहेत, तर आपण त्यांचे दर्शनास जाऊं. त्याप्रमाणें उभयता तेथें गेल्यावर भटजींनीं त्या ब्राह्मणाच्या मुलाकडून सर्व योगाभ्यासाचा क्रम करवून रावजी मोडक यांस दाखविला. तेव्हां रावजी मोडकांनीं भटजीमहाराजांस तत्काल साष्टांगनमस्कार घालून म्हटलें कीं, "हें केवळ आपल्याच कृपेनें झालें आहे. आपल्या कृपे वांचून अशा प्रकारची योगासिद्धि या युगांत होणें दुर्घट होय, यांत संशय नाहीं!"

पुढें भटजींनीं क्रमाक्रमानें त्या ब्राह्मणाचे मुलाकडून अभ्यास चालविला. तेव्हां सात दिवस पर्यंत त्यास समाधि लावून बसणें साध्य झालें. पुढें ही त्याची कीर्ति सर्वत्र प्रसृत होऊन लोक त्याला "नारायणबावायोगी" असें म्हणूं लागले. त्या संधीस श्रीमंत बाजीरावसाहेब यांची स्वारी नाशिकास आली. तेव्हां नारायणबावा

ची कीर्ति ऐकून ते त्याचे दर्शनास गेले. आणि दहा हजार रुपये त्यांनी बावापुढें ठेविले; परंतु बावांनी त्यांचा स्वीकार केला नाहीं! असो. पुढें भटजींनी एकदा नारायणबावास सांगितलें कीं, नाशिकावांचून अन्य स्थलीं योगाभ्यासास योग्य अशी जागा तुह्मीं सिद्ध करावी म्हणजे मी येऊन शेष राहिलेला अभ्यास तुह्मांकडून करवीन. अशी भटजीमहाराजांची आज्ञा झाल्यावरून नारायणबावांनीं रघुनाथराव यांचे तीर्थरूप विठ्ठलराव तात्यासाहेब यांची भेट घेतली, आणि मालेगांवासन्निध दाभाडी ह्मणोन एक गांव आहे, तेथें योगाभ्यासास योग्य असा मठ बांधून द्यावा ह्मणून कळविलें. मंतर भटजींनींही तात्यासाहेब यांस तो मठ बांधून देण्याविषयीं आज्ञा केली. तेव्हां त्यांनीं सात आठ हजार रुपये खर्च करून यथाशास्त्र योगाभ्यासास जशी जागा पाहिजे होती, तशी बांधून दिली. मध्यंतरीं रघुनाथभटजी हे सन्यास करून समाधिस्थ झाले, या कारणांमुळें पुढें राहिलेला योगमार्ग शिकविण्यास कोणीच राहिले नाहीं, व त्या कारणानें तो अभ्यास पूर्णतेस गेला नाहीं. तत्रापि नारायणबावा यांस चाळीस दिवस पर्यंत समाधि लावून बसण्याचें सामर्थ्य आलें होतें. त्यांचा विठ्ठलराव तात्यासाहेबांवर अत्यंत लोभ असल्यामुळें ते कधीं कधीं विंचुरास येऊन वाड्यांत दोन दोन महिने पर्यंत रहात असत. ते त्या वेळेस तीन दिवस अगर सात दिवस अशी समाधि करीत. रघुनाथराव यांचे लहानपणापासून त्यांजवर नारायणबावांची अत्यंत प्रीति असे. पुढें विठ्ठलराव तात्यासाहेब कैलासवासी झाले. तरी नारायणबावा हे पूर्वी प्रमाणें प्रेमपूर्वक विंचुरास येऊन कांहीं दिवस रघुनाथराव यांजपाशीं रहात असत. पुढें कांहीं दिवसांनीं नारायणबावा हे दाभाडी येथेंच सन्यास घेऊन समाधिस्थ झाले. त्या जागीं रघुनाथराव यांनीं नारायणाची मूर्ति स्थापन करून त्यानीच पूजा नैवेद्य वगैरेची व्यवस्था करून दिली. त्याप्रमाणें ती हल्लीं चालत आहे.

पुणें शहरानजीक भीमातीरीं खेड ह्मणोन एक गांव आहे. तेथें चंडीरामबावा या नांवाचे सत्पुरुष होते. ते विरक्त व सदाचार संपन्न होते. आणि त्यांचें इष्टदैवत श्रीविष्णु होतें, ह्मणून त्यांनीं खेड येथें भीमातीरीं एक उत्तम विष्णुमंदिर बांधिलें. आणि आपले शिष्य मंडळीकडून त्या देवाची पूजा व वार्षिक उत्सव आणि अन्नसत्र सतत चालावें ह्मणोन त्यांनीं उत्तम प्रकारची योजना करून ठेविली. त्याप्रमाणें आज पर्यंत सतत क्रम चालत आला आहे. चंडीरामबावा हे नासिक येथील रघुनाथभटजीचे शिष्य होते. ते एके समयीं सिंहस्थाचे पर्वांत गोदास्नाना करितां नासिकास आले आसतां गोदातीरीं कोठें तरी निरामय जागीं वास करावा या हेतूनें त्यांनीं स्नायखेडेंगांवासन्निध करंजगाव हें आपले वास्तव्याकारितां योग्य ठिकाण ह्मणोन पसंत केलें. तें ऐकून रघुनाथराव हे करंजगांवीं गेले. आणि त्यांनीं त्यांचें दर्शन घेऊन त्यांची योग्य व्यवस्था ठेविली. पुढें जेव्हां जेव्हां रघुनाथराव यांचें जाणें पुण्यास होई, तेव्हां तेव्हां ते मुद्दाम खेडास जाऊन त्या सत्पुरुषाचें दर्शन घेत. असा क्रम चालल्यानें चंडीरामबावा यांची रघुनाथराव यांजवर मोठी कृपा झाली. चंडीरामबाव

मसूर गांव येथील रहाणारे वेणीमाधवशास्त्री हे कुटुंबासुद्धां नाशिकास आले. आणि क्षेत्रवास करून त्यांनीं वेदांत शास्त्राचा बहुत अभ्यास चालविला. पुढें त्यांस वैराग्य होऊन ते मठांत राहूं लागले. तेथें प्रातःकालीं उपनिषदांच्या भाष्याचा पाठ सांगून नंतर घरीं भोजनास जावें, तिसरे प्रहरीं कांहीं वेदांताचीं प्रकरणें सांगावीं, आणि रात्रीस योगवाशिष्ठ वगैरे ग्रंथ वाचावे, असा क्रम बहुत वर्षें सतत चालला. यांस स्वशाखाध्ययन उत्तम प्रकारें असून व्याससूत्रासहित दशोपनिषदें हीं चांगलीं येत असत. त्यांस मुलें आणि प्रपंचांतील इतर परिवार बराच होता. परंतु त्याचे निर्वाहाची काळजी ते बिलकुल करीत नसत. कोणी तरी धर्मार्थ त्यांच्या परिवाराचा परामर्श करीत. पुढें त्यांचें कुटुंब निवर्तलें, तेव्हां त्यांनीं सर्व वेणीमाध

त्याग केला, आणि काशीस जाऊन सन्यासाश्रम स्वीकारिला. पुढें कांहीं दिवसपर्यंत त्यांनीं श्रवण, मनन, व निदिध्यासन या गोष्टी उत्तम प्रकारें केल्या . त्यांस आत्मसाक्षात्कारही झाला होता असें ह्मणतात. त्यांनीं गंगोत्री, केदार, बदरीनारायण व त्या प्रदेशांतील सर्व पुण्य क्षेत्रांच्या यात्रा पादचारी करून रामेश्वराची यात्राही त्याचप्रमाणें केली. नंतर ते नाशिकास येऊन पंचवटींत राहिले. तेथें बहुत लोक दर्शनास येऊं लागले. भिक्षा वरचेवर होऊं लागल्या. हें त्यांस बरें वाटेना. ह्मणोन ते सांयखेडेंगांवीं गोदातीरीं निरामय जागीं जाऊन राहिले. या सत्पुरुषाचा समागम आपल्यास कांहीं दिवस पर्यंत व्हावा या हेतूनें रघुनाथरावही सांयखेडें येथें जाऊन राहिले. त्यांस त्या सत्पुरुषाचे मुखानें कांहीं वेदांताचीं प्रकरणें श्रवण करण्याचा लाभ झाला. त्यांची वेदांत सांगण्याची पद्धत अप्रतिम होती. कारण, त्यांचे अंगीं श्रोत्यास बोधकरण्याचें सामर्थ्य विलक्षण होतें. कांहीं महिने पर्यंत ते सांयखेड्यास राहिल्यावर तेथून निघून कृष्णातीरीं वढूथ गांवीं जाऊन राहिले. नंतर तेथून निघून वैराजक्षेत्रीं[वांईस]गेले आणि कांहीं दिवसांनीं ते त्याच क्षेत्रीं समाधिस्थ झाले. चतुर्थाश्रमांतील त्यांचें नांव ' रामानंद ' असें होतें. वांईकर लोकांनीं त्यांची समाधी व तिजवर एक मंदिर असें उत्तम प्रकारें बांधिलें आहे.

अयोध्याप्रसाद— उत्तर हिंदुस्थानांत काल्पी शहराजवळ नोनापूर ह्मणोन एक लहान गांव आहे. तेथें अयोध्याप्रसाद या नांवाचे तद्देशी ब्राह्मण राहात असत. ते मोठे रामभक्त होते, व त्यांच्या साधुत्वाची बहुत कीर्ति होती. हे प्रतिवर्षी जलविहार या नांवाचा उत्सव करीत; तेव्हां त्या उत्सवाची अशी रीत असे कीं, नोनापुर येथें जो एक मोठा तलाव आहे, त्या तलावांत एक उत्तम नाव शृंगारून तींत रामाची मूर्ति स्थापन करावी. आणि वाद्यघोष आणि भजन करीत त्या तलावांत संचार करावा. या जलविहाराचे उत्सवास त्या भां

तांतील शेंकडों लोक येत, त्या सर्वांस ते सिधा देत असत. तीन दिवस उत्सव झाल्यावर शेवटीं सर्वांस निरोप द्यावयाचा, तेव्हां ते एकथा पाटींत पुऱ्या घेऊन त्यांपैकीं एकक पुरी सर्वांस देत. अशाप्रकारें हजारों लोकांस पुऱ्या वांटीत. परंतु पाटींतील पुऱ्या सरत नसत! सर्वांस पुऱ्या पोहोंचल्याची खूण हीच असे कीं, पाटींतील पुऱ्या सरल्या ह्मणजे सर्वांस प्रसाद पोहोंचला असें समजावें. हा चमत्कार शेंकडों लोकांनीं पाहिला आहे. या भगवद्भक्ताची पुष्कळ जणांनीं सेवा करून आपले मनोरथ सिद्ध करून घेतले. रघुनाथराव हे उत्तर हिंदुस्थानांतील यात्रेस गेले, त्यावेळेस त्यांस त्या सत्पुरुषाचें दर्शनाचा लाभ सहज झाला. रघुनाथराव यांचा मुक्काम कांहीं दिवस कानपूर एथें असता दैवयोगानें ते तेथें येऊन त्यांचे जवळ राहिले. त्यावेळेस रघुनाथराव यांस त्यांचा पुष्कळ समागम झाला. त्यांची वृत्ति अतिशांत असून आचार फार उत्तम होता. ते प्रत्यहीं सायंकाळीं तुलसीदासाचीं पदें म्हणून भजन करीत, तेव्हां त्यांच्या नेत्रांतून सर्वकाल आनंदाश्रु पडून भजनांत त्यांस देहाचा विसर पडत असे.

सुमारें पसतीस वर्षें झालीं असतील, तेव्हां मैथिल देशांतील मैथिल ज्ञातीचे व पन्नास वर्षांचे वयाचे एक ब्राह्मण विंचुरास आले. या ब्राम्हणाचें तप अति निग्रहाचें होतें. त्यांच्या मस्तकावर जटा असत, तथापि ते त्रिकालस्नान मस्तकावरून करीत. व त्यांजवळ जो एक नरसिंह शालिग्राम होता, त्याचें ते त्रिकाल पूजन करीत असत. त्यांचा नियम असा होता कीं, सायंकाळीं तीन घटका दिवस शेष राहिला म्हणजे सूर्यास्त होण्यापूर्वीं नरसिंहाची पूजा करून मग सायंसंध्या करावी. एक दिवस अगदीं कांहींच भक्षण करावयाचें नाहीं. दुसरे दिवशीं फक्त कच्चे भुईमुगाचे दाणे आणि ताक भक्षण करावें. अशाप्रकारें एकांतर उपवास म्हणजे धरणें पारणें हें यांचे व्रत होतें. कदाचित् या क्रमानें एका दशीस भक्षण कर

एक तपस्वी मैथिल ब्राह्मण.

ण्याचा दिवस आला तर त्या दिवशीं किंचित्‌ही आहार न करतां दुसरा जो उपोषणाचा दिवस, त्या दिवशींही कांहीं भक्षण न करितां तिसरे दिवशीं मात्र वर लिहिल्याअन्वयें कांहींतरी भक्षण करावें, असा त्यांचा क्रम सारखा चालला होता. त्यांचीं व्याकरणशास्त्रांत उत्तम गति असून ते मोठे व्युत्पन्न होते. व कांहीं मंत्रशास्त्रही जाणत असत. हे विंचुरास कांहीं महिनें राहून पुढें येवल्यास कित्येक दिवस होते. तेथें त्यांनीं कांहीं काळपर्यंत विद्यार्थी यांस शास्त्राध्ययन सांगितलें. नंतर ते रामेश्वराचे यात्रेस गेले. ती यात्रा त्यांनीं पादचारी केली. ती करून ते विंचुरास परत आल्यावर तेथें त्यांस ज्वर उत्पन्न होऊन ते परलोकवासी झाले. तेव्हां त्यांचे येवलें येथील राहाणारे विद्यार्थी यांनीं त्यांचें उत्तरकार्य उत्तम प्रकारें केलें. या तपस्वी ब्राह्मणाची रघुनाथराव यांजवर अत्यंत प्रीति असून त्यांनीं ही त्यांची उत्तम प्रकारें सेवा केली.

सखारामबावा अंमळनेरकर यांचे शिष्य गोविंदबावा अंमळनेरकर

खानदेशांत अंमळनेर गांवीं सखारामबावा नांवाचे साधु झाले. त्यांची प्रसिद्धि सर्वत्र आहेच, याकरितां ती लिहिणें नको. त्यांचे शिष्य गोविंदबावा या नावें झाले. ते यजुःशाखी ब्राह्मण असत. ते ब्रम्हचारी असून मोठे विरक्त भगवद्भक्त होते. ते भागवतधर्म आचरण करीत असत. त्यांचा प्रत्यहीं प्रातःस्नानाचा नियम असून ते सर्व काल भगवन्नाम स्मरणांत घालवीत असत. ते नित्य रात्रीं चार तासपर्यंत नामसंकीर्तनपूर्वक भजन करीत असत. नवविधभक्तींतील नामस्मरणरूप भक्तीवर त्यांचा दृढनिश्चय होता. या भगवद्भक्ताचे योगानें बहुत ब्राह्मणांचे कुटुंबाचा निर्वाह चालत असे. प्रति चातुर्मास्यांत पंढरपूरक्षेत्रीं वास करून तेथें सूर्योदयापूर्वीं नित्य कर्तव्य जें ब्राम्हणकर्म त्याची समाप्ति झाल्यावर मध्यान्हपर्यंत पांडुरंगासमीप भगवद्भजन करावें; नंतर ज्या घरीं भोजनाचें आमंत्रण असेल, तेथें बरोबरील परिवारासह जाऊन भोजन करावें; असा त्यांचा नियम होता. चातुर्मास्य समाप्त झाल्यावर ते आळंदी देहू वगैरे या-

त्रा करून अंमळनेरास जात. तेव्हां मुद्दाम विंचुरास येऊन आठ चार दिवस मुक्काम करीत. तेव्हां रघुनाथराव हे त्यांस (गोविंद-बावांस) आपले घरीं भोजनास आणून प्रत्यहीं त्यांचें भजन श्रवण करीत. त्र्यंबकक्षेत्रीं निवृत्तिनाथ समाधिस्थ झाले. त्यांचे समाधीचा दिवस लोकांत प्रसिद्ध नसल्यामुळें तेथें यात्रेस वगैरे कोणी जात नसे. सबब गोविंदबावा यांनीं पौष वद्य ११ हा यात्रेचा दिवस ठरवून ते त्या दिवशीं प्रतिवर्षीं त्र्यंबकास जाऊं लागले. तेव्हांपासून तेथें निवृत्तिनाथाची यात्रा भरूं लागली. आतांतर त्या यात्रेची बहुतच वृद्धि झाली आहे. या भगवद्भक्ताचा अंतकाळ पंढरीक्षेत्रीं भगवन्नामस्मरण करीत असतां झाला. त्यांचें दहन चंद्रभागातीरीं पुंडलीकासन्निध झालें. त्यांचे शिष्यांनीं हल्लीं तेथें एक मोठी इमारत बांधिली आहे. या बावांची शिष्यमंडळी मध्य महाराष्ट्र देशांत बहुत आहे. या सत्पुरुषाची रघुनाथराव यांजवर बहुत कृपा होती. व त्यांचेंही त्या साधूचे ठायीं अत्यंत प्रेम असे.

वर लिहिलेल्या गोविंदबावांचे गुरु सखारामबावा अंमळनेरकर, यांचे गुरुबंधु खानदेश जिल्ह्यांतील चोपडें येथें राहाणारे यजुःशाखी गोविंदबावा या नांवाचे भगवद्भक्त होते. हेही मोठे विरक्त असून भगवन्नामस्मरणरूप भक्तीवर यांचा मोठा निश्चय होता. हे स्वभावानें बहुत शांत व दयाळु असत. हेही चातुर्मास्यपर्यंत पंढरपुरास वास करून पांडुरंगासन्निध भजन करीत असत. आणि चातुर्मास्य समाप्त झाल्यावर परत चोपड्यास जात. तेव्हां विंचुरास येऊन आठ चार दिवस मुक्काम करीत. तेव्हां रघुनाथराव या बावांस आपले घरीं भोजनास आणून त्यांचा बहुत सत्कार करीत. त्यांचाही अंतकाल पंढरपूरक्षेत्रींच झाला. त्यांचें दहन चंद्रभागातीरीं पुंडलीकासमीप झालें. तेथें त्यांचे शिष्यमंडळीकडून एक इमारत तयार होत आहे. या भगवद्भक्ताचें रघुनाथराव यांजवर बहुत प्रेम होतें.

सुमारें ४० वर्षांपूर्वी सिंहस्थपर्वणींत गोदास्नानाकरितां गौड

पंडितस्वामी

ज्ञातीचे एक स्वामी नासिकास आले. प्रथम त्यांचे स्वभावाचें व वि द्येचें ज्ञान कोणासही झालें नाहीं. परंतु पुढें थोडेच दिवसांत ते आपले विद्वत्तेचे संबंधानें प्रसिद्धीस आले. तेव्हां नासिकक्षेत्रांतील सर्व विद्वान त्यांचा बहुमान करूं लागले. सरळ स्वभाव, वैराग्य, तेजस्विता, लीनता, अत्युत्कट विद्वत्ता असून निरभिमानता, दयालुता, या सर्व गुणांचा समुदाय त्या स्वामींचे ठायीं वास करीत होता. त्यां चे स्वभावाचा व विद्येचा लौकिक ऐकून पुष्कळ विद्यार्थी त्यांजकडे अध्ययनार्थ आले. त्या सर्वांचा त्यांनीं स्वीकार करून त्यांस वि- द्यादान करण्यास आरंभ केला. तेव्हां कितीएकांस व्याकरण, कि- तीएकांस न्याय, कितीएकांस मीमांसा, कितीएकांस वेदांत, अशा प्रकारें ते सर्व शास्त्राचे पाठ सांगत असत. कोणतेही शास्त्रांत त्यां स किमपीहि आंध्य नव्हतें. नासिकक्षेत्रांत शास्त्रविद्येचा अगदीं अ भाव होण्याचा समय आला होता. परंतु या स्वामीच्या येण्यानें तेथें सर्व शास्त्रविद्येचें पुनरुज्जीवन झालें. या स्वामीच्या अप्रतिम शास्त्राध्ययनावरून त्यांस सर्व लोक पंडितस्वामी असें ह्मणूं लागले. हे स्वामी नासिकास होते तेव्हां रघुनाथराव यांनीं पुष्कळ वेळ त्यां चें दर्शन घेतलें. पुढें कांहीं दिवसांनीं ते नासिकाहून काशीस जाऊं लागले, तेव्हां त्यांनीं मुद्दाम विंचुरास येऊन तेथें मुक्काम केला; त्या समयीं रघुनाथराव यांनीं त्यांचा अत्यंत सत्कार करून पुढें रवान गी करून दिली. त्या वेळेस ते पादचारी होते. ते काशीस पोहोंच- ल्यावर भागीरथीतीरीं दशाश्वमेधघाटीं राहिले. तेथेंही शें दीडशें विद्यार्थी त्यांजपाशीं पढत असत. काशीक्षेत्रीं प्रत्येक शास्त्रांत त्या काळीं पंडितस्वामीच्या बरोबरीचा असा कोणीही विद्वान् नव्हता, असो. पुढें थोडेच दिवसांनीं रघुनाथराव हे काशीक्षेत्रीं जाऊन तेथें त्यांचा एक वर्षभर मुक्काम झाला. त्या समयीं पंडितस्वामींचा त्यांस पुष्कळ सहवास घडला. आणि त्यांचे मुखानें एकदोन उपनिषदांचीं भाष्यें त्यांचे श्रवणांत आलीं. रघुनाथराव यांजवर पंडितस्वामींची

अत्यंत कृपा असे. रघुनाथराव यांचें राहणें दुर्गाघाटीं असून तेथून दशाश्वमेध घाट फार दूर होता ह्मणोन स्वामींनीं त्यांस अशी आ-ज्ञा केली कीं, दुर्गाघाटीं वासुदेवस्वामी भाष्य सांगत असतात, तेथें तुह्मीं श्रवणास जात जावें. त्यांची सांगण्याची शैली चांगली आहे. त्यांनीं केवळ एकवेळ मात्र प्रस्थानत्रय वाचिलें, पण तेवढ्या नेंच त्यांची वेदांत शास्त्रांत उत्तम गति झाली! असला बुद्धिमान पुरुष आजपर्यंत आमच्या पाहण्यांत आला नाहीं! बुद्धिमान अ-सून त्यांचें वैराग्य आणि सदाचारसंपन्नता फार मोठी आहे! असें पंडितस्वामींनीं सांगितल्यावर, रघुनाथराव हे दुर्गाघाटीं आठवल्यांचे मठांत वासुदेवस्वामी पाठ सांगत असत, तो श्रवण करण्यास जा ऊं लागले. पंडितस्वामी हे पुढें कांहीं वर्षें काशीवास करून नंतर समाधिस्थ झाले. त्यांनीं क्षेत्रोक्षेत्रीं लोकांस विद्यादान केलें. त्यां जपाशीं पढलेले बहुत विद्यार्थी शास्त्रांत प्रवीण होऊन मोठ्या यो ग्यतेस चढले आहेत. येणेकरून स्वामीच्या मागें त्यांची कीर्ति सर्व त्र राहिली आहे!

वर आह्मीं वासुदेवस्वामी सांगितले, हे पूर्वाश्रमीं पुणें जिल्ह्यां-तील ओतूर गांवचे राहाणारे होते. पूर्वीच्या कर्मसंस्कारानें यांस अ ल्प वयांतच विरक्तता प्राप्त होऊन त्यांनीं सन्यास केला. पुढें त्यांनीं पंडितस्वामीजवळ वेदांत शास्त्राचा अभ्यास केला. त्यावेळेंस त्यां चें वय तीस वर्षांचे आंत असून त्यांची बुद्धिमत्ता विलक्षण होती. त्या काळीं वेदांताचा पाठ सांगणारा काशीक्षेत्रांत त्यां सारखा को णीच नव्हता. रघुनाथराव काशीहून स्वदेशीं परत आल्यावर त्यां स्वामींनीं पुढें वाणीचा उपरम केला. ह्मणजे भाषण करणें अगदीं च सोडिलें. नंतर कांहीं दिवसांनीं त्याच क्षेत्रीं ते समाधिस्थ जाले. वासुदेवस्वामी

अक्कलकोट येथें एक स्वामी होते, ते मोठे सिद्ध पुरूष असत हें आबालवृद्धास माहीत आहे. हे स्वामी मुळीं कोठें जन्मले व त्यांनीं दीक्षा कधीं घेतली व ते कोणत्या जातीचे होते हें कोणासही कळलें अक्कलकोटचे स्वामी

नसेल असें वाटतें. ते कोणापाशीं कधींहीं धड बोलत नसत. त्यांस कोणी कांहीं विचारिलें तर ते त्यास भलतेंच उत्तर देत, यामुळें कितीएक लोक त्यांस विक्षिप्त असें ह्मणत होते. बाल, उन्मत्त, पिशाच, ह्या तीन वृत्ति पूर्ण ब्रह्मनिष्ठाच्या असतात व त्यांचा हेतु असा असतो कीं, आपण लोकांत मिश्र होऊंनये, व आपणांस कोणाचा उपद्रव लागूं नये. त्याचप्रमाणें या स्वामींची वृत्ति व आचरण होतें. त्यांचा चेहरा मोठा भव्य असून त्यांचे शरीराची काठी उंच होती. व त्यांचा वर्ण गोरातांबुस असून त्यांजवर साधुत्वाचें पुष्कळ तेज होतें. ते स्वामी आजानुबाहु[1] होते म्हणजे त्यांचे हात त्यांच्या ज्यानुपर्यंत [ गुडघ्यापर्यंत ] पोहोचत इतके लांब होते. ते हमेषा खडी हिंदुस्थानी भाषा बोलत, क्वचित् मराठीही बोलत असत. त्यांचें वय किती वर्षांचें होतें, याचा कोणासही ठिकाण लागला नाहीं. त्यांचें भाषण व रंगरूप यांवरून ते गौड जातीचे ब्राम्हण असून दिल्ली प्रदेशांतील राहाणारे असावें, असें लोक अनुमान करीत असत. अक्कलकोट येथें व इतर ठिकाणीं त्यांनीं कितीएक अमानुष कृत्यें केलीं असें तेथील लोक सांगतात. पूर्वी रघुनाथराव यांचे कनिष्ठ बंधु माधवराव हे अक्कलकोट येथें रीजेंटचे हुद्यावर होते. त्यावेळेस हे स्वामी त्यांचे राहाण्याचे घरीं महिन्यामध्यें स्वइच्छेनें आठचार दिवस रहात होते. आणि कधीं रात्रीचे सामसूमीत सरळ व संगतवार भाषण करून त्यांत मुद्याच्या गोष्टी सांगत. रघुनाथराव हे ह्या स्वामींच्या दर्शनाकरितां दोन वेळां अक्कलकोटास गेले होते. आणि त्यांनीं त्यांचें प्रथम दर्शन करून त्यांस आपले उतरण्याचे ठिकाणी येण्याविषयीं विनंती केली. तेव्हां ते तत्काळ त्यांजबरोबर त्यांचे तंबूंत गेले आणि तीनचार दिवस तेथें राहिले. त्यावेळेस ते रघुनाथराव यांजबरोबर एकांतांत एखादे वेळेस सरळ भाषण करीत, कधीं शि

टीप १ आजानुबाहु असणें हें सामुद्रिकांत महापुरुषाचें लक्षण म्हटलें आहे.

ध्या देत, व कधीं क्रोधानेंही बोलत असत. त्यांचे दर्शनार्थ देशोदेशींचे हजारों लोक येत असत. शें दोनशें नवी यात्रा त्यांचे दर्शनास आली नाहीं असा दिवस मुळींच गेला नाहीं. तात्पर्य या स्वामींचें वैराग्य पूर्ण दशेस पोहोंचलें असून खरोखरी ते ब्रह्मनिष्ट होते, ह्यांत संशय नाहीं. त्यांजसारखे वैराग्यसंपन्न सत्पुरुष या जगांत थोडेच असतील !

ज्या सद्गृहस्थास दाहा बारा वर्षांपूर्वी बागलाण प्रांतांतील व त्याचे आसमंतांतील लोक प्रथम "देवमामलेदार" अशी संज्ञा देऊन पूज्य मानूं लागले, ते गृहस्थ पुणें जिल्ह्यांतील इंदापूर तालुक्यांत नीरानरसिंहपुरापासून सुमारें आठ कोसांवर भोंसें ह्मणोन जें गांव आहे तेथील मुळचे राहाणारे आहेत. त्यांचा कुलस्वामी नीरा व भीमा यांचे संगमस्थानांतील श्रीनरसिंह हा आहे. व त्याजवर त्यांची बाळपणापासून मोठी निष्ठा असल्यामुळें हल्लीं त्यांचे घरीं जी पाषाणाची त्या देवाची मूर्ति आहे, तिची त्यांनीं सदैव अंतःकरणें करून उपासना केली असें लोकांत प्रसिद्ध आहे. यशवंतराव महाराज (देवमामलेदार)

ते वयांत आल्यावर त्यांनीं इंग्रज सरकारचे पदरीं कारकुनीची असामी मिळविली. पुढें त्यांची उत्तरोत्तर बढती होत जाऊन शेवटीं त्यास मामलेदारीचा हुद्दा मिळाला. मामलेदार झाल्यावर त्यांची एक दोन ठिकाणीं बदली झाल्यावर शेवटीं ते बागलाण प्रांतांत सटाणें तालुक्याचे मामलेदार झाले.

लहान वयापासून त्यांचे अंगीं निरहंकार, इंद्रियदमन, भूतदया, शांति, क्षमा, सत्य, अहिंसा, औदार्य आणि परोपकारबुद्धि इत्यादि सद्गुणांचीं बीजें वसत होतींच. तशांत त्यांस सत्समागम बराच घडला असून त्यांनीं श्रीनरहरीची सेवाही एकनिष्ठेनें केली. त्यामुळें त्यांचे वरलिहिलेले बीजरूप सद्गुण वृद्धिगत होऊन ते पूर्णतेस आल्यानें त्यांचे संपूर्ण खासगी वर्तनांत ते दृष्टीस पडूं लागले इतकेंच नाहीं, तर, सरकारी कामांत सुद्धां त्यांसें वर्तन अत्यंत न्याय

दृष्टीचें व क्षमाशीलपणाचें होऊं लागलें, त्यामुळें ते सर्वमान्य हो-
ऊन संपूर्ण लोक त्यांजवर प्रेम करूं लागले, आणि तें प्रेम वाढतां
वाढतां इतकें वाढलें कीं, त्यांजवळ रात्रंदिवस शेंकडों लोक जमा
होऊन त्यांस "यशवंतराव महाराज" असें ह्मणूं लागले. आणि
भाविक जनांत तर वर लिहिल्याप्रमाणें त्यांजविषयीं अत्यंत पूज्य
बुद्धी उत्पन्न होऊन ते त्यास देव मामलेदार असें म्हणून नवस सु
द्धां करूं लागले. आणि चमत्कार हाच वाटतो कीं, त्या नवसांचे
योगानें पुष्कळ भाविक लोकांचे मनोरथ पूर्ण होऊं लागले. होतां
होतां त्यांचे साधुत्वाची इतकी प्रसिद्धी झाली कीं, दूरदूरचे प्रांतांतून सुद्धां
हजारों लोक यात्रेप्रमाणें त्यांचे दर्शनास येऊं लागले. त्या लोकां-
चा आदरसत्कार करण्यांतच या पूज्य मामलेदाराचा पुष्कळ मौल्य
वान वेळ खर्च होऊं लागला. हें वर्तमान सरकारी वरिष्ठ अधिका-
ऱ्यांचे कानावर गेलें. परंतु यशवंतराव यांनीं सरकारी नौकरी पंच
वीस वर्षांवर इमानानें केली असून त्यांचे प्रामाणिकपणास कधींही
कलंक लागला नाहीं. हें सरकारी कामगारांनीं मनांत आणून त्यांस
कांहीं ठपका न देतां नौकरी सोडून देऊन पेनशन मागण्यास सांगि
तलें; परंतु तसें न करितां त्यांनीं सरकारी नौकरीचा राजीनामा मा
त्र दिला.

या प्रमाणें नौकरीचे वेधापासून ते मुक्त झाले असतां वाटेल
तिकडे मोकळेपणें फिरूं लागले. आणि दर्शनाकरितां त्याजकडेही
हजारों लोक बिनादिक्कत येऊलागले. पुढें ते पुणें व मुंबई या शहरां
स गेले. तेव्हां त्यांचे दर्शनास येणाऱ्या मनुष्यांचीं इतकी मोठी ग-
र्दी होऊं लागली कीं, तंटा बखेडा होऊं देऊं नये ह्मणोन त्यांचे मु
क्कामाचे ठिकाणीं सरकारतर्फेनें पोलीसचे पाहारे सुद्धां राहूं लागले.
शिवाय हलवाई, नारळवाले, फुलवाले माळी, वगैरेचीं दुकानें
यात्रेकऱ्यांचे सोईकरितां येऊं लागलीं. आणि लोक नवसांबद्दल
त्यांजपुढें शेंकडों रुपयांची मिठाई व नारळ ठेऊं लागले. किंवा त्यां

घे नांवानें वांटूं लागले. सारांश त्या सत्पुरुषासंबंधीं किती गोष्टी लिहिल्यातरी त्या संपणार नाहींत!

रघुनाथराव यांनीं त्यांचें दर्शन प्रथम सटाण्यास जाऊन घेतलें. तेव्हां पासून त्यांजवर त्या महाराजांची मोठी कृपा झाली. आणि कधीं कधीं ते विंचुरास येऊन रघुनाथराव यांचे वाड्यांत दोन तीन महिने पर्यंत स्वसंतोषानें राहूं लागले. एके वेळेस तर पांच महिन्यावर राहिले. रघुनाथराव यांची स्त्री सौ॰ जानकीबाई ह्याही महाराजांची बहुत सेवा करूं लागल्या. आणि महाराजही त्यांजवर कृपादृष्टी ठेवूं लागले. कारण त्यांनीं त्या पतिव्रता व साध्वी बाईस आपली धर्मभगिनी असें मानिलें होतें. रघुनाथराव यांनीं एके समयीं महाराजास गंडकीशिलेच्या उत्तम प्रकारच्या चार मूर्ति नजर केल्या. त्या, एक नरहरीची, दुसरी गरुडाची, तिसरी हनुमानाची, व चौथी प्रल्हादाची अशा होत्या. ह्या चारही मूर्तींची महाराज दररोज पूजा करीत असतात. परस्परें भेटीझाल्यावर महिना दोन महिने लोटले असतां महाराज जेथें असतील तेथें रघुनाथराव कुटुंबासुद्धां जाऊन त्यांचें दर्शन घेत. याप्रमाणें सात आठ वर्षे क्रम चालला. अलीकडे श्रीमंत तुकोजीराव होळकर यांनीं महाराजांस इंदुरास नेऊन आपले वाड्यांत ठेविलें होतें त्यामुळें कांहीं महिने पर्यंत रघुनाथराव यांस त्यांचें दर्शन झालें नाहीं, तथापि ते पत्रद्वारें वरचेवर त्यांचें कुशल वृत्त विचारीत असत. दोन तीन वर्षांपूर्वीं रघुनाथराव यांची वर लिहिलेली स्त्री नरसिंहपूर येथें परलोकवासी झाली. त्यावेळेस त्या भक्तिमान बाईनें अंतकालीं महाराजांचे पुष्कळ स्मरण केलें. पुढें महाराजांस त्यांचे परलोकगमनाचें वर्तमान समजलें, तेव्हां त्यांस बहुत दुःख झालें. असो रघुनाथराव यांची महाराजांचे ठायीं मोठी निष्ठा असून महाराजही त्यांजवर मोठा लोभ ठेवीत आहेत.

या प्रकारें रघुनाथराव यांस सत्पुरुषांची दर्शनें होऊन त्यांची सेवा घडली.

या प्रमाण श्रीमंत रघुनाथराव उर्फ अण्णासाहेब विंचुरकर यांचे हातून जीं प्रशंसनीय सत्कृत्यें झालीं तीं, व त्यांस कित्येक सत्पुरुषांचीं दर्शनें होऊन त्यांची सेवा घडली ती, अशीं हीं दोन्ही प्रकरणें या भागांत लिहून तो येथें समाप्त केला असे.

---

तीर्थयात्रा प्रबंधाचा
चवथा भाग समाप्त.

# परिशिष्ट १.

---

## काशीक्षेत्रांतील चोवीस यात्रा.

---

श्रीमंत रघुनाथराव ऊर्फ अण्णासाहेब विंचुरकर यांच्या काशी यात्रेचें निरूपण आम्ही या ग्रंथाच्या पहिल्या भागांत केलें. त्या प्रसंगीं काशीक्षेत्राचें वर्णन संक्षेपानें लिहिलें. त्यां क्षेत्रामध्यें ज्या चोवीस यात्रा करण्यास सांगितल्या आहेत, तो प्रकार विस्तारानें तेथें लिहिला नाहीं. कारण, अण्णासाहेब यांची महायात्रा हा विषय प्रधान असून हा यात्रांचा विषय त्याचा अंगभूत होय, ह्मणून प्रधान विषयांत अंगभूत विषयाचा अति विस्तार करणें ठीक वाटेना, यास्तव त्या प्रसंगीं तें प्रकरण तसेंच ठेविलें. आतां तेंच प्रकरण परिशिष्ट रूपानें येथें स्वतंत्र लिहितों यांत काशीक्षेत्रामध्यें कर्तव्य ज्या चोवीस यात्रा त्यांचा पुराणोक्त क्रम कसा आहे, व प्रत्येक यांतेंत देवता किती आहेत, व प्रति यात्रेंतील देवता व तीर्थें यांचीं नावें कोणतीं आहेत, व ज्या देवता प्रसिद्ध नाहींत त्यांचीं स्थानें कोणत्या ठिकाणीं आहेत, या गोष्टीचें सविस्तर वर्णन केलें आहे. एणें करून वाचकांस व विशेषंकरून यात्रेकरू लोकांस त्या यात्रांचा पुराणोक्त क्रम कसा आहे याची माहिती होण्यास ठीक पडेल. तसेंच पुण्य तीर्थें आणि देवता यांचीं नांवें वाचण्यांत आल्यानें भाविक वाचकांस धर्मसंबंधानें पाहातां कांहीं तरी पुण्यांश प्राप्त होईल असाही एक उद्देश आहे!

---

टीप १ आम्ही पुढें जीं देवतादिकांचीं नांवें लिहिलीं आहेत तीं, 'विश्वेश्वर' 'भवानी' 'ढुंढीराज' 'मणिकर्णिका' 'दंडपाणी' अशीं प्रथमांत लिहिलीं आहेत. यांतून प्रत्येक नामाचें संस्कृत चतुर्थ्यंत रूप करून त्याच्या आरंभीं 'श्री' आणि अंतीं 'नमः' अशीं पदें जोडिलीं असतां त्या त्या देवतेचा तो नाममंत्र होतो. जसें 'श्री विश्वेश्वरायनमः' 'श्री भवान्यैनमः' 'श्री ढुंढिराजा-

सदरहू यात्रांचें निरूपण करण्यापूर्वी यात्रेकरू यास काशीस पोंचल्यावर तेथें प्रथम तीर्थविधि करावा लागतो तो प्रकार थोडक्यांत सांगतों. यात्रेकरू यानें प्रथम चक्रपुष्करिणी नामक तीर्थी जाऊन तेथें तीर्थभेट व अर्घ्यदान करून सचैलस्नान करावें मग मणिकर्णिकातीर्थी प्रायश्चित्तपूर्वक मुंडन ( क्षौर ) करून स्नान करावें. नंतर ज्ञानवापीनामक तीर्थी येऊन त्या तीर्थाचें वंदन आचमन करून, प्राणायाम करावा. मग विश्वेश्वराचें व धर्मधर्मेश्वराचें दर्शन करावें. त्या दिवशीं उपोषण करून दुसरे दिवशीं पितृद्देशेंकरून तीर्थ श्राद्ध करावें. या प्रमाणें तीर्थविधि आटपल्यावर व्यासांनीं सूतास एक यात्रा करण्यास सांगितली आहे ती पहिल्या प्रथम करावी. या यात्रेंत दहा देवता सांगितल्या आहेत त्या अशाः— १ आदित्य, २ द्रौपदी, ३ विष्णु, ४ दंडपाणी, ५ महेश्वर, ६ ढुंढिविनायक, ७ ज्ञानवापी, ८ तारकेश्वर, ९ ज्ञानेश्वर, १० महाकालेश्वर. या देवतांचीं दर्शनें या लिहिलेल्या क्रमानें करावीं; ज्ञानवापीचें मात्र दर्शन करून तेथें आचमन व मार्जन करावें. सर्वांचीं दर्शनें झाल्यावर दंडपाणीचें दुसऱ्यानें दर्शन घेऊन मग पुनः विश्वेश्वराचें दर्शन करून त्याच देवळांत मुक्तिमंडप म्हणून एक स्थान आहे, तेथें किंचित् विश्रांति घेऊन मग घरीं जावें. घरीं जातांनां मणिकर्णिकातीर्थी येऊन त्याचें वंदन व आचमन करावें असा संप्रदाय आहे.

---

यनमः ' ' श्री मणिकर्णिकायैनमः ' ' श्री दंडपाणयेनमः ' कोणी अधिकारी भाविकास नमस्कारादि करण्याची इच्छा असल्यास त्यानें अशीं रूपं उच्चारून नमस्कारादिक करावें.

**टीप.** १ ॥ व्यासउवाच ॥ निशामयमहाप्राज्ञलोमहर्षणनन्दिते ॥ यथाप्रथमतोयात्राकर्तव्यायात्रिकैर्मुदा ॥ १ ॥ आदित्यद्रौपदींविष्णुंदंडपाणिमहेश्वरं ॥ नमस्कृत्य ततोगच्छेद्द्रष्टुंढुंढिविनायकं ॥ २ ॥ ज्ञानवापीमुपस्पृश्यतारकेशंततोर्चयेत् ॥ ज्ञानेशंच समभ्यर्च्यमहाकालेश्वरंतथा ॥ ३ ॥ ततःपुनर्दंडपाणिमित्येषानित्ययात्रिका ॥ ततोमंडपमागत्यविश्राम्यस्वगृहंव्रजेत् ॥ ४ ॥

( या श्लोकांचा भावार्थ [illegible] )

या प्रमाणें काशीक्षेत्रांत प्रथमच यात्रा करण्यास सांगितली आहे तिचा क्रम सांगितला. आतां त्या क्षेत्रांत ज्या चोवीस यात्रा करण्यास सांगीतल्या आहेत त्यांचीं नांवें आणि प्रत्येक नावापुढें त्यांतील देवतांची संख्या कोष्टकरूपानें खालीं देतों.

चोवीस यात्रांचीं नांवें व प्रत्येक यात्रेंतील देवतांची संख्या यांचें कोष्टक.

| यात्रा नाम. | देवतासंख्या. | यात्रा नाम. | देवतासंख्या |
|---|---|---|---|
| १ नित्ययात्रा. (लहान) | १० | १४ चतुःषष्टियोगिनी यात्रा. | ६४ |
| २ नित्ययात्रा मोठी. (काशीखंडांतील) | २६ | १५ दक्षिणमानस यात्रा. | ११७ |
| ३ अंतर्गृही यात्रा. | १०० | १६ उत्तरमानसया० | १२३ |
| ४ पंचतीर्थी यात्रा. | १६ | १७ नगर प्रदक्षिणा यात्रा. | ५५ |
| ५ पंचक्रोशीयात्रा. | १८६ | | |
| ६ छपन्नविनायक यात्रा. | ५६ | १८ सप्तऋषियात्रा. | ८ |
| | | १९ अष्टविनायक यात्रा. | ८ |
| ७ बेताळीस लिंगांची यात्रा. | ४२ | २० द्वादशज्योतिर्लिंग यात्रा. | १२ |
| ८ एकादशरुद्रयात्रा. | ११ | | |
| ९ अष्टभैरवयात्रा. | ८ | २१ नवग्रहयात्रा. | ९ |
| १० द्वादशादित्ययात्रा. | १२ | २२ मोक्षप्रदक्षिणा यात्रा. | ९३ |
| ११ अष्टवसुयात्रा. | ८ | २३ अविमुक्तिप्रदक्षिणायात्रा. | ४९ |
| १२ नवदुर्गायात्रा. | ९ | | |
| १३ नवगौरीयात्रा. | ९ | २४ सप्तपुरीयात्रा. | ७ |

वर ज्या चोवीस यात्रा लिहिल्या, त्यांपैकीं कोणतीही यात्रा

करणें झाल्यास प्रथम मणिकर्णिका तीर्थांत स्नान करून ज्ञानवापीस यावें. तेथें तीर्थवंदन, आचमन व प्राणायाम करून विश्वेश्वराचें दर्शन घेऊन त्याची पूजा करावी. नंतर मुक्तिमंडपांत येऊन जी यात्रा कर्तव्य असेल तिचा संकल्प करावा, नंतर विश्वेश्वराचें दर्शन घेऊन मणिकर्णिकेस यावें, तेथें वंदन आचमन प्राणायाम करून यात्रेस आरंभ करावा, यात्रा समाप्त झाल्यावर विश्वेश्वराचें दर्शन करून मुक्तिमंडपांत यावें, तेथें यात्रा ईश्वरास अर्पण करावी, नंतर पुनरपि विश्वेश्वराचें दर्शन घेऊन मणिकर्णिकेस येऊन तेथें वंदन आचमन करून घरीं यावें. या प्रमाणें प्रत्येक यात्रेचा क्रम जाणावा. यात्राक्रमांत एखादी देवता दुसरे देवतेचे सन्निध असते, तरी सन्निधानाप्रमाणें क्रम न धरितां पुराणोक्त क्रमाप्रमाणेंच दर्शनें घेतलीं पाहिजेत, असा नियम आहे. या प्रमाणें प्रति यात्रेचा क्रम जाणावा.

असमर्थांकरितां सुगम यात्रा.

वर ज्या चोवीस यात्रा सांगितल्या त्या ज्यांस होत नाहींत असे जे बाल, वृद्ध, रोगी, अशक्त, अशा लोकांकरितां एक वेगळीच यात्रा शंकरांनीं कृपाळूपणें सांगितली आहे, तिचा क्रम असाः—मध्यान्हीं मणिकर्णिकातीर्थीं स्नान तर्पण करून मग विश्वेश्वर, अन्नपूर्णा, ढुं-

---

टीप ॥ श्लोक ॥ स्नात्वाचोत्तरवाहिन्यायांतिविश्वेश्वरालय ॥ अदूरःपरिपेपितोगृह्णीयान्नियमव्रती ॥ १ ॥ आलस्येनापियोगच्छेत्कुर्याद्विश्वेशदर्शनं ॥ पदेपदेश्वमेधस्य फलंप्राप्नोतिमानवः ॥ २ ॥ श्रीमद्विश्वेश्वरेदृष्टेदृष्टाःस्युःसर्वदेवताः ॥ मणिकर्णिकावगाहनसर्वतीर्थावगाहनं ॥ ३ ॥ भावार्थ—उत्तर वाहिनीं गंगेचें स्नान करून विश्वेश्वराचें दर्शन घेऊन उक्तनियमांचें धारण करावें आळसानें जरी कोणी विश्वेश्वराचे दर्शनास जाईल तरी त्यास पदोपदीं अश्वमेध यज्ञाचें फल प्राप्त होतें विश्वेश्वराचें दर्शन घेतलें असतां सर्व देवतांचें दर्शन घेतल्याचें फल प्राप्त होतें. मणिकर्णिकेचें स्नान केलें असतां सर्व तीर्थांचें स्नान केल्याचें फल प्राप्त होतें.

---

टीप २ ॥ श्लोक ॥ विश्वेश्वरंनमस्कृत्यसंपूज्यजगदीश्वरं ॥ यात्राफलमवाप्नोति सहस्रगुणितांहितत् ॥ १ ॥ भावार्थ—विश्वेश्वराचें दर्शन करून पूजन केलें असतां यात्राफल सहस्रगुणित प्राप्त होतें.

ढुंढिराज, ज्ञानवापी, कालभैरव. दंडपाणी, इतक्या देवतांची दर्शनें करावीं आणि घरीं जावें. या यात्रेस संकल्प वगैरे यात्रेचे नियम धारण करण्याचें कारण नाहीं. फक्त देवतांचीं दर्शनें घेतलीं ह्मणजे झालें.

वर चोवीस यात्रांचे कोष्टकांत प्रत्येक यात्रेंतील देवतांची संख्या मात्र सांगितली, आतां त्या देवतांचीं नामें अनुक्रमानें सांगतों.

१ नित्ययात्रा [ लहान ] देवता १० त्यांचीं नांवें. नित्ययात्रा लहान.

| | |
|---|---|
| १ विश्वेश्वर. | ७ गुहा. ( ऋषींची तप करण्याचीं गुंफा.) |
| २ माधव. | ८ गंगा. |
| ३ ढुंढिविनायक. | ९ भवानी. ( अन्नपूर्णा ) |
| ४ दंडपाणी. | १० मणिकर्णिका. |
| ५ भैरव. | |
| ६ काशीदेवी. | लहान नित्य यात्रा समाप्त. |

२ नित्ययात्रा ( मोठी ) देवता १६ त्यांचीं नांवें. नित्ययात्रा मोठी.

| | |
|---|---|
| १ श्रीगंगा. | ९ महेश्वर. |
| २ सिद्धिविनायक. | १० ज्ञानवापी. |
| ३ अन्नपूर्णा. | ११ तारकेश्वर. |
| ४ आदित्य. | १२ नंदिकेश्वर. |
| ५ द्रौपदी. | १३ महाकाल. |
| ६ माधव. ( नकुलेश्वरासन्निध आहे. ) | १४ दंडपाणी. (दुसरें स्थान आहे) |
| ७ दंडपाणी. | १५ विश्वेश्वर. |
| ८ ढुंढिराज. | १६ मोदविनायक. [ विश्वेश्वराचे उत्तर भागीं आहे. ] |

टीप १ ॥ श्लोक ॥ विश्वेशं,माधवं,ढुंढिं,दंडपाणिंच,भैरवं ॥
वंदे काशीं,गुहां,गंगां,भवानीं,मणिकर्णिकां. ॥ १ ॥
( या श्लोकांत सांगितल्या क्रमानें विश्वेशादि देवतांचें वंदन करावें )

| | |
|---|---|
| १७ प्रमोदविनायक [ जटाशंकराचे देवालयाजवळ आहे. ] | २१ मुक्तिमंडप |
| | २२ शृंगारमंडप |
| १८ सुमुखविनायक. ( ज्ञानवापीचे पूर्वेस आहे.) | २३ वैराग्यमंडप |
| | २४ ज्ञानमंडप. |
| १९ दुर्मुखविनायक [ गौरिशंकराचे देवालयाजवळ आहे.) | २५ कैलासमंडप. |
| | २६ मोक्षलक्ष्मीविलासमंडप. |
| २० गणनाथ विनायक. ( मुक्तिमंडपामध्यें आहे. ) | मोठी नित्ययात्रा समाप्त. |

अंतर्गृही यात्रा.

## ३ अंतर्गृही यात्रा[1] देवता १००

| | |
|---|---|
| १ श्री गंगा. | १० जरासंधेश्वर. |
| २ मणिकर्णिका. | ११ सोमनाथ. |
| ३ सिद्धिविनायक. | १२ दाल्भेश्वर. |
| ४ मणिकर्णिकेश्वर. | १३ शूलटंकेश्वर. |
| ५ कंबलेश्वर. | १४ आदिवराहेश्वर. |
| ६ वासुकीश्वर. | १५ ब्रह्मेश्वर. |
| ७ पर्वतेश्वर. | १६ अगस्तीश्वर. |
| ८ गंगाकेशव. | १७ लोपामुद्रा. |
| ९ ललितादेवी. | १८ कश्यपेश्वर. |

१ टीप ॥अंतर्गृहस्ययात्रावैकर्तव्याप्रतिनासरं ॥ प्रातःस्नात्वाविधानेननत्वापंचविनायकान्॥ १ ॥ नमस्कृत्वाथ.वैश्वेशंस्थितोनिर्वाणमंडपे॥ अंतर्गृहस्ययात्रांवैकरिष्येघौघशांतये ॥ २ ॥ गृहीत्वानियमंचेतिगत्वाथमणिकर्णिकां ॥ मौनेनगच्छेत् ॥ भावार्थ—ही अंतर्गृही यात्रा नित्य करायाची. ती प्रातःकाळीं स्नान करून पंचविनायकांचें दर्शन करून विश्वेश्वराचें दर्शन करावें मग मुक्तिमंडपांत जाऊन सकल पातक निरासार्थं अंतर्गृही यात्रां करिष्ये असा संकल्प करून पूर्वोक्त क्रमानें मौनादि नियम धारण करून यात्रेस आरंभ करावा. ती समाप्त झाल्यावर, विश्वेश्वरास येऊन तेथें "अंतर्गृहस्ययात्रेयंयथावद्याकृतामया ॥ न्यूनातिरिक्तयाशंभुःप्रीयतामेनयाविभुः" अशी प्रार्थना करून विश्रांति घेऊन क्रमाप्रमाणें घरा जावें.

१९ हरिकेश.
२० वैद्येश्वर.
२१ ध्रुवेश्वर.
२२ गोकर्णेश्वर.
२३ गोकर्णकूप.
२४ हाटकेश्वर.
२५ अस्थिक्षेपतटाकतीर्थ.
२६ कीकसेश्वर.
२७ भारभूतेश्वर.
२८ चित्रगुप्तेश्वर.
२९ चित्रघंटादेवी.
३० पशुपतीश्वर.
३१ पितामहेश्वर.
३२ कलशेश्वर.
३३ चंद्रेश्वर.
३४ चंद्रकूप.
३५ सिद्धेश्वर.
३६ आत्मवीरेश्वर.
३७ विद्येश्वर.
३८ अग्नीश्वर.
३९ नागेश्वर.
४० संकटादेवी.
४१ हरिश्चंद्रेश्वर.
४२ चिंतामणीविनायक.
४३ सेनाविनायक.
४४ वसिष्ठवामदेव.
[ येथे प्रथम आवरण समाप्त होतें या आवरणांत चव्येचाळीस देवता आहेत. ]
( येथून द्वीतीय आवरणास आरंभ होतो. )
४५ श्री गंगा. ( येथें गंगेचें वंदन करावें. ).
४६ त्रिसंध्यविनायक.
४७ त्रिसंध्येश्वर.
४८ विशालाक्षीदेवी.
४९ धर्मेश्वर.
५० विश्वबाहुकादेवी.
५१ आशाविनायक.
५२ वृद्धादित्य.
५३ चतुर्वक्त्रेश्वर.
५४ धर्मकूप.
५५ ब्राह्मणेश्वर.
५६ मनःप्रकामेश्वर.
५७ ईशानेश्वर.
( येथें द्वितीय आवरण समाप्त होते. या आवरणांत तेरा देवता आहेत. )
( येथून तृतीय आवरणास आरंभ होतो. )
५८ चंडीचंडेश्वर.
५९ भवानीशंकर.
६० अन्नपूर्णा.
६१ ढुंढिराज.

६२ राजराजेश्वर.
६३ नकुलेश्वर.
६४ लांगुलेश्वर.
( येथें तृतीय आवरण समाप्त होतें. या आवरणांत सात देवता आहेत. )
[ येथून चतुर्थ आवरणास आरंभ होतो. ]
६५ परान्नेश्वर.
६६ परद्रव्येश्वर.
६७ प्रतिग्रहेश्वर.
६८ निष्कलंकेश्वर.
६९ मार्कंडेयेश्वर.
७० अप्सरेश्वर.
७१ गंगेश्वर.
( येथें चतुर्थ आवरण समाप्त होतें. या आवरणांत सात देवता आहेत. )
( येथून पंचम आवरणास आरंभ होतो. )
७२ ज्ञानेश्वर.
७३ ज्ञानवापी.
७४ श्री काशीविश्वेश्वर.
७५ नंदिकेश्वर.
( येथें पंचम आवरण समाप्त होतें. या आवरणांत चार देवता आहेत. )
[ येथून सहावे आवरणास आरंभ होतो. ]
७६ तारकेश्वर.
७७ महाकालेश्वर.
७८ पूर्णदंडपाणि.
७९ महेश्वर.
८० मोक्षेश्वर.
( येथें सहावें आवरण समाप्त होतें. या आवरणांत पांच देवता आहेत. )
[ येथून सप्तमावरणास आरंभ होतो. ]
८१ वीरभद्रेश्वर.
८२ अविमुक्तेश्वर.
८३ मोद.
८४ प्रमोद.
८५ सुमुख
८६ दुर्मुख
८७ गणनाथ ( हे पांच विनायक कोठें आहेत, तें पूर्वी लिहिलेल्या यात्रेंत लिहिलें आहे.)
[ येथें सात आवरणें झालीं. या आवरणांत सात देवता आहेत. ]
( येथून आठवे आवरणास आरंभ होतो. )
८८ मुक्तिमंडप.
८९ ज्ञानमंडप.

९० वैराग्यमंडप.
९१ शृंगारमंडप.
९२ कैलासमंडप.
९३ सभामंडप.
९४ मोक्षमंडप.
९५ काशीविश्वेश्वर.
९६ ऐश्वर्यमंडप.
९७ विलासमंडप.
९८ रंगमंडप.
९९ कुक्कुटमंडप.
१०० मोक्षलक्ष्मीविलासमंपड.

[ येथें अष्टमावरणाची समाप्ति झाली. या आवरणात तेरा स्थानें आहेत. येथेंच अंतर्गृही समाप्त होते. ]

( अंतर्गृही यात्रा समाप्त. )

---

## ४ पंचतीर्थी यात्रा, देवता १६.

पंचतीर्थी यात्रा.

१ असीसंगम.
२ असीसंगमेश्वर.
३ दशाश्वमेधतीर्थ.
४ दशाश्वमेधेश्वर.
५ वरुणासंगम.
६ वरुणासंगमेश्वर.
७ विष्णुपादोदक.
८ आदिकेशव.
९ केशवआदित्य.
१० पंचगंगा.
११ पंचगंगेश्वर.
१२ बिंदुमाधव.
१३ मणिकर्णिका.
१४ मणिकर्णिकेश्वर.
१५ आत्मवीरेश्वर.
१६ विश्वेश्वर ( दर्शन करून पूजा करावी. )

या प्रमाणें ही पंचतीर्थी नावाची यात्रा करून कालभैरवाचें दर्शन घ्यावें नंतर घरीं यावें.

( पंचतीर्थी यात्रा समाप्त. )

---

## ५ पंचक्रोशीयात्रा, देवता १८६.

पंचक्रोशी यात्रा.

काशीक्षेत्रांत असतां जीं कायिकवाचिकादि पातकें घडतात, त्यांच्या निरासार्थ ही यात्रा विहित आहे. तिचा क्रम असाः—पाहांटेस उठून पंचगंगेचें स्नान व संध्या झाल्यावर मणिकर्णिकेस स्नान

करून ज्ञानवापीस यावें. तेथें वंदन, आचमन, प्राणायाम करून विश्वेश्वराची पूजा करावी. नंतर मुक्तिमंडपांत येऊन यात्रेचा संकल्प करावा, तो प्रकार असाः—देशकालाचाउच्चार करून "अमुक नाम्नोमम काशी वाराणसी अविमुक्तपुरी अंतर्गृह इतिचतुर्विधेस्मिन् क्षेत्रेकृत सकलपातकानिरासपूर्वक श्री परमेश्वर प्रीत्यर्थ पंचक्रोशी यात्रा महंकरिष्ये" असा संकल्प करून प्रार्थना करावी ती अशीः—

श्लोक॥काश्यांप्रजातवाक्कायमनोजनितमुक्तये ॥ज्ञाताज्ञातविमुच्यर्थपातकेभ्योहितायच ॥ १ ॥ पंचक्रोशात्मकंलिंगंज्योतीरूपंसनातनं ॥ भवानीशंकराभ्यांचलक्ष्मीश्रीशाविराजितं ॥ २ ॥ ढुंढिराजादिगणैःषट्पंचाशद्भिरावृतं ॥ द्वादशादित्यसहितंनृसिंहैःकेशवैर्युतं॥३॥कृष्णरामत्रययुतंकूर्ममत्स्यादिभिस्तथा ॥ अवतारैरनेकैश्चयुतंविष्णोःशिवस्यच ॥४॥गौर्यादिशक्तिभिर्जुष्टंक्षेत्रंकुर्याम्प्रदक्षिणं ॥ यथांजलिरतःप्रोक्तंमहादेवमहेश्वर ॥ ५ ॥ विहितंअनुसंधायकरिष्येव्रतमुत्तमं ॥ पंचक्रोशस्ययात्रांवैकरिष्येविधिपूर्वकं ॥ ६ ॥ प्रीत्यर्थंतवदेवेशसर्वाघौघप्रशांतये ॥

अशी प्रार्थना करून पुनः नमस्कार करून ढुंढिराजाची प्रार्थना करावी, ती अशीः—श्लोक॥ढुंढिराजगणेशानमहाविघ्नौघशांतय ॥ पंचक्रोशस्ययात्रार्थंदेयाज्ञाकृपयाविभो ॥ १ ॥ अशी ढुंढिराजाची प्रार्थना करून विश्वेश्वराची प्रार्थना करावी ती अशीः—करिष्येअमुकोऽहंपंचक्रोशप्रदक्षिणां ॥ आज्ञांदेहिमहादेवसर्वपापापनुत्तये ॥२॥ अशी विश्वेश्वराची प्रार्थना करावी, नंतर विश्वेश्वरास प्रदक्षिणा करून साष्टांग नमस्कार घालावा. नंतर मोद, प्रमोद, सुमुख, दुर्मुख, गणनायक, या पंचविनायकांचें दर्शन पूजन करून दंडपाणीचें पूजन करून "भक्तांश्चतपसारक्षदंडपाणेनमोस्तुते" अशी प्रार्थना करून कालराजाचें दर्शन पूजन करून विश्वेश्वराचें पुनः पूजन करून मणिकर्णिकेस जाऊन तेथें स्नान करून पंचक्रोशी यात्रेस आरंभ करावा.

टीप. १ येथें अमुक याच्या ठिकाणीं यात्रा करणारानें आपलें नाम उच्चारून उद्देश करावा.

या यात्रेंतील देवतांचीं नांवें अशीं:—

१ मोद.
२ प्रमोद.
३ सुमुख.
४ दुर्मुख.
५ गणनाथ.
६ कालराज.
७ विश्वेश्वर.
८ भवानीशंकर.
९ मुक्तिमंडप.
१० ढुंढिराज.
११ विश्वेश्वर.
१२ मोदादिपंचविनायक.
१३ दंडपाणी.
१४ आनंदभैरव.
१५ मणिकर्णिका.
१६ मणिकर्णिकेश्वर.
१७ सिद्धिविनायक.
१८ गंगाकेशव.
१९ ललितादेवी.
२० जरासंधेश्वर.
२१ रामेश्वर.
२२ दाल्भेश्वर.
२३ शूलटंकेश्वर.
२४ आदिवाराहेश्वर.
२५ शीतलादेवी.
२६ वंदीदेवी.
२७ दशाश्वमेधेश्वर.
२८ दशाश्वमेधतीर्थ.
२९ चतुःषष्टियोगिनी.
३० सर्वेश्वर.
३१ नारदेश्वर.
३२ रुक्मांगदेश्वर.
३३ गौरीकुंड.
३४ नीलकंठ.
३५ केदारेश्वर.
३६ हनुमदीश्वर.
३७ सेतुबंधरामेश्वर.
३८ सीतारामचंद्र.
३९ असीसंगमतीर्थ.
४० असीसंगमेश्वर.
४१ अर्कविनायक.
४२ लोलार्केश्वर.
४३ लोलार्कतीर्थ.
४४ लोलार्कादित्य.
४५ पुष्करतीर्थ.
४६ दुर्गाकुंड.
४७ दुर्गाविनायक.
४८ दुर्गादेवी.

[ येथपर्यंत अठ्ठेचाळीस देवता होतात. येथें दुर्गेची पूजा केली पाहिजे. या दिवशीं घाट चढणें व उतरणें याचे फार श्रम होतात

या करितां येथें मुकाम करितात. तेथें राहाण्यास करव्यांची धर्मशाळा आहे. तेथून गंगा जवळच आहे. येथेंच पहिले दिवशीं मुकाम केला तर गंगेचें स्नान करून दुर्गेची पूजा करावी, व प्रार्थना करावी. तो श्लोक असा; "अथदुर्गेमहादेविकाशीक्षेत्रनिवासिनी ॥ सर्वविघ्नहरेदेविपुनर्दर्शनमस्तुते" ॥ १ ॥ अशी प्रार्थना झाल्यावर देवता दर्शनास आरंभ करावा. त्या देवता अशा:—

४९ विष्वक्सनेश्वर.
५० कर्दमतीर्थ.
५१ सोमनाथ.
५२ कर्दमेश्वर.
५३ कर्दमेश्वर महादेव.

येथें पांच देवता होतात. कर्दमेश्वर देवाची पूजा करून धर्मशाळेंत मुक्कामास जावें; नंतर कर्दमतीर्थीं स्नान करून तर्पण, मध्यान्हसंध्या जाल्यावर श्राद्ध करून पिंडदान करावें. मग ब्राह्मणासहवर्तमान भोजन करावें. आणि तेथेंच राहावें. हें दुसऱ्या दिवशींचे कृत्य झालें. तिसरे दिवशीं कर्दमतीर्थीं स्नान करून ब्राह्मणांस दक्षिणा वाटावी. नंतर कर्दमेश्वराची पूजा करून प्रार्थना करावी. तो श्लोक असा:— कर्दमेशमहादेवकाशीवासिजनप्रिय ॥ त्वत्पूजनान्महादेवपुनर्दर्शनमस्तुते ॥ १ ॥ अशी प्रार्थना झाल्यावर देवता दर्शनास आरंभ करावा त्या देवता येणेंप्रमाणें:-

५४ नागनाथ.
५५ चामुंडा.
५६ कर्णेश्वर.
५७ मोक्षेश्वर.
५८ वीरभद्र.
५९ विकटदुर्गा.
६० उन्मत्तभैरव
६१ भैरवकुंड (येथें मार्जन आचमन करावें.)
६२ नीलकंठ.

---

टीप. १ पहिल्या दिवशीं दुर्गेची पूजा केल्यावर तेथें मुक्काम न करितां या कर्दमेश्वरास येऊन येथील श्राद्धादिक कृत्य करून एथेंच मुक्काम केला ह्मणजे एथें जें कृत्य झालें तेंच पहिल्या दिवशींचें कृत्य झालें असें समजावें. येथें पहिला मुकाम केल्यास पंचक्रोशी यात्रेस पां[illegible] न येगें दुसरे [illegible] झाल्यास साहा [illegible]

६३ नीलगण.
६४ कामकूट.
६५ विमलदुर्गा.
६६ महादेव.
६७ नंदिकेश्वर.
६८ भृंगीश्वर.
६९ ज्ञानेश्वर.
७० भीमविनायक.
७१ गणप्रिय.
७२ विरूपाक्ष.
७३ दक्षेश्वर.
७४ विमलेश्वर.
७५ मोक्षद.
७६ ज्ञानद.
७७ अमृतेश्वर.
७८ गंधर्वसागरतीर्थ.
७९ भीमचंडीदेवी.
८० रविरक्ताक्षगंधर्व.
८१ चंडीविनायक.
८२ नरकार्णवतारकशिव.

(येथें एकूणतीस देवता होतात.) येथें भीमचंडी देवीची पूजा करून धर्मशाळेंत उतरल्यावर गंधर्वसागर नामक तीर्थीं स्नान करून माध्यान्हिक झाल्यावर श्राद्ध, व पिंडदान करावें, नंतर ब्राह्मणांसह भोजन झाल्यावर मुक्काम करावा हें तिसरे दिवशींचें कृत्य झालें. चवथें दिवशीं प्रातःकालीं गंधर्वसागर तीर्थाचें स्नान करून संध्या झाल्यावर ब्राह्मणांस दक्षिणा वांटावी, नंतर भीमचंडीचें दर्शन करून प्रार्थना करावी, तो श्लोक असाः—भीमचंडीप्रचंडानीममाविघ्नविनाशिनी॥ नमस्तेस्तुगमिष्यामिपुनर्दर्शनमस्तुते ॥ १ ॥ अशी प्रार्थना केल्या नंतर देवता दर्शनास आरंभ करावा, त्या देवता येणें प्रमाणें:—

८३ एकपाद विनायक.
८४ महाभीम.
८५ भैरव.
८६ भैरवी.
८७ भूतनाथ.
८८ सोमनाथ.
८९ कालनाथ.
९० कपर्दीश्वर.
९१ कामेश्वर.
९२ गणेश्वर.
९३ मदोत्कटक.
९४ वीरभद्रेश्वर.
९५ चारुमुख.
९६ गणनाथ.
९७ देहलीविनायक.

९८ तत्पार्श्वेषोडशविनायक.
९९ उग्रविघ्नहर्ता.
१०० भक्तानामभयदाता.
१०१ वाममार्गप्रबोधक.
१०२ पापिशास्ता.
१०३ विघ्नहर्ता.
१०४ तपोवन.
१०५ तपोवनपरित्राता.
१०६ सीतारक्षक.
१०७ आयुःकर्ता.
१०८ रोगहर्ता.
१०९ निधिदाता.
११० द्विजाधिप.
१११ तुंदिल.
११२ गणेश्वर.
११३ विश्वरक्षाकृत्.
११४ गणनाथ.
११५ गणप्रिय.
११६ उद्दंडविनायक.
११७ उत्कलेश.
११८ रुद्राणी.
११९ तपोभूमी.
१२० वरुणा.
१२१ रामेश्वर.
१२२ सोमेश्वर.
१२३ भरतेश्वर.
१२४ लक्ष्मणेश्वर.
१२५ शत्रुघ्नेश्वर.
१२६ द्यावाभूमीश्वर.
१२७ नहुषेश्वर.
१२८ चतुर्गणेश्वर.
१२९ श्वेतभूमी.
१३० नवखेचरेश्वर.
१३१ तुळजादेवी.

येथें एकूणपन्नास देवता होतात. या स्थळीं आल्यावर रामेश्वराची पूजा करावी. आणि मुक्काम करून वरुणानदीचें स्नान, माध्यान्हिक झाल्यावर श्राद्ध करून पिंडदान करावें. नंतर ब्राह्मण भोजन घालून आपण भोजन करावें. त्यां दिवशीं यास्थळींच मुक्काम करावा. येथें चौथे दिवसाचें कृत्य समाप्त झालें. पांचवे दिवशीं वरुणातीर्थी स्नान करून संध्या व पितृतर्पण झाल्यावर ब्राह्मणांस भूयसी दक्षिणा वांटावी.नंतर रामेश्वराची पूजा करून प्रार्थना करावी, तो श्लोक—

॥ श्रीरामेश्वररामेणपूजितस्त्वंसनातन ॥ आज्ञांदेहिमहादेवपुनर्दर्शनमस्तुते ॥ १ ॥ अशी प्रार्थना झाल्यावर मार्गास लागून देवता दर्शन करूं लागावें. त्या देवता अशाः—

१३२ असंख्यात तीर्थें.

१३३ देवसंध्येश्वर.

१३४ पाशपाणिविनायक.

१३५ पृथ्वीश्वर.

१३६ मोक्षभूमी.

१३७ स्वर्गभूमी.

१३८ देवभूमी.

१३९ उपसर्वतीर्थ.

१४० कपिलधारातीर्थ.

१४१ वृषभध्वजेश्वर.

येथपर्यंत दाहा देवता झाल्या. येथें आल्यावर वृषभध्वजेश्वराची पूजा करून धर्मशाळेंत उतरावें. नंतर कपिलधारातीर्थी स्नान करून, श्राद्ध, पिंडदान झाल्यावर ब्राह्मणभोजन करून मुक्काम करावा. येथें पांचवे दिवसाचें कृत्य झालें. सहावे दिवशीं प्रातःकाळीं कपिलधारातीर्थी स्नान करून संध्या तर्पण झाल्यावर ब्राह्मणांस दक्षिणा वांटावी. मग वृषभध्वजेश्वराची पूजा करून प्रार्थना करावी, ती अशी ॥ श्लोक ॥ वृषभध्वजदेवेशपितृणांमोक्षदायक ॥ नमोस्तुतेगमिष्यामिपुनर्दर्शनमस्तुते ॥ १ ॥ अशी प्रार्थना झाल्यावर मार्गास लागावें. त्यापुढील देवता येणें प्रमाणें:—

१४२ ज्वालानरसिंह.

१४३ खर्वविनायक.

१४४ वरुणासंगमतीर्थ.

( या स्थळीं वरुणेचा भागीरथीशीं संगम झाला आहे. येथें स्नान, तर्पण केलें पाहिजे. )

१४५ संगमेश्वर.

१४६ आदिकेशव.

१४७ प्रल्हादेश्वर.

१४८ प्रल्हादतीर्थ.

१४९ त्रिलोचनेश्वर.

१५० गोतीर्थ.

१५१ गोपरक्षेश्वर.

१५२ पंचगंगा.

१५३ पंचगंगेश्वर.

१५४ बिंदुमाधव.

१५५ गभस्तीश्वर.

१५६ मंगलागौरी.

१५७ अग्नीश्वर.

१५८ हरिश्चंद्रेश्वर.

१५९ वसिष्ठवामदेव.

१६० पर्वतेश्वर.

१६१ महेश्वर.

१६२ तारकेश्वर.

१६३ सिद्धिविनायक.

१६४ सप्तावरणविनायक.

१६५ मणिकर्णिका.

(पंचक्रोशीस आरंभ केल्यावर मुक्कामी येईपर्यंत मार्गांत भाषण न करिता शिवनाम स्मरण करावें या प्रमाणें जो क्रम, तो येथें मणिकर्णिकेचें स्नान करून सोडावा. ह्मणजे मौन विसर्जन करावें. आणि तेथें ब्राह्मणांस दक्षिणा वांटावी.)

१६६ त्रिसंध्येश्वर.
१६७ विशालाक्षीदेवी.
१६८ शुक्रेश्वर.
१६९ भवानीशंकर.
१७० साक्षीविनायक.

(येथून हातांत यव घेऊन मार्गानें एकसारखें टाकीत जावें.)

१७१ ढुंढिराज.
१७२ अन्नपूर्णा.
१७३ विश्वेश्वर.
१७४ एकयवविनायक.
१७५ ज्ञानेश्वर.
१७६ काशीविश्वेश्वर.
१७७ दंडपाणि.
१७८ कालभैरव.
१७९ वक्रतुंड.
१८० मध्यमेश्वर.
१८१ मुक्तिमंडप.
१८२ विष्णु.
१८३ आनंदभैरव.
१८४ आदित्य.
१८५ मोदादिपंचविनायक.
१८६ श्री विश्वेश्वर.

———o———

श्री विश्वराजवळ आल्यावर श्री विश्वेश्वराची पूजा करून प्रार्थना करावी. त्या प्रार्थनेचे श्लोक आहेत ते असेः—" जयविश्वेशविश्वात्मन्काशीनाथजगद्गुरो ॥त्वत्प्रसादान्महादेवकृताक्षेत्रप्रदक्षिणा॥१॥ अनेकजन्मपापानिकृतानिममशंकर ॥ गतानिपंचक्रोशात्मलिंगसम्यक्प्रदक्षिणात् ॥ २ ॥ त्वद्भक्तिकाशीवासश्चरहितःपापकर्मणा ॥ सत्संगश्रवणाद्यैश्चकालोगच्छतुनःसदा ॥ ३ ॥ हरशंभोमहादेवसर्वज्ञसुखदायक ॥ प्रायश्चित्तंसुनिर्वृत्तंपापानांत्वत्प्रसादतः ॥ ४ ॥ पुनःपापमतिर्मास्तुधर्मबु

---

टीप. १ या पंचक्रोशी यात्रेंत १८६ देवता आहेत ह्मणून आरंभीं सांगीतलें. परंतु ती संख्या नक्की नाहीं. कारण मध्यें मध्यें देवता व ऋषि व तीर्थें यांची स्थानें बहुतच आहेत. तीं इतकीकीं त्यांची नक्की गणना करतां यावयाची नाहीं असें पुराणांत ह्मटलें आहे.

द्धिःसदास्तुमे " अशी प्रार्थना करून ब्राह्मणांस यथाशक्ति, दक्षिणा द्यावी. नंतर पुनः हात जोडून प्रार्थना करावी, तो श्लोक असाः— पंचकोशस्ययात्रेयंयथाशक्तिमयाकृता ॥ न्यूनसंपूर्णतांयातुत्वत्प्रसादादुमापते ॥ १ ॥ अशी प्रार्थना करून नंतर विश्वेश्वराची पुनः पूजा करून तेथून मणिकर्णिकेस यावें. तेथें आचमन प्राणायाम करून घरीं जावें. नंतर दशदानें व गोदानें देऊन यात्रासांगतासिध्यर्थ ब्राह्मणभोजन घालून आपण सकुटुंब भोजन करावें. पंचक्रोशीयात्रा करित असतां वेद, धर्म, विष्णु, शिव इत्यादिकांची निंदाकरणारे व पतित अशांशीं भाषण करूं नये. निषिद्ध पदार्थ भक्षूं नयेत. असत्य भाषण करूं नये. मार्गांत शौचास गेलें असतां स्नान करावें. उजव्या बाजूस काशीक्षेत्र असल्यामुळें त्या बाजूस लघवी करूं नये, व थुंकूंही नये. शुद्ध भावानें प्रदक्षिणा करावी. अशा क्रमानें जो प्रदक्षिणा करील त्याचीं सप्तजन्मींचीं पातकें नाशाप्रत पावतील, असें प्रतिज्ञा पूर्वक विश्वेश्वरांनीं अन्नपूर्णेस सांगितलें, ह्मणून पुराणांत वर्णन आहे.

पंचक्रोशी यात्रा समाप्त.

## ६ छपन्न विनायक यात्रा, देवता. ५६

छपन्नाविनायकयात्रा

| | |
|---|---|
| १ अर्कविनायक, [ लोलार्काचे सन्निध आहे. ] | ६ पाशपाणिविनायक. ( तपोवनाच्या पुढें कर्वाकवड गांव येथें. ) |
| २ दुर्गविनायक. ( दुर्गे सन्निध आहे. ) | ७ खर्वविनायक, [ वरुणा संगम तीर्थासन्निध. |
| ३ भीमचंडीविनायक, (भीमचंडी सान्निध आहे. ) | ८ सिद्धिविनायक, ( मणिकर्णीकाघाटीं. ) |
| ४ देहलीविनायक, ( पंचक्रोशीच्या मार्गांत आहे. ) | ९ लंबोदरविनायक. [ केदारेश्व (चिंतामणिविनायक.) |
| ५ उद्दंडविनायक, महेश्वरासमीप. | |

राचे मार्गे. ]

१० कूटदंतविनायक. [ कर्मीकूटाचे उत्तरेस सिद्धेश्वराचे देवालया जवळ. ]

११ शालटंकविनायक, ( लहरी तळ्याचे नैऋत्यकोणी. )

१२ कूष्मांडविनायक, बुलवर्यगांवीं देवालय आहे.

१३ मुंडाविनायक वडाख्यगांवीं चंडीश्वराचे देवालयाजवळ.

१४ कीकटाद्विजविनायक. धूपचंडीचे पश्चिमेचे भिंतीला.

१५ राजपुत्रविनायक, वरुणा संगमीं.

१६ प्रणवविनायक, त्रिलोचन घाटीं.

१७ वक्रतुंडविनायक, चतुःषष्ठी घाटीं.

१८ एकदंतविनायक, पुष्पदंत महादेवाचे सन्निध.

१९ त्रिमुखविनायक शिवगौरी सन्निध.

२० पचास्यविनायक, पिशाच मोचनीं.

२१ हेरंबविनायक, वाल्मीकगौरीपाशीं पिशाचमोचना जवळ.

२२ विघ्नराजविनायक. चित्रकूट स्थानीं.

२३ वरदाविनायक, सलिलेश्वरा सन्निध.

२४ मोदकप्रियविनायक, आद्वि महादेवाचे सन्निध.

२५ अभयविनायक, शूलटंकेश्वरा सन्निध.

२६ सिंहतुंडविनायक, ब्रह्मेश्वरा सन्निध.

२७ कुणीताक्षविनायक. लक्ष्मी कुंडाचे समीप.

२८ क्षिप्रप्रसादविनायक, पितृ कुंडाचे समोर.

२९ चिंतामणिविनायक. ज्यागेश्वरासमीप.

३० दंतहस्तविनायक. वक्रतुंडाचे समीप.

३१ पिचंडिलविनायक. प्रल्हाद घाटीं.

३२ उद्दंडविनायक, त्रिलोनेश्वरी आहे.

३३ स्थूलदंतविनायक. सोमेश्वरा समीप.

३४ कलिप्रियविनायक. मनःप्रकामेश्वरा समीप.

३५ चुर्तर्दंतविनायक, ध्रुवेश्वराचे

समीप.

३६ द्वितुंडविनायक, सांबादित्या चे समीप.

३७ ज्येष्ठविनायक, ज्येष्ठेश्वराचे समीप.

३८ गजाविनायक. भारभूतेश्वरा चे समीप.

३९ कालविनायक, राजघाटावर.

४० नागेशविनायक, नागेश्वरा समीप

४१ मणिकर्णिकाविनायक,(प्रसिद्द आहे.)

४२ आशाविनायक.[अंतर्गृहीत.]

४३ सृष्टिविनायक भवानीशंकराचे पश्चिमेस.

४४ यक्षविनायक, महाब्रह्मपुरींत आहे.

४५ गजकर्णविनायक. ईशानेश्वरा समीप.

४६ चित्रघंटविनायक, आदिविश्वेश्वरा समीप.

४७ स्थूलजंघविनायक, लांगलेश्वरासमीप.

४८ मंगलविनायक, हरिश्चंद्रेश्वराचे समीप.

४९ मोदविनायक. विश्वेश्वराचे उत्तरेस.

५० प्रमोदविनायक, जटाशंकराचे उत्तरेस.

५१ सुमुखविनायक, ज्ञानवापीचे पूर्वेस.

५२ दुर्मुखविनायक, गौरीशंकराचे समीप.

५३ गणनाथविनायक. मुक्तिमंडपामध्यें.

५४ ज्ञानविनायक, ढुंढिराजाचे पश्चिमेस.

५५ द्वारविनायक ज्ञानवापी समीप.

५६ अविमुक्तविनायक विश्वेश्वराचे देवळाचेपश्चिमेस.

ही छपन्न विनायकांची यात्रा भाद्रपद शुद्धांत प्रति दिवशी प्रतिपदे पासून चथुर्थी पर्यंत करावी. निदान प्रति दिवशीं चवदाचवदा करून चतुर्थीस समाप्त करावी.

छपन्नविनायकांची यात्रा समाप्त

---

## ७ बेचाळीस लिंगयात्रा, देवता ४२.

बेच्याळीस लिंगयात्रा

१ श्री ओंकारेश्वर.

२ त्रिलोचनेश्वर.

३ आदिमहादेव.
४ कृत्तिवासेश्वर.
५ रत्नेश्वर.
६ चंद्रेश्वर.
७ केदारेश्वर.
८ धर्मेश्वर.
९ वीरेश्वर.
१० कामेश्वर.
११ विश्वकर्मेश्वर.
१२ मणिकर्णिकेश्वर.
१३ अविमुक्तेश्वर.
१४ विश्वेश्वर.
१५ अमृतेश्वर. (सप्तावरणविनाकासन्निध.
१६ तारकेश्वर, ज्ञानवापी समीप.
१७ ज्ञानेश्वर. ज्ञानवापींत.
१८करुणेश्वरत्रिसंध्येश्वरासमीप.
१९ मोक्षद्वारेश्वर, त्रिसंध्येश्वरासमीप.
२० स्वर्गद्वारेश्वर.
२१ ब्रह्मेश्वर, दशाश्वमेधीं.
२२ लांगलीश्वर.
२३ वृद्धकालेश्वर.
२४ वृषेश्वर. मध्यमेश्वरासमीप.
२५ चंडीकेश्वर, बडेगांवास.
२६ नंदिकेश्वर, ज्ञानवापीसमीप.
२७ महेश्वर, ज्ञानवापी समीप.
२८ ज्योतीरूपेश्वर, मणिकर्णिकेश्वरासमीप.
२९ शैलेश्वर, कुलस्तंभाचे समीप.
३० संगमेश्वर, वरुणा संगमीं.
३१ ललितेश्वर, राजघाटीं.
३२ मध्यमेश्वर.
३३ हिरण्यगर्भेश्वर, त्रिलोचनीं.
३४ ईशानेश्वर, अंतर्गृहींत.
३५ गोप्रेक्षेश्वर, गोघाटीं.
३६ वृषभध्वजेश्वर, कपिलधारेस.
३७ उपशांतेश्वर, अग्नीश्वरघाटीं.
३८ ज्येष्ठेश्वर सप्तसागरासमीप.
३९ निवासेश्वर, भूतभैरवासमीप.
४० शुक्रेश्वर अन्नपूर्णेसमीप.
४१ व्याघ्रेश्वर भूतभैरवासमीप.
४२ जंबुकेश्वर वक्रतुंडासमीप.

ही यात्रा श्रावणांत प्रति सोमवारीं करावी.

बेचाळीस लिंगयात्रा समाप्त.

८ एकादशरुद्र यात्रा. देवता ११

१ अग्नीश्वर नागेश्वरासमीप.
२ उर्वशीश्वर (वटमूलीं०)

एकादश रुद्रयात्रा.

३ नकुलेश्वर. विश्वेश्वरासमीप.
४ आषाढीश्वर, भारभूतेश्वरा-समीप.
५ भारभूतेश्वर. अंतर्गृहींत.
६ लांगलेश्वर. ज्ञानवापीचे उत्तरेस
७ त्रिपुरांतकेश्वर. अदिविश्वेश्वरा समीप.
८ मनःप्रकामेश्वर. अंतर्गृहींत.
९ प्रीतिकेश्वर. त्रिसंध्येश्वरासमीप.
१० मदालसेश्वर. चंडिकेश्वरासमीप.
११ तीलपर्णेश्वर, कुक्कुटेश्वराचे पाठीमागें.

एकादशरुद्र यात्रा समाप्त.

## ९ अष्टभैरव यात्रा, देवता ८

अष्टभैरव यात्रा.

१ रुद्रभैरव. ( हनुमंतघाटीं. )
२ चंडभैरव, दुर्गासमीप.
३ असीतभैरव, स्वर्गद्वाराचे उत्तरेस.
४ कपालभैरव, कुलस्तंभासन्निध.
५ क्रोधभैरव, बटूक नामाने प्रसिद्ध.
६ उन्मत्तभैरव. पंचक्रोशीत.
७ संहारभैरव, कालभैरव नामानें प्रसिद्ध.
८ भीषणभैरव, ज्येष्ठेश्वरासन्निध.

अष्टभैरव यात्रा समाप्त.

## १० द्वादशादित्य यात्रा, देवता १२

द्वादशादित्य यात्रा.

१ लोलार्कादित्य. असीसंगमीं.
२ उत्तरार्कादित्य.
३ सांबादित्य, सूर्यकुंडासमीप.
४ द्रुपदादित्य, दंडपाणीचे समीप.
५ मयूखादित्य, गभस्तेश्वरा समीप.
६ खखोल्कादित्य. पिलीपिला-तीर्थी.
७ अरुणादित्य. आदिमहादेवा सान्निध.
८ वृद्धादित्य, आशाविनायका समीप.
९ केशवादित्य, वरुणा संगमीं.
१० विमलादित्य. हरिकेशवाचे वनांत.
११ गंगादित्य. गंगाकेशवाचे समीप.
१२ यमादित्य. संकटेच्याघाटावर.

द्वादशादित्य यात्रा समाप्त.

———o———

अष्टवसु यात्रा.

## ११ अष्टवसुयात्रा, देवता ८.

| | |
|---|---|
| १ दक्षेश्वर, वृद्धकालतीर्थासमीप. | ५ नर्मदेश्वर, त्रिलोचनीं. |
| २ पार्वतीश्वर, आदिमहादेवा समोर. | ६ गभस्तीश्वर |
| ३ पशुपतीश्वर, अंतर्गृहींत. | ७ सतीश्वर. रत्नेश्वरासन्निध. |
| ४ गंगेश्वर ज्ञानवापीसमोर. | ८ तारकेश्वर, ज्ञानवापीजवळ. |
| | अष्टवसुयात्रा समाप्त. |

नवदुर्गा यात्रा.

## १२ नवदुर्गा यात्रा, देवता ९.

| | |
|---|---|
| १ शैलपुत्री, शैलेश्वराजवळ. | ७ कालरात्री. अंतर्गृहींत. |
| २ ब्रह्मचारिणी, दुर्गाघाटीं. | ८ महागौरी. संकटा देवी ह्मणून प्रसिद्ध. |
| ३ चित्रघंटा, अंतर्गृहींत. | ९ सिद्धेश्वरी, चंद्रेश्वरासमीप. |
| ४ कूष्मांडी अशीवरची महादुर्गा. | ही यात्रा अष्टमी, नवमी, चतुर्दशी या दिवशीं अवश्य करावी. नवरात्रांत या यात्रेचे मोठें फल सांगितले आहे. |
| ५ स्कंदिनी, वागीश्वरी ह्मणून प्रसिद्ध. | |
| ६ कात्यायनी. विकटा या नामे करून विश्वेश्वरा समीप. | नवदुर्गा यात्रा समाप्त. |

नवगौरी यात्रा.

## १३ नवगौरी यात्रा, देवता ९,

| | |
|---|---|
| १ सुखनिर्मालिकागौरी, गोप्रक्षेश्वरासमीप. | ५ विशालाक्षीगौरी. ( प्रसिद्ध ) |
| २ ज्येष्ठागौरी, ज्येष्ठेश्वरासमीप. | ६ ललितागौरी. ( प्रसिद्ध ) |
| ३ सौभाग्यगौरी. ज्ञानवापी समीप. | ७ भवानीगौरी, भवानीतीर्थावर. |
| ४ शृंगारगौरी, ज्ञानवापीसमीप. | ८ मंगलागौरी, ( प्रसिद्ध ) |
| | ९ लक्ष्मीगौरी. लक्ष्मीकुंडासमीप |
| | नवगौरी यात्रा समाप्त. |

## १४ चतुःषष्टियोगिनी यात्रा, देवता ६४

चतुःषष्टि योगिनीयात्रा.

१ गजानना.
२ सिंहमुखी.
३ गृध्रास्या.
४ काकतुंडा.
५ उष्ट्रग्रीवा.
६ हयग्रीवा.
७ वाराही.
८ शरभानना.
९ उलूकिका.
१० शिवारावा.
११ मयूरी.
१२ विकटा.
१३ अष्टवक्त्रा.
१४ कोटराक्षी.
१५ कुब्जा.
१६ विकटलोचना
१७ शुष्कोदरी.
१८ ललज्जिव्हा.
१९ अश्वदंष्ट्रा.
२० वानरानना.
२१ ऋक्षाक्षी.
२२ केकराक्षी.
२३ बृहत्तुंडा.
२४ सुराप्रिया.
२५ कपालहस्ता
२६ रक्ताक्षी.
२७ शुकी.
२८ श्येनी.
२९ कपोतिका.
३० पाशहस्ता.
३१ दंडहस्ता.
३२ प्रचंडा.
३३ चंडविक्रमा.
३४ शिशुघ्नी.
३५ पापहंत्री
३६ काली.
३७ रुधिरपायिनी
३८ वसाधया.
३९ गर्भभक्षा.
४० शवहस्ता.
४१ अंत्रमालिनी.
४२ स्थूलकेशी.
४३ बृहत्कुक्षी.
४४ सर्पास्या.
४५. प्रेतवाहना.
४६ दंदशूककरा.
४७ क्रौंची.
४८ मृगशीर्षा.
४९ वृषानना.
५० व्यालास्या.
५१ धूम्रनिःश्वासा.
५२ व्योमैकचरणा.
५३ उर्ध्वदृष्टी.
५४ तापीनिशोषीणीदृष्टी

५५ कोटरी.
५६ स्थूलनासिका.
५७ विद्युत्प्रभा.
५८ बलाकास्या
५९ मार्जारी.
६० कटपूतना.
६१ अट्टहासा.
६२ कामाक्षी.
६३ मृगाक्षी.
६४ मृगलोचना.

चतुःषष्टियोगीनी यात्रा समाप्त.

---

## १५ दक्षिणमानस यात्रा, देवता ११७.

दक्षिणमानस यात्रा.

१ मणिकर्णिका.
२ हनुमदीश्वर.
३ मोदादिपंचविनायक.
४ लक्ष्मीनारायण.
५ अन्नपूर्णा.
६ ढुंढिराज.
७ श्रीविश्वेश्वर.
८ धर्मकूप ( स्नान मार्जन. )
९ धर्मेश्वर.
१० विश्वउखादेवी.
११ सावित्रीवट.
१२ आनंदभैरव.
१३ वृद्धादित्य.
१४ आशाविनायक.
१५ विशालाक्षीदेवी.
१६ त्रिसंध्येश्वर.
१७ त्रिसंधिविनायक.
१८ कर्णीश्वर.
१९ मोक्षद्वारेश्वर
२० राजराजेश्वरीदेवी.
२१ ललितादेवी.
२२ गंगाकेशव.
२३ जरासंधेश्वर.
२४ मोक्षेश्वर.
२५ दाल्भेश्वर.
२६ शूलटंकेश्वर.
२७ आदिवाराहेश्वर.
२८ शीतलादेवी.
२९ दशाश्वमेधेश्वर.
३० दशाश्वमेधतीर्थ. [ मार्जन ]
३१ सर्वेश्वर.
३२ सरस्वतीविनायक.
३३ चतुःषष्टीदेवी.
३४ भद्रकालेश्वर.
३५ कृष्णगोपाळ.
३६ पातालेश्वर.
३७ पुष्पदंतेश्वर
३८ गरुडेश्वर.

३९ तिलभांडेश्वर.
४० रेवातीर्थ. (मार्जन)
४१ नर्मदेश्वर.
४२ बनेश्वर.
४३ नारदेश्वर.
४४ मानससरोवर. (मार्जन.)
४५ क्षेमेश्वर.
४६ चित्रांगदेश्वर.
४७ रुक्मांगदेश्वर.
४८ गौरीकुंडतीर्थ. (मार्जन)
४९ नीलकंठ.
५० केदारेश्वर.
५१ चिंतामणीविनायक.
५२ सेतुबंधरामेश्वर.
५३ हनुमदीश्वर.
५४ सीतारामचंद्र.
५५ कामिकुंड. (मार्जन)
५६ सिद्धेश्वर.
५७ स्वमकुंडतीर्थ. (मार्जन)
५८ स्वमेश्वर.
५९ भरतेश्वर.
६० महावीर.
६१ स्वमेश्वरीदेवी.
६२ असिसंगमतीर्थ. [मार्जन]
६३ असिसंगमेश्वर.
६४ अर्कविनायक.
६५ पाराशरेश्वर.
६६ अमरेश्वर.
६७ लोलार्केश्वर.
६८ लोलार्कतीर्थ. (मार्जन)
६९ स्थाणुकेश्वर.
७० लोलार्कादित्य.
७१ स्थाणुकुंड. (मार्जन.)
७२ कुरुक्षेत्रतीर्थ. [मार्जन]
७३ कुरुक्षेत्रेश्वर.
७४ रणस्तंभेश्वर.
७५ महामय.
७६ कुक्कुटेश्वर.
७७ दुर्गाकुंड. [मार्जन]
७८ दुर्गाविनायक.
७९ दुर्गादेवी.
८० गौबईदेवी. (गऊबाई इजला कवड्या वहाव्या लागतात.)
८१ रेणुकादेवी.
८२ रेणुकातीर्थ. (मार्जन)
८३ शंखोद्धारतीर्थ. [मार्जन]
८४ द्वारकेश्वर.
८५ रणछोडेश्वर.
८६ वैजनाथ.
८७ कामाक्षीकुंड. (मार्जन)
८८ कामाक्षीदेवी.
८९ बटुभैरव.
९० रामकुंड. (मार्जन)
९१ रामेश्वर.

९२ लवकुशतीर्थ. [ मार्जन ]
९३ लवकुशेश्वर.
९४ लक्ष्मीकुंड. ( मार्जन )
९५ कुलिताक्षीविनायक.
९६ महालक्ष्मीदेवी.
९७ नारायण.
९८ सूर्यकुंड. [ मार्जन ]
९९ सांबादित्य.
१०० ध्रुवेश्वर.
१०१ कालिकादेवी.
१०२ वैद्यनाथ.
१०३ गोदावरीतीर्थ. [ मार्जन ]
१०४ गोतमेश्वर.
१०५ त्र्यंबकेश्वर.
१०६ अगस्तिकुंड. [ मार्जन ]
१०७ अगस्तीश्वर.
१०८ क्षिप्रप्रसादविनायक.
१०९ भवानीशंकर.
११० शुक्रकूप. ( मार्जन )
१११ शुक्रेश्वर.
११२ ढुंढिराज.
११३ अन्नपूर्णा.
११४ दंडपाणि.
११५ आनंदभैरव.
११६ ज्ञानवापी.
११७ श्रीकाशीविश्वेश्वर.

दक्षिणमानस यात्रा समाप्त.

---

१६ उत्तरमानस यात्रा[1], देवता १२३.

उत्तरमासन यात्रा.

१ मणिकर्णिकेश्वर.
२ पंचगंगेश्वर[1].

टीप १ ॥ श्लोक ॥ किरणाधूतपापाचपुण्यतोयासरस्वती ॥ गंगाचयमुनाचैवपंचनद्यःपुनंतुमां ॥ प्रयागेमाघमासेचसम्यक्स्नानेनयत्फलं ॥ तत्फलंकोटिगुणितंपंचनद्याःक्षणेक्षणे ॥ आदौपंचगंगास्नानानंतर मणिकर्णिकास्नानंतर्पणंकूर्यात् ॥ ३ ॥ भावार्थ— १ किरणा, २ धौतपाप, ३ सरस्वती, ४ गंगा, ५ यमुना अशा पांच नद्या मिळून जें तीर्थ [ हें भागीरथींत मणिकर्णिके जवळ आहे ]त्यास "पंचगंगा" असें ह्मणतात. प्रयागास माघ मासभर स्नान केल्यानें जें पुण्य प्राप्त होतें त्याच्या कोटीगुणित पुण्य या पंच गंगातीर्थीं प्रतिक्षणीं स्नान केल्यानें प्राप्त होतें. असें या तीर्थांचें मोठें माहात्म्य आहे. प्रथम पंचगंगेचें स्नान करून मग मणिकर्णिकेचें स्नान करून तर्पण करावें असा संप्रदाय आहे.

३ बिंदुमाधव.
४ केशव.
५ वंशगोपाल.
६ लक्ष्मीनरसिंह.
७ श्री दुर्गा.
८ गभस्तीश्वर.
९ मंगलागौरी.
१० मयूखादित्य.
११ दक्षेश्वर.
१२ हनुमतेश्वर.
१३ घृतविनायक.
१४ दधिविनायक.
१५ दुग्धविनायक.
१६ शर्कराविनायक.
१७ मधुविनायक.
१८ अमर्दकेश्वर.
१९ पापभक्षेश्वर.
२० कालमाधव.
२१ नवग्रह.
२२ सुरेश्वर.
२३ आदिभैरव.
२४ कालेश्वर.
२५ कालभैरव.
२६ क्षेत्रपाल.
२७ पांडवेश्वर.
२८ महाकालेश्वर.
२९ कालदंड.
३० कालकूप. (मार्जन)
३१ हंसेश्वर.
३२ हंसतीर्थ. ( मार्जन )
३३ कृत्तिवासेश्वर.
३४ रत्नेश्वर.
३५ सत्येश्वर.
३६ माणकेश्वर.
३७ शंखचूड.
३८ वृद्धकालेश्वर.
३९ वृद्धकालतीर्थ. [ मार्जन ]
४० अमृतकुंड. [ मार्जन ]
४१ अपमृत्युहरेश्वर.
४२ मध्यमेश्वर.
४३ वृक्षेश्वर.
४४ कल्याणदेवी.
४५ मंदाकिनीतीर्थ. ( मार्जन. )
४६ जंबुतीर्थ. ( मार्जन )
४७ जंबुकेश्वर.
४८ वक्रतुंड.
४९ कंदुकेश्वर.
५० गुहाकेशव.
५१ भूतभैरव.
५२ निवासेश्वर.
५३ व्याघ्रेश्वर.
५४ दंडतीर्थ. ( मार्जन )
५५ ज्येष्ठागौरी.
५६ ज्येष्ठेश्वर.

५७ सप्तसागरतीर्थ. ( मार्जन )
५८ सप्तसागरेश्वर.
५९ अरुणादित्यदेवी.
६० घंटाकर्णतीर्थ. [ मार्जन ]
६१ घंटाकर्णेश्वर.
६२ व्यासेश्वर.
६३ भीमकटाविनायक.
६४ पितृकुंडतीर्थ. [ मार्जन ]
६५ पित्रेश्वर.
६६ मातृकुंड. ( मार्जन )
६७ मातृदेवी.
६८ पिशाचमोचनतीर्थ.(मार्जन)
६९ कपर्दीश्वर.
७० वाल्मिकीश्वर.
७१ चित्रकोटतीर्थ. ( मार्जन )
७२ सीतारामचंद्र.
७३ धूपचंडीतीर्थ. [ मार्जन ]
७४ धूपचंडीदेवी.
७५ आग्नीध्रेश्वर.
७६ ईश्वरगंगातीर्थ. [ मार्जन ]
७७ सिद्धेश्वर.
७८ वागीश्वरीदेवी.
७९ लंबोदरविनायक.
८० कर्कोटकतीर्थ. ( मार्जन )
८१ दमयंतीनल.
८२ कर्कोटकेश्वर.
८३ कर्कोटकनाग.
८४ बर्बरीकुंड. ( मार्जन )
८५ पुत्रार्कादित्य.
८६ सुमंतपर्वत.
८७ सुमंतेश्वर.
८८ कुलस्तंभ.
८९ मुंडविनायक.
९० कपालमोचनतीर्थ.[ मार्जन ]
९१ वैतरणीतीर्थ. [ मार्जन ]
९२ प्रेतरणीतीर्थ. [ मार्जन ]
९३ पापमोचनतीर्थ. [ मार्जन ]
९४ ऋणमोचनतीर्थ. [ मार्जन ]
९५ मत्स्योदरीतीर्थ. [ मार्जन ]
९६ ओंकारेश्वर.
९७ ममलेश्वर.
९८ कपिलधारातीर्थ. [ मार्जन ]
९९ कपिलेश्वर.
१०० वृषभध्वजेश्वर.
१०१ ज्वालानरसिंह.
१०२ खर्वविनायक.
१०३ वरुणासंगम. [ स्नान वा मार्जन ]
१०४ संगमेश्वर.
१०५ आदिकेशव.
१०६ यमतीर्थ. [ मार्जन ]
१०७ यमेश्वर.
१०८ प्रल्हादेश्वर.
१०९ त्रिलोचनेश्वर.

| | |
|---|---|
| ११० पिलीपिलातीर्थ. [ मार्जन ] | ११७ मणिकर्णिकेश्वर. |
| १११ हिरण्यगर्भेश्वर. | ११८ सिद्धिविनायक. |
| ११२ आदिमहादेव. | ११९ स्वर्गद्वारेश्वर, |
| ११३ नर्मदेश्वर. | १२० सप्तावरणविनायक, |
| ११४ गोपरक्षेश्वर, | १२१ नीलकंठेश्वर, |
| ११५ कामेश्वर, | १२२ आत्मवीरेश्वर, |
| ११६ मणिकर्णिका, [ स्नान व तर्पण ] | १२३ श्रीकाशीविश्वेश्वर, |
| | उत्तर मानस यात्रा समाप्त, |

१७ नगर प्रदिक्षणा यात्रा, देवता ९५,

नगर प्रदक्षिणा यात्रा

| | |
|---|---|
| १ सिद्धिविनायक. | १७ रुक्मांगदेश्वर. |
| २ मणिकर्णिकेश्वर. | १८ गौरीकुंडतीर्थ. ( मार्जन ) |
| ३ गंगाकेशव. | १९ नीलकंठ. |
| ४ ललितादेवी. | २० केदारेश्वर, |
| ५ जरासंधेश्वर, | २१ हनुमतेश्वर. |
| ६ सोमेश्वर. | २२ श्मशानेश्वर, |
| ७ दाल्भेश्वर. | २३ असीसंगमतीर्थ. ( स्नान वा मार्जन. ) |
| ८ शूलटंकेश्वर. | २४ असीसंगमेश्वर, |
| ९ आदिवाराहेश्वर. | २५ अर्कविनायक, |
| १० शितिकंठेश्वर. | २६ लोलार्कतीर्थ, [ मार्जन ] |
| ११ बंदीदेवी. | २७ लोलार्केश्वर, |
| १२ दशाश्वमेधेश्वर. | २८ दुर्गाकुंडतीर्थ, [ मार्जन ] |
| १३ दशाश्वमेधतीर्थ. [ स्नान अथवा मार्जन. ] | २९ दुर्गादेवी, |
| १४ चतुःषष्टीदेवी. | ३० दुर्गाविनायक, |
| १५ सर्वेश्वर. | ३१ शुक्रेश्वर, |
| १६ नारदेश्वर. | ३२ शालटंकविनायक, |

| | |
|---|---|
| ३३ कूष्मांडविनायक, | ४४ बिंदुमाधव. |
| ३४ पंचपांडवाविनायक, | ४५ पंचगंगेश्वर. |
| ३५ चंडिकेश्वर, | ४६ गभस्तीश्वर. |
| ३६ वरुणा, [ क्रमानें यात्रा केली तर येथें राहावें.] | ४७ मंगलागौरी. |
| | ४८ व्यंकटेश्वर. |
| ३७ वरुणासंगमतीर्थ. [ स्नान वा मार्जन. ] | ४९ अग्नीश्वर. |
| | ५० नागेश्वर. |
| ३८ आदिकेशव. | ५१ वशिष्ठवामदेवेश्वर. |
| ३९ वरुणासंगमेश्वर. | ५२ हरिश्चंद्रेश्वर. |
| ४० प्रल्हादेश्वर. | ५३ पर्वतेश्वर. |
| ४१ पिलीपिलातीर्थ. ( मार्जन ) | ५४ मणिकर्णिकेश्वर. |
| ४२ त्रिलोचनेश्वर. | ५५ श्रीकाशीविश्वेश्वर. |
| ४३ पंचगंगा. ( स्नान वा मार्जन ) | नगर प्रदक्षिणा यात्रा समाप्त. |

सप्तऋषि यात्रा.

१८ सप्तऋषि यात्रा, देवता ७ व अरुंधती आठवी.

| | |
|---|---|
| १ कश्यपेश्वर. | ५ गौतमेश्वर. |
| २ अत्रीश्वर. | ६ जमदग्नीश्वर. |
| ३ भरद्वाजेश्वर. | ७ वशिष्ठेश्वर. |
| ४ विश्वामित्रेश्वर. | ८ अरुंधतीश्वर. |

सप्तऋषीयात्रा समाप्त.

अष्टविनायक यात्रा.

१९ अष्टविनायक यात्रा, देवता ८.

| | |
|---|---|
| १ सिद्धिविनायक. | ५ क्षिप्रप्रसादाविनायक. |
| २ सप्तावरणविनायक. | ६ ढुंढिराजाविनायक. |
| ३ त्रिसंध्य विनायक. | ७ एकयवविनायक. |
| ४ आशाविनायक. | ८ वक्रतुंडविनायक. |

अष्टविनायक यात्रा समाप्त.

## २० द्वादश ज्योतिर्लिंग यात्रा, देवता १२.

| | |
|---|---|
| १ ओंकारेश्वर. | ७ केदारेश्वर, |
| २ महाकालेश्वर, | ८ वैजनाथ, |
| ३ नागनाथ, | ९ रामेश्वर, |
| ४ भीमाशंकर, | १० मल्लिकार्जुन, |
| ५ सोमनाथ, | ११ त्र्यंबकेश्वर, |
| ६ घृष्णेश्वर, | १२ श्रीकाशीविश्वेश्वर, |

द्वादशज्योतिर्लिंग यात्रा समाप्त,

## २१ नवग्रहयात्रा, देवता ९

नवग्रहयात्रा

| | |
|---|---|
| १ सोमेश्वर, | ६ शनैश्चरेश्वर. |
| २ मंगलेश्वर, | ७ आदित्येश्वर. |
| ३ बुधेश्वर, | ८ राहवेश्वर. |
| ४ बृहस्पतीश्वर, | ९ केत्वीश्वर. |
| ५ शुक्रेश्वर. | नवग्रह यात्रा समाप्त. |

---

## २२ मोक्ष प्रदक्षिणा यात्रा, देवता ९३.

मोक्षप्रदक्षिणायात्रा.

| | |
|---|---|
| १ मोक्षविनायक. | ११ सोमेश्वर. |
| २ मोक्षेश्वर. | १२ दाल्भेश्वर. |
| ३ करणेश्वर. | १३ शूलटंकेश्वर. |
| ४ त्रिसंध्येश्वर. | १४ आदिवराहेश्वर. |
| ५ त्रिसंध्यविनायक. | १५ शीतलादेवी, |
| ६ प्रीतिकामेश्वर. | १६ दशाश्वमेधेश्वर. |
| ७ राजराजेश्वर, | १७ दशाश्वमेधतीर्थ. (मार्जन) |
| ८ गंगाकेशव. | १८ सरस्वतीविनायक. |
| ९ ललितादेवी, | १९ कालिकादेवी. |
| १० जरासंधेश्वर. | २० चतुःषष्ठीदेवी. |

२१ कृष्णगोपाल.
२२ पातालेश्वर.
२३ पुष्पदंतेश्वर.
२४ गरुडेश्वर.
२५ तिलभांडेश्वर.
२६ रेवातीर्थ. [मार्जन]
२७ लक्ष्मीकुंड. (मार्जन)
२८ कुलिताक्षविनायक,
२९ महालक्ष्मी.
३० सूर्यकुंड. (मार्जन)
३१ सांबादित्य.
३२ भीमकटविनायक,
३३ निवासेश्वर,
३४ व्याघ्रेश्वर.
३५ ज्येष्ठागौरी,
३६ ज्येष्ठेश्वर,
३७ भूतभैरव,
३८ गुहाकेशव,
३९ कंदुकेश्वर,
४० जंबुकेश्वर,
४१ वक्रतुंडविनायक,
४२ मंदाकिनितिर्थि, [मार्जन]
४३ कल्याणदेवी,
४४ ऋषेश्वर,
४५ मध्यमेश्वर,
४६ जमदग्निऋषि,
४७ अपमृत्युहरेश्वर,
४८ वृद्धकालेश्वर.
४९ वृद्धकालतीर्थ, (मार्जन)
५० अमृतकुंड, (मार्जन)
५१ दक्षप्रजापति,
५२ शंखचूड,
५३ सत्येश्वर,
५४ मणिकेश्वर,
५५ रत्नेश्वर,
५६ कृत्तिवासेश्वर,
५७ हंसेश्वर,
५८ हंसतीर्थ, (मार्जन)
५९ खेतादंडतीर्थ. (मार्जन)
६० कालमाधव.
६१ कालभैरव.
६२ नवग्रह.
६३ पंचपांडव
६४ महाकालेश्वर,
६५ कालदंड.
६६ कालकूप. (मार्जन)
६७ ब्रह्मेश्वर.
६८ दुर्गादेवी.
६९ दुर्गाकुंड. (मार्जन)
७० लक्ष्मीनृसिंह,
७१ पंचगंगेश्वर.
७२ बिंदुमाधव.
७३ पंचगंगा (स्नान वा मार्जन)
७४ गभस्तीश्वर.

७५ मंगलागौरी.
७६ मयूखादित्य.
७७ विष्णु.
७८ व्यंकटेश.
७९ रामतीर्थ. ( मार्जन ).
८० रामेश्वर.
८१ अग्नीश्वर.
८२ नागेश्वर.
८३ विंध्यवासिनी.
८४ संकटादेवी.
८५ हरिश्चंद्रेश्वर.
८६ चिंतामणीविनायक.
८७ सेनाविनायक.
८८ वशिष्टवामदेव.
८९ पर्वतेश्वर.
९० सिद्धिविनायक.
९१ तारकेश्वर.
९२ वशिष्ठ.
९३ श्रीकाशीविश्वेश्वर.
मोक्षप्रदक्षिणा यात्रा समाप्त.

## २३ अविमुक्त प्रदक्षिणा यात्रा, देवता ४९.

अविमुक्त प्रदक्षिणा यात्रा.

१ अविमुक्तेश्वर.
२ सप्तावरणविनायक.
३ स्वर्गद्वारेश्वर.
४ ललितादेवी.
५ शूलटंकेश्वर.
६ शीतलादेवी.
७ दशाश्वमेधेश्वर.
८ दशाश्वमेधतीर्थ. [ मार्जन ]
९ चतुःषष्टीदेवी.
१० गौरीकुंडतीर्थ. [ मार्जन ]
११ नीलकंठेश्वर.
१२ केदारेश्वर.
१३ लंबोदरविनायक.
१४ कोटीदंतविनायक.
१५ वैजनाथ.
१६ त्र्यंबकविनायक.
१७ पंचास्यविनायक.
१८ पिशाचमोचनतीर्थ. [ मार्जन ]
१९ कपर्दीश्वर.
२० हेरंबविनायक.
२१ विघ्नराजविनायक.
२२ वागीशविनायक.
२३ राजपुत्रविनायक.
२४ त्रिलोचनेश्वर.
२५ प्रल्हादतीर्थ. [ मार्जन ]
२६ ब्रह्मेश्वर.
२७ पंचगंगातीर्थ. ( मार्जन )
२८ पंचगंगेश्वर.
२९ बिंदुमाधव.
३० रामतीर्थ. [ मार्जन ]

३१ रामेश्वर.
३२ अग्नीश्वर.
३३ नागेश्वर
३४ विंध्यवासिनी.
३५ संकटादेवी
३६ हरिश्चंद्रेश्वर.
३७ चिंतामणीविनायक.
३८ सेनाविनायक.
३९ वशिष्टवामदेव.
४० पर्वतेश्वर.
४१ पुष्करिणीतीर्थ. (मार्जन)
४२ सिद्धिविनायक.
४३ महेश्वर.
४४ तारकेश्वर.
४५ मणिकर्णिकेश्वर
४६ काशीविश्वेश्वर.
४७ अन्नपूर्णा.
४८ ढुंढिराज.
४९ ज्ञानवापी.

अविमुक्ति प्रदक्षिणा यात्रा समाप्त.

२४ सप्तपुरी यात्रा, देवता ७ यांचीं नावें.

| पुरीचें नाव. | कोणत्या ऋतूंत यात्रा करायाची ती. | पुरीचें स्थळ कोठे आहे तें. |
|---|---|---|
| १ मथुरा. | वसंतऋतूंत. | शैलेश्वराच्या जवळ आदिकेशवा समीप. |
| २ अयोध्या. | ग्रीष्मऋतूंत. | पंचक्रोशींत रामेश्वरा सन्निध. |
| ३ द्वारका. | वर्षाऋतूंत. | शंखोद्धारतीर्था सन्निध. |
| ४ अवंतिका (उज्जयिनी.) | शरदृतूंत. | वृद्धकालेश्वरासान्निध. |
| ५ कांची. (शिवकांची व विष्णुकांची.) | हेमंतऋतूंत | व्यंकटेशासान्निध. |
| ६ मायापुरी. [हरिद्वार.] | शिशिरऋतूंत. | असीसंगमेश्वरा सन्निध. |

| ७ श्रीक्षेत्रकाशी. | वसंतऋतूंत. | श्रीललितादेवी सन्निध. |
|---|---|---|

सप्तपुरी यात्रा समाप्त.

---o---

या प्रकारें काशीक्षेत्रांतील मुख्य चोवीस यात्रा आहेत त्यांचीं नांवें व तत्संबंधी देवतांचीं नावें व प्रत्येक यात्रेंतील देवतांची संख्या सांगीतलीं, या खेरीज पर्व विशेषांच्या विशेष यात्रा स्वतंत्र सांगीतल्या आहेत. शिवाय पर्जन्यकाळीं गंगेस पाणी चढूं लागलें ह्मणजे मर्यादा कल्पिल्या आहेत, त्या त्या मर्यादेपर्यंत गंगा वाढली ह्मणजे वेगळालीं पर्वें होतात आणि त्या पर्वांचीं " इंद्रद्युम्न, पुष्कर, कुरुक्षेत्र, मत्स्योदरी " अशीं वेगळालीं नांवें ठेविलेलीं आहेत. त्या त्या पर्वकाळीं गंगास्नान केलें असतां विशेष फल प्राप्त होतें असें माहात्म्यांत सांगीतलें आहे.

या प्रमाणें काशीक्षेत्रांत नित्य यात्रा वगैरे ज्या चोवीस यात्रा करण्यास सांगीतल्या आहेत त्यांचें सविस्तर निरूपण येथें समाप्त झालें.

---o---

प्रथम परिशिष्ट
समाप्त.

---o---

टीप. १ सात मोक्षपुऱ्या सांगितल्या आहेत त्यांचा श्लोक असा:—॥ अयोध्यामथुरामायाकाशीकांचीअवंतीका ॥ पुरीद्वारवतीचैवसप्तैतामोक्षदायका: ॥ १ ॥ या श्लोकाप्रमाणें पाहातां, १ अयोध्या, २ मथुरा, ३ माया, ४ काशी, ५ कांची, ६ अवंतीका, ७ द्वारका, या प्रमाणें सप्तपुऱ्याचा क्रम दिसतो परंतु वरील कोष्टकांत असा क्रम न धरितां वसंतादिऋतूंच्या क्रमानें त्या लिहिल्या आहेत.

---o---

# परिशिष्ट २ रें.

## महायात्रा.

महायात्रे संबंधी शास्त्रोक्त प्रकार कसा आहे, आणि त्या विषयीं आगगाडी चालू होण्यापुर्वी आपल्या लोकांत चालत आलेला संप्रदाय कसा होता, आणि आगगाडी चालू झाल्यानंतर त्या स्थितीत बदल कशी झाली, या गोष्टीं विषयींची वाचकांस कांहीं माहिती व्हावी ह्मणून त्या बद्दल पुढें थोडेसें निरूपण करितों.

तीर्थें व क्षेत्रें यांच्या यात्रा शास्त्रोक्त नियम धारण करून केल्या असतां देहदंडन होऊन पापाचें क्षालन होतें; आणि पुण्यप्राप्ति होऊन चित्तशुद्धिद्वारा त्या [ यात्रा ] ज्ञानोत्पत्तीस कारण होतात. या प्रमाणें यात्रा ह्या देह आणि चित्त ह्यांच्या शुद्ध्यर्थ ह्मणून शास्त्रांत विहित आहेत.

काशी प्रयाग आणि गया ह्या तीन स्थलांचें माहात्म्य पुराणांत अतिशयित वर्णिलें आहे. त्यांत काशी येथें वास करण्याचे, प्रयाग येथें त्रिवेणीच्या [ गंगा यमुना व सरस्वती ह्या तीन नद्यांच्या संगमीं ] स्नानाचें, गया येथें विष्णुपदीं पिंडदान करण्याचें महाफल सांगीतलें आहे. ह्या तीन स्थलांच्या समुदायास त्रिस्थली ह्मणतात, आणि ह्या त्रिस्थलीच्या यात्रेस महायात्रा असें ह्मणण्याचा संप्रदाय आहे. ह्या त्रिस्थलीच्या यात्रा संबंधानें संस्कृतांत एक स्वतंत्र ग्रंथ आहे त्यास त्रिस्थली सेतु असें ह्मणतात.

गयेस जाऊन विष्णुपदीं पित्रुद्देशानें पिंडदान करणें हें पितृसंबंधानें पुत्राचें मुख्य कर्तव्य होय; एणेकरून पितरांस मुक्ति प्राप्त झाल्यानें पुत्राच्या जन्माची सार्थकता होते, असें आहे ह्मणून गया यात्रा करण्याविषयीं लोकांची फार उत्कंठा असते. गयायात्रेस ग

यावर्जन असें ह्मणतात. याचा मूळ शब्द गयाव्रजन असा आहे, त्याचा हा अपभ्रंश होय. गयावर्जनाची इतकी आवश्यकता आहे कीं सिंहस्थ गुरु, मलमास, गुरु व शुक्र यांचा अस्त, इत्यादिक इतर तीर्थयात्रेस वर्ज्य आहेत, परंतु गया यात्रेस यांचा निषेध मानूंनये, असें शास्त्र आहे. गया यात्रेच्या उद्देशें गेलें तरी काशी आणि प्रयाग हीं महा क्षेत्रें जवळच आहेत तेव्हां इतकें दूर जाऊन त्यांची यात्रा न करितां परत येणें ठीक नाहीं, त्यांचीही यात्रा करणे अवश्य आहे असें मनांत आणून घरींहून गयावर्जनास निघते समयीं त्रिस्थलीयात्रा करण्याचाच उद्देश असतो, व त्या प्रमाणें यात्रेकरू लोक त्रिस्थलीयात्रा म्हणजे महायात्राही करण्याची यथाशक्ति सिध्धता करितात.

महायात्रेस जाण्याचा निश्चय होऊन निघण्याचा मुहूर्त पाहून दिवस ठरला म्हणजे त्याचे पूर्व दिवशीं उपोषण करून दुसरे दिवशीं म्हणजे पारणेच्या दिवशीं यात्रा निर्विघ्न पारपडण्यासाठीं श्रीगणपति, ब्राम्हण, साधुसंत यांची यथाशक्ति पूजा करून यात्रेचा संकल्प करावा. नंतर घृतश्राद्ध म्हणून एक घृतप्रधानक श्राद्ध सांगितलें आहे, तें करून इष्टदेवता, गुरू, व वडील यांची आज्ञा घेऊन कार्पटिकाचा ह्मणजे तिर्थाटन करणाऱ्याचा वेष करून घरांतून सुमुहूर्तावर पादचारीच प्रयाण करावें. प्रथम दिवशीं आपल्या गांवच्या सीमेजवळच मुक्काम करावा. दुसरे दिवशीं प्रातःकाळीं स्नान व संध्या करून ईश्वरनामस्मरण करीत पादचारीच मार्गक्रमण करूं लागावें. दुपारचे वेळेस मुक्काम करून मध्यान्हस्नान इत्यादि मध्यान्ह कृत्य आटपून नैवेद्य, वैश्वदेव, अतिथिपूजन, हीं करून भोजन करावें. भोजन करून मार्गक्रमण करूंनये. या प्रमाणें नित्य मार्ग क्रमीत जावा. आशौचाचा प्रतिबंध प्राप्त झाल्यास शुद्धी होईतोंपर्यंत थांबावें. मार्ग बिकट व भयकारक असेल तर थांबू नये. प्रतिग्रह, परान्न, स्त्रीसंग, इत्यादि वर्ज्य करून सत्यभाषण ब्रह्मचर्यादि नियम

धारण करावे. मार्गक्रमण करितानां छत्री किंवा जोडा यांचें धारण केल्यास चतुर्थांश पुण्य कमी होतें. वाहना रूढ झाल्यास अर्धे पुण्य जाते. मार्गांत अन्य तीर्थ लागल्यास तत्प्रयुक्त उपोषण क्षौर इत्यादि शास्त्रोक्त तीर्थविधि करावा. नदी लागल्यास तिच्या परतीरास जाऊन तेथं तीर्थविधि करावा. सरस्वती नदी लागल्यास तिच्या आलीकडच्या तीरीच तीर्थविधि करावा. तीर्थ प्राप्त झाले असतां स्नान तर्पण, श्राद्धादिक तत्काळ करावें, विलंब लाऊंनये. अकस्मात् महातीर्थ प्राप्त झाले, आणि तेथें राहण्याचा संभव नसला तर भोजन झालें असलें तरीं, रात्र पडली असली तरी, किंबहुना आशौच असलें तरी सूर्यचंद्र यांच्या ग्रहणाप्रमाणें तत्काळ स्नान करून हिरण्यादि शुद्ध करावें, असा महा तीर्थाचा अत्यंत थोर महिमा वर्णिला आहे.

या प्रमाणें मार्गक्रमण करून काशी, प्रयाग, आणि गया, या त्रिस्थलीस जाऊन त्या त्या स्थलीं विहित जीं, स्नान, दान. श्राद्ध, पिंडदान, देवतादर्शनपूजनादिक कृत्यें, तीं सर्व आटपून गंगाजली घेऊन परत स्वग्रामीं यावें. मग गंगेची व गोदेची भेटकरून घरीं दधिश्राद्ध सांगितलें आहे तें करून शेवटीं यात्रेची समाप्ती करून नंतर यात्रा सांगतार्थ गंगापूजन पूर्वक यथाविधि ब्राह्मण भोजन घालावें, या कृत्यास मांवदे असें ह्मणतात.

या प्रमाणें त्रिस्थली यात्रेचा विधि त्रिस्थली सेतु वगैरे ग्रंथांत विस्तारानें सांगितला आहे, त्या प्रमाणें नेम धर्म बाळगून यात्रा करणे परम कठिण आहे म्हणून कांहीं शास्त्र व कांहीं सोय अशा धोरणानें त्रिस्थलीयात्रा करण्याचा संप्रदाय या देशांत आगगाडी झाली नव्हती त्या वेळीं ज्या प्रकारें चालू होता तो प्रकार सांगतों:—

त्रिस्थलीयात्रा करूं इच्छिणारे लोक संगत सोबतीच्या सोई करितां परस्पर संकेत ठरवीत आणि दिवाळी झाली ह्मणजे घराहून निघून मेळाजमून चालते होत. दिवाळी होतांच निघणें झालें म्हणजे

मकर मासाचे सुमारास प्रयागास जाऊन पोंचण्यांस ठीक पडे. ह्या यात्रेकरूंच्या मेळ्यास काफला किंवा संघ असें म्हणत. त्या मेळ्यांत कोणी पायीं, कोणी घोड्यावर, कोणी गाडींत, कोणी डोलींत या प्रमाणें शरीरबल व द्रव्याची अनुकूलता यांच्या मानानें मार्गक्रमण करीत. सर्व यात्रेकरू लोक मागून आलेल्या संप्रदाया प्रमाणें सकाळीं मुक्कामाहून निघतानां सर्वांनीं कालभैरवाचें स्मरण करून मार्ग क्रमण्यास आरंभ करावा. प्रति मंगळवारीं सायंकाळीं काल-भैरवाचे नावानें प्रत्येक यात्रेकरूनें शेरणी वांटावी. मार्गांत अन्य देवता प्राप्त झाली असतां तथील क्रमाप्रमाणें त्या देवतेचें दर्शन वंदनादी करावें. तीर्थ प्राप्त झाल्यास तथील क्रमाप्रमाणें मुंडन श्राद्धादिक तीर्थविधि करावा. या प्रमाणें मार्गक्रमण करण्याची रीत असे.

या प्रकारें मजल दरमजल चालून प्रथम प्रयागास जाऊन पोंचले म्हणजे तथील क्षौर श्राध्धादि विधि झाल्यावर सपत्नीक असतील ते वणीदानादीक तथील कृत्य करून मकर संक्रांत लागल्यापासून एक महिनाभर प्रातःकाळीं त्रिवेणीचें म्हणजे प्रयागाचें स्नान नियमानें करीत. महिनाभर न साधल्यास साधेल तितकेच दिवस करीत. ज्यास एक मासभर त्रिवेणीस्नान घडतें त्यास कल्पवास घडल्याचें फल प्राप्त होतें असा येथील मकर मास स्नानाचा मोठा महिमा आहे.

प्रयाग येथील मकर स्नानें आटपल्यावर यात्रेकरू लोक तेथून महाशिवरात्रीचे सुमारास काशीस जात. तेथें गेल्यावर मणिकर्णि-का तीर्थसंबंधी कर्तव्य जो क्षौरश्राद्धादिक तीर्थविधि तो आटपून कालाष्टक करीत, ह्मणजे कालभैरवप्रीत्यर्थ ब्राह्मणसुवासिनी यांची मिथुनें (मेहुणें) यांस भोजनास घालीत. पुढें काशीतील नित्य यात्रा, अंतर्गृही यात्रा, मोक्षप्रदक्षिणा, दक्षिणमानस, उत्तरमानस, इत्यादि यात्रा करीत. पुढें वसंत ऋतु प्राप्त होण्याचे सुमारास गये

स जाऊन तेथें मधुगया करीत नंतर पुनः काशी येथें परत येत.

काशीस आल्यावर तेथें मार्गशीर्ष शुद्ध १५ या दिवशी पिशाचमोचननामक तीर्थाची यात्रा आहे ती होईपर्यंत यथाशक्ति नियम पाळून आस्थापूर्वक काशीवास करीत असत.

काशीवास करणारास काशीखंडांत बहुत नेमधर्म सांगितले आहेत, त्यांत इंद्रियांचें दमन, मनाचा निग्रह, सत्यभाषण, शौच, ब्रह्मचर्य, इत्यादिक नियम मुख्य आहेत. अशा नियमांचें धारण करून जो कोणी काशीवास करील त्यास तीर्थयात्रेचें उक्त फल प्राप्त होईल असें सांगितलें आहे.

गयायात्रेंत वटश्राद्ध हें मुख्य आहे. तें झाल्यापासून पुढें वटपत्रावर जेऊं नये असा निषेध आहे, तो ते पाळीत असत. कोणी कोणी तर विष्णुपदीं पिंडदान केल्यावर पुढें श्राद्धीं पिंडदान करीत नसत. परंतु यास शास्त्राधार आढळत नाहीं.

काशीहून निघतांनां जें फळ आपणास प्रिय असेल तें जन्मपर्यंत सोडण्याचा वृद्धाचार आहे, येणेकरून काशीयात्रेची स्मृति राहते असें कोणी ह्मणतात. आणि कोणाचें मत असें आहे कीं, फलाशा सोडावी ह्मणजे काम्यकर्में त्यागून, केवळ निष्काम कर्मेंच आचरावीं, असा ह्या फळत्यागांत हेतू आहे. असो, ह्या वृद्धाचारास अनुसरून रघुनाथराव विंचूरकर यांनीं अलाबु ह्मणजे दुध्याभोंपळा सोडिला आहे.

महायात्रा करून परत आल्यावर गोदायात्रा करून घरीं दधिश्राद्ध करण्याचा विधि आहे, तो करीत. नंतर मोठ्या आदरानें आपले इष्ट, मित्र, सोयरे, धायरे, यांस बोलावून ब्राह्मण व सुवासिनी यांस उत्तम प्रकारचें भोजन घालून बरोबर आणिलेले गंगोदकाचा वगैरे प्रसाद देत. या प्रमाणें हें समाप्तीचें कृत्य करीत, या कृत्यास मांवंदे असें ह्मणतात, असें हें मांवंदे करण्याचा प्रचार असे.

काशीयात्रा केल्यावर प्रतिवर्षीं कार्तिक वद्य ८ हा काळभैरवाचे प्रादुर्भावाचा दिवस आहे त्या दिवशीं कालभैरव प्रीत्यर्थ उपोषण करून दुसरे दिवशीं ब्राह्मणभोजन वगैरे घालण्याचा विधि आहे, त्याप्रमाणें ते दरसाल करीत असत.

काशीयात्रा करून आलेले भाविक लोक प्रति दिवशीं सायंकाळीं संध्या झाल्यावर भैरवाष्टक वगैरे स्तोत्रांचा पाठ करण्याचा नियम चालवीत असत.

या प्रमाणें आगगाडी होण्याच्यापूर्वी "महायात्रा" ह्मणजे "त्रिस्थलीयात्रा" करण्याचा जो लोक संप्रदाय चालत होता तो आह्मीं सांगितला. आतां शास्त्रांत सांगीतलेल्या विधीप्रमाणें यथास्थितपणें नेमधर्म पाळून यात्रा करणें फारच कठीण, त्यांत तशी यात्रा प्रस्तुत काळीं घडणें तर अशक्यच हें उघडच आहे. तथापि यथाशक्ति नेमधर्म पाळून मोठ्या भक्तीनें व आस्थेनें लोक यात्रा करीत होते, तोही संप्रदाय आगगाडी चालू झाल्यापासून अगदीं बंद झाला! ही गोष्ट सर्वांच्या अनुभवास स्पष्टपणे येतच आहे ह्मणून तिजविषयीं विशेष सांगण्याचें अगत्य नाहीं.

तीर्थयात्रा ह्मटल्या ह्मणजे एक प्रकारचें तप आहे. यांचे योगानें देहास क्लेश, व श्रम होऊन दंडन होतें. ह्मणूनच मोठमोठ्या पापाच्या प्रायश्चित्तार्थ कृच्छ्रचांद्रायणादि कष्ट साध्य व्रतें सांगितलीं आहेत. तशाच प्रकारें पापाचे प्रायश्चितार्थ तीर्थयात्रादि विधि शास्त्रकारानीं सांगितला आहे. त्यांत तीर्थाची योग्यता, स्थलाचें दूरत्व, आणि त्याची यात्रा करण्याचे क्लेश इत्यादिकाचें तारतम्य लक्षांत आणून प्रायश्चित्ताची योजना केली असते असें उघड दिसून येतें.

आतां आगगाडीनें तीर्थयात्रा केली असतां तीस कष्ट व श्रम लागत नाहींत, तर ती केवळ सुखानें व सहज रीतीनें होते याजकरितां ती करणारास यात्रासंबंधी नेमधर्म कांहीच घडत नाहींत, ह्म

णून यात्रेचें फळ जितकें प्राप्त व्हावें तितकें होत नाहीं, हें उघडच आहे. म्हणून आगगाडीनें त्रिस्थलीची वगैरे यात्रा केल्यास त्या त्या तीर्थी व क्षेत्रीं स्नानदानादि कृत्य करण्यांत येईल, त्याचें मात्र फल प्राप्त होईल, यात्रेचें उक्त फल प्राप्त व्हावयाचें नाहीं! या प्रमाणें आगगाडी झाल्यापासून यात्रेच्या धर्माचा अगदीं लोप झाला! खेरीज कालमानानें लोकांची श्रद्धा व भक्ति नाहीसी झाली ! विरुद्ध धर्माच्या लोकांचा सहवास झाला, त्या योगानें स्वधर्मातील खऱ्या तत्वाचें अज्ञान होऊन परधर्मच बरा वाटूंलागला! तीर्थयात्रा, स्नानसंध्या, पूजाअर्चा, व्रतनियम इत्यादि व दुसरेही कित्येक विधिनिषेध शास्त्रकारांनीं देहदंड, इंद्रिय दमन, मनोजय हीं होण्याकरितां सांगितले आहेत ते सर्व सदोष दिसूं लागले ! लोक युक्तिवादी झाले, त्यामुळें मनाचा भाविकपणा नष्ट झाला! आणि मनाच्या भावनेनें होणारे जे देवतासाक्षात्कारादि अनुभव ते अर्थात नष्ट झाले ! दृष्ट फलाकडेसच लोकांची प्रवृत्ती होऊन अदृष्टावर विश्वास राहिला नाहीं ! वैद्यशास्त्रान्वयें शरीरास जें अपकारकरणारें आढळेल तेंच अभक्ष्य, अपेय व अगम्य होय ! जेणेंकरून शरीरास सुख होईल त्याचेंच सेवन करावयाचें! या प्रकारें वैद्यशास्त्राचे जे विधिनिषेध तेच पुढें पडून धर्मशास्त्रोक्त जे विधिनिषेध, त्यांचा अनादर झाला! लोक इतके युक्तिवादी झाले कीं, मुळीं ईश्वरच नाहीं असें मानण्या पर्यंत गोष्ट येऊन ठेपली ! मग त्या पुढें स्नानसंध्यादि कर्मे, जातिभेद, तीर्थयात्रा, श्रुतिस्मृति इत्यादिकांचें प्रामाण्य, हें कोठून राहाणार? असो ! या सर्व गोष्टींचा विचार केला असतां कित्येक पुराणांतून कलियुगाचें वर्णन केलें आहे, तें सांप्रत कालीं अनुभवास येतें! ह्मणजे लोक युक्तिवादी होतील! शौचाचार नाहींसा होईल! जातिभ्रष्ट होऊन वर्णसंकर होईल ! देवताप्रत्यय येणार नाहीं! स्त्रियांचें माहात्म्य वाढून त्या अमर्याद व निर्लज्य होतील ! पुरुष कामाधीन होऊन स्त्रियांस देवता प्रमाणें मानितील ! श्रुतिस्मृति इत्या

दिकांवर विश्वास राहाणार नाहीं! भक्ष्याभक्ष्य पेयापेय गम्यागम्य इत्यादिकांचे नियम, आणि उपनयन विवाह गर्भाधान इत्यादि संस्कारांचे नियम राहाणार नाहींत! लोक मद्यपान वगैरे दुराचार करतील! स्वल्प अर्थाकरितां देखिल लोक मोठाले घातपात करितील! अर्थाकरितां पितापुत्रांमध्येंही वैरभाव उत्पन्न होईल! सर्वत्र गोवध होऊं लागतील! गंगादिक तीर्थें काश्यादिकक्षेत्रें व देवता यांच्यांत सत्व राहाणार नाहीं! देशांत अवर्षण दुर्भिक्ष्य महामारी इत्यादि नाना उपसर्ग होऊन प्रजांचा संहार होईल! घोर कालि माजला असतां असा प्रकार होईल, ह्मणून अनेक पुराणांतून आढळतें.[1] तोच प्रकार हल्लीं प्रायःचालू होऊन दिवसेंदिवस वृद्धिंगत होत आहे!

---

टीप १ श्लोक ॥ यावत्तिष्ठतिगंगात्रतावत्तीर्थानिसंतिच ॥ स्वस्वस्थानेनृणां-पापंतावदेवहरंतिच ॥ ॥ यदाह्यदृश्यागंगास्यात्कोवातत्पापमाहरेत् ॥ प्राप्तेकलियुगेघोरेशौचाचारविवर्जिते ॥ तत्वसंख्यैर्वर्षशतैर्गतेदेवोमहेश्वरः ॥ वाराणसीस्थलिंगानिपातालेसनयिष्यति ॥ ततोद्विगुणवर्षैस्तुगंगावाराणसीतथा ॥ भविष्यतिह्यदृश्यासासत्वरंतुमुनीश्वराः ॥ अंतर्हितायदाकाशीभविष्यतितदामुने ॥ नाशस्तुलिंगचिन्हानांनिष्प्रभाःसकलाजनाः ॥ चतुर्दिशासुदुर्भिक्षंमहामारीसमुद्भवः ॥ गोवधश्चापिसर्वत्रमृत्तिकाभस्मसन्निभाः ॥ गंगोत्तर्यांतुयाधारापतेत्भागेतुपश्चिमे ॥ हरिद्वाराच्चवायव्येत-स्यालोपोभविष्यति ॥ भागीरथ्यांगतायांतुमर्कटीतंतुसन्निभाः ॥ भविष्यंतिजलेकीटाः जलंनीलीनिभंभवेत् ॥ चतुर्वर्षसहस्रैस्तुशैलस्थाःसर्वदेवताः ॥ सत्वंत्यक्त्वागमिष्यंतिमानसंचसरोवर ॥ गतेषुशैलदेवेषुराजानोधैर्यविच्युताः ॥ पापिष्ठाश्चदुराचारानानेतिपरिपीडिताः ॥ कलेरयुतवर्षाणिभविष्यंतियदाखग ॥ श्रौतस्मार्तस्यलोपस्तुविष्णुत्यक्ष्यतिमेदिनीं ॥ तदालोकाभविष्यंतिमद्यपानपरायणाः ॥ स्वल्पायुषःस्वल्पभाग्यानानारोगैश्चपीडिताः॥द्विजास्तुदक्षिणेदेशेवेदज्ञाःसंभवंतिच ॥ आनीयतान्शाककर्ताधर्मसंस्थापयिष्यति ॥ * * * * *

भावार्थ—जों पर्यंत या भूलोकीं गंगा आहे, तों पर्यंत इतर सर्व तीर्थें स्वस्वस्थानीं राहून जनांचीं पापें दूर करितील. गंगा गत झाल्यावर त्यांचें पाप कोण दूर करील? घोर कलियुग प्राप्त झालें असतां शौचाचार राहाणार नाहीं. कलीचीं अडीच हजार वर्षें गेलीं असतां शंकर हे काशींतील सर्व लिंगांत पाता

हिंदुधर्मान्वयें पाहातां ह्या भरतखंडांत कलीचा प्रादुर्भाव होऊन लोक सदाचारापासून भ्रष्ट झाले आहेत. त्यांत कोणी अंतर्बाह्य दुराचारी आहेत, व कोणी आंतून दुराचारी असून बाह्यात्कारीं दांभिकपणें सदाचारीपणाचा आकार दाखवितात! वास्तविक अंतर्बाह्य सदाचारी व नीतिमान् असे थोडेच सांपडतील! असो! ईश्वरीकृपेनें ह्या स्थितींत बदल होऊन लोक सन्मार्गवर्ती होतील; आणि श्रुति स्मृति इत्यादि सच्छास्त्रावर प्रामाण्यग्रह होऊन ईश्वराचें भय मनांत उत्पन्न होईल, तेव्हां दुराचाराविषयींची वासना नष्ट होऊन सदाचाराविषयींच प्रवृत्ति होईल. आणि कलियुग समाप्त होऊन कृतयुगा-

---

ळीं नेतील. नतर पांच हजार वर्षांनीं गंगा आणि काशी ह्या दोन्ही अदृश्य होतील. काशी अदृश्य झाली ह्मणजे सर्व लिंगचिन्हांचा नाश होईल. मग सब लोक निस्तेज व दीन होतील. चोहींकडे दुर्भिक्ष व महामारी यांचा उद्भव होईल. सर्वत्र गोवध होऊं लागेल. मृत्तिका केवळ राखे प्रमाणें होईल. गंगोत्रीच्या पश्चिमेस व हरिद्वाराच्या वायव्येस जी गंगेची धारा पडते ती नाहींशी होईल. गंगा ( भागीरथी ) रूपदेवता ही गत झाली ह्मणजे तिचें पाणी शाईसारिखें काळें होऊन त्यात बारीक बारीक कीटक होतील. कलीचीं चारहजार वर्षें गेलीं ह्मणजे पर्वतस्थ देवता सत्व टाकतील आणि मानस सरोवरास जातील. या प्रमाणें देवता गेल्या ह्मणजे धैर्यहीन असे राजे होतील. लोक पापी व दुराचारी होतील. अतिवृष्टी, अनावृष्टी, टोळ, उंदीर इत्यादिक उपसर्गांनीं प्रजा पीडित होईल. नानाप्रकारचे रोग व दुर्भिक्ष हीं लोकांस पीडा देतील. कलीचीं दहाहजार वर्षें गेलीं ह्मणजे श्रौतस्मार्त कर्माचा लोप होईल. विष्णु या भूलोकाचा त्याग करितील लोक मद्यपानसक्त होतील; व ते अल्पायुषी व भाग्यहीन होऊन त्यांस नानाप्रकारच्या रोगाची बाधा होईल. मग कलीच्या अंतीं दक्षिण देशांत एक शककर्ता उत्पन्न होऊन तो वेदोक्तधर्माची पुनः संस्थापना करील, असें सनत्कुमार संहितेंतील २४ व्या अध्यायांत वर्णन आहे. या खेरीज श्रीमद्भागवत भारत रामायण इत्यादि पुराणग्रंथांत कलियुगांतील दुराचारांचें विस्तारानें वर्णन केलें आहे त्याचा सारांश आम्ही वर मूळ परिशिष्ट लिहिलें त्यांत आलाच आहे.

चा [ सत्ययुगाचा ] प्रादुर्भाव होईल. मग आर्यलोकांची उत्तम स्थिति होऊन ते आनंदानें व सुखानें नांदू लागतील !

( दुसरें परिशिष्ट समाप्त. )

—o—

# संस्कृत श्लोक.

भूयात्सदायंरघुनाथतीर्थयात्राप्रबंधोजनवृंदतुष्ट्यै ॥
सद्वृत्तशोभातिशयेनरम्योदोषाकरोऽप्यब्जइवप्रसन्नः ॥ १ ॥

शाकेसागरखाष्टभूपरिमितेऽद्वेचित्रभान्वाह्वये ।
चैत्रेमासिचशुक्लपक्षतिदिनेक्षेत्रेशुभेनासिके ॥
ल्लेलेइत्युपनामकःशिवपुरीजन्मागणेशाभिधो ॥।
निन्येऽमुंरघुनाथसत्कृतिपरंग्रंथंसमाप्तिंमुदा ॥ २ ॥

टी० १ अथ ग्रंथकृत् स्वीयां प्रार्थनां इंद्रवज्रवृत्तेन प्रकटयति भूयादिति । अयंपूर्वोक्तः रघुनाथतीर्थयात्राप्रबंधः, रघुनाथस्य रघुनाथाख्यगृहस्थवर्यस्य, इयंकर्तरिषष्ठी तेन रघुनाथकृताइत्यर्थः एतादृश्यः याः तीर्थयात्राः काशीप्रयागादिमहाप्रसिद्धतीर्थयात्राः तद्विषयकः प्रबंधोग्रंथः अब्ज इव चंद्र इव, अब्जोजैवातृकःसोम- इत्यमरेण अब्जशब्दस्य चंद्रपर्यायेषुपठितत्वात् । जनवृंदतुष्ट्यै लोकसमुदायतोषाय सदासर्वकालं भूयात् भवतु इत्यर्थः ॥ कीदृशः ? दोषाकरोऽपि सद्वृत्तशोभातिशयेन रम्यः । दोषाकरोपि दोषप्रचुरोपि चंद्रपक्षे निशाकरोपि । सद्वृत्तशोभातिशयेन, सतः अर्थात् रघुनाथाख्यसत्पुरुषस्य यत् वृत्तं वृतांतः, यद्वासच्चतद्वृत्तंचेतिकर्मधारयः शोभनोवृत्तांतइत्यर्थः ( अर्थात् रघुनाथस्य शोभनवृत्तांतः ) तस्य शोभातिशयेन शोभाभरेण रम्यो मनोहरः। चंद्रपक्षे सत् शोभनं यद्वृत्तं वर्तुलं वर्तुलाकारं बिंबमितियावत् तस्य शोभातिशयेन रम्यो रमणीयः॥ पुनःकीदृशः? प्रसन्नः प्रसादविशिष्टः, प्रसादस्तु ग्रंथे सुबोधार्था पदवाक्ययोजना, चंद्रपक्षेतु निर्मलकांतिमत्वम् ॥ १ ॥

२ इदानीं उक्तः प्रबंधः कदा कुत्रच स्येन समापित इति ग्रंथकृन्निजाभिधाननिर्देशसहितं शार्दूलविक्रीडितेन वृत्तेन विस्तरा

दाह शाकइति । श्रीत्र्यंबकक्षेत्रजन्मा लेले इत्युपनामा गणेशशर्मा अमुं रघुनाथकृतमहायात्रादिसत्कृत्यविषयकं ग्रंथं शालिवाहन शके १८०४ चित्रभानुनामसंवत्सरे चैत्रशुक्लप्रतिपत्तिथौ नासिकक्षेत्रे समाप्तिं नीतवानिति श्लोकतात्पर्यार्थः ॥ रघुनाथसत्कृतिपरमित्यनेन रघुनाथसत्कारपरोप्ययंग्रंथइत्यपिध्वन्यते ॥ २ ॥

## ह्या ग्रंथांतील शब्द वाक्यें इत्यादिकांचें शुद्धिपत्र.

| पृष्ठ. | पंक्ति. | अशुद्ध | शुद्ध. |
|---|---|---|---|
| १ | शिलेख | बिंचुरकर | विंचुरकर. |
| २ | ७ | याच्या | बाऱ्यां |
| ३ | १९ | संवस्थान | संस्थान |
| ४ | बाजू | आन्हिक क्रम | आन्हिक क्रम |
| ४ | १४ | अन्हिक | आन्हिक |
| ४ | १८ | पुर्वक | पूर्वक |
| ७ | बाजू | याचे | यांचे |
| ११ | २ | मुहुर्तानें | मुहूर्तानें |
| १३ | १३ | बृहस्वती | बृहस्पती |
| १३ | १९ | पदांगुष्ठानें | पदांगुष्ठानें |
| १५ | बाजू | ललिगबारी | ललिंगबारी |
| १६ | ५ | जगद्रुरु | जगद्गुरु |
| १७ | ७ | क्षोरविधि | क्षौरविधि |
| २३ | १८ | राज्जावर | राज्यावर |
| २३ | २७ | लिला | लीला |
| २४ | ८ | उत्तरले | उतरले |
| २४ | २५ | आदिकरून | आदिकरून |
| २५ | १० | घ्रत | घृत |
| २७ | १० | कमा | काम |
| ३१ | ३ | नाभें | नामें |
| ३१ | १६ | लाकांबरोबर | लोकांबरोबर |
| ३१ | २५ | दुरा | दुसरा |
| ३२ | ३ | याच्चींच | यांचींच |

| पृष्ठ. | पंक्ति. | अशुद्ध | शुद्ध. |
|---|---|---|---|
| ३४ | १९ | खाल | खोल |
| ३४ | २४ | देवप्रगांत | देवप्रयागांत |
| ३५ | (टीपेंत) | पूज्जा | पूजा |
| ३५ | (टीपेंत) | पुडे | पुढें |
| ३६ | ८ | प्रवृति | प्रवृत्ति |
| ३६ | १३ | गोरवर्ण | गौरवर्ण |
| ३६ | २६ | सग्रहीं | संग्रहीं |
| ३७ | १६ | शिष्पा पैकीं | शिष्यां पैकीं |
| ३७ | १६ | क्षात्रिय | क्षात्रेय |
| ३७ | २५ | श्रीनगारापासून | श्रीनगरापासून |
| ३८ | ४ | ऐक | एक |
| ३८ | १२ | भिल | भिल्ल |
| ३८ | १३ | शिवगंगत्मक | शिवगंगात्मक |
| ३८ | बाजू | कुर्म | कूर्म |
| ३८ | २७ | तिर्थे | तीर्थे |
| ३९ | १ | ऋषींचें | ऋषींचे |
| ३९ | १५ | नाराण | नारायण |
| ३९ | १८ | प्रदीत | प्रदीप्त |
| ४० | १ | पवत | पर्वत |
| ४५ | बाजू | आलकापुरी | अलकापुरी |
| ४६ | ६ | महत | महंत |
| ४७ | ६ | प्रफुलीत | प्रफुल्लित |
| ४७ | १६ | टेंकर्डी | टेंकडी |

| | | | |
|---|---|---|---|
| ४८ | बाजू | पिंपळ | पिंपळ |
| | | कोटी | कोटी |
| ४८ | ११ | जोसी | जोशी |
| ५३ | २९ | ब्रह्मचा | ब्रम्हचा |
| | | यानें | ऱ्यानें |
| ५५ | १ | दवास | देवास |
| ५५ | १९ | जातिल | जातील |
| ५५ | २२ | छातिसावा | छत्तिसा० |
| ५६ | टीप | किंरुष | किंपुरुष |
| ५७ | २१ | पूजारी | पुजारी |
| ५९ | अं०७ | बिल्वके | बिल्वके |
| | | दार | श्वर |
| | | महा० | महादेव |
| ६० | अं०८ | लक्ष्म्या | लक्ष्मणा |
| | | श्रम | श्रम |
| ६१ | अं०९ | उखीमट | उखीमठ |
| ६३ | अं०१९ | उत्पात्ते | उत्पत्ति |
| ६४ | १२ | माठें | मोठें |
| ६५ | २४ | बिद्रूप | विद्रुप |
| ६६ | २४ | दुध | दूध |
| ६९ | २७ | कस्तुरी | कस्तूरी |
| | | मृग | मृग |
| ७० | १९ | गितेचा | गीतेचा |
| ९७ | २१ | बिष्णुनीं | बिष्णूनीं |
| ९८ | टीप | भोगिरथी | भागीरथी |
| ९९ | ४ | कासी | काशी |
| ९९ | ७ | पुष्कइर | पुष्करि |
| | | णी | णी |
| ९९ | बाजू | क्षेत | क्षेत्र |
| ९९ | १४ | मणिक | माणिक |
| | | र्णिका | र्णिका |
| १०० | ८ | कातिवा | कात्तिवा |
| | | सेश्वर | सेश्वर |

| | | | |
|---|---|---|---|
| १०० | २० | भीक्षा | भिक्षा |
| १०१ | ६ | कुप | कूप |
| १०२ | ५ | उपाद्धी | उपाद्धि |
| | | कासंध | कासंबं |
| | | | धीं |
| १०७ | बाजू | कदमेश्वर | कर्दमेश्वर |
| ११० | ८ | कर्जतराजा | कर्जतराजा |
| | | री पणा | री पणा: |
| ११० | ११ | गायायात्रा | गयायात्रा |
| ११२ | बाजू | दारूषेटून | दारूपेटून |
| १२४ | १२ | अद्भूत | अद्भुत |
| १२६ | १७ | ग्रहस्थ | गृहस्थ |
| १२६ | २५ | प्रीत्यर्थ | प्रीत्यर्थ |
| १२७ | ७ | प्रायश्चित | प्रायश्चित्त |
| १२७ | १३ | अर्घ | अर्घ्य |
| १२७ | १३ | सचिल | सचैल |
| १२७ | १८ | प्रात्प | प्राप्त |
| १२७ | टीप | पुंण्याचा | पुण्याचा |
| १२८ | १० | ब्रह्मदे | ब्रह्मदे |
| | | वांनें | वानें |
| १२९ | १ | मदाची | मधाची |
| १२९ | ८ | मदार्ची | मधार्ची |
| १३२ | १४ | झालीं | झाळीं |
| १३४ | १० | बिन्हाहीं | बिन्हाडीं |
| १३६ | १५ | दुर | दूर |
| १३६ | २० | अक्षय | अक्षय्य |
| | | वट | वट |
| १३७ | २ | आलें | आले |
| १३७ | १० | सुठतो | सुटतो |
| १३७ | बाजू | दाषेशां | दोषशां |
| | | तिकर | तिकर |
| १३८ | ३ | संकोचित | संकुचित |
| १४४ | १३ | उज्याड | उजाड |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १४५ | ६ | सुमा ा | सुमारास | १९३ | ३ | गीव्यात्ति तीर्थ | गीष्पत्ति तीर्थ |
| १४६ | ७ | कृष्णांनें | कृष्णानें | १९४ | ६ | श्रेष्ट | श्रेष्ठ |
| १४६ | १९ | लाकाची | लोकाची | १९९ | ५।६ | पुज्यारी | पुजारी |
| १४६ | २० | कृष्णानी | कृष्णानें | २०२ | १० | बदोबस्त | बंदोबस्त |
| १५० | १९ | श्रीमंत | श्रीमंत | २०३ | १२ | संक्रात | संक्रांत |
| १५१ | टीप | मध्यदश | मध्यदेश | २०३ | २१ | त्याची | त्यांची |
| १५१ | टीप | आण | आणि | २०४ | १५ | नासिसा | नाहींसा |
| १६१ | ९ | कोडीव | कोंडीव | २०४ | २० | अनुष्टा नाचे | अनुष्ठा नाचे |
| १६१ | २० | कृष्णम दीर | कृष्णमं दीर | २०५ | १७ | पुर्डे | पुढें |
| १६१ | २७ | प्रायश्चित | प्रायश्चित्त | २०६ | ११ | साडिके | सोडिलें |
| १६१ | ९ | बारीह श्वर | बाराहे श्वर | २०६ | १५ | वैकुंट | वैकुंठ |
| १६५ | २७ | हलेल्या | हलेल्या | २०८ | ९ | मल्लिका र्नून | मल्लिका र्जुन |
| १६६ | २७ | वेदशास्त्र | वेदशास्त्र | | | | |
| १६७ | ६ | राहिल | राहील | २०८ | १९ | प्रख्यांत | प्रख्यात |
| १६८ | २० | अर्शी | अशी | २१२ | १५ | बोलिलें | बोलिले |
| १६९ | २० | लाक | लोक | २१८ | २ | बांधेनें | बाधेनें |
| १७० | २ | पवत | पर्वत | २२० | बाजू | रामतीथ | रामतीर्थ |
| १७० | बाजू | शुक्रेश्वर | शुक्रेश्वर | २२३ | १८ | नदीसी | नदीशीं |
| १७२ | १५ | याच्या | त्यांच्या | २२४ | बाजू | महाकट क्षेत्र | महाकूट क्षेत्र |
| १७४ | २१ | गोदाव रासी | गोदाव रीशीं | २२७ | २ | पूजा | पूजा |
| १७८ | २३ | कृष्णगो पी | कृष्ण गोपी | २३१ | ५।६।७ ११ | वसिष्ट | वशिष्ठ |
| १८१ | १० | तेथं | तेथें | २३८ | १६ | देवापुढी | देवापु ढील |
| १८१ | २२ | भाषणें | भाषण | | | | |
| १८३ | ९ | गेलें | गेले | २३८ | १७ | शिवपंच्या यतन | शिवपंचा यतन |
| १८३ | २७ | अध्धाय | अध्याय | | | | |
| १८५ | ८ | मुर्ती | मूर्ति | २३८ | १८ | केलेलें | केलेलीं |
| १८६ | १७ | प्रसंन्न | प्रसन्न | २३८ | १९ | आश्रीत | आश्रित |
| १८७ | ४ | मूर्तीवि षयीं | मूर्तीवि षयीं | २३८ | १९ | कृष्णा च्यार्य | कृष्णा चार्य |

| | | | |
|---|---|---|---|
| २४१ | ११ | आल | आले |
| २४२ | | सिलाले | शिलाले |
| | | ख | ख |
| २४५ | ७ | तथील | तेथील |
| २४८ | १५ | वदोबस्त | बंदोबस्त |
| २४८ | १९ | अव्वव | अव्यव |
| | | स्था | स्था |
| २४८ | १९ | खुद्द | खुद्द |
| २४९ | २० | स्त्रीया | स्त्रिया |
| २५० | ७ | दुध | दूध |
| २५० | १७ | मेरूपर्व | मेरूपर्व |
| | | तासी | ताशीं |
| २५४ | ९ | शेशषा | शेषशा |
| | | यी | यी |
| २५४ | १८ | आसमं | आसमं |
| | | तता | तात |
| २५५ | १७ | पुत्रोप्तत्ति | पुत्रोत्पत्ति |
| २५५ | २४ | कार्तिका | कात्तिका |
| २५७ | १३ | एकार्ब | एकांब |
| | | रेश्वर | रेश्वर |
| २५७ | २३ | महापुजा | महापूजा |
| २५८ | २ | अनमू | असून |
| २५८ | ३ | मोठीं | मोठी |
| २५८ | ८ | पुजक | पूजक |
| २६० | १ | तैत्तीरीय | तैत्तिरीय |
| २६१ | १० | भुईकिला | भुईकिल्ला |
| २६१ | १७ | तेथन | तेथून |
| २६२ | ५ | उपात्ति | उत्पात्ति |
| २६२ | ६ | गेल | गेले |
| २६२ | ७ | दर्शन | दर्शनें |
| २६२ | ८ | यात्रावि | यात्रावि |
| | | घ | धि |
| २६२ | ९ | अल्या | असल्या |
| | | मुळे | मुळें |

| | | | |
|---|---|---|---|
| २६३ | ७ | त्याचे | त्यांचे |
| २६७ | २ | आपस्तंभ | आपस्तंब |
| २६८ | ३ | ाह्मण | ब्राह्मण |
| २६८ | बाजू | स्मृतश्र | स्मृतिश्र |
| | | वण | वण |
| २६८ | २१ | असूत | असून |
| २६८ | २३ | शंकरा | शंकरा |
| | | च्यार्य | चार्य |
| २६९ | १२ | न्नाम्हण | ब्राह्मण |
| २६९ | १८ | यजुर्वेद | यजुर्वेद |
| २७० | ११ | प्रज्या | प्रजा |
| २७१ | ५ | श्नीनर | श्रीनर |
| | | सिंह | सिंह |
| २७१ | १३ | श्रीगमा | श्रीरामा |
| | | ची | ची |
| २७१ | २७ | रघना | रघुना |
| | | थगव | थराव |
| २७२ | ६ | अवि | अवि |
| | | च्छिन्न | च्छिन्न |
| २७२ | १८ | श्रीयंबके | श्रीत्र्यंब |
| | | श्वर | केश्वर |
| २७२ | बाजू | देवाल्या | देवालया |
| २७२ | ,, | स्थान | [illegible]न |
| २७३ | बाजू | वेळावे | वेळावेळ |
| २७४ | ८ | लिंगानि | लिंगानि |
| २७४ | ११ | १९ श्लोका पुढें (पितामहो नृसिंहश्च रमादेवी पितामही) | |
| २७५ | अं० १ | जद्गुरू | जगद्गुरू |
| २७७ | १५ | गृह्याग्नी | गृह्याग्नि |
| २७९ | २१ | मुर्ति | मूर्ति |
| २८४ | ४ | व्यवहारो | व्यवहारो |
| ० | | उप. | पयुक्त |
| २८४ | ७ | १७९६ | १७६९ |

| | | | |
|---|---|---|---|
| २८९ | २७ | ह्मणुं | म्हणूं |
| २९२ | १४ | सायडे ड्यास | सांयखे ड्यास |
| २९३ | २७ | एका द शीस | एकाद- शीस |
| २९८ | ६ | वृति | वृत्ति |
| २९९ | १४ | हुदा | हुद्दा |
| ३०० | ६ | बुद्धी | बुद्धि |
| ३०२ | १ | या प्रमा ण | याप्रमा णें |

| | | | |
|---|---|---|---|
| २१ | अंक११ | तीलपर्णे श्वर | तिलपर्णे श्वर |
| २६ | टीप | कूयांत् | कुर्यात् |
| २९ | ११ | आथवा | अथवा |
| २९ | १८ | गौरीकूं डतीर्थ | गौरीकुं डतीर्थ |
| | २७ | लोलार्के श्वर | लोलार्के श्वर |
| ३१ | | ज्योर्ति लिंग | ज्योति लिंग |
| ३५ | ४ | सांगीत कीं | सांगित ली |
| ३५ | ७ | पर्वे | पर्वे |
| ३५ | ७ | वर्षांचीं | वर्षांचीं |

## ( परिशिष्ट १. )

| | | | |
|---|---|---|---|
| १० | ४ | वाराण सी | वाराण शी |
| १३ | १० | नंनर | नंतर |
| १४ | अ१०७ | आयु: र्कर्ता | आयु: कर्ता |
| १६ | अं१७३ | विश्वश्वग | विश्वेश्वर |
| १७ | ११ | काशीक्षत्र | काशीक्षेत्र |
| १८ | अं. २६ | सिंहतूंड | सिंहतुंड |
| १८ | अं. १८ | एकंदत्त | एकदंत |
| | अं. १८ | पुष्पदं त्त | पुष्पदं त |
| | अं ३० | दंत्तहस्त विनायक | दंतहस्त विनायक |
| १८ | अं ३० | वक्रतुड | वक्रतुंडा |
| १८ | अं ३२ | त्रिलोने श्वर | त्रिलोच नेश्वर |
| १९ | | चथुर्थी | चतुर्थी |
| २० | अं०१५ | विनाका सन्निध | विनाय कासन्निध |

## ( परिशिष्ट २ रें. )

| | | | |
|---|---|---|---|
| १ | शिरोले ख | प्रबध | प्रबंध |
| १ | २ | होण्या पुर्वी | होण्या पूर्वी |
| १ | ९ | शुद्धर्थ | शुध्यर्थ |
| ४ | १५ | वर्णादान | वेर्णादान |
| ५ | २७ | मांवदे | मांवदें |
| ६ | ९ | लोक सं प्रदाय | लोकसं प्रदाय |
| ६ | २० | प्रायश्चि तार्थ | प्रायश्चि त्तार्थ |
| ७ | ११ | झालें | झाले |
| ९ | १ | हिंदुध र्मान्वयें | हिंदुध र्मशास्त्रा न्वयें |
| ९ | १ | होऊन | होऊन बहुत |

ह्या प्रमाणें दोष व चुक्या शुद्ध करून हें शुद्धिपत्र लिहिलें; ह्या खेरीज ज्या चुक्या व दोष शुद्धकरणें राहिले त्या बद्दल वाचकांनीं क्षमा करावी.